# HANSAKOSHA

# हंसकोश.

म्हणजे

महाराष्ट्र भाषेच्या कवितांमधील कठीण व निवडक शब्दांचा

कोश.

हा ग्रंथ परोपकार बुध्धीनें लोककल्याणार्थ

रा॰ रा॰ रघुनाथ भास्कर गोडबोले

याणीं रचिला

तो

मुक्काम पुणें पेठ शनवार येथें नारो आपाजी गोडबोले यांचे

छापखान्यांत छापिला

आवृत्ति पहिली.

शके १७८५

तारीख १ आक्टोबर सन १८६३ इसवी रोजीं तयार झाला

हा ग्रंथ सन १८४७ चा आक्ट २० प्रमाणें

रजिष्टर केला आहे

किंमत ३ रुपये.

# प्रस्तावना.

श्रीमत्परमेश्वर निर्मित महाभूमीच्या ठायीं, जें हें प्रसिध्ध भरत खंड आहे. यांतील कित्येक देशांत स्वस्व प्राकृत भाषांतून सगुण निर्गुण भगवत्स्वरूप विषयक अद्वैत शांति रसाचें कवितारूपानें व्याख्यान करणारे जे अलीकडे महान् महान् साधु कवि होऊन गेले आहेत, त्यांचे कविता शक्तीस आधार म्हटला असतां प्राचीन व्यास वाल्मीकि प्रभृति संस्कृत कविश्रेष्ट यांचीच काव्यें होत. तथापी, सूक्ष्म दृष्टीनें विचार करून पाहतां असें समजतें कीं, वरील कवींचीं काव्यें, कलियुग लागल्यावर थोड्याच अवकाशानें बौध्धादिक अनेक बाह्य मतानीं उच्छेदित करून नष्ट केलीं होतीं, तीं श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु याणीं, साकल्यें करून उदयास आणून आपल्या अत्युत्तमज्ञानभक्तियुक्त रसभरित वाणीनें भूषित केलीं, म्हणूनच अर्वाचीन कवींच्या कविता शक्तीस आधार झाली, एऱ्हवीं झालीं नसतीं, आणि असेंच आहे म्हणून, सर्व मोठ मोठे कवि त्यांस, आप आपल्या ग्रंथांत फार मोठा मान देऊन, अत्याल्हाद पूर्वक स्तुत्याभार रूपानें स्तवितात. अतएव कलियुगामध्यें संस्कृताचे आद्यकवि व सकल संस्कृत आणि प्राकृत कवींच्या कविताशक्तीस आधारभूत श्रीमज्जगद्गुरु-आचार्यच होत.

श्रीमज्जगद्गुरु यांच्या प्रस्थानत्रय व्याख्यानाचें प्रतीक घेऊन, प्रथमतःच त्यांचे शिष्य श्रीधराचार्य व सुरेश्वराचार्य ह्या दोघांनीं, श्रीमद्भागवत व्याख्या, वं वार्तिक व्याख्या अनुक्रमें करून लिहिल्या, आणि नंतर पुढेंही तोच आधार धरून संस्कृत व प्राकृत ग्रंथकार श्रीविद्यारण्य मुकुंद राजादिक याणीं, आप आपले ग्रंथ लिहिले.

श्री मुकुंदराज महाराष्ट्र भाषेचे अद्यकवि होत, हें बहुजन संमत आहेच. तथापी, कित्येक म्हणतात कीं, ज्यांचा जन्म युधिष्टिर शकांत झाला होता. व ज्यांस कविमालेंत धरून एकनाथानीं नमन केलें आहे. असे जे हट योग निपुण पुरुष चांगदेव वटेश्वर, ते आद्यकवि असावेत, त्यास विचार करून पाहातां ही गोष्ट सयुक्तीक आहे खरी, परंतु जसे वसिष्ठादिक पुरातन कवि असोन, संस्कृतांत आद्यकवीची पदवी वाल्मीकीसच मिळाली आहे. तसे चांगदेव वटेश्वर पुरातन प्राकृत कवि असतां ही, प्राकृतांत आद्य कवीची पदवी बहुजन संमतानें मुकुंदराजासच मिळाली आहे.

वर लिहिलेला चांगदेव यांचा जन्मकाळ, व कविताशक्ति, या दोहों वरून-

असें सिध्ध होतेंकीं, श्रीमच्छंकराचार्य हे त्यांच्या आधींचे फार वर्षें मागले होत. म्हणजे आणखी कित्येक आधार व विद्वानांचीसंमतें, यांवरून त्यांस होऊन गेल्या ला ४००० सुमारें वर्षें झालीं आहेत.

महाराष्ट्र भाषेचे आद्य कवि, व जयत्पाल राजाचे गुरु मुकुंदराज यांणीं, आचार्यांलिंकवरून प्रथमतः ओवीबध्ध असा विवेक सिंधुनामक ग्रंथ रचिला- व कांहीं अवकाशानें मागून परमामृत म्हणून लहानसें पुस्तक लिहिलें, त्या दोन ही ग्रंथांतील, ओव्यांचा विचार करून पाहातां, संस्कृता मध्यें जो अनुष्टुभ छंद आहे. त्याच्याच साम्यतेच्या त्या म्हणावयास चिंता नव्हती, परंतु त्यांचीं अक्षरें कधीं कधीं ३२ व कधीं कधीं दोन तीन अक्षरांच्या फेरानें अधिक किंवा उणीं अ शीं आढळतात, म्हणून, व अन्य कितीएक कारणांवरून, ओवी छंद हा संस्कृत- छंदाहून अगदीं भिन्न आहे, असाच निर्णय ठरला आहे.

दासबोधादि कितीएक लहान मोठे ग्रंथ, विवेक सिंधूच्याच ओवीचे आ हेत. परंतु ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत या ग्रंथांच्या ओव्या अनुक्रमानें विवे क सिंधूच्या ओव्यांहून नऊ नऊ दाहा दाहा अक्षरांनीं उण्याच अधिक अशा आ हेत, म्हणजे ज्ञानेश्वरीची ओवी बावीस अथवा चोवीस अक्षरांची व भागवताची ओवी ४२ किंवा ४४ अक्षरांची आदिकरून आहे, आणि यावरून ओवीच्या- परम लघुत्वाची व दीर्घत्वाची सीमा आतां लिहिलेल्या प्रमाणाहून अधिक अ थवा उणी नसोन, ही कविता, कवींच्या मर्जीप्रमाणें म्हणजे स्वछंद कविता आहे असें सिध्धहोतें.

ओवीबध्धकविता म्हणून जेवढी, तेवढी जशी स्वछंद आहे, असीच, अभं ग, नाना प्रकारचीं पदें, कटिबंध, व दोहोरे, आदिकरून कविता ही ही स्वछंदच आहे, संस्कृत छंदास अनुसरून कविताकरणारे एक वामन दुसरे मोरोपंत व- तिसरे रघुनाथ पंडित हे मात्र तीन कवि होऊन गेले. आणि, जरी यांची कवि ता शास्त्रीय छंदोबध्ध असून गोड आहे, तरी तीहून स्वछंद कवितेची मान्य- ता लोकांत फार आहे, स्वछंद कविता करणारें जें साधु मंडळ, त्यांत रामदास स्वामीकृत मन बोधाचे श्लोक, येवढे मात्र संस्कृत छंदास अनुसरून आहेत.

याप्रमाणें ज्या महाराष्ट्र भाषेच्या कवितारूप ग्रंथांतील निवडक निवडक- शब्दांचा संग्रह ह्यापुस्तकांत केला आहे, त्याग्रंथाच्याउत्पत्तीस मूळकाय, छंद को णता, व अक्षर नियम कसा असतो, इत्यादि संक्षेपें करून सांगितलें. आ तां ह्या पुस्तका विषयीं थोडेसें सांगतों, हें पुस्तक म्हणजे महाराष्ट्र भाषेच्या-

किती एक कवितां मधील कठिण शद्बांचा कोश भांडारा मध्यें, जसा अमोल व दुर्मिळ संग्रहार्ह वस्तुंचा संग्रह असतो, तसाच कवितां मधील ज्या शद्बां चा अर्थावबोध झाल्या शिवाय त्या उत्तम प्रकारें लागत नाहींत, अतएव जे कवितां मधील इतर शद्बांहून संग्रह योग्य, त्यांचा संग्रह यथामति ह्या कोशांत केला आहे.

कवितां मधील कठिण शद्ब कोश, रचण्या विषयींचा उद्गार मना मध्यें येऊन, केवळ आरंभ करून ठेवल्याला, सुमारें सात वर्षे झालीं, परंतु मला दुसरें कांही मोठें कार्य आधींच आरंभिलेलें सत्वर कडेस लावण्याचें अगत्य होतें. म्हणून हें काम तसेंच ठेऊन, मी तिकडे लक्ष दिलें, पुढें तें काम ही शके १७८१ मध्यें कडेस लागून गेलें, तरी कोशाचें काम हातीं धरण्यास चांगलेपणें मनांत येईना, तशांत मध्यंतरीं दासबोध ग्रंथापुरती लहानशी परिभाषा मजकडून लिहून तयार जाल्या मुळें तर, हें काम माजीच पडत चाललें होतें. तों कांहीं कारण परत्वानें मी पुण्यास आलों, व वर्ष साहा महिनें येथें राहाणार आहें. असें पाहून, हा कोश कडेस लावण्या विषयीं माझे कित्येक मित्र यांणीं फार गळ घातला, त्यांच्या भिडे मुळें मग नकार न करतां, किति एक ग्रंथ जमऊन, याजवर सतत आठ महिनें श्रम घेऊन, परोपकारोद्देशानें हें काम कडेस लावलें.

कोशरचना करत्ये वेळीं, दुर्बोधशद्बांस ग्रंथांतील ओव्या लावाव्या, अथवा संस्कृतादि संज्ञा त्यांपुढें दर्शवाव्या, हें मनांत नव्हतें. परंतु हें काम चाललें असतां रा॰ कृष्णशास्त्री चिपळोणकर यांणीं पाहिलें, तेव्हां त्यांणीं सुचविलें कीं, यांस ओव्या व संस्कृतादि संज्ञा लागल्या असतां फारच उपयोग लोकांस होईल, त्यावरून त्यांचा फार आभार मानून, मी त्या प्रमाणें व्यवस्था ठेऊन नाम विशेषणादि संज्ञा प्रति एक शद्बास ह्या अधिक लावल्या आहेत. आतां जरी मराठी शद्ब बहुधा संस्कृताचे अपभ्रंश आहेत तरी जे शद्ब ठळक अपभ्रंश दिसतात त्यांस मात्र त्या संज्ञा लाविल्याअसून इतरांची गणना प्राकृतांतच केली आहे

मी शद्ब निवडीत असतां यमकादि साधुणुकी सार्गी जे शद्बांचे फेरफार होजातते पुष्कळ अंशीं मला नियमित दृष्टीस पडूं लागल्या वरून, मनांत आलें कीं, यां विषईं कांहीं नियम बांधावे. मग सर्व शद्ब निवडून झाल्यावर एकंदरीनें फार विस्तार न होतां पाहूं लागलों तों, त्यांचे सोळा नियम होऊं लागले, मग त्यांचे तिलके-नियम बांधून, व त्यांचा दृढाभ्यास होण्या करितां किती एक प्रश्नोत्तरें त्यांस-जोडून, एक टिपण कोशास जोडण्या करितां तयार केलें, आणि कवितां मधून श

ह्यांस प्रत्यय व अव्ययें कोण कोणती लागताततीं, व क्रियाविशेषणें, हीं हीं संपूर्ण निवडून काढून दुसें टिपण ही जोडण्या करितां तयार केलें, हीं दोन ही टिपणें अगदीं निःसंशय झालीं आहेत.

कविते मध्यें क्रिया पदाचें प्रकरण फार चमत्कारीक आहे, त्यानें ही एटिपण करावें असें मनांत मात्र आलें होतें- परंतु तो विच्यार फार बारकाव्याचा असल्या मुळें, सध्याच्या प्रसंगीं तिकडे चित्त देण्याचें मनांतून नसतांही, वर लिहिले ले माझे विद्वानमित्र यांची त्याविषयीं फार अभिरुची दिसल्या मुळें, यथामतित्याचाही थोडासा विचार करून, जी माला सिध्ध केली, तें तिसरें टिपण ह्या कोशास जोडिलें, व हें जरी पूर्ण दशेस आलें नसलें तरी येवढ्यावरून कवितां मधील क्रियापदांची पुष्कळ समजूत पडेल असा भरंवसा आहे.

महाराष्ट्र भाषेंत जे आजपर्यंत कवि होऊन गेले. त्यां मध्यें बहुतेकांचीं वर्णनें किती एक ग्रंथांतून आलीं असोत, ज्यांचीं नावें सुध्दांच आलीं नाहींत. अथवा नावें आलीं असोत ज्यांच्या कविता आल्या नाहींत. त्या अवशिष्ट कवि व कवितां विषयीं संक्षेपसें लहानच टिपण रा० कृष्णराव रामचंद्र याणीं आणून दिल्हें, तें आल्हाद पूर्वक ग्रहण करून ह्या कोशास चौथें असें म्हणून जोडिलें.

या प्रमाणें कोशास पूर्वोक्त टिपणें जोडण्याचीं सिध्ध झाल्यावर मनांत आलें कीं, ह्यांत थोडे कवितां मधील वेंचे घालावे मग तेही थोडेसे जमा करून त्यास जोडिले, आणि ह्या ग्रंथांत सार सार अशा निवडक प्रकारांचा संग्रह आहे म्हणून याचें नांव **हंसकोश** असें ठेविलें.

## कोशपाहण्याची सूचना.

ह्या कोशांत एका शब्दाचे जे नाम विशेषणादि भेदें करून अनेकार्थ कवितेंत होतात. तितके ही तो शब्द एक वारच लिहून त्यापुढें आंकडे व ओव्यांच्या संज्ञा घालून लिहिले असून, कोठे कोठे समयास सुचलीं तसीं वाक्यें ही लिहिलीं आहेत. तर कोश पाहाणारानीं जो अर्थ ज्या प्रसंगास इष्ट असेल तो घेत जाऊन कोणतीही कविता पाहात जावी.

अ, आ – ए, ये – ण, न – ओ, वो आदि करून अक्षरांचा ओवी बध्ध मराठी कवितेंत फार घोटाळा आहे. म्हणून तशा शब्दांची साधारण पणानें निवड करव ली तितकी केली, व जेथें दोन ही प्रकारच्या शब्दांची प्रबळ रूढी दिसून आली, तेथें दोनी ही प्रकार निश्चित करून कोशांत ते शब्द कोठे कोठे दुहेरी लिहिले.

ह्या कोशांत जे शब्द पाहातांच अर्थ मनांत येत नाहीं, त्यांस मात्र ओव्यांच्या सं

ज्ञा केल्या आहेत, त्यांत कोठे कोठे शेंकडा एकदोन शद्बांस ओव्या लागणें अवश्य असून लागल्या गेल्या नाहींत, त्यां विषयीं सज्जनानीं क्षमा करावी. व कोठे कोठे ओव्यांचे सलग दोन दोन आंकडे आले आहेत. ते प्रतीच्या विरोधामुळें ग्रंथ पाहाणारांस पुढें आडचण पडूं नये म्हणून आले आहेत. इतक्यावरही यांत लिहिलेले आंकडे कदाचित्त एकाद्या प्रतीशीं न मिळतील तर दोन तीन ओव्यांच्या फेरानें कोश पाहाणारांनीं ते पाहात जावें.

महाराष्ट्र कवितांचे ग्रंथ, वेदांत शास्त्र पध्धतीस अनुसरून असतात. म्हणून त्यांचे अर्थ जसे होतात तसेच उत्तम प्रकारें लिहिलें आहेत, त्यांत कोणास हात घालण्या जोगें ठेविलें नाहीं, व जेथे लक्षणें लिहिण्याचा प्रसंग आला तेथेंतीं, सुलभ सुलभ शद्बांनीं लिहून सत्वर ध्यानांत येतील असें केलें आहे.

महाराष्ट्र कवितो द्देशानें हा कोश पाहाणारांस विशेषें करून असें सांगणें आहे कीं, केवळ त्याणीं शद्ब पाहाण्यांत निमग्न होऊं नये, तर प्रथम शद्ब पाहून पुढें शद्बाचा अर्थ मनांत आणण्याचा यत्न करीत जावा. व अर्थ मनांत आणल्यावर त्याच्या वरची पदवी ज्या द्वारानें मिळेल तें द्वार शोधून, ती साध्य करावी. खालीं खालीं घसरत जाऊं नये या विषयीं पंचदशी मध्यें ब्रम्हानंदाच्या पहिल्या आध्यायांत जे वाक्य आहे, ते येथे लिहून दाखविलें पाहून स्वहितेछु याणीं वर्तणूक ठेवावी.

श्लोक

॥शद्बानेव पठ स्याहो तेषामर्थंच पश्यसि ॥
॥शद्बपाठेऽर्थबोधस्ते संपाद्यत्वेन शिष्यते ॥१॥
॥अर्थे व्याकरणाद्बुध्ये साक्षात्कारोऽवशिष्यते ॥
॥स्यात्कृतार्थत्वधीर्यावत्तावद्गुरुमुपास्व भो ॥२॥

आतां प्रस्तावनेचा उपसंहार करितांनां शेवटील प्रार्थना ही आहे कीं, ह्या कोश रचत्येसमयीं, महाराष्ट्र भाषेंतले कठिण शद्ब प्रचुर. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथी भागवत, रुक्मिणीस्वयंवर, दासबोध, रामविजय, शिवलीलामृत, वाक्यवृत्ति, मोरोपंती कित्येक आर्या, व वामनी कित्येक श्लोक, आदि करून निवडक निवडक ग्रंथ घेऊन, त्यांतले ही निवडक निवडक शद्ब तितके यथामती निवडून, जो हा ग्रंथ सिध्ध केला, यांत शद्ब एकंदर सात हजारांवर आहेत, तरी हे शद्ब थोडे म्हणून सज्जनांनीं उदास होऊं नये, कांकीं प्रत्यय व अव्ययें यांचें टिपण यांत असल्यानें. तसेच क्रियापद माला व सोळा नियम यांत गुंफू

न गेयल्यानें, कोशांतील शद्बांशिवाय शतावधीशद्बांचा संग्रह यांत झालेला न आहे, तथापी, सकलभूत मात्रनिवासी परमात्मा यास, तत् संतोषार्थ हें कार्य, स्वशक्त्यनुरूप लहानशा उपायनरूपानें समर्पण केलें आहे.

## ह्याग्रंथांत मानलेल्या संज्ञाची सूचना.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विवे॰ | म्हणजे | विवेकसिंधु. | दा॰ | म्हणजे | दासबोध. |
| पू॰ | म्ह॰ | पूर्वार्ध्द. | द॰ | म्ह॰ | दशक. |
| उ॰ | म्ह॰ | उत्तरार्ध्द. | स॰ | म्ह॰ | समास. |
| प॰ | म्ह॰ | परमामृत. | आग॰ | म्ह॰ | आगमसार. |
| ओ॰ | म्ह॰ | ओवी. | पंचि॰ | म्ह॰ | पंचिका. |
| ज्ञा॰ | म्ह॰ | ज्ञानेश्वरी. | सदा॰ | म्ह॰ | सदाचार. |
| अ॰ | म्ह॰ | अध्याय. | वा॰ | म्ह॰ | वाक्यवृत्ति. |
| अमृ॰ | म्ह॰ | अमृतानुभव. | सं॰ | म्ह॰ | संस्कृत. |
| प्र॰ | म्ह॰ | प्रकरण. | सं॰अप॰ | म्ह॰ | संस्कृताचाअपभ्रंश. |
| भा॰ | म्ह॰ | भागवत एकनाथी. | प्रा॰ | म्ह॰ | प्राकृत. |
| रुक्मि॰ | म्ह॰ | रुक्मिणीस्वयंवर. | ना॰ | म्ह॰ | नाम. |
| धा॰ना॰ | म्ह॰ | धातुसाधितनाम. | वि॰ | म्ह॰ | विशेषण. |
| क्रि॰ | म्ह॰ | क्रियापद. | क्रि॰अव्य॰ | म्ह॰ | क्रियाविशेषण अव्यय. |
| श॰अ॰ | म्ह॰ | शद्बयोगी अव्यय. | | | |
| स॰ना॰ | म्ह॰ | सर्वनाम. | अव्य॰ | म्ह॰ | अव्यय. |
| धा॰अ॰ | म्ह॰ | धातुसाधितअव्यय. | संबो॰ | म्ह॰ | संबोधन. |
| मुक्ते॰वन॰ | म्ह॰ | मुक्तेश्वरीवनपर्व. | धा॰वि॰ | म्ह॰ | धातुसाधितविशेषण. |

☞ ह्याग्रंथांत हर एक प्रकारें सुधारणा करणेंव पुनरावृत्ति छाप णें आदिकरून सर्व प्रकारचा हक्क ग्रंथकर्त्यानीं आपल्याकडे ठेविला आहे.

# अनुक्रमणिका.


भागपहिला ———————————— पृष्ठ

१ प्रकरण पहिलें किती एककवींचें वर्णन . . . . . . . . . . . . . १

२ प्रकरण दुसरें किती एक कवितांमधील वेंचे . . . . . . . . . . ३

एकनाथकृत चतुःश्लोकी भागवत वेंचे . . . . . . . . . . ३

एकनाथकृत हरुलामलक वेंचे . . . . . . . . . . . . . . ४

मुक्तेश्वरकृत नारदनीति . . . . . . . . . . . . . . . . . ९

वामनी अजामिल आख्यान . . . . . . . . . . . . . . . १५

वामनी नरहरिदर्पण . . . . . . . . . . . . . . . . . . १७

३ प्रकरण तिसरें कवितांमधील प्रत्यय व अव्ययें आदिकरून . . . २०

प्रत्यय . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २०

अव्ययें . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २१

गुणविशेषणें व क्रियाविशेषणें . . . . . . . . . . . . . . २२

४ प्रकरण चौथें कवितांमधील क्रियापदें . . . . . . . . . . . . २४

५ प्रकरण पांचवें कवितांमधील शब्दांचें रूपांतर नियम . . . . . ४१

भागदुसरा कोश . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

श्री.

# कवि आणि कविता यांविषयीं जो विशेष शोध लागला त्याचें वर्णन.

## भाग पहिला.

### प्रकरण १

### श्रीरंगनाथ.

रंगनाथ स्वामी कविमालेंत प्रख्यात आहेत, यानीं केलेल्या पदांविषयीं ची सर्वांस माहिती आहे, परंतु यांची लघुवासिष्ठावर ओवीबध्ध टीका आहे. ती विषयीं कोणास माहिती नाहीं; ही टीका प्रस्तुत निगडी इ सातारा येथें आहे.

### श्रीबहिरंभट्ट.

हा कवि ब्राह्मण होता, याचें वर्णन फार चमत्कारिक व भक्तिविजयांत लिहिलेलें आहे. तो मोठा विद्वान् व कवि होता. श्रीमद्भागवताच्या दशम स्कंधावर याची ओवी बध्ध टीका आहे; व ती चाळीस हजारांवर आहे.

### शिवकल्याण.

ह्या कवीनें अमृतानुभवावर शके १५२७ सांत टीका केलेली आहे.

### मेरूकवि.

ह्यानें अवधूत गीतेवर टीका केली आहे.

### माधवदास.

ह्या कवीनें वासिष्ठावर टीका केली आहे.

### श्रीरत्नाकर.

चांगदेव वटेश्वर यांच्या शिष्यपरंपरेंत हा कवि होऊन गेला आहे; यानें जो ग्रंथ केला आहे त्याचें नाव दीपरत्नाकर. हा ग्रंथ ओवी बध्ध व सुमारानें पांच हज्जार आहे. हा कवि श्रीरामदासस्वामी यांच्या मागून झाला असल्या विषयीं या ग्रंथांत एके ठिकाणीं उल्लेख आला आहे.

### नारायणबावा.

ह्या कवीनें ज्ञानसागर, बोधसागर, आनंदसागर, आदिकरून सात ग्रंथ आहेत. हे साताऱ्या जवळ ब्रह्मारण्यांत राहात असत, आणि यांस होऊन गेल्याला सुमारें ५० वर्षें झाली आहेत.

## श्री नारायण हंस महाराज दुसरे हंसराज.

नारायण हंस महाराज हे ऋग्वेदी ब्राम्हण मूळचे रोजगारी होते; गोदावरी च्या उत्तरेस परभणी म्हणून गांव आहे तेथले हे राहाणारे होत. यांचें वर्णन हंस पध्धती नामक ग्रंथाच्या सातव्या अष्टकांत समग्र लिहिलेलें आहे. त्यांचे पहिलें नाव नारायण. असे आदिनारायणा पासून सातवे रामदास स्वामी होत. व रामदा सस्वामी पासून सातवे नारायण हंस होत यांच्या नावा पुढें हंस अशीं अक्षरें लाग ताल त्यांचें कारण ते परमहंस होते हें आहे. आदि कल्पांत आदिनारायण हंसरू पानें प्रगट होऊन त्याणें सनकादिकांचें समाधान केलें. त्याचेच रामदास स्वामी व नारायण हंस हे दोन अवतार कलियुगांत झाले. म्हणून रामदासास पहिले हंस किंवा हंसराज आणि नारायण हंसास दुसरे हंसराज अशी नामव्यवस्था आ हे. शालीवाहन शके १७२० सांत हे प्रकट होऊन १७७७ सांत वैशाख शुध्ध ८ मी स समाधिस्थ झाले. यांची समाधी परंडा येथें असून यानीं ग्रंथ केले ते यणें प्र माणें

### ग्रंथाचीं नावें येणे प्रमाणे.

१ वेदेश्वरी नामक शिवगीतेवरील टीका १००००.

२ कथा कल्पलता नामक वेदांत विषयां चीं रूपकें. १००००.

३ आगमसार नामक ग्रंथ. ३५००.

४ श्रीमच्छंकराचार्य कृत् सदाचार टीका २१००

५ श्रीमच्छंकराचार्य कृत् लघुवाक्यवृत्ति टीका. ५६००.

६ ग्रहद्वासिध्धांत गत चूडाल आख्या न अभंग शतकें २२.

७ अमृतानुभव सम ओवी टीका ८००

८ दासबोधोपपत्ति विषयीं संकेत कु बडी-१५००.

९ ईशावास्य उपनिषद टीका. ५००

१० वेदनावाचीं पदें व अभंग. ३००.

११ गद्य रूप तत्व झाडा ग्रंथ सुमारानें ३०००.

याशिवाय भक्ति,ज्ञान, वैराग्य पर. किती येक स्फुट अभंग लिहावयाचे होते परंतु समाधिकाळ जवळ आला जाणून हंसराजानीं तें काम त्यांचे पूर्ण कृपा पात्र जे पुरुष त्यांजकडे सोंपलें ते अभंग कांहीं हंसराजाच्या समक्ष व कांहीं मागून सिध्धीस गले त्यांची संख्या ३४४० असून त्यांत हंसदास किंवा हंसकुल प्रभु आशा अर्थाचें नाव येत असतें.

### पूर्णानंद स्वामी.

यानीं पंचदशिवर ओवीबध्ध टीका चांगली केलेली आहे.

### माणीकप्रभु.

हा कवि सांप्रत हुमनाबाद येथें विद्यमान आहे यानें केलेलीं पदें फार चांगलीं असून हरदास लोकांच्या तोंडीं पुष्कळ आहेत

### निमणराज व संजीवन.

हे दोघे कवि प्रस्तुत विद्यमान आहेत यानीं हंसपध्धत्ति नामक ग्रंथरचलेला फार सुंदर आहे. यांत रामदास स्वामीचीगुरुपरंपरा व शिष्य परंपरा याविषयींचें वर्णन आहे. हा ग्रंथ सुमारानें १००० येईल.

कृष्णराव रामचंद्र.

## प्रकरण २

## एकनाथ.

॥ चतुःश्लोकीभागवत. ॥

॥ अवधाराग्रंथकथन ॥ कल्पादिजेंपुरातन ॥ हरिब्रम्ह्यांचेंजुनाटज्ञान ॥ तेथेअवधानश्रोतांद्यावें ॥ २५ ॥ कृपाकरींगाअच्युता ॥ धांवेंपावेंभगवंता ॥ याएकार्णवाआंतोता ॥ होईंरक्षितामज स्वामी ॥ ७० ॥ घडावयाभगवद्भक्ति ॥ तपादिसाधनयुक्ति ॥ देवो सांगे ब्रम्ह्याप्रती ॥ ऐक परिक्षितीनृपवर्या ॥ ८६ ॥ ककारापासूनमकार वरी ॥ वर्णाशीस्पर्श म्हणिजे शास्त्रकारीं ॥ त्यांत तकारू सोळावानिर्ध्यारी ॥ पकारुउच्चारीएकविसावा ॥ ८९ ॥ ऐशींतपयेअक्षरें दोन्हीं ॥ परमेष्टीऐके कानीं ॥ तेचिदोनीवेळाकरोनी ॥ तपतपध्वनि परिसताझाला ॥ ९० ॥ म्हणेंतालुवोष्टपुटेंवीण ॥ नव्हेअक्षरांचें उच्चारण ॥ होका येथे बोलिलाकोण ॥ देहधारीआनदिसेना ॥ १०१ ॥ तपयानामाची काय स्थिती ॥ तपेंपाविजेकोणप्राप्ति ॥ ऐशीविधाताचित्तीं ॥ तपाची स्थितीगति विचारीस्वयें ॥ २ ॥ तप म्हणिजेपरमसाधन ॥ येणेंसाधेआत्मनिधान ॥ ऐकोनीमी असावधान ॥ ऐसेंस्वहितस्फुरणहृदयीं स्फुरलें ॥ ३ ॥ तप म्हणजेनव्हे स्नान ॥ तप म्हणिजेनव्हे दान ॥ तपनव्हे शास्त्रव्याख्यान ॥ वेदाध्ययननव्हेतप ॥ ८ ॥ तप म्हणिजेनव्हे योग ॥ तपम्हणिजेनव्हे याग ॥ तपम्हणिजे वासनात्याग ॥ जेणें तुटतीलाग कामक्रोधाचे ॥ ॥ ९ ॥ जेणेंदंभलोभनिःशेषआटे ॥ अहंममता समूळतुटे ॥ याचिनावेंतपगोमटें ॥ मानीनेटपाटें विधाता ॥ १० ॥ निष्ठाकेलियातपस्थिती ॥ जाहलीसद्गुरूचीप्राप्ति ॥ आतांगुरुमुखें प्रजापति ॥ आत्मप्रतितीपावेल ॥ १५६ ॥ जैंपूर्वपुण्याच्यानिष्कामकोडी ॥ तैंसद्गुरुचरणजोडतीजोडी ॥ जैंगुरुचरणीं

आवडी गादी॥ तैं पाविजे रोकडी ब्रम्हप्राप्ति॥१५७॥ गुरुच्या गायींनीच पण॥ शिष्यें देखिलिया जाण॥ अनुमान करिलां हेळण॥ ब्रम्हज्ञान कदां नुपजे॥१५८॥ गुरुतें पाहलां मनुष्यबुध्धि॥ ज्ञान न देगा त्रिशुध्धि॥ यालागी हरि कृपानिधि॥ निजवैभव सिध्धिस्त्र ध्यास दावी॥५९॥ जो सी तुझें नित पें संतोषलों॥ प्रत्यक्ष तुजलागीं भेटलों॥ तो मी हृदयस्थ दुरी केलों॥ तुझ्या पझालों कूटयोगियां॥२०१॥ कूट ऐसें देहा लें म्हणती॥ त्या देहासी ज्यासी आसक्ति॥ त्यासी कदां न व्हे माझी प्राप्ति॥ जाण निश्चित कूटयोगी ते॥२०५॥ संतोषोनी श्रीनारायण॥ ब्रम्ह या म्हणे आपण॥ जें अभिष्ट वांछी तुझें मन॥ तो वर संपूर्ण माग वेगीं॥२०७॥ ऐक स्वामी विश्वनाथ॥ तूं अनाथांचा निज नाथ॥ मज करावें जी सनाथ॥ ऐसें प्रार्थित उपतप्यमान॥३२९॥ कां म्हणशी उपलप्यमान॥ मी केवळ झालों जी अज्ञान॥ त्या मज वरी कृपा करून॥ निज शुध्द ज्ञान सांगावें॥३३०॥ विषयवासनें वीण॥ वृत्तीशी जें विवेक स्फुरण॥ त्या नाव बोलिजे ज्ञान॥ सत्य जाण स्वयंभु॥३९७॥ चिद्रूपें वृत्तीचें स्फुरण॥ त्या नाव बोलिजे ज्ञान॥ तें चि स्वयें होइजे आपण॥ या नाव विज्ञान विधातिया॥३९८॥ देहाचें जाउनी अहंपण॥ ब्रम्हाहमस्मि स्फुरे स्फुरण॥ ते स्फूर्ति ही विरे संपूर्ण॥ या नाव विज्ञान पूर्णत्वाचें॥३९९॥ हे पावावया पूर्ण प्राप्ति॥ भावें करावी भगवद्भक्ति॥ ते भक्तिची निजस्थिती॥ ऐक तुज प्रती सांगेन॥४०२॥ भगवद्भाव सर्वभूतीं॥ या नाव मुख्य माझी भक्ति॥ हें चि भजन त्या अनहंकृती॥ विज्ञानप्राप्ति जें त्याशी॥४०३॥ ॥७॥

## हस्तामलक.

॥ कोणी एक ब्राम्हणाच्या गृहीं॥ परम भाग्यास्तव पाहीं॥ जन्मला चमदेही॥ त्याचें वैभव तिहीं नेणिजे॥३२॥ जेवीं शुक्तिके माजी रत्न॥ का लोहा माजी गुप्त धन॥ तेवी त्याचे हृदयींचें ज्ञान॥ इतर जन नेणती॥३३॥ कोहं भावें करावें रुदन॥ सोहं भावें हास्यवदन॥ दोन्ही सांडोनी आपण॥ मुळींचें मौन अखंडलें॥३४॥ राहोन फोडी बाळक॥ तेथें मिळाले सकळ लोक॥ अवघे म्हणती अलोलीक॥ निश्चयो येक न करवे॥३६॥ मेत म्हणो तरी प्राण आहे॥ अंध म्हणों तरी पाहे॥ हें ठायींचें रडों नेणें काय॥ अभिनव माय बाळक॥३७॥ झालीं अष्टवरुषें पूर्ण॥ केवीं करूं उपनयन॥ जन्मोनी याशी लागले मौन॥ गायत्री स्मरण करीना॥४२॥ ऐशी त्या बाळकाची स्थिती॥ तेव समर्पी सहज गती॥ श्रीशंकरा

चार्यभिक्षार्थी॥ साग्रहामतीस्वयेंआले॥४६॥ व्यवहारीलोकअतिसधन॥आ
णीकआग्निहोत्रीसुब्राम्हण॥ भिक्षार्थीआचार्यांशीआपण॥ बहूसालज्जनप्रार्थि
ती॥४७॥ उपेक्षून त्यांचियेभिक्षेसी॥साक्षेपेंआलेत्यागृहासी॥देखोनबाळका
चीस्थितीऐसी॥ झालेसंतोषीआचार्य॥४८ देखोनियांत्याचींचेन्ह॥जाणोनत्या
च्याहृदयींचेंज्ञान॥ शंकराचार्यसुप्रसन्न॥स्वयें संतोषोनसुखमय झाले॥४९
॥अतिशयेंश्रीश्रीशंकरु॥ करितेझाले प्रश्नादरु॥ ज्ञानविज्ञाननिजनिर्धारु॥
आत्मसाक्षात्कारप्रगटावया॥५१॥ ॥श्रीशंकराचार्यउवाच॥ ॥ श्लोक॥
कस्त्वंशिशोकस्यकुतोसिगंताकिंनामतेत्वंकुतआगतोसि॥ एतन्मयोक्तंव
दचार्भकत्वंमत्प्रीतयेप्रीतिविवर्धनोसि॥१॥ ॥टीका॥ तूं कैंचा कोणाचा को
ठील कोण॥तुझें कोठून आगमन॥ काय नाव कोण वर्ण॥पुढारें गमन तुज को
ठे॥५६॥ऐसाआचार्यांचाप्रश्न॥ ऐकतांप्रकाशलें निजज्ञान॥ जेवीलागतांर
विकिरण॥ सूर्यकांत संपूर्णप्रभादावी॥५९ देखोनीपूर्णिमापूर्णचंद्र॥ भरितेंन
खवळेक्षीरसागर॥ तेवीदेखोनीप्रश्नादर॥ ज्ञानाब्धिअपारउलथलेंभरितें॥
६०॥ होतांवसंताचें आगमन॥ कोकिळासांडीनिजमौन॥ तेवीआचार्यांचेंऐ
कतांवचन॥ विसर्जीमौन यावज्जन्म॥६१॥ऐकतांआचार्यांचेंवचन॥करत-
ळामळप्रकाशीज्ञान॥ यालागीं तेंचिअभिधान॥हस्तामलकजाणम्हणतीयें
॥६३॥ हस्तामलकउवाच॥ श्लोक ॥ नाहंमनुष्योनचदेवयक्षोनब्राम्हण
क्षत्रियवैश्यशूद्रः॥नब्रम्हचारीनगृहीवनस्थोभिक्षुर्नचाहंनिजबोधरूपः॥
॥१॥ टीका ॥ हस्तामलकें आपण॥ आपुल्यास्वरूपाचें लक्षण॥देहातीत
पूर्णपण॥ स्वयें संपूर्णसांगतु॥६४॥ मजलोकमानितीमाणुसपण॥मी
मनुष्यनव्हेंचिआपण॥ मीमनुष्याचा आत्माजाण॥ सबाह्यपरिपूर्णपरमा
त्मातोमी॥६५॥ इंद्रचंद्र वरुण॥मीनव्हें देवीदेवगण॥ माझेनिदेवा देवपण॥मी
परमात्मापूर्णदेवाधिदेवो॥६६॥ विष्णुविरंचीमहेश॥हेही माझेअंशांश॥मी-
परमात्मापरेश॥ जगदादीजजगदीशमीचमीस्वयें॥६७॥ यक्षराक्षसपिशाच
क॥तेमीनव्हे त्याचाचाळक॥ सकळभूतांचामीपाळक॥भूताभूतखदेखमा
झेनिअंगें॥६८॥मीनव्हेगाब्राम्हण वर्णी॥ माझेनिब्राम्हणा ब्राम्हणपण॥मी
ब्राम्हण पेदेवआपण॥पूज्यब्राम्हणमाझेनितेजें॥६९॥मीक्षत्रियनव्हेआप
ण॥क्षेत्र्यांचा प्रताप तोमीजाण॥माझेनिक्षत्रियाक्षत्रियपण॥शौर्यधैर्यपूर्ण
क्षत्रियांचेंसी॥७॥मजनाहीं वैश्यपण॥मीवैश्यांचेंनिधिनिधान॥माझेनिवैश्या
वैश्यपण॥ मीनिधिनिधानवैश्यांचें॥७१॥ मीनव्हेंशूद्रवर्ण॥ मीचाचा-

नीचमीआपण ॥ मजहून स्वालुतेपण ॥ आनासीजाणअसेना ॥ ७२ ॥ जयाशी आतळतांभीतीनारी ॥ तोमीनव्हेब्रम्हचारी ॥ माझेनिब्रम्हचर्याचीथोरी ॥ भोगून नरनारीनैष्ठिकीतोमी ॥ ७३ ॥ जेवीचोहरेंलिहिलींभिंतीवरी ॥ तेथें मिथ्यानोव रानोवरी ॥ तेवीं सुखींनाहींनरनारी ॥ ब्रम्हचारीनैष्ठिकस्य ॥ ७४ ॥ देहगेहद्रव्य- दारा आसक्त ॥ तेसामीनव्हेंगृहस्थ ॥ देहगेहद्रव्यदारा अनासक्त ॥ तोमीगृह स्थत्रैलोक्यगृहीं ॥ ७५ ॥ वनींवसोनियांवानप्रस्थ ॥ तेसामीनव्हेजाणयेथ ॥ माझेनिजनवन प्रशस्त ॥ वनवासीं विश्रांतमज्ञावभावें ॥ ७६ ॥ वेदें लाविलेंभि केशी ॥ तेसामीनव्हें सन्यासी ॥ नजाळून जाळिलें सर्वकर्मासी ॥ मीनित्य सन्या सीगृहदारीं ॥ ७७ ॥ देवमनुष्य यक्षनव्हेशी ॥ चारीवर्णनव्हेम्हणसी ॥ ब्रम्हचा रीगृहस्थाशी ॥ तूंनम निसीभिक्षुत्व ॥ ७८ ॥ इतुकेन होनियांजाण ॥ म्हण शी तूंयेथेकोण ॥ त्याही स्वरूपाचेंलक्षण ऐकेंसंपूर्णगुरुवर्या ॥ ७९ ॥ शुध्ध बुध्धनित्यमुक्त ॥ चिन्मात्रैकसदोदित ॥ निजानंदें आनंदभरीत ॥ तोमीयेथे निजबोध ॥ ८० ॥ जरी तूंनिज बोध आपण ॥ त्यानिजबोधाचेंलक्षण ॥ विशद सांगावें संपूर्ण ॥ हेमनोगत पूर्ण आचार्याचे ॥ ८१ ॥ त्यामनोगताचेंमहिमान अ तिगुह्यब्रम्हज्ञान ॥ सबाह्यसखाश्रीजनार्दन ॥ एकाएकपण ग्रंथार्थें आलें ॥ ॥ ८२ ॥ ॥ यापरीकरतळामळक ॥ ज्ञान बोलिलातोबाळक ॥ तेणें आचार्या शीपरमसुख ॥ श्लोकेंश्लोक संपला ॥ ६३४ ॥ संपलें ज्ञान निरूपण ॥ कोंदाटलें ब्रम्हपूर्ण ॥ तेणें आचार्य आपण ॥ बाळकापूर्ण आळिंगीतेझाले ॥ ६३५ ॥ दोन्ही श्लोक पूर्वप्रश्न ॥ बाराश्लोक गुह्यज्ञान ॥ त्याचें केलें व्याख्यान ॥ ब्रम्हपरिपूर्ण पूर्णलें ॥ ६३६ ॥ हे चवदा हीश्लोकजाण ॥ चौदाविद्यांचें निजजीवन ॥ जीवीं जीवासमाधान ॥ हें निरुपण हस्तामलक ॥ ६३७ ॥ त्याहस्तामलकाचेंलक्षण सर्वावरिष्टश्रेष्ठपण ॥ तेंही सांगेननिरूपण ॥ श्रोतां अवधानमज द्यावें ॥ ६४२ ॥ त्याबाळकाचे सुहृदजन ॥ त्यांशी आचार्यपुसे आपण ॥ हामपन्नींचावेडापू र्ण ॥ कार्यकारण जाणेना ॥ ६४३ ॥ हा मद्दृत्तीशीनयेकामा ॥ परमार्थदानद्या वा आम्हा ॥ हे आचार्याचीवचनगरिमा ॥ त्याआम्हणोत्तमामानली ॥ ६४४ ॥ केवळ अबोलणेंलेंकरूं ॥ त्याशी विज्ञान बोलवीशंकरू ॥ हात्यांसांचद्यावासं मधारू ॥ ऐसानिजनिर्धारु दृढकेला ॥ ६४५ ॥ त्याचेंकरऊन उपनयन ॥ सर्वें चिश्रीशंकरकरीमुंडण ॥ पूर्णसन्यास देउनीजाण ॥ घेऊन आपणनिघाला ॥ ६४६ ॥ अद्यापीव्यास पूजेसी ॥ पूज्यत्व हस्तामलकाशी ॥ पाहतांसन्यासपध्ध तीशी ॥ श्रेष्ठत्व त्यासीआचार्यलें ॥ ६४७ ॥ ॥७॥ ॥

## श्रीशंकराचार्यगुरुपरंपरापध्धतिचें वर्णन.

मुळींमुख्यश्रीनारायण॥ त्याचाशिष्यचतुरानन॥ तेणेंउपदेशिलाआप
ण॥ नारदजाणमहामुनी॥ ६४९॥ नारदेंउपदेशिलाश्रीव्यास॥ व्यासेंउप
देशिलेंश्रीशुकास॥शुकेंउपदेशिलेंगौडपादास॥ येथूनसन्यासपध्धति॥
६५०॥ सन्यासगुरुगौडपादाचार्य॥ तच्छिष्य गोविंदपादपूज्यवर्य॥ तेणें केले
शिष्यद्वय॥ विवरणाचार्य आणिशंकरु॥ ६५१॥ प्रबोधधैर्य अतिवीर्य॥ ज्ञान
गुणेंगुणगांभिर्य॥ निजात्मज्ञानें अतिऔदार्य॥ तोशंकराचार्य चिन्मूर्ति॥
६५२॥ दशाचार्यदशसन्यासी॥ जेबोलिले व्यास पूजेसी॥ त्यांचियासांगेन
विभागासी॥ यथान्वयेंसीपध्धति॥ ६५३॥दशाचार्याचीविविधथोरी॥ पूर्वा
चार्यश्रेष्ठचारी॥श्रीशंकरापासोनीज्ञान गजरीं॥ आचार्यत्व साहीजणा॥
६५४॥आदो गौडपादाचार्य॥ दुसरागोविंदभगवत्पादवर्य॥ त्यापासूनवि
वरणाचार्य॥ आणिमुख्यआचार्यश्रीशंकरु॥ ६५५॥ ॥७॥ ॥

## श्रीशंकराचार्यपासून षडाचार्यत्यांचीं नांवें

विश्वरूपाचार्यतोएक॥ पृथ्वीधराचार्यदुसरादेख॥ सहजाचार्यतिसराह
स्तामलक॥ चौथाश्रीधराचार्यभागवतव्याख्याता॥ ६५६॥ पद्मपादाचार्य
त्रोटकाचार्य॥ इतुकेनसंपलेदशाचार्य॥ सन्यासामाजी अतिवर्य॥ परमशौ
र्यज्ञानाचें॥ ६५७॥ आश्रमधर्म अतिवीर्य॥ ज्ञानध्यानेंश्रेष्ठशौर्य॥ तेच्चव
घेझाले मठाचार्य॥ मठपर्यायि तोऐका॥ ६५८॥

## आणखीआचार्याचेउपदेशी१०दाहा ते येणेंप्रमाणें

श्रीशंकराचार्य उपदेशी॥ झालेआणीकदशसन्यासी॥ सांगेन त्यांच्यानावा
सी॥ यथान्वयेसीविभाग॥६५९॥ तीर्थआश्रमवन अरण्य॥ गिरीपर्वतसा
गरजाण॥ सरस्वतिभारतीनामाभिधान॥ पुरीनेंपूर्णदाहाहोनामें॥
॥६६०॥ ॥७॥ ॥७॥ ॥७॥

## मठपर्याय.

॥ द्वारकामठ पश्चिमसमुद्रीं ॥ तेथें विश्वरूप आचार्यत्वरी ॥ तीर्थ आश्रम तेथींचे-
अधिकारी ॥ त्यामठामाझारी वसताती ॥ ६६१ ॥ बद्रिकाश्रम जो कामठ ॥ त्रोटका
चार्य तेथें वरिष्ट ॥ गिरीपर्वतसागरश्रेष्ठ ॥ मठीं उद्भट वसिन्नत्यांशी ॥ ६६२ ॥ जगन्ना
थमठ पूर्वसमुद्रीं ॥ तेथें पद्मपादाचार्य अधिकारी ॥ वन अरण्य ते अंगें करी
॥ मठीं निरंतर ते वसती ॥ ६६३ ॥ हस्तामलकाचार्य परम ॥ त्याशी सहजीं स
हज विश्राम ॥ न करीच मठ मठीचा आश्रम ॥ आत्माराम परिपूर्णत्वें ॥ ६६४ ॥ शृं
गिरी मठ दक्षिणे माझारी ॥ तेथें पृथ्वीधराचार्य आज्ञाकरी ॥ सरस्वती भारती-
आणि पुरी ॥ तेथे निरंतर ते वसती ॥ ६६५ ॥ उरला जो श्रीधराचार्य ॥ त्यासी नां
हीं मठतात्पर्य ॥ भागवतव्याख्याता अतिवीर्य ॥ परमचातुर्य भावार्थदीपिका ॥
॥ ६६६ ॥ सन्यास प्रधान हा ग्रंथ ॥ या लागीं गुरुपरंपरा समस्त ॥ ग्रंथीं साधूनी-
आद्यंत ॥ ग्रंथी ग्रंथार्थ संपला ॥ ६६७ ॥ जैसा तळहातींचा आवळा ॥ तैसा ग्रं
थीं अर्थ दिसे प्रांजळा ॥ निवे मुमुक्षूचा जिव्हाळा ॥ परम सोहळा साधुशी ॥
॥ ६६८ ॥ हस्तामलकाची टीका ॥ एकला कर्ता नव्हें एका ॥ साह्य जनार्दन निज
सखा ॥ ग्रंथार्थ नेटका अर्थिला तेणें ॥ ६६९ ॥ एका जनार्दना शरण ॥ जनार्दनीं
प्रिय एकपण ॥ जनार्दन रूपें स्वत्व जाण ॥ ग्रंथ संपूर्ण पूर्णत्वा आला ॥ ६७० ॥
पूर्ण झालें निरूपण ॥ पूर्ण म्हणावया म्हणतें कोण ॥ खुंटला बोल तुटलें मौन ॥-
आनंदघन अद्वयत्वा ॥ ६७१ ॥ दर्पणें प्रति मुख दाविलें ॥ दर्पणें जातां तेणें तें ने-
लें ॥ परी देखतें मुख नाहीं नेलें ॥ तें असें संचलें निजांगीं ॥ ६७२ ॥ तेवीं अज्ञा
नें आत्मत्व न्यावें ॥ कां ज्ञानें आणोनि द्यावें ॥ ऐसें वस्तुशी न संभवे ॥ ते असे-
स्वभावें सदोदित ॥ ६७३ ॥ हेंच येथींचें निरूपण ॥ जे ज्ञानाज्ञाना बोळवण ॥
एका जनार्दनीं जन विजन ॥ वस्तु परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६७४ ॥ पूर्णत्वाचें परिपूर्ण
॥ सद्गुरूचे श्रीचरण ॥ एका जनार्दना शरण ॥ एकपण नुउरे ॥ ६७५ ॥ इति-
श्री हस्तामलकटीका संपूर्ण ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

नुरउनी

# मुक्तेश्वर कृत सभापर्व
## अध्याय ३
## नारदनीति.

॥ श्रीगणेशायनमः ॥ नारदम्हणेमहाराजा ॥ धर्मस्वरूपधर्मात्मजा ॥ नामासा रिखीसुतेजा ॥ करणी निर्मळअसेकीं ॥ १ ॥ ऐश्वर्यलाधल्यासंपूर्ण ॥ धर्मींवर्त तअसेकींमन ॥ राजमदें दुरभिमान ॥ संचरलानाहींकीं ॥ २ ॥ न्यायें अर्जिलाजो अर्थ ॥ व्ययकरिसी कींधर्मार्थ ॥ विषयकामलोभेंचित्त ॥ विटाळलेंनाहींकीं ॥ ३ ॥ वडीलआचरले जोधर्म ॥ तोचिचालविसीकींनेम ॥ अविहितधर्माचा कर्दम ॥ तुजलेपला नाहींकीं ॥ ४ ॥ धर्मेंअर्थअर्थेंधर्म ॥ धर्मपात्रींपुरुषोत्तम ॥ चढलावाढलासुखोद्यम ॥ नित्यनित्यकरिसीकीं ॥ ५ ॥ धर्मासीअविरोधऐसा काम ॥ तोचिसेविसीकींसुगम ॥ इंद्रियलोलुप्यतेचाभ्रम ॥ प्राप्त झालानाहीं कीं ॥ ६ ॥ नित्यनैमित्तिक ह्याकर्मीं ॥ वर्ततआहेसकींनिष्कर्मी ॥ कामनिषिद्धा चीऊर्मी ॥ लोटिसीकींआलिया ॥ ७ ॥ अनयासीहोसायासीं ॥ भाग्यजोडि लेंसंपत्तीसीं ॥ विभागूनीसमस्तांसीं ॥ सेविसीकींसुजाणा ॥ ८ ॥ अनुकुळ अथवाप्रतिकुळ ॥ अदृष्टें कांहींझालियाविकळ ॥ धर्मापासूनबुध्धिअचळ ॥ भ्रंशकांहींनपवेकीं ॥ ९ ॥ अहोरात्रीसाठीघडी ॥ लोटितांकरिसीपुण्यजो डी ॥ विकळता झालियाधडफुडी ॥ विचारीतअससीकीं ॥ १० ॥ अखंडित नामस्मरणीं ॥ देवोकेलाअसेकींऋणी ॥ जोपावोनदेहमरणीं ॥ दास्यकरी निजांगें ॥ ११ ॥ मोक्षद्वारींच्याद्वारपाळा ॥ आर्जवेंभजसीकींनृपाळा ॥ जेकाहात धरणीडोळां ॥ सायुज्यधामदाविती ॥ १२ ॥ समतासंतोषसद्विवेक ॥ चौथा- साधुसंगतोदेख ॥ यांसीकरूनियांसख्य ॥ मित्रभावेंअससीकीं ॥ १३ ॥ का मक्रोधलोभत्रया ॥ तेविमोहमदमत्सरपया ॥ वर्जित्यानियोजित्यागयां ॥ ठेऊंजाणत्याजाणसीकीं ॥ १४ ॥ कामनसावापरस्त्रियेचा ॥ क्रोधनसावासत्पु रुषाचा ॥ लोभनसावाशरीराचा ॥ मोहपुत्राचाबाधक ॥ १५ ॥ मदनसावासु हृद्जातीं ॥ मत्सरनसावासर्वभूतीं ॥ तुझेवर्तणुकेचीरीति ॥ सांगरऐसीच- आहेकीं ॥ १६ ॥ कामअसावाईश्वरभजनीं ॥ क्रोधअसावाइंद्रियदमनीं ॥ गुरुतीर्थप्रसादशेषग्रहणीं ॥ लोभअपारअसावा ॥ १७ ॥ मोहअसावासज्ज नासीं ॥ मदअसावादुर्गुणासीं ॥ मत्सरसदांसंसारेंसी ॥ असावातोअसेकीं ॥ १८ ॥ राजचिन्हींषड्विधगुण ॥ सत्सउपायपरमगहन ॥ बळाबळाचें लक्षण

॥ जाणसीकींजाणत्या ॥ १९ ॥ आज्ञा कीर्ति द्विजपाळण ॥ दान भोग मित्र रक्षण
साही गुणांत व प्रधान ॥ सालंकार असतीकीं ॥ २० ॥ जाणती नानाव्यूहरचना ॥
थोडे न जिंकिती बहुल सेना ॥ ऐसे तुझे गा विचक्षणा ॥ सेनापति असतीकीं ॥ २१ ॥
निर्लोभ आणि विश्वासूक ॥ ऐसे वंशज असतीकीं सेवक ॥ जे का स्वामीकाजीं
देख ॥ देह देती सांडणें ॥ २२ ॥ वेतन भक्षूनियां पवित्र ॥ मानिती अन्यद्रव्य अ
पवित्र ॥ ऐसे नियोगें सेवक स्वतंत्र ॥ स्वव्यापारीं तुझे असतीकीं ॥ २३ ॥ उत्तम
मध्यम कनिष्टपदीं ॥ योग्यायोग्य विचार विधि ॥ परिक्षूनी विशाळबुध्धि ॥ यो
जिसी कीं नरेंद्रा ॥ २४ ॥ अमात्यपदीं दासीपुत्र ॥ अधमस्थळीं परमपवित्र ॥ अ
पूज्या पुजोनी सत्पात्र ॥ अवमानीत नाहींस कीं ॥ २५ ॥ अचाट कार्य साधितां भृ
त्य ॥ वेतना होती कोटी गणित ॥ द्रव्य देऊन त्याचें चित्त ॥ तोषवीत आहेस कीं ॥
२६ ॥ आपुले काजीं पावले मरण ॥ त्यांचीं कुटुंबें आश्वासून ॥ आपुलिया कुटुं
बा समान ॥ पाळिसी कीं दयाळा ॥ २७ दरिद्रकाळींचीं मित्रें ॥ भेटों आलिया स्ने
हपात्रें ॥ वोळखी देऊन दर्शनमात्रें ॥ श्रियावंत करिसी कीं ॥ २८ ॥ परगुणप
रिक्षा जाणतें ॥ चित्त जाकळे परस्वधनें ॥ हे मुख्य प्रभूचीं लक्षणें ॥ तुझे गयीं
असतीकीं ॥ २९ ॥ मंत्रियांच्या राहटीकेशा ॥ देती यशाकीं अपयशा ॥ चारमु
खें नित्य नरेशा ॥ विचारीत असशी कीं ॥ ३० ॥ नेमाहूनी आगळें धन ॥ घेऊन
प्रजातें पीडन ॥ करितो अयोग्य प्रधान ॥ पदातीत करिसी कीं ॥ ३१ ॥ राजद्रव्य दे
ऊनी चांग ॥ भूमिसेवा करिती सांग ॥ न करितां राजाज्ञेचा भंग ॥ प्रजा नेमें असती
कीं ॥ ३२ ॥ वरचेवर दूतांचिये गोष्टी ॥ राष्ट्र अवलोकिसी कीं दृष्टी ॥ नष्ट तस्करां-
चिया राहाटी ॥ भंगिसी कीं ऐकतां ॥ ३३ ॥ तीर्थयात्रे जाती जन ॥ त्यातें फोडूनघे
ती धन ॥ तया दुष्टांचें करोनि हनन ॥ मार्ग मुक्त करिसी कीं ॥ ३४ ॥ सांगावयो क्लृ
श गोष्टि ॥ दुर्बळ येऊं इच्छी भेटी ॥ तया येतां आड काठी ॥ तुझे द्वारीं नाहीं कीं ॥ ३५
॥ परराष्ट्र घ्यावया धाडिसी सैन्य ॥ झुंजती त्यांचे चिकरावें कंदन ॥ वांचूनप्रजां
तें नागवण ॥ तुझेनि होत नाहीं कीं ॥ ३६ ॥ पिपालिका लागत जेथे ॥ तत्काळ हा
त पावे तेथें ॥ तेवी दीन पावतां दुःखातें ॥ क्लेशातीत करिसी कीं ॥ ३७ ॥ अंगींचा
जे विरोम उपडे ॥ तो जैसा हृदयातें गउका पडे ॥ तेवि प्रजा पावतां पीडे ॥ जाण
सी कीं तत्काळीं ॥ ३८ ॥ तुझिया राज्यामाजी माता ॥ पुत्र पाळिती कीं पितृआ
ज्ञा ॥ न करितां पुरुषाची अवज्ञा ॥ स्त्रिया धर्में असती कीं ॥ ३९ ॥ शरीर संपत्ति
मनोभावा ॥ अर्पून करिती सद्गुरुसेवा ॥ ऐसे शिष्य नरपार्थिवा ॥ शिष्यधर्में अस
तीकीं ॥ ४० ॥ श्रोत्री कुटुंबी निर्धन ॥ साधु सात्वीक परी वृत्तिक्षीण ॥ त्यांचें ह

रूनियांदैन्य ॥ सदापाळणकरिसीकीं ॥ ४१ ॥ दरिद्रें ब्राम्हणाचीजाया ॥ तारु
ण्यकाळीं अंतरे राया ॥ तेथें द्रव्यदेउनी तया ॥ साह्य संपूर्ण करिसीकीं ॥ ४२ ॥
रोगेंप्रवासीपीडली ॥ काराग्रहीं जे अडकली ॥ ते ते सांभाळूनी भली ॥ क्लेशा-
तीलकरिसीकीं ॥ ४३ लोकलाजेंत्यजितीप्राणा अधनें धनलुब्धाचिया ऋणा
॥ त्याउत्तमाचें ऋणमोचना ॥ अतिसाक्षेपकरिसीकीं ॥ ४४ ॥ आवडीचेंनिज
आपत्य ॥ गुणि जामात श्रियावंत ॥ तयाऐसें परम आर्त ॥ याच कांतेंकरिसी
कीं ॥ ४५ ॥ गृहापातल्याक्षुधापीडितें ॥ ते तृप्त होतापंचामृतें ॥ आशिर्वचनेंस्व-
स्थव्हातें ॥ तुजपासून जातीकीं ॥ ४६ ॥ तुझे ऋत्विज श्रुतिपारग ॥ सांग संपा
दितीकींयाग ॥ तू तेंनेणतां कर्मव्यंग ॥ कदा होत नाहीं कीं ॥ ४७ ॥ ब्राम्हणस्था
पिले वृत्ति क्षेत्रीं ॥ ते ते अक्षयीराजपत्रीं ॥ स्वस्थ भक्षोनपुत्रपौत्रीं ॥ विहि
तधर्मीं असतीकीं ॥ ४८ ॥ दुष्टाग्रहींउघडितांमुख ॥ शांतिकरितीतत्काळि
क ॥ त्रिकाळ ज्ञानी जोतिषीगणक ॥ शुभसूचक असतीकीं ॥ ४९ ॥ निरपेक्ष
असतीकींभांडारी ॥ ॥ क्लीबरक्षक अंतःपुरीं ॥ शुचिआप्ततृप्त जठरी ॥ पाक
कर्ते असतीकीं ॥ ५० ॥ विषमदेशाचिये संधि ॥ अविचार शूरठेविले सुध्धीं ॥
दुर्गपर्वस्थितिबुध्धि ॥ धैर्यवंत असतीकीं ॥ ५१ ॥ बोलीं जाणती समयोचित्त
चतुरशास्त्रज्ञपंडित ॥ ते ते शिष्टसाधनार्थ ॥ योजिसीकींनरेंद्रा ॥ ५२ ॥ जितें
द्रियन्यायवंत ॥ परमपवित्रसाधुसंत ॥ सदाचारीसभेआंत ॥ निकटवर्ती
असतीकीं ॥ ५३ ॥ दुर्जनक्षुद्र आणि कोपी ॥ वाग्निष्ठुर परम संतापी ॥ पैशुन्य
वादीमहापापी ॥ सभास्थानींत्यजिलेकीं ॥ ५४ ॥ अपमानावयासंतसाधु ॥ दे
वाद्विजादोषशद्बु ॥ बोलतीत याचा जिव्हाछेदु ॥ तत्काळिक करिसीकीं ॥ ५५
॥ जागा होउनियांअपराती ॥ सारासार विचारनीती ॥ मोक्षोपायभवनीरत्ति
॥ विचारील असस कीं ॥ ५६ ॥ नरकमोक्षोपायचिन्ह ॥ जितांचिजाणतीस-
ज्ञान ॥ जनाचे सुखीं निंदास्तवन ॥ होतें तें जाणत अससीकीं ॥ ५७ ॥ वरुषापा
ल्टोनीजीर्ण ॥ दुर्गपर्वतींनूतन धान्य ॥ यंत्रौषधिअक्षयजीवन ॥ संग्रहीत
अससीकीं ॥ ५८ ॥ पडलें खचलें काजेथें ॥ तात्काळ सरिसें करिजे तेथें ॥ ऐसीं
शिल्पिकारभृत्यें ॥ वेतन भोक्तीं असतीकीं ॥ ५९ ॥ मठवापीदेवागार ॥ भंग-
ल्याकरोनजिर्णोध्धार ॥ दीपनेवेद्य निरंतर ॥ चालवीत अससीकीं ॥ ६० ॥ प
शुपीडती प्रजन्यें ॥ गळती गाईचीं गोठणें ॥ वोढाळें चरती शाळीवनें ॥ ऐसें हो
तनाहींकीं ॥ ६१ ॥ क्षुधितें रुध्धदारिद्रमेळीं ॥ पडोनिहोतीरोडदुर्बळी ॥ कर्दमपं
थें वर्षाकाळीं ॥ चालिजेत नाहींकीं ॥ ६२ ॥ आपुलें महत्व होईल न्यून ॥ म्हणो

पुरोहितप्रधान ॥ श्रेष्ठपातस्यादर्शनीं विघ्न ॥ करिती ऐसें नाहीं कीं ॥ ६३ ॥ आ
प्तसुहृदां वाटे त्रास ॥ संतसाधु मानिती क्लेश ॥ ऐशिया दुर्गुणाचा स्पर्श ॥ तुज तंव-
झाला नाहीं कीं ॥ ६४ ॥ पर्वकाळीं स्त्रीमैथुन ॥ सूर्योदयीं निद्रासंपन्न ॥ एकल्या
पंक्तींत मिष्टान्न ॥ भक्षणें घडत नाहीं कीं ॥ ६५ ॥ बहुवर्णि आपुले पुत्र ॥ विहित
विद्ये अतिपवित्र ॥ अनालस्य अहोरात्र ॥ अभ्यासीत असती कीं ॥ ६६ ॥ उग्र
कामी स्त्रीधन हरितां ॥ कुळवंता जेवी त्यागिती भर्त्ता ॥ तैसें तुज धरत्रीनाथा
॥ प्रजीं त्यजिलें नाहीं कीं ॥ ६७ ॥ याजकत्यजिती पतितातें ॥ कुळें वाळिती भ्रष्टा
तें ॥ तेवी सर्व लोकीं तूतें ॥ उपेक्षिलें नाहीं कीं ॥ ६८ ॥ सहस्त्र मूर्खांतें दवडून ॥ एक
पंडित ज्ञानसंपन्न ॥ संग्रहूनि त्याचें मन ॥ स्वस्थें स्वस्त करिसी कीं ॥ ६९ ॥ एक
दुष्टाचे संगति ॥ यशलाभ सुखसंपत्ति ॥ नासून भोगवी अपकीर्ति ॥ हें तुज घड
त नाहीं कीं ॥ ७० ॥ आढ्य अव्यसनी अनुरक्त ॥ मित्र उदासीन शत्रु अमित्य ॥
या सातांचें चिकीर्षित ॥ जाणसी कीं सुजाणा ॥ ७१ ॥ तुवां अथवा तव प्रधानीं ॥
रहस्य बोलिजे एकांतस्थानीं ॥ तें बाहेरी लोकांच्या कर्णीं ॥ प्रगट होत नाहीं कीं ॥
७२ ॥ दुष्ट बलिष्ट आज्ञारहित ॥ तदर्थ अपाय विचार गुप्त ॥ प्रगटल्या नाश क
रील बहुत ॥ हें तंव जाणत अससी कीं ॥ ७३ ॥ एक उघडें बोलिजे जनीं ॥ एक प्रेरि
जे महंत कर्णीं ॥ एक ठेविजे आपुल्या मनीं ॥ हें तंव जाणत अससी कीं ॥ ७४ ॥ वै
रीवर्गाचें वर्तन ॥ क्षणक्षणां घ्यावया ज्ञान ॥ गुप्त ठेऊनी चारगण ॥ विचारीत अ
ससी कीं ॥ ७५ ॥ तुजसी दाऊनी आसता ॥ शत्रूसी पाववितीवार्ता ॥ ऐसे कोणते
तत्वतां ॥ ओळखोनी असशी कीं ॥ ७६ ॥ वार्ता आणि तेजे वार्तिक ॥ तेनेण ताए-
कासी एक ॥ तिन्हीं तिन्हीं अनोळख ॥ प्रेरिसी कीं सुजाणा ॥ ७७ ॥ बहुल लाभ-
स्वल्पयत्नीं ॥ तेथें आलस्य न सेकीं मनीं ॥ स्वल्पलाभें बहुत हानी ॥ तेथें उद्योग-
न से कीं ॥ ७८ ॥ राज्यरक्षितें झुंजार बळी ॥ सकल ही वापा नियम काळीं ॥ वेतन
पाऊन तुझ्या दळीं ॥ एकचित्तें असती कीं ॥ ७९ ॥ ज्याचे निकार्यसाधे पुढें ॥ तेज
री पावती वेतन न पीडे ॥ तरी समर्थी महाअनर्थ घडे ॥ हें निवाडें जाणसी कीं ॥ ८० ॥
अर्थसंग्रह पाहोन जोडी ॥ चतुर्थांशें वेचदवडी ॥ सकळ वेचूनि हात झाडी ॥ हे
तुज खोडी नाहीं कीं ॥ ८१ अर्थव्ययाचे अधिकारी ॥ गणक लेखक प्रथम प्रहरीं ॥
सिध्धपत्रें धरोनि करीं ॥ उभे सन्मुख असती कीं ॥ ८२ ॥ आरूढल्या भद्रासनीं ॥
राजदर्शना येइजे जनीं ॥ दिव्य माळा वस्त्राभरणीं ॥ देखसी कीं साजिरे ॥ ८३ ॥
रत्नांबरी खड्गधर ॥ किरीटकुंडलीं सालंकार ॥ सुहृद क्षत्रियांचे भार ॥ उभय भा
गीं असती कीं ॥ ८४ ॥ श्रेष्ठ सत्पात्रीं ओपितां दान ॥ योगियां विशेष अर्पितां धन ॥

दुष्टपुरोहित्तप्रधान॥ विघ्नकर्ते नसतीकीं॥ ८५॥ नगररक्षावयाकारणें॥ कीजेत
ग्रामाचींपाटणें॥ घोषग्राम्यतुल्यकरणें॥ ऐसेंकरीत अससीकीं॥ ८६॥ पर्वतसं
धिघाटबेटा॥ वोसरणें आणिचोरवाटा॥ तेथेंवसवोनियांपेंठ॥ मार्गनिर्भयक-
रिसीकीं॥ ८७॥ नापेक्षितांमेघजळें॥ सदांपिकें पिकतीसकळें॥ अभंगतडागें
पाटस्थळें॥ पैं निर्मळ असतीकीं॥ ८८॥ कृषिवळें खंगलीभणगें॥ धनधान्येंवो
पूनिअंगें॥ शेताचेनिराजभागें॥ पाळिसीकींनरेंद्रा॥ ८९॥ लुब्धतस्करलेख
नकारीं॥ राजस्त्रियाराजकुमारीं॥ प्रजांलागींबलात्कारीं॥ पीडिजेतनाहींकीं
॥९०॥ हिंसकअनत्याईप्रसिध्ध॥ त्यांचाश्रवणींपडतांशब्द॥ आधींकरोनि-
यांबंध॥ मगविचारकारिसीकीं॥ ९१॥ उदरपीडेचेमहामारी॥ उत्तमेंहि करितां
चोरी॥ धरोनिआणितां राजद्वेरीं॥ मानेंमुक्तकरिसीकीं॥ ९२॥ अष्टभोगीं-
स्त्रीरंजन॥ बाह्यअंतरीं संरक्षण॥ करणेंगूज अनुवादन॥ स्त्रीजनासीनाहीं
कीं॥ ९३॥ उगाणिलांपरराज्यातें॥ जेजेवस्तुलाधलीज्यातें॥ तेतेमुक्तकरून-
त्यातें॥ तोषवीत अससीकीं॥ ९४॥ औषधनेमेंशरीरातें॥ वृध्दसेवनमानसा
तें॥ दोप्रकारीआपणातें॥ रक्षिसीकींसुजाणा॥ ९५॥ अवलोकूनीअपपरातें
तदनुसार त्याकर्मातें॥ प्रयोजूनीमग आठांतें॥ सेविसीकींसुजाणा॥ ९६॥ परा
च्यापक्षीं अष्टादश॥ आपुलापक्षींपंचदश॥ गुण जेबोलिले।विशेष॥ जाण-
सीकींनरेशा॥ ९७॥ द्यूतनिद्राअन्नपान॥ स्त्रीसंयोग व्यय व्यसन॥ काळपा
होनीविचक्षण॥ करितीतेसेंकरिसीकीं॥ ९८॥ अष्टांगेंचतुर्विधबळें॥ शत्रुजिं
किजेबुध्दिकुशळें॥ व्यसनींकांक्षीणत्याआगळे॥ आदरें वश्यकरिसीकीं॥ ९९
॥ अंतःकरण आणिशरीर॥ नियमींनपवेविकार॥ शाहूतोसजीवगिरीवर॥
नचळेनढळेंसुरवळेंकीं॥ १००॥ परहितार्थसंतसाधु॥ जोसांगतीबुध्दिवादु
तोमानूनिपरमवंद्यु॥ वर्तसीकींतदाज्ञा॥ १॥ ज्ञातिगुरुदेवप्रतिमा॥ यज्ञमंड
पचैत्यद्रुमा॥ देखतांक्षणींराजोत्तमा॥ नमस्कार करिसीकीं॥ २॥ वृध्दतापस
ब्राम्हणपंक्ति॥ अश्वभांडारभद्रजाती॥ ध्वजाप्रासाद पवित्रक्षिती॥ देखतांवंदन
करिसीकीं॥ ३॥ दंडित्यांतेंप्रत्यक्षयम॥ पूज्यांप्रतीपरमसौम्य॥ परिक्षोनीअधमो
त्तम॥ वर्तसीकींशाहाणिया॥ ४॥ कार्यसाधनींअतिनेटके॥ साचस्तवनकरू-
निसुखें॥ सभामंडपींमानाधिक्यें॥ गौरवीतअससीकीं॥ ५॥ अग्निसर्पचोरव्या
घ्र॥ रोगराक्षसकापरचक्र॥ यापासावआपुलेंराष्ट्र॥ रक्षिसीकींबळिष्टा॥ ६॥
अंधमुकेंपंगुव्यंग॥ अतुरसन्यासीअध्वंग॥ पितयाऐसेसांगोपांग॥ पाळणा
त्यांचें करिसीकीं॥ ७॥ नास्तिक्यसक्रोधअनृत्यता॥ प्रमादआणिदीर्घसूत्रता॥

कार्यी आळसक्षिप्रवित्तता ॥ निश्चितांचा नारंभु ॥ ८ ॥ ज्ञानियांचें अदर्शन ॥ अ
नर्थाचें दृढचिंतन ॥ अनर्थी एकनिष्ठमन ॥ अरक्षण मंत्राचें ॥ ९ ॥ मंगळाचा अ
प्रयोग ॥ विषयांचा अतिप्रसंग ॥ चौदा दोषीं तुझें अंग ॥ सांग शिवतलें नाहीं कीं ॥
१० ॥ निद्रा आळस भय क्रोधता ॥ अमार्दव आणि दीर्घसूत्रता ॥ साही अनर्थांच्या
माथां ॥ पाय देऊन अससी कीं ॥ ११ ॥ सफळ दारा सफळ वित्त ॥ सफळ वेद सफ
ळ श्रुत ॥ तुझें असे कीं निश्चित ॥ हें भगदार्थ परिसें पां ॥ १२ ॥ सफळ दारा रतिपु
त्रें ॥ वेद सफळ अग्निहोत्रें ॥ दत्तभुक्तिनें पवित्रें ॥ सफळ वित्त जाणसी कीं ॥ १३ ॥
श्रुत्यर्थे बोधला अर्थ ॥ यानाव श्रुतज्ञान म्हणत ॥ त्याचें फळ शीळवृत्त ॥ त्या आ
चारें असससी कीं ॥ १४ ॥ परद्वीपींच्या अमोल्य वस्तु ॥ वणिक आणिती इच्छून स्वार्थु ॥
त्यांचा पुरवोनी मनोरथु ॥ लाभ चौगुणा देशी कीं ॥ १५ ॥ देशा उरापातले अर्थी ॥-
द्रव्य देऊन त्यांची आर्ती ॥ जगीं जोडावी सत्कीर्ती ॥ हेंचि असो सी असे कीं ॥ १६ ॥ वि
षमकाळा रणव पातले ॥ कुळपुत्र वंशज भले ॥ ते ते मानून आपुले ॥ आपणा ऐसे क
रिसी कीं ॥ १७ ॥ वैद्य चिकित्सक मर्दक ॥ हडपी सागळी नापिक ॥ निकटवर्ती वि
श्वासिक ॥ हितकारक असती कीं ॥ १८ ॥ शत्रुनाशना लागीं ॥ अथवें ॥ विषप्रयोग
जाण तीबरवे ॥ वासपुष्प फळासवें ॥ प्राण घेती पराचे ॥ १९ ॥ निर्दोषियां दोषारो
प ॥ निर्धना धनिकत्व विकल्प ॥ दुर्जनांचा दुर्गुण लोप ॥ तुझे नगरीं नाहीं कीं ॥ २० ॥
आचार दाखवोनी लोक दृष्टि ॥ अंतरीं अनाचार राहटी ॥ ऐसे दांभिक निकटीं ॥
वर्तणार नसती कीं ॥ २१ ॥ तोंडें बोले नियां ब्रह्म ॥ भंगिती सदाचार धर्म ॥ प्रशं-
सा अभिचारीक कर्म ॥ ते संसर्गी त्यजिले कीं ॥ २२ ॥ दाखोनि योगियाचें चिन्ह ॥
पोशिती उदर आणि शिश्न ॥ त्याचे ठायीं तुझें मन ॥ विश्राम तना हीं कीं ॥ २३ ॥
धनीक न वेची धनातें ॥ दरिद्री नाचरे तपातें ॥ शास्त्रज्ञ चालतां कुपंथें ॥ दंडिसी कीं
निजाज्ञा ॥ मातापितरें दवडून दुरी ॥ श्वशुर वर्ग सांठवी घरीं ॥ ऐसी कुश्चिताचा
रपरी ॥ तुझे देशीं न से कीं ॥ २५ ॥ सुना छळिती सासु वांतें ॥ गुरु अव्हेरिती पितयां
तें ॥ सेवक अवगणिती स्वामीतें ॥ ऐसें होत नाहीं कीं ॥ २६ ॥ एवं सर्वांपरी जाण
॥ राजा असावा सावधान ॥ हें विस्तार निरोपण ॥ पुण्यश्लोका बोधिलें ॥ २७ ॥
जो का राजा ऐसिया परी ॥ चहूं वर्णांचें पाळण करी ॥ पृथ्वी भोगोनि लोकोत्तरीं ॥ श
क्रसायुज्य स्वयें पावे ॥ २८ ॥ ऐसे परीचे उत्तम गुण ॥ तुझे ठायीं असावे पूर्ण ॥ ऐसें
आमुचें इच्छिमन ॥ किंचित्प्रश्न म्हणूनहे ॥ २९ ॥ किंचित्काळ प्रवेदनें ॥ ऐसें बो
लती पंडीत शाहाणे ॥ तें चि विस्तारोनी मनें ॥ तुजकारणें बोलिलों ॥ ३० ॥ ऐको-
नी नारदाचें वचन ॥ आश्चर्य करी कुरूनंदन ॥ म्हणे केवढा विचक्षण ॥ होय स

वेत्तादेव ऋषी ॥ ३१॥ पुढती पार्थिवाचे प्रश्नें ॥ लोकपाळ सभास्थानें ॥ व्यासगुरुवर्णिलि वदनें ॥ तीं सज्जनी परिसावी ॥ ३२॥ सभापर्वीं नारद नीति ॥ उद्योगपर्वी विदुरनीति ॥ भीष्मपर्वी कृष्णनीति ॥ भगवद्गीताजी नावें ॥ ३३॥ लीलाविश्वंभरपदांबुजीं ॥ मुक्तेश्वर षट्पद सहजीं ॥ गुंजारवें करितां रुंजी ॥ भारतकथा प्रगटली ॥ ३४॥ इति श्री महाभारत सभापर्व नारदनीतिसमाप्तः ॥ ७॥ १३४

## वामनपंडित.

### नामसुधा अजामिलआख्यान ॥

॥ द्विज अतःपर यत्न म्हणे करूं ॥ पवन इंद्रिय चित्त ही आवरूं ॥ मन बुडेल तमांत पुन्हा जसें ॥ करीन साधन संद म्हणें तसें ॥ २६॥ छेदूं बंध अनादि तो प्रथम जो जाला अविद्यावळें ॥ जीच्या आवरणें सुखा विसरतां दुर्वासनेंची कुळें ॥ विक्षेपें बहु कामना उपजतां कर्में करी यांगळें ॥ त्यांची भोगिलिया विणें न चुकती जीं कर्मभूळें फळें ॥ २७॥ सांख्यें आत्म अनात्मता निवडितां शाहे अविद्या हरूं ॥ योगें ज्ञानहुताशनांत अवध्या वृत्ती सही संहरूं ॥ तेव्हां संचितनाश तां न उपजती कर्में अकर्मापणीं ॥ प्रारब्धा सही भोगितां न विसरऊं ऐक्यें उरूं निर्गुणीं ॥ २८॥ जों प्रारब्ध असेल तोंवरी भजों सर्वात्मभावें हरी ॥ पावें तों स्थिर जंगमीं बहु घरीं भातीच जे शार्करी ॥ जे मध्यस्थ अमित्र मित्र अवघे तद्रूप पाहों स्वयें ॥ सर्वांचा निजसोइरा निजसखा आत्मा अशा निश्चयें ॥ २९॥ ऐसें निश्चय गुंफितां वृषळिचें फांसे गळां प्रीतिचें ॥ खेदें आठवती विशेष सुरतक्रीडादि कीं जे तिचे ॥ पापापें निरुतांत पाश पडले होते पहा हो मला ॥ ऐसें आठवितां विरक्ति उठतां तात्काळ झाला भला ॥ ३०॥ ऐसे हे विषयांत दोष न सतां कां टाकिते हो भले ॥ मिष्टान्नीं विषये रिती विषयते त्या ब्राम्हणा वाटले ॥ बोले प्रस्तुत आर्यकार्य करणें कीं हे जगन्मोहिनी ॥ मायास्त्री मयि यींस टाकुनि निघों निःसंगसंगीं वनीं ॥ ३१॥ ॥ करुनि मर्कटनाच विलेंस मला ॥ कट कटा अतिलंपट मी तिला ॥ प्रियतमा अधमा जवा दली ॥ वय समस्त घडी जसि लोटिली ॥ ३२॥ करिन कीर्तन मी दिन यामिनी ॥ स्फुरती काम गृहें सुतकामिनी ॥ जस जसें सुख होइल कीर्तनीं ॥ तस तसा मग निश्चप नर्तनीं ॥ ३५॥ उपजले सुमनोरथ ही जसे ॥ द्विज समस्त हि आचरला तसे ॥ त्यजिल सर्व हि तो मननें मुनी ॥ म्हणुन येथुनियां वदतो मुनी ॥ ३७॥ क्षणेक सत्संग तिच्या प्रज्ञानें ॥ केलें तसें सर्व अजामिळानें ॥ उंध्रास तातेरु

चळीं द्विजाला ॥ सांडून दासी हरिदास जाला ॥ ४० ॥ कचिद्गंगातीरीं हरिगृहीं-
हरिद्वारनगरीं ॥ निजीं चित्ता योजी द्विजवर चिदाकाश कुहरीं ॥ दृढ प्रत्याहारें नि
यमुनि मनीं इंद्रियगणां ॥ चिदाकारें चित्तें करुनि भजतो विप्र अगुणा ॥ ४१ ॥-
चिदाकारा चित्ता हुनि हि निज आत्मा पलिकडे ॥ असें योगी पाहे तरि च मन हें
उन्मनिं पडे ॥ चिदाकारें आहे मन म्हणुनि राहे लतितुका ॥ निरोधीं ज्या वृत्ति
उपजति लहा योग इतुका ॥ ४२ ॥ न जे थे चिच्छक्ति सहज न असे निर्गुणपणीं ॥
अखंडानंदाचा अनुभव असा एक सगुणीं ॥ असे देवाजीवा सहज अगुणा-
ऐक्य चि परी ॥ असा आत्मा पाहे तरि च कळला त्यास चि हरी ॥ ४३ ॥ ॥
केकावली ॥ ॥ अशा अनुभवीं बुडी दिधि अजामिळाच्या मनें ॥ समा
धि सरतां मनीं किमपि इच्छि ना चिंतनें ॥ अशांत हरिदास ते नयनिं चार जे दे-
खिले ॥ द्विजें वळखिले मनीं सतत जे सुखें रेखिले ॥ ४४ ॥ करी जों नमस्का
र चौघां जणाला ॥ जसे चार ते पांच वा विप्र झाला ॥ पडे अंग पूर्वींच गंगाप्रवा-
हीं ॥ भुजा चारी देखे असा विप्र देहीं ॥ ४५ ॥ करि गदांबुज अंबुद सांवळा ॥ क-
रितटींत डिदंबर मेखळा ॥ सतत षोडशवार्षिक कोंवळा ॥ हरि करी हरिना-
म अजामिळा ॥ ४६ ॥ इति नामसुधा द्वितीयाध्याय तृतीय चरण ॥ छ ॥ ॥
॥ विज्ञान जें अति रहस्य विशुध्ध वेदीं ॥ ते थें चि भागवत धर्म न भक्तिभेदीं ॥
ज्या कारणें प्रिय कळत्र सुखादि वित्तें ॥ ते ल्हां चि भक्ति जरि तो उमजेल चित्तें
॥ १६ ॥ म्हणविती बहु वैष्णव आपणा ॥ परि न जाणति भक्तिचिया खुणा ॥ ह
रि असें दुसरें जरि नावडे ॥ तरि च तो हरिभक्ति लधां घडे ॥ १७ ॥ प्रिय हरी
सकळां हुन जाणती ॥ परि जया स्तव ते प्रिय ने गती ॥ भजति कीं सुख दे हरि
आपणा ॥ प्रियतरीं निज जीव हरा उणा ॥ १८ ॥ निज सुखार्थ हरि प्रिय जे ध-
वां ॥ अधिक आपुली आवडि ते धवां ॥ हरि हुनी प्रिय आणि कहा अशी-
॥ निगम संमतिं भक्ति घडे कशी ॥ २६ ॥ मैत्रेयी प्रति याज्ञवल्क्य निगमीं
हें विस्तरें बोलिला ॥ कीं ज्याला गिं समस्त ही प्रिय असा आत्मा चि हा आ
पुला ॥ जो का आवडतो निमित्त नसतां तो जाणसी जे धवां ॥ कांहीं ही तुज
जाणनें चि न उरे सर्वज्ञ तूं ते धवां ॥ २७ ॥ कोणी ते सगुणीं च निष्ठ परि हा आ-
त्मा प्रियश्री हरी ॥ ऐसें भक्तिरहस्य नेणति न हे सद्भक्ति दोघां परी ॥ आत्मा
सर्व जड प्रकाशक असें लोकीं बहु जाणती ॥ जाणोनी श्रुत कीर्तनादि सगुण
प्रेमा मनीं नेणती ॥ २९ ॥ म्हणत रसें श्रुति तें वस्तु तुल्य ती ॥ इतर भासु नियां हरिसे
विती ॥ म्हणुनि आत्मपणें हरिसेवणें ॥ परम वैष्णव तो तरि बोलणें ॥ ३० ॥ ॥

# नरहरिदर्पण.

## प्रारंभः

॥जयनिर्गुणी तींस्व संकल्पनाहीं॥ करीईश्वर तींजगींकल्पनाहीं॥स्थितिमाजि
जे त्यामध्यें स्वैरभावें॥ जगींत्याचनानावतारींरमावें॥ ६॥ स्वयें कल्पितो जोज
गत्कल्पकांहीं॥ करीतोजनोध्धार संकल्प कांहीं॥ म्हणेंम्यास्वदिव्यावतारींरमा
वें॥ जळींभूतळीं व्योम हीआक्रमावें॥ ७॥ विना ज्ञानजे भक्त वैकुंठवासी॥ अ-
मुक्तस्थळीं चिंतिलें त्याजिवांसी॥ तयामाजि हीद्वार पाळद्वयातें॥ सवेंजन्मवावें
गमे अद्वयातें॥ ८॥ जयविजय असे तेजावळे हो दितीचे॥ असुरइतरझालेपु
त्रपौत्रादितीचे॥ प्रथमउपजला तोधाकुटा बंधुहोता॥ धरणीधर वराहें मारि
ला दैत्य होता॥ १३॥ केलादुरुक्तवचनीं अपमान साचा॥ द्वारांतिहींचसन
कादिक मानसांचा॥ तेशापितीअसुर योनिसत्यांसजाया॥ दोन्ही हरीचकरि
कीर्तिजगींसजाया॥ १४॥ बुडे जेंक्षमाउध्धरी जो क्षमेला॥ तयाक्रोडरूपें हिरण्या
क्षमेला॥ पुढें दूसरा जेष्ठत्या अग्रजाला॥ मनींक्रोधउत्पन्नअत्युग्रजाला॥ १५॥
तो हिरण्यकशिपूप्रियभावा॥ कारणे निजतमोगुणभावा॥ दाववीत्वरित
ठेकुनि मांडी॥ द्वेषविष्णुचरणाप्रति मांडी॥ १८॥ अजरअमर काया आपु
लीतो कराया॥ तप करी वर मागे धातयालोकराया॥ नमृतिमज म्हणेंहोचेत
नाचेतनाहीं॥ मरण हरिं असें कीं दीनरात्रींतनाहीं॥ १९॥ त्यावरें अमर मा
नवलोकीं॥ स्वामी तो विफळ हें अवलोकीं॥ देव वृंद अवघाच पळाला॥ भी
ळपोनिहि अघाचपळाला॥ २०॥ तेदेव हो प्रार्थिती देवदेवा॥ कीं आपलें तें
पद देव देवा॥ जाली बहूबुध्धि अधीर वाणी॥ तों बोलिली होअशरीरि वाणी
॥ २१॥ कीं हातपें तोधुन अग्रजाला॥ त्याच्यावरें सर्व अवध्य जाला॥ तथापि
मारीन विदुर्धराया॥ गांजील माझ्या जयिं भक्तराया॥ २२॥ प्रल्हाद त्याचा-
सुत त्या कुमारीं॥ घडे जयींद्वेषमुकुंद मारी॥ केव्हां असें होइल हे असोसी॥
दुःखें बहू तो सुर वृंद तोसी॥ २३॥ ऐसी प्रतिज्ञा हृदयांत देवा॥ तो दैत्य त्या-
भागवतांस देवा॥ पुरोहितांच्यासदनींच ठेवी॥ ते सीकवीती अतिनीच ठे
वी॥ २४॥ एके दिसीं घे सुत दैत्य अंकीं॥ तो स्नेह त्याचा गणवेन अंकीं॥ पुसे
तयाभागवतोत्तमातें॥ कीं आवडे तें तुज सांग मातें॥ २५॥ प्रल्हाद बोले सद
नत्यजावें॥ तपोवनालागिं अगत्य जावें॥ तेथें भजावें हरिच्या पदातें॥ जोआ
पदांतें हरिदे पदातें॥ २६॥ दैत्येश्वरा आवडि हे विसातें॥ कीं सेवणें श्री स्वरूपें

त्तमातें ॥ त्यजूनिविष्णूसभजेमहातें ॥ तोआपुलाघातकरीस्वहातें ॥ २७ ॥
दुःखार्णवींजोधरिकासयाची ॥ चिंतालयाळामगकासयाची ॥ नचीसरावें
चिकदापित्याला ॥ प्रऱ्हाद इत्यादिवदेपित्याला ॥ २८ ॥ परिसतांअसुरेश्वर
हांसिला ॥ मगम्हणेकवणेंशिशुनासिला ॥ शिकविलेंबरवेंअथवांजसें,वद
तितेंचिमुलेंअतिराजसें ॥ २९ ॥ म्हणेंहाकरावागुरूनेंविचार ॥ स्वयेंलेंकु
राठाउकेकायचार ॥ हरीआमुच्यावाइटाचाधुकेला ॥ तयाच्याजनींहाकु
ळींभेदकेला ॥ ३० ॥ गुरूतें असेंदैत्यसांगोनधाडी ॥ तयागोष्टीहेवाटलीदेव
धाडी ॥ भिऊनीमनींतर्कनानाकरिती ॥ तयापूसतीविप्रसामादिरीती ॥
३२ ॥ अरेहेप्रऱ्हादागुरुपुसतीकोठूनसिकसी ॥ कसीहोतीप्रज्ञात्यजुनतिस
तूंस्वैरठकसी ॥ स्वयेंतूझ्यापोटामधिलअथवाबुध्दिउकळी ॥ कळीहृत्पद्मा
चीउगवलिकुळींघेउनकळी ॥ ३३ ॥ उपाध्येहोनेणातरितुम्हितयाश्रीकर
धरा ॥ धरापोटींहेंजीमगनकरणेंस्पंदअधरा ॥ धरास्वामीचक्रेंवधिमसहिर
ण्याक्षचुलता ॥ लताबुध्दीचीत्यातरुवरीकिजेयोगभलता ॥ ३६ ॥ तोंबुध्दि
कोपेंखवळेद्विजाची ॥ जाचीम्हणेंटाककथाअजाची ॥ बाभूळहेंचंदनकान
नासी ॥ नासीलभेदोननिरंजनासी ॥ ३९ ॥ बासीकलासिगुरुपासुनिजोप
सारा ॥ साराअसोतुजकचेवदत्यांचिसारा ॥ गोष्टीवदेकुशलत्यावरीज्या
पित्याला ॥ त्यालागतीलमधुरानकदापित्याला ॥ ४४ ॥ श्रवणहरिकथेचें-
कीर्तनींगातजावें ॥ स्मरणचरणसेवाअर्चनांहींभजावें ॥ नमनकरुनिदा
स्यें सख्यआत्मार्पणातें ॥ करितिलरतिवाटेसारहेंआपणातें ॥ ४५ ॥ ॥
॥ केकावली ॥ ॥ हिरण्यकशिपूस्वयेंपरिसतांअशीवैखरी ॥ म्हणें
गुरुकसातुझीकपटमित्रताहेखरी ॥ पुरोहितम्हणें नमीनजनअन्यहाभावदे
॥ अजीसहजबुध्दिलेतवकुमारजेंजेंवदे ॥ ४६ ॥ गुरुमुखेंनअरेजरिसी
कसी ॥ कुमतिउद्भवलीतुजहेकसी ॥ सुतम्हणेविषयार्थसदांपित्या ॥ अ-
सिनबुध्दिनरांसकदापित्या ॥ ४७ ॥ करीजोप्रऱ्हादप्रियभजवार्ताचिपरमा
॥ रमाकांताच्यात्याचरणिंमनपावेउपरमा ॥ रमाहिवृत्तीलेंहरिचजगहोऊ
नपसरे ॥ सरेतेंभ्रांतीनेंस्वपरअनुसंधानविसरे ॥ ५६ ॥ असेंवर्णितांव-
र्णितांत्याअजाला ॥ पित्याचेचअंकींसमाधिस्थजाला ॥ अहोस्वस्मांडीव
रूनीअभाग्यें ॥ दिलालोटुनीलभ्यजोपूर्वभाग्यें ॥ ५७ ॥ ताऊनीडोळेअति
कोपतापें ॥ मारम्हणेंराक्षसहोप्रतापें ॥ कुपुत्रपोटांतिलरोगवाटे ॥ छेदून-
टाकायमलोकवाटे ॥ ५८ ॥ नथोंगिहोगाजिअहोजळाला ॥ निमग्नहीलोकर

वेजळाला ॥ उरावरी आदळि पर्वतातें ॥ केलें उपाया सही सर्वतातें ॥ ६५ ॥ ता
तघालकर वीस्वकरानें ॥ देववीत विषमातृकरानें ॥ जो उपाय अनिवार वधा
ला ॥ सर्वलोक करून दैत्यन धाला ॥ ६७ ॥ मी क्रुध्य होतां मज लोक सारे ॥ भीती
भिसी एक न तूं कसारे ॥ याशासना लंघिसि दुर्ग मातें ॥ कोण्हा बळें सत्वरसां
गमातें ॥ ८६ ॥ प्रल्हाद बोले जग गां जितोसी ॥ ज्याच्या बळें आत्मपणें जिता-
सी ॥ रक्षी अनाथा मज ही हरी तो ॥ ज्याला असा बापहि संहरीतो ॥ ८७ ॥
माझें तुझेंचि बळ लेंइतुकें चि नाहीं ॥ त्याचेंच जीबळ असे सकळा जनाहीं ॥ तूं
शत्रु मानिसि तया असुर स्वभावें ॥ तोटा किसील झणि त्यासनिजात्मभावें
॥ ८८ ॥ या गोष्टिनें फारचलत झाला ॥ घे खड्ग बोले मग आत्मजाला ॥ कां तोम
रोइछिसि तो निपात ॥ स्वयें असा बोलसि सन्निपात ॥ ९३ ॥ शद्वासि या उत्त
रहेंचि वाटे ॥ कीं तूज लाऊं यमलोक वाटे ॥ जी तो सि तूं हा क्षण कोण सोसी ॥
मी सोसिलों एक तूं हे असोसी ॥ ९४ ॥ त्रिभुवनेश्वर जो मज वेगळा ॥ तुज गमे स
कळांहूनि आगळा ॥ जरि दिसेल अरे मज ये क्षणीं ॥ वधिन त्यां ज पुढें तुज ये क्ष
णीं ॥ ९५ ॥ जरि समर्थ असेल तुझा धणी ॥ तरि तुझी पुरवील चि तो धणी ॥
परि वदें स्थळ कोण तया असे ॥ म्हणुनि गर्जत शद्ब करी असे ॥ ९६ ॥ ॥
॥ घनाक्षरी ॥ ॥ प्रल्हादासी दैत्य थोर ॥ म्हणे मज थोर थोर ॥ भीति बो
लतां समोर ॥ भेंन वाटे तूज ला ॥ १ ॥ तूं तरुण कीं किशोर ॥ पांचा वरुषांचें पोर
॥ म्हणसि साजण चोर ॥ नाग वीति मजला ॥ २ ॥ बोल बोलसी तिरवट ॥ मरूं
पाहसी फुकट ॥ मृत्य आलासे निकट ॥ नाहीं तो समजला ॥ ३ ॥ तुझा मी प्रत्य
क्ष काळ ॥ कैंचा विष्णु रक्षपाळ ॥ दिसेना तो फट काळ ॥ लपों जाणें लाजला-
॥ १ ॥ अरे तुझा कोठें देव ॥ म्हणे सर्व वासुदेव ॥ विश्वपदीं विश्वमय ॥ तं तु तो-
चि वसतो ॥ १ ॥ नानालंकारीं कनक ॥ तैसा अनेकीं जो एक ॥ फिटे दृष्टिचा क
ळंक ॥ जेव्हां तेव्हां दीसतो ॥ २ ॥ गातिश्रुति इतिहास ॥ चाळिचे तन्य देहास ॥
टाकुनियां संदेहास ॥ मज ही विश्वासला ॥ ३ ॥ दैत्य म्हणे अरे थांब ॥ गोष्टि ठेवीं
लांबलांब ॥ मज समोर हा खांब ॥ यांत कैसा वसतो ॥ २ ॥ म्हणे स्तंभ दारुरूप
॥ दारु मध्यें नित्य रूप ॥ थीजलें तथापि तूप ॥ रस तो न ना सतो ॥ १ ॥ तरि
दिसेना कां मज ॥ म्हणे भजूनि समज ॥ प्रत्यक्ष हा अधोक्षज ॥ दिसेना तो दीस
तो ॥ २ ॥ स्तंभीं दिसत से जाण ॥ ऐसें बोलतां सुजाण ॥ दैत्यें घेतलें उड्डाण ॥
सिंहासना वरूनी ॥ २ ॥ खवळला उसंखळ ॥ दांतें दांत खाय खळ ॥ हाणे
खांबासी निखळ ॥ खड्ग मुष्टि धरूनी ॥ २ ॥ तेंच समयीं कठोर ॥ बहू भयंक

रघोर ॥ ध्वनिउठेमहाघोर ॥ मोठ्याबळेंकरूनी ॥ १ ॥ म्हणेअसुरानिकळ कोणगर्जतप्रबळ ॥ पाहेचहूंकडेचळ ॥ लोचनपसरूनी ॥ २ ॥ ध्वनिउठिला अखंड ॥ त्यापिढीपेंखंडखंडे ॥ वाटेकरीखंडखंड ॥ ब्रम्हांडविदारुनी ॥ ३ ॥ दिग्गजांचेंचंडचंड ॥ भग्न होतिशुंडादंड ॥ लेंडेंटाकितीउदंड ॥ पायुवायुसा- रूनी ॥ ४ ॥ झाले दैत्य लंडभंड ॥ दानवेंद्र मुंडमुंड ॥ होति त्यांचे पिंडपिंड ॥ रो मांचउभारुनी ॥ १ ॥ रात्रीचर कळभंड ॥ जाले पुढें थंडथंड ॥ जे व्हांसिंहार णशुंड ॥ निघे हाकामारुनी ॥ २ ॥ सुरवसिंहाचेंउद्भट ॥ नरतनुजेसदट ॥ हो यनृसिंह प्रगट ॥ विधीवररक्षणी ॥ ३ ॥ बाहू बहुचंडचंड ॥ काळदंडसेउ दंड ॥ ज्वाळा तोंडींते अखंड ॥ चंडरश्मिईक्षणी ॥ नखेंवज्रेंशीं निखट ॥ दां तशब्दीं खटखट ॥ जीभ चंचळ लिखट ॥ जाणोंखड्गदक्षणी ॥ ॥ कुंड लें मंडित गंड ॥ अंगीं बाणलें श्रीखंड ॥ जालेंहृदय दुखंड ॥ दैत्याचें तत्क्षणीं ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ खरीकराया निजभक्तवाणी ॥ आणीकवींच्या- सि सहीन वाणी ॥ स्तंभीं सभे अद्भूतमूर्तिदावी ॥ मनुष्यनासिंह चितेवदावी ॥११०॥ मनुजरूपनव्हे नरकेसरी ॥ सकलसृष्टिकरूनशकेशरी ॥ कनकवर्ण कटींपटकेशरी ॥ प्रगटहोयअसानरकेशरी ॥१११॥ ॥७॥ ॥ ७ ॥

---

## प्रकरण ३

### महाराष्ट्रभाषेच्या कवितेंतशब्दांस जेप्रत्ययवअव्ययें लागतातत्यांचेंटिपण.

## प्रत्यय.

शब्दाचेंमूळरूप कवितेंतहोईल. किंवाअसेलतीप्रथमा.

द्वितीयेचेप्रत्यय- स, शी, ला, तें,
तृतीयेचेप्रत्यय- एँ, ने, न, ण, शीं, नशीं, ई, ऑ;
चतुर्थीचेप्रत्यय- द्वितीये प्रमाणें.

पंचमीचेप्रत्यय- ऊन, हून.
षष्ठीचेप्रत्यय- चा, ची, चे, चेनी.
सप्तमीचेप्रत्यय- ई, ऑ, त.

---

॥अव्ययें॥

द्वितीयेचींअव्ययें- मत, मती, लागीं लागोनी, लागोनियां, लागोंनी,

तृतीयेचींअव्ययें- मुळें विंदानें वशें वसें, मेळें, सांगडें, कडून, करून, करीं, करवीं, पाडें, वगें.

चतुर्थीचींअव्ययें- कारणें, सार्ठी, करितां, अर्थीं, स्तव, पाडें, जवळ, पाशीं उपकंठीं, कडे, अधाडें,

पंचमीचींअव्ययें- पासून, पासोन, पासाव, परीस, पासोनी, पासोनियां, पावोन, पावोनीयां, पाहोन, होवोन, लागोन, पून, पें.

षष्ठीचींअव्ययें- संबधीं,

सप्तमीचींअ०- माजी, माजिवडें, माझारी, माजिवटें, भीतरी, अतोतें, आतौतें, औतुवटें, औत, वर, वरी, उपरी, गर्यीं, गयां, अभ्यांतरीं, मध्यें, विषयीं.

मराठी कवितेंत शह्बानें मूळ रूप अर्थाच्या धोरणानें सर्व विभक्तींचें दर्शक होतें, त्या विषयीं हींखालीं लिहिलेलीं उदाहरणें पाहा.

ओव्या

॥उध्धवें विन विल्यावरी॥ ऋषी कळवळ लाश्रीहरी॥७॥

॥मजनांदतांये सृष्टी॥ कळीउघडूंनशके दृष्टी॥७॥

॥ सत्कर्म सिध्धीगेलें॥ नरीफुगेनाहें-म्याकेलें॥७॥

॥ कासंभावंना सूनीदिठी॥ सांगेगोर्ठी पुराणीक॥७॥

आवेडी कळवळलेंचित्त॥ घालींसाष्टांगदंडवत॥७॥

॥तुझियें मीया विचित्र उपोधी॥ शरीरीं केली आत्मबुध्धि॥७॥

अभंग

॥आनंदाचीठेवजनकभूपाळ॥ अौनी पद तळजळेज्याचा॥१॥

॥तेविनमीसीता आनंदात चित्ता॥ मगहो बोलतारामु सुनी॥१॥

॥ पत्रलिहिलें रुक्मिणी॥ जेव्हांतुज चक्रपाणी॥१॥

॥ गेला अंतकभगिनी॥ वसुदेव हात रोनी॥१॥

आर्या.

॥ स्वकरें चंदन घांशी॥ गंगेचें पाणि कावडी भरितो॥७॥

॥ कवितांमधील गुण विशेषणें आणि क्रिया विशेषणें॥

## गुणविशेषणेंप्रकार १

| | |
|---|---|
| असा - ऐसा - एवी - एउता - एतुला - येतुला. | कसा - कैसा - केवी - के - केतुला - कायसा - केउता - |
| तसें - तैसें - तेवी - तेउतें - तेतुलें. | जसें - जैसें - जेवी - जेतुलें - जेउतें. |

## गुणविशेषणेंप्रकार २

| | |
|---|---|
| इतका - इतुका - इतुला - एतुला - येतुला. | जेवढा - जेउता - जेतुला - जितुका. |
| जितकें - जितुकें - जितुलें - जेतुलें. | केवढें - केउतें - केतुलें - कितीक - कितुकें. |
| तितकें - तितुकें - तितुलें - तेतुलें. | तेवढें - तेउतें - तेतुलें - तितुकें - तेसणें. |
| अमकें - अमुकें - अंबुलें. | येवढें - येसणें - येउतें - येतुलें - इतुकें - इलिसें - इवलीसें. |
| तमकें - तमुकें - | |

## सामान्यरूपेंयाविषयीं.

| | |
|---|---|
| अशा - ऐसेनी - ऐशिया. | कशा - कैसेनी - कैसिया. |
| तशा - तैसेनी - तैसिया. | जशा - जैसेनी - जैसिया. |

## क्रियाविशेषणें.

| कालवाचकें | स्थलवाचकें. |
|---|---|
| जेव्हां - जेधवां - जई - जों - जंव - जयीं. | इकडे - येथें - ऐल - ऐलाउ - अर्ते - अरुतें - अलीकडे. |
| तेव्हां - तेधवां - तई - तयीं - तों - तंव. | पलीकडे - पैल - पैलाउ - पर्ते - परुतें परौतें - पऱ्होतें - पऱ्हा. |
| केव्हां - केधवां - कई - कहीं - कें - कधीं. | जिकडे - जें - जेथें - जयीं. |
| एव्हां - एधवां - येधवां - आतां - आधीं. | तिकडे - तें - तयीं - तेथें. |
| पुनः - पुन्हा - पुढती - पुढां - मागुती - मागौती - माघौती - नंतर - मग. | कोठें - के - कें - कहीं. |
| शेवटीं - शेखीं - सेखीं. | पुढें - पुढां - पुढारां |
| पूर्वीं - मागां - मागें - माघारां. | मागें - मागां - पूर्वीं. |
| आज - आजी. | वर - वरी - वर्ते - वरुतें. |
| वारंवार - पुनःपुनः - अखलेख. | खालीं - खालुतें. |
| मग - मा. | |

समुच्चयार्थक.

आणि-आणखी-अणिखी-ना-क
वितेंत कथिल आहे.

निश्चयार्थक.

निश्चय-खचित-निःसंदेह-निसंश
य-निश्चयें-निश्चयेंसी-निःसंशयेंसी.
च-ची-चि.

स्वरूपबोधक.

कीं-जे.

न्यूनबोधक.

परंतु-परी-परि-मा-कचित-म्ह
णें-म्हणी-एकादें.

अनुकरणवाचक.

झटकर-झटदिशी-उराउरी-उगउगी.
तत्क्षणीं-तेधवां-तेंच-अपैसें अ
थवा लागलीच.

पक्षबोधक.

अथवा-किंवा-का-ना-नाना-नातरी.

## कारणबोधक.

कांजर-कांजरी-कारण-कांकीं-म्हणोन-म्हणवोन-म्हणोनी-म्हणोनीयां-
त्याशी.

## संकेतबोधक.

जर-जरी-म्हणी-म्हणें-जयीं-यद्यपीं.
जरीही-जऱ्ही.

तर-तरी-तंव-तो-तों-तयीं-तरमग
तरीही-तऱ्ही.

## अतर्कितबोधक.

अवचट-अवचटें.
अकस्मात-अवसात-अवचितें-
एकाहेळा-

एकाएकी-एकाकी-म्हणी-म्हणें
एकसरें.

## शब्दयोगीअव्ययें.

सभोंवतें-भोंवतेंसभोंवर-सभोंवता
आसमंतात.
वांचून-वांचोन-वांचोनी-वीण-वीन
विना-
सारखें-सांगडें-तुकें-पाडें-पडिपाडें-परी.
जवळ-संनिध-आडजाला-लागसर.

पावेतों-वरी-वेऱ्ही-पर्यंत.
प्रमाणें-परी-परिया.
जवळ-उपकंठीं.
बरोबर-सवें-सरिसें.
स्वाधीन-अपैतें.

याप्रमाणें गुणविशेषणें आणि क्रियाविशेषणें-यांचीं कवितेंत जीं रूपें आढळ
लीं-तीं सर्व येथें दाखविलीं याशिवाय जीं राहिलीं-तीं गद्यरूप भाषा प्रमाणेंच पद्यां

तर हालात असेंसमजावें.

## प्रकरण ४

## महाराष्ट्रभाषेच्या कवितांमधील क्रियापद विचाराचें टिपण ॥

### असधातुस्वार्थवर्तमानकाळ.

### कवितेंतील उदाहरणें

### प्रकार १

॥ मी आहें जो सर्वजनासी ॥ आहेंच आहें दिवाकीं निशी ॥ मी नाहीं हा संशय को णासी ॥ कधीं हीनसे ॥ ७ ॥ श्रोते पुसती कोण ग्रंथ ॥ काय बोलिलें जी येथ ॥ श्रव णकेलियानें प्राप्त ॥ काय आहे ॥ ७ ॥ तेसा घेतला मसंगु ॥ जिये त्तानीं आम्हा लागु ॥ आणि तुझा अनुरागु ॥ अथी येथे ॥ ७ ॥

### वरील उदाहरणाची मालिका.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | मी आहें | आम्ही आहों |
| द्वितियपु० | तूं आहेस - आहेशी. | तुम्ही आहां - आहाती. |
| तृतीयपु० | तो आहे - अथी. | ते आहेत - आहेती. |
| | ती - किंवा ते - आहे - अथी | त्या आहेत - आहेती. |
| | तें आहे - अथी. | तीं आहेत - आहेती. |

### प्रकार २

॥ तूंचि प्रत्यक्ष ब्रम्ह असशी ॥ वेदाचीं वाक्यें जे ऐशीं ॥ तेंचि गुरु बाणविती शि- ष्याशी ॥ विवेचनद्वारा ॥ ७ ॥ भ्रमें वाहवला असे कैसा ॥ तो बोलूं सावध होमा नसा ॥ याशी साम्य दृष्टांत असे जैसा ॥ तो अवधारीं ॥ ७ ॥ दूजा कासया सी अति सो ॥ याचि स्थितीनें आम्हीं असों ॥ तेंचि तुजलागीं सांगतसों ॥ मास व्हावी म्ह णोनी ॥ ७ ॥

| | एकव० | अनेकव० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी असें | आम्हीं असों. |
| द्वि० पु० | तूं असशी - | तुम्ही असां. |
| तृ० पु० | तो असे | ते असत - असती. |
| | ती किंवा ते - असे | त्या असत - असती. |
| | तें असे | तीं असत - असतीं. |

प्रकार २

॥ तेंनिजरीमी असतों ॥ तरांकेवीरडतोंबोंबलतों ॥ केवीतारींतारीं उच्चारितों ॥
मीअज्ञानजरी ॥ ७ ॥ स्थूलानेंभियत्वचि असतें ॥ तरींसर्पेंधरिलां कांउपेक्षितें ॥
आणिहें चिद्रूपचिजरीहोतें ॥ तरीजाणतेंनिज लिया ॥ ७ ॥ तेथें आहेपणाजरीअ
सता ॥ स्वप्नदेहांतकासया येता ॥ असोअस्तिभातिभियता ॥ स्वप्नभासा आली ॥

| | एकव॰ | अनेकव॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मीअसतों | अम्हींअसतों. |
| द्वि॰ पु॰ | तूंअसतोशि | तुम्ही असतां |
| तृ॰ पु॰ | तोअसतो | तेअसती- असतात- असताती |
| | ती-किं॰तेअसती | त्याअसती- असतात- असताती |
| | तेंअसतें | तीं असतीं- असतात- असताती |

असधातूचा स्वार्थींवर्तमानकाळींचौथाप्रकार होय असा आहे आणि
तोभूत व भविष्य याहीदोनीकाळांचादर्शकहोतो.

होँय याचीं
वर्तमानकाळाचीं उदाहरणें.

॥ मनोजवसिध्धिऐशीआहे ॥ कल्पिलियाठायांशीपाहे ॥ मनोवेगेंशरीरजाय ॥
चौथी होय हे सिध्धि ॥ ७ ॥ शुष्कवादज्यारथागोष्टी ॥ त्यांतही वाग्वादउठी ॥
होय नव्हेकपाळपिटी ॥ मिथ्याचावटीकरीना ॥ ७ ॥

होययाचीं
भूतकाळाचीं उदाहरणें.

॥ लोहएकांगेंस्पर्शमणि ॥ लागतांसर्वांग होय सुवर्णी ॥ तेवीसद्भक्तमाझ्याध्या
नीं ॥ चिद्रूपपणीसर्वांग ॥ ७ ॥ तोजेउतीवासपाहे ॥ तेंदिग्मंडळसुखाचें होय.
॥ तोजेथेकोउभाठाय ॥ तेथेंसुखावलेंराहे महासुख ॥ ७ ॥ आवडीहरिकथा-
ऐकतां ॥ नानाचरित्रेंश्रवणकरितां ॥ माझीआत्मचर्चा हृदयींधरितां ॥ पाल-
टचित्तातेणेंहोय ॥ ७ ॥ मैंभिकेपरतेंनलाहे ॥ तन्हीगारुडीसर्वदाहे ॥ कायकी
जेशीणचि होय ॥ गोडएका ॥ ७ ॥ निजपदेंशी दृष्यानाशु ॥ भक्तांशी आपणदे
तु ॥ आपणहोंयभक्तांकित ॥ राहे तिष्टतु आपाशी ॥ ७ ॥

होययाचींभविष्यकाळाचीं उदाहरणें.

---

* द्वितीयपुरुषीं होय याचेंहोशी असेंरूपजाणावें

॥ सर्वभूतीं भगवंत आहे ॥ ह्मणोनि त्याशी उपद्रव होय ॥ यालागीं वागवितां हात पाय ॥ सावध राहे निजदृष्टी ॥ ७ ॥

## असधातु स्वार्थभूतकाळ.

### प्रकार १

॥ धन्य पुण्याइ फळली ॥ कृपा केली श्रीरामें ॥ १ ॥ होतों पुढती सामोरा ॥ सीताव रा भेटलों ॥ २ ॥ पक्षी समुदाय होती एकराती ॥ उजाडतां जाती दाही दिशा ॥ १ ॥
वरील उदाहरणांतील माळा.

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्र० पु० | मी होतों. | अम्ही होतों |
| द्वि० पु० | तूं होतासी. | तुम्ही होतां-होतेती |
| तृ० पु० | तो होता | ते होते-होती. |
| | ती-किं० ते होती | त्या होत्या. |
| | तें होतें | तीं होतीं. |

### प्रकार २

॥ जरी भाव असला भाविक ॥ तरी देव होय महाठक ॥ नवल तयाचें कौतुक ॥ जैसास तैसा ॥ ७ ॥ परी जया सि तया विवेक असिला ॥ तरींच बोधे जाय सुट ला ॥ नाहीं तरी गुरुही अनधिकारी याला ॥ उपेक्षून जाती ॥ ७ ॥

| | एक० | अने० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी असलों-असिलों-असिंनलों | आम्हीं असलों-असिलों-असिनलों |
| द्वि० पु० | तूं असलाशी-असिलाशी-असिनलाशीं | तुम्ही असला-असिला-असिनला. |
| तृ० | तो असला-असिला-असिनला | ते असले-असिले-असिनले. |
| | ती-किं० ते असली-असिली-असिंनली | त्या असल्या-असिल्या-असिनल्या. |
| | तें असलें-असिलें-असिनलें | तीं असलीं-असिलीं-असिंनलीं. |

## असधातू स्वार्थभविष्यकाळ

### प्रकार १

| | एक० | अने० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी असेन. | अम्हीं असूं |
| द्वि० पु० | तूं असशील. | तुम्ही असाल |
| तृ० पु० | तो-ती-किं० ते-तें असेल | ते-त्या-तीं असतील. |

प्रकार २

| एक० | अनेक० |
|---|---|
| प्र० पु० मी असणार | अम्ही असणार |
| द्वि० पु० तूं असणार | तुम्ही असणार |
| तृ० पु० तो-ती किंवा ते-तें असणार | ते-त्या-तीं-असणार. |

## असधातु निषेधरूपस्वार्थ वर्तमानकाळप्रकार १

॥ नाभीवाचून जो अंकुरेचि कांहीं ॥ रिताठाव थाराथावा दीणनाहीं ॥ ॥
॥ नव्हे तें निजालें नसतें चि आलें ॥ कळूं लागलें सज्जनाचेनि बोलें ॥ ॥
॥ जेथें क्षरना अक्षर ॥ तेथें कैंचें एकाक्षर ॥ शाब्दलाचा विचार ॥ तेथें हीं न दिसे ॥
॥ तैसा नोहे मा आराम ॥ सकळदेवांशी विश्राम ॥ १ ॥ अभंग ॥ ॥ ॥

| एक० | अने० |
|---|---|
| प्र० पु० मी नाहीं-नव्हें-नोहे-ना | अम्हीं नाहीं-नहों. |
| द्वि० पु० तूं नाहीस-नव्हशी-नोहेशी | तुम्हीं नाहीं-नव्हां. |
| तृ० पु० तो नाहीं-नव्हे-नोहे-ना. | ते नाहींत-नोहेती. |
| ती कीं ते नाहीं-नव्हे नोहे-ना | त्या नाहींत-नोहेती. |
| तें नाहीं-नव्हें-नोहे-ना. | तीं नाहींत-नोहेती. |

प्रकार २

॥ माया कठीण ब्रम्ह कोमळ ॥ माया अल्प ब्रम्ह विशाळ ॥ माया नसे सर्वकाळ ॥
ब्रम्ह चि असे ॥ ॥ ज्ञानाहून श्रेष्ठ असेना ॥ तरी कां पाहिजे उपासना ॥ उ
पासनेनें जना ॥ काय प्राप्त ॥ ॥ नसे गवा ब्रम्हा न शिव अथवा श्रीपजि हरी ॥
हरी जो तापातें उच्चलु निरूपा सिंधुलहरी ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

| एक० | अने० |
|---|---|
| प्र० पु० मी नसें-असेंना | अम्हीं नसों-असोंना. |
| द्वि० पु० तूं नससी-असशीना | तुम्हीं नसां-असांना. |
| तृ० पु० तो नसे-असेना. | ते नसत-नसती-असतीना. |
| ती किं० ते नसे-असेना | त्या नसत-नसती-असतीना. |
| तें नसे-असेना. | तीं नसत-नसती-असतीना. |

प्रकार ३

॥ नसता कवित्वव्यापार ॥ तरी कैंचा असता जगदोध्दार ॥ म्हणोन कवित्व हे

आधार ॥ सकळसृष्टीशी ॥ ७ ॥ नसते जरी संत ॥ तरी देवा होता अंत ॥ १ ॥
ते वीदेव हीननसता ॥ कोणीसंतानपूसता ॥ १ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

| | एक० | अने० |
|---|---|---|
| प्र० पु० | मीनसतों | अम्हीनसतों |
| द्वि० पु० | तूंनसतोशी | तुम्हीनसतां |
| तृ० पु० | तोनसतो | तेनसतात - नसती |
| | ती - किं० तेनसती | त्यानसतात - नसती |
| | तें नसतें | तीं नसतात - नसती |

अस धातुचा चौथा प्रकार निषेधरूपी वर्तमानकाळीं होय याचा नव्हे असाच होतो व भूत भविष्य काळीं ही त्याच रूपानें वर्ततो.

## असधातुचा निषेधरूपी भूत काळ

### प्रकार १

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मीनव्हतों - नहोतों | अम्हीनव्हतों - नहोतों |
| द्वि० पु० | तूंनव्हताशी - नहोताशी | तुम्हीनव्हतां - नहोतां |
| तृ० पु० | तोनव्हता - नहोता | तेनव्हते - नहोते |
| | ती किं० तेनव्हती - नहोती | त्यानव्हत्या - नहोत्या |
| | तेंनव्हतें - नहोतें. | तींनव्हतीं - नहोतीं |

### प्रकार २

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मीनसलों | अम्हीं नसलों. |
| द्वि० पु० | तूंनसलाशी | तुम्हीनसलां. |
| तृ० पु० | तो नसला | ते नसले. |
| | ती - किं० ते नसली | त्यानसल्या. |
| | तें नसलें. | तीं नसलीं. |

## असधातुनिषेधरूपभविष्यकाळ

### प्रकार १

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मीनसेन | अम्हींनसूं. |
| द्वि० पु० | तूंनसशील | तुम्हीनसाल. |
| तृ० पु० | तो-ती किं० ते-तें-नसेल | ते-त्या-तीं-नसतील. |

प्रकार २

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मीनसणार | अम्हीनसणार |
| द्वि० पु० | तूंनसणार | तुम्हीनसणार |
| तृ० पु० | तो-ती किं० ते-तेंनसणार | ते-त्या-ती नसणार. |

हो धातुचा वर्तमान काळ होतो, भूतकाळ झाला अथवा जाला, किंवा जाहला; व भविष्यकाळ होईल-होणार, असा समजावा; याचें निषेधरूपीं भविष्यकाळीं नव्हेल हें मात्र एक रूप अधिक होत असतें.

वर्तमान काळाच्या क्रियापदांविषयीं

निर्बंध १

शीक, भज, म्हण, जाण, पूस, पढ, जप, लाग, जीण, बघ, माग, वद, लाह, लाभ, ऐक, बोल, देख, सांग, बूझ, सूझ, समज, परीस; हे सकर्मक धातु शिवाय करून, अवशिष्ट सकर्मक धातु छंदादि साधणुकीसाठीं मराठी कवितेंत-स्वार्थीं तृतीयपुरुषेकवचनीं वर्तमान काळीं ईकारांत होतात-जसें-करी; वाची, भाजी, खाई, देई, भसी, आणी इत्यादि याशिवाय केलेले धातु त्याच अर्थीं, काळीं, पुरुषीं, वचनीं एकारांत होतात-जसे, शिके, भजे, म्हणे, जाणे, पुसे. पढे. इत्यादि.

निर्बंध २

ये, जा, हो, न्हा, हे अकर्मक धातु शिवाय करून अवशिष्ठ अकर्मक धातु छंदादिसाधणुकीसाठीं मराठी कवितेंत-स्वार्थीं तृतीयपुरुषेकवचनीं वर्तमानकाळीं-एकारांत होतात जसे-पडे, निजे, बसे, इत्यादि शिवाय केलेले धातु त्याच अर्थीं, काळीं, पुरुषीं, वचनीं ईकारांत होतात-जसे-येई, जाई, होई, न्हाई इत्यादि.

## निर्बंध ३

सकर्मक व अकर्मक धातु ज्या अर्थी, पुरुषीं, काळीं, जसे कवितेंत होतात म्हणून वरील दोन निर्बंधांत सांगितलें, ते स्वार्थी काळीं प्रथम पुरुषेकवच नीं व आज्ञार्थी द्वितीय पुरुषैकवचनीं वर्तमानकाळीं अनुनासिक होतात जसे- करीं, वाचीं, भाजीं, खाईं, देईं, भक्षीं, आणीं, शिकें, भजें, म्हणें- पडें, निजें, बसें, येईं, जाईं, होईं, न्हाईं, इत्यादि.

## निर्बंध ४

सकर्मक व अकर्मक एकाक्षरी धातु, पी, धू हे, शिवायकरून अवशिष्ट राहिले ते- कवितेंत छंदादि साधणुकीसाठीं स्वार्थी तृतीय पुरुषैकवचनीं वर्तमानकाळीं आकारांतापुढें य जोडल्यानें व एकारांत ससेच ठेवल्यानें सिध्ध होतात- जसे, ये, दे, घे, ने, व, जाय, खाय, न्हाय, इत्यादि.

## निर्बंध ५

सकर्मक व अकर्मक द्विस्वभाव धातु, ते कवितेंत छंदादिकारण परत्वें स्वार्थी तृतीय पुरुषैकवचनीं वर्तमानकाळीं ईकारांत अथवा एकारांत होतात आणि तेच अनुनासिक केल्यास स्वार्थी वर्तमान काळीं प्रथम पुरुषैकवचनीं व आज्ञार्थी द्वितीय पुरुषैकवचनीं वर्तमान काळचे होतात, जसे; उठी, उठीं, उठे, उठें, जिंके, जिंकें, जिंकी, जिंकीं, चाखे, चाखें, चाखी, चाखीं, पाहे, पाहें, पाही, पाहीं, मापी, मापीं, मापे, मापें, वाहे, वाहें, वाही, वाहीं; इत्यादि.

## निर्बंध ६

स्वरारंभाक्षर धातु कवितेंत छंदादि कारणपरत्वें- सर्वकाळीं निषेधरूपीं- लिहिणें असतां त्या स्वरानुरूप तेथे न हें अक्षर जोडल्यानें सिध्ध होतात- जसे- ओळख नोळख उरे नुरे इत्यादि.

### वर्तमानकाळाविषयीं कवितांमधलीं उदाहरणें.

भागवत एकादशस्कंध.

॥मीमांसकाचें येथेंमत॥ काम्यनिषिध्धरहित॥ कर्मचि साधन मानीत॥ मोक्षयेणें प्रास म्हणताती॥१॥ ऐशिया निजसुखाचीगोडी॥ विषयीं काय जाणती बापुडीं॥ वेचितां लक्षानुलक्ष कोडी॥ त्यासुखाचीकवडी लाभेना॥२॥-जोदमनशीळ जगजेठी॥ अक्रांचीही नव्हे निसटी॥ तो निजसुखाचें साम्राज्यपटी॥ बैसे उठाउठी तात्काळ॥३॥ देखतां नानाभूत विषमता॥ ज्याशी-साचार दिसे समता॥ तो या जेनिजसुखाचे माथां॥ क्रीडे सर्वथा समसाम्यें॥४॥ त्याचें पाऊल जेथें पडे॥ तेथें निजसुखाची खाणी उघडे॥ तो प्रसंगें पाहे जयाकडे॥ तेथें स्वानंदें वाढे परमानंदु॥५॥ तो ज्यासी भेटे अदृष्टें॥ त्यासी-सुखाचीपाहांट फुटे॥ त्याचा पावलागल्या अवचटें॥ सुखाचें गोमटें निजसुख लाभे॥६॥ आकळोनि उपनिषदार्थ॥ तुझ्याठायीं भजनयुक्त॥ ते तुज सर्वगता तें जाणत॥ सुनिश्चितसर्वात्मा॥७॥ हरिखें म्हणे सारंग पाणी॥ धन्य उध्दवा तुझी वाणी॥ मोक्षमार्गाची निशाणी॥ हे जनालागोनी त्वां केली॥८॥ दीनाचि येदयेलागीं॥ जो रिघे जळते आगी॥ त्याचें चरण मी वंदीं वेगीं॥ धन्य जगीं दयाळ॥९॥ ज्याच्या शरीर बळाचें कोड॥ एकला लक्षावरी दे झड॥ जऱ्ही तुटला दुधड॥ तऱ्ही वैरीयाचें तोंड विभांडी॥१०॥ जेवी कामिनीतारांचें मरण॥ घेऊन जाय अहेवपण॥ तेवी काम क्रोध जाण॥ लोभलक्षण असेना॥११॥

वाक्यवृत्ति

॥तूं म्हणशी हारसास्वाद उठे॥ समाधिशी विघ्न करी नेटें॥ तरी ऐकावें वचन गोमटें॥ यथार्थ सांगों॥१॥ जेथें जेथें साभिमान उपजे॥ पुण्य पापात्मकाचीं उमटती बीजें॥ तें तें अवश्य बळें त्यागिजे॥ स्वतसिध्धबाधकम्हणोनी॥२॥ ॥ज्ञानेश्वरी॥ ॥ का दोहीं काष्ठांचिया घृष्टी॥-आजीवन्ही जो एक उठी॥ तो दोन्ही हे भाव आटी॥ आपणचि होय॥१॥ ॥ ॥रुक्मिणीस्वयंवर॥ ॥ रुक्मेयाकृष्णनिंदा करित॥ वाग्देवता स्तुती वदत॥ निंदेशी वागेश्वरी भीत॥ पाप अद्भुत निंदेचें॥१॥७॥

अभंगाची उदाहरणें.

बोले चाले हरी॥ त्याची कथा तोचि करी॥१॥ विनवी रमावल्लभदास॥ अवघा हरीचा विलास॥४॥ आळवितों करुणा करे॥ विश्वंभरे दयाळे॥१॥ तुकाम्हणे दुजा कोण॥ ऐसा प्राणनिवारी॥५॥ सुखचंद्र ऐसें म्हणशी ज्या तोंडा॥ परी अवघा लोंडा दुर्गंधीचा॥१॥ मानिशी लाडकी॥ वनिता जे प्राण सखी॥१॥ परम नातें स्मरता॥ ध्यानीं आणीं रे अवस्था॥२॥ मत्तगजगामिनी॥ पडे भू

मिशी ऊताणी ॥ ३ ॥ हंसदास म्हणे भिय ॥ मेल्यातिचें वाटे भय ॥ ५ ॥ ॥

## सकर्मक कर धातुचें चालविणें.

### स्वार्थवर्तमानकाळ.

#### प्रकार १

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मी करितों | अम्ही करितों. |
| द्वि॰ पु॰ | तूं करितोशी | तुम्ही करितां. |
| तृ॰ पु॰ | तो करितो | ते करितात. |
| | ती किं॰ ते करिती | त्या करितात. |
| | तें करितें. | तीं करितात. |

#### प्रकार २

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मी करीं | अम्ही करों. करूं |
| द्वि॰ पु॰ | तूं करिशी | तुम्ही करां |
| तृ॰ पु॰ | तो / ती किं॰ ते / तें } करी | ते / त्या / तीं } करिती. |

#### प्रकार ३

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मी करीत | अम्ही करितों. |
| द्वि॰ पु॰ | तूं करीतशी - करिशी | तुम्ही करितां. |
| तृ॰ पु॰ | तो करीत | ते करितात. |
| | तीकिं॰ ते करील | त्या करितात. |
| | तें करीत. | तीं करितात. |

### अपूर्णवर्तमानकाळाचीं उदाहरणें

॥ जाणीव म्हणजे अंतःकरण ॥ अंतःकरण विष्णूचा अंश जाण ॥ विष्णू करिताहे पाळण ॥ येणें प्रकारें ॥ १ ॥ तो अंतरआत्मा म्हणिजे देव ॥ तयाचा चंचळ-स्वभाव ॥ पाळिताहे सकळ जीव ॥ अंतरीं वसोनी ॥ २ ॥ सावेगळें कांहीं चनसे ॥

॥ पाहों जालां तरी न दिसे ॥ न दिसोन वर्तवीतसे ॥ प्राणीमात्रासी ॥ ३ ॥ का राज पत्नी निरखून ॥ देखावयास समर्थ कोण ॥ परी निजपुत्र तेथें जाण ॥ बळें स्तनपान करितसे ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

## अपूर्णवर्तमानकाळ

### प्रकार १

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी करीत आहें-करिताहें | अम्ही करिताहों. |
| द्वि० पु० | तूं करिताहेशी | तुम्ही करिताहां. |
| तृ० पु० | तो करिताहे | ते करिताहेत. |
| | ती किं० ते करिताहे | त्या करिताहेत |
| | तें करिताहे | तीं करिताहेत. |

### प्रकार २

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी करीत असें-करितसें | अम्ही करितसों. |
| द्वि० पु० | तूं करीत असशी-करितशी | तुम्ही करितसां. |
| तृ० पु० | तो करीत असे-करितसे | ते करीत असती. |
| | ती किं० ते करितसे | त्या करीत असती. |
| | तें करितसे. | तीं करीत असती. |

### प्रकार ३

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी करीत असतों | अम्ही करीत असतों. |
| द्वि० पु० | तूं करीत असतोशी | तुम्ही करीत असतां. |
| तृ० पु० | तो करी असतो | ते करीत आसतात. |
| | ती किं० ते करीत असती | त्या करीत असतात. |
| | तें करीत असतें. | तीं करीत असतात. |

## भूतकाळाचीं उदाहरणें

### दासबोध.

॥ मंत्रयंत्र उपदेशिले ॥ नेणते प्राणी गोंविले ॥ जैसे झांकोन मारिले ॥ दुख

णाईत ॥१॥ वैद्य पाहिला परी कच्चा ॥ तरीच प्राण गेला पोराचा ॥ येथे उपावद्र सन्याचा ॥ काय चाले ॥२॥ जाणत्यावरी गर्व केला ॥ तरी नेणत्याकरीं बुडाला ॥ तेथे कोणाचा घात झाला ॥ बरें पाहा ॥ ३॥ पापाची खंडना झाली ॥ जन्मम रण यातना चुकली ॥ ऐशी स्वयें प्रचीत आली ॥ म्हणिजे बरें ॥४॥ ब्रम्हांड- हें कोणें केलें ॥ कास याचें उभारिलें ॥ मुख्य कर्त्यास ओळखिलें ॥ म्हणिजे- बरें ॥५॥ ॥७॥

अभंग.

॥ माता निंद्य केली राज्यहि त्यागिलें ॥ भरतें जोडिलें रामराया ॥१॥ प्रल्हादें पितायामृत्यु स्वीकारिला ॥ परी जोडियेला नारायण ॥२॥ बिभीषणें बंधु सोडियेला खळ ॥ श्रीराम निर्मळ सखा केला ॥३॥ ॥७॥ ॥

## स्वार्थभूतकाळ.

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मी अ॰ म्या केलें - मियां केलें | आम्ही केलें- |
| द्वि॰ पु॰ | तूं- तुवां- त्वां केलें- केलेंशी. | तुम्ही केलें- केलेती. |
| तृ॰ पु॰ | त्यानें- त्याणें- तयानें- तेणें केलें | त्याणीं- त्यानीं- तीहीं- केलें |
| | तिणें अ॰ तयेनें केलें | |
| | त्याणें- तयानें- तेणें केलें | |

करीत होतों, करिता झालों, केले होतें, केलें आहे, करणार होतों, हे क्रमानें अपूर्णभूत, पूर्णभूत, भूतभूत, वर्तमानभूत, भविष्यभूत; कवितेंत फार क्वचित येतात तथापि आल्यास असे होतील.

## भविष्यकाळाचीं उदाहरणें.

॥ विचार पाहील तो पुरुषु ॥ विचार न पाहील तो पशु ॥ ऐशीं वचनें सर्वेशु ॥ गयीं गयीं बोलिला ॥१॥ अरे जो चंचळाशी ध्याईल ॥ तो सहज चंचळेल ॥ जो निश्चळाशी भजेल ॥ तो निश्चळि ॥२॥

स्वार्थी तृतीयपुरुषेकवचनीं जो करधातुचा वर्तमानकाळीं दुसरा प्रकार लिहिला; यांत भविष्यकाळ ध्वनित होतो याचें उदाहरण.

अभंग.

॥ मन अन्यासी हें चिंती ॥ तुजवांचुनी श्रीपति ॥१॥ तरी पचो नरकांत ॥ कल्प होतां ही बहुत ॥२॥ देव करी तरी काय एक नोहे ॥ पाषाण चीना येतां रियेले ॥१॥७॥

॥ वरील उदाहरणाचीं माळ ॥

## प्रकार १

| | ए०व० | अ०व० |
|---|---|---|
| प्र०पु० | मी करीन | आम्ही करूं. |
| द्वि०पु० | तूं करशील | तुम्ही कराल. |
| तृ०पु० | तो-ती किं० ते-तें करतील. | ते-त्या-तीं करतील. |

## प्रकार २

| | ए०व० | अ०व० |
|---|---|---|
| प्र०पु० | मी करणार | आम्ही करणार. |
| द्वि०पु० | तूं करणार | तुम्ही करणार. |
| तृ०पु० | तो-ती किं० ते-तें करणार | ते-त्या-तीं करणार. |

## प्रकार ३

| १ | ए०व० | अ०व० |
|---|---|---|
| प्र०पु० | मी करीं | अम्ही करूं-करों |
| द्वि०पु० | तूं करिशी | तुम्ही करां |
| तृ०पु० | तो-ती किं० ते-तें करी | ते-त्या-तीं करिती. |

मी करीत असेन करणार आहें केलें असेल करणार असेन हे अनुक्रमें अपूर्णभविष्य वर्तमानभविष्य भूतभविष्य भविष्यभविष्य कवितेंत बहुधा येत नाहींत क्वचित आल्यास असे होतील.

## आज्ञार्थ

### उदाहरणें.

॥ ऐक अकिंचनाची गोष्टी ॥ नाहीं मठ मठिका पर्णकुटी ॥ पांचापालवीं मोकळ्या गांठीं ॥ त्यासी ये भेटी निज निज सुख माझें ॥ ७ ॥ सुक म्हणे परिक्षिती ॥ सावधान होई चित्तीं ॥ धन्य उध्धवाची प्रश्नोक्ति ॥ स्वकर्में मुक्ति पूसिली ॥ १ ॥ ॥ मग तूं ही जनकापरी ॥ जें जें पाहिजे तें तें करीं ॥ रुष्यादि अथवा काव्य तर्कें सारीं ॥ पढें यथा सुखें ॥ ७ ॥ एक मी वांचून कांहीं ॥ भक्तांशी शीय आणी नाहीं ॥ माझें भजन सुखें पाहीं ॥ लोकीं तिहीं न समाती ॥ ७ ॥ गुरु सेवे लागीं जाण ॥ शरीर राखावें सावधान ॥ या लागी शिष्याशी भोजन ॥ युक्ताहार पण सर्वदां ॥ ॥ अगार विदनार खरें कीं खोटें ॥ विचारून पाहें हें गोमटें ॥ रुपरूपशून्य तुज लाभेटे ॥ तें शून्यासी कीं अन्यासी ॥ ७ ॥ भलतैसा देह हा वर्तो ॥ पुण्य कीं पापास का प्रवर्तो ॥ मन बुध्धि पाहिजे तें चिंतो ॥ वाणी बडबडो भलतैशी ॥ ७ ॥ ॥

## अभंग.

॥ देव जोडे तरी सुखाशी अल्हेरा ॥ अर्पारे शरीरा देवकाजीं ॥ ध्रु० ॥ निशि दीनी चिंता करा रे देवाची ॥ नेदावी पडों चिउणी वता ॥ ध्रु० ॥ सांडा माय बाप बंधु विघ्नकर ॥ परी सीतावर आधीं जोडा ॥ ध्रु० ॥ प्राणावरी प्रीति ॥ ऐशी देवीं धरा भक्ति ॥ ध्रु० ॥ हेंचि आवडो या मना ॥ देवा इतूकि प्रार्थना ॥ ध्रु० ॥ हें चि दान देगा देवा ॥ तुझा विसर नव्हावा ॥ १ ॥ न लगे मुक्ति धनसंपदा ॥ संतसंग देई सदा ॥ २ ॥ ध्रु० ॥ ॥ ध्रु० ॥

वरील उदाहरणाची माला

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु० | मी करूं | अम्ही करूं |
| द्वि० पु० | तूं कर अ० करीं | तुम्ही करा |
| तृ० पु० | तो-ती किं० ते-तें करो | ते-त्या-तीं करोत- |

## विध्यर्थाचीं उदाहरणें.

॥ होका उपायें येणें तेणें ॥ पुढिलाशी जें सुख देणें ॥ तें उपतिष्टे मज कारणें ॥ तो गुण न्यायश्री कृष्णें वंदिजे ॥ ध्रु० ॥ आधीं झुंजार तुवां हो आवें ॥ मग हातीं शस्त्र न घ्यावें ॥ कान झुंजाचया करावें ॥ देवांगुण ॥ ध्रु० ॥ ग्रामासाठीं कुळ सांडिजे ॥ देशाकारितां ग्राम दंडिजे ॥ ऐशा न्यायार्थे जाणिजे ॥ वचन मिथ्या ॥ जाणावें परान्नें अंतर ॥ उदासीनता निरंतर ॥ नीति न्यायासी अंतर ॥ पडों नये ॥ ध्रु० ॥ ऐसें ओळखिलें पाहिजे ॥ ओळखोन भजन कीजे ॥ जेसा साहेब नमस्कारिजे ॥ बोळखिल्या ऊपरी ॥ सांडून आपुली संसार व्यथा ॥ करीत जावी देवाची चिंता ॥ निरूपण कीर्तन कथा वार्ता ॥ देवाच्याच सांगाव्या ॥

## अभंग

माझें सर्व जावें देवानें राहावें ॥ देवाशी पाहावें भक्तपणें ॥ १ ॥ काय ते करावे संपत्तीचे लोक ॥ जानकीनायक जेथें नाहीं ॥ ध्रु० ॥ काय म्या पामरें बोलावीं उत्तरें ॥ सख्या विश्वंभरें बोलवीलें ॥ १ ॥ ध्रु० ॥ नरदेहाचे संगती ॥ चुकवावी पुनरावृत्ति ॥ गर्भवासदुःख अति ॥ तुवां बहू भोगिलें ॥ १ ॥ ध्रु० ॥ ॥ ध्रु० ॥

वरील उदाहरणाची माळा

## विध्यर्थ

## प्रकार १

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मीं म्यां मियां करावे, | अम्ही करावें. |
| द्वि॰ पु॰ | तूं - त्वां - तुयां करावेंस | तुम्ही करावें. |
| तृ॰ पु॰ | त्याणें - तेणें - तयानें करावें<br>तिणें - तिनें - तये नें - तिया करावें<br>त्याणे - तेणें - तयानें करावें | त्याणीं - तयानीं - तीहीं करावें |

## प्रकार २

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मीं - म्यां - मियां करिजे. | अम्ही करिजे. |
| द्वि॰ पु॰ | तूं - त्वां - तुवा करिजेस अ॰ करिजे. | तुम्ही करिजे. |
| तृ॰ पु॰ | त्याणें - तेणें - तयानें करिजे.<br>तिया - तयेनें - तियेनें करिजे.<br>त्याणें - तेणें - तयानें करिजे. | त्याणीं - त्यानीं - तयानीं - तिहीं - तेहीं करिजे. |

## प्रकार ३

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मीं - म्यां - मियां करीतजावें. | अम्ही करीतजावें. |
| द्वि॰ पु॰ | तूं - त्वां - तुवां करीतजावेंस. | तुम्ही करीतजावें. |
| तृ॰ पु॰ | त्याणें - तेणें - तयानें करीतजावें.<br>तिनें - तयेनें - तिया करीतजावें<br>त्यानें - तेणे - तयानें करीतजावें | त्याणीं - त्यानीं - तयानीं - तिहीं तेहीं करीतजावें. |

ह्या कर धातुस विध्यर्थी कीजे, व दे धातुस दीजे; हें एक रूप सर्व धातुं पेक्षां अधिक होत असतें, तें वर प्रमाणेंच चालवावें. विध्यर्थाचे अवांतभेद म्हणजे, अपूर्णवर्तमान, भूत, वर्तमानभूत आणि भविष्य; हे अनुक्रमानें देतअसावें, द्यावें होतें अ॰ द्यायाचें होतें, दिलें असावें, देणार असावें, कवितेंत प्रायः येत नाहींत तथापी अभ्यास हीं लिहून दाखविलेलीं रूपें या प्रमाणेंच होतील.

कवितेंत संशयार्थ व संकेतार्थ आढळत नाहींत तथापी अभ्यासयाचीं रूपें मराठी व्याकरणा प्रमाणें समजावीं.

## ओवी.

पाहाणारपाहणें जयालागलें॥ तेंतद्रूपलें प्रासझालें॥ तरीमगजाणावेंबाणलें॥समाधान॥१॥

करणें, कर्त्ता, करणार, करणारा, हींधातुसाधीलनामें; व केलेलें, हें धातुसाधित विशेषण समजावें.

## धातुसाधीतअव्ययाचींउदाह॰

ओव्या.

॥चालतां बोलतां धंदा करितां॥खातां जेवितां सुखी होतां॥ नाचाउपभोग भोगितां॥ नामविसरूंनये॥ ७॥ सर्पलन्ध्याजेवीशापरीं॥ माथां हांटल्या फडानकरी॥ तेवीधनदारागृहपुत्रीं॥ छळितां ज्याभीतरी क्रोधनुमसे॥७॥

यांत पहिल्या ओवींतलीं सर्वअव्ययें वर्तमान कालवाचक आहेत व दुसरींतलीं भूत कालवाचक आहेत. करितां, करीतअसतां, हीं वर्तमान कालवाचकें. केलेंअसतां, हें भूत कालवाचक. करून, करोन, करोनी, करोनियां; हीं पूर्वकालवाचकें आणि करूं, हें निमित्तवाचक.

## प्रयोजकक्रियापदें.

ओव्या.

॥माशी आपणातें गिळवी॥ परिपुढिलातें वांतीशीणवी॥ तैसें कश्मळआठवी॥ आचरणजें॥७॥ राखोंजाणेंनीतिन्याय॥ नकरीन करवी अन्याय॥ कठिण प्रसंगींउपाय॥ करूंजाणें॥७॥ शांतिधरून धरवावी॥ तन्हेसांडून-सांठवावी॥ क्रियाकरून करवावी॥ बहुतांकरवीं॥७॥ ॥७॥

वरीलउदाहरणाचीमाला.

| | |
|---|---|
| वर्तमानकाळ····मीकरविलों इत्यादि. | रीतिभूत··· मीकरवीतअसें इ॰ |
| अपूर्णवर्तमान···मी करवीत आहें इ॰ | पूर्णभूत··· मीकरविताझालों इ॰ |
| रीतिवर्तमान····करवीतअसतों इ॰ | भूतभूत···मीं-म्यां- मियांकरविलेंहोतें. |
| भूतकाळ······मीं-म्यां-मियांकरविलें | वर्त॰भू॰···मीं-म्यां- मियांकरविलेंआहे. |
| अपूर्णभूत·····मी करवीत होतों इ॰ | भविष्य ··· मी करवीन. |

या धोरणा प्रमाणेंच यांतील आज्ञार्थादिभेदजाणावे; व माझ्यानें करवतें इत्यादिशक्य क्रियापदें कवितेंत बहुधा क्वचित येतात तीं ही धोरणानें समजावीं.

## करधातुचेंनिषेधरूपींचालविणें

### स्वार्थवर्तमान काळ.

#### प्रकार १

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मी करीतनाहीं | आम्ही करीत नाहीं |
| द्वि॰ पु॰ | तूं करीतनाहींशिं | तुम्ही करीतनाहीं |
| तृ॰ पु॰ | तो-ती किं॰ ते-तें करीतनाहीं | ते-त्या अ॰ तिया-तीं करीतनाहींत |

#### प्रकार २

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मीनकरीं-करींना. | अम्हीनकरूं-करूंना. |
| द्वि॰ पु॰ | तूंनकरिशी-करिसीना. | तुम्हीनकरां-करांना. |
| तृ॰ पु॰ | तो-तीअ॰ ते-तेंकरीना-नकरी | ते-त्या-तिया-तींनकरिती-करितीना. |

#### प्रकार ३

| | | |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मीनकरील | अम्हीनकरील. |
| द्वि॰ पु॰ | तूंनकरितशी | तुम्हीनकरितसां. |
| तृ॰ पु॰ | तो-तीअ॰ ते-तेंनकरीत | ते-त्या-तींनकरीत. |

### भूतकाळ.

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | म्यां-मियां-मीं केलेंनाहीं | अम्ही केलें नाहीं. |
| द्वि॰ पु॰ | त्वां-तुवां-तूं केलें नाहींस. | तुम्ही केलें नाहीं. |
| तृ॰ पु॰ | त्याणें-तेणें-तिया-तिणें-तेणे केलेंनाहीं. | त्याणीं-तिहीं-तेहीं केलें नाहीं. |

याच प्रमाणें धोरण पाहून भूतकाळाचे प्रकार समजतजावे

### भविष्यकाळ

| | ए॰ व॰ | अ॰ व॰ |
|---|---|---|
| प्र॰ पु॰ | मी करणार नाहीं. | अम्हीकरणारनाहीं. |
| द्वि॰ पु॰ | तूं करणार नाहींस | तुम्ही करणार नाहीं. |
| तृ॰ पु॰ | तो-तीअ॰ ते-तेंकरणारनाहीं | ते-त्या-तीं करणारनाहींत. |

भविष्य काळाचे अवांतर भेद यावरून ध्यानांत आणावे.

| ए० व० | आज्ञार्थ. | अ० व० |
| --- | --- | --- |
| प्र० पु० मी करूं नको | | अम्ही करूं नको. |
| द्वि० पु० तूं करूं नको. | | तुम्ही करूं नका. |
| तृ० पु० तो- ती कि० ते- तें न करू | | ते- त्या- तीं न करूत. |

| ए० व० | विध्यर्थ प्रकार १ | अ० व० |
| --- | --- | --- |
| प्र० पु० म्यां- मियां- मीं न करावें- करावेंना | | अम्ही करावेंना- न करावें. |
| द्वि० पु० तूं- त्वां- तुवां न करावें- करावेंना. | | तुम्ही करावेंना- न करावें |
| तृ० पु० { त्याणें- तेणें- तयानें- तिनें- तयेनें तिया न करावें- करावेंना. } | | त्यानीं- तेहीं- तिहीं करावेंना- नं करावें |

| ए० व० | प्रकार २ | अ० व० |
| --- | --- | --- |
| प्र० पु० मीं- म्यां- मियां करूं नये- करीत जाऊं नये | | अम्हीं करूं नये- करीत जाऊं नये. |
| द्वि० पु० तूं- त्वां- तुवां करूं नये- करीत जाऊं नये | | तुम्हीं करूं नये- करीत जाऊं नये. |
| तृ० पु० { त्यानें- तेणें- तिनें- तेणें- तिया- तेणें करूं नये- करीत जाऊं नये. } | | { त्याणीं- तिहीं- तेहीं करूं नये- करीत जाऊं नये. } |

अवशिष्ट रूपें धोरणानें ध्यानांत आणावीं. कवितेंत हें एक क्रियापदाचें रूप बरेंच आढळतें; म्हणजे, करिजेतें, करिजेलें, करिजेल; याचीं रूपें, केलें जातें, केलें गेलें, केलें जाईल; अशीं समजावीं:

कवितेंत भूत काळा विषयीं गोंधळ पडण्याचा अगदीं संभव नाहीं; परंतु भविष्य वर्तमान काळ यांचा बराच घोंटाळा पडतो. यासाठीं लक्ष्य पुरऊन पाहात गेलें पाहिजे कांकीं वर्तमान काळाचें सर्व प्रकारचीं क्रियापदें कधीं कधीं भविष्य काळचीं दर्शक होत असतात या विषयीं खालचें उदाहरण पाहा.

ओवी ॥ नाशिवंत नासेल कीं नासेना ॥ ऐसा अनुमानचि आहे मना ॥
॥ तरी तो पुरुष सहसा ज्ञाना ॥ अधिकारी नव्हे ॥ १ ॥ ॥ ७ ॥

अभंग ॥ देव करी तरी काय एक नोहे ॥ पाषाण ची नावें तारियेले ॥ १ ॥

क्रियापदांचें व्याकरण करितां यावें म्हणून येथें ही केकावली लिहिली आहे.

॥ के० ॥ तुम्हा हरिहरांत ज्या दिसतसे दिसो वास्तव ॥ प्रबुध्द म्हणती नसे तिळहि भेद मी यास्तव ॥ म्हणें मति यथार्थ जें स्वमत वर्णिती शैव तें ॥ न वैष्णव दुराग्रही परम मुख्य ही दैवतें ॥ १ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥

# प्रकरण ५

## महाराष्ट्रकवितेंत यमक, छंद व कविरूढी यांच्या साधणुकीसाठीं जी शद्बांचीं रूपांतरें होतात त्या विषयींनियम १.

ज्यांचें अंत्याक्षर य किंवा ह आहे, अशींजीं अकारांत पुल्लिंगी संस्कृत नामें अथवा विशेषणें आहेत, तीं यमक, छंद, किंवा कविरूढी; यांच्यासाधणुकी साठीं मराठी कवितेंत ओकारांत होतात. जसे- निश्चय, विषय, सदय, अतिशाय, उपाय, अभिप्राय, स्वकीय, तुरीय, सूर्य, प्रमेय. इत्यादि; आणि, अनुग्रह, विरह, दुःसह, दुःखावह, प्रवाह, सिंह, समूह, देह, लोह, प्ररोह, आदिक रून हे शब्द, निश्चयो, विषयो, सदयो, अतिशयो, उपायो, अभिप्रायो, स्वकीयो, तुरीयो, सूर्यो, प्रमेयो व अनुग्रहो, विरहो, दुःसहो, दुःखावहो, प्रवाहो, सिंहो, समूहो, देहो, लोहो, प्ररोहो; याप्रमाणें होतात.

### कवितांमधील उदाहरणें

॥ वरा निश्चयो शाश्वताचा करावा ॥ म्हणे दास संदेह तो वीसरावा ॥
॥ सदां वीषयो चिंतितां जीव गेला ॥ अहंभाव अज्ञान जन्मास आला ॥ १ ॥
॥ तूं कांहीं संशयो न धरीं ॥ मुक्त वर्तती दोहींपरी ॥
॥ परी तूं स्वयें अभ्यास करीं ॥ सांगितला जैसा ॥ १
॥ कवि स्वधर्माचा आश्रयो ॥ कवि भनाचा मनोजयो ॥
॥ कवि धार्मिकाचा विनयो ॥ विनयकर्त्ते ॥ १ ॥ ॥ ७ ॥
॥ धन्य धन्य हा नरदेहो ॥ येथील अपूर्वता पाहा हो ॥
॥ जो जो कीजे परमार्थ लाहो ॥ तो तो पावे सिध्धीतें ॥ १
॥ सांडून आर्द्रतेचा शाहो ॥ नादळत भरला दिसे डोहो ॥
॥ तैशी नेव वस्तु पाहा हो ॥ सर्वत्र असे ॥ १ ॥ ७ ॥ ॥
॥ लोहो कांव लोखंडें घडे ॥ तैशी वस्तु वस्तुतें जोडे ॥
॥ जैसा सूर्याचेनि उजेडें ॥ सूर्यो दिसे ॥ १ ॥ ७ ॥
॥ तुझा अनुग्रहो घडे ॥ तरीं ज्ञान होय रोकडें ॥
॥ स्वस्वरूप अनुभविजे फुडें ॥ स्वानुभावेंचि ॥ १ ॥

## नियमदुसरा.

ज्यांचें अंत्याक्षर, य, किंवा ह नाहीं अशीं जीं अकरांत पुल्लिंगी व क्वचितू नपुंसकलिंगी संस्कृत व प्राकृत नामें अथवा विशेषणें आहेत तीं यमक छंद किंवा कविरूढी यांचा साधणुकीसाठीं मराठी कवितेंत उ अथवा ऊकारांत होतात. जसे- ईश्वर, लाभ, वसंत, पंथ, संसार, विस्तार, एक. हरिख, मठ, मार्ग, पंडित, अर्थ, कुंजर, श्वापद, चाळक, निंदक, समर्थ, टवाळ, धीर, विद्वान् इत्यादि शद्व, ईश्वरु, लाभु, वसंतु, पंथु, संसारु, विस्तारु, एकु, हरिखु, मठु, मार्गु, पंडितु, अर्थु, कुंजरु, श्वापदु, चाळकु, निंदकु, समर्थु, टवाळु, धीरु, विद्वानु. या प्रमाणें होतात. कवितांतील उदाहरणें

॥ आतां उपाय बन वसंतु ॥ आज्ञेचा जो अहेवतंतु ॥
॥ अमूर्तेनिगुरु मूर्तु ॥ कारुण्याचा ॥ १ ॥ मोडून माया
॥ कुंजरु ॥ मुक्तमोतीयांचा बोगरु ॥ जेव विवासदुरु ॥
॥ निवृत्तिवंदू ॥ २ ॥ सांडोन मीठपणाचा लोभु ॥ मिठें
॥ सिंधुलाचा घेतल्ला लाभु ॥ तेवी अहं देउनियां शंभु ॥ शां
॥ भवि झालों ॥ ३ ॥ कांहीं बाहीं अलुमालु ॥ देखेए
॥ कादियेवेलु ॥ तरि तें देखणें हो टवाळु ॥ जयाचा-
॥ गावीं ॥ ४ ॥ गोडी आणि गुळु ॥ कापूर आणि परी
॥ मळु ॥ निवडूं जातां पांगुळु ॥ निवाडु होय ॥ ५ ॥
॥ किंबहुना शब्दु ॥ स्मरणदानी प्रसिध्धु ॥
॥ परीययाही संबंध्धु ॥ नाहीं येथे ॥ ६ ॥ ७ ॥
॥ मारिलें वत्सासुर वासरु ॥ बकासूर तें पाखरु ॥
॥ किरडूं मारिलें अघासुरु ॥ इतुकेन विरु केवी होय ॥ १ ॥
॥ केशिया मारिलें तट्टू ॥ बैल मारिला अरिष्टू ॥ इतुकि
॥ यासाठीं वीर वाटू ॥ केवी सुभट्ट म्हणावो ॥ २ ॥
॥ भजाया जनीं पाहातां राम एकू ॥ करी बाण एकु मुखीं शब्द एकू ॥
॥ क्रिया पाहातां उध्धरे सर्व लोकू ॥ धरा जानकीनायेकाचा विवेकू ॥ १
॥ नव्हे चेटकु चाळकु द्रव्यभोंदु ॥ नव्हे निंदकु मत्सरु भक्तिमंदू ॥
॥ नव्हे उन्मतू वेसनी संग बाधू ॥ जगीं ज्ञानियातो विसाधू अगाधू ॥ २
॥ दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ॥ स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ॥

॥ नवलरोगाचा पडिपाडू ॥ गोडपरमार्थझालाकडू ॥
॥ केवळविषप्राय विषयगोडू ॥ अतिशयें सुखाडू मानिती ॥ १ ॥
॥ विद्यावंताचा पूर्वजु ॥ म त्तानज्जु एक द्विजु ॥
॥ त्रिनयनु चतुर्भुजु ॥ फरशपाणी ॥ १ ॥ ७ ॥
॥ तूं समर्थाचें लेंकरू ॥ अभिमानें घेतला संसारू ॥
॥ अभिमान सोडितां पैलपारू ॥ पावशीबापा ॥ १ ॥
॥ पाहातां रूपाचा दुकाळु ॥ नामाचा तरी विटाळु ॥
॥ तेथें स्तवना गोंधळु ॥ रिघे कोठे ॥ १ ॥ ७ ॥ ॥
॥ एकें दिधला कल्पतरु ॥ त्यादीजे दर्पणींचा हारु ॥
॥ तेणें लोकाय गव्हांरु ॥ उत्तीर्ण होय ॥ १ ॥ ७ ॥
॥ जय जय स्वामी सद्गुरु ॥ शंकरानंद करुणाकरु ॥
॥ मोक्षध्वजा परपारु ॥ पाववीं निजदासा ॥ १ ॥

## नियम तिसरा.

ज्यांचें अंत्याक्षर, य, किंवा ह, आहे, अशीं जीं उकारांत पुल्लिंगी संस्कृत नामें अथवा विशेषणें आहेत तीं, यमक, छंद, कविरूढी, यांचे साधणुकीसाठीं मराठी कवितेंत ओकारांत होतात. जसे- वायु, राहु, महाबाहु, हे शब्द वायो, राहो, महाबाहो याप्रमाणें होतात.

कवितांतील उदाहरणें.

॥ वायो नव्हे पुरातन ॥ तैशी मूळमायाजाण ॥
॥ साच म्हणतांपुन्हालीन ॥ होत असे ॥ १ ॥ ॥
॥ काम क्रोधें लिथाडिला ॥ तो केसाह्मणावाभला ॥
॥ अमृत सेवितांच पावला ॥ मृत्य राहो ॥ २ ॥ ॥
॥ जरेपासून जन्मला मोहो ॥ तैसा जरासंध पाहाहो ॥
॥ वेढीं उठिला महाबाहो ॥ सैन्य समुदावो लोटला ॥ १
॥ स्वरूपीं उदेला अहंकार राहो ॥ तेणें सर्व आच्छादिलें व्योम पाहो ॥ ७ ॥

## नियमचौथा

जांत र, ळ किंवा ल असून त्याचाच मागें चवर्ग सोडून कोणतेंही अकारांत अक्षर आहे, असे जे प्राकृत शब्द आहेत; ते छंद किंवा कविरूढी, यां

नें साधणुकी साठीं, मराठी कवितेंत या अकारांत स्थानीं उकारांत किंवा ऊकारांत होतात जसे- लेंकरें, डिरवळ, बगळा, घुंगुरडें, वाव्हटळ, गांवदळ, पांदरकें, वातळ, बाभळ, विरळा, दादला, धाकला, आपला, चांगला, हे शब्दः लेंकुरें, डिरवूळ, बगुळा, घुंगुरडें, वाव्हटूळ, गांवदूळ, पांदुरकें, वातूळ, बाभूळ, विरूळा, दादुला, धाकुला, आपुला, चांगुला, या प्रमाणें होतात.

कवितेंतील उदाहरणें.

॥ लेंकुरें उदंड झालीं ॥ तों लक्ष्मी निघोन गेली ॥
॥ बापुडीं भिकेशी लागलीं ॥ कांहीं खावया मिळेना ॥ १
॥ बाळा मंत्र बगुळा मंत्र ॥ काळी मंत्र कंकाळी मंत्र ॥
॥ बटुक मंत्र नाना मंत्र ॥ नाना शक्तीचे ॥ २ ॥ ७ ॥
॥ निःशेष कामना रहित ॥ ऐसा तो विरूळा संत ॥
॥ सर्वां वेगळें मत ॥ अक्षयी जाचें ॥ १ ॥ ७ ॥
॥ गुण म्हणजे हें हें चांगुलें ॥ हें हें ओंगळ तें तें दूषिलें ॥
॥ येणें रीति जीवें कल्पिलें ॥ गुणदोषात्मक ॥ १ ॥ ॥
॥ सर्वज्ञ त्याचा भिक्षुर्षु ॥ जियाबाइला केला पुरुषु ॥
॥ तेणें दादुलें निसत्ताविशेषु ॥ शक्ती झाली ॥ १ ॥
॥ माशियें दुग्धाची घोंटी ॥ कळिकाळाचें नरडें फोडी ॥
॥ रावणादिक बापुडीं ॥ घुंगुर्डीं जैशीं ॥ १ ॥ ॥

## नियम ५ वा.

ज्यांत र ळ किंवा ल असून त्याचाच मागें च वर्गीचें अकारांत अक्षर आहे, असे जे प्राकृत शब्द आहेत ते छंद किंवा कविरूढी यांचा साधणुकी साठीं, मराठी कवितेंत अकारांत चवर्ग स्थानीं इ किंवा ईकारांत होतात. जसें- कुश्चळ, कुचर, साजरें, गोजरवाणें, कोजळी, फाजल, हे शब्द- कुश्चीळ, कुचीर, साजिरें, गोजिरवाणें, कोजिळी, फाजील, या प्रमाणें होतात.

कवितेंतील उदाहरणें.

॥ जन्म हाचि विषम काळ ॥ जन्म हेंचि ओखटी वेळ ॥
॥ जन्म हेंचि अति कुश्चीळ ॥ नरकपतन ॥ १ ॥
॥ ऐशी या कुचीर शिष्यासी ॥ उपेक्षितां दोष नाहीं गुरूसी ॥
॥ मग तो तीव्र मज्ज जरी श्रवणाशी ॥ परी तो वंचक ॥ १ ॥

पाहा पाहा डोळेभरी ॥ मूर्त सांवळी गोजिरी ॥ १ ॥

## नियमसाहवा.

ज्यांत र, ळ किंवा ल असून त्याचाच मागें ह अक्षर आहे असे जे प्राकृतशब्द आहेत ते छंद किंवा कविरूढी यांचा साधणुकीसाठीं मराठी कवितेंत त्या ह स्थानीं ओकारांत होतात. जसें- मोहरा, वोहळ, दोहरा, सोहळा, डोहळे, बोहलें, हेशब्द- मोहोरा, वोहोळ, दोहोरा, सोहोळा, डोहोळा, बोहोलें, याप्रमाणें होतात.

कवितेंतील उदाह.

॥ परि ते सरिता मिळणी मागें ॥ वोहोळ गे सें मा निजें जगें ॥
॥ तैसा नव्हे शिष्यवेगें ॥ स्वामीच होय ॥ १ ॥ ॥ ७
॥ सकळ सोहोळा जाहालियावरी ॥ गौरवी निर्धारी रामसर्वी ॥ १ ॥
॥ गुहक सुग्रिव बिभीषण थोर ॥ सकळ वानर पुजियेले ॥ २ ॥ ७
॥ राघवसेवन व्हावें निशिदिन नलगे अन्य पाळा ॥
॥ म्हणे सुमित्रा करु निरूपा हा पुरवावा डोहोळा ॥ १ ॥
॥ श्रीरामवरप्रसादें ॥ राशी पडतील घरांत मोहोरांना ॥ ७ ॥

## नियमसातवा.

जांत र, ळ, किंवा ल असून त्याचाच मागें य आहे असे जे प्राकृतशब्द आहेत; ते छंद किंवा कविरूढी यांचे साधणुकीसाठीं मराठी कवितेंत, त्या य-स्थानीं य लोपून केवळ इ किंवा ई होऊन सिध्ध होतात. जसे- पायरी; सायरीक, सायळ, कायल हेशब्द- पाइरी साइरीक साईळ काईल याप्रमाणें होतात.

कवितेंतील उदाहरणें.

॥ मैंद साइरीक काटिती ॥ फांसे घालून प्राण घेती ॥
॥ तैसें आयुष्य गेलिया अंतीं ॥ प्राणि यास होय ॥ १
॥ देवद्वारी पडशाळा ॥ पाइरिया दीपमाळा ॥
॥ वृंदावनें पार पिंपळा ॥ बांधतो सकळगुण ॥ १ ॥

## नियम आठवा.

जांत ट वर्गांतील अक्षरा मागेंच अकरांत-च वर्गाचें अक्षर आहे असे

जे प्राकृत शब्द आहेत, ते छंद किंवा कविरूढी यांचा साधणुकीसाठीं मराठी कवितेंत त्या अकारांत च वर्ग स्थानीं इ किंवा ई कारांत होतात जसे- गोचड, बोजड, खुजट, इत्यादि शब्द- गोचीड बोजीड खुजीट या प्रमाणें होतात-

कवितेंतील उदाहरण-

॥ गोचीड अशुध्ध सेविती ॥ चाम वा मासांत घुसती ॥
॥ पिसोळे चाऊन पळती ॥ अकस्मात ॥ १ ॥ ७ ॥

## नियम नववा.

जांत ट वर्गांतील अक्षरामागेंच- चवर्गाशिवाय अकारांत कोणतेंही अक्षर आहे- असे जे प्राकृत शब्द आहेत ते, छंद किंवा कविरूढी यांचे साधणुकी साठीं मराठी कवितेंत त्यामागील अक्षर स्थानीं उ किंवा ऊ कारांत होतात-जसे धाकटा, बापडा, वांकडें, अखडणें, विरडणें, इत्यादि शब्द- धाकुटा बापुडा वांकुडें अखुडणें विरुडणें या प्रमाणें होतात-

कवितेंतील उदाहरणें-

॥ लेंकुरें खेळती धाकुटीं ॥ एकें रांगती एकें पोटीं ॥
॥ ऐशी घरभरी झाली दाटी ॥ कन्या आणि पुत्रांची ॥ १ ॥
॥ वांकुडा तिकुडा फोडिला ॥ पाषाण घडून नीट केला ॥
॥ दुसऱ्ये वेळेशीं पाहिला ॥ तरि तो तैसाचि असे ॥ १ ॥
॥ धुरू लेंकरूं बापुडें दैन्यवाणें ॥ कृपा भाकितां दीधली भेटी जेणें ॥ ७ ॥

## नियम दाहावा.

ज्यांचें अंत्याक्षर य असून उपांत्य कोणतें ही आकारांत अक्षर आहे, असे जे शब्द आहेत, ते यमक छंद किंवा कविरूढी यांचा साधणुकी सागें मराठी कवितेंत अंत्याक्षर लोपून त्या स्थानीं- व किंवा वो होऊन सिध्ध होतात- जसे- समुदाय, अपाय, न्याय, अभिप्राय, राय, गाय, ठाय, घाय, डाय, थाय; इत्यादि शब्द- समुदाव, अपाव, न्याव, अभिप्राव, राव, ठाव, घाव, धाव, डाव, थाव, किंवा समुदावो, अपावो, न्यावो, अभिप्रावो, रावो, ठावो, घावो, धावो, डावो, थावो, या प्रमाणें होतात-

कवितेंतील उदाहरणें-

॥ भक्तिचेनि योगें देव ॥ निश्चयें पावती मानव ॥
॥ ऐसा आहे अभिप्राव ॥ इये ग्रंथीं ॥ १ ॥ ७ ॥

॥ नारातीआणि दिवो ॥ पातली सूर्याचा ठावो ॥
॥ तैशींआपुला साचि चावो ॥ दोघेजियें ॥ १ ॥ ७॥
॥ भेदू लाजोनिआवडी ॥ एकरसींदेतबुडी ॥
॥ तोभोगणे या थाव काढी ॥ अद्वैताचा जेथे ॥ २ ॥
॥ मनींधरोनि हाचिभावो॥ अंतःपुरा आला रावो॥
॥ रुक्मिणीशीकृष्णनाहो॥ राणिये पाहोपुसतसे॥ १
॥ पूर्ण प्राप्तीचामुख्य ठावो॥ सर्वभूतींभगवद्भावो ॥
॥ हाचिभक्तिचा पूर्ण गौरवो॥ तोचि अभिप्रावो
॥ हरिसांगे ॥ १ ॥ ७॥

## नियमअकरावा.

ज्यांचें अंत्याक्षर य असून उपांत्य कोणतेंही अकारांत अक्षर आहे; असे जे पुल्लिंगी शब्द आहेत, ते यमक, छंद, किंवा कविरूढी, यांचे साधणु कीसाठीं उपांत्य ओकारांत होऊन व अंत्याक्षर लोपून मराठी कवितेंत सिध्ध होतात, आणि जर तोच य पुल्लिंगी शब्दांत, मध्यें व स्त्रीलिंगी तसेच, नपुंसकलिंगी शब्दांच्या अंतीं असेल तर, लोपून त्याच्याच मागलें अक्षर क्रमानें एकारांत किंवा ऐकारांत होतें जसे- निश्चय, निश्चय, विस्मय, उदय, सदय, अतिशय, इत्यादिशब्द- विषो, निश्चो, विस्मो, उदो, सदो, अतिशो, किंवा अतिसो; आणि अवयव, भय, सय, संवय हे शब्द- अवेव, भें, से, संवे, याप्रमाणें होतात.

कवितेंतील उदाहरणें.

॥ आपणाप्रतीरवि ॥ उदो न करी जेवी ॥
॥ हा वंद्य नव्हे तेवी ॥ वंदनासी ॥ १ ॥
॥ आतां सविकल्प वें असो ॥ किंवानिर्विकल्पीं समरसो॥
॥ परीदुसरेपणाचा अतिसो ॥ जातया नाहीं ॥ १ ॥
॥ जैसीं समर्थाचींलेकुरें ॥ नाना अवेवीं सुंदरें ॥
॥ मूळपुरुषाचेनिहारें ॥ तैसे कवि ॥ १ ॥ ७ ॥
॥ दृष्टीस लागली संवे ॥ जें दिसेल तेंचिपाहावें ॥
॥ परंतु सार तें जाणावें ॥ गौप्य आहे ॥ २ ॥ ७ ॥
॥ प्रल्हादासी देसथोर ॥ म्हणे मज थोरथोर ॥
॥ भीति बोलतां समोर ॥ भें नवाटे तूजला ॥ १ ॥ ७॥

## नियमबारावा.

ज्यांत ष किंवा क्ष अक्षर आहे, असे जे शब्द आहेत, ते यमक, छंद, किंवा कविरूढी यांच्या साधणुकी सार्गी मराठी कवितेंत तें अक्षर लोपून त्याजागीं ख होऊन सिध्ध होतात. जसे - विष, रेषा, पाषांड, अक्ष, अक्षता, निरीक्षण इत्यादि शब्द - विख, विखो, रेखा, पाखांड, आंख, अखता, निरिखण; याप्रमाणें होतात. कवितेंतील उदाह०

॥ सत्ताप्रकाशसुख ॥ या लिहीं तिहीं उणें लेख ॥ ७
॥ वीख पणें वीख ॥ विखा नाहीं ॥ १ ॥ ७
॥ हागा मायाबसे द्राविशी ॥ तेंमायीक म्हणोनी चाळिशी ॥
॥ अमायीक तंव नव्हेशी ॥ कवणाही विखो ॥ १ ॥ ७
॥ अखताचि अखता ॥ अखतीं असे न पूजितां ॥
॥ मा आखतीं काय आलां ॥ पूजों जावें ॥ १ ॥ ७ ॥ ७
॥ घेऊन रथाचापें अंख ॥ वेगीं धाविंनला सन्मुख ॥
॥ कोपें क्षणूं आला सात्यक ॥ येरें मस्तक च्छुकाविला ॥ १
॥ तयाशीं द्यावें जीभा कंड ॥ तें आसुचें काळें तोंड ॥
॥ या बोला म्हणाल पाखांड ॥ तरीज्ञा तेउंदड तुम्हापाशीं ॥ १
॥ मला निरखितां भवच्चरण कन्यका आपगा ॥
॥ म्हणे अगइ ऐकिलें न कधिंही असें पापगा ॥ ७ ॥

## नियमतेरावा.

ज्यांत कोणे एकेम अक्षरावर रेफ आहे, असे जे शब्द आहेत ते छंद किंवा कविरूढी यांचा साधणुकी सार्गी, मराठी कवितेंत तो रेफ लोपून रेफाक्षराच्या मागेंच रेफाचा रु किंवा रू होऊन सिध्ध होतात. जसे - हर्ष, वर्ष, दर्शन, आर्ष, अर्भक, मार्ग, अर्ता, पर्ता, तुर्क, इत्यादि शब्द - हरुष, वरुष, दरुशन, आरुष, अरुभक, मारुग, अरुता परुता, तुरूक, याप्रमाणें होतात.

॥ शत वरुषें अनावृष्टी ॥ तेणें संहारे जीव सृष्टी ॥
॥ ऐशा कल्पांतींच्या गोष्टी ॥ शास्त्रीं निरूपिल्या ॥ १ ॥
॥ आपण तुरूक गुरू केला ॥ शिष्य चांभार मेळविला ॥
॥ नीच यातीनें नाशिला ॥ समूदाव ॥ १ ॥ ७ ॥ ॥

॥ आजीभाग्येंमीसभाग्यपूर्ण ॥ लाधलोंतुमचेंदरुशन ॥
॥ तरी आत्यंतीकक्षेमकोण ॥ कृपाकरूनमजसांगा ॥ १ ॥
॥ कीर्तनाचाघडघडाट ॥ आनंद कोंदलाउद्भट ॥
॥ हरुषें डोले वैकुंठपीठ ॥ सुखेंनीळकंठतांडवनाचे ॥ २
॥ कान्होसच्चिदानंदशब्दअरुता ॥ ताहीपरुतातोतूंत्याहीपरुतातोतूं ॥
॥ निजानंदूरे ॥ कान्होसच्चिदानंदशब्द अरुता ॥ १ ॥ ६० ॥ ७ ॥

## नियमचौदावा.

ज्यांत ष अक्षरावर रेफ आहे असे जे शब्द आहेत, ते यमक, छंद, किंवा कवि रूढी यांचा साधणुकी साठीं, मराठी कवितेंत ष स्थानीं ख झाला असतां रेफा ची त्या भागेंच, रि, किंवा, री, होऊन सिध्ध होतात.

कवितांतीलउदाहरणें.

॥ ऐसी सेवाकरितां तोखें ॥ उतराई ह्मणे हरिखें ॥
॥ तंव काळ काळपणासुके ॥ अनित्यनाशें ॥ १ ॥
॥ तुझास्तुतिवादकरणें ॥ तंव परतलीं श्रुतिपुराणें ॥
॥ तेथे माझें आरिखबोलणें ॥ कोठे कोणें सारावें ॥ १ ॥

## नियमपंध्रावा.

ज्यांत व अक्षर आहे, असे जे शब्द आहेत. ते यमक, छंद किंवा कविरूढी यांचे साधणुकी साठीं मराठी कवितेंत व हें अंत्याक्षर असतां व स्थानीं वो किंवा उ अथवा ऊ होऊन सिध्ध होतात; परंतु तें च मध्याक्षर असतां उ किं वा ऊ मात्र होऊन सिध्ध होतात. जसे – जीव, शिव, देव, गव, भाव, गौरव; आणि, कंवठ, देशावर, कावळा, पावलें, देवळें; इत्यादि शब्द. जिवो, शिवो, देवो, गवो, भावो, गौरवो; किंवा, जिउ, शिउ, देऊ, भाऊ, गउ, गौरउ; आणि, कंऊठ, देशाऊर, काउळा, पाउलें, देउळें; याप्रमाणें होतात.

कवितांमधीलउदाहरणें.

॥ जिया जेवविला शिऊ ॥ वेदाचें कोणें बहू ॥ ७ ॥
॥ वाढितेनशी जेऊं ॥ निघालाजो ॥ १ ॥ ॥ ७ ॥ ॥
॥ जया चेनिरूपासलिलें ॥ जिऊ हा गवघरीपारवळे ॥
॥ जे शिवपणही ओविळे ॥ अंगीं नउवी ॥ २ ॥ ७ ॥

॥ सांगतां वाचे तेंवाचा ॥ ठाऊ फिटे वाच्यवाचकाचा ॥
॥ परता काय भेदाचा ॥ विटाळु होय ॥ ३ ॥ ध्रु ॥
॥ तेथे न मन के बोलें ॥ केउतीं सुये पाऊलें ॥ ध्रु ॥
॥ अशी लावो निजाडिलें ॥ नावनिजेणें ॥ ४ ॥ ध्रु ॥
॥ जनाचालालची स्वभावो ॥ आरंभींच म्हणती देवो ॥
॥ म्हणजे कांहीं तरी देवो ॥ ऐशी वासना ॥ १ ॥ ध्रु ॥
॥ कांउळे होले हे पक्षी अधम ॥ चिमण्या साळ्यादि मध्यम ॥
॥ रांचे नीलकंठादि उत्तम ॥ हे गुणदोष कल्पना ॥ १ ॥ ध्रु ॥
॥ देव देविचीं देउळें ॥ मोडी दुष्ट अंगबळें ॥ १ ॥ ध्रु ॥
॥ ज्ञानदेऊ म्हणे श्रीमंत ॥ हें अनुभवामृत ॥ ध्रु ॥
॥ येणें चि जीवन्मुक्त ॥ होइजे जगीं ॥ १ ॥ ध्रु ॥

## नियमसोळावा.

ज्यांचें अंत्याक्षर बा असून उपांत्य ओकारांत अक्षर आहे, अशीं जीं आकारांत पुल्लिंगी विशेषनामें आहेत, तीं यमक, छंद किंवा कविरुढी यांचे साधणुकीसाठीं मराठी कवितेंत देवास उद्देशून असतां अंत्याक्षर लोपून व मनुष्यास उद्देशून असतां अंत्याक्षर व उपांत्याची मात्रा अशीं दोन लोपून सिध्द होतात. जसे – विठोबा, कान्होबा, तुकोबा; हे शद्ब. देवास उद्देशून असणारे, विठो, कन्हो; आणि मनुष्यास उद्देशून असणारे, विठा, कान्हा, तुका; याप्रमाणें होतात.

कवितांतील उदाहरणें.

॥ विठोनें शिरीं वाहिला देवराणा ॥ तयाअंतरीं ध्यास रे त्यास नेणा ॥
॥ नामा म्हादा गोंदा विठा नारी पुत्र ॥ जन्मले पवित्र त्याचे वंशीं ॥ १ ॥
॥ तुका म्हणे तया ॥ माझे नमन आचार्या ॥ १ ॥
॥ कृष्ण कान्हो गोपाळा ॥ या आरुषा नामाचा चाळा ॥
॥ घेऊन गर्जती वेळोवेळा ॥ तेणें घन नीळा सुखावे ॥ १ ॥

## नियम समाप्त.

संस्कृत आणि प्राकृत शब्द जे अनियमितपणानें बदलतात,त्यांचीं थोडीं उदाहरणें.

| संस्कृत. | | प्राकृत | |
|---|---|---|---|
| भ्रतार··भातार. | शूर····सौरा. | रिगम··रिघ,रिघाव. | गोमांस··घाऊस. |
| ह्रास··हरास,हराश. | देवर···दीर,देर. | हत्ती···हलरूं. | मळ·····मैळ. |
| वृक्ष····रुख. | प्रहर···पाहार. | अंगठा··अंगोठा. | दांडगें····दादुगें. |
| मेघ····मेह. | पत्तन···पाटण. | नागवणें··नाहीगवणें | ठक····ठकडा. |
| निर्गम···निगम. | गृह,गेह··घर. | धाकटें···धाकलें. | माग····मागोवा. |
| पुच्छ····पूस. | पुरंध्री··पुरंदरी. | तूट····तुटार. | रांड····रांडवा. |
| व्यवधान··वाउधान. | आदर्श··आरसा. | लाडकें···लाडिलें. | अवघें···अघवें. |
| पक्ष··पांख,पंख. | स्वातंत्र्य··स्वातंतर्य. | लटिकें···लटूक. | वोखटें···वोख. |
| ध्रुव···धुरू. | ज्ञाती··न्याती. | पंख···पाखोळा. | सोपें····सोपारें. |
| नाग····ना. | वल्लभ··वालभ. | अमवसा··अमासा. | चोंच····चाचुवडें. |
| निरीक्षण··निरखणें. | प्रक्षालन·पाखाळणें | दोघेपण··दोघुलेपण | कंवठ···कवीठ. |
| खड्ग····खर्ग. | संगी····सागी. | हिणकट··हिणेलें. | नवरा····नाहो. |
| अग्नि···आग,आगी | रात्री··राती,रात. | गोष्ट···गोठ. | चांगलें···चांग. |
| बडिश···बिडीश. | अमीष··अवीस. | हल्या··हलकट,हलका | लघु····लाग. |
| शंबर···सावरें. | फणा··फडा,फडी,फड | ॥भातारान्वेंदिसणें॥भातारूचिजियेचेंअ॥ | |
| परिक्षा···पारख. | कुमारी··कुवारी,कारी | ॥सणें॥नेघिजलीदोघेंजणें॥निवडूंजिथे॥१ | |
| दिन··दिव,दिह,देह, | संधी···शांधी. | याप्रमाणें प्रत्येकाचें उदाहरण दिल्हें अस | |
| कलह··कळ,कळी | स्वतंत्र···स्वतंतर | तें,परंतु विस्तारभयामुळें पुरे केलें आहे. | |
| रणशूर···रणसोर. | भर्ता···भर्तार. | | |

अनियमितप्रकरण समाप्त.

## कवितांचेनियमाभ्यासाचेंदृढीकरणार्थकितीएक प्रश्नोत्तरें.

### ओवी.

॥जयजयाजीसद्गुरु॥नकळेस्वरूपाचापारु॥जेथेमायेचाबडिवारु॥
॥सर्वथानचले॥१॥ ॥७॥ ॥७॥ ॥

प्रश्न— ह्या ओवींत, रकार उकारांत होण्याचें कारण काय?

उत्तर— प्रथमचरणांत सद्गुरु, हा शब्द उकारांत आहे; म्हणून यमकसाधणुकीसाठीं, बाकी, रकार उकारांत झाले आहेत.

प्रश्न— हे शब्द उकारांत कोणत्या नियमाप्रमाणें झाले?

उत्तर— दुसऱ्यानियमाप्रमाणें.

प्रश्न— हा दुसरा नियमच आहे याची ओळख काय?

उत्तर— ह्याशब्दांचीं अंत्याक्षरें य किंवा ह नाहींत, हीच याची ओळख आहे.

### ओवी.

॥आतांअसोहायुक्तिवादु॥जंवईश्वरेंशीस्फुरेभेदु॥तंवनसुटेहासंबंधु॥मिथ्याहेंतोचा॥१॥ ॥७॥ ॥७॥

प्र०— ह्या ओवींत तीनही चरणांत उकारांत शब्द झाले आहेत यांचें प्रयोजन काय?

उ०— कविताशोभिवंत दिसावी म्हणून कविरूढीसाठीं.

प्र०— ही कविरूढी कोणत्या नियमाप्रमाणें आहे?

उ०— दुसऱ्यानियमाप्रमाणें.

प्र०— हा दुसरा नियम कशावरून?

उ०— अंत्याक्षर ओवीमधील शब्दानें य किंवा ह नाहीं म्हणून.

प्र०— शब्दानें अंत्याक्षर य किंवा ह असतें तर यमक, छंद किंवा कविरूढ साधणुकीसाठीं कसें झालें असतें?

उ०— ओकारांत झालें असतें.

प्र०— शब्दानें अंत्याक्षर य किंवा ह असतां ओकारांत व्हावें हा नियम कोणता?

उ०— पहिला.

### श्लोक.

॥गजेंद्रमहासंकटींबाहयाहे॥तयाकारणेंश्रीहरिधांवताहे॥७॥ ॥

प्र०— ह्या श्लोकांत गजेंद्र हा अकारांत पुल्लिंग शब्द; ऊकारांत कां झाला?

उ०- छंद साधणुकीसाठीं.

प्र०- हा छंद कोणता, व ऊकारांत शद्ब कोणत्या नियमा प्रमाणें झाला?

उ०- हा भुजंगप्रयात छंद असून ऊकारांत शद्ब दुसऱ्या नियमा प्रमाणें झाला आहे.

प्र०- भुजंगप्रयाताचें लक्षण काय?

उ०- लघु, गुरु, गुरु; असा तीन अक्षरांचा एक गण, असे १६ गण असणें, हेंच त्याचें लक्षण.

ओवी.

॥ कांहींनसुचाचें तो मोहो॥ बहू संशयतो संदेहो॥ वचनेंनमनीतोदुराग्र हो॥ निग्रहहेघोरवृत्ति॥ १॥ ॥ ७॥ ॥ ७॥

प्र०- ह्या ओवींतील तीन ही चरणांत ह अक्षर अंतीं, असे अकारांत पुल्लिंग शद्ब ओ कारांत कां झाले?

उ०- कविरूढ साधुणुकी साठीं.

प्र०- ही कविरूढ कोणत्या नियमा प्रमाणें साधली?

उ०- पहिल्या नियमा प्रमाणें.

प्र०- दुसऱ्या नियमा प्रमाणें कां नाहीं?

उ०- ह्या शद्बांत ह अंत्याक्षर आहे म्हणून

श्लोक.

॥ मनासंशयोवाउगातोत्यजावा॥ प्रभातेमनीरामचिंतीतजावा॥ १ ॥

प्र०- ह्या श्लोकांत, संशय, अकारांत पुलिंग शद्ब, ओकारांत कां झाला?

उ०- छंद साधणुकी साठीं.

प्र०- कोणत्या नियमा प्रमाणें?

उ०- पहिल्या.

प्र०- कशावरून?

उ०- शद्बाचें अंत्याक्षर य आहे म्हणून.

प्र० असा नियम य अक्षरा पुरताच आहे कीं काय?

उ०- नाहीं. य आणि ह या दोन अक्षरां विषयीं आहे.

प्र०- य किंवा ह अंत्याक्षर नसल्यास अन्यांत्या क्षरां विषयीं नियम कसा व कोणता?

उ०- नियम दुसरा, व ते अकारांत पुल्लिंग शद्ब उकारांत होतात.

पद.

॥ देहो जर्जर मळिन वेगळा॥ नतूं कीं॥ देहो जर्जर मळिन वेगळा॥ ध्रु०॥

प्र० ह्या पदांत देह शद्ब ओकारांत कां झाला?

उ०- छंद साधणुकी साठीं.
प्र०- ह्या छंदाचें संस्कृतांतल नाव काय?
उ०- हा छंद संस्कृतांतला नव्हे.
प्र०- तरमग छंद साधणुकी साठीं म्हणून जें तूं उत्तर दिल्हेंस तें व्यर्थ झालें.
उ०- व्यर्थ कां होईल. कां कीं हा स्वछंद आहे
प्र०- स्वछंद असल्यास शद्व ही स्वछंद कां नसावा?
उ०- छी,छी, तसें नव्हे; स्वछंद जरी तरी तालावर म्हणतांनां पडूं नये म्हणून शद्व स्वछंद होऊं नाहीं.

ओवी.

॥आतां वंदूं ते सज्जन॥जे का आनंद चिद्घन॥ वरुषताती स्वानंद जीवनं॥ ॥संतप्त जनें निवाचया॥१॥ ॥७॥ ॥७॥

प्र०- ह्या ओवींत वरुषताती ह्या शद्वाचें मूळ काय?
उ०- वर्षताती
प्र०- मूळचा शद्व असा; ओवींत कोणत्या नियमावरून रूपांतर पावला.
उ०- तेराव्या नियमा प्रमाणें.
प्र०- चौदाव्या नियमा प्रमाणें कां नाहीं?
उ०- ष चा ख झाला नाहीं म्हणून.

ओवी.

॥मातियेचा द्रोण केला॥ तो कोळियाशीं भावो फळला॥ म्हणोन विश्वासें दीणनाडला॥ जगठकिला विकल्पें॥१॥ ॥७॥ ॥

प्र०- ह्या ओवींत भावो असें रूप कोणत्या नियमा प्रमाणें झालें?
उ०- पंधराव्या.
प्र०- ह्या नियमा प्रमाणें भाउ कां होऊं नये?
उ०- किंचित छंदास अपुर्तें पडतें म्हणून तसें होऊं नये.
प्र०- भाऊ, असें दीर्घ अक्षर घालायाचें होतें?
उ०- तरी घातलें असतें तर अडचण नव्हती व तेणें करून यमकादिक, हीं ही बिघत नव्हतीं असें असून घातलें नाहीं; ही कवीची मर्जी.

ओवी.

॥पाषाण प्रतिमा हा निंदतो॥ तेथें चिद्ब्रह्म पूर्ण भावो॥ भक्त संत सज्जनाशीं पाहे॥ अनुभव नदेहो लवों चिनेणें॥१॥ ॥७॥ ॥

प्र०- ह्यांत देवो, भावो, असें रूप होण्याचें कारण काय ?

उ०- यमक साधणूक.

प्र०- ह आणि व यांचे यमक साम्य होतें काय ?

उ०- प्राकृत कवितेंत ह आणि व, ह आणि य, य आणि व; तसेंच क चें ख शीं, ग चें घ शीं, च चें छ शीं; इत्यादि क्रमानें यमक साम्य होतें.

अभंग

॥ भव्य रूप हरी। किरीट तो शिरीं ॥ कुंडलें साजिरीं शोभती ॥ १ ॥ ७.

प्र०- कोणत्या नियमा वरून साजिरीं असें झालें ?

उ०- पांचव्या.

प्र०- साजरीं होत नाहीं काय ?

उ०- नाहीं. कांकीं अभंग म्हणण्याच्या चार, पांच चाली आहेत, तेव्हां हें रूप जसें सर्व साधारण पणानें ताला वर म्हणायास सांपडतें, तसें दुसरें सांपडत नाहीं. अतएव तें एकदेशी रूप त्याज्य आहे.

॥ अभंग ॥ ॥ विठो पंढरीच्या राया ॥ माझें दंडवत पायां ॥ १ ॥ ७ ॥

प्र०- विठो शब्द कोणत्या नियमानें झाला ?

उ०- सोळाव्या.

प्र०- ह्या नियमा प्रमाणें विग असें ही होतें ?

उ०- मनुष्यास उद्देशून असल्यास होतें; हें देवास उद्देशून असल्या मुळें तसें होत नाहीं.

ओवी.

॥ येणें रीतिं मी कितीचांगुला ॥ नख शिख आवडता झाला ॥ हस्तपादा दिशोभला ॥ हेचि विडंबन ॥ १ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

प्र०- चांगुला असें रूप कोणत्या नियमा वरून झालें

उ०- चौथ्या नियमा वरून.

प्र०- चौथ्या नियमा प्रमाणें; वाकळ, चाकर, घागर, चघळ, टक्कल, यांचीं रूपांतरें कशीं होतील ?

उ०- वाकूळ, चाकूर, चघूळ, घागूर, टक्कूल, अशीं होतील.

प्र०- अशीं रूपें; कवि, कवितेंत घेतात काय ?

उ०- हीं रूपें नियमित असतां ही यांची रूढी मोठ भाषणांत नत्यामुळें घेत नाहींत.

ह्याखालीं दिलेल्या उदाहरणाचे नियम स्वबुध्धीनें पाहावे.

अभंग–॥होतां उणाभावो॥ प्राणनाश काळ हाजावो॥१॥ ७॥

श्लोक –॥देहबुध्धिचानिश्चयोज्याढळेना॥ तयाज्ञानकल्पांतकाळीं कळेना॥
॥चपळमन वळेना हीततेंआकळेना॥परमकठिणदेहो देहबुध्धिगळेना॥

हे खालचे शद्ब नियमित कोणते व अनियमित कोणते हें पाहावें.

१ पारिखद, २ देशाउर, ३ अवेव, ४ तुर्य, ५ कंवीठ, ६ खो,
७ मारग, ८ संवे, ९ भें, १० अरिख, ११ वरुष,
१२ से, १३ पावो, १४ खमा, १५ वेख.

याप्रमाणें कवितांमधील शद्बांचे फेरफारा विषयींचे नियमांची योजना कोणत्यारीतीनें करून दृढाभ्यास करावा; त्याचा येथें थोडासा मासला दाखवून ठेवला आहे, तर अभ्यास करणारानीं याप्रमाणेंच पाहात जावें.

## विशेषसूचना

### सूचना १

क, ग, च, ज, ट, ड, त, द, आणि प, ब, ह्या अकारांत अक्षरापुढें ह बाराखडीचें कोणतें ही एक अक्षर आलेलें असे जे शद्ब आहेत त्यांतील ह अक्षराचा कवितेंत छंदादिसाधणुकीसाठीं लोप झाल्यास अथवा कवीनें केल्यास वर लिहिलेलीं अक्षरें क्रमेकरून, ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध; आणि, फ, भ; या प्रमाणें होतात. उदाह० आग्रहो, आघ्रो, आग्रहार, आघ्रार इत्यादि.

### सूचना २

ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध; आणि फ, भ; अशीं अक्षरें असलेले जे शद्ब ते, छंदादिसाधणुकीसाठीं लांबविणें असतां, वर लिहिलेलीं अक्षरें क्रमेंकरून, ह, बाराखडीचें कोणतें ही एक अक्षरपुढें निराळें लाऊन; क, ग, च, ज, ट, ड, त, द; आणि प, ब, या प्रमाणें ह्याच्या मागें होतात. उ० भिणें, भीति, झाला; हे शद्ब; बिहुणें, बिहिती, जाहला, या प्रमाणें होतात. उ० ॥ कृष्णातुजा सुभद्रा॥ कन्याला योग्य जाहली आहे॥

वर लिहिलेल्या दोन सूचना सर्व ठिकाणीं न लागल्यामुळें त्यांची गणना नियमांत केली नाहीं असें समजावें. असें रूप होणारें कदाचित आहे व त्यास वर दिलेल्या उदाहरणाशिवाय दुसरीं उदाहरणें ही नाहींत; तथापी हा प्रकार ध्यानांत असावा म्हणून सूचना लिहून ठेविली आहे.

## भाग १ पहिला समास.

अंक-सं०ना०१ मांडी २ आंकडा ३ चिन्ह

अंकणा-सं०अप०ना०पायबीद-भा०अ० १९ ओ०१४२.

अकरा-सं०अप०संख्या०वि०१ अकरा-२ मनासहितदशेंद्रियें-भा०अ०१४ ओ०१०४

अकरारुद्र-सं०अप०ना० एकादशरुद्र त्यांचीनांवें-१ रैवत २ अज ३ भव ४ भीम ५ वाम ६ वृषाकपि ७ अजैकपाद ८ उग्र ९ अहिर्बुध्य १० बहुरूप ११ महान्.

अकवि-सं०विशे० मूर्ख-ना० अज्ञानीपुरुष.

अंकसळ-प्रा०ना०रौप्यादिधातु-ज्ञा० अ०१८ ओ०४९२.

अकळ-प्रा०विशे० अकळावयासमर्थ.

अकारमात्रा-सं०ना० प्रणवाचीपहिली-मात्रा.

अंकांक्षा-सं०अप०ना०आकांक्षा २ इच्छा.

अकिंचन-सं०विशे० दरिद्री.

अंकित-सं०ना०१ सेवक-२ विशे० चिन्हित.

अंकु-सं० अप०नाम०शिष्य-ज्ञा०अ०१८ ओ०१६५९.

अंकुडें-प्रा० विशे० वांकड्याआणीचें-ज्ञा० अ०११ ओ०२६२.

अंकुर-सं०ना० मोड.

अर्क-सं०ना० सूर्य.

अर्का-सं०ना० रुई.

अर्कु-सं०अप०ना० अर्क-सूर्य

अर्कुलें-प्रा०ना० रेफ-दा०द०१९ स०१ ओ०३.

अक्रिय-सं०वि० क्रियारहित.

अखंडैकरस-सं०ना०१ ब्रह्म २ वि० त्रिविधभेदपरिच्छेदरहितअखंडद् झाल्यान् तें

अखता-सं०अप०ना० अक्षता-भक्त० प्रक०९ ओ०५४

अखम-सं०अप०वि०१ अक्षम २ पंगु

अखर-सं०अप०ना०१ अक्षर २ वि० अविनाश.

अखवलेख-प्रा०क्रि०वि०अव्य० वारंवार-ज्ञा०अ०१३ ओ०८४८

अखिळ-सं०अप०वि०१ अखिल २ संपूर्ण.

अग-सं०ना०१ पर्वत २ वृक्ष.

अंगघालणें-प्रा०धा०ना०पडणें विवे० पू०प्र०२ ओ०४.

अंगच्छाया-सं०ना० आश्रय-ज्ञा०अ० १७ ओ०५६.

अगड-प्रा०ना० रुवणीचीवाट-भा० अ०९ ओ०१३५.

अगद-सं०ना०१ औषध २ वि० निरोगी.

अंगद-सं० ना०१ बाहूभूषण २ वाली पुत्र.

अंगदट-सं०अप०वि० बळकट-ज्ञा० अ०१६ ओ०४५

अंगनघेणें-प्रा०धा०ना० आंगे सरणें ज्ञा०अ०१ ओ०१५१.

अंगना- सं॰ ना॰ स्त्री.

अगर्भप्राणायाम- सं॰ ना॰ प्रणवरहित प्राणायाम.

अगम्य- सं॰ वि॰ दुर्गम.

अगर- प्रा॰ ना॰ - शेत - मळा - ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ३५.

अगरी- प्रा॰ ना॰ पेंठ - ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ४५४.

अंगलग- प्रा॰ ना॰ समागम विवे॰ उ॰ प्र॰ ११ ओ॰ १६.

अंगली- प्रा॰ क्रि॰ औषधदेणें - ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ४२.

अंगवरवा- प्रा॰ क्रि॰ वि॰ अव्य॰ अंगावर - ज्ञा॰ अ॰ ११ ओवी ४२५.

अंगवण- प्रा॰ ना॰ १ स्वइच्छा - ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ९२ - २ सामर्थ्य भा॰ अ॰ ७ ओ॰ ४८८.

अंगवणें- प्रा॰ वि॰ प्राप्त - ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २६५.

अंगवणियेचें- प्रा॰ वि॰ अलीकडचें ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ६३०। ६३१.

अंगवणें- प्रा॰ धा॰ ना॰ सुकणें - अमृ॰ प्र॰ १ ओ॰ ३४.

अगस्ति- सं॰ अप॰ ना॰ अगस्त्यनामा ऋषि.

अगस्ती- प्रा॰ ना॰ देहबुध्धीचीखोळ - ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १८३.

अंगहीन- सं॰ ना॰ १ पण्यांगना - ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २४५ - २ मदन ३ विपंगु.

अंगळी- प्रा॰ क्रि॰ १ अंगलीशब्दपाहा २ ना॰ बोट

अगांतुकलक्षण- सं॰ अप॰ ना॰ आगंतुकलक्षण ह्मणजे जें केव्हां आहे व केव्हां नाहीं तें.

अगाध- सं॰ वि॰ गंभीर - खोल.

अगार- सं॰ ना॰ १ घर २ स्थान.

अगारामेर- प्रा॰ ना॰ शेताचीकड - ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ४३८.

अंगिक- सं॰ अप॰ ना॰ सामर्थ्य भाग॰ अ॰ ४ ओ॰ ९ - ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ५२४.

अंगिकभाव- सं॰ ना॰ आकृती - ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ४

अंगिकें- सं॰ अप॰ ना॰ सामर्थ्य ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २९९। ३००.

अगियाळें- सं॰ अप॰ ना॰ अग्निकुंड - ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १६२ - ललाटस्थअग्निचक्रास ही म्हणतात.

अंगिरापुत्र- सं॰ ना॰ बृहस्पति.

अंगिसुनी- प्रा॰ वि॰ निश्चळ ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ २०६.

अंगी- सं॰ ना॰ १ ज्याचें अंगतो - २ मुलांचें अंगडें.

अंगीपडणें- प्रा॰ धा॰ ना॰ साह्य होणें - अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ६.

अगुणिआष्टधा प्रकृति- सं॰ ना॰ पंचमहाभूतें व तीनगुणमिळूनजी प्रकृति ती.

अंगुळवेढें- सं॰ अप॰ ना॰ कांडरूं - ज्ञा॰

द॰ ३ स॰ ६ ओ॰ १८

अंगेष्टी-सं॰अप॰ना॰ साष्टांगनमन ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २०३।२०४

अगोचर-सं॰वि॰ इंद्रिय अगम्य.

अगोचरीमुद्रा-सं॰ना॰ अंतरांतपाहाण्याची जी धारणा प्रकरणीं चौथीमुद्रा ती.

अंगोत-सं॰ अप॰वि॰ अंगसंबंधी.

अर्गळा-सं॰ अप॰ना॰१अर्गला २प्रतिबंध ३अडसर-भा॰ ए॰ अ॰ २ ओ॰ ३३३.

अग्निस्थान-सं॰ना॰ ललाटस्थहृदलचक्र अथवा अग्निचक्र: ज्ञा॰ अ॰ ८-ओ॰ ९४

अग्रगण्यु-सं॰अप॰ वि॰ अग्रगण्य-अथवा पहिलागणास योग्यतो.

अग्रज- सं॰ना॰ वडीलभाऊ.

अग्र्यबुध्धि-सं॰वि॰ सूक्ष्मबुध्धि.

अग्रवर्ण-सं॰ना॰ब्राह्मण.

अग्रहार-सं॰ना॰ देवब्राह्मणास दिलेलाग्रामादिक त्याचें नांव.

अघ-सं॰ना॰ - पाप -पातक.

अघोरयोगी-सं॰ना॰ भूत प्रेताचेंसाधनकरणारा तो.

अघोरी-सं॰वि॰ साहसकर्मी.

अंघ्रीरेणु-सं॰ना॰चरणरज.

अघ्रो-सं॰ अप॰ना॰ आग्रह-भा॰अ॰ ३० ओ॰ १०९.

अचर्च-सं॰वि॰ ज्या विषयींचर्चाकरतांयेतनाहीं तो विषय.

अचर-सं॰ना॰ १ वृक्षादिस्थावरपदार्थ-२वि॰ स्थिर.

अचळ-सं॰अप॰ना॰ १अचल अथ॰ पर्वत-२ वि॰ निश्चळ.

अचार-प्रा॰ना॰ १ आकार-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ ४५-२वि॰ मोठें.

अचिंता-सं॰ अप॰वि॰ अचिंत्य ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १९५.

अचुंगळ-प्रा॰ वि॰ १ कृपण-२ भ्रष्ट-दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ १४.

अचुंबित-सं॰ वि॰ १ संपूर्ण-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ७-२ परिपूर्ण-ज्ञा॰ अ॰ ४ ओ॰ २१४-३ अगणित-भा॰ अ॰ १६ ओ॰ २३३-भा॰ अ॰ ११ ओ॰ ६८२-४ अतिनिःसंग-भा॰ अ॰ ३ ओ॰ २९२.

अचेत -सं॰ वि॰ अचेतन.

अर्चनभक्ति-सं॰ना॰ उपासनामार्गीतील नवविध भक्तिरूप साधनाचें भगवत्पूजन रूप पांचवें अंग ती.

अर्चिरामार्ग-सं॰ना॰ सूर्यकिरणद्वाराजाण्याचा जो उर्ध्वगतिकमार्ग तो२ उत्तम मार्ग-ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २५४.

अर्ची-सं॰ना॰ज्वाला.

अच्युत-सं॰ना॰ १ परमेश्वर-२ वि॰ अपतित-३ पावन.

अच्छादन-सं॰ अप॰ ना॰ वस्त्र-आच्छादन.

अज-सं॰ना॰ १ परमेश्वर २वि॰ जन्म

रहित-३ एकराजा.
अंजन-सं०ना० काजळ-२ नेत्रौषध.
अंजनी-सं०ना० मारुतीचीआई
अजपा-सं०ना० एकाअहोरात्रांतव्यवस्थेनेंराहाणारे प्राणीयांचे शरीरांतजें-सोहंशब्दात्मक वायूचें घेणें सोडणें मिळून एकश्वासरूपजपतो २१६०० श्वासानीं सहजम्हणजे जपनकरितांजपहोतो म्हणून त्याचें नांव अजपा.
अजसुत-सं०ना० दशरथ.
अजहल्लक्षणा-सं०ना० अत्यागलक्षणा जीवास जेंसारासार अथवा नित्य अनित्य एकत्वांदूनगेलें आहे त्याचा निवाडा करण्याच दोहींच्या अत्यागानें निवाडा घडतनाहीं म्हणूनजी लक्षणा वेदांत,शास्त्रांत, ग्राह्य करीत नाहींत ती.
अजा-सं०ना० १ माया २ शेळी.
अजातपक्ष-सं०वि० पंखनफुटलेले
अजानदेव-सं०ना० चिरलोकवासी जे पितर त्यांच्यावरलया योग्यतेच्चे वकर्म देवांच्या स्थानास्थायोग्यतेचे जेदेव ते.
अजित-सं०ना० परमेश्वर.
अंजित-सं०वि० अंजनयुक्त.
अजितेंद्रिय-सं०ना० ज्याच्यास्वाधीनइंद्रियेंनाहींत असाजो अविरक्त पुरुषतो-२ वि० अवैराग्यशील.
अजिन-सं०ना० मृगचर्म
अजिर-सं०ना० अंगण
अर्जन-सं०ना० संपादन
अटकु-प्रा०वि० बाधक-ज्ञा०अ० ६ ओ० ११५.
अटन-सं०ना० परिभ्रमण.
अटवी-सं०ना० अरण्य.
अटीकाटणें-प्रा०धा०ना० राबणें. ज्ञा०अ० १३ ओ० २९
अटु-प्रा०ना० १ दुर्भाषण-ज्ञा०अ० १३ ओ० २७१. २ वि० कठिणभा-अ-ओ.
अटुळणें-प्रा०धा०ना० बांधणें.
अठी-प्रा०ना० ऐक्य-ज्ञा०अ० ५ ओ० १३२.
अठिवेठी-प्रा०ना० जाणेंयेणें- वेरझार.
अडकट-प्रा०ना० १ अडमार्ग २ रान.
अडकंठें-प्रा०ना० अर्धमार्ग-ज्ञा०अ० ६ ओ० ५५.
अडका-प्रा०ना० पैशाचापत्रांशतो-दा०द० ५ स० २ ओ० २१.
अडची-प्रा०ना० दुर्गममार्ग-ज्ञा०अ० ६ ओ० १५४.
अडजाला-प्रा० शब्द० अव्य० सन्निध ज्ञा०अ० ६ ओ० १६७
अडताळा-प्रा०ना० अडपळा-दा०द० १ स० २ ओ० ६.
अडदर-प्रा०ना० भय-ज्ञा०अ० १६ ओ० ३१५।३१६.

अडदरा-प्रा॰ना॰भय-भा॰अ॰२ओ॰
२८४.

अडंबर-सं॰अप॰ना॰आडंबर-अवडं
बर.

अडमुठी-प्रा॰वि॰अक्लेश-ज्ञा॰अ॰
६ओ॰४

अडमोडी-प्रा॰ना॰स्वमतप्रतिपादन
ज्ञा॰अ॰१२ओ॰६९४.

अडव-प्रा॰वि॰असार-ज्ञा॰अ॰१८-
ओ॰३६.

अडवंकी-प्रा॰ना॰खीळ-ज्ञा॰अ॰१२
ओ॰५२.

अडवंगी-प्रा॰ना॰ अडमार्ग कुमार्ग
ज्ञा॰अ॰१३ओ॰१६२.

अडवारा-प्रा॰ना॰ प्रतिबंध-ज्ञा॰अ॰
१५ओ॰५६

अडस्-प्रा॰ना॰खोळंबा-

अडसणें-प्रा॰धा॰ना॰आडवसणें.

अडसो-प्रा॰ना॰ खोळंबा-ज्ञा॰अ॰
१३ओ॰६३१-२ फंदाळा-ज्ञा॰अ॰१७ओ॰
४९.

अडळू-प्रा॰ना॰स्पर्श-ज्ञा॰अ॰१३ओ॰
२३५।२३६.

अडी-प्रा॰वि॰दुर्घट-ज्ञा॰अ॰६ओ॰४६५.

अडीमोडी-प्रा॰ना॰अंगपिळा भा॰अ॰
७ओ॰५२४.

अदंच-प्रा॰ना॰ मोठेपण-ज्ञा॰अ॰१७
ओ॰३४०।३४१.

अणिमादिऐश्वर्य-सं॰ना॰ अष्टम-
हासिध्दिरूप ऐश्वर्य.

अणियाळें-प्रा॰वि॰ अणिदार.

अणुआर-प्रा॰वि॰चातुर.

अर्णव-सं॰ना॰समुद्र.

अंत-सं॰ना॰-शेवट-मरणसम
य.

अंतक-सं॰ना॰-यम-काळ.

अंतःकरण-सं॰ना॰परावाचारूप
निर्विकल्प स्फुरण ह्मणजे मनबुध्यादि
चूनजोसामान्यरूपानें आठव त्यानें-
नांव

अंतःकरणपंचक-सं॰ना॰१अंतः
करण२ मन३ बुध्दि४ चित्त ५अहं-
कार.

अतर्क्य-सं॰वि॰ तर्कायास येतना
ह्मणें.

अतणें-प्रा॰धा॰ना॰ दृडपणें-ज्ञा॰अ॰
६ओ॰१५४.

अतत्याई-सं॰अप॰वि॰घातक अ
तत्यायी अतिकोपानें भलतेंच करणारा
भा॰अ॰३०ओ॰१५८.

अतद्व्यावृत्ती-सं॰ना॰ तन्न तन्न
अनेति नेति ह्मणजे तें नाहीं तें नाहीं अ
शा वेदानें नाशिवंताची व्यावृत्ति केली ति
चें नांव.

अंतर्भाव-सं॰ना॰ अभिप्राय.

अंतर्माळा-सं॰अप॰ना॰ आंतडें.

अंतसुख-सं॰वि॰ नामरूपोन्मूख
नव्हे म्हणजे स्वरूपोन्मुख.

अंतर- सं॰ अप॰ ना॰ अभिप्राय.
अंतरंग- सं॰ वि॰ जिवलग.
अंतरंगभजन- सं॰ ना॰ अंतरंगउपासना म्हणजे आर्त जिज्ञासु व अर्थार्थी या तिहींहून भिन्न जी चौथी भक्ती अथवा ज्ञान भक्ति तें.
अंतराय- सं॰ ना॰ विघ्न.
अंतराळ- सं॰ अप॰ ना॰ १ अंतराल २ आकाश.
अंतरिक्ष- सं॰ ना॰ आकाश.
अंतर्वत्नी- सं॰ वि॰ गर्भिणी.
अतसिपुष्प- सं॰ ना॰ जवसाचें फूल.
अतळस- प्रा॰ ना॰ परिमळ- दा॰ द॰ १८ स॰ १ ओ॰ ८.
अतिक्रमु- सं॰ अप॰ ना॰ १ अतिक्रम २ अमर्याद.
अतिकाळ- सं॰ अप॰ ना॰ अतिकाल अथवा विलंब.
अतिगीळ- प्रा॰ ना॰ मलय- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ४०
अतित- सं॰ अप॰ ना॰ अतिथि.
अतिपात- सं॰ ना॰ १ भंग २ नाश.
अतिमात्र- सं॰ वि॰ फार.
अतिरस- सं॰ ना॰ अत्युष्णत्व.
अतिव्याप्ति- सं॰ ना॰ कोणेक वस्तुच्या गयीं जें लक्षण आहे अथवा त्यापासून जें कार्य घडावयाचें तें लक्षण किंवा तें कार्य अन्य वस्तुच्या गयीं दिसणें यद्वतीपासून होणें असा जो व्यभिच्यारती.
अतिशूद्र- सं॰ ना॰ महार.
अतिशो- सं॰ अप॰ वि॰ अतिशय २ ना॰ अतिप्रसंग. ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ४९.
अतिसो- सं॰ अप॰ वि॰ १ अतिशय अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ६२ - २ ना॰ अतिप्रसंग.
अतीत- सं॰ वि॰ १ मागें झालेलें २ सं॰ अप॰ ना॰ अतिथि.
अतीत- सं॰ वि॰ भिन्न.
अतींद्रिय- सं॰ वि॰ १ वैराग्यशीळ २ इंद्रियांस अगोचर.
अतुडणें- प्रा॰ धा॰ ना॰ सांपडणें- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ७१ - अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ३२.
अतुर्बळ- सं॰ अप॰ वि॰ अगणित बलाढ्य- भा॰ अ॰ १ ओ॰ २१९.
अतुर- सं॰ अप॰ वि॰ उताविळ २ आतुर.
अंतुरी- प्रा॰ ना॰ स्त्री- विवे॰ उ॰ प्र॰ १ ओ॰ ६९ - दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ ८.
अतुवट- सं॰ अप॰ ना॰ गुह्य- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २०३
अतेबुरी- प्रा॰ ना॰ टकल- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५५८.
अतेव- प्रा॰ वि॰ मूर्तिमंत- भा॰ अ॰ १८ ओ॰ १८४
अतेव- सं॰ अप॰ अव्य॰ या कारणास्तव- अतएव भा॰ अ॰ २० ओ॰ २४२.
अतौतें- प्रा॰ शब्द॰ अ॰ मध्यें- भा॰

अ०२ ओ०३९०.
अर्ती—सं० अप० ना० अपेक्षा-ज्ञा०अ० ६ ओ०३७२.
अर्तु—सं० अप० वि० १ आर्त २ रोगी.
अंत्यज—सं० ना० अतिशूद्र.
अत्यंतक्षेम—सं० ना० उत्तमप्रकारें कल्याण.
अत्यंतिक—सं० अप० वि० अतिशयित —बहुत
अत्यंतिकप्रलय—सं० अप० ना० आत्यंतिकप्रलय २ विवेकप्रलय.
अंत्रपाट—सं० अप० ना० अंतःपट.
अत्रि—सं० ना० अनसूयापति एकमहान्ऋषि तो.
अथणें—सं० अप० धातु० ना० असणें
अथाव—प्रा० वि० १ खोल २ ओंड
अथिला—प्रा० वि० भाग्यवान्-ज्ञा० अ० ११ ओ० ६२२.
अथिलेपण—प्रा० ना० थोरपण —समर्थपण-ज्ञा० अ० ९ ओ० ३६८— ज्ञा० अ० १० ओ०१४.
अथी—सं० अप० क्रि० आहे-ज्ञा० अ० ५ ओ०१३० भाग० अ०५ ओ० १८८.
अर्थ—सं० ना० १ द्रव्य २ भावगर्भ ३ अंबर्भव.
अर्थवाद—सं० ना० १ स्तुतिफलश्रुति.
अर्थार्थी—सं० वि० १ धनेच्छु -२ च्यारप्रकारचे भक्तांतील प्रवृत्तिरूपपहिल्या पदवीचा कामी भक्त तो.
अदखणा—प्रा० वि० १ अदेखणा-अथवा कुरूप.-२ दुष्ट-दा० द० २ स० ३ ओ० २८.
अदत्त—सं० वि० कृपण.
अदंभित्व—सं० ना० साधुत्व.
अदभ्र—सं० वि० बहुत.
अंदू—सं० अप० ना० पायहंसळी-भा० अ० १४ ओ० ४९४
अंदुक—सं० ना० हत्तीचीपायबिडी
अंदुज—प्रा० ना० हड्यावर्ण-दा० द० ३ स० ६ ओ० २०
अदृष्ट—सं० ना० १ कर्म—२ कर्माश्रयत्व-ज्ञा० अ० ८ ओ० २६५
अंदोळणें—सं० अप० धा० ना० हलणें.
अद्दूलं—प्रा० ना० मनास लागलेलीरेंत अन्मनोशिक्षा-दा० द० १८ स० ५-ओ० २२
अद्रि—सं० ना० पर्वत.
अंध—सं० वि० १ अंधळा-२ ना० धृतराष्ट्र.
अंधकूप—सं० ना० निर्जलकूप.
अंधतम—सं० ना० १ एकनरक आहे- २ वि० अत्यंत अंधळा.
अधपणें—प्रा० धा० ना० हुरपळणें ज्ञा० अ० १२ ओ० ४६
अंधबंद—सं० ना० अंधपटळ.
अधर—सं० ना० १ ओंठ-२ वि० निराधार.

अधस्त्री-सं॰ना॰दासी.
अधाडा-प्रा॰ना॰मध्यभाग-ज्ञा॰अ॰ ७ओ॰६९
अधाडें-प्रा॰शब्द॰अव्य॰ कडे.
अधांतरीं.-प्रा॰ क्रि॰ वि॰ अधेंमध्यें.
अधाशुरें-प्रा॰वि॰ अर्ध्यभोजनी-ज्ञा॰ अ॰६ ओ॰२९०.
अधाधिणें-प्रा॰धा॰ना॰ भेडसावणें-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ ३३.
अधार्धें-सं॰अप॰वि॰ अर्धेमर्धें-अर्धवट.
अधि-सं॰अप॰ना॰ मनोव्यथा आधि.
अधिकरण-सं॰ना॰ स्थान-आश्रय-ज्ञा॰अ॰८ ओ॰३२.
अधिकार-सं॰ना॰ पदवी-योग्यता.
अधिकारी-सं॰ना॰१ साधनचतुष्टयसंपन्नपुरुष-२ विश्मुख्य.
अधिदैविकताप-सं॰ना॰१ अतिवृष्टि अनावृष्टिरूपदुःख-२ यमयातनेचा आठव होऊन जें मनास दुःख होतें तें.
अधिभूतिकताप-सं॰ना॰ स्वशरीराहून अन्यजें त्यापासून होतें दुःख तें.
अधिष्ठान-सं॰ना॰ आश्रय.
अधिष्ठानशेष-सं॰ना॰ ब्रह्मस्वरूप.
अध्रुव-सं॰अप॰वि॰ अध्रुव अथवा चंचळ
अधोगति-सं॰ना॰ नरकगति.
अधोर्ध्व-सं॰ना॰१ अधउर्ध्ववाहाणारे प्राणवायुपंचक त्याचें नाव-२ प्रकृतिपुरुष.
अर्धनारीनटेश्वर-सं॰ना॰ शिवशक्ति अथवा प्रकृतीपुरुष.
अर्ध्यपुडीकाया-सं॰अप॰ना॰ अर्ध्यायुषीशरीर म्हणजे जें जें ज्याचें आयुष्य आहे त्यांतलें अर्ध्यनिद्रेंत जातें-उरलें बाकी अर्ध आयुष्य म्हणून देहास असें नांव आहे-दा॰द॰१५॰ स॰८ ओ॰३५.
अर्ध्यबिंब-सं॰ना॰ प्रणवाची अर्ध्य मात्रा.
अध्यस्त-सं॰वि॰ नसून दिसणारें तें जसें मृगजल.
अध्यक्ष-सं॰ना॰ १स्वामी-२ वि॰ मुख्य.
अध्यात्म-सं॰वि॰१ आत्मविषयक-२ ना॰ वेदांत.
अध्यात्मविद्या-सं॰ना॰ वेदांतशास्त्र.
अध्यात्मिकताप-सं॰ना॰ देह-इंद्रियें आणि प्राण यांपासून होतें दुःख त्याचें नांव.
अध्यारोप-सं॰ना॰ जगद्रूत्पाचा आरोप.
अध्यास-सं॰अप॰ना॰ तादात्म्य-जें आपलें रूप नसतां तेंच मी म्हणून दृढ धरणें त्याचें नाव.

अध्वर - सं॰ना॰ यज्ञ.
अध्वसंक्रमण - सं॰ना॰ मार्गसंक्रमण.
अनकळित - प्रा॰ वि॰ अक्लेश - निरुपद्रव - ज्ञा॰ अ॰७ ओ॰७०१.
अनंग - सं॰ना॰ मदन.
अनगट - प्रा॰ना॰ मुळ - ज्ञा॰ अ॰१५ ओ॰१५०.
अनंगदहन - सं॰ना॰ शिव.
अनंगु - सं॰अप॰ना॰ अनंग.
अनर्गळ - सं॰ अप॰ वि॰ अनर्गळि अथवा मनस्वी - दा॰द॰२ स॰३ ओ॰१८.
अनघ - सं॰वि॰ निष्पाप.
अनर्घ्य - सं॰वि॰ अमोल.
अनणु - सं॰वि॰ अणु नव्हे तें - २ महान्.
अनंत - सं॰ना॰ ब्रह्म - २ वि॰ अंत नाहीं तें
अनधिकारी - सं॰वि॰ साधनचतुष्टयसंपन्न नव्हे तो.
अनन्य - सं॰वि॰ अद्वैत.
अनन्यगति - सं॰ना॰ भक्त - ज्ञा॰ अ॰८ ओ॰१९१.
अनन्योदक - सं॰ना॰ भक्ति - ज्ञा॰ अ॰१५ ओ॰४.
अनयाळें - प्रा॰वि॰ अणीदार - भा॰ अ॰१४ ओ॰४१५.
अनराहटी - प्रा॰ना॰ कुमार्ग - दा॰द॰२ स॰३ ओ॰२७.
अनल - सं॰ना॰ अग्नि.
अनलस - सं॰वि॰ निरालस अथवा आळसरहित.
अनव - सं॰वि॰ दृश्य - जुनाट.
अनवछिन्न - सं॰वि॰ व्यापक - अखंड दंडायमान्
अनवरत - सं॰ क्रि॰वि॰ निरंतर.
अनवसर - सं॰ना॰ १ असमय - २ दुष्काळ - अमृ॰प्र॰२ ओ॰९
अनंसाईपण - सं॰अप॰ना॰ असहनता.
अनहित - सं॰अप॰ना॰ अहित - अकल्याण.
अनागत - सं॰ वि॰ पुढें होणारें - भविष्यमान्
अनार्त - सं॰ वि॰ निरिछ - स्फूरती.
अनाथ - सं॰वि॰ दीन.
अनादि - सं॰वि॰ ज्यास आदि नाहीं तें - उत्पत्तिरहित तें.
अनादिठावो - सं॰अप॰ ना॰ कर्मभूमी ज्ञा॰ अ॰१६ ओ॰२९४ - २९५.
अनादृश्य - सं॰वि॰ अदृश्य नव्हे तें - स्पष्ठ
अनान् - प्रा॰वि॰ निरनिराळें.
अनार्य - सं॰वि॰ १ नीच - २ दुष्ट.
अनारिसें - प्रा॰वि॰ वेगळें - भिन्न - ज्ञा॰ अ॰११ ओ॰१०८. वाक्य - ओवी ९९२ - दा॰द॰६ स॰२ ओ॰१८ - विवे॰पू॰प्र॰२ ओ॰७७.
अनावसरू - सं॰ अप॰ना॰ असा

य-ज्ञा० अ०१ ओ०१८३.
**अनावृत**-सं० वि० आवरणरहित.
**अनावृत**-सं० क्रियावि० निरंतर ज्ञा० अ०१२ ओ०१
**अनाक्षर**-सं०अप०वि० अनक्षर अथवा शब्दातीत.
**अनित्य**-सं० वि० विनाशी.
**अनिर्देश्य**-सं० वि० निर्देशारहित-२ अंगुलीनें दाखविण्या सारखें नव्हेतें.
**अनिभ्रांत**-सं०अप०वि० १ यथार्थ २ भ्रांती रहित.
**अनिमिष**-सं० क्रि०वि० अविलंब-सत्वर.
**अनिरुप्य**-सं० वि० अनिर्वाच्य.
**अनिल**-सं०ना० वायु.
**अनिर्वचनीय**-सं०वि० अनिर्वाच्य
**अनिवार**-सं० वि० निवारण्यासअशक्य-दुर्निवार
**अनिछा**-सं०ना०अनेछा.
**अनु**-सं०अप० वि० अन्य-अमृ० प्र०६ ओ०३२.
**अनुकंपा**-सं०ना० दया-कृपा.
**अनुकरणें**-प्रा० धा० ना० १ अनुकूळ होणें-ज्ञा० अ०१४ ओ० २७७.-२ आकारास येणें. ज्ञा० अ०१५ ओ० ४१४-४१५.
**अनुकार**-सं०ना०१ स्वरूप-२आकार ज्ञा० अ०६ ओ०३००
**अनुग्रहो**-सं०अप०ना० अनुग्रहकृपणें कृपा-विवे० पू० प्र०१ ओ०६.
**अनुघडी**-प्रा० क्रि० वि० निरंतर-ज्ञा० अ०१२ ओ०६४०
**अनुघडुपडलिया**-प्रा० वि० अवघड ज्ञा० अ०८ ओ०१२१.
**अनुघडुफुटणें**-प्रा०धा०ना० शरत्कूल भास होणें-ज्ञा० अ०१ ओ०१०२.
**अनुचित**-सं० वि० अयोग्य.
**अनुज**-सं०ना० धाकटा भाऊ.
**अनुजनी**-सं०ना० भाऊ.
**अनुजा**-सं०ना० धाकटी बहीण.
**अनुजाइजो**-सं०वि० अनुकूल-ज्ञा० अ०१० ओ०२७९.
**अनुताप**-सं०ना० पश्चात्ताप.
**अनुपान**-सं०ना० मुख्य औषधास साह्य उपद्रव्य तें.
**अनुबंधचतुष्टय**-सं०ना० विषय-२ संबंध-३ प्रयोजन — ४ अधिकारी यांचा समुच्चय.
**अनुमान**-सं०ना०१ अटकळ-२ संशय-दा०द०१ स०२ ओ०२६-दा० द०१९ स० ३ ओ०२१-३ निश्चय-दा० द०१८ स०१ ओ०८.
**अनुराग**-सं०ना० प्रीति.
**अनुरोध**-सं०ना० अनुकुलता.
**अनुलोम**-सं०ना०१ अन्वय-२ वि० सुलटें.
**अनुलोमज**-सं०ना० नीच वर्णाचे स्त्रीचे गर्भी उत्तम वर्णा पासून झालेली

संतती ती.

अनुवाद- सं० ना० व्याख्यान विषया चें पुनर्व्याख्यान.

अनुवृत्ति- सं० ना० अन्वय म्हणजे व्याप्ती. आग० पं० १ स० १ ओ० ४८.

अनुवृत्तिपंथ- सं० ना० सुषुम्नाना डी- ज्ञा० अ० ८ ओ० ११४.

अनुष्टुप- सं० अप० वि० १ संकोचि त:-२ ना० चरणास आठ अक्षरें अ साप यांतील छंद तो.

अनुसंग- सं० ना० १ विश्वास २ स मागम.

अनुसंधान- सं० ना० ध्यान-भा० अ० १७ ओ० १८.

अनुसरणें- सं० अप० धा० ना० अनु कूल होणें.

अनुसारा- सं० ना० मार्ग.

अनुसूट- प्रा० वि० निर्लेप. भा० अ० २९ ओ० ३६१.

अनुस्यूत- सं० वि० अखंड दंडायमा न.

अनुहातचक्र- सं० ना० हृदयकम ल- ज्ञा० अ० १२ ओ० ५४.

अनुहातध्वनी- सं० ना० योगादिधा रणेनें जो दशनादांचा ध्वनी ऐकूं येतो तो.

अनेग- सं० अप० वि० अनेक.

अनेलोल- प्रा० ना० आणीक प्रकार-ज्ञा अ० ७ ओ० १६४.

अनोते- सं० अप० वि० अन्य-भा० अ० १० ओ० १२४.

अन्न- सं० ना० पृथ्वी- वाक्य० ओ० १९५२.

अन्नमयकोश- सं० ना० -स्थूल देह

अन्यथाज्ञान- सं० ना० विपरीत- ज्ञान.

अन्योन्याध्यास- सं० ना० सत्याव र मिथ्याचा व मिथ्यावर सत्याचा असा जो परस्पराध्यास तो.

अन्योन्याश्रयता- सं० ना० ह्याला तो आश्रय व त्याला हा असा जो परस्प राश्रय त्याचें नांव.

अन्वय- सं० ना० १ वंश- २ व्याप्ति- ३ संदर्भ- दा० द० १ स० १ ओ० १६.

अन्वर्थ- सं० वि० यथार्थ.

अन्वयानुकार- सं० ना० वंशानुरू पता.

अन्वित- सं० वि० युक्त.

अन्वीक्षिकी विद्या- सं० ना० सां ख्यशास्त्र.

अन्हाड- प्रा० वि० उनाड-भा० अ० ११ ओ० ५५८.

अपंचीकृतभूतें- सं० ना० सूक्ष्मपं च तत्वें.

अपजणें- प्रा० धा० ना० उत्पन्न होणें ज्ञा० अ० १५ ओ० ३३२

अपर्णा- सं० ना० पार्वती.

अपत्य- सं० ना० लेंकरूं.

अपभ्रंश- सं० ना० विकार.

अपरांतर- प्रा० ना० फारअंतर-

ज्ञा० अ० ११ ओ० ६२७

अपरिग्रह- सं० ना० असंचय.

अपरितोष- सं० ना० असंतोष.

अपरोक्षज्ञान- सं० ना० जीवास ज्या सप्तावस्था आहेत त्यांतील पांचवी अवस्था तिचें नाव.

अपल्याणी- सं० अप० ना० मोकळपा ठीघोडा. भा० अ० २० ओ० २७४.

अपवर्ग- सं० ना० मोक्ष

अपवाद- सं० ना० १ लय- २ उपसंहार- ३ आळ

अपसद- सं० वि० दुष्ट- अधम.

अपस्मार- सं० ना० १ फेंफरें- २ वि० फेंपरे वायीक.

अपांग- सं० ना० कृपादृष्टी.

अपांगपात- सं० ना० कृपादृष्टितुषार

अपाड- प्रा० ना० बहुत अंतर- ज्ञा० अ० ६ ओ० १४०

अपाडें- प्रा० क्रि० अ० सत्वर- ज्ञा० अ० १५ ओ० १२५

अपान- सं० ना० पंच प्राणांतील अधोगामी जो पांचवा वायु तो.

अपांपति- सं० ना० समुद्र.

अपाययंत्र- सं० ना० अपायप्रकार.

अपावृत- सं० वि० प्रकट.

अपावो- सं० अप० ना० अपाय- भा० अ० १७ ओ० ३४२.

अपेक्षा- सं० ना० इच्छा.

अपेतें- प्रा० शब्द० अव्य० स्वाधीन- ज्ञा० अ० ११ ओ० ३७.

अपैसें- प्रा० क्रि० अ० १ आपले आपण- ज्ञा० अ० ९ ओ० ४६२. - २ क्षणलीच- तत्क्षणींच- विवे० प्र० २ ओ० ८३.

अप्रदक्षिण- सं० वि० प्रतिकूळ.

अप्रमेयमान- सं० वि० प्रमाणास अतीत तें- ज्ञा० अ० ९ ओ० १५९.

अप्रवृत्ति- सं० ना० अन्यथाप्रवृत्ति

अप्राप्त- सं० अप० वि० ज्यास प्रांतना हीं- भा० अ० १ ओ० ८४.

अप्रोक्ष- सं० अप० वि० अपरोक्ष- प्रत्यक्ष.

अप्सरा- सं० ना० देवलोकींच्या नृत्यांगना.

अफाट- प्रा० वि० विस्तीर्ण..

अफुट- प्रा० वि० अद्वैत- अमृ० प्र० ९ ओ० ६

अंब- सं० अप० ना० अंबु- पाणी.

अंबक- सं० ना० नेत्र.

अंबर- सं० ना० १ आकाश- २ वस्त्र.

अबरख- प्रा० ना० अभ्रक- ज्ञा० अ० १० ओ० १४.

अंबलाकांजी- प्रा० ना० अंबलेली पेज- भा० अ० ५ ओ० ९८.

अबळा- सं० अप० ना० अबला अथवा स्त्री.

अबाधित- सं० वि० उत्पत्तिस्थितिप्रलय अशा तिहीं काळीं ज्यास बाधा

होतनाहींतें.
अंबिका- सं॰ना॰ पार्वती.
अंबु- सं॰ना॰ पाणी.
अंबुखा- प्रा॰ना॰ दृष्टी- ज्ञा॰अ॰१६ ओ॰२६०-२६१.
अंबुखासुभें- प्रा॰ना॰ दोन अक्षरेंयेणें-थोडीबहुत विद्या असणें- ज्ञा॰अ॰१६ ओ॰२२३.
अंबुरिवणें- प्रा॰धा॰ना॰ शिंपणें- ज्ञा॰ अ॰११ ओ॰३४२- ज्ञा॰अ॰१४ ओ॰१६२
अंबुखें- प्रा॰ना॰ १ शून्य-२ वि॰ शून्यरूप- ज्ञा॰ अ॰१८ ओ॰७०१.
अंबुज- सं॰ना॰ कमल.
अंबुजासन- सं॰ना॰ ब्रह्मदेव.
अंबुथणें- प्रा॰धा॰ना॰ पेरणें- ज्ञा॰ अ॰१३ ओ॰७२२.
अंबुद- सं॰ना॰ मेघ.
अंबुधर- सं॰ना॰ मेघ.
अंबुनिधी- सं॰ना॰ समुद्र.
अंबुलें- प्रा॰वि॰ अमकें- ज्ञा॰अ॰१३ ओ॰९००.
अब्ज- सं॰ना॰ कमल.
अब्जिनी- सं॰ना॰ कमलिनी.
अब्द- सं॰ना॰ वर्ष.
अब्धि- सं॰ना॰ समुद्र
अभक्त- सं॰ना॰ १ अभक्तिमानपुरुष २ वि॰ भक्तनव्हेतो- अथवा अभक्तिमान्
अभद्र- सं॰वि॰ अशुभ.
अभानावरण- सं॰ना॰ अचरणांतीलदुसराभाग.
अभारू- सं॰अप॰वि॰ १ अभार- श्रमरहित- ज्ञा॰अ॰९ ओ॰१७-२ ना॰ योग्यता- ज्ञा॰अ॰११ ओ॰७९.
अभाव- सं॰ना॰ नास्तित्वबुध्धि.
अभाळ- सं॰अप॰ना॰ अभ्र.
अभिच्यारू- सं॰अप॰ना॰ अभिचार ह्मणजे जारण मारणादिकर्म.
अभिजात्य- सं॰ना॰ १ उत्तमजातित्व- २ वि॰ उत्तम जातीय- ज्ञा॰ अ॰९ ओ॰४२१.
अभिधान- सं॰ना॰ नाम.
अभिनव- सं॰वि॰ १ अपूर्व- २ ना॰ नवल.
अभिन्नकारण- सं॰ना॰ भिन्नन व्हे असें जें निमित्त व उपादान कारणाचें ही कारणतें- ब्रम्ह.
अभिन्नव- सं॰अप॰वि॰ अभिनव
अभिप्राव- सं॰अप॰ना॰ अभिप्राय- दा॰ द॰१ स॰१ ओ॰४.
अभिप्रेत- सं॰वि॰ अत्यंत प्रिय.
अभिभव- सं॰ना॰ पराभव.
अभिभूत- सं॰क्रि॰अव्य॰ वश.
अभिमान- सं॰ना॰ अहंकार.
अभिलषित- सं॰ना॰ इष्ट- इच्छित.
अभिवंदन- सं॰ना॰ नमन.
अभिव्यक्ति- सं॰ना॰ प्राकट्य- अनुभव.
अभिशाप- सं॰ना॰ निंदा.

अभिष्ट-सं०वि० इच्छित.
अभिळास-सं०अप० ना० अभिलाष-दा० द० ३ स० ३ ओ०१२
अभिळाख-सं०अप० ना० अभिलाष-अपहार-भा० अ० १३ ओ० १४८.
अभित्त-सं०वि० युक्त.
अभिज्ञान-सं० ना० खूण.
अंभोज-सं०ना० कमल.
अंभोद-सं०ना० मेघ.
अर्भक-सं०ना० मूल-लेंकरूं.
अभ्यर्चित-सं०वि० पूजित.
अभ्यास-सं०ना० निदिध्यास.
अभ्र-सं०ना०-अभाळ-मेघ.
अभ्रमु-सं०ना० हत्तीण.
अमर्त्यभाव-सं०ना० अमरत्व.
अमर-सं०ना० त्रिदश-देव.
अमरतरु-सं०ना० कल्पवृक्ष.
अमरेंद्र-सं०ना० इंद्र-देवेश.
अमराधिप-सं०ना० इंद्र.
अमर्ष-सं०ना० क्रोध.
अमात्र-सं०वि० प्रणवातीत-२ अविषय.
अमासे-प्रा० अव्य० अंमळ.
अमित्र-सं० ना० शत्रु.
अमुख्यअहंकार-सं०ना० शास्त्रीय आणि लौकिकी या उभयरूपें करून ज्ञात्याचे ठायीं ज्ञानोत्तर काळीं भर्जित बीज न्यायानें असतो अहंकार तो.

अमुत्र-सं०ना० परलोक.
अमूप-प्रा०वि० पुष्कळ-अमृ० प्र० ७ ओ० ११४-भा० अ० १ ओ० २३
अमृत-सं०ना० १ सुधारस-२ दूध-३ मोक्ष.
अमृतकर-सं०ना० चंद्र.
अमृतकळा-सं०अप०ना० १ चंद्राची कळा-२ गालफडास संकेत.
अमेद्य-सं०अप० वि० अमेध्य-अपवित्र.
अमेध्य-सं०वि० अपवित्र.
अमोघ-सं०वि० सफल.
अमोरी-प्रा०ना० सायदर्भ-ज्ञा० अ० ६ ओ० १८२.
अमोद-सं०अप० ना० आमोद अथवा सुवास.
अय-सं०ना० लोखंड.
अयणी-प्रा०ना० समुदाय-वाक्य० ओ० ११५८.
अयत-सं०अप० वि० आयत अथवा रुंद.
अयतन-सं०अप० ना० आयतन अथवा घर-स्थान.
अयन-सं०ना० षण्मास संख्येचें नाव.
अयनक-सं०अप०ना० लोखंडी भिंग-वाक्य० ओ० ३९०९.
अयनी-प्रा०ना० युक्ति-ज्ञा० अ० ६ ओ० ३४३.

अर्यमा-सं०ना० सूर्य.
अयुर्भाव-स०अप०ना०अविर्भव-भा० अ०१ओ०१५६.
अर-प्रा०ना० आर अथवा अजगर.
अरणी-सं०ना० होमाग्निउत्पन्नकरण्याचें काष्ट.
अरणीषट्क-सं०ना० आत्मषट्कनामक अश्वलायनशाखेचें उपनिषत्-यांसच ऐतरेय म्हणतात.
अरत्र-सं०ना० हा लोक अथवा मृत्युलोक.
अरंधें-प्रा०ना० अनपत्यत्व दुःख दा०द०२स०३ओ०३७.
अरवस-प्रा०ना० अंकुर-ज्ञा०अ०१५ओ०१०९
अरविंद-सं०ना०कमल.
अरवी-प्रा०ना० आर वस-अग्रडें ज्ञा०अ०११ओ०३३७.
अरळ-प्रा०वि० मृदु.
अराइणें-प्रा०धा०ना० अनुकूल होणें-ज्ञा० अ०१६ओ०१६०-१६१.
अराटी-प्रा०ना० काँटी.
अराणूक-प्रा०ना०१ प्रतिबंध-भा० अ०१०ओ०२००-२ तृप्ती-आवड-रुक्मि० अ०१८ओ०२३.
अरि-सं०ना० शत्रु.
अरिख-सं०अप०वि०अर्ख-भा० अ०६ओ०७.-भा० अ०१६ओ०१.
अरुण-सं०ना० गरुडाग्रज-सूर्यसारथी.
अरुतें-प्रा०अ० अलीकडे.
अरूपवासनाक्षय-सं०ना० निर्विकल्प जीवन्मुक्ती.
अरुवार-प्रा०ना०१ मृदुशेज-पर०प्र०१२ओ०७-२वि० हळुवर-मृदु-भा०अ०१२ओ०५-भा०अ०२१ ओ०७५.
अरुष-सं०अप०वि० आर्ष-विक्षिप्त.
अरोगणें-प्रा०धा०ना० जेवणें-ज्ञा० अ०६ओ०२
अरोतें-प्रा०वि० अल्पसें-अमृ० प्र०४ओ०११
अलक-सं०ना०कुरळकेश.
अलग-प्रा०वि० भिन्न.
अलक्ष्य-सं०वि० जें लक्षायास येत नाहीं तें.
अलातचक्र-सं०ना० कोलीतकांकण.
अलाबू-सं०ना० भोंपाळा.
अलि-सं०ना० भ्रमर
अलिक-सं०ना० कपाळ.
अलिनि-सं०ना० भ्रमरी.
अलिप्त-सं०वि० निर्मळ.
अली-सं०अप०ना० आली सखी-मैत्रीण
अलोट-प्रा०वि० अचूक-खरें-भा० अ०२०ओ०१११.

अलोदणें- प्रा॰धा॰ना॰धुंडाळणें-भा॰अ॰२४ ओ॰६०६.

अलोलीक- प्रा॰वि॰ अपूर्व-भा॰अ॰२ ओ॰१७-दा॰द॰१ स॰८ ओ॰२०.

अलौकीक-सं॰वि॰ १ अरण्यवासी. २ ना॰ विच्याररूपदृष्टी-ज्ञा॰अ॰८ ओ॰२६६.-३ वि॰ अपूर्व.

अल्पकु- सं॰अप॰ वि॰ दरिद्री॰ज्ञा॰अ॰१६ ओ॰ २२६.

अल्पविणें- सं॰अप॰ धातु॰ना॰बुडविणें-ज्ञा॰अ॰११ ओ॰३१६.

अवकळा-सं॰अप॰ना॰ अवकळा अथवा दुश्चिन्ह.

अवकासु-सं॰अप॰ना॰१ भेद-ज्ञा॰अ॰६ ओ॰४०-२ सामर्थ्य-ज्ञा॰अ॰१० ओ॰ ७१.

अवखुळा- प्रा॰ना॰ अडकाठी.

अवगण-सं॰अप॰ना॰ अवगणाना अथवा त्याग.

अवगणियेचें-प्रा॰वि॰ अलीकडचें-ज्ञा॰अ॰११ ओ॰ ६३०-६३१.

अवगणें- सं॰अप॰ धातु॰ना॰अवगमणें अथवा भासणें.-भा॰अ॰११ ओ॰४५.

अवगातणें- प्रा॰धा॰ना॰ अवलंबणें-पर॰प्र॰१० ओ॰ २३.

अवगमणें- सं॰अप॰धातु॰ना॰भासणें- ज्ञा॰अ॰१ ओ॰१६.

अगवळ- सं॰अप॰वि॰ अमंगळ-ज्ञा॰अ॰१३ ओ॰६७७ ज्ञा॰अ॰१६ ओ ४००-४०१.

अवगळणें- सं॰अप॰धा॰ना॰अवगणनें-ज्ञा॰अ॰१८ ओ॰२०४.

अवगळें- प्रा॰ना॰ खोलगटपण-ज्ञा॰अ॰७ ओ॰७८

अवगों- प्रा॰ना॰ हुंकार -२ क्रि॰वि॰अव्य॰-होय- ज्ञा॰अ॰६ ओ॰१३१.

अवगाहन-सं॰ना॰ स्नान.

अवचटें-प्रा॰अव्य॰-अकस्मात्

अवडतें-प्रा॰वि॰ भलतें-ज्ञा॰अ॰६ ओ॰३३७.

अवडळु- प्रा॰वि॰ किंचित्-अमृ॰म॰३ ओ॰२७.

अवतरण-सं॰ना॰ प्रकटपण.

अवतंस - सं॰ना॰ शिरोभूषण.

अवदसा- सं॰अप॰ना॰ अवदशा. अ॰ अवकळा.

अवदा- सं॰अप॰ना॰ अवधी-भा॰अ॰६ ओ॰२५४

अवदुंबर- सं॰अप॰ना॰ उदुंबर -उंबर.

अवधान- सं॰ना॰ एकाकारवृत्तित्व.

अवधारणें-सं॰अप॰धा॰ना॰ऐकणें

अवधिशेष-सं॰वि॰१ उरलेंत-२ ना॰ ब्रम्ह.

अवन- सं॰ ना॰ १ रक्षण-२ वि॰ निर्ज ल.

अवनी- सं॰ ना॰ पृथ्वी.

अवरपर- प्रा॰ वि॰ परोक्षा परोक्ष. अथवा दृष्टस्थूल-वाक्य ॰ ओ॰ २२६७-

अवला- प्रा॰ ना॰ १ वलहें-२ वलहेंह लविणारा-भा॰ अ॰ २॰ ओ॰ १७६.

अवलावो- सं॰ अप॰ ना॰ अवलाव अथवा अवलंब-अमृ॰ प्र॰ १ ओ॰ २४.

अवलीळा- प्रा॰ अन्य॰ सहज-विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ४६.-भा॰ अ॰ ३ ओ॰ २-भा॰ अ॰ १५ ओ॰ ५.

अवष्टंभु- सं॰ अप॰ ना॰ १ अवष्टंभ-२ प्रपंच-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ४१५-३ अहंकार-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५२९.

अवसर- सं॰ ना॰ अवकाश-समय.

अवसरोचित- सं॰ वि॰ समयोचित.

अवसात- सं॰ अप॰ अन्य॰ अकस्मात्-ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ६९-ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ६२४।६२५. ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १०४.

अवसान- सं॰ ना॰ १ अंत-नाश- २ धैर्य-आग॰ पंचि॰ १४ स॰ ३ ओ॰ २७.

अवसी- प्रा॰ ना॰ रात्रपूर्वभाग-

अवस्था- सं॰ ना॰ स्थिती.

अवस्था- प्रा॰ ना॰ उत्कंठा.

अवस्थात्रय- सं॰ ना॰-जागृति-स्वप्न-सुषुप्ति-

अवहार- प्रा॰ ना॰ मोठ्या सैन्याचा आळा-

अवा- प्रा॰ १ संबोधन स्त्रीचें-२ ना॰ माया. ३ कुंभाराचीभटी.

अवांका- प्रा॰ ना॰ १ हेत विकल्प-भा॰ अ॰ २ ओ॰ ७३४.-२ सारांश-भा॰ अ॰ ५ ओ॰ ५७१-३ धैर्य-भा॰ अ॰ ११ ओ॰ १४८६-४ अभिप्राय-भा॰ अ॰ १७ ओ॰ १८.

अवाप्त- सं॰ वि॰ पूर्ण.

अवासवा- प्रा॰ अन्य॰ अव्हासव्हा.

अवास्कंध- सं॰ ना॰ भूमीपासूनमेघमंडळापावेतों मानलेला सप्त स्कंधांतील पहिला स्कंध तो.

अवाळुव- प्रा॰ ना॰ वोष्ठ मांत-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १८२.

अवाळें- प्रा॰ ना॰ अवाळू

अवि- सं॰ ना॰ मेंढा.

अविक्रिय- सं॰ वि॰ क्रियाशून्य.

अविच्छिन्न- सं॰ वि॰ परिच्छेदरहित.

अविदग्ध- सं॰ वि॰ मूर्ख.

अविद्या- सं॰ ना॰ ब्रह्मस्वरूपावरकजीवोपाधिशक्ती-२ अज्ञान.

अविनित- सं॰ वि॰ अनम्र-उध्दट.

अविर्भाव- सं॰ अप॰ ना॰ आविर्भाव-प्रकटपणा-

अविवेकी- सं॰ वि॰ अविचारी.

अविष्करणें- सं॰ अप॰ धातु॰ ना॰ आविष्करणें-प्रकटणें-पसरणें-ज्ञा॰

अ०६ ओ० ११–ज्ञा०अ०१ ओ०७८.
अविसाळें–प्रा०ना० पक्षाचें घरटें-कोग-ज्ञा०अ०११ ओ०२५८–ज्ञा० अ०१६ ओ० ३–भा० अ०७ ओ०१५७
अवी–सं० ना० मेंढा
अवीस–सं०अप०ना० अमिषअथवामांस-ज्ञा० अ०६ ओ०२३२ ज्ञा० अ०३ ओ०२५८.–भा०अ०३ ओ०७९७–७९८ भा०अ० २६ ओ०४२२.
अवेव–सं०अप०ना० अवयव-भा० अ०१ ओ०३७–ज्ञा०अ०१ ओ०४.
अवेश–प्रा०ना०अवकाश–ज्ञा०अ० १६ ओ०२८१–२८२.
अव्यक्त–सं० वि०१ अस्पष्ट-२सूक्ष्म-३ ना० माया.
अव्यंगवाणें–सं०अप०वि०पूर्ण.
अव्यय–सं०वि० व्ययरहित-शाश्वत
अव्यवहार–सं०वि० व्यवहाररहित
अव्याकृत–सं०ना०ब्रम्हांडाचातिसरादेह.
अव्यावर्तक–सं०वि०स्वाभाविक लक्षणयुक्त.
अव्हाट–प्रा०ना०अडवाट-ज्ञा०अ० ४ ओ०२३.
अव्हावेल–प्रा० ना० दक्षिणावर्तवेल-दा० द० ६ स०१ ओ० १२.
अव्हाशंख–प्रा०ना०दक्षिणावर्तशंख-दा०द०६ स०१ ओ०१२
अव्हा सव्हा–प्रा०वि० वामसव्य-इक डेतिकडे-अमृ० प्र०१ ओ०५२.
अंश–सं०ना० विभाग.
अशकडी–प्रा०ना०विरुध्धपण-असंगतपण-ज्ञा० अ०१६ ओ०५.
अशंका–सं०अप०ना० आशंकाअथवा संशय.
अशन–सं०ना० भोजन-खाणें.
अशनि–सं०ना० वज्र.
अशरीरीवाणी–सं०ना० अशरीरवाणी.अथवा आकाशवाणी.
अशलग–प्रा०वि० सुगम-सोपें.
अशलगपण–प्रा०ना०१सुगमपण-२ गोडी-ज्ञा० अ०७ ओ०११४.
अशिव–सं०ना० अकल्याण.
अशी–सं०अप० ना० आशिर्वाद
अंशु–सं०ना० किरण-२सूक्ष्मतंतू.
अंशुग–सं०ना०बाण
अंशुमाळी–सं० अप०ना० सूर्य.
अशुध्ध–सं०ना०१रक्त-२ वि० अस्वच्छ.
अशेष–सं०वि० संपूर्ण.
अश्म–सं०ना०-दगड.
अश्रायिणें–सं०अप० धा०ना०आश्रयकरणें.
अश्लेशणें–प्रा०धा०ना० आलिंगणें
अश्व–सं०ना० घोडा.
अश्ववाहनी–सं०अप०ना० चाबूकस्वार-भा० अ०२० ओ०२१४.

अश्वेत-सं॰वि॰ श्वेतनव्हेतें.
अष्टकुलाचल-सं॰ना॰ मेरूच्याचा रीदिशांस जे भारतादि वर्षआहेत-त्या प्रत्येकांचीमर्यादाकरणारे-१ निल-२ निषध-३ विंध्याचल-४माल्यवान्-५मलय-६गंधमादन-७हेमकूट-८वहिमालय असें आठ पर्वतआहेतते.
अष्टगुण-सं॰वि॰ आठपट.
अष्टदिग्पाल-सं॰ना॰ पूर्वादि अष्ट दिशांचे-१ इंद्र-२अग्नि-३यम ४ निऋति-५वरुण-६ वायु-७कुबेर-८ आणि ईशान-असेंजे आठअधिकारी ते.
अष्टदेह-सं॰ना॰-१ स्थूल २ सूक्ष्म ३ कारण-४ महाकारण आणि-१ विराट्-२हिरण्य-३अन्याकृत-४ मूलप्रकृति-असेपिंडींच्यार व ब्रम्हांडींचे च्यार देह मिळून आठते.
अष्टधाप्रकृति-सं॰ना॰ सूक्ष्मपंचतत्वें व तीन गूण म्हणजे-१ पृथ्वी-२ आप-३ तेज-४ वायु-५आकाशहीं मूळचींतत्वें-आणि१सत्व-२रज-३ तम—हे तीनगुण मिळून जी प्रकृती ती.
अष्टनायका-सं॰ना॰१ घृताचि अथवा तिलोत्तमा-२ उर्वसी-३मेनिका-४रंभा-५पूर्वचिति-६ स्वयंप्रभा-७मित्रकेशी-८जनवल्लभा अशाइंद्रसभेस आठ मुख्य नृत्यांगनाआहेत त्या.
अष्टभाव-सं॰ना॰१कंप२रोमांच३स्फुरण४ प्रेमाश्रु-५स्वेद-६हास्य-७लास्य-८व गायन-असे आठ स्वात्विकभावते.
अष्टभोग-सं॰ना॰१ अन्नोदक २ ३ तांबूल-४पुष्प-५चंदन-५ वसन-७ शय्या-८ अलंकार असे८ भोगते.
अष्टमहासिद्धि-सं॰ना॰१ अणिमा-२ महिमा-३ लघिमा-४ गरिमा ५ प्राप्ति-६ प्राकाम्या-७ ईशता ८ ववशिता अशासिध्दीत्या.
अष्टवसु-सं॰ना॰ प्रतिमन्वंतरांत होणारे जे आठ देवते.
अष्टसृष्टि-सं॰ना॰१ काल्पनीक-२ शाद्बीक-३ प्रत्यक्षा-४ चित्रलपा-५ स्वाप्नी-६ गंधर्वा-७ ज्वरिका ८ दृष्टिबंधना अशाआठत्या.
अष्टांगयोग-सं॰ना॰१ यम२नियम-३आसन-४ प्राणायाम-५प्रत्याहार ६ ध्यान ७धारणा८ समाधि अशींआठ अंगें ज्या योगास तो योग.
अष्टादशावर्ण-सं॰ना॰१ब्राह्मण २क्षत्रिय-३ वैश्य-४ शूद्र-५ कुंभार ६ गौळी ७ तेळी(१ सोनार२सुतार ३ लोहार ४ तांबट ५ पाथरवट हे पांच मिळून)८ पांचाल ९ कोष्टी १०रंगारी ११शिंपी १२न्हावी १३पारधी १४म्हार १५धनगर१६परीट १७मांग १८ चांभार असे मिळून आठरावर्णते.

असकट-प्रा॰वि॰ निर्मळ-सरसकट नव्हेतें. रुक्मि॰ अ॰१८ ओ॰५१.
असकृत्- सं॰ अव्य॰ वारंवार.
असके- प्रा॰ वि॰ असिकें अथवा सर्व विवे॰ पू॰ प्र॰२ ओ॰९.
असत्- सं॰वि॰ मिथ्या.
असती-सं॰ ना॰ १ व्यभिच्चारिणी स्त्री-२ व्यभिचारिणी.
असदावरण-सं॰ना॰ आवरणांतील पहिलाभाग.
असदुत्तर- सं॰ना॰ कुतर्काचेंभाषण.
असंप्रज्ञ- सं॰वि॰ निर्विकल्प.
असंप्रज्ञात- सं॰वि॰ निर्विकल्प.
असंभावना- सं॰ ना॰ कोणी एकस्य अर्थजो त्या विषयीं सत्यत्व नवाटणें ती.
असमसहास- प्रा॰वि॰१ असंख्यात- ज्ञा॰अ॰८ ओ॰२४-२ अनिवार-भा॰अ॰३ ओ॰२६७.
असमाई- प्रा॰वि॰ नसमावणारेंतें ज्ञा॰ अ॰६ ओ॰११८.
असलगु- प्रा॰वि॰ अशालग अथवा सुगम- ज्ञा॰अ॰८ ओ॰२३७-ज्ञा॰ अ॰११ ओ॰१२७.
असलणों- प्रा॰धा॰ना॰ उसळणे- ज्ञा॰ अ॰१३ ओ॰२६८.
असंसक्ति- सं॰ना॰ ज्ञानीजीवाचा सप्तभूमिकांतील पांचवी भूमिका.
असांगडें- प्रा॰वि॰ निरुपम- ज्ञा॰ अ॰१५ ओ॰३०४.
असांघडें- प्रा॰वि॰ असांगडें.
असाधारण- सं॰वि॰ विशेष अथवा एकेक.
असाधारणकार्य- सं॰ना॰ एकेकाचें भिन्नभिन्नकार्य.
असाधुवाद- सं॰ना॰ निंदा.
असाध्वस- सं॰वि॰ निर्भय.
असि- सं॰ना॰ खड्ग अ॰ तरवार.
असित- सं॰वि॰ नीलवर्ण.
असितपथ- सं॰ना॰ अग्नि.
असिपत्र- सं॰ना॰ खड्गधारा.
असिपद- सं॰ना॰ तत्पद आणि त्वंपद या दोहींचें वाच्य म्हणजे उपाधि टाकून- निरुपाधिक लक्षांशाचें जें ऐक्य सहजींच असलेलें प्रत्ययास येतें तें.
असिवार- प्रा॰ना॰ स्वार अथवा राऊत.
असु-सं॰ ना॰ प्राण
असुदे- प्रा॰वि॰ यत्नावांचून ऐलें दा॰द॰२ स॰२ ओ॰२६.
असुर- सं॰ना॰ राक्षस-दैत्य.
असू- सं॰अप॰ नां॰अश्रु.
असूया- सं॰ना॰ १ दोषारोप-२ मत्सर.
असेख- सं॰अप॰वि॰ संपूर्ण-ज्ञा॰ अ॰१ ओ॰३
असेयोट- प्रा॰वि॰ अनसूट-ज्ञा॰

अ० १५ ओ० ४.
**असोसी**-प्रा० ना० हाव अथवा इच्छा आग० पंचि० १ स० ५ ओ० ९०.
**असोळी**-प्रा० ना० पक्ष्याचें घरटें-भा० अ० २६ ओ० ४३५.
**अस्तमित**-सं० वि० मावळलेलें
**अस्तभीति**-सं० वि० निर्भय.
**अस्त्रतती**-सं० ना० शस्त्रसमुदाय.
**अस्ति**-सं० ना० सदत्व.
**अस्था**-सं० अप० ना० आस्था-आसक्ति.
**अस्थि**-सं० ना० हाड-
**अहंकार**-सं० ना० प्रियद्वेष्योपेक्षावृत्तीरूपे अंतःकरण पंचकांतील पांचवाअवयवतो.
**अहंभाव**-सं० ना० मीपणा.
**अहाच**-प्रा० अव्य० वरवर-ज्ञा० अ० ७ ओ० ३६.
**अहाचवहाच**-प्रा० अव्य० वरवर ज्ञा० ६ ओ० ९९.
**अहाणा**-प्रा० वि० आत्मघातकी-ज्ञा० अ० २ ओ० १९६.
**अहाणें**-प्रा० धा० ना० पोळणें.
**अहाळबाहाळ**-प्रा० वि० बहुत-ज्ञा० अ० ११ ओ० ३५१.
**अहि**-सं० ना० सर्प.
**अहर्निशी**-सं० अप० अव्य० अहर्निश अथवा रात्रंदिवस.
**अहेतुक**-सं० वि० हेतुरहित अथवा निष्काम.
**अहेव**-प्रा० ना० १ सुवासिनीस्त्री-२ वि० सौभाग्यवती.
**अहेवतंतु**-प्रा० ना० सौभाग्यसूत्र.
**अहेवपण**-प्रा० ना० सौभाग्य.
**अळे**-प्रा० ना० आळ-ज्ञा० अ० १५ ओ० २३०.
**अळंकरी**-सं० अप० ना० मोक्षश्री ज्ञा० अ० ६ ओ० ३५६.
**अळिकुळ**-सं० अप० ना० भ्रमर-ज्ञा० अ० ११ ओ० २४९.
**अळी**-सं० अप० ना० १ भ्रमर-२ किडी
**अळुकी**-प्रा० ना० -आवड अथवा भूक.-अमृ० प्र० १ ओ० ५.
**अळुकेलें**-प्रा० वि० भुकेलें-ज्ञा० अ० ५ ओ० ११०.
**अळुमाळ**-प्रा० कि० किंचित्-भा० अ० १० ओ० ३०१.
**अळुमाळु**-प्रा० वि० कांही थाही-अमृ० प्र० २ ओ० ६०
**अळोंच**-प्रा० ना० ध्वनि-ज्ञा० अ० ६ ओ० २७१.
**अळोंचणें**-प्रा० धा० ना० हळुच सांगणें-भा० अ० ११ ओ० ११५८.
**अक्ष**-सं० ना० १ इंद्रिय-२ नेत्र-३ खेळावयाचा फांसा. ४ आंस.

अक्षत- सं॰वि॰ क्षतरहित अथवा अभंग.

अक्षम- सं॰वि॰ पंगू.

अक्षर- सं॰वि॰ शाश्वत.

अक्षवाण- सं॰ अप॰ना॰ आरती- रुक्मि॰ अ॰१५ ओ॰१४.

अक्षे-सं॰अप॰वि॰ अक्षय.

अक्षेप- सं॰ अप॰ ना॰ संशय युक्तइ छा.

अक्षौहिणी- सं॰ ना॰ रथ २१८७० हत्ती २१८७० घोडे ६५६१० पदाती अथवा पायदळ १०९३५० मिळून एकंदर २१८७०० संख्या सैन्य जी मध्यें आहे ती.

अज्ञ- सं॰ वि॰ मूर्ख.

अज्ञालता- सं॰ ना॰ कोणी एक विषय प्रत्यक्ष असतां. त्या विषयीं जों पर्यंत मनबुध्धिनें विकल्प केला नाहीं असा जो वृत्तीचा भाव त्याचें नाव -

अज्ञान- सं॰ना॰ १ अविद्या अथवा नकळणें- २ जीवास सप्तावस्था आहेत त्यांतील पहिली अवस्था ती.

## आ

आइणी- प्रा॰ ना॰ सामर्थ्य- ज्ञा॰ अ॰१॰ओ॰४५.

आइती- प्रा॰ ना॰ सामग्री- ज्ञा॰अ॰ १३ओ॰ ५९१.- ज्ञा॰अ॰१८ओ॰१२९- ३३०.

आइतें- प्रा॰वि॰ १ सहज- २ अव्य॰ स्वतः अ॰ स्वतः सिध्ध- ज्ञा॰अ॰१॰ ओ॰१११.

आइसा- प्रा॰ ना॰ लक्ष्मी- ज्ञा॰अ॰ ११ ओ॰३२.

आकणा- प्रा॰ना॰ खडामाती.

आकर- सं॰ना॰ खाण.

आकळ- प्रा॰ वि॰ अत्यंत कळणें ज्या ज्या ठायीं असें जें ज्ञानघन तें.

आकळणें- प्रा॰ धा॰ ना॰ जाणनें आरोपणें- ज्ञा॰अ॰२ ओ॰१२३.

आकाशवास- सं॰ना॰ वृक्षादिकांवर वास करणें तो.

आकांक्षा- सं॰ ना॰ इच्छा ज्ञा॰अ॰ १५ओ॰१००

आक्रोश- सं॰ना॰ खेद-दुःख येवें करून ओरडणें तें.

आँख- सं॰ अप॰ ना॰ आँस- अक्ष.

आखंडल- सं॰ना॰ इंद्र.

आखाडभूती- सं॰ अप॰वि॰ ठक अथवा भोंदू- आषाढभूती.

आख्या- सं॰ना॰ अभिधान-नाम -कीर्ति.

आग- सं॰ना॰ अपराध.

आंग- प्रा॰ ना॰ गांव- ज्ञा॰अ॰१५ ओ॰४८२-४८३.

आंगदट- सं॰अप॰वि॰ अंगदृढ.

आगम- सं० ना० शास्त्र.
आगमी- सं० वि० तंत्रमागनुसारी.
आगर- प्रा० ना० शेतमळा- दा० द० ३ स० १ ओ० ५.
आगरडे- प्रा० वि० अग्र- ज्ञा० अ० १४ ओ० २०७.
आगरू- सं० अप० ना० अगार अथवा स्थान- ज्ञा० अ० ४ ओ० १९२.
आंगवण- प्रा० ना० इच्छा- पर० प्र० १२ ओ० २४.
आंगवणें- प्रा० धा० ना० मिळणें- भा० अ० २३ ओ० ७०५.
आगळा- प्रा० वि० अधिक.
आंगिठ- सं० अप० ना० आगटी- ज्ञा० अ० १८ ओ० १२७.
आगी- सं० अप० ना० अग्नि.
आग्या- सं० अप० वि० १ मुखांतून अग्निच्या ज्वाला निघतात असा जो सर्प तो. भा० अ० ४ ओ० ८६- २ ना० आग्यासर्प २ एक पाला आहे ज्याच्या स्पर्शानें अंगाची आग होते- दा० द० ३ स० ७ ओ० ५
आघवें- प्रा० वि० संपूर्ण.
आघात- सं० ना० थपेट अ० धक्का- भा० अ० १३ ओ० ४३७.
आग्रो- सं० अप० ना० आग्रह- ज्ञा० अ० ३ ओ० ९०- भा० अ० १९ ओ० १२८.
आंचवणें- प्रा० धा० ना० मुकणें धुणें.
आचांगळी- प्रा० वि० निर्फळ.

आचार्य- सं० ना० श्रीगुरू.
आचूडमूळ- सं० अप० वि० आमूलाग्र- भा० अ० ५ ओ० १७४.
आच्छादन- सं० ना० वस्त्र- उदा० अन्न आच्छादन॥ हें तो प्रारब्धा अधीन॥ १॥ अभंग॥.
आजवळ- प्रा० ना० आजोळ
आजी- सं० ना० युध्य.
आज्य- सं० ना० घृत अथवा तूप.
आटघाट- प्रा० ना० श्रम- दा० द० १९ स० २ ओ० ७.
आटण- सं० अप० ना० अटन अथवा परिभ्रमण भा० अ० २६ ओ० ९२.
आटणी- प्रा० ना० मूस- दा० द० ३ स० १ ओ० २.
आटवी- सं० अप० ना० अरण्य- ज्ञा० अ० १८ ओ० १५३१.
आटाआटी- प्रा० ना० आटाआट- अथवा दगदग- दा० द० ३ स० २ ओ० ७.
आटाटी- प्रा० ना० आयाट- अथवा श्रम.
आटी- प्रा० ना० यत्न- ज्ञा० अ० १० ओ० १६९.
आटोप- प्रा० ना० सामर्थ्य- ज्ञा० अ० १७ ओ० ३८.
आंठी- प्रा० ना० मिठी- ज्ञा० अ० १३ ओ० ७८७.
आठवें- प्रा० ना० हृदय- ज्ञा० अ० ६ ओ० ३७०.

आंतुळणें- प्रा॰धा॰ना॰ बांधणें अथवा आवळणें ज्ञा॰अ॰१५ओ॰८८.

आड- प्रा॰ना॰ प्रेम-ज्ञा॰अ॰९ओ॰ २४१.

आडपाडी- प्रा॰ना॰ खटपट अथवा श्रम- वि वें॰पू॰प्र॰१ओ॰१५.

आडंबर- सं॰ना॰ आव अथवा डौल.

आडवारा- प्रा॰ना॰१ प्रतिबंध-२ धरबंद-ज्ञा॰अ॰१५ओ॰४६.

आडवी- सं॰अप॰ना॰१ आडमार्ग ज्ञा॰अ॰८ ओ॰२४॰ -२अरण्य-ज्ञा अ॰१३ओ॰ ६२.

आडवें- सं॰अप॰ना॰ अरण्य-अमृ॰प्र॰२ओ॰२.

आडसणें- प्रा॰धा॰ना॰ लपणें-अमृ॰प्र॰७ ओ॰२

आडळणें- प्रा॰धा॰ना॰ विषय होणें अथवा आदळणें.

आडळ- प्रा॰ना॰ स्पर्श.

आडळु- प्रा॰ना॰ सहनता- ज्ञा॰अ॰ ६ओ॰ ३६२.

आडारवा- प्रा॰ना॰१ धोरण-२ युक्ति-(ऐसेहे आडारखे साधून॥ कोण करावा)

आडी- प्रा॰ना॰ रोध-ज्ञा॰अ॰१३ओ॰ १६९.

आडे- प्रा॰ क्रि॰ - सांठवे- ज्ञा॰अ॰९. ओ॰११.

आदाणु- प्रा॰ना॰ ढाल तरवार धरणार.

आढ्य- प्रा॰वि॰ युक्त.

आणा- प्रा॰ना॰ शपथ-भा॰अ॰२९ ओ॰२५. क्रिया॰ घेऊनये.

आतणें- प्रा॰धा॰ना॰ स्पर्शणें-ज्ञा॰ अ॰१५ओ॰४९६-४९७.

आतप- सं॰ना॰ सूर्य.

आतपत्र- सं॰ना॰ छत्र.

आतर- सं॰ना॰ नावेचा उतार.

आतळणें- प्रा॰धा॰ना॰ स्पर्शकरणें- वि वें॰पू॰प्र॰१ ओ॰२१-पर॰प्र॰ ११ ओ॰४.

आतिसो- सं॰अप॰ अतिशय अथवा अतिप्रसंग. वाक्य॰ओ॰ ४५७६.

आतुडणें- प्रा॰धा॰ना॰ सांपडणें-

आतुबळी- सं॰वि॰ अतिबलाढ्य.

आंतुलीकडे- प्रा॰अव्य॰ जीवाच्या ठायीं.

आंतुवट- प्रा॰वि॰ अंतरंग-ज्ञा॰ अ॰१६ओ॰४५.

आतें- प्रा॰ अव्य॰ व्याप्त ज्ञा॰अ॰ ८ ओ॰२१३.

आतोतें- प्रा॰शब्द॰अव्य॰ ओंत.

आर्त- सं॰ना॰१ रोगी मनुष्य-२ वि॰ रोगी

आर्ती- सं॰अप॰ना॰ आवड-रु

विम० अ०३ ओ०१

आत्मघ्न- सं० ना० १आत्महत्याकरणारा पुरुष-२ वि० आत्महत्यारा.

आत्मचर्चा- सं० ना० आत्म विषयकभाषण.

आत्मज- सं० ना० पुत्र.

आत्मजा- सं० ना० कन्या.

आत्मनिवेदन- सं० ना० उपासना मार्गतील नवविधभक्तिरूप साधनाचें-ज्ञानभक्ति नामक नववें अंगतें.

आत्मप्रतिती- सं० ना० १अनुभव-२त्रिविध प्रतितींतील तिसरी प्रतिती.

आत्मविदविलासी- सं० ना० १ ज्ञानी पुरुष-२ वि० ज्ञानी.

आत्मविद्या- सं० ना० अध्यात्म विद्या अथवा ब्रम्ह विद्या.

आत्मस्थिती- सं० ना० ब्रम्ह स्वरूपस्थिती.

आत्मज्ञानी- सं० ना० १ आत्म स्वरूप जाण नारा. २ वि० आत्म विद.

आत्मा- सं० ना० स्वस्वरूप.

आत्माश्रयता- सं० ना० आपला आपणासच आश्रय त्याचें नांव.

आत्यंतिक प्रलय- सं० ना० विवेक प्रलय.- निद्रा आणि मरण हे दोपिंडिंचे व कल्प महाकल्प हे दोन ब्रम्हांडींचे मिळून प्रलयचार त्यांत जीवास मुक्तता नाहीं-या स्तव हा पांचवा प्रलय जीवास मुक्तिकर आहे- तो असा कीं पुन्हा जन्मावें मरावें हें ज्यांत उरत नाहीं.

आथी- सं० अप० क्रि० आहे. ज्ञा० अ० ५ ओ० ४२.

आथीलेपण- प्रा० ना० थोरपण-भाग्य.

आदर्श- सं० ना० आरसा.

आदळपण- प्रा० ना० असमर्थपण ज्ञा० अ० १३ ओ० ९५१.

आदि- सं० वि० १पहिलें - २ना० उत्पत्तिसमय.

आदिच- प्रा० धा० अव्य० स्वस्थ असतां - ज्ञा० अ० ८ ओ० ५९.

आदित्य- सं० ना० सूर्य.

आदित्याचेंझाड- सं० अप० ना० सूर्यफुलाचें झाड- ज्ञा० अ० १८ ओ० ८८६.

आदिपुरुष- सं० ना० श्रीभगवान्.

आदिबीज- सं० ना० प्रणव

आदिशक्ति- सं० ना० माया देवी.

आदिशून्य- सं० ना० माया- ज्ञा० अ० ७ ओ० २४.

आदेश- सं० ना० उपदेश.

आंदोळणें- प्रा० धा० ना० कंपित होणें- ज्ञा० अ० १ ओ० १७०

आद्य- सं० वि० १ आदि-२ ना० आदिपुरुष.

आधार- सं० ना० १ आश्रय-२ आधारचक्र.

आधारचक्र- सं० ना० षट्चक्रांतील पहिलें जें गुद द्वार स्थित योगशास्त्रो-

क्त चक्रलें.
आधि- सं॰ना॰ १ मनोव्यथा-२ पाप
आंध्य- सं॰ना॰ अंधःकार- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ १९९-२००.
आध्यास- सं॰ना॰ तादात्म्य.
आन- सं॰ अप॰ वि॰ अन्य अथवा निराळें.
आनकदुंदुभि- सं॰ना॰ कृष्ण पिता वसुदेव.
आनंद- सं॰ना॰ सुखरूपता.
आनन- सं॰ना॰ मुख.
आनंदभोग- सं॰ना॰ सुषुप्ति सुख
आनंदवन- सं॰ना॰ श्री काशीपुरी.
आनंदावभासभोग- सं॰ना॰ तूर्याअवस्थेचें सुख.
आनंदावाप्ति- सं॰ना॰ आनंदप्राप्ती-निरंकुशातृप्ति.
आनान- सं॰ अप॰ वि॰ अन्यअन्य अथवा वेगळें वेगळें.
आनिभ्रांत- सं॰ वि॰ यथार्थ.
आप- सं॰ना॰ पाणी.
आप- सं॰ अप॰ स॰ना॰ १ आपण-२ वि॰ आपलें.
आपंगणें- प्रा॰ धा॰ ना॰ पोसणें.
आपगा- सं॰ना॰ नदी.
आपणपाच- प्रा॰ अ॰ आपले ठायीं ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २०१
आपणावें- सं॰ अप॰ ना॰ आत्मस्वरूप-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ९५.
आपपर- सं॰ वि॰ आपलें परकें.
आपा- सं॰ अप॰ ना॰ आप अथवा पाणी- आग॰ पंनि॰ १ स॰ १ ओ॰ २८.
आपाड- प्रा॰ वि॰ १ अत्युत्तम-विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ १९-२१.-२ अंतर-ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ २७४.
आपाडु- प्रा॰ना॰ अधिकपणा अथवा मोठेपणा-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ११३०.
आपादन- सं॰ना॰ संपादन-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ३८.
आपीआप- सं॰ अप॰ ना॰ १ आपला आपण-२ वि॰ आपो आप अथवा सहज.
आपूर्त- सं॰ अप॰ ना॰ पूर्त म्हणजे-वापीतडागादि बांधणें.
आपैलें- प्रा॰ वि॰ ऐलें- ज्ञा॰ अ॰ ३ ओ॰ ४५.
आप्त- सं॰ना॰ यथार्थ बोलणारा-श्रीगुरू.
आफळणें- प्रा॰ धा॰ आपटणें.
आबळागोबळा- प्रा॰ना॰ आपला आपण-दा॰ द॰ ५ स॰ ६ ओ॰ ५६.
आंबुखा- प्रा॰ना॰ गवसणी-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ १६२.
आभ- सं॰ अप॰ ना॰ प्रतिबिंब-आग॰ पंनि॰ १ स॰ २ ओ॰ २४.
आभास- सं॰ना॰ प्रतिबिंब.
आभाळ- सं॰ अप॰ ना॰ अभ्र.
आभोळा- प्रा॰ वि॰ अत्यंत भोळा.

ज्ञा० अ० ५ ओ० १६६.
**आमय**- सं० ना० रोग.
**आमा**- प्रा० ना० स्तन.
**आमासा**- प्रा० वि० अंमळसा- वाक्य० ओ० ४६८३.
**आमोद**- सं० ना० सुवास.
**आम्नाय**- सं० ना० वेद.
**आयणी**- प्रा० ना० १ तत्वनिर्णयेच्छाः ज्ञा० अ० ६ ओ० १०-२ मन- ज्ञा० अ० ६ ओ० ४९५-३ प्रसर- ज्ञा० अ० ७ ओ० ५-४ मत्त- ज्ञा० अ० ८ ओ० १००-५ समुदाय- भा० अ० ४ ओ० २३ वाक्य० ओ० ११५८.
**आयत**- सं० वि० विस्तीर्ण.
**आयतन**- सं० ना० घर-स्थान.
**आया**- प्रा० ना० आकार- ज्ञा० अ० ७ ओ० ६८ भाग० अ० ३ ओ० ३२.
**आयुर्वेद**- सं० ना० वैद्यशास्त्र.
**आर्य**- सं० वि० श्रेष्ठ.
**आर**- प्रा० ना० अंकुर- ज्ञा० अ० १५ ओ० ७९.
**आरज**- सं० अप० वि० आर्य अथवा श्रेष्ठ- दा० द० २ स० १ ओ० २०.
**आरंभकार्य**- सं० ना० निमित्त उपादानादि अनेक कारणानीं ज्या कार्याचा आरंभ घडतो तें.
**आरंभरंभेचा गोरऊ**- सं० अप० ना० केळीचा खांब ज्ञा० अ० ६ ओ० ४६२.
**आरळ**- प्रा० वि० मृदु- रुक्मि० अ० ३ ओ० २६.
**आराइणें**- प्रा० धा० ना० अनुकूल असणें- भा० अ० २ ओ० २३२.
**आराम**- सं० ना० बाग.
**आरिख**- सं० अप० वि० आर्ष.
**आरुष**- सं० अप० वि० आर्ष.
**आरोगणें**- प्रा० धा० ना० भक्षण- करणें- विवे० पू० प्र० ७ ओ० ७२- अमृ० प्र० १ ओ० २०
**आरोप**- सं० ना० कल्पना- ज्ञा० अ० ९ ओ० ७१.
**आलंब**- सं० ना० अवलंबन.
**आलय**- सं० ना० घर.
**आला**- प्रा० ना० आगमन- अमृ० प्र० १० ओ० २३
**आलाप**- सं० ना० भाषण.
**आली**- सं० ना० १ सखी-२ पंक्ति
**आलोटणें**- प्रा० धा० ना० पारंगत होणें- हस्तगत करणें- भा० अ० ५- ओ० ५७.
**आवगणें**- प्रा० धा० ना० आरोपणें
**आवचितें**- प्रा० वि० -अवंचक- ज्ञा० अ० १३ ओ० ५२७-५२८.
**आवचित्य**- प्रा० ना० सेवक- ज्ञा० अ० १० ओ० ५२.
**आवटणें** -प्रा० धा० ना० उरणें-
**आवडळ**- प्रा० वि० साकार- दृश्य.
**आवडें** - प्रा० वि० भलतें- ज्ञा० अ० ७ ओ० ११९.

आवर्त- सं॰ ना॰ भोंवरा.

आवरण- सं॰ ना॰ १ आछादन-२जी वाच्यासप्तावस्थेंतील दुसरी अवस्था

आवरणशक्ति- सं॰ना॰ आछादक शक्ति अथवा अविद्या.

आवरी- प्रा॰ ना॰ कारभारी-ज्ञा॰अ॰ १३ओ॰२८.

आवसरी- प्रा॰ना॰ मोह-ज्ञा॰ अ॰६ ओ॰७.

आवसा- सं॰ अप॰ ना॰ आसावा- स्या- अमृ॰ प्र॰ ४ ओ॰ १५.

आवांकणें- प्रा॰ क्रि॰ अव्य॰ आग स्वरूप.

आविष्कर- सं॰ अप॰ ना॰ प्रवेश-ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २७७-२७८.

आवो- प्रा॰ ना॰ आकार अथवा डौल ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ३४.- भा॰ अ॰ २ ओ॰ १८९.

आश- सं॰ अप॰ ना॰ आशा.

आशकडी- प्रा॰ना॰ असंगत पणा -विरुध्धता- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ५.

आशंका- सं॰ ना॰ संशययुक्त प्रश्न.

आशय- सं॰ना॰ हृद्गत अभिप्राय.

आशा- सं॰ ना॰ दिशा.

आशा- प्रा॰ ना॰ इच्छा.

आशी- सं॰ ना॰ आशिर्वाद.

आशु- सं॰ अव्य॰ सत्वर अथवा शी घ्र.

आश्रम- सं॰ ना॰ १ ब्रह्मचर्य- गृहस्थ -वानप्रस्थ आणि सन्यास असे आश्रमतो. एकेक- २ स्थान

आश्लेषणें- प्रा॰ धा॰ ना॰ आलिंगणें ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ३३३- ३३४.

आर्ष- सं॰ वि॰ १ छांदिष्ट- २ वोबडें विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ १६.

आस- सं॰ अप॰ ना॰ आशा अथवा इच्छा.

आसकें- प्रा॰ वि॰ सर्व- सगळें.

आसंघडी- प्रा॰ वि॰ अघटित- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ९९०

आसन- सं॰ ना॰ पद्मादि आसनतें एकेक.

आसमसाहास- प्रा॰ वि॰ असंख्यात- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २४.

आसमास- प्रा॰ वि॰ पुष्कळ.

आसव- सं॰ ना॰ मद्य.

आसावणें- प्रा॰ धा॰ ना॰ विसांवणें.

आसिवार- प्रा॰ ना॰ घोडा- भा॰ अ॰ ३० ओ॰ ९३

आसुडणें- प्रा॰ धा॰ ना॰ ओढणें.

आसोस- प्रा॰ वि॰ १ गडद- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ २४६- २ ना॰ इच्छा- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ६५.

आस्तरण- प्रा॰ ना॰ अंथरूण- वाक्य॰ ओ॰ ६९५.

आस्था- सं॰ ना॰ आवड.

आस्थान- सं॰ ना॰ सभा.

आस्पद- सं॰ ना॰ स्थान.

आस्य- सं॰ ना॰ मुख अथवा तोंड
आहाण- प्रा॰ वि॰ सर्व- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ३७५-३७६.
आहाळणें- प्रा॰ धा॰ भा॰ पोळणें.
आहारिसा- सं॰ अप॰ ना॰ आदर्श अथवा आरसा- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ २८३.
आळा- प्रा॰ ना॰ झळया अथवा झळा -ज्वाळा- भा॰ अ॰ ३ ओ॰ १६०.
आळ- प्रा॰ ना॰ आरोप.
आळवण- प्रा॰ ना॰ विनवण.
आक्षेप- सं॰ ना॰ शंका- संशय.
आज्ञा- सं॰ ना॰ १ ऐश्वर्य- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ३०८-३०९- २ वेद- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ १.
आज्ञोत्तारण- सं॰ अप॰ ना॰ सशास्त्र भाषण.

## इ

इंगळ- सं॰ अप॰ ना॰ अंगार अथवा निखारा.
इंगळी- सं॰ अप॰ ना॰ १ ठिणगी- २ विंच्वाचीजाती
इच्छाशक्ति- सं॰ ना॰ सृष्टी व्हावी अशी जी इच्छाती.
इटिमिटी- प्रा॰ ना॰ इडापिडा.
इडा- सं॰ ना॰ -१ इडा नाडी म्हणजे वा मनासापुढ नाडी जिला चंद्रनाडी म्हणता तती.- २ वि॰ वाम अथवा डावी.
इडुरिया- प्रा॰ ना॰ सांजोऱ्या- रु क्मि॰ अ॰ १४ ओ॰ ११९.
इतर- प्रा॰ वि॰ अन्य अथवा येर.
इतिश्री- सं॰ ना॰ ग्रंथअध्यायादिकांची संपूर्णता अथवा समाप्ति- दा॰ द॰ १९ स॰ १ ओ॰ १९.
इदंता- सं॰ ना॰ -हें असा निर्देश- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ २६७
इदंवृत्ति- सं॰ ना॰ हें अशी वृत्ति अथवा मन ऊ॰ किंवा चित्त मन हें ऐशी वृत्ति॥ क्रियादिक होती अहंकारें.
इंदिरा- सं॰ ना॰ लक्ष्मी.
इंदिरावर- सं॰ ना॰ विष्णु.
इंदिरावरभगिनी- सं॰ ना॰ पार्वती.
इंदीवर- सं॰ ना॰ कमल.
इंदु- सं॰ ना॰ चंद्र.
इंधन- सं॰ ना॰ सर्पण.
इभ- सं॰ ना॰ हत्ती.
इषत्- सं॰ वि॰ किंचित
इषु- सं॰ ना॰ बाण.
इसाळु- प्रा॰ ना॰ १ ब्रह्मराक्षस- २ भूतबाधा- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५०१-५०२.
इसितव्य- सं॰ अप॰ ना॰ ईशत्व- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ५४५-५४७.
इहफल- सं॰ ना॰ ह्या लोकचें फळ
इहा- सं॰ ना॰ इच्छा.
इहामुत्रफलभोगविराग- सं॰ ना॰

साधन-चतुष्टयांतील ह्या लोकींचे व परलोकींचे फळभोगा विषयीं वैराग्य असें दुसरें साधन

**इक्षुदंड**- सं॰ ना॰ ऊंस.

**इंद्र**- सं॰ ना॰ - स्वर्गांतील देवांचा राजा त्याचें साधारण नांव-हे इंद्र एका ब्रम्ह दिवसांत स्वर्गामध्यें १४ होतात त्यांचीं नांवें १ यज्ञ २ रोचन ३ सत्यजीत ४ त्रिशिख ५ विभू ६ मंत्रद्रुम ७ पुरंदरप्रस्तुत आहे ८ बळी दैत्य पुढें होणार ९ अद्भुत १० शंभु ११ वैधृति १२ ऋतधामा १३ दिवस्पति १४ आणि शुचि

**इंद्रफणी**- सं॰ ना॰ १ इंद्र आणि शेष २ मांजर व सर्प. दा॰ द॰ १५ स॰ ५ ओ॰ १.

**इंद्रलोक**- सं॰ ना॰ स्वर्ग-अथवा ब्रम्हसृष्टीच्या आंत जें इंद्राचें वासव्यस्थान आहेतें.

**इंद्रावण**- सं॰ अप॰ ना॰ इंद्रवारूणी अथवा क डू कंवडळ.

**इध्मा**- सं॰ ना॰ समिध.

**इष्टा**- सं॰ ना॰ यज्ञादिकर्म.

# ई

**ईश**- सं॰ ना॰ ईश्वर.

**ईशचैतन्य**- सं॰ ना॰ समचैतन्यांतील आभास रूपी जीवन्यामक चैतन्यतें अथवा ईश्वर.

**ईशसृष्ट**- सं॰ ना॰ ईश्वरनिर्मित सर्वतें.

**ईशान**- सं॰ ना॰ १ पूर्वादिक्रमानें आठव्या दिशेचा अधिकारी तो-२ ईश्वर.

**ईशावास्य**- सं॰ ना॰ कण्वशाखेचें उपनिषत.

**ईश्वर**- सं॰ ना॰ १ जगत्कर्त्ता-२ विद्या पाधिभगवान.

**ईषणा**- सं॰ ना॰ इछा.

**ईक्षण**- सं॰ ना॰ १ अवलोकन-२ सृष्टिकर्तुत्व हेतु.

# उ

**उकल**- प्रा॰ ना॰ १ उमज-उमल -२ क्रि॰ उलगड.

**उकारमात्रा**- सं॰ ना॰ प्रणवाची दुसरी मात्रा.

**उक्त**- सं॰ धा॰ वि॰ सांगितलेलें.

**उखका**- प्रा॰ ना॰ भावार्थ- कर्तव्यार्थ-

**उखर**- प्रा॰ वि॰ खरबुडित- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ९ = वाक्य॰ ओ॰ २३४६.

**उखरव**- प्रा॰ ना॰ १ गुंताडा २ कार्य- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ३२५

**उखा**- सं॰ अप॰ ना॰ प्रातःकाल

अथवा उषःकाल-ज्ञा० अ० ७ ओ० १३१ ज्ञा० अ० १५ ओ० १११

**उखाळ**- प्रा० ना० उलार अथवा वांतीचें ओषध-दा० द० ३ स० ७ ओ० ३३.

**उखिता**- प्रा० वि० १ उदासीन-ज्ञा० अ० १३ ओ० ३४-२ ना० वारसरू-ज्ञा० अ० १३ ओ० ५९३-भा० अ० ९ ओ० २५५

**उखितें**- प्रा० वि० १ अवघें-ज्ञा० अ० ९ ओ० ३३५-२ उक्तें-भा० अ० २३ ओ० ७०८.

**उखिविखी**- प्रा० ना० होय नव्हे करणें ज्ञा० अ० १३ ओ० ६६ ज्ञा० अ० १७ ओ० ३९.

**उखी**- प्रा० ना० १ उखवणीस येणें अथवा मरगळ-ज्ञा० अ० १३ ओ० ५३०. २ धातु० ना० बोलणें-आग० पंचि० ५ स० २ ओ० २७-३ वि० वाव अथवा व्यर्थ-ज्ञा० अ० २ ओ० ६५.

**उखीऐसें**-प्रा० वि० १ मरगळलेलें-२ अनित्य-ज्ञा० अ० १५ ओ० १४३.

**उखीहोणें**- प्रा० धा० ना० थकणें-निमणें-ज्ञा० अ० १३ ओ० ११३९.

**उगड**- प्रा० ना० उध्धार-ज्ञा० अ० ३ ओ० १४७ भा० अ० १७ ओ० २२७.

**उगंड**- प्रा० ना० उगड.

**उगडणें**- प्रा० धा० ना० विसरणें-भा० अ० ९ ओ० २५५.

**उगलें**-- प्रा० वि० उगें-व्यर्थ-वाक्य० ओ० ११६८.

**उगवणें**- प्रा० धा० ना० उकलणें-उलगडणें-

**उगळणें**- प्रा० धा० ना० ओकणें-अमृ० प्र० १ ओ० ३

**उगाणानें**- प्रा० धा० ना० अर्पण करणें-ज्ञा० अ० ९ ओ० ४०४

**उगाणावा**- प्रा० ना० लूट-भा० अ० १ ओ० २०९.

**उगाणा**- प्रा० ना० १ गणना-ज्ञा० अ० ७ ओ० १२९-२ अनुभव-ज्ञा० अ० ११ ओ० ७१-ज्ञा० अ० १३ ओ० ८५-३ उपदेश-ज्ञा० अ० १३ ओ० ११४४ भा० अ० १७ ओ० २२९.-४ चव अथवा रुचि-अमृ० प्र० ६ ओ० ९०-५ नागवण-भा० अ० ४ ओ० ७८-भा० अ० २३ ओ० ६५९.

**उगाणें**-प्रा० ना० अगाध अनुभव-ज्ञा० अ० ७ ओ० ११८

**उगाळ**-प्रा० ना० चावलेला विडा-ज्ञा० अ० १३ ओ० ४१९-४२०.

**उचंबळणें**-प्रा० धा० ना० उचमळणें-हेलकावणें-विवे० पूं० प्र० १ ओ० ४१.

**उचंबळा**- प्रा० ना० हर्ष-ज्ञा० अ० ७ ओ० ११७

**उचित**-सं० वि० योग्य.

**उंछवृत्ति**- सं० ना० मार्गांतील कण वेंचण्यानें निर्वाह करून राहाणें अशी वृत्ति.

उच्छिष्टचांडाळी- सं० ना० एकक्षुद्रदेवता आहे.
उजरी- प्रा० ना० स्वस्थता- ज्ञा० अ० ६ ओ० १७- १९० - २ उत्कर्ष- ज्ञा० अ० १४ ओ० ३९१.
उजवण- प्रा० ना० विवाह.
उजाळ- सं० अप० वि० १ उजळ- श्वेत किंवा पांढरें- अमृ० प्र० ५ ओ० ३ २ ना० प्रकाश - नावलौकीक.- ज्ञा० अ० १६ ओ० ३५७- ३५८.
उजिती- प्रा० ना० आग टी - ज्ञा० अ० ११ ओ० ३४२.
उजितें- प्रा० ना० पेट - ज्ञा० अ० ८ ओ० २१३.
उजिरी- प्रा० ना० रीत- ज्ञा० अ० १६ ओ० २७० - २७१.
उजिवण- प्रा० ना० सार्थक- ज्ञा० अ० १० ओ० १४७.
उजीगरा- प्रा० ना० जागरण- ज्ञा० अ० ६ ओ० २२१.
उजीरपण- प्रा० ना० सरलत्व.
उजू- प्रा० वि० १ नीट- २ अनुकूल ज्ञा० अ० १७ ओ० ३८
उज्जीवन- सं० ना० भोगसाधन
उटंक- प्रा० वि० - उथळ विवे० पू० प्र० १ ओ० ८४.
उटकणें- प्रा० धा० ना० वेगळें पडणें
उटज- सं० ना० पर्णशाळा.
उटणें- प्रा० ना० १ उटणपदार्थ- २ धा० ना० घासणें अथवा चोळणें.
उटी- प्रा० ना० १ महात्म्य- भा० अ० ११ ओ० ७४६.- २ चंदनलेप- ॥ अंगींचंदनाचीउटी॥ केशरकस्तूरीललाटीं॥
उटीउतरणें- प्रा० धा० ना० महत्पदापासूनभ्रष्टहोणें- ज्ञा० अ० ९ ओ० ३३९.
उठाउठी- प्रा० क्रि० अव्य० सत्वर - झटकर.
उठाण- प्रा० ना० उत्थान.
उडगण- सं० अप० ना० उडुगण अथवा नक्षत्रें.
उडंगु- प्रा० ना० उडंग अथवा त्रास- भा० अ० ४ ओ० २७८.
उंडण- प्रा० ना० क्रिडा अ० अळी- भा० अ० ५ ओ० ९३.
उडवा- प्रा० ना० रास अथवा ढीग ज्ञा० अ० १८ ओ० ७२५.
उंडी- प्रा० ना० नैवेद्य - बळी- ज्ञा० अ० १७ ओ० ९७.
उडुप- सं० ना० १ नौका- २ चंद्र.
उड्डियान- सं० ना० हृदयस्थानअथवा अनाहतचक्र.
उणीव- प्रा० ना० न्यूनता-
उणें- प्रा० ना० १ धिक्‌जिणें- ज्ञा० अ० ११ ओ० ३७. - २ वि० न्यून.
उतटणें- प्रा० धा० ना० उलणें- भा० अ० १२ ओ० १७५.
उतान्ही- प्रा० ना० इच्छा अथवा आवड- ज्ञा० अ० १३ ओ० १६६- ज्ञा० अ० १७

ओ॰१६३.

उत्कट - सं॰वि॰१ अत्यंत - ज्ञा॰अ॰ १४ ओ॰१०० - २ उत्कृष्ट - भा॰अ॰४ ओ॰ ९७.

उत्कंठा - सं॰ना॰ उत्सुकता अथवा आवड - कळकळ.

उत्क्रांत - सं॰वि॰ उठलेलें अथवा उद्भवलेलें.

उत्तरा - सं॰ना॰ अभिमन्युस्त्री अथवा परिक्षिती माता.

उत्तरारणी - सं॰ना॰ अग्नि मंथनकरण्याची खालची अरणी.

उत्तरीय - सं॰ना॰ उपवस्त्र.

उत्तीर्ण - सं॰क्रि॰ अ॰१ उतराई - २ वि॰ ऋणमुक्त.

उत्पवन - सं॰ना॰ उड्डान.

उत्प्रेक्षा - सं॰ना॰ १ कोणें एके वास्तविक अर्थावर कल्पित अर्थाचें साधर्म्य करणें तिचें नांव उदाह॰ अंधःकारावर हा अंधःकार नव्हे तर चक्रवाकविरहानलाग्निधूमहोय जसें ॥ जोअंबरीं उफळतां खुर लागलाहे ॥ तो चंद्रमानिजतनू वरीडागिलाहे॥ हीउत्प्रेक्षा - २ युक्ति.

उत्संक - सं॰अप॰वि॰ उत्कंठखळ अथवा उतावळें.

उत्संखळ - सं॰अप॰वि॰ उताविळ - भा॰ अ॰५ ओ॰२१७.

उत्संगीं - सं॰शब्द॰अव्य॰ सन्निधान.

ज्ञा॰अ॰१ ओ॰ ४७८ - भा॰अ॰२ ओ॰ ५५.

उथळणें - प्रा॰धा॰ना॰ उसळणें.

उत्थान - सं॰ना॰ परावर्तन - उगवणी - पतन.

उदग्र - सं॰वि॰ उच्चाग्र.

उद्दंड - सं॰वि॰ बहुत.

उदधि - सं॰भा॰ समुद्र.

उदर - सं॰ना॰ पोट.

उदरंभरि - सं॰वि॰ पोटभरू.

उदश्रु - सं॰ना॰१ रडणारा - २ वि॰ रडवा.

उदळणें - प्रा॰धा॰ना॰ उसळणें अमृ॰प्र॰१ ओ॰५६.

उदान - सं॰ना॰ पंच प्राणांतील कंठस्थित तिसरावायु.

उदावाद - प्रा॰वि॰ उघडें - उघड अथवा प्रकट - ज्ञा॰अ॰१३ ओ॰३०५

उदित - सं॰वि॰१ उदय पावलेलें - २ उत्कंठित.

उदितें - सं॰अप॰क्रि॰ चढतें - ज्ञा॰अ॰ १० ओ॰११५.

उदीपणें - सं॰ अप॰धा॰ना॰ उदेणें अथवा उगवणें.

उदो - सं॰अप॰ना॰ उदय - अमृ॰ प्र॰२ ओ॰४४.

उद्गार - सं॰ना॰ शब्द.

उद्घोष - सं॰ना॰ गर्जना.

उद्बोध - सं॰ना॰ जागृती.

**उद्भट**- सं॰ वि॰ प्रसिध्ध.
**उद्भव**- सं॰ ना॰ उत्पत्ति.
**उद्यत**- सं॰ अप॰ वि॰ उद्युक्त.
**उद्यान**- सं॰ ना॰ बाग.
**उद्युत्कार**- सं॰ अप॰ ना॰ उदय करणारा.
**उद्योत्कार**- सं॰ अप॰ ना॰ उदयकर्ता.
**उद्रेक**- सं॰ ना॰ अधिकता.
**उद्वसु**- सं॰ अप॰ वि॰ उद्वस अथवा ओस.
**उद्वस्कंध**- सं॰ ना॰ सतस्कंधांतील- सूर्यमंडळा पासून चंद्र मंडला पर्यंतच्या ची मर्यादा असा तिसरा स्कंध तो.
**उद्वेग**- सं॰ ना॰ उद्विग्नपणा.
**उधणी**- प्रा॰ ना॰ धारें अथवा गवाक्ष ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २९३-२९४.
**उधमणे**- प्रा॰ धा॰ ना॰ बुडबुडे येणें.
**उधवणी**- प्रा॰ ना॰ उधणी.
**उधवणें**- प्रा॰ धा॰ उसळणें अथवा वर येणें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ८७- भा॰ अ॰ २ ओ॰ १७६.
**उधाइणें**- प्रा॰ धा॰ ना॰ प्रकरणें ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४५२.
**उध्धट**- सं॰ अप॰ वि॰ दांडगा.
**उध्धत**- सं॰ वि॰ उध्धट.
**उनीद**- सं॰ अप॰ ना॰ जागृति ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ६९.
**उन्नति**- सं॰ ना॰ अधिक्य अथवा- वृध्धि- वर्चस्व.
**उन्मत्तद्रव्य**- सं॰ ना॰ मद्यादि पदार्थ.
**उन्मनि**- सं॰ ना॰ मनाचें लीनत्व होतें अशी पांचवी अवस्था ती.
**उन्मिळा**- सं॰ अप॰ ना॰ लक्ष्मण- स्त्री ऊर्मिला.
**उन्मीलन**- सं॰ ना॰ उघडणें.
**उन्मेख**- सं॰ अप॰ ना॰ उन्मेष.
**उन्मेष**- सं॰ ना॰ १ ज्ञान- २ शद्ब.
**उन्मेषवृत्ति**- सं॰ ना॰ परावाचारूपनिर्विकल्प स्फुरण अथवा अंतःकरणवृत्ति.
**उपकंठी**- सं॰ शद्ब॰ अव्य॰ जवळ ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ३५.
**उपकरण**- सं॰ ना॰ उप साहित्य- उपसाधन.
**उपकरणें**- सं॰ अप॰ धा॰ ना॰ सेवा करणें.
**उपक्रम**- सं॰ ना॰ आरंभ अथवा उत्पत्ती.
**उपखणें**- प्रा॰ धा॰ ना॰ उगेंच बसणें
**उपखा**- प्रा॰ ना॰ १ श्रम- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ११५.- २ खर्च- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ६५२- ३ क्रि॰ अव्य॰ वृथा- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ९५ - ४ वि॰ निरर्थक.
**उपगणें**- प्रा॰ धा॰ उबगणें अथवा कंटाळणें.
**उपचार**- सं॰ ना॰ गौरव.

उपडु- प्रा० ना० जागरण.
उपंढेर- प्रा० ना० ढोंगउघडकी- अव्यवस्था- दा० द० २ स० १० ओ० ३७.
उपणें- प्रा० वि० उपयोगी- ज्ञा० अ० १८ ओ० ११४१.
उपतिष्ठणें- सं० अप० धा० ना० मनांतबिंबणें.
उपदिष्ट- सं० ना० १ महावाक्य अथवा गायत्री- २ धा० वि० उपदेशिलेलें.
उपनणें- प्रा० धा० ना० उपजणें- ज्ञा० अ० १ ओ० २७५.
उपनयन- सं० ना० व्रतबंध.
उपनिषत्- सं० ना० वेदांत ज्याशाखा आहेत त्या प्रति शाखेतील जो वास्तवीक मथितार्थ तो ज्यांत सांगितला आहे तें.
उपपत्ति- सं० ना० दृष्टांत- युक्ति- कारण.
उपप्राण- सं० ना० १ नाग- २ कूर्म- ३ कृकल- ४ देवदत्त- ५ धनंजय- असे जे शरीरस्थ पांच उपवायु ते.
उपमणें- प्रा० धा० ना० उडणें.
उपमर्द- सं० ना० निरास- निराकरण
उपमिणें- सं० अप० धा० ना० तुळणें.
उपयम- सं० ना० विवाह.
उपरति- सं० ना० विषय निवृत्ति- वैराग्य.
उपरतें- प्रा० वि० १ वरलें- २ ना० विचार- ज्ञा० अ० १८ ओ० ७२८.
उपरम- सं० ना० शांति.
उपराग- सं० ना० ग्रहण उ० चंद्रासि लागतिकळा उपराग होतो.
उपराळा- प्रा० ना० अधिक्य- स० ओ० १८४१.
उपरी- प्रा० ना० १ माडी- २ क्रि० अव्य० वर.
उपरें- प्रा० ना० अधिकता.
उपरोध- सं० ना० आग्रह- हट्ट- ज्ञा० अ० ११ ओ० ७१.
उपरोधिक- सं० वि० व्याजस्तुतवाक्य० ओ० ५३३.
उपल- सं० ना० दगड.
उपलउ- प्रा० ना० स्पष्टीकरण- ज्ञा० अ० १४ ओ० ८६.
उपलब्धि- सं० ना० १ प्राप्ति- २ स्पष्टता.
उपलंभें- सं० अप० ना० उपलब्धि
उपलवण- प्रा० ना० १ वर्णन- विवे० पू० प्र० १ ओ० १८- २ शोभा- अमृ० प्र० ९ ओ० ८.
उपलवणी- प्रा० ना० वर्णना- ज्ञा० अ० १३ ओ० ८५४.
उपलवणें- प्रा० धा० ना० व्यक्तकरणें- ज्ञा० अ० ११ ओ० २२३.
उपलविजणें- प्रा० धा० ना० सांगणें ज्ञा० अ० १५ ओ० ४४.
उपलाण- प्रा० ना० घोडा- ज्ञा० अ० १८ ओ० ४६४.

उपवटणें - प्रा॰ धा॰ ना॰ जागें होणें.
उपवर - सं॰ वि॰ विवाहयोग्य.
उपशम - सं॰ ना॰ लय - ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २७.
उपसर्ग - सं॰ ना॰ उपद्रव - विघ्न.
उपसर्पण - सं॰ ना॰ सांनिध्य - भा॰ अ॰ ९ ओ॰ २७.
उपसंहार - सं॰ ना॰ लय अथवा समाप्ति.
उपस्थ - सं॰ ना॰ मैथुन द्वार पंच कर्मेंद्रियांतील चवथें इंद्रिय.
उपसाहणें - सं॰ अप॰ धा॰ ना॰ क्षमा करणें.
उपहास - सं॰ ना॰ थट्टा.
उपहित - सं॰ वि॰ उपाधियुक्त.
उपहिता - सं॰ ना॰ अंबवण अथवा अंबोण - ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ १५४
उपाइणें - प्रा॰ धा॰ ना॰ १ आरंभणें ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ४० - २ अकस्मात मिळणें - ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १३२.
उपाइलें - प्रा॰ वि॰ १ उत्कृष्ट - ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १०८ - २ आवडतें - ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ७८९. - ३ मशारल अथवा मोठें - ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १३३.
उपांग - सं॰ ना॰ - १ उपसाहित्य ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १० - २ उपशास्त्र म्हणजे न्याय - पूर्वोत्तरमीमांसा - पुराणें व धर्मशास्त्र. हे चार भाग यांच्या समुच्चयाचें नाव.

उपादानकारण - सं॰ ना॰ ज्या कारणांत कार्याची उत्पतिस्थितिलय असून ज्यास निमित्त कारणापेक्षा असत्य त्या द्रव्याचें नाव जशी घट उपादान कारण मृत्तिका.
उपाधि - सं॰ ना॰ १ माया - २ मन - ३ विकार - आ॰ पंचि॰ १ स॰ २ ओ॰ ४०.
उपानह - सं॰ ना॰ चर्मी जोडा.
उपायन - सं॰ ना॰ अर्पण पदार्थ.
उपार - सं॰ अप॰ ना॰ उपाय - भा॰ अ॰ ५ ओ॰ ५६२.
उपाव - सं॰ अप॰ ना॰ उपाय.
उपासणें - सं॰ अप॰ धा॰ ना॰ प्रार्थणें अथवा विनवणें.
उपासनाकांड - सं॰ ना॰ त्रिकांड वेदांतील चित्तस्थैर्य हेतु दुसरें कांडतें.
उपास्ति - सं॰ ना॰ उपासना अथवा भक्ति.
उपेग - सं॰ अप॰ ना॰ १ उपयोग - २ प्रयोजन - अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ १
उपेगु - सं॰ अप॰ ना॰ उपयोग - फळ
उपेणें - प्रा॰ ना॰ विश्रांतिस्थान.
उपेक्षा - सं॰ ना॰ त्याग -
उपोद्घात - सं॰ ना॰ बोलायाचा अर्थ मनांत ठेवून संक्षेपतः अन्य प्रकारें जो त्या अर्थाचा प्रस्ताव

तो.
उपोडु- प्रा॰ना॰ जागृति- ज्ञा॰अ॰ १५ ओ॰ २६९.
उफरवणें- प्रा॰धा॰ना॰ रिक्त होणें- ज्ञा॰ अ॰१३ओ॰६६५.
उफरवा- प्रा॰ ना॰ उपसा अथवाना श- अमृ॰ प्र॰२ओ॰५९.
उफळणें- प्रा॰धा॰ना॰उडणें.
उफाळणें- प्रा॰ धा॰ ना॰ उसळणें
उबग- प्रा॰ना॰ कंटाळा अथवात्रा स- वाक्य॰ओ॰ ५२४- ज्ञा॰अ॰११ ओ॰४५३.
उबडुण- प्रा॰ना॰कर्मोद्भव.
उबडें- प्रा॰ वि॰ उपडें अथवा पालथें.
उबाळ- प्रा॰ ना॰१ टांस-२ घोष अथ वा गर्जना.
उभ- सं॰अप॰ ना॰ उभारणी अथवा उत्पत्ति.
उभग- प्रा॰ना॰ उबग अथवा त्रास.
उभज- प्रा॰ना॰ १ संतोष- २ दुःख ज्ञा॰अ॰१४ ओ॰३२९
उभड- प्रा॰ना॰ १ झरा- ज्ञा॰अ॰७ ओ॰६९ - २ उमाळा-भा॰अ॰१४ओ॰ ३२६ - ३ गहिंवर- दा॰ द॰ ३ स॰ ५ - ओ॰ ६.
उभय- सं॰ वि॰ दोघे - दोन- दोन्ही.
उभयता- सं॰वि॰ उभय.
उभला- प्रा॰ना॰दारवंग-ज्ञा॰अ॰ १३ओ॰ ७००.
उभळी- प्रा॰ना॰ खोकला-भा॰अ॰ १ओ॰ २७०.
उभारा- प्रा॰ना॰ स्थिरता- ज्ञा॰अ॰ ६ओ॰२२१.
उभास- प्रा॰धा॰ दिसणें.
उभेय- प्रा॰वि॰ जिवंत- ज्ञा॰अ॰ ८ ओ॰ ६३.
उमगणें- प्रा॰धा॰ना॰ परिस्फुट हो णें.
उमच- प्रा॰ना॰ कृतज्ञता- ज्ञा॰अ॰ १७ओ॰२७७-२७८.
उमरडणें- प्रा॰धा॰ना॰ त्याग क रणें. ज्ञा॰अ॰९ ओ॰२०७.
उमस- प्रा॰ना॰ १ उद्भव- ज्ञा॰अ॰ २ ओ॰६९- सदा॰ ओ॰१६२. - २ विस्तार- ज्ञा॰ अ॰१५ ओ॰१०९.
उमा- सं॰ना॰ पार्वती.
उमाणणें- प्रा॰धा॰ना॰ मोजणें.
उमाणा- प्रा॰ना॰ माप.
उमावर- सं॰ ना॰ शिव.
उमाळा- प्रा॰ ना॰ १ लोट अथवा हुंदका- २ आकार- ज्ञा॰अ॰११ओ॰ ३६४.
उरकणें- प्रा॰धा॰ना॰ संपणें अ थवा आटोपणें
उरग- सं॰ना॰ सर्प.
उरण- सं॰ना॰ मेंढा, बकरा.
उरवी- सं॰ अप॰ना॰ पृथ्वी.
उराउरी- प्रा॰क्रि॰अव्य॰ झटूक

र-ज्ञा॰अ॰११ ओ॰३६.
उरी- प्रा॰ना॰ गव अथवा स्थिति.
उरोज-सं॰ना॰स्तन.
उलथणें- प्रा॰धा॰ना॰पालटणें-अमृ॰प्र॰१ओ॰२.
उलथा- प्रा॰ना॰ संस्कार-ठसा दिवे॰उ॰प्र॰९ ओ॰३१.
उलार- प्रा॰ना॰ वांती.
उलूक-सं॰ना॰ घुबड.
उल्कापात-सं॰ना॰ नक्षत्रपात.
उल्लासणें- सं॰अप॰धा॰ना॰ वाढणें.
उल्हाळ- प्रा॰ना॰१अधिक्य.२भरती-भा॰अ॰२ ओ॰५१६.
उल्हाळ- प्रा॰ना॰उडी उ॰ ॥लवणाचीमासोळी जिवनीं घेयेउल्हाळा॥
उल्हाटयंत्र- सं॰ना॰१तोफ-२ गरनाळ.
उल्हाटशक्ति- सं॰ना॰ कुंडलिनी.
उल्हास- सं॰ना॰ आनंद.
उवाइणे- प्रा॰धा॰ना॰१ प्रसन्नहोणें- ज्ञा॰अ॰५ ओ॰१६२- २पसरणें-ज्ञा॰अ॰६ ओ॰२१५.
उवाइला- प्रा॰ना॰ अभिप्राय-ज्ञा॰अ॰५ओ॰१४२.
उवावो-प्रा॰ना॰१ उवाव अथवा प्रसर-ज्ञा॰अ॰६ ओ॰४१६.-२ पाकट्य- ज्ञा॰ अ॰१६ ओ॰९.- ज्ञा॰अ॰१७ ओ॰१०.

उवेढा- प्रा॰ना॰-परचक्रपराभव ज्ञा॰अ॰११ ओ॰३८७.
उर्वरीत- सं॰अप॰ना॰ अवशिष्ट.
उर्वी-सं॰अप॰ना॰ ऊर्वी अथवा पृथ्वी.
उर्वीगर्भरत्न- सं॰अप॰ना॰ऊर्वी गर्भ रत्न म्हणजे सीता.
उशना-सं॰ना॰शुक्राचार्य.
उष्टर-सं॰अप॰ना॰ उष्ट्र अथवा उंठ.
उष्णावास-सं॰ना॰ पंचाग्निसाधनवास.
उष्णांशु- सं॰ना॰ सूर्य.
उष्णीष- सं॰ना॰ पागोटें.
उसणाधाई- प्रा॰अव्य॰समोरासमोर-ज्ञा॰अ॰२ओ॰१९०
उसंतु- प्रा॰ना॰उसंत अथवा विसांवा- भा॰अ॰३ओ॰१३३ वाक्य॰ ओ॰२७९०
उससा- प्रा॰ना॰सुख-ज्ञा॰अ॰१६ओ॰४१४-४१५.
उसिटें-सं॰अप॰वि॰ उच्छिष्ट-अमृ॰प्र॰२ओ॰१५.
उसीलजाणें- प्रा॰धा॰ना॰मानेंत घांस अडकणें-दा॰द॰३ स॰५ ओ॰३३
उहु- सं॰अप॰ना॰ ऊह म्हणजे तर्क अथवा कल्पना-भा॰अ॰२३ ओ॰२२७.

उहापोहा- सं॰ अप॰ ना॰ होयन व्हे करणें- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ८९
उळ- प्रा॰ ना॰ फूल- अमृ॰ प्र॰ ४ ओ॰ ८.
उळगी- प्रा॰ ना॰ बिगार- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ४५८.
उळीग- प्रा॰ ना॰ कार्य- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ४१९- ४२०.
उळिगा- प्रा॰ ना॰ भोंवऱ्याच्यागर गराद्य सारखें सेवे साठीं हिंडणें- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २०१.

# ऊ

ऊणखूण- प्रा॰ ना॰ वादाघाट.
ऊर्णनाभी- सं॰ ना॰ कोंतीण.
ऊर्ध्वमूल- सं॰ ना॰ १ देह- २ प्रपंच.
ऊर्ध्वरेता- सं॰ ना॰ ब्रम्हचारी.
ऊन- सं॰ वि॰ उणें- न्यून- उष्ण.
ऊर्मी- सं॰ ना॰ मनाचे तरंग.
ऊरु- सं॰ ना॰ मांडी.
ऊर्वरीत- सं॰ ना॰ १ अवधिशेष वस्तु॰- २ वि॰ अवशिष्ट.
ऊर्वी- सं॰ ना॰ पृथ्वी.
ऊर्वीगर्भरत्न- सं॰ ना॰ सीता.
ऊहु- सं॰ अप॰ ना॰ ऊह अथवा तर्क.
ऊहापोह- सं॰ ना॰ विचारयुक्त योजना.
ऊळ- प्रा॰ ना॰ फूल.

# ऋ

ऋषभदेव- सं॰ ना॰ भरतरा जाचापिता.
ऋषि- सं॰ ना॰ तपस्वी.
ऋक्ष- सं॰ ना॰ मानवजातीअ स्वल.
ऋक्षपति- सं॰ ना॰ जांबुवंत
ऋक्षराज- सं॰ ना॰ ऋक्षपति.

# ए

एकचिलाटें- प्रा॰ ना॰ एकादेहें च.
एकतुकें- सं॰ अप॰ श॰ अव्य॰ समान- सारखें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ २५.
एकदेशी- सं॰ वि॰ अल्प.
एकबग- प्रा॰ ना॰ एकप्रकार- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४०४.
एकमुख- सं॰ क्रि॰ अ॰ सस्मुख- भा॰ अ॰ १ ओ॰ १५१.
एकमोहरें- प्रा॰ क्रि॰ अव्य॰ एक

न-ज्ञा० अ०१० ओ०२५२-२५३.
एकरस- सं०ना० परब्रम्ह-अमृ० प्र०१ओ०९.
एकलाधी- सं०अप०ना०एकबु ध्धिल म्हणजे एक रूपता.
एकलें- प्रा०वि०-सामर्थ्यहीन-ज्ञा० अ०१० ओ०३०९-३१०.
एकवंकिया- सं०अप०ना०एका कारता-ज्ञा०अ०६ओ०३९६.
एकवंकी- सं०अप०ना०तादात्म्य ज्ञा०अ०८ओ०१३६.
एकवंके- सं०अप०ना० सारखेप ण- ज्ञा०अ०१५ओ०५७१.
एकवद- सं०अप०ना०एकल-ए कवटला.
एकवळा- सं०अप०ना०एकोप- ज्ञा०अ०११ओ०५
एकवाक्य- सं०ना०एकवाक्यता.
एकविरा- सं०ना० रेणुकानामक- देवी.
एकवेळु- सं०अप०ना० मरण-ज्ञा० अ०९ओ०२०६.
एकसरणें- सं०अप०धा०ना०अ नुसरणें-ज्ञा०अ०१३ओ०६०६
एकसरा- सं०अप० अव्य०१ एका एकी-२ एकाकी अथवा एकटा-दा० द०२स०१ओ०२१.
एकसार- सं०ना० अनन्य भक्त ज्ञा०अ०५ओ०४.
एकसारांश- सं०ना० एकसार.
एकाएकी- सं०अप०वि० एकाकी अथवा निःसंग-भा०अ०१ओ० ४३.
एकांतर- सं०ना० एकादिसाआ ड़पणा- धारणें पारणें ज्ञा०अ०१७ ओ० ३६३-३६४.
एकायतनु- सं०अ०ना० एकाय. तन अथवा अधिष्ठान ब्रम्ह-ज्ञा० अ०६ओ०१३०.
एकावळी- सं०अप०ना० एकेरा हार.
एकाक्ष- सं०ना० दैत्यगुरु शुक्र तो-२ कावळा.
एकीहेळा- सं०अप०अव्य०अक स्मात्.
एण- सं०ना० हरिण -मृग.
एणांक- सं०ना० चंद्र.
एणाक्षी- सं०वि० मृगनयना.
एन- सं०ना० पाप.
एर- प्रा०ना० येर-अन्य.

## ऐ

ऐक्यभाव- सं०ना० ब्रम्हभाव.
ऐणी- प्रा०ना० ब्रम्हप्राप्तीचीइ च्छा-विवे०पू०प्र०१ओ०८०
ऐतरेय- सं०ना० अश्वलायनशा

रेन्या उपनिषदाचें नाव.
ऐतें- प्रा० ना० आइती- हाशद्बपाहा.
ऐना- सं०अप० ना० अयनकशद्बपाहा.
ऐरिणी- प्रा० ना० लग्नांतील झाल-रु क्मि० अ० १६ ओ० १५५.
ऐश्वर्ययोग- सं० ना० माया योग ज्ञा० अ० ९ ओ० १२.
ऐहिक- सं० वि० इहलोक संबंधी.

## ओ-औ.

ओक- सं० ना० घर-स्थान-शरीर.
ओखटें- प्रा० वि० वाईट.
ओगर- प्रा० ना० वाटपी.
ओगरणें- प्रा० धा० ना० वाटणें.
ओगराळें- प्रा० ना० वाटण पात्र.
ओंगळ- सं० अप० वि० घाणेरा-अ मंगळ.
ओटंगण- प्रा० ना० १ गिर्दी-२ लो ड.
ओडण- प्रा० ना० ढाल.
ओतप्रोत- सं० वि० सबराभरीत.
ओदन- सं० ना० भात.
ओपणें- प्रा० धा० ना० देणें.
ओलांडा- प्रा० ना० १ उपदंश अथवा गरमीरोग- २ ओलांड याचा विकार.
ओसंग- प्रा० ना० मांडी.
ओसंडणें- प्रा० धा० ना० टाकणें.
औट- प्रा० वि० साडेतीन संख्या.
औटपीठ- सं० ना० द्विदल आग्न चक्रावरील. योगशास्त्रोक्त स्थान तें.
औत्तानपादीय- सं० अप० ना० ध्रु व.
औदुंबर- सं० अप० ना० उदुंबर वृक्ष.
औधत्य- सं० ना० उध्धटपण.
और्ध्वदेहिक- सं० ना० उत्तर कि या.- २ वि० उत्तर क्रिया संबंधिक.
औरस- सं० वि० स्वीय.

## क

ककारांत- सं० ना० सुषुम्ना ना डी- ज्ञा० अ० १२ ओ० ५२.
ककारादिठकारांत- सं० वि० क पासून ठ पर्यंत वर्ण युक्त- भा० अ० १२ ओ० २३९.
कंगळ- प्रा० ना० घोड्याची कलगी रुक्मि० अ० ८ ओ० १५.
कच- सं० ना० १ केश- २ बृहस्पती चा पुत्रणया.
कचरट- प्रा० वि० हलकट- दा० द० ११ स० ५ ओ० २१.
कचाट- प्रा० ना० १ खटपट- आ० पं० १ स० ३ ओ० ५.- २ सांकड अ

थवा संकोच- म॰ ओ॰ ७३८.
कंचुक- सं॰ ना॰ अंगरखा.
कंचुकी- सं॰ ना॰ चोळी.
कछ- प्रा॰ ना॰ कांसव.
कंज - सं॰ ना॰ कमल.
कंजकन्या- सं॰ ना॰ सरस्वती.
कट- प्रा॰ ना॰ प्रारब्ध- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५३९-५४०
कटक- सं॰ ना॰ सैन्य.
कटकट- प्रा॰ ना॰ कट अथवा प्रारब्ध.
कटकटा- प्रा॰ संबो॰ हे प्रारब्धा.
कटा- प्रा॰ संबो॰ हे कटकटा- भा॰ अ॰ २३ ओ॰ ४०९
कटाघी- सं॰ अप॰ ना॰ कटाह अथवा कढई.
कटाव- सं॰ अप॰ ना॰ १ कटाह- २ कवितेचि एक जाती.
कटाक्ष- सं॰ ना॰ नेत्रकोण दृष्टीनें अवलोकन.
कटिरव- सं॰ अप॰ ना॰ सिंह.
कठ- सं॰ ना॰ कठवल्ली नामक कृष्ण यजुर्चें उपनिषत्.
कंठणें- प्रा॰ धा॰ ना॰ क्रमणें.
कठोर- सं॰ वि॰ कठिण- निर्दय.
कडलरणें- प्रा॰ धा॰ ना॰ खडतरणें अथवा अंगीं भेदणें- भा॰ अ॰ ११ ओ॰ १५०
कडवसा- प्रा॰ ना॰ भिंवई अथवा भोंवई- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३६४.
कडवसा- प्रा॰ क्रि॰ अ॰ एकीकडे- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ३१३.
कडवसें- प्रा॰ ना॰ अंधारें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ११२.
कडवें- प्रा॰ वि॰ कडू- क्रूर अथवा दुष्ट.
कडस- प्रा॰ ना॰ विचार- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ १५३-१५४.
कडसणी- प्रा॰ ना॰ विचार- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ८५- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १७४- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ४३.
कडसणें- प्रा॰ धा॰ ना॰ १ सावध करणें- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २७ -२ कसीं लावणें- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ५- ३ घुसळणें- ज्ञा॰ अ॰ २ ओ॰ १२९.
कडाड- प्रा॰ वि॰ जाणता अथवा पटलेला- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ९७.
कडाडगहीस- प्रा॰ वि॰ पटत मूर्ख अथवा अविचारी.
कडियाळी- प्रा॰ ना॰ माळ- हार अथवा जाळी- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ५२१ ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३१७.
कणव- प्रा॰ ना॰ दया अथवा कृपा भा॰ अ॰ १ ओ॰ ३७.
कणवाळू- प्रा॰ वि॰ कृपाळू- दयाळू.
कणिका- प्रा॰ ना॰ कण अथवा रज- भा॰ अ॰ १ ओ॰ ३२.

कर्णधार- सं॰ ना॰ नावाडी.
कर्णमात्रा- सं॰ ना॰ कर्णभूषण.
कर्णिका- सं॰ ना॰ कमलमध्यभाग.
कतबा- प्रा॰ ना॰ रोखा.
कर्त्ता- सं॰ ना॰ १ करणारा- २ विज्ञानमयकोश.
कर्तृतंत्र- सं॰ वि॰ ध्यातृवछिन्न.
कर्तृतंत्रता- सं॰ ना॰ त्रिपुटी- वा॰ ओ॰ २२२५.
कथा- सं॰ ना॰ कीर्तन- ग्रंथार्थ- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १४१.
कंथा- सं॰ ना॰ गोधडी.
कथालाप- सं॰ ना॰ वर्णन.
कंद- सं॰ ना॰ १ नाभी- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ४०६- ४०७- २ गाभा- उ॰ ध्याई ध्याई हो आनंद कंदा.
कदन- सं॰ ना॰ युध्य- हनन.
कंदर्प- सं॰ ना॰ १ मदन २ कांदा
कदंब- सं॰ ना॰ १ समुदाय- २ कळंबवृक्ष.
कदर्य- सं॰ अप॰ वि॰ कदर्यु अथवा कृपण.
कदर्यु- सं॰ ना॰ कृपण.
कंदर- सं॰ ना॰ गुहा.
कर्दळ- सं॰ अप॰ ना॰ कर्दली अथवा कापूर केळ.
कंदळी- प्रा॰ ना॰ कदन.
कदान्न- सं॰ ना॰ रुक्षअन्न.

कंदुक- सं॰ ना॰ चेंडू.
कंधर- सं॰ ना॰ मस्तक.
कनक- सं॰ ना॰ १ सुवर्ण- २ धोत्रा.
कनकाद्रि- सं॰ ना॰ सुवर्णाचल म्हणजे मेरूपर्वत.
कनवाळू- प्रा॰ वि॰ कृपाळू.
कन्हणें- प्रा॰ धा॰ ना॰ कुंथणें.
कपाट- सं॰ ना॰ १ गुहा- २ द्वार.
कपाल- सं॰ ना॰ १ खर्पर- २ विक्षिप्त चित्तद्वार- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १८०.
कपालधर- सं॰ ना॰ शिव.
कपि- सं॰ ना॰ वानर.
कपित्थ- सं॰ ना॰ कवठीचें झाड- कवठ
कपिध्वज- सं॰ ना॰ अर्जुन.
कर्पूरगौर- सं॰ ना॰ शिव.
कर्पूरजननी- सं॰ ना॰ कापूर केळ.
कपोल- सं॰ ना॰ गाल.
कपोळ- सं॰ अप॰ ना॰ कपाळ ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १८६.
कबर- सं॰ ना॰ केश.
कबरी- सं॰ ना॰ वेणी.
कबाड- प्रा॰ ना॰ असारभार.
कबाडि- प्रा॰ ना॰ कडबा.
कंबु- सं॰ ना॰ शंख.
कमठ- सं॰ ना॰ कांसव.
कमलजन्मा- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.

कमलभवांड- सं॰ ना॰ ब्रम्हांड.
कमला- सं॰ ना॰ १ लक्ष्मी-२संपत्ति.
कमलावर- सं॰ ना॰ विष्णु.
कमलासन- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
कमलोद्भव- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
कमोदी- सं॰ ना॰ चंद्रविकासी कमल.
कर्मकांड- सं॰ ना॰ त्रिकांड वेदांतील चित्तशुध्दिहेतु पहिलें कांड.
कर्मज- सं॰ ना॰ १कर्मों पासूनतें-२ देह ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ४६.
कर्मनिष्ट- सं॰ ना॰ देह - ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ४७४-२ वि॰ कर्मठ.
कर्मभूमी- सं॰ ना॰ मृत्युलोक- भारतवर्षास प्राधान्यानें म्हणतात.
कर्मेंद्रियपंचक- सं॰ ना॰ वाचा- पाणि- पाद- उपस्थ आणि गुद ह्या पंचकाचें नांव.
कयाधु- सं॰ ना॰ हिरण्यकशिपूची स्त्री.
कयाधुहृदयरत्न- सं॰ ना॰ प्रल्हाद.
कर- सं॰ ना॰ हात-२किरण.
करक- प्रा॰ ना॰ लचक- झाली मधील दिवे.
कारका- सं॰ ना॰ जलगार.
करगत- सं॰ अव्य॰ हस्तगत.
करंटा- प्रा॰ वि॰ हतभाग्य.

करटी- सं॰ ना॰ हत्ती.
करण- सं॰ ना॰ १ इंद्रिय-२ मनोमय कोश.
करणी- प्रा॰ ना॰ कंवटाल अथवा कृत्रीम.
करतळामळ- सं॰ अप॰ ना॰ करतलामलक म्हणजे हातचा आंवळा
करपुष्कर- सं॰ ना॰ करकमल-शुंडाग्र.
करबाड- प्रा॰ ना॰ कउबा.
करवाल- सं॰ ना॰ तरवार.
करवील- प्रा॰ ना॰ बगळा- भा॰ अ॰ ५ ओ॰ १६४.
करी- सं॰ ना॰ हत्ती.
करौंडी- प्रा॰ ना॰ कुर्वंडी- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ १०७.
कऱ्हें- प्रा॰ ना॰ उंट- ज्ञा॰ अ॰ ११- ओ॰ ४११.
कऱ्हेरी- प्रा॰ ना॰ चौरी धरणार- भा॰ अ॰ १२ ओ॰ ५५७.
कल- प्रा॰ वि॰ मंजूळ.
कलंक- सं॰ ना॰ दोष.
कलत्र- सं॰ ना॰ १स्त्री-२ कुटुंब दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ ४०.
कलनत्व- सं॰ ना॰ कालगति.
कलभ- सं॰ ना॰ हत्तीचा छाव.
कलभट- सं॰ अप॰ ना॰ कलहभट अथवा कलहशूर- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ३२.

कलंभा- सं॰अप॰ना॰ झगडा-ज्ञा॰ अ॰६ओ॰१६.
कलरव- सं॰ अप॰ ना॰ मंजूळशद्ब भा॰ अ॰४ ओ॰८१.
कलशश्रुति- सं॰ना॰ कुंभकर्ण.
कलशसंभव- सं॰ना॰ अगस्त्यऋषि.
कलशोद्भव- सं॰ना॰ कलशसंभव
कलहो- सं॰ अप॰ ना॰ कलह-भा॰ अ॰१ओ॰२१५.
कलाप- सं॰ना॰ मयूरपिछ समुदाय.
कलापु- सं॰अप॰ना॰ कलापअथवासमुदाय. ज्ञा॰अ॰४ ओ॰१०८.
कलितकाल- सं॰ना॰ कालनियंता.
कलिमल- सं॰ ना॰ दोष-पातक.
कलियुग- सं॰ना॰ चौकडींतीलचवथें युग.
कलुष-सं॰ना॰ पातक.
कलेवर- सं॰ ना॰ शरीर.
कल्प- सं॰ना॰ नित्यकल्पवमहाकल्प या भेदें करूनतो.
कल्पतरु- सं॰ ना॰ कल्पवृक्ष म्हणजे कल्पित पुरविणारा वृक्षतो.
कल्पितें-सं॰अप॰ना॰मन- ज्ञा॰अ॰९ओ॰९२.
कल्मष- सं॰ना॰दोष.
कल्लोळ- सं॰अप॰ना॰ कल्लोल-लाट-तरंग.
कल्हार- सं॰ना॰ कमल.
कंवटाल- प्रा॰ना॰ कृत्रिम.
कवतीक- प्रा॰ना॰ कौतुकअथवा नवल.
कवल- सं॰ना॰ ग्रास.
कवळ- सं॰अप॰ना॰१कावीळरोग-भा॰अ॰५ओ॰१७४.-२ग्रास.
कवळी- प्रा॰ना॰दंतपंक्ति.
कवि- सं॰ना॰१शुक्राचार्य-२काव्यकर्ता.
कविजा- सं॰ना॰शुक्रकन्या देवयानी.
कविलास- सं॰अप॰ना॰ कैलास.
कविहीर- सं॰ना॰ कविश्रेष्ट.
कवेश्वर- सं॰अप॰ना॰ कवीश्वर.
कव्य- सं॰ना॰ श्राध्धकर्मान्न.
कव्हाळ- प्रा॰वि॰ आकाशाहून मोठें- ज्ञा॰अ॰११ओ॰३५९.
कशा- सं॰ना॰ चाबूक अथवाकमची.
कश्मल- सं॰ना॰१ मळ-२मूर्छा
कषाय- सं॰ ना॰ १कारा-२ निदिध्यासकाळीं अन्यथा भासभासून चित्त विक्षेप होतो असें तिसरें

विभ्रतें.

**कसणें**- प्रा० धा० ना० १ बांधणें-२ कसोटीस लावणें- ३ नेसणें- दा० द० १ स० २ ओ० १७.

**कसवटी**- प्रा० ना० १ परिक्षा-२ परिक्षक- ज्ञा० अ० १ ओ० ३०७.

**कळ**- प्रा० वि० १ मंजूळ-२ ना० रग अथवा निडिक- उ० वाथे वटक वाय गोळा॥ हातीं पायीं लागती कळा॥ ३ ना० मर्म- उ० तुका म्हणे कळ॥ पायधरल्या न चले बळ॥१॥ इ०

**कळकर**- सं० अप० वि० कलहकर- दा० द० १९ स० ३ ओ० ९.

**कळंकु**- सं० अप० ना० कलंक अथवा दोष.

**कळप**- सं० अप० ना० कलाप अथवा समुदाय.

**कळस**- सं० अप० ना० १ कलश भा० अ० १४ ओ० ११- २ शेवट- उ० आतां कळस हा ग्रंथींचा॥ गोड घांस शेवटींचा॥१॥ इ०

**कळा**- सं० अप० ना० १ कला म्हणजे चंद्राचा षोडशांश- २ सोळा संख्येस संज्ञा- ३ युक्ति अथवा कौशल्य- उ० ॥ असो सकळ कळा प्रवीण॥ विद्यामात्र परिपूर्ण॥ तरीत्तें कौशल्य परिज्ञान॥ म्हणों नये॥ दा०॥

**कळातीत**- सं० अप० ना० १ परब्रह्म- २ वि० निर्गुण.

**कळानिधि**- सं० अप० ना० कलानिधि म्हणजे चंद्र.

**कळाविद**- सं० अप० वि० कुशल.

**कळासणें**- प्रा० धा० ना० १ लागणें ज्ञा० अ० ८ ओ० ११२- २ बांधणें- उ० जैसें यंत्र कळासिलें॥ तैसेंच हें गात्रीं गयीं बांधिलें॥

**कळासु**- सं० अप० ना० चातुर्य- ज्ञा० अ० १७ ओ० ८.

**कळि**- सं० अप० ना० १ कलह- दा० द० ३ स० ५ ओ० २२- २ कलियुग उ० हंस दास म्हणे कळी॥ नर तो या भूमंडळीं॥

**कळिकटा**- प्रा० वि० १ निमित्तभूत- अमृ० प्र० ६ ओ० ५- २ भांडखोर॥ उ०॥ जेथें तेथें कळिकटा॥

**कळिणें**- प्रा० धा० ना० जाणणें- ज्ञा० अ० ६ ओ० १११.

**कळिरव**- सं० अप० ना० मंजूळ शब्द- ज्ञा० अ० ११ ओ० ३३६.

# का

**का**- प्रा० अव्य० किंवा- अथवा- भा० अ० १ ओ० ३०३- दा० द० २ स० ५- ओ० २१

**काइसुख**- सं० अप० ना० शरीरसुख- ज्ञा० अ० ५ ओ० ११३.

**काई**-प्रा॰स॰ना॰ काय-२ वि॰ कसें अमृ॰प्र॰७ ओ॰६९.

**काउटी**-प्रा॰ना॰ महल-भा॰अ॰१ ओ॰३०६.

**काउरें**-प्रा॰ना॰ वेड- विवे॰पू॰प्र॰ २ओ॰१६.

**काक**-सं॰ना॰ कावळा.

**कांकड**-प्रा॰ना॰ खडा अथवा हरळ

**काकताळीन्याय**-सं॰अप॰ना॰ काकताळीयन्याय म्हणजे कावळा बसायास व फळ पडायास एकच गांठ पडते तसें एकादें कार्य सहजीं सहज होऊनजाणें त्याचें नांव.

**कांकर**-प्रा॰ना॰ कांकड अथवा खडा-भा॰अ॰१७ ओ॰५.

**काकीमुख**-सं॰ना॰ योगशास्त्रोक्त सुषुम्ना रंध्र.

**काकुस्थ**-सं॰वि॰ श्रीरामाचें विशेषण.

**काकोळ**-प्रा॰ना॰ विष.

**काग**-सं॰अप॰ना॰ कावळा.

**कागटाळीन्याय**-सं॰अप॰ना॰ काकताळीयन्याय-उ॰ पावलों हा देहे कागताळीन्यायें॥ न घडे उपायें घडों आलें

**कांचकुहिरी**-प्रा॰ना॰ ज्याच्या स्पर्शानें अंगास भारी खाज सुटते असें एक फळ आहे तें

**कांचन**-सं॰ना॰ सुवर्ण.

**काचर**-सं॰वि॰ अधीर.

**काचणी**-प्रा॰ना॰ घर्षण-भा॰ अ॰२१ ओ॰२४६

**काचरी**-प्रा॰ना॰ उसरी-अमृ॰ प्र॰६ ओ॰४८.

**काचें**-प्रा॰वि॰ कच्चें.

**काज**-सं॰अप॰ना॰ कार्य.

**कांजरा**-प्रा॰ना॰ कुचल्याचें झाड.

**कांजी**-प्रा॰ना॰ १ पेज २ धुवण उ॰ अमृत देऊन घेतलें कांजी॥ कल्पवृक्ष देऊनी आणिली भाजी॥

**कांट**-प्रा॰ना॰ मळ-भा॰अ॰११ ओ॰५९६.

**कांटाळा**-प्रा॰ना॰ बरोबरी-ज्ञा॰ अ॰८ ओ॰२६३.

**कांटाळें**-प्रा॰ना॰ १ उपमा-अमृ॰प्र॰७ ओ॰२६६. २ अव्य॰ बरोबर-ज्ञा॰अ॰१२ ओ॰१६१.

**कांटिवडें**-प्रा॰ना॰ कांटी-ज्ञा॰ अ॰१३ ओ॰६७८

**कांठफरा**-प्रा॰ना॰ मडक्याच्या त्यापासून निघालेला वाटोळा कांठ भा॰अ॰१३ ओ॰२०६.

**कांड**-सं॰ना॰ ब्रम्हांड.

**कांडें**-प्रा॰ना॰ बाण-ज्ञा॰अ॰१६ ओ॰४०३-४०४.

**कांडोळणें**-प्रा॰धा॰ना॰ खाजविणें किंवा घांसणें-दा॰द॰२स॰ १ ओ॰६९.

**काणा**-प्रा॰वि॰ अर्ध्यवर एका

क्ष अथवा तिरळा.
काणी-प्रा० ना० क्लेश-ज्ञा० अ० १८ ओ० ७६.
काणोसें-प्रा० वि० वांकडें-दा० द० ११ स० ८ ओ० २२.
कांत-सं० ना० पति-भ्रतार.
कातर-सं० वि० भित्रा-भ्याड-लं-डी.
कातरा-प्रा० ना० तिर्कसदोनओ घांचामेळ-दा० द० ११ स० ७ ओ० ३
कांता-सं० ना० स्त्री.
कांतार-सं० ना० अरण्य.
कातिया-प्रा० ना० कोपता-ज्ञा० अ० १७ ओ० ९६.
कांती-प्रा० ना० शस्त्र-भा० अ० ५ ओ० २७९.
कार्तस्वर-सं० ना० सोनें
कादाचित्कत्व-सं० ना० क्वचित पण.
कादिमांत-सं० वि० आणिना० कपासून म पर्यंत वर्ण.
काद्रवेय-सं० ना० सर्प.
कानकोंडें-प्रा० वि० चोरटें-दा० द० ३ स० ३ ओ० ५५-वाक्य० ओ० ११०१
कानटें-प्रा० ना० एक जंतु दा० द० १ स० १० ओ० ५५.
कानडें-प्रा० वि० १ दुर्बोध-२ अव घड किंवा कठीण-ज्ञा० अ० ९ ओ० ४२-ज्ञा० अ० १२ ओ० ३१। दा० द० ५ स० १ ओ० २.
कानन-सं० ना० अरण्य.
कानवडें-प्रा० वि० एकांगावरलें-दा० द० १८ स० ९ ओ० ७.
कानवेन्ही-प्रा० ना० अनर्थशद्बप रिणाम-ज्ञा० अ० ९ ओ० १८२.
कानाडी-प्रा० ना० आकर्ण-धनुष्य दोरी.
कानी-प्रा० ना० दांवें-काढाडणीं
कान्ही-प्रा० ना० १ कनी अथवा दांवें-ज्ञा० अ० १४ ओ० १५८-२ शेत धान्यफलकरणें-भा० अ० १० ओ० ५०९.
कांपा-प्रा० संबो० कांबापा-२ अ व्य० कां अथवा कशाकरितां
कार्पास-सं० ना० कापूस.
काबाड-प्रा० ना० निकणओझें उ० काबाडी वाहाती काबाड॥ श्रेष्ट भोगिती रत्नें जोड॥
-कांबी-प्रा० ना० धनुष्य दंड-ऊ० पदीं राघवाचे सदां ब्रीद गाजे॥ बळें भक्तरीपुशिरीं कांबिवाजे-इ०
काम-सं० ना० १ मदन-२ इच्छा.
कामठ-प्रा० ना० दुकान.
कामठा-प्रा० ना० टांकसाळा-ज्ञा० अ० १५ ओ० ४७९-४८०
कामथाडोळ-प्रा० ना० अंडुकली अ० बुल्ली-भा० अ० १४ ओ० ३८२
कामदेव-सं० ना० मदन.

**कामधेनु**- सं० ना० इच्छितपुरवणारी स्वर्गधेनु.

**कामना**- सं० ना० इच्छा.

**कामविणें**- प्रा० धा० ना० १ राहाटणें संपादणें- ज्ञा० अ० १८ ओ० ४२१ - २ सिध करणें- पूर्णकरणें- भा० अ० ११ ओ० २६०.

**कामसदन**- सं० ना० उपस्थ.

**कामाण**- प्रा० ना० धनुष्य- भा० अ० १२ ओ० १५२.

**कामांतक**- सं० ना० मदनांतक म्हणजे शिव.

**कामारि**- सं० ना० मदनारि म्हणजे शिव.

**कामारें**- प्रा० ना० सेवक- विवे० उ० प्र० ११ ओ० ११६ - भा० अ० ७ ओ० १११

**कामिणी**- प्रा० ना० पिवळें सारें दिसतें तो कावीळ रोग.

**कामिनी**- सं० ना० स्त्री.

**कामुक**- सं० वि० सकाम.

**कार्मुक**- सं० ना० धनुष्य.

**काम्य**- सं० वि० कामनीक अथवा सकाम.

**काय**- सं० ना० शरीर अथवा देह.

**कायटी**- प्रा० ना० घालमेल- अमृ० प्र० ७ ओ० १८२.

**कार्य**- सं० ना० १ संपूर्ण पदार्थ जाततें- २ काम.

**कार्यानुमेय**- सं० वि० कार्यावरून अनुमान करण्यास योग्य.

**कारण**- सं० ना० १ निमित्त २ हेतु ३ प्रयोजन ४ तिसरा देह.

**कारणदेह**- सं० ना० तिसरा पिंडींचा देह म्हणजे अज्ञानदेह.

**कारा**- सं० ना० बंदीशाळा.

**कारागृह**- सं० ना० बंदीशाळा.

**कारुण्य**- सं० ना० करुणा अथवा दया.

**कारुष्य**- सं० ना० कृशता- ज्ञा० अ० १३ ओ० ५१६ - ५१७.

**कालकूट**- सं० ना० विष.

**कालपरिछेदरहित**- सं० वि० अमुक काळीं असणें व अमुक काळीं नसणें असा ज्या परब्रम्ह वस्तूस कालाचा परिछेद नाहीं त्याचें नांव.

**कालवा**- प्रा० ना० नदीचा सोगपाट तो.

**कालाबूल**- प्रा० वि० कासाविस ज्ञा० अ० १६ ओ० १४१.

**कालाभूल**- प्रा० वि० कालाबूल.

**कालिंदी**- सं० ना० यमुना.

**कावर**- सं० ना० गुदस्थानीं बांध लावून प्राण ज्याचें कर्म सोसण्या स्थांत आहे त्याचें नांव.

**कावरू**- सं० अ० ना० कावर - ज्ञा० अ० १८ ओ० १०२६.

**कावरूख**- प्रा० ना० [illegible]

झाड किंवा जाळ्या वाढतात त्याचें नांव- भा० अ० २३ ओ० ३३.
कावरुखें- प्रा० ना० कर्मजन्यस्थान- ज्ञा० अ० १५ ओ० ५२.
कावरें- प्रा० वि० भ्रमिष्ट- ज्ञा० अ० १५ ओ० १०९.
काविरें- प्रा० ना० वेड अथवा भ्रम दा० द० २ स० ६ ओ० ५.
काव्य- सं० ना० १ शुक्राचार्य- २ कविता.
काव्यसुता- सं० ना० देवयानी.
काशा- प्रा० ना० शेतांत कासरूप गवतें तें- भा० अ० ३१ ओ० ३९२.
काश्मिर- सं० ना० १ पाषाणाचीजाती- २ एकदेश आहे- दा० द० ११ स० ५ ओ० २.
काष्ठा- सं० ना० दिशा.
कास- सं० ना० खोकला.
कास- सं० अप० ना० १ कच्छ- २ आश्रय.
कासर- सं० ना० रेडा.
कासाकुळी- प्रा० ना० कासावि- शी.
कासार- सं० ना० सरोवर.
कासिया- प्रा० ना० काशा शद्बपाहा.
कास्मिरी- प्रा० ना० वाक्चापल्य ज्ञा० अ० १३ ओ० ३१९.
काहणी- प्रा० ना० १ गोष्ट- २ फोल- दा० द० ३ स० २ ओ० ४०.
काहळ- प्रा० ना० चर्म वाद्यविशेष.
काह्याचें- प्रा० स० ना० कशाचें
काळफोड- प्रा० ना० स्वनेत्रास दृश्य नव्हे असा पाठीवरला फोड तो. दा० द० ३ स० ६ ओ० १७.
काळवखें- प्रा० ना० १ अंधारें- अमृ० प्र० २ ओ० १०- २ आळस- ज्ञा० अ० १२ ओ० ४१.
काळा- प्रा० ना० १ काळ अथवा विलंब- ज्ञा० अ० ५ ओ० १६६. २ वि० कृष्णवर्ण.
काळियाना- सं० अप० ना० कृष्णसर्प- भा० अ० ५ ओ० १००

## कि

किंकर- सं० ना० सेवक.
किंचिज्ञ- सं० वि० १ अल्पज्ञानी -२ ना० जीव.
किडाळ- प्रा० वि० खोटें- लटकें.
किणें- प्रा० ना० घट्टा- वण.
किण्हें- प्रा० ना० किणें.
कित- प्रा० ना० १ विपरीतभावना- दा० द० १ स० १ ओ० १२- २ कंटाळा- दा० द० ३ स० ५ ओ० १७.
कितव- सं० वि० १ दुष्ट- २ द्युतका

र.
किंदेव- सं० ना० देवासारखे मनुष्य ते-भा० अ०१४ ओ०५१.
किन्नर- सं० ना० मानवजातीअस्व ल-भा० अ०१४ ओ० ४९.
किंपुरुष- सं० ना० मानवजातीवान र-भा० अ०१४ ओ०५०.
किंबुध- सं० वि० मूर्ख.
किरकणें- प्रा० धा० ना० त्रासणें-दा द०१४ स० २ ओ०१०
किरळी- प्रा० ना० कीळ.
किराण- प्रा० ना० उड्डान.
किरी- सं० ना० डुकर.
किरीटी- सं० ना० अर्जून
किरु- प्रा० अव्य० निश्चयें करून.
किल्हाण- प्रा० ना० उड्डान.
किंशुक- प्रा० ना० पळसाचें झाड
किशोर- सं० ना० बालक.

## की.

कीं- प्रा० अव्य० किंवा-अथवा- भा० अ०१ ओ०३७.
कीट- प्रा० ना० १ हिणकरसोनें-२ मळ-ज्ञा० अ०१३ ओ०१०३८.
कीर- सं० ना० किडा.
कीड- प्रा० ना० खोटेपण अथवा हिणकसपण- ज्ञा० अ०१८ ओ०१२१ भा० अ०१० ओ०६३-२ वि० खोटें अथवा हिणकट.
कीर्तनभक्ति- सं० ना० उपास नामार्गातील नवविधभक्ति रूप साधनाचें दुसरें अंग.
कीर- प्रा० ना० १ रावा- २ अव्य० निश्चयात्मक-अमृ० प्र० ६ ओ०१९.
कीरु- प्रा० अव्य० निश्चयें करून.
कीश- सं० ना० वानर.
कीळ- प्रा० ना० प्रभा- दा० द०१ स०२ ओ०१४.

## कु.

कु- सं० ना० १ पृथ्वी- २ अव्य० वाईट.
कुकरणें- प्रा० धा० ना० निंदा करणें.
कुक्कुर- सं० ना० कुत्रा.
कुच- सं० ना० स्तन.
कुचर- प्रा० ना० अंगराखू.
कुचंबणें प्रा० धा० ना० संकोचणें -चुरउणें-
कुच्या- सं० ना० अंगांतील शिरा.
कुज- सं० ना० मंगळ.
कुंजर- सं० ना० हत्ती.
कुंजरी- सं० अप० ना० ज्यांत हत्ती असतात अशी सेना.

कुंजरू- सं० अप० ना० कुंजर
कुटज- सं० ना० कुड्याचें झाड
कुटाकुटी- प्रा० ना० १ महामारी-भ्र य-दा० द०१स०१ ओ०५
कुटिल- सं० वि० १ वक्र-२ दुष्ट.
कुटिलाल- सं०अप० ना० कुरळ केंस.
कुटी- प्रा० ना० आळ अथवा आ रोप-विवे० पू० प्र०७ ओ०५-अमृ० प्र०७ ओ०१०५.
कुंटीण- प्रा० ना० वेश्या-२ कुंटण
कुटीळ- प्रा० वि० कुटाळ.
कुटें- प्रा० वि० लंगडें-ज्ञा० अ० १३ ओ० १०७१.
कुंटें- प्रा० वि० कुबडें.
कुठें- प्रा० वि० मनांत कुडकुडणा रें-दा० द० २ स० ३ ओ० २३.
कुडकुडणें- प्रा० धा० ना० कष्टी होणें
कुडमुळी- प्रा० ना० कमळ-ज्ञा० अ० १५ ओ० ३.
कुडावा- प्रा० ना० रक्षण- उ० ॥ क रीं संकटीं सेवकाचा कुडावा ॥ प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥
कुडी- प्रा० ना० शरीर-दा० द० १५ स० १ ओ० १०.
कुडें- प्रा० वि० १ वाईट- ज्ञा० अ० २ ओ० २५० - २ व्यर्थ- रुक्मि० अ० ११ ओ० ३.
कुणप- सं० अप० ना० कुणप अथ वा प्रेत.
कुंत- सं० ना० भाला.
कुंतल- सं० ना० केश.
कुंती- सं० ना० १ भाला धरणारा -२ पांडव माता.
कुत्सा- सं० ना० निंदा.
कुधर- सं० ना० पर्वत.
कुब्ज- सं० वि० कुबडें.
कुंभ- सं० ना० घट अथवा घागर.
कुंभक- सं० ना० प्राणायाम सम यीं पूरक होऊन जों पर्यंत रेचक झा ला नाहीं तो पर्यंत जीप्राण वायूची स्थिरताती.
कुंभपाक- सं० ना० एक नरका चें नाव.
कुंभसंभव- सं० ना० अगस्त्य ऋषि.
कुंभिनी- सं० ना० पृथ्वी.
कुंभिनीपाल- सं० ना० राजा अ थवा भूपाळ.
कुमर- सं० अप० ना० कुमार.
कुमार- सं० ना० पुत्र.
कुमारी- सं० ना० कन्या.
कुमुद- सं० ना० चंद्रविकासी कम ल.
कुरंग- सं० ना० हरिण.
कुरठा- प्रा० ना० घरटें.
कुरर- सं० ना० १ टिटवापक्षी-२ हरिण.

कुऱ्हाडा- प्रा॰ ना॰ परसु अथवा फर शासमक शस्त्र.
कुऱ्हें- प्रा॰ वि॰ कुवडें.
कुल- प्रा॰ ना॰ अर्थज्ञान- दा॰ द॰ १८ स॰ ५ ओ॰ ५.
कुलटा- सं॰ वि॰ व्यभिचारिणी.
कुलिश- सं॰ ना॰ वज्र.
कुलाळ- सं॰ अप॰ ना॰ कुलालम्हणजे कुंभार.
कुवलय- सं॰ ना॰ १ कमल- २ भूमंडळ.
कुवसा- प्रा॰ ना॰ १ आश्रय- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १२५. २ वि॰ साह्य- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ १७८.
कुवाड- प्रा॰ ना॰ कोडें अथवा कूट- विवे॰ पू॰ प्र॰ २ ओ॰ ३९.
कुवाडें- प्रा॰ ना॰ १ कोडें- दा॰ द॰ ७ स॰ ३ ओ॰ १३- २ अवघड- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ४२.
कुर्वंडी- प्रा॰ ना॰ ओंवाळणें अथवा ओंवाळा.
कुश- सं॰ ना॰ दर्भ
कुशस्थळी- सं॰ ना॰ द्वारका.
कुशी निघणें- प्रा॰ धा॰ ना॰ मनांत येणें.
कुश्चिळ- प्रा॰ वि॰ घाणेरें.
कुष्ट- सं॰ ना॰ कोड रोग.
कुसमूस- प्रा॰ ना॰ कुरकूर.
कुसमुसमोड- प्रा॰ ना॰ कासाविशी- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १८८.
कुसरी- प्रा॰ ना॰ चातुर्य- दा॰ द॰ १ स॰ २ ओ॰ २१- भा॰ अ॰ १ ओ॰ २५- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ८.
कुसुम- सं॰ ना॰ फूल.
कुसुमचाप- सं॰ ना॰ मदन.
कुसुमशर- सं॰ ना॰ मदन.
कुहर- सं॰ ना॰ गुहा- भा॰ अ॰ ७ ओ॰ १४६.
कुहरी- सं॰ ना॰ दरकुटी- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १२५.
कुहा- सं॰ अप॰ ना॰ कूप- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ६७७.
कुहार- सं॰ ना॰ कोंगर- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ११५.
कुहिट- प्रा॰ वि॰ नासकें- दा॰ द॰ १ स॰ ९ ओ॰ १७.
कुह्मिजक- प्रा॰ वि॰ कुजट- भा॰ अ॰ १३ ओ॰ ७७०
कुहु- सं॰ ना॰ आमावास्या.
कुळकणी- प्रा॰ ना॰ चातुर्य.
कुळक्रमु- सं॰ अप॰ ना॰ कुलकर्मांचा प्रवर्तक पुरुष- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २७७.
कुळवाड- प्रा॰ ना॰ उदीम- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५६५.
कुळवाडी- प्रा॰ ना॰ १ उदीम करणारा- २ षड्रिपु संज्ञा.
कुळीक- प्रा॰ ना॰ मोउशी- दा॰ द॰

२स०६ओ०२५.
कुक्षा-सं०ना०दरी.
कूट-सं०ना० १देह-२ निंदा.
कूटस्थ-सं०ना० देहस्थ प्रत्यगात्मा
कूप-सं०ना० आड.
कूर्पर-सं०ना० कोंपर.
कूर्म-सं०ना० कांसव-२ उन्मीलन कर्त्तापंच उपप्राणांतीलशरीरस्थदुसरा वायु.

## कृ.

कृकल-सं०ना० १सरज-२क्षुधा उत्पन्न कर्त्ता पंच उप प्राणांतील तिस रावायु.
कृछ्र-सं०ना० कष्टरूपतप अथवा प्रायश्चित.
कृतघ्न-सं०वि० उपकार न जाण णारा.
कृतयुग-सं०ना० चौकडींतील प हिलें युग म्हणजे सत्ययुग.
कृतज्ञ-सं०वि० उपकार जाणणारा.
कृतांत-सं०ना० काळ अथवा यम.
कृतांतभगिनी-सं०ना० यमुना.
कृती-सं०वि० कुशल.
कृत्रिम-सं०ना० कपट.
कृत्या-सं०ना० राक्षसी.
कृपानिधि-सं०ना० श्रीगुरु.
कृशान-सं०ना० अग्नि.
कृषि-सं०ना० शेतकी.
कृषिवळ-सं० अप०ना० शेतकरी.
कृष्ण-सं०ना० १ विष्णूचा आठवा अवतार-२अर्जुन-३वि०काळे-४ ना०तमोगुण-५माया.
कृष्णद्वैपायन-सं०ना० व्यासक ल्पामध्यें या नावाचा व्यास होऊन गेला तो.
कृष्णसखा-सं०ना० अर्जुन.
कृष्णा-सं०ना० १ द्रौपदी-२ एक महानदी आहे.

## के-कै.

के-प्रा०क्रि०अव्य० कोठे-ज्ञा०अ० १० ओ० १३-अमृ०प्र०२ओ०२७.
केकी-सं०ना० मयूर.
केणी-प्रा०ना० १ जिन्नस-२वि कत घेतलेला जिन्नस. ज्ञा०अ०६ ओ०३४१-ज्ञा०अ०९ओ०४७१.
केणें-प्रा०ना० जिन्नस-रुक्मि० अ०३ओ०१७.
केतु-सं०ना० १ध्वज-२राहुना मक ग्रहाचें कबंध.
केदार-सं०ना० शेत अथवा म ळा.
केन-सं०ना० सामवेदांतील एका शाखेचें उपनिषत्.

केयूरादि- सं॰ना॰ मुकुटकुंडलादि क.
केलवली- प्रा॰ना॰ सती निघणारी स्त्री अथवा सती-ज्ञा॰अ॰१३ ओ॰५५
केली- सं॰ना॰ क्रीडा.
केवा- प्रा॰ना॰ पाड अथवा थोरी- भा॰अ॰४ ओ॰१२३.उ॰ पुढें मानवा किंकरा कोण केवा॥प्रभाते मनीं राम- चिंतीत जावा.
केविलवाणें- प्रा॰वि॰ दीनवाणें दा॰द॰३ स॰२ ओ॰१४.
केसर- सं॰ना॰ कमलतंतु.
केसरी- सं॰ना॰ केशरी-सिंह.
केळी- सं॰अप॰ना॰ केली अथवा क्रीडा.
कैटभारि- सं॰ना॰ श्रीविष्णु.
कैपक्ष- प्रा॰ना॰ कैंवार- कैंवारी-दा॰द॰२ स॰८ ओ॰१४-ज्ञा॰अ॰९ ओ॰१६८.
कैपक्षी- प्रा॰ना॰ कैंवारी-दा॰द॰४ स॰८ ओ॰२७.
कैफक- प्रा॰वि॰ भ्रमकारक-ज्ञा॰अ॰१७ ओ॰२५.
कैरव- सं॰ना॰ कमल.
कैरवपति- सं॰ना॰ चंद्र.
कैरवलोचन- सं॰ना॰ शिव.
कैरें- प्रा॰वि॰ तिरळें.
कैलास- सं॰ना॰ ब्रम्हसृष्टीबाहेर असें व माया आवरणा मध्यें शिवाचें स्वेच्छा निर्मित वास्तव्य स्थान आहे तें.
कैवल्य- सं॰ना॰ मोक्ष- निर्गुण सायुज्य.
कैंवाड- प्रा॰ना॰ नानाप्रकार-दा॰द॰३ स॰९ ओ॰११.

## को-कों.

कोक- सं॰ना॰ चक्रवाकपक्षी.
कोकशास्त्र- सं॰ना॰ स्त्रीकामविषयशास्त्र.
कोड- प्रा॰ना॰ १ कौतुक- विवे॰ पू॰प्र॰१ ओ॰२६.-२ इच्छा अथवा आवड-३ एक रोग आहे.
कोडी- प्रा॰वि॰१ कोटी संख्या-२ कोड ज्यास रोग आहे तो.
कोडें- प्रा॰ना॰ कौतुक-नवल-ज्ञा॰अ॰७ ओ॰२२.
कोणप- सं॰ना॰ राक्षस.
कोल- प्रा॰ना॰ भाल्याचें लोखंडी अग्रफळ तें-ज्ञा॰अ॰१३ ओ॰५३८। ५३९.
कोथळा- प्रा॰ना॰ पोट कोश-भा॰अ॰१३ ओ॰२५०
कोदंड- सं॰ना॰ धनुष्य.
कोंदणें- प्रा॰धा॰ना॰ एका मागें एक भरणें.

कोंदाटणें- प्रा० धा० ना० घनदाट भरूनराहाणें.
कोपट- प्रा० ना० १ घर- अमृ० प्र० ५ ओ० ४- २ शरीर- ज्ञा० अ० १४ ओ० २१०
कोंबारा- प्रा० ना० कोंभ.
कोंभ- प्रा० ना० अंकुर.
कोयाळ- सं० अप० ना० कोकिल.
कोरान्न- सं० ना० कोरडें अन्न अशी भिक्षा.
कोराळें- प्रा० ना० डोंगरी कोरींवले णें- २ कडा- ज्ञा० अ० १६ ओ० ११६.
कोलदंडा- प्रा० ना० पायांत हात अडकवून बांधून गुडघ्यांत दांडा घालणें तो.
कोलित कांकण- प्रा० ना० अलात चक्र- भा० अ० १३ ओ० २५०.
कोलिता- प्रा० ना० रक्षणकर्ता- ज्ञा० अ० १८ ओ० ७९०.
कोल्हेरी- प्रा० ना० सोंग- ज्ञा० अ० ९ ओ० १७३ अमृ० प्र० ७ ओ० ४.
कोल्हेरी वेताळ- प्रा० ना० तृणपुतळा- शेतबुजवणा- ज्ञा० अ० ११ ओ० ४६६-४६७.
कोवसा- प्रा० ना० आश्रय अथवा आधार- भा० अ० २ ओ० ७४- दा० द० २ स० ७ ओ० ४.
कोवळणें- प्रा० धा० ना० आलिंगणें
कोश- सं० ना० १ दिव्य अथवा शपथ- ज्ञा० अ० १३ ओ० ६०४- २ भांडार ३ आवरण.
कोष्ठ- सं० ना० कोठा.
कोसला- प्रा० ना० आपणाभोंवतें घर करून आंत कोंडून घेऊन मरतो असा किडा- दा० द० ९ स० ७ ओ० ४.
कोसळणें- प्रा० धा० ना० १ घसरणें अथवा पडणें- २ प्रतिकूळ होणें- दा० द० १४ स० ६ ओ० १५.
कोळें- प्रा० ना० तिळाचें झाड- ज्ञा० अ० १३ ओ० ५८५.
कौतुक- सं० ना० नवल- मोज- दा० द० २ स० ६ ओ० २२.
कौतुहल- सं० ना० कौतुक- भा० अ० १५ ओ० १५९.
कौपीन- सं० ना० लंगोटी.
कौलागम- सं० ना० मंत्र शास्त्र.
कौलिक- सं० ना० मांत्रिक.
कौलिकमार्ग- सं० ना० वैदीक व तांत्रिक मिश्र क्रियाअसा मार्ग.
कौशिक- सं० ना० १ विश्वामित्र ऋषि- २ घुबड.
कौशेय- सं० वि० रेशमी.
कौळिक- प्रा० ना० किरात म्हणजे कोळी अथवा भिल्ल- भा० अ० १ ओ० ५२.
क्रतु- सं० ना० यज्ञ.
क्रमेलक- सं० ना० उंट.
क्रव्याद- सं० ना० मांसभक्षक जीव.

क्रांत- सं॰ वि॰ व्याकुल.
क्रांतदर्शि- सं॰ ना॰ ज्ञानी-पारदर्शी
क्रिमी- सं॰ अप॰ ना॰ कृमी अथवा किडा.
क्रियमाण- सं॰ ना॰ प्रारब्ध कर्मभो गीतअसतां होतें जेशुभाशुभकर्मतें.
क्रिया- सं॰ ना॰ १ प्राणमयकोश- २ कृती.
क्रियाशक्ति- सं॰ ना॰ कर्मेंद्रियें
क्रोड- सं॰ ना॰ वराह.
क्रोष्ठा- सं॰ ना॰ कोल्हा.
क्लीब- सं॰ ना॰ नपुंसक.
क्वारी- सं॰ अप॰ ना॰ कुमारी-भा॰ अ॰ ११ ओ॰ २३०.

# ख

ख- सं॰ ना॰ १ आकाश-२ शून्य.
खग- सं॰ ना॰ १सूर्य-२ पक्षी.
खंग- प्रा॰ ना॰ न्यूनता-ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ११०.
खंगणें- प्रा॰ धा॰ ना॰ अशक्त होणें अथवा थकणें-दा॰ द॰ ३ स॰ ३ ओ॰ २०
खगगमन- सं॰ ना॰ गरुड वाहन अथवा विष्णु.
खगा- प्रा॰ ना॰ पाऊस-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५८३.
खंगु- प्रा॰ ना॰ खंग.

खगेंद्र- सं॰ ना॰ गरुड.
खगेश्वर- सं॰ ना॰ गरुड.
खग- सं॰ अप॰ ना॰ खड्ग अथवा तरवार.
खच- प्रा॰ ना॰ रूप.
खचर- सं॰ ना॰ राक्षस- पिशाच.
खंजनाक्षी- सं॰ वि॰ खंजन प- क्षाचे नेत्रासारखे जिचे नेत्र ती- स्त्री.
खट- प्रा॰ वि॰ खोटें- भा॰ अ॰ २० ओ॰ १८१.
खटखट- प्रा॰ ना॰ किरकार
खटनट- सं॰ अप॰ वि॰ शठ आणि नष्ट.
खटपट- प्रा॰ ना॰ १ मेहनत-२ त कट-दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ७
खट्वांग- सं॰ ना॰ खंडा नामक दु धारी तरवार.
खडकुती- प्रा॰ ना॰ सूर्याच्या ख डतर तापानें शेतजळून जाणें ती- दा॰ द॰ ३ स॰ ७ ओ॰ ४२.
खंडणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ मोडणें अथवा तोडणें.
खडतर- प्रा॰ वि॰ उग्र-तीव्र.
खडतरणें- प्रा॰ धा॰ ना॰ खोंचणें -आदळणें.
खडवा- प्रा॰ ना॰ पर्वत.
खंडज्ञान- सं॰ ना॰ १ नाशिवंतपदा र्थाचें ज्ञान-२ देवनिराळा व भक्त नि

गाळा असें ज्ञान तें.
खंडा- सं० अप० ना० दुधारी तरवार
खडाष्टक- प्रा० ना० पोटांत विष्टाख ड्या सारखी होऊन शौच समयीं दुःख होतें त्याचें नांव. दा० द० ३ स० ६ ओ० २९.
खडाण- प्रा० ना० अल्प दुधीला- थाळ गाय.
खडु- प्रा० वि० गढूळ.
खडुला- प्रा० ना० खडक अथवा प र्वत- ज्ञा० अ० ११ ओ० ५३९-५४०.
खड्ग- सं० ना० तरवार.
खणुवाळ- प्रा० वि० १ खरबुडीत ज्ञा० अ० १५ ओ० १६५- २ कठिण ज्ञा० अ० १८ ओ० १८६.
खत- प्रा० ना० कागद- रोखा.
खती- सं० अप० ना० खेद.
खतले- प्रा० वि० धरणधेऊ.
खंदस्ती- प्रा० वि० खंदा अथवा दां डगा- डाबराखू.
खदिरांगार- सं० ना० खैराचे निखा रे.
खदिरसार- सं० ना० काथ.
खद्योत- सं० ना० काजवा.
खनाळ- प्रा० ना० निर्जन स्थळ- एकांत स्थळ- दा० द० १५ स० २ ओ० २३
खपुष्प- सं० ना० आकाशपुष्प.
खबाड- सं० ना० लहान पाणथंकें दा० द० १८ स० ९ ओ० १०
खंबीर- प्रा० ना० आश्रय- दा० द० २० स० ७ ओ० १८. बळकट.
खर- सं० ना० गाढव.
खरपूस- प्रा० वि० चमचमीत- खणकें-
खरांटें- प्रा० ना० गुराच्या पायानें झालेला निखल- ज्ञा० अ० ५ ओ० ११२.
खरीप- प्रा० ना० पडीत भूमीची सुं धि- ज्ञा० अ० ६ ओ० ४९०.
खरु- सं० अप० ना० खर अथवा गाढव.
खरें- प्रा० ना० जीभ कांटे- दा० द० ३ स० ६ ओ० ३२.
खल- सं० वि० दुष्ट.
खल- प्रा० ना० घोंटणी- वाक्य० ओ० ५२८१.
खलक- हिं० ना० लोक- दा० द० १९ स० ९ ओ० १८
खवण- सं० अप० ना० आकाश- अमृ० प्र० ६ ओ० ५९. पडशब्द.
खवणी- प्रा० ना० माकड- ज्ञा० अ० ४ ओ० २४.
खळगें- प्रा० वि० लहान.
खळी- प्रा० ना० तुरटी- दा० द० १९ स० १ ओ० १५.
खळें- प्रा० ना० झोंबी- ज्ञा० अ० ११ ओ० ४०५.

## खा.

खाकर-प्रा० वि० नवा टवटवीत असतां जो पालवी झडलेला असा वृक्ष होतो तो-भा० अ० १२ ओ० ३.

खांकरा-प्रा० वि० घोड्यास चालशिकविण्याचा खुळ खुळा- भा० अ० २० ओ० २१४.

खांकरेजणें-प्रा० धा० ना० उद्भवणें-ज्ञा० अ० १५ ओ० १५९.

खांकरा-प्रा० वि० अनधिकारी. ज्ञा० अ० १७ ओ० १३.

खाकावणें-प्रा० धा० ना० गर्जणें भा० अ० ३० ओ० ५८.

खागें-प्रा० ना० चंद्र सूर्याभोंवतें होतें तें खळें. ज्ञा० अ० ९ ओ० ४७०-ज्ञा० अ० १४ ओ० २५५.

खांन्चु-प्रा० ना० मत खंडन. ज्ञा० अ० १३ ओ० १०५१.

खान्चें-प्रा० वि० कनिष्ट- दडपलेलें ज्ञा० अ० ९ ओ० ३२६.

खांजणीभांजणी-प्रा० ना० क्षयवृद्धि-दा० द० १५ स० ४ ओ० १८.

खाजुगें-प्रा० ना० खाजें-भक्ष्य.

खाजें-प्रा० ना० खाणें.

खांड-प्रा० ना० दाटी-भा० अ० ५ ओ० १२३.

खांडा-प्रा० ना० खंडा-शब्दपाहा.

खाडाण-प्रा० ना० खडाण शब्दपाहा.

खाणीव-प्रा० वि० खणिलेलें- कल्पि अ० १४ ओ० १०४.

खाणोरी-प्रा० वि० १ खादाड-२ कांळीजखाऊ- दा० द० २ स० ३ ओ० ३१.

खालवड- प्रा० ना० १ उकरडा २ वि० दुर्गंध.

खादणें- प्रा० धा० ना० खाणें.

खाद्य- सं० ना० अग्नि- उदक आणि लवण यांवांचून सिध्ध जे खाण्याचे पदार्थ ते.

खानोरी- प्रा० वि० खाणोरी शब्द पाहा.

खापर- सं० अप० ना० कपाळ- मस्तकांतील कमळ.

खांबसूत्र- प्रा० ना० कळसूत्री बाहुलें- भा० अ० ४ ओ० १३.

खांबा-प्रा० ना० अंकुर- ज्ञा० अ० १५ ओ० १५९.

खाल- हिंदु० ना० अंगचें कातडें- दा० द० ३ स० ७ ओ० ७३.

खाला- प्रा० ना० बाहुली- ज्ञा० अ० ११ ओ० ४६५-४६६.

खालावणें- प्रा० धा० ना० कनिष्ट दशा पावणें.

## खि-खी.

खिचट- प्रा० ना० मिसळ- ज्ञा० अ० १४ ओ० २७४.

खिचा- प्रा॰ ना॰ प्रळय- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३९३.
खिजणें- प्रा॰ धा॰ ना॰ रुसणें- दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ ४८.
खितपणें- प्रा॰ धा॰ ना॰ झिजणी स लागणें.
खिरडणें- प्रा॰ धा॰ मागें सरणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ २१६.
खिल्लार- प्रा॰ ना॰ पशुसमुदाय.
खीच- प्रा॰ ना॰ खिचडी- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १४४.

## खु-खू.

खुंटणें- प्रा॰ धा॰ ना॰ संपणें- अड णें.
खुडमुळी- प्रा॰ ना॰ कमळ- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ३.
खुडीव- प्रा॰ वि॰ खुडलेलें- रुक्मि॰ अ॰ १९ ओ॰ १०४.
खुडुकणें- प्रा॰ धा॰ ना॰ अडकणें- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १४७.
खुतखावीण- प्रा॰ ना॰ यजमानी ण- स्वामीण- रुक्मि॰ अ॰ १४ ओ॰ १०१
खुंतणें- प्रा॰ धा॰ ना॰ ध्यान धरणें ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ६५४.
खुर्द- सं॰ वि॰ लहान अथवा अ सें.
खुरी- प्रा॰ ना॰ गुराचा अस्वरम्ह णजे बसण्याची जागा- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५५८.
खुळें- प्रा॰ वि॰ १ वेडें- २ लंगडें- दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ४०.

## खे-खै.

खेचर- सं॰ ना॰ १ योगी- २ पक्ष्या दिक गगन संचारी ते.
खेचरी- सं॰ ना॰ १ राक्षसी- २ धा रणा प्रकरणीं मुद्रेचें नांव.
खेचरीमुद्रा- सं॰ ना॰ भ्रूमध्या वरून दृष्टी नेऊन अंतराळीं अवलो कन करणें अशी धारणा प्रकरणीं प हिली मुद्रा ती.
खेचरु- सं॰ अप॰ वि॰ १ अदृश्य- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ९९. २ ना॰ देवता भा॰ अ॰ ७ ओ॰ २०७.
खेटा- प्रा॰ ना॰ फेरा- दा॰ द॰ १३ स॰ ९ ओ॰ ११.
खेडकुली- प्रा॰ ना॰ उपवन- भा॰ अ॰ ७ ओ॰ ५६३.
खेव- प्रा॰ ना॰ १ आलिंगन- अ मृ॰ म॰ ६ ओ॰ ८६- भा॰ अ॰ १ ओ॰ २७२- २ अपाय- दा॰ द॰ ६ स॰ ६ ओ॰ ३२- ३ अव्य॰ लक्षणींच- अमृ॰ म॰ १ ओ॰ ६२.

खेवण- प्रा० ना० भूषण- ज्ञा० अ० १३ ओ० १९५- ज्ञा० अ० १ ओ० ५.
खेवणी- प्रा० वि० जडीत- ज्ञा० अ० ११ ओ० १३३.
खेवों- प्रा० क्रि० अव्य० खेव म्हणतां तत्क्षणींच- ज्ञा० अ० १० ओ० ११६-११८
खेवंगी- प्रा० वि० यथास्थित अथवा बळकट. ज्ञा० अ० १३ ओ० १०७.

## खो-खो.

खो- सं० अप० ना० क्षय-
खोकरणें- प्रा० धा० ना० क्षयपावणें -फुटणें.
खोकरें- प्रा० वि० फुटकें- ज्ञा० अ० ८ ओ० १५.
खोंचणें- प्रा० धा० ना० भोसकणें- बरमणें-
खोटी- प्रा० ना० लगड- गोळा- ज्ञा० अ० १६ ओ० २१५.
खोटु- प्रा० ना० खोटी.
खोप- प्रा० ना० पोट- ज्ञा० अ० ९ ओ० १०३.
खोबळें- प्रा० ना० बुजिवण- प्रा० अ० ८ ओ० २३३.
खोमण- प्रा० ना० वक्रता- ज्ञा० अ० १३ ओ० ९११.
खोलणीयें- प्रा० अव्य० गमनयोग्य ज्ञा० अ० ९ ओ० ३२६.
खोलणें- प्रा० धा० ना० उघडणें.
खोल्लता- प्रा० ना० दिवट्या अथवा मशालची. ज्ञा० अ० १३ ओ० ४१७-४१८.
खोलिजणें- प्रा० धा० ना० चालणें ज्ञा० अ० १२ ओ० ७१.
खोळ- प्रा० ना० पोट- ज्ञा० अ० ११ ओ० २५८.

## ग.

गगन- सं० ना० आकाश.
गगनग- सं० ना० आकाश संचारकर्ते.
गगनोळ- सं० अप० ना० आकाशपुष्प- ज्ञा० अ० १६ ओ० ३६२-३६३. अमृ० प्र० ७ ओ० ८२.
गंगावती- सं० ना० वनस्पती- ज्ञा० अ० ९ ओ० १४.
गच गच- प्रा० ना० दिलाई.
गज- सं० ना० हत्ती-
गजकर्ण- सं० ना० १ गणपती-२ ल्यारोग.
गजगमा- सं० वि० गजगामिनीस्त्री.
गजघंट- सं० ना० गजसमुदाय.
गजपति- सं० ना० हतीवरील अधिकारी.

गजपूर-सं॰ना॰ हस्तनापुर.
गंठीसोड-प्रा॰ना॰ भामट्या-उचल्या. दा॰द॰२ स॰७ ओ॰५०.
गंड-प्रा॰ना॰ गर्व-ताग-अभिमान.
गंडकी-सं॰ना॰ कसवटीशिळाअथवा कसोटी.
गडद-सं॰ना॰ १ अंधःकार-२ कि॰ निबिड.
गडद्र-प्रा॰ना॰ १ खांच अथवा खळगा-२ आड अथवा विहीर-दा॰द॰ ५ स॰१ ओ॰३७.
गण-सं॰ना॰ प्रमथादिक ईश्वराचे गणते.
गणीस-प्रा॰ना॰ शत्रु-दा॰द॰१९ स॰९ ओ॰२५.
गणप-सं॰ना॰ गणपति.
गतत्रप-सं॰वि॰ निर्लज्य.
गतवयस्क-सं॰वि॰ वृध्ध.
गतायाता-सं॰ना॰ निदिध्यासप्रकर्णी चारभूमिकांतील दुसरीभूमिकाती.
गताळका-सं॰अप॰वि॰ अकेशाविधवा. भा॰अ॰२२ ओ॰२७९.
गर्ता-सं॰ना॰ १ खांच-२ डोळे चांगले असून दिसूंनये तो रोग.
गथागोवी-प्रा॰ना॰ गाथागोवी शब्दपाहा.
गद-सं॰ना॰ १ रोग-२ यादवांतीलएका कुळाचें नांव.
गर्दभ-सं॰ना॰ गाढव.
गदारोळ-प्रा॰ना॰ १ पांडित्य-२ निरूपण.
गर्दीन-सं॰वि॰ गरायुध्धनिपुण.
गद्य-सं॰ना॰ अक्षरें व मात्रायांच्यांत नियम नसतो अशी अछंदोबध्ध कविता ती.
गंधर्व-सं॰ना॰ ईश्वराचे चित्ररथादिक गायक ते.
गंधर्वनगर-सं॰ना॰ गंधर्वसृष्टिहा शब्द पाहा.
गंधर्ववेद-सं॰ना॰ गायन विद्या.
गंधर्वसृष्टि-सं॰ना॰ आकाशांत नगराकृतीचे व त्यांतील मनुष्यादि आकृतीचे अनेक रंग दिसतात ते.
गंधवाह-सं॰ना॰ वायु.
गभस्ति-सं॰ना॰ सूर्य.
गभीर-सं॰वि॰ गंभीर अथवा खोल.
गर्भसुखी-सं॰वि॰ गर्भास आल्या दिवसापासून ज्याणे दुःख सोसिलें नाहीं तो.
गमणें-प्रा॰धा॰ना॰ १ भासणें-२ पावणें-ज्ञा॰अ॰५ ओ॰२९.
गम्य-सं॰वि॰ प्राप्त-ज्ञा॰अ॰९ ओ॰१५१.
गर-सं॰ना॰ विष.

गरल- सं॰ ना॰ विष.
गरगल- सं॰ना॰ श्रीशिव.
गरिमा- सं॰ ना॰ महत्व.
गरुडध्वज- सं॰ ना॰ श्रीविष्णु.
गरुडस्थ- सं॰ ना॰ गरुड.
गरुवती- सं॰ अप॰ वि॰ गुरुवती अथवाश्रेष्ठ- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ३२.
गरुवा- सं॰ वि॰ म्हातारा.
गलंड- प्रा॰ ना॰ बेंड.
गवसणी- प्रा॰ ना॰ व्याप्ति- आ छादन.
गवसणें- प्रा॰ धा॰ ना॰ सांपडणें.
गवांदी- प्रा॰ ना॰ अन्नछत्र- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ २३० - २३१ - भा॰ अ॰ ५ ओ॰ ५६५.
गवाक्ष- सं॰ ना॰ धारें अथवा खि डकी- जाळी.
गवेषणा- सं॰ ना॰ शोध.
गव्हर- सं॰ ना॰ गुहा.
गव्हरणें- प्रा॰ धा॰ ना॰ सांगणें- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ २५.
गव्हार- प्रा॰ वि॰ मूर्ख- उ॰ ॥ का यगतऐशी केलिसे गव्हारा ॥ जाहा लासातेरा आयुष्याचा ॥
गहन- सं॰ ना॰ १ अरण्य- २ वि॰ दुर्बोध अथवा कठिण.
गहिरें- प्रा॰ वि॰ गंभीर- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ १५९.
गहिंस- प्रा॰ वि॰ जडमूढ- भा॰ अ॰ ३ ओ॰ ६७८.
गहिंसपण- प्रा॰ ना॰ अविचार ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ५१३.
गहिंसु- प्रा॰ वि॰ वाईट- भा॰ अ॰ ३ ओ॰ १७४.
गळ- प्रा॰ ना॰ १ मानफांस- २ पाठी स बगाड घेताना गेंचतात तो.
गळंगा- प्रा॰ ना॰ एक कार- घोंरा ळा- दा॰ द॰ १॰ स॰ १॰ ओ॰ ९.
गळस- प्रा॰ वि॰ मांसल.
गळसोटी- प्रा॰ ना॰ गळ्यापाशीं होणारा रोग. दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ३६.
गळाळा- प्रा॰ ना॰ मधुररसधा रा- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ १७ - आग॰ पं॰ १४ स॰ १ ओ॰ ११.

## गा

गांगेय- सं॰ ना॰ भीष्माचार्य.
गाजलीराणिवा- प्रा॰ ना॰ प्रकृ रश्रुतीच्याशपथा- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २६०.
गाजी- प्रा॰ वि॰ प्रतापी॰ दा॰ द॰ १९ स॰ ८ ओ॰ ५
गांठा- प्रा॰ ना॰ पिंजरा- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ २३३- २३४.
गांठी- प्रा॰ ना॰ १ अहंकार- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ४६- २ माळ- भा॰ अ॰ २

ओ. १०.

गांठ्याळ- प्रा. वि. आंतल्यासाठीचें म्हणजे कपटी- दा. द. २ स. ३ ओ. २३.

गाडें- प्रा. वा. माळका- अमृ. प्र. ७ ओ. २६१.

गांडोरा- प्रा. ना. मार्ग बुजवणी- ज्ञा. अ. ११ ओ. ५३९-५४०.

गाडौरा- प्रा. ना. पाया- ज्ञा. अ. १८ ओ. १५०७.

गाट- सं. वि. बळकट.

गात्र- सं. ना. अंग- उ. ॥ नको जाऊं देऊं भंगा॥ गात्रें माझी पांडुरंगा॥

गाथा- प्रा. ना. अभिमान- उ. ॥ मी देह ऐसा गाथा॥ आला देहबुध्दिच्या माथां॥ इ. ॥.

गाथागोंवी- प्रा. ना. १ गलबला -गुंताडा- दा. द. ३ स. १ ओ. ४- २ मिथ्यार्थ.

गादणें- प्रा. धा. ना. पीडावणें- भा. अ. २३ ओ. १००.

गांधल- प्रा. ना. माशीचीविषारी जाती.

गांधार- सं. ना. १ सप्तस्वरांतील तिसरास्वर- २ शकुनी.

गाधिज- सं. ना. विश्वामित्रऋषि

गाभा- सं. अप. ना. गर्भ अथवा सार.

गाभारा- सं. अप. ना. मध्यभाग.

गाभिणी- सं. अप. वि. गर्भिणी- ज्ञा. अ. १८ ओ. ९५१.

गाभिणें- प्रा. वि. फुगलेलें- ज्ञा. अ. १७ ओ. १५९.

गाभेवन- प्रा. ना. सूक्ष्मांकुर- ज्ञा. अ. १० ओ. ७०.

गाथा- सं. ना. मन- ज्ञा. अ. ५ ओ. १५३.

गायक- सं. ना. गवई.

गार- प्रा. ना. १ खांच अथवा खळगा- दा. द. ५ स. १ ओ. ३७- २ जलगार- गारगोटी- ३ वि. शीतळ- थंड.

गारोळें- प्रा. वि. घारडोळें- दा. द. ३ स. ६ ओ. ४२.

गाल्होरा- प्रा. ना. गालगुच्चा- दा. द. ३ स. ७ ओ. २५.

गांव- सं. अप. ना. च्यार कोस अथवा योजन- उ. ॥ तोसेतु प्रथम दिनीं ॥ चवदा गावें दिनांतरें वीस॥.

गावदेगा- प्रा. वि. गांवदळ.

गावारें- प्रा. ना. गव्हारपण- ज्ञा. अ. १५ ओ. २६८.

गार्हस्थ्य- सं. ना. ग्रहस्थाश्रम

गाहाळणें- प्रा. धा. ना. हरवणें अथवा सांडणें.

गाही- प्रा. ना. गोही अथवा साक्षी.

गार्ह्यपति- सं. अप. ना. गार्हपत्याग्नि- वा. ५२०४.

गाळी- सं० अप० ना० शिवी.

## गि-गी.

गितु- सं० अप० ना० गीत अथवा गायन.
गिरगिरी- प्रा० ना० भोंवंड.
गिरा- सं० ना० वाणी अथवा वाचा.
गिरि- सं० ना० पर्वत-२ दश सन्यास्यांतील एक भेद.
गिरिजा- सं० ना० पार्वती.
गिरीश- सं० ना० श्रीशिव.
गिवसणें- प्रा० धा० ना० सांपडणें.
गिवसितये- प्रा० क्रि० प्राप्त होय.
गी- सं० ना० वाणी अथवा वाचा.
गीर्वाण- सं० वि० संस्कृत.
गीशर- सं० ना० वाक्शर अथवा वाग्बाण.
गीष्पति- सं० ना० बृहस्पति.

## गु-गू.

गुंडणें- प्रा० धा० गुंफणें-गुंडाळणें.
गुंडा- प्रा० ना० गोटा.
गुदार- प्रा० ना० हत्तीच्या पाठीवरील हौदा- अंबारी.
गुढी- प्रा० ना० ध्वज अथवा निशाण
गुण- सं० ना० १ सत्व, रज, तम ते एक-२ दोरी-३ वात-सूत्र.
गुणसाम्य- सं० ना० त्रिगुणाचा गर्भधारण कर्ती माया, महत्तत्व अथवा शुध्धसत्व- यांचेंच नांव.
गुणक्षोभिणी- सं० ना० गुणसाम्य गुणास प्रसवल्यावर हें नाव पावते.
गुणिया- प्रा० ना० १ गारुडी-ज्ञा० अ० १३ ओ० ७२५-२ पंचाक्षरी-भा० अ० ७ ओ० २०६.
गुंती- प्रा० ना० प्रतिबंध.
गुंथणें- प्रा० धा० ना० गुंफणें-ज्ञा० अ० १८ ओ० १७४३.
गुद- सं० ना० पंच कर्मेंद्रियांतील- अपान द्वार नामक पांचवें इंद्रिय.
गुंफिरा- प्रा० ना० गुंताडा-ज्ञा० अ० ४ ओ० २८५.
गुमान- प्रा० ना० १ आधिक्य-२ अहंकार-दा० द० १५ स० २ ओ० ८.
गुरर्वा- सं० अप० वि० श्रेष्ठ.
गुरळी- प्रा० ना० चूळ-दा० द० २ स० १ ओ० ६४.
गुरु- सं० ना० १ विद्या सांगणारा २ वि० थोर-३ जड.
गुलत्रय- सं० अप० ना० राळ काकवी- गुळवणी-दा० द० १६ स० ४ ओ० १५.
गुळडाग- प्रा० ना० चोंचे-दा० द० ३ स० ७ ओ० ३४.

गुद्दी- प्रा० ना० गलबला- दा० द० १३ स० ५ ओ० २४.

गुर्विणी- सं० वि० गरोदर-गर्भि णी.

गुहिरा- प्रा० ना० इछेनुरूप क्षणक्ष णां रंग पालटणारें सरड्या पेक्षां मो ठें जिवाणुं आहे- दा० द० १३ स० ७ ओ १७.

गुह्यज्ञान- सं० ना० स्वस्वरूपज्ञा न.

गुह्यार्थ- सं० ना० गुप्तार्थ.

गुळवणी- प्रा० ना० गुळें पाणी.

गुळाळा- प्रा० ना० गुळणी- ज्ञा० अ० १३ ओ० ४१८-४१९.

गूज- प्रा० ना० गुह्य गोष्ट.

गृहमेधि- सं० ना० गृहस्थ.

गृहस्थ- सं० ना० शास्त्रोक्तपा णिग्रहण करून स्वस्त्री वांचून अ न्यस्त्रिया मातृवत् मानणारा असा च्यार आश्रमांतील दुसरा आश्रम धर तो.

गेह- सं० ना० घर- अथवा गृह.

## गो - गौ.

गोखातु- प्रा० अव्य० मध्येंच- ज्ञा० अ० ११ ओ० ३८९.

गोचर- सं० वि० प्रकट- प्रत्यक्ष.

गोठणें- प्रा० धा० ना० घट्ट होणें-

गोष्टी- सं० अप० ना० गोष्ट.

गोड- प्रा० वि० १ साजिरें- ज्ञा० अ० १४ ओ० २६३-२ मधुर- जि व्हे गोड तीन अक्षरांचा रस॥ अमृत जयास फिकें पुढें ॥१॥-

गोत- सं० अप० ना० गोत्रज- सं० द० २ स० १ ओ० ९.

गोतांबील- प्रा० ना० एका ताटां त सर्वांनीं मिळून जेवणें तें- ज्ञा० अ० १७ ओ० १६०

गोत्र- सं० ना० १ पर्वत- २ कूळ

गोंदळा- प्रा० ना० समुदाय- भा० अ० ३ ओ० १९६.

गोधळूक- प्रा० ना० मावळतीवे ळ- प्रदोषवेळ- ज्ञा० अ० १८ ओ० १०८५.

गोधांगुळी- सं० अप० ना० धनु र्धराचें अंगुस्त न.

गोप- सं० ना० १ गौळी- २ सूर्य.

गोपायिता- सं० ना० रक्षण के र्ता.

गोपुर- सं० ना० देवालयांत जी उंच शाला असते ती.

गोंबी- प्रा० ना० गोम अथवा घो ण.

गोमटें- प्रा० ना० १ चांगुलपण -अमृ० प्र० ६ ओ० ११-२ वि० चां गलें- भा० अ० ७ ओ० १६- वाक्य० ओ० १६२६.

गोमय- सं० ना० गाईचेंशेण.
गोरटी- प्रा० ना० स्त्री- भा० अ० ८ ओ० २१७.
गोरांजन- प्रा० ना० स्त्रिया अथवा पुरुषभगव त्प्रीत्यर्थ आपणास जाळून घेतात त्या साधनाचें नाव.
गोरी- प्रा० ना० पारधीअथवातसं बंधीगायन- ज्ञा० अ० ८ ओ० १४८- ज्ञा० अ० १६ ओ० १२०
गोरोचन- सं० ना० गाईच्यामुखकांतील सुगंधीद्रव्य.
गोलांगुळ- सं० अप० ना० माकड.
गोल्हाट- सं० ना० औटपीठावरलें योगशास्त्रोक्तस्थान.
गोव- प्रा० ना० गुंता- दा० द० २ स० १ ओ० २०.
गोवळी- सं० अप० ना० गोळण-मुख्यत्वेंराधा.
गोसायळ- प्रा० ना० सायळपक्षाचीजाल- दा० द० ३ स० ७ ओ० ८.
गोसावी- सं० ना० १ स्वामी- २ कि मुख्य- ज्ञा० अ० १८ ओ० ११२.
गोहाडी- प्रा० ना० गुरवाडी.
गोही- प्रा० ना० गाही हा शब्द पाहा.
गोळ- सं० अप० ना० गोल अथवा अंड.
गौण- सं० वि० न्यून.
गौणात्मा- सं० ना० मुख्यात्मा व मिथ्यात्मा नव्हेत ते म्ह० स्त्रीपुत्रादिक- वाक्य० ओ० ७७५.
गौल्य- सं० ना० मधुरता- ज्ञा० अ० ३ ओ० २७१
गौल्यता- सं० ना० मनोरंजन रूपभाषण- दा० द० १ स० ६ ओ० १५.
ग्रंथिभेद- सं० ना० चिज्जडए कचबुध्दिस दृढ झालें आहे त्याचा जो भेद होणें तो.
ग्रहस्थ- सं० अप० ना० गृहस्थ शब्द पाहा.
ग्रहेश- सं० ना० सूर्य.
ग्राम- सं० ना० १ गांव- २ इंद्रियें
ग्रामकूळ- सं० अप० ना० कुत्रें- ज्ञा० अ० १३ ओ० ६८०.
ग्रामज्य- सं० ना० ग्राम्यधर्म अथवा मैथुन.
ग्राम्यस्त्री- सं० ना० वेश्या- ज्ञा० अ० ८ ओ० १६१.
ग्रामाधिपति- सं० ना० ग्राममुख्य- पाटील- खोत.
ग्रामिणी- सं० अप० ना० हरामी पणा- दा० द० २ स० ३ ओ० ६.
ग्राह- सं० ना० नक्र- मगर.
ग्रीवा- सं० ना० मान अथवा गळा.
ग्लह- सं० ना० डाव- पण.
ग्लांती- सं० अप० ना० खंती- दा० द० ५ स० २ ओ० १९.

ग्लानी - सं॰ना॰ खंती - दैन्य - भा॰ अ॰२६ ओ॰१८.

## घ.

घट - सं॰ना॰ घागर - शरीर.

घंट - सं॰ना॰ समुदाय - ज्ञा॰अ॰ १८ ओ॰१७१२.

घटभंग - सं॰ना॰ स्थूल अथवा लिंगशरीरभंग.

घटसंभव - सं॰ना॰ अगस्त्यऋषि.

घटश्रोत्र - सं॰ना॰ कुंभकर्ण.

घंटापारधी - सं॰ना॰ गायनादिकेंकरून मृगास भुलऊन पाशांत घालणारा पारधी - भा॰अ॰२६ ओ॰२३६.

घटोद्भव - सं॰ना॰ घटसंभव - शब्द पाहा.

घडघडाट - प्रा॰ना॰१ गजर - २ अव्य॰ मोठ्याने.

घडी - सं॰अप॰ना॰१ घरका - २ लहान घागर.

घडोते - प्रा॰ना॰ साधन - ज्ञा॰अ॰ १७ ओ॰२९.

घणाविळें - सं॰अप॰वि॰ घट्ट झालेलें - ज्ञा॰अ॰१५ ओ॰५.

घन - सं॰ना॰१ मेघ - २ वि॰ घट्ट.

घनदाट - प्रा॰वि॰ निबिड.

घनरस - सं॰ना॰१ जल - २ कापूर.

घनवटला - सं॰अप॰ना॰१ भारीपणा - २ घट्टपणा.

घनवटा - प्रा॰ना॰ गादी अथवा गालीच्या.

घनसार - सं॰ना॰१ चंदन - २ कापूर.

घनावणें - सं॰अप॰धा॰ना॰१ घट्ट होणें - २ दगावणें.

घनावळी - सं॰अप॰ना॰ मेघपंक्ति - ज्ञा॰अ॰९ ओ॰११९.

घनीभूत - सं॰वि॰१ मेघयुक्त - २ लगडलेलें.

घबाड - प्रा॰वि॰ मोठें - महान् - वा॰ २८४२.

घमंड - प्रा॰ना॰ घमस्यान - दा॰द॰११ स॰७ ओ॰१.

घमस्यान - प्रा॰ना॰ लयलूट - दा॰द॰१८ स॰३ ओ॰१८.

घरघेणा - प्रा॰वि॰ घातकी - घरबुडव्या.

घरटा - प्रा॰ना॰ तरू - ज्ञा॰अ॰ १८ ओ॰६५१.

घरटी - प्रा॰ना॰ गस्त अ॰ फेरी.

घरटीकार - प्रा॰ना॰ गस्त करी.

घरडुळणें - प्रा॰धा॰ना॰ धांडोळणें - ज्ञा॰अ॰६ ओ॰२१६.

घरवरोत - प्रा॰ना॰ घरवात अथवा संसार.

घरवात - सं॰अप॰ना॰ गृहवार्ता

अथवा प्रपंच.
घराणी- प्रा॰ ना॰ ठिकाण- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २३४.
घरोतें- सं॰ अप॰ ना॰ गृहस्थ अथवा घरबारी- विवे॰ उ॰ प्र॰ ६ ओ॰ ५.
घष्टनी- प्रा॰ ना॰ घांसा घांसी- दा॰ द॰ १४ स॰ ४ ओ॰ ४.
घसमस- प्रा॰ ना॰ असार- फोल
घसमसपण- प्रा॰ ना॰ घस घस- दा॰ द॰ १४ ओ॰ ४ ओ॰ ४.
घसवटणें- प्रा॰ धा॰ ना॰ घांसणें- झिजणें.

## घा-घि-घी.

घाऊस- सं॰ अप॰ ना॰ गोमांस- अथवा मांस- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १३१.
घांघोसणें- प्रा॰ धा॰ ना॰ धोधणें- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ६७.
घांणवटा- प्रा॰ ना॰ घाणा॥ अ॰ जैसा घांणवटियाचा टेरु॥ इ॰॥
घालघेणा- प्रा॰ वि॰ घालकी- दा॰ द॰ ५ स॰ २ ओ॰ २६.
घानाळ- प्रा॰ वि॰ नाकाड्या- लांब नाक्या- दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ४३.
घापणें- प्रा॰ धा॰ ना॰ १ घालणें- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १०० - २ सोडणें- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ १९० - ३ सांपडणें- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ १८.
घामेजणें- प्रा॰ धा॰ ना॰ श्रमी होणें. ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ३४८ - ३४९.
घारणें- प्रा॰ धा॰ ना॰ भाजणें- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १५८ - भा॰ अ॰ ८ ओ॰ २७९ - २ लहरावणें- भा॰ अ॰ २३ ओ॰ ५९७
घालणें- प्रा॰ धा॰ ना॰ उडीसकणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४९॥ उ॰॥ दक्षाचियेयज्ञभागीं॥ उमा घालूनघेतलें आगी॥
घावणें - प्रा॰ धा॰ ना॰ सांपडणें- ज्ञा॰ अ॰ ३ ओ॰ ४२.
घास - प्रा॰ ना॰ गवत.
घिसणी- प्रा॰ ना॰ घिस घीस- दा॰ द॰ १४ स॰ ४ ओ॰ ४.
घीस- प्रा॰ ना॰ झिजण- झीज॥ उ॰ शरीरें घीस साहणें॥ दुर्जनाशीं मिळोन जाणें॥ इ॰

## घु-घू.

घुंगुरडें- प्रा॰ ना॰ चिलीट अथवा मशक- उ॰॥ रावणादिक बापुडीं॥ घुंगुरडीं जैशीं॥ इ॰॥
घुंघालणें- प्रा॰ धा॰ ना॰ शब्दकरणें अ॰ ओरडणें- गुणगुणणें उ॰ जेसे सर्व लोक निजलिया॥ उलूक उठे घुंघातु॥ इ॰॥
घूर्णित- सं॰ वि॰ भ्रमित.

**घुमणें**-प्रा॰ धा॰ ना॰ शद्बकरणें.
**घुमरी**-प्रा॰ ना॰ सामर्थ्य-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २७२. वि॰ लगडील-भा॰ अ॰ १२ ओ॰ ५९१.
**घुरा**-प्रा॰ ना॰ दुर्गंधिवृक्ष-ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १२५३.
**घुलें**-प्रा॰ ना॰ एक कीट आहे-मा न घुलकाविलपाहाणारें मनुष्य-२ वि॰ मान घुलकावणारें-दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ४२.
**घूक**-सं॰ ना॰ घुबड.
**घूर्णिका**-सं॰ ना॰ दासी.
**घृत**-सं॰ ना॰ तूप.
**घृष्टी**-सं॰ ना॰ घर्षण अथवा समाग म-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ५१.

## घे-घै-घो-घौ.

**घेतें**-प्रा॰ ना॰ अंतःकरण-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ २२.
**घेपणें**-प्रा॰ धा॰ ना॰ घेणें-ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ३१२.
**घोकरी**-प्रा॰ क्रि॰ अव्य॰ लवकर ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ५३१.
**घोरव**-सं॰ अप॰ ना॰ घोष अथवा गर्जना-ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ १५७.
**घोंगाण**-प्रा॰ ना॰ साक्षी-उ॰ ॥ जें कारवर कटलें मरकटलें॥ अत्यंत घों गाणें घोंगाळिलें॥ इ॰॥
**घोंगें**-प्रा॰ क्रि॰ अव्य॰ लवकर-ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ८४.
**घोटभरणें**-प्रा॰ धा॰ ना॰ जीवघे णें-भा॰ अ॰ ४ ओ॰ २.
**घोंटाळा**-प्रा॰ ना॰ १ एकंकार-२ घों टकवडा-दा॰ द॰ १९ स॰ १ ओ॰ १५.
**घोर**-सं॰ वि॰ भयंकर.
**घोर**-प्रा॰ ना॰ १ काळजी-उ॰ ऐ साघोर करित असतां॥ स सुखदेखि लाअबविता॥-२ वीणा नामक तंतु वाद्याची तार-उ॰ विणा व्हावा कासया शी-घोर लागलाजयाशी-॥१॥
**घोरवृत्ति**-सं॰ ना॰ रजोगुणाची वृत्ति-ग्रा॰ ओ॰ ९४५.
**घोरांदर**-सं॰ ना॰ भयंकर समर
**घोष**-सं॰ ना॰ १ गर्जना-२ गोठा.
**घोषयात्रा**-सं॰ ना॰ गोरक्षणनि मित्त यात्रा.
**घोषी**-सं॰ ना॰ परस्परानुप्रवेश-ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ९३-भांडवल.
**घोसणें**-प्रा॰ धा॰ ना॰ १ शोधणें-२ सांपडणें.
**घोळाणा**-प्रा॰ ना॰ गुणघुणा-दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ३७.
**घ्राण**-सं॰ ना॰ पंचज्ञानेंद्रियांतील पांचवें इंद्रिय तें-नाक.

## च.

चक- प्रा॰ वि॰ ठक- दा॰ द॰ २ स॰ २ ओ॰ २५.
चकोर- सं॰ ना॰ चंद्रामृतचपान करणारा असा एक पक्षी आहे तो.
चक्र- सं॰ ना॰ आधारादि साहा चक्रें त्यांतील एकेक तें.
चक्रकापत्ति- सं॰ ना॰ कोणे एके वस्तुचा दुसरीस आश्रय- दुसरीचा तिसरीस आणि तिराचा पुनः पहिलीस- असो जो चक्राप्रमाणें फेरा तो.
चक्रवर्ती- सं॰ ना॰ सप्तद्वीपा भूमींत ज्याचें निष्कंटक स्वामित्व तो राजा अथवा सार्वभौम.
चक्रवाक- सं॰ ना॰ स्त्रीपुरुषांत दिवसास संयोग व रात्रीं वियोग होतो अशी एक पक्षांची जाती आहे तो पक्षी.
चक्रवाल- सं॰ ना॰ मंडल.
चखोट- प्रा॰ वि॰ चांगलें- चोखट
चंचू- सं॰ ना॰ चोंच.
चर्चा- सं॰ ना॰ प्रश्न प्रश्नोत्तर रूप भाषण.
चट- प्रा॰ ना॰ चटक- व्यसन.
चटपट- प्रा॰ ना॰ चिंता- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ १५.
चंडकीर्ण- सं॰ ना॰ सूर्य.
चंडांशु- सं॰ ना॰ सूर्य.
चणक- सं॰ ना॰ हरभरा.
चतुर्थी- सं॰ ना॰ चोथी भक्ति- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २७०.
चतुर्दशभुवनें- सं॰ ना॰ १ भूलोक- २ भुवर्लोक- ३ स्वर्लोक ४ महर्लोक- ५ जनोलोक- ६ तपोलोक- ७ व सत्यलोक- १ अतल २ वितल- ३ सुतल- ४ तलातल- ५ महातल- ६ रसातल- ७ व पाताल असे सात स्वर्ग व सात पाताळें मिळुन लोक अथवा भुवनें चवदा तीं.
चतुर्दशविद्या- सं॰ ना॰ १ ऋग्वेद- २ यजुर्वेद- ३ सामवेद- ४ व अथर्वणवेद- १ छंद- २ निरुक्त- ३ व्याकरण- ४ जोतिष- ५ शिक्षा- ६ व कल्पसूत्र- १ आणि न्याय- २ मिमांसा- ३ पुराण- ४ व धर्मशास्त्र असे चार वेद साहा शास्त्रें च्यार उपशास्त्रें मिळून विद्या १४ त्या.
चतुर्धाभक्ति- सं॰ ना॰ १ धर्म २ अर्थ- ३ काम- ४ मोक्ष यांचा समुच्चय असा चतुर्विधपुरुषार्थ तो.
चतुर्मुख- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
चतुरानन- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
चतुरास्य- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
चतुर्वक्र- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
चतुर्वदन- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
चतुर्विधमुक्ति- सं॰ ना॰ १ सलोकता- २ समीपता- ३ स्वरूपता- ४ आणि सगुण व निर्गुण रूपद्वय सायुज्यता अशा चार मुक्तींचा समुच्चय याचें नाव.

चतुर्विधवाचा- सं॰ना॰ १ परा-२ पश्यंति-३ मध्यमा- आणि-४ वैखरी या चार वाचांचा समुदाय त्याचें नाव.

चतुर्व्यूह- सं॰ना॰१वासुदेव-२संकर्षण-३अनिरुध्ध- आणि-४प्रद्युम्न असे पृथ्वीस आधारभूत चार व्यूह आहेत त्यांचा समुच्चयाचें नाव.

चतुष्पद- सं॰ना॰ गोअश्वादि चार पायांचे पशु ते.

चत्वारभूतग्राम- सं॰ना॰ चत्वार खाणी- १ जारज-२ अंडज-३ स्वेदज- आणि ४ उद्भिज यांचा समुच्चय तो.

चत्वारमुक्ति- सं॰ना॰ चतुर्विधमुक्ति- हा शब्द पाहा.

चत्वारवर्ण- सं॰ना॰१ब्राम्हण-२क्षत्रिय-३वैश्य- आणि-४शूद्र.

चत्वारिअनुबंधन- सं॰ अप॰ ना॰ अनुबंधचतुष्टय म्हणजे-१ विषय-२ संबंध-३ प्रयोजन- आणि-४ अधिकारी- यांचा समुच्चय तो.

चंद्रचूड- सं॰ना॰ श्रीशंकर.

चंद्रमौळी- सं॰ अप॰ ना॰ श्रीशिव.

चंद्रशाला- सं॰ना॰ उंच माडी.

चंद्रावळी- सं॰ अप॰ ना॰ कृष्णाच्या अष्टनायकांतील जी राही तिची बहिण ती.

चंद्रिका- सं॰ना॰ चांदणें.

चंद्री- सं॰ना॰ डोळे तारकळ- दा॰ द॰३ स॰५ ओ॰४.

चपळा- सं॰ अप॰ ना॰ चपला अथवा वीज.

चमत्कारु- सं॰ अप॰ ना॰ चमत्कार अथवा आश्चर्य.

चमरी- सं॰ना॰ वनगाय.

चमू- सं॰ना॰ सेना.

चर्मक- सं॰ना॰ अष्टादश वर्णांतील अठरावा वर्ण तो म्हणजे चांभार.

चर्मकुंड- सं॰ना॰ चांभाराचें कातडें भिजत घालण्याचें कुंड तें.

चर- सं॰ना॰ जंगम म्हणजे चालणारे प्राणी.

चरणी- सं॰ अप॰ ना॰ सेवा- ज्ञा॰ अ॰११ ओ॰७०१-७०२.

चरम- सं॰वि॰ शेवटलें.

चरमस्थिति- सं॰ना॰ सहजसमाधिरूपस्थिति ती.

चलचित्तपानतुंदिल- सं॰वि॰ चंचलचित्ताचें प्राशन करून दोंदील असा तो.

चव- प्रा॰ना॰ रुची- शोभा.

चवई- सं॰ अप॰ ना॰ चौरंग.

चवक- प्रा॰ना॰ आश्चर्य- ज्ञा॰ अ॰११ ओ॰३२९.

चवडा- प्रा॰ना॰-१ पंजा-२ विस्तृत

**चवदाभुवनें**- सं॰ अप॰ ना॰ पाहा- चतुर्दशभुवनें.

**चवदाविद्या**- सं॰ अप॰ ना॰ पाहा- चतुर्दशविद्या.

**चवरें**- प्रा॰ ना॰ शंवर- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ५८- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ५५. २ मस्तक- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १५४.

**चवऱ्यायशीलक्षयोनी**- सं॰ अप॰ ना॰ २००,०००,०. वृक्षयोनी- ११०,०० ०,०. कीटकयोनी- ३००,०००,० पशुयोनी- ९००,०००, जलचरयोनी- १००,०००,० पक्षीयोनी आणि ४००, ००० मानवयोनी मिळुन सर्व योनी ८४०,०००,०. चवऱ्यायशीलक्ष.

**चषक**- सं॰ ना॰ पेला.

**चळथ**- प्रा॰ ना॰ चवड.

**चळिया**- सं॰ अप॰ ना॰ चांचल्य.

**चक्षु**- सं॰ ना॰ पंचज्ञानेंद्रियांतील- तिसरें इंद्रिय तें- नेत्र.

**चक्षुश्रवा**- सं॰ ना॰ सर्प.

## चा-

**चाईचाट**- प्रा॰ ना॰ शरीरांत को ठे केंसाच्या ठिकाणीं विकार होऊन जे त्या जागचे केंस एका एकी गळून जा तात असा जो रोग तो- दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ५१.

**चाकळा**- प्रा॰ ना॰ मल द्वारचे मांस गोळे त्याचें नाव- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १०१.

**चाकाटणें**- प्रा॰ धा॰ ना॰ चकित होणें- दा॰ द॰ १४ स॰ २ ओ॰ ११.

**चांग**- प्रा॰ वि॰ चांगलें- विवे॰ पू॰ प्र॰ २ ओ॰ १०.

**चांगावें**- प्रा॰ ना॰ चांगुलपण.

**चांचण**- प्रा॰ ना॰ चांचड नामक तांबड्या मुंगळ्याची- जात आहे ती-

**चांचरणें**- प्रा॰ धा॰ ना॰ भुलणें- दा॰ द॰ ५ स॰ १ ओ॰ ३७.

**चांचरी**- प्रा॰ ना॰ बोबडी.

**चांचरीमुद्रा**- सं॰ ना॰ पांपण्या व बुबुळ हलवित हलवित भ्रुमध्यावर पाहात बसण्याची- धारणा मकरणीं तिसरी मुद्रा आहे ती.

**चांचुवडें**- सं॰ अप॰ ना॰ चोंच भा॰ अ॰ ७ ओ॰ ५७५.

**चाट**- प्रा॰ वि॰ वडबड्या- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ३०.

**चाटपण**- प्रा॰ ना॰ चघळपण- बा॰ ओ॰ २२२२.

**चाटू**- प्रा॰ ना॰ स्वयपाकांतील पळी- भा॰ अ॰ १० ओ॰ ४६२.

**चाड**- प्रा॰ ना॰ इच्छा- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ८- भा॰ अ॰ २ ओ॰ ७९३ बा॰ ओ॰ ५२५.

**चातक**- सं॰ ना॰ मेघोदकचपान

करणारा एक पक्षी आहे तो·

चातुरंगदळ- सं॰ अप॰ ना॰ रथ-घोडे-हत्ती- आणि पदाती अथवा पायदळ असें चार प्रकारचें सैन्य ज्या दळांत असतें त्या समुच्चयाचें नाव·

चाथी- प्रा॰ ना॰ बडबड ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ३१२-३१६·

चांद्रायण- सं॰ ना॰ चंद्र कलांच्या मानावर एक व्रत प्रायश्चित्तार्थ आहे त्याचें नांव·

चाप- सं॰ ना॰ धनुष्य·

चापलता- सं॰ ना॰ धनुष्य·

चांपोळी- सं॰ अप॰ ना॰ चाफ्याचें फूल- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ८५३·

चाम- सं॰ अप॰ ना॰ कातडें·

चामरखीळ- प्रा॰ ना॰ मोगमस·

चामर- सं॰ ना॰ चौरी·

चामवा- प्रा॰ ना॰ त्वचेंत घुसणारी एक उवांची जाती आहे तिचें नांव·

चामीकर- सं॰ ना॰ सोनें·

चार- सं॰ ना॰ सेवक·

चार- प्रा॰ ना॰ सोंग अथवा वेड्याचे उयाळति किंवा गोष्टी·

चारण- सं॰ ना॰ एक देवजाती आहे

चारदोष- सं॰ अप॰ ना॰ आत्माश्रयता- अन्योन्याश्रयता- चक्रकापत्ति आणि अनवस्था- असे चत्वारदोष- विकल्प विषयीं शास्त्रांत आहेत ते·

चारीअभिमानी- सं॰ अप॰ ना॰ विश्व- तैजस- प्राज्ञ- प्रत्यगात्मा असे चत्वार अभिमानी शरीरांतील जागृदादि अवस्थांचे ते·

चारीअवस्था- सं॰ अप॰ ना॰ जागृती- स्वप्न- सुषुप्ति आणि तूर्या अशा चत्वार अवस्था त्या·

चारीखाणी- सं॰ अप॰ ना॰ जरायुज- अंडज- स्वेदज आणि उद्भीज- अशा चत्वार खाणी त्या·

चारीपुरुषार्थ- सं॰ अप॰ ना॰ धर्म- अर्थ- काम आणि मोक्ष असे चतुर्विधपुरुषार्थ ते·

चारीभक्त- सं॰ अप॰ ना॰ आर्त- जिज्ञासु- अर्थार्थी आणि ज्ञानी असे चतुर्विध भक्त ते·

चारीमुक्ति- सं॰ अप॰ ना॰ सलोकता- समीपता- स्वरूपता आणि सगुण निर्गुण भेदें करून सायुज्यता अशा चतुर्विधमुक्ती त्या·

चारीयुगें- सं॰ अप॰ ना॰ कृत- त्रेत- द्वापार आणि कली- अशीं चतुर्युगें ती·

चारीवर्ण- सं॰ अप॰ ना॰ ब्राह्मण- क्षत्रिय- वैश्य आणि शूद्र असे चतुर्वर्ण ते·

चारी वाणी- सं॰ अप॰ ना॰ परा- पश्यंती- मध्यमा- आणि वैखरी अशा चत्वार वाणी त्या·

चारीस्थानें- सं॰अप॰ना॰ नेत्र- कंठ- हृदय- आणि मूर्ध्नी अशींच्यार स्थानें तीं·

चारु- सं॰ वि॰ चांगलें अथवा उत्तम·

चारुस्छळ- सं॰अप॰ना॰ १ चारखाणी किंवा चार वाणी· २ उत्तमस्थळ·

चारुस्थळणें- प्रा॰धा॰ना॰ सत्यमानणें- ज्ञा॰अ॰ ६ ओ॰ ७२·

चार्वाक- सं॰ वि॰ देहात्मवादी·

चावट- प्रा॰ वि॰ चघळ·

चावटी- प्रा॰ना॰ वाचाळपणा·

चावदशी- प्रा॰ना॰ जागृती- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ४११·

चाळक- सं॰अप॰ वि॰ १ चाळविणारा· २ ना॰ चाळक वाऊ नामक व्याधी·

## चि-ची·

चिकित्सक- सं॰ना॰ वैद्य·

चिकित्सा- सं॰ना॰ रोगाचें निदान·

चिखली- प्रा॰ना॰ पावसाळ्यांत चिखलापासून जो विकार पांचेस होतो ती·

चिंचावणें- प्रा॰धा॰ना॰ चिपचिबणें- भा॰अ॰ ५ ओ॰ ११७·

चिच्छेष- सं॰ना॰ चित्भुजंग·

चिडाणी- प्रा॰ना॰ कुपात्र- भा॰ अ॰ २६ ओ॰ २०३·

चिडी- प्रा॰ना॰ चिमणी·

चिदाणिउत- प्रा॰ वि॰ कांटेरें- भा॰ अ॰ २ ओ॰ १५·

चिणचिण- प्रा॰ना॰ धूसफूस- उ॰ ॥ चिणचिण करी शीलरी सुखें करीं ॥ व्यर्थ गुरगुरी शीण लूका ॥ भा

चित्- सं॰ना॰ स्वरूप लक्षणांतील दुसरें ज्ञानरूपलक्षण त्याचें नाम

चित्त- सं॰ना॰ चिंतन ह्यात्मक अंतःकरण पंचकांतील चवथा अवयव तें·

चित्तज्- सं॰ना॰ मदन·

चिंतवणें- सं॰अप॰ना॰ चिंतन ज्ञा॰अ॰ १२ ओ॰ ४३·

चित्तहीन- सं॰ वि॰ विक्षिप्त- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ १७८·

चित्कळिका- सं॰अप॰ना॰ चैतन्यकलिका·

चित्रकाई- सं॰अप॰ वि॰ अपूर्वदेही·

चित्रलेप- सं॰ना॰ १ गोपीचंदन अथवा गंधगोळ्या यांची मूर्ति- २ तसबीर·

चित्सागर- सं॰ना॰ ज्ञान समुद्र

चिंतामणि- सं॰ना॰ १ चिंतीलदेणारा मणि- २ गणपति·

चिति- सं० अप० ना० चित्.
चिदचिद्ग्रंथि- सं० ना० जडचैतन्य परस्पराध्यास.
चिदंबर- सं० ना० चिदाकाश- चिद्रूप.
चिदंभोधि- सं० ना० चित्समुद्र अथवा ब्रम्ह.
चिद्गगन- सं० ना० ज्ञानाकाश अथवा ब्रम्ह.
चिदाकाश- सं० ना० चिद्गगन अथवा ब्रम्ह.
चिदाभास- सं० ना० ज्ञानाभास. अथवा जीव.
चिमोरा- प्रा० ना० अंगास घेतात तो चिमटा दा० द० ३ स० ७ ओ० २५
चिवडा- प्रा० ना० बचबच. उ० मूर्खाकिरितां चिवडा होय ॥ मजालसीचा ॥ इ० ॥.
चिवळ- प्रा० वि० रोड- भा० अ० ३ ओ० ६७८.
चिळशी- प्रा० ना० चिळस अथवा वीट.
चीची- प्रा० वि० १ फलकर- दा० द० १५ स० ८ ओ० ३८-- २ ना० फजीती- उ० विकारें घडे हो जनीं सर्व चीची.
चीर- सं० ना० वस्त्र.

## चु-चू.

चुकुर- प्रा० ना० १ भ्रम- २ वि० भ्रमिष्ठ- दा० द० २ स० २ ओ० ३९.
चुनवणी- प्रा० ना० चुनगरटे.
चुबक- सं० ना० लोहचुंबक- ज्ञा० अ० ४ ओ० ०७.
चुंबक- सं० अप० ना० लोहचुंबक
चुंबक- प्रा० वि० कृपण.
चुंबकळलें ठेणें- प्रा० धा० ना० भोनावणें- ज्ञा० अ० ८ ओ० १०७.
चुरबुरी- प्रा० वि० तीक्ष्ण.
चुळुकें- प्रा० वि० सुंदर- ज्ञा० अ० ११ ओ० १३३.
चूड- सं० ना० मुकुट.
चूडामणि- सं० ना० शिरोरत्न.
चूत- सं० ना० अंबा.
चूतांकुर- सं० ना० अंब्याचा मोहोर.

## चे-चै.

चेटकी- प्रा० ना० १ चेडें करणारा मनुष्य- २ वि० चेड्या.
चेडें- प्रा० ना० ब्रम्हमहादि चेटकें ज्ञा० अ० १७ ओ० १४.
चेणें- प्रा० धा० ना० जागें होणें- विवे० पू० प्र० २ ओ० ३. अमृ० प्र० २ ओ० ४१.
चेतन- सं० ना० सजीवप्राणी.
चेतनाचक्षु- सं० ना० बुध्यादि

द्रष्टा-ज्ञा॰अ॰८ ओ॰३४.
चेतविणें-प्रा॰धा॰ना॰ खवळविणें
चेपणी-प्रा॰ना॰ अटी-ज्ञा॰अ॰९ ओ॰२०.
चेल-सं॰ना॰ वस्त्र.
चेवा-प्रा॰ना॰ जागृति-विवे॰पू॰ प्र॰१ ओ॰७.
चैतन्य-सं॰ना॰ मुख्यचैतन्य-२ आभासचैतन्य.
चैल-सं॰ना॰ वस्त्र.

## चो-चौ.

चोख-प्रा॰वि॰ उत्तम अथवा चांगलें.
चोखटें-प्रा॰वि॰ चांगलें-ज्ञा॰अ॰ ४ ओ॰११४.
चोखाळ-प्रा॰वि॰ निर्मळ-ज्ञा॰अ॰ २ ओ॰२३३.
चोज-प्रा॰ना॰ नवल-विवे॰पू॰ प्र॰१ ओ॰९६.
चोजणें-प्रा॰धा॰ना॰ जाणणें-अमृ॰ प्र॰४ ओ॰३६. आ॰पं॰१० स॰४- ओ॰१५.
चोंडकें-प्रा॰ना॰ डुगडुगवाद्य-रुक्मि॰अ॰११ ओ॰६०
चोंढें-प्रा॰ना॰१ गर्ता-ज्ञा॰अ॰७ ओ॰७६-२वि॰ खोल-ज्ञा॰अ॰१३ ओ॰५४९.
चोष्य-सं॰वि॰ चोखण्यास योग्य असे पदार्थ.
चोहट-प्रा॰ना॰ बाजारचौक-ज्ञा॰अ॰१६ ओ॰२१८-भा॰अ॰ ५ ओ॰१०१.
चोळखा-प्रा॰ना॰ सुरकुती-अमृ॰प्र॰७ ओ॰६९.
चौखणें-प्रा॰धा॰ना॰ चोहोंकडे ताणून बांधणें-दा॰द॰३ स॰७ ओ॰६५.
चौखुरणें-प्रा॰धा॰ना॰ चौखरणें-ज्ञा॰अ॰१४ ओ॰१७७.
चौचक-प्रा॰ना॰ कपाट-ज्ञा॰ अ॰१२ ओ॰५२.
चौताळणें-प्रा॰धा॰ना॰ रागावणें-
चौथापुरुषार्थ-सं॰अप॰ना॰ चतुर्थपुरुषार्थ म्हणजे मोक्ष.
चौथीभक्ति-सं॰अप॰ना॰ ज्ञानभक्ति.
चौदारत्नें-सं॰अप॰ना॰ चतुर्दश रत्नें यांचीं नावें-१ लक्ष्मी-२ कौस्तुभमणि-३ पारिजातकवृक्ष-४ सुरानामकमद्य-५ धन्वंतरीनामकवैद्य-६ चंद्रमा-७ कामधेनु-८ ऐरावती नामा हत्ती-९ रंभादिक अप्सरा-१० उच्चैःश्रवानामक घोडा-११ शार्ङ्ग नामें धनुष्य-१२ अमृत-१३ पांचजन्य नामक शं

रव-१४ कालकूटनामकवीष-
**चौदाविद्या**- सं॰अप॰ ना॰ चतु र्दश विद्या हा शद्व पाहा.
**चौपाशी**- प्रा॰ क्रि॰अव्य॰ चोहों कडे- भा॰अ॰२ओ॰२८२.
**चौफळा**- प्रा॰ना॰ चौरंगअथवा झोंपाळा- ज्ञा॰अ॰१५ ओ॰१.
**चौफेरी**- प्रा॰ क्रि॰अव्य॰ चौफेर अथवा चोहोंकडे-
**चौबार**- प्रा॰ना॰ चोहरा- दा॰द॰२ स॰१ओ॰३४.
**चौरली**- प्रा॰ना॰ चोरवेळ- ज्ञा॰अ॰ १६ओ॰७.
**चौसष्ठीकळा**- सं॰अप॰ना॰- चतुःषष्ठीकळा-यांचीं नावें—
१ गीत- २ वाद्य- ३ नृत्य- ४ नाट्य- ५ आलेख्य- ६ विशेषकच्छेद्य-७ तंडुलकुसुमबलिप्रकार- ८ पुष्पास्तरण ९ दशनवसनांगराग-१० मणिभूमिकाकर्म-११ शयनरचन-१२ उदकवाद्य-१३ उदकघात-१४ चित्रयोग-१५ माल्यग्रथन विकल्प- १६ शेखरापीडयोजन-१७ नेपथ्ययोग- १८ कर्णपत्र भंग-१९ सुगंधयुक्ति- २० भूषणयोजन- २१ ऐंद्र जाल-२२ कौतुमारयोग-२३ हस्तलाघव-२४ चित्रशाकापूपभक्ष विकारक्रिया- २५ पानकरसरागासव योजन-२६ सूचीकर्म-२७ सूत्र क्रीडा- २८ प्रहेलिका- २९ मालिमाला- ३० दुर्वचक योग- ३१ पुस्तकवाचन- ३२ नाटकाख्याइकादर्शन- ३३ काव्य समस्यापूरण- ३४ पट्टिकावेत्र वाण विकल्प- ३५ तर्ककर्म ३६ तक्षण-३७ वास्तुविद्या-३८ रूप्यरत्नपरिक्षा- ३९ धातुवाद-४० मणिरागज्ञान- ४१ आकरज्ञान-४२ वृक्षायुर्वेद-४३ मेषकुक्कुट लावक युद्धविधि- ४४ शुकसारिका प्रलापन ४५ उत्सादन- ४६ केश मार्जन कौशल- ४७ अक्षरमुष्टिका कथन-४८ देशभाषाज्ञान- ४९ म्लेछितकुतर्कविकल्प- ५० पुष्पशकटिका निमित्तज्ञान-५१ यंत्र मातृका धारणमातृका- ५२ संवाच्य- ५३ मानसीकाव्य क्रिया- ५४ अभिधानकोश-५५ छंदोज्ञान- ५६ क्रियाविकल्प-५७ छलितकयोग- ५८ वस्त्रगोपन- ५९ द्यूतविशेष- ६० आकर्षक्रीडा- ६१ बालक्रीडन- ६२ वैनायिकविद्याज्ञान- ६३ वैजयिकविद्याज्ञान- ६४ वैतालिकविद्याज्ञान-

## छ.

**छटा**- सं॰ना॰ किरण
**छंद**- सं॰ना॰१ अनुष्टुभादिकपद्यांचेंनाव- २ वेद.
**छंद**- प्रा॰ना॰हट्ट- नाद.

छद्म- सं॰ना॰ निमित्त.

छंपन्नकोटीवसुमति- सं॰अप॰ ना॰ पंचाशत्कोटीवसुमती.

छपन्नभाषा- सं॰अप॰ना॰ भरतखंडातजे छपन्नदेशआहेत सा मसे काची एकेकभाषा- त्यादेशभाषांचींनावें- १.अंग- २ वंग- ३ कलिंग- ४ कांबोज- ५ काश्मिर- ६ सौवीर- ७ सौराष्ट्र- ८ मागध- ९ मालव- १० महाराष्ट्र- ११ नेपाळ- १२ केरळ- १३ चोळ- १४ पांचाळ- १५ गौड- १६ मलाळ- १७ सिंहल- १८ वड्य- १९ द्रविड- २० कर्नाटक- २१ मरहट- २२ पानाट- २३ पांड्य- २४ पुलिंद- २५ आंध्र- २६ कनोज- २७ यावन- २८ जलांध- २९ शलभ- ३० सिंधु- ३१ अवंती- ३२ कन्नड- ३३ हूण- ३४ दाशार्ण- ३५ भोजकोट- ३६ गांधार- ३७ विदर्भ- ३८ बाल्हिक- ३९ गज्जर ४० बर्बर- ४१ केकेय- ४२ कोशल ४३ कुंतल- ४४ शूरसेन- ४५ टंकण ४६ कोंकण- ४७ मत्स्य- ४८ मद्र- ४९ सैंधव- ५० पाराशार्य- ५१ गुर्जर- ५२ खचर- ५३ भूचक्र- ५४ झल्लुक- ५५ प्राग्ज्योतिष- ५६ कराहट.

छवी- सं॰ना॰ कांती.

छात्र- सं॰ना॰ शिष्य.

छांदोग्य- सं॰ना॰ सामवेदांतील एकाशाखेचें उपनिषत् आहे तें.

छाया- सं॰ना॰ सावली- उ॰ तुकाम्हणे पडतो पायां॥ कराछाया रूपेंची॥१॥.

छायानायक- सं॰ना॰ सूर्य-

छायापुरुष- सं॰ना॰ उंचे जागेवर उभेंराहून सूर्य पाठिशीं घेऊन आपल्या छायेच्याग्रीवेवर दृष्टी पुष्कळ वेळपर्यंत पांपण्या न हलवितां द्यावी- नंतर तीच दृष्टी तशी आकाशांत योजावी म्हणजे मोठा एकपुरुष दिसतो त्याचें नाव-

छायामंडप- सं॰ना॰ बारीक शुभ्रवस्त्राचा पडदा सोडून त्याचे आंत दिवालावावा- नंतर मनुष्य जनावरें आदिकरून यांचा आकृतीचीं कातरलेलीं चित्रें- दीप व पडदा यांच्यामधून फिरवावीं म्हणजे त्या पडद्यावर चित्राकृती मोठी दिसून चमत्कार वाटतो त्याचें नाव-

छावा- प्रा॰ना॰ हत्तीचें पिलूं.

## ज-

ज- सं॰ना॰ हें अक्षर संस्कृतशब्दापुढें आलें असतां- त्यापासून उत्पन्न झालें अशा अर्थास दाखवितें- उ॰ आत्मज- जलज- बहुज इत्यादि.

जगद्व्याळ- सं० अप० ना० १ जग द्व्याल अथवा जगसर्प- २ वि० भ यंकर- भा० अ० २२ ओ० ८०८.

जगति- सं० ना० पृथ्वी- उ० ईशाचें स्थान तें होंचि ॥ सर्व या जगतीवरी ॥ इ०

जगतिसुर- सं० ना० ब्राम्हण.

जगदंबुद- सं० ना० जगद्रूपमेघ.

जगदीश- सं० ना० परमेश्वर-

जगदुन्मीलन- सं० ना० जगोत्प त्ति-

जगभांड- मा० वि० अतिभांडगा- सर्वत्र भांडगा.

जंगम- सं० ना० १ चालणारे प्राणी ते- २ पाशुपत मताचा अपभ्रंश अ सें एक मत आहे तदनुयाई तो.

जघन- सं० ना० पृष्ठभाग.

जघन्य- सं० वि० अधम.

जघन्य- प्रा० ना० लौकीक.

जघन्यज- सं० ना० शूद्र.

जंघा- सं० ना० मांडी- २ पोटरी- भा० अ० १४ ओ० ४९१.

जंघाळ- सं० अप० वि० उंच.

जट्याळ- सं० अप० वि० जटिल अथवा जटाधारी-

जठर- सं० ना० उदर

जड- सं० वि० ज्ञानहीन.

जडभारी- प्रा० ना० संकट- उ० पड लां जडभारी ॥ दासीं आठवावा हरी ॥१

जडाजड- सं० ना० जड आणि चैतन्य.

जती- सं० अप० ना० बौध्यमतिजो पाषांडी यती तो- उ० ॥ जती जंगम शे वडा ॥ नानक पंथी कानफाडा ॥ इ० ॥

जंत्रा- प्रा० ना० घोडा- ज्ञा० अ० ११ ओ० ३१५.

जनक- सं० ना० पिता- एका रा जाचें नाव.

जननी- सं० ना० आई-

जनपद- सं० ना० देश.

जन्य- सं० ना० युध्य.

जन्हुकन्या- सं० ना० जान्हवी.

जपाकुसुम- सं० ना० जासवंदीचें फूल

जंबीर- सं० ना० निंबू.

जंबुक- सं० ना० कोल्हा.

जयंती- सं० ना० १ कचमाला- २ वि० जिंकणारी- उ० कैसी मजस खी होय मयंती ॥ रतिरूप जयंती ॥ इ०

जरगा- प्रा० ना० पाण्यांत घाल ण्याचें जाळें- ज्ञा० अ० ७ ओ० ८६- भा० अ० ७ ओ० २२२.

जरठ- सं० वि० निबर.

जरंडी- प्रा० ना० पोटांत बाजूस रोग होतो तो- दा० द० ३ स० ६ ओ० ३७.

जरा- सं० ना० म्हातारपण- उ० कू तांत कट कामल ध्वज जरादिसों ला गली ॥ पुरः सर गदां सवें झगट तांत नू भागली ॥ इ० ॥

जल- सं० ना० उदक.

जलचर- सं॰ ना॰ मत्स्यादिक.
जलज- सं॰ ना॰ कमल-शंख.
जलजोद्भव- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
जलद- सं॰ ना॰ मेघ.
जलधर- सं॰ ना॰ मेघ.
जलधि- सं॰ ना॰ समुद्र.
जलनिधि- सं॰ ना॰ समुद्र.
जलरुह- सं॰ ना॰ कमळ.
जलशयन- सं॰ ना॰ विष्णु.
जलाभास- सं॰ ना॰ मृगजल.
जलाशय- सं॰ ना॰ सरोवर.
जलेश- सं॰ ना॰ वरुण.
जल्पक- सं॰ वि॰ निंदक.
जव- सं॰ ना॰ वेग.
जवनीक- प्रा॰ ना॰ पडदा- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ६२- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ४१.
जवार- प्रा॰ ना॰ कुळडाळ- दा॰ द॰ ११ स॰ ७ ओ॰ २०.
जसन- प्रा॰ ना॰ आडकथाविनोद दा॰ द॰ १२ स॰ ५ ओ॰ ६
जहदजहल्लक्षणा- सं॰ ना॰ त्यागात्यागलक्षणा- म्हणजे सार काय व असार काय हें ओळखून असार तितकें त्यागावें व सार ग्रहण करावें अशी वेदांत शास्त्रांत ग्राह्य केली आहे लक्षणा ती.
जहल्लक्षणा- सं॰ ना॰ त्यागलक्षणा म्हणजे जीवास सार व असार एकच वाटून गेलें आहे- त्या सर्वांचा त्याग झाल्यास ग्राह्य कांहींच उरला नाहीं म्हणून जी वेदांत शास्त्रांत दूषित लक्षणा आहे ती.
जळ- सं॰ अप॰ ना॰ पाणी.
जळचर- सं॰ अप॰ ना॰ जलचर.
जळज- सं॰ अप॰ ना॰ जलज- कमळ-शंख.
जळद- सं॰ अप॰ ना॰ जलद अथवा मेघ.
जळदजाळ- सं॰ अप॰ ना॰ जलदजाल- मेघपटल.
जळधर- सं॰ अप॰ ना॰ जलधर.
जळनिधि- सं॰ अप॰ ना॰ जलनिधि.
जळवास- सं॰ अप॰ ना॰ शीतकाळीं आकंठ मर्यादपाण्यांत उभें राहणें तो.
जळाभास- सं॰ अप॰ ना॰ मृगजळ.
जळाशय- सं॰ अप॰ ना॰ सरोवर.

## जा.

जाइउळ- सं॰ अप॰ ना॰ जाईचें फूल.
जाइजणें- प्रा॰ वि॰ अशाश्वत.
जाउपे- प्रा॰ ना॰ लेंकरूं- अमृ॰ अ॰ ६ ओ॰ २९- आ॰ पं॰ ७ स॰ १ ओ॰ ३८.
जाकळणें- प्रा॰ धा॰ ना॰ व्यापणें

ज्ञा० अ० १४ ओ० ६२.
जाखमाता - प्रा० ना० क्षुद्रदेवता.
जागाईत - प्रा० ना० समासऋद्धी - दा० द० १० स० १ ओ० १५.
जागृतिअवस्था - सं० ना० प्रत्यक्ष इंद्रियांनी प्रत्यक्ष विषय ग्रहण करणें अशी जी बुध्धीची अवस्था ती.
जाजावणें - प्रा० धा० ना० त्रासणें.
जानू - प्रा० ना० आळ अथवा आरोप - दा० द० २ स० २ ओ० २१.
जाड - प्रा० ना० बळ - ज्ञा० अ० ७ - ओ० ८५ - २ वि० प्रौढ - दा० द० १४ स० ३ ओ० ३८.
जाड्य - सं० ना० जडत्व.
जातवेद - सं० ना० अग्नि.
जातिमुकुळ - सं० अप० ना० जाईची कळी.
जात्यंध - सं० वि० जन्मांध.
जानी - सं० ना० पति.
जानु - सं० ना० गुडघा.
जान्हवी - सं० ना० भागिरथी.
जापाणनें - प्रा० धा० ना० १ आटोपणें - ज्ञा० अ० ११ ओ० ५८१ - २ अपूज्य करणें - दा० द० ६ स० ६ ओ० ३५.
जामदग्न्य - सं० ना० श्रीपरशुराम नामक विष्णूचा साहावा अवतार.
जामात - सं० ना० जावई.
जामून - प्रा० वि० अतिठेंगणें - दा० द० ३ स० ६ ओ० ४२.
जाया - सं० ना० स्त्री.
जायाचा - प्रा० वि० अस्थिर - दा० द० ५ स० ३ ओ० ७५ - या० ओ० २६५३
जालंदर - सं० ना० योगशास्त्रोक्त कंठस्थानाचें नाव.
जावळी - प्रा० ना० भाकड.
जावळिया - प्रा० ना० शेजारी - ज्ञा० अ० १७ ओ० २१६ - २१७.
जावानिगें - प्रा० वि० नामांकित.
जाह्नवीळ - सं० अप० ना० शिव.
जाळितें - प्रा० ना० ज्ञान - ज्ञा० अ० ८ ओ० ५८.

## जि - जी -

जिउ - सं० अप० ना० जीव.
जिउप्राण - सं० अप० ना० जीव प्राण - अमृ० प्र० १ ओ० १२.
जिणनें - प्रा० धा० ना० जिंकणें.
जिणें - प्रा० ना० वांचणें.
जितवणी - सं० ना० जीवनोपाय
जितार्णे - प्रा० ना० कुरवंडी - ज्ञा० अ० १३ ओ० ३३६ - ३३७.
जिवाळें - प्रा० वि० सजीव - अमृ० प्र० ७ ओ० ३६.
जिव्हा - सं० ना० पंच ज्ञानेंद्रियांतील रसना नामक चौथें इंद्रियतें
जिव्हार - सं० अप० ना० अंतःकरण - ज्ञा० अ० १६ ओ० १२१.

जिव्हाळा- सं॰ अप॰ ना॰ १ ओला
वा- २ अंतःकरण- पर॰ प्र॰ १ ओ॰
१५. विव॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ २ उ॰॥ जाणें
भक्तिचा जिव्हाळा॥ तो नि देवाचा पूत
ळा॥१॥

जिष्णु- सं॰ ना॰ १ इंद्र- २ अर्जुन.

जिज्ञास- सं॰ अप॰ ना॰ जिज्ञासु-
च्यार प्रकारचे भक्तांतील निवृत्तिरूपां
तला दुसऱ्यापदवीचाभक्त तो.

जिमूति- सं॰ ना॰ मेघ.

जीय- सं॰ अप॰ ना॰ जीव-

जीव- सं॰ ना॰ अविद्या प्रति बिंबित
ब्रम्हचैतन्य तें.

जीवकण- सं॰ अप॰ ना॰ जीवदशा

जीवचैतन्य- सं॰ ना॰ सतचैतन्यां
मधील आभास चैतन्यांतील दुस
रें तें- जीव.

जीवदशा- सं॰ ना॰ जीवत्व.

जीवहेत- सं॰ ना॰ जीव निर्मित का
मक्रोधादिक.

जीवधर्म- सं॰ ना॰ अविद्याकामक
र्मादिक-

जीवन- सं॰ ना॰ १ उदक- २ आ-
युष्य-

जीवन्मुक्त- सं॰ ना॰ गुरूपदेशों क
रून झालेला मुक्त तो.

जीविका- सं॰ ना॰ निर्वाह अथवा
उपजीवन.

जीवित- सं॰ ना॰ आयुष्य.

## जु

जुखेळ- प्रा॰ ना॰ जुवा- ज्ञा॰ अ॰
१५ ओ॰ ४८०- ४८१.

जुंझार- प्रा॰ ना॰ योध्या.

जुत्पति- सं॰ ना॰ जेंठा अथवा मल्ल

जुनाट- सं॰ अप॰ वि॰ जीर्ण अथ
वा पुरातन-

जुंबाड- प्रा॰ ना॰ तेज- ज्ञा॰ अ॰
११ ओ॰ ३६३.

जुवारी- प्रा॰ ना॰ जुवा खेळ्या-
ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ६७३.

## जे-जै

जेंगट- प्रा॰ ना॰ झांन घड्याळ- दा॰
द॰ २ स॰ ७ ओ॰ २४.

जेणें- प्रा॰ ना॰ जिणें अथवा वांच
णें- दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ ४२.

जेनिगें- प्रा॰ ना॰ बोलणें- ज्ञा॰
अ॰ ६ ओ॰ ४९२.

जेष्ठ- सं॰ ना॰ वडील.

जेसाठणें- प्रा॰ धा॰ ना॰ लोळणें
ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ १२०.

जैत- सं॰ अप॰ ना॰ जय- अमृ॰
प्र॰ २ ओ॰ १९.

## जो

जोईस - सं० अप० ना० ज्योतिष- ज्ञा० अ० १८ ओ० १६३१.
जोगी - सं० अप० ना० १ योगी पुरुष - २ वि० योगी.
जोगेस्वरा - प्रा० ना० बैल - ज्ञा० अ० ११ ओ० ५४२।५४३.
जोजार - प्रा० ना० जंजाळ - स्वरूप द.
जोडा - प्रा० ना० उपमा - स० ओ० २११.
जोडी - प्रा० ना० नफा - ज्ञा० अ० १४ ओ० १७.
जोत्स्ना - सं० ना० शीतकिरण.
जोनें - सं० अप० वि० जुनें अथवा वडील - ज्ञा० अ० १८ ओ० १५२८.
जोहर - प्रा० ना० अग्नि - भा० अ० ५ ओ० २३४.
जोहरा - प्रा० ना० अग्नि - ज्ञा० अ० १० ओ० १४५.
ज्या - सं० ना० धनुष्य दोरी.
ज्योतिर्विद - सं० ना० ज्योतिषी.
ज्वरसृष्टि - सं० ना० तपाच्या भ्रांतींत जें अन्न कुपथ्य भासतें त्याचें नाव.
ज्वलन - सं० ना० अग्नि.
ज्वालामाळी - सं० ना० अग्नि.

## झ-

झकणें - प्रा० धा० ना० फसणें.
झगडा - प्रा० ना० भांडण.
झटपट - प्रा० ना० १ त्वरा - २ क्रि० अव्य० लौकर - ३ भांडण - दा० द० २ स० ३ ओ० ७.
झटें - प्रा० ना० १ हुदकण - ज्ञा० अ० ९ ओ० १८ - २ झोंबी - उ०॥ बोलके पहिलवान कळिकटे॥ तयांशीं बाथांबीं झटें॥
झड - प्रा० ना० लोभाविष्ट दृष्टी - सतत दृष्टी.
झडकरणें - प्रा० धा० ना० विच्यार करणें - ज्ञा० अ० ७ ओ० ११२.
झडपण - प्रा० ना० बाहेर वसा - बाधा.
झमकणें - प्रा० धा० ना० झळकणें
झळझळ - प्रा० ना० कवडसा - ग० ओ० ६४६.
झळंबणें - प्रा० धा० ना० १ बुडणें - ज्ञा० अ० १२ ओ० ८७ - २ पोळणें दा० द० ३ स० १ ओ० ५० - ३ गुंडाळणें दा० द० ३ स० ४ ओ० ४१.
झळाळ - प्रा० ना० तेज - विवे० पू० म० १ ओ० १७ - दा० द० १ स० २ ओ० १४ - भा० अ० १० ओ० २१२.

## झा

झाक - प्रा० ना० झुळुक - वा० ओ० ३५५८.

झांकोळणें- प्रा॰ धा॰ ना॰ आच्छादित होणें- व्यापणें-

झांग्या- प्रा॰ ना॰ झांगेकरी-

झावळें- प्रा॰ वि॰ भ्रमयुक्त- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ७२.

झासुर- प्रा॰ ना॰ आळस- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १०५.

## झि- झी- झु-

झिंज्जाडणें- प्रा॰ धा॰ ना॰ झोट धरणें- झिंजऱ्या धरून अंगास झोंबणें-

झीळ- प्रा॰ वि॰ हळू- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ७४-

झुगारणें- प्रा॰ धा॰ ना॰ फेकणें-

झुंजार- प्रा॰ ना॰ योध्दा-

## झे- झो-

झेंगट- प्रा॰ ना॰ जेंगटशाहपाहा.

झोंक- प्रा॰ ना॰ १ कल- २ विकार- अमृ॰ प्र॰ १ ओ॰ ७.

झोटिंग- प्रा॰ ना॰ पिशाच.

झोटी- प्रा॰ ना॰ शेंडी-

झोंड- प्रा॰ वि॰ कोडगा- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ २९.

झोतावा- प्रा॰ ना॰ पाण्याचा लोट

झोलिहन- प्रा॰ ना॰ विक्षेप- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ २५७-२५५.

झोळ- प्रा॰ ना॰ १ झोळ अथवा पदर- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ४८- २ मि॰ मिथ्या- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ६०

## ट

टक- प्रा॰ ना॰ १ एकसारखें लक्ष- २ संकट-

टकळा- प्रा॰ ना॰ वेध-

टका- प्रा॰ ना॰ अग्रभाग- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १६६.

टकें- प्रा॰ ना॰ प्रतिमा- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १५२.

टवंच- प्रा॰ ना॰ दुःख- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ १८२.

टवाळ- प्रा॰ वि॰ १ लटिकें- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ११३९- २ निरर्थक- भा॰ अ॰ १ ओ॰ ७९.

टवाळ- प्रा॰ वि॰ लटिकें- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ३०.

टवाळी- प्रा॰ ना॰ असद्वर्तणूक- दा॰ द॰ ५ स॰ २ ओ॰ १९.

## टा-

टाकी- प्रा॰ ना॰ रुती- आवड- उ॰ दरें ज्याची जैशी टाकी- तेणें तैसें करावी.

टाकिजणें- प्रा॰ धा॰ ना॰ पावणें

ज्ञा॰अ॰१४ ओ॰४०६.
टाकिणें - प्रा॰धा॰ना॰ फाकणें-भा॰ अ॰१२ ओ॰२३०.
टाचणी - प्रा॰ना॰ त्रेधा अथवा दुर्दशा-भा॰अ॰२० ओ॰१८०.
टाचें - प्रा॰वि॰१ उणें- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰५०-२ थोडें- ज्ञा॰ अ॰१५ ओ॰ ४७०-४७१
टाफरें - प्रा॰वि॰ धवकचालकें-दा॰द॰ ३ स॰ ६ ओ॰४२
टाळेंबस - प्रा॰ना॰ गेंगाण व्याधि दा॰द॰३ स॰६ ओ॰२०.

## टि-

टिकरणें - प्रा॰ना॰ ठिकाण-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰१४.
टिकल्लग - प्रा॰वि॰ शोभिवंत-ज्ञा॰ अ॰१८ ओ॰८५४.
टिकु - प्रा॰ना॰१ टिकला-२ बोट-लावणें अथवा निंदणें- ज्ञा॰अ॰१५ ओ॰२४४.
टिकेलें - प्रा॰धा॰वि॰ स्थिरराहिलें-
टिटघर - प्रा॰ना॰ सोंगट्यांतील फटघर-
टिपरी - प्रा॰ना॰ चाप-उ॰ नानाप्रकारें छळिती॥ नाकाशीं टिपऱ्या लाविती ॥१॥
टिळक - सं॰अप॰ना॰ तिलक अथवा टिकला-भा॰अ॰२२ ओ॰२२

## टे

टेंक - प्रा॰ना॰ डोंगर-भा॰ अ॰५, ओ॰१०४.
टेंका - प्रा॰ना॰ आश्रय-अमृ॰प्र॰ ४ ओ॰६.
टेहणी - प्रा॰ना॰ १ रक्षण-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰५०५-५०६-२ अनास्था-रुक्मि॰ अ॰८ ओ॰५२.

## टो

टोणपा - प्रा॰ना॰१ सोंडगा-२ वि॰ विद्याहीन-
टोलर - प्रा॰वि॰ पोकळ-रुक्मि॰ अ॰१८ ओ॰५२.
टोल्हर - प्रा॰वि॰ टोलर-

## ठ

ठकडा - प्रा॰वि॰ मोगा ठकव्या॰
ठकार - प्रा॰वि॰ मनोहर-उ॰ ठकाराचें गण करीं चापबाण॥
ठसठोंबस - प्रा॰वि॰ निर्भीड बभक्षर शात्रु-दा॰द॰२ स॰२ ओ॰३२.
ठसणें - प्रा॰धा॰ना॰ बाणानें अथ

वाविंवणें-
ठसेठोमसें - प्रा॰वि॰ बारीक मोठें-

## ठा-

ठाउकतें- प्रा॰वि॰ साध्य- ज्ञा॰अ॰ १०ओ॰१७८।१८०.
ठाउवें- प्रा॰ अव्य॰ ठाउकें- भा॰अ॰ १०ओ॰१५४.
ठाक- प्रा॰ना॰ ठसा- ज्ञा॰अ॰७ ओ॰२५.
ठाकठोक- प्रा॰ वि॰-रोख-प्रत्यक्ष-
ठाकणें- प्रा॰धा॰ना॰१ राहणें- प॰ प्र॰५ओ॰४- २ जवळ करणें- ज्ञा॰ अ॰९ओ॰२३६.
ठाणा- प्रा॰ना॰ आकृती अथवा शरीरबांधा-
ठाणें - प्रा॰धा॰ना॰ राहणें- ज्ञा॰ अ॰६ओ॰१२.
ठाणोरी- प्रा॰ना॰ युध्यकर्त्ता-ज्ञा॰ अ॰१८ओ॰४३९.
ठाय- प्रा॰ना॰१ निश्चय- ज्ञा॰अ॰ ९ओ॰२६३-२ क्रि॰ उभाराहा-भा॰ अ॰१४ओ॰१०९.
ठायींठेवणें- प्रा॰धा॰ना॰ नामसंकेतकरणें-
ठायींपडणें- प्रा॰धा॰ना॰ सांपडणें-
ठायींपाडणें- प्रा॰धा॰ना॰ थांगला वणें- वा॰ओ॰५६२.
ठायेंठावो- प्रा॰वि॰ वास्तविक- स्थानवासी- ज्ञा॰अ॰८ओ॰१५६ अमृ॰प्र॰९ओ॰३७.
ठावणें- प्रा॰धा॰ना॰ राहणें- अमृ॰प्र॰४ओ॰४.
ठावो- प्रा॰ना॰ ठाव अथवा गिकाण-थारा-

## ठि-ठी-ठु-ठे.

ठिकरी- प्रा॰वि॰ भिन्न-अलिप्त- ज्ञा॰अ॰१८ओ॰४३४-५३९.
ठी- प्रा॰ना॰ठिकाण- ज्ञा॰अ॰१५ ओ॰४३२-४३३.
ठुणका- प्रा॰ना॰बुकांदा - दा॰द॰ ३स॰७ओ॰२५.
ठेंगणें- प्रा॰वि॰१ उणे-विवे॰पू॰ प्र॰१ओ॰७५-२ हलकें-नीच-भा॰ अ॰५ओ॰१५८.
ठेव- प्रा॰ना॰ठेवण अथवा आकृती-दा॰द॰१ स॰२ओ॰८.
ठेवा- प्रा॰ना॰ संचय-दा॰द॰३स॰ ३ओ॰२४.

## ड.

डंका- प्रा॰ना॰ चर्मवाद्य- अमृ॰ प्र॰५ओ॰३६.

डकारादिफकारांत- सं० वि० डपासून फपर्यंत वर्ण.

डगरू- प्रा० ना० डगर अथवा प्रसिद्धि- ज्ञा० अ० १५ ओ० ११८- अमृ० प्र० २ ओ० ३४. आळ.

डंगरू- प्रा० ना० डंगर अथवा प्रतिबंध- ज्ञा० अ० १८ ओ० १२- विवे० उ० प्र० ११ ओ० ११६.

डगळ- प्रा० वि० मोठें- ज्ञा० अ० १७ ओ० १२७.

डंगारणेंगार- प्रा० ना० टिकारें अथवा बडगे मार- दा० द० ३ स० ७ ओ० ६५.

डंडुळणें- प्रा० धा० चळणें- भा० अ० ४ ओ० ८४.

डंब- सं० अप० ना० १ दंभ- २ खटाटोप- विवे० पू० प्र० ७ ओ० ३२.

डबक- प्रा० ना० डबकें- भा० अ० १० ओ० ६३३.

डहुळणें- प्रा० धा० घुसळणें- अमृ० प्र० ७ ओ० ७४.

## डा

डाईक- प्रा० वि० दावा धरणारें-

डाकुळी- प्रा० ना० चेष्टा- ज्ञा० अ० १७ ओ० १४.

डाखळ- प्रा० ना० डाहळी- अमृ० प्र० ७ ओ० १४३

डांग- प्रा० ना० लंगडी- दा० द० ५ स० १ ओ० ४१

डांगा- प्रा० ना० काठी- ज्ञा० अ० १५ ओ० २५१.

डांगुरटी- प्रा० ना० डांगोरा अथवा दौंडी- ज्ञा० अ० १८ ओ० २९१.

डाल- प्रा० ना० जाडीसाल- ज्ञा० अ० १५ ओ० १६.

डावलणें- प्रा० धा० ना० टाकणें- भा० अ० २० ओ० २०३

डांस- प्रा० ना० चिलटांचीएक जात आहे.

डाहारणें- प्रा० धा० ना० प्रसिद्ध करणें- ज्ञा० अ० १४ ओ० ४१- ज्ञा० अ० १५ ओ० २६७.

## डि

डिंगरू- गुजराथी० अप० ना० १ मुलगें अथवा लेंकरूं- भा० अ० २३ ओ० ९२८- २ वि० लाडकें-

डिंडिमा- प्रा० ना० १ संभ्रम- ज्ञा० अ० १५ ओ० ३१५- २ सुखदुःख- ज्ञा० अ० १६ ओ० ४४३- ४४२.

डिंब- प्रा० ना० आकृति- प्रतिभास भा० अ० २ ओ० १७१.

डिंभ- प्रा० ना० डिंब.

डिरू- प्रा० ना० शेंग- ज्ञा० अ० १५ ओ० ९५.

डुडुळ- प्रा० ना० घुबड-ज्ञा० अ० १४ ओ० २५०

## डे- डो-डौ-

डेबिरें- प्रा० वि० मारकें- भा० अ० ११ ओ० ५५८

डोमकावळा- प्रा० ना० महार कावळा

डोरी- प्रा० ना० सुंदरमुख- भा० अ० २६ ओ० ७८.

डोहळा- प्रा० ना० इच्छा.

डोळस- प्रा० वि० सुरूप.

डौंडी- प्रा० ना० धंडोरा-ज्ञा० अ० १८ ओ० ६०२

डौरवाय- प्रा० ना० उपहास- ज्ञा० अ० १२ ओ० ८२७.

## ढ- ढा-

ढवाळी- प्रा० ना० थट्टा- दा० द० २ स० ५ ओ० २५.

ढसाळ- प्रा० वि० मोठें - भा० अ० ६ ओ० ६.

ढसाळणें- प्रा० धा० ना० विसरणें- ज्ञा० अ० ११ ओ० १६१-

ढाल- प्रा० ना० १ क्षुद्रसाधन- दा० द० ३ स० ३ ओ० ४५ - २ घावरावीम्ह णजेघावन लागूंदेण्याचेंसाधन.

ढाळ- प्रा० ना० १ अभिषेक- ज्ञा० अ० १२ ओ० २८६-२८७ - २ रसपूट- भा० अ० ५ ओ० ८४ - ३ जुलाब- उ० ॥ ढाळआणिउस्वाळदेती ॥ पथ्यकठिण सांगती ॥ - ४ अव्य० सहज- दा० द० १९ स० ८ ओ० ९.

ढाळेंढाळें - प्रा० क्रि० अव्य० मंद मंद- विवे० उ० प्र० ११ ओ० ९४.

## ढि- ढे- ढो-

ढिमा- प्रा० ना० मुलामा- ज्ञा० अ० १३ ओ० ४७० - ४७१

ढिसाळ- प्रा० वि० मोठें - ज्ञा० अ० ४ ओ० ११६.

ढेंढें- प्रा० धा० ना० जाणें- ज्ञा० अ० १ ओ० १०२.

ढेमें- प्रा० ना० धोंड- ज्ञा० अ० १६ ओ० ३४० - ३४१.

ढोंढी- प्रा० ना० आकार- ज्ञा० अ० ८ ओ० २२.

ढोबळ- प्रा० वि० स्थूळ अथवा मोठें.

## त

तकवा- प्रा० ना० धीर- दा० द० १९ स० १० ओ० २७.

तर्क- सं० ना० १ कल्पना अथवायु क्ति- २ शब्द- अमृ० प्र० ६ ओ० ४६

तक्र- सं० ना० ताक.

तगट - प्रा० वि० तगाऊ.
तगबग - प्रा० ना० तळमळ.
तटका - प्रा० ना० संबंध.
तटस्थ - सं० वि० स्तब्ध अथवा कुंठित.
तटस्थलक्षणा - सं० ना० आगंतुकलक्षणा.
तटाक - सं० ना० सरोवर अथवा तळें
तटिनी - सं० ना० नदी.
तडणें - प्रा० धा० ना० त्रासून बोलणें
तडदा - प्रा० ना० चांदवा - ज्ञा० अ० १२ ओ० ५५.
तडस - प्रा० ना० पोटफुगीची तिडीक दा० द० ३ स० ६ ओ० ३२.
तडाग - सं० अप० ना० तटाक अथवा तळें.
तडित् - सं० ना० वीज.
तण - सं० अप० ना० तृण - ज्ञा० अ० १८ ओ० ४३८.
तणाव - प्रा० ना० ताण दोर - दा० द० १९ स० ९ ओ० २२.
तर्णक - सं० ना० वत्स.
तत्पद - सं० ना० उपदेशरूप महावाक्यांतील ईश्वर नामक पहिलें पद.
तत्पर - सं० वि० सावध.
तत्वता - सं० वि० १ तात्विकरूप - २ खरें - ३ पादपूरण
तत्वज्ञानी - सं० वि० पंचतत्वांस आश्रयभूत जें ब्रह्म तत्व तें जाणणारा अ-

सातो - २ ना० ज्ञानीपुरुष.
तन - सं० अप० ना० तनु अथवा देह.
तनय - सं० ना० पुत्र.
तनया - सं० ना० कन्या.
तनु - सं० ना० देह.
तनुचतुष्टय - सं० ना० स्थूल-सूक्ष्म-कारण-महाकारण असे चार देह ते.
तनुज - सं० ना० पुत्र.
तनुमानसा - सं० ना० ज्ञानी जीवाच्या सप्त भूमिका आहेत त्यांतील मनास तनुत्व म्हणजे कृशत्व आणणारी तिसरी भूमिका ती.
तन्नतन्न - सं० ना० नामरूपात्मक दृश्य भासाची जी व्यावृत्ति तद्वाचक जें वेदाचें भाषण तें.
तन्मात्रा - सं० ना० शब्दस्पर्शादि पंच विषय.
तन्मात्राधवें-ही - सं० अप० वि० प्रणवातील - ज्ञा० अ० ६ ओ० ३०४.
तन्हार - सं० अप० ना० तृणालय - छप्पर - ज्ञा० अ० ३ ओ० २६८.
तप - सं० ना० स्वस्वरूपानुसंधान - २ साधनचतुष्टयांतील तिसऱ्या साधनाचें - तिसरें अंग.
तपन - सं० ना० सूर्य.
तपीळ - प्रा० वि० तापट अथवा तापड.
तम - सं० ना० १ अंधःकार - २ क्रोध ३ वि० तिसऱ्या गुणाचा गुण - ना० तमो

गुण.

**तमालनील**- सं॰ना॰ विष्णु.

**तमुंड**- प्रा॰ना॰ १ डोयखुपस-२ डोयखुपशा-दा॰द॰२ स॰३ ओ॰२९.

**तमोगुण**- सं॰ना॰ त्रिगुणांतील अज्ञानादिदायक तिसरा गुण तो.

**तमोहर**- सं॰ना॰ सूर्य-तमारि.

**तरंग**- सं॰ना॰ पाणफुगा- कल्पना उ॰॥ अनंत बुध्दिचे तरंग॥ क्षण क्षणा पालटती रंग॥ इ॰

**तरट**- प्रा॰ना॰ घोड्याचा अंसूड- भा॰अ॰२० ओ॰२१४.

**तरणि**- सं॰ना॰ सूर्य.

**तरणी**- सं॰ना॰ नौका.

**तरळ**- प्रा॰ना॰ अजीर्णाची हागओक-दा॰द॰३ स॰६ ओ॰२५.

**तरळणें**- प्रा॰धा॰ना॰ १ भांबावणें-२ खेळणें- ज्ञा॰अ॰१३ ओ॰१०४.

**तरांडें**- प्रा॰ना॰ ताफा- ज्ञा॰अ॰७ ओ॰९८.

**तरिया**- प्रा॰ना॰ नौका- भा॰अ॰१ ओ॰१३.

**तरु**- सं॰ना॰ वृक्ष.

**तऱ्हा**- प्रा॰ना॰ १ प्रकार-२ एककल्लीपण-दा॰द॰२ स॰३ ओ॰७.

**तल्प**- सं॰ना॰ शय्या.

**तल्पकी**- सं॰अप॰वि॰ तल्पग अथवा मात्रागमनी

**तल्पग**- सं॰वि॰ गुरु अथवा पितृद्रोही.

**तवक**- सं॰ना॰ वेग- ज्ञा॰अ॰११ ओ॰३४२

**तवका**- प्रा॰ना॰ धैर्य- वा॰ओ॰ ५२६०.

**तळपट**- प्रा॰ना॰ नाश.

**तळपणें**- प्रा॰धा॰ना॰ विराजणें अथवा शोभणें- दा॰द॰१ स॰२ ओ॰

**तळबुड**- प्रा॰ना॰ मूळ- ज्ञा॰अ॰ १५ ओ॰१६८.

**तळवट**- प्रा॰ना॰ अधोभाग.

**तळवटणें**- प्रा॰धा॰ना॰ दडपणें वा॰ओ॰ ९४२.

**तळवेमार**- प्रा॰ना॰ १ अन्ह्याणी तापल्या तव्यावर उभें करणें-२ पर्वता तळीं लोटणें- ३ तळून मारणें.

**तळोंट**- प्रा॰ना॰ तळवट.

**तळोंटपण**- प्रा॰ना॰ नम्रता- ज्ञा॰अ॰१३ ओ॰११५.

**तक्षक**- सं॰ना॰ एका सर्पाचें नाव

**तज्ञ**- सं॰वि॰ ज्ञानी.

## ता.

**ताकपिरें**- प्रा॰वि॰ ताक पिणारें.

**तार्किक**- सं॰ना॰ नैय्यायिक.

**तागा**- प्रा॰ना॰ दोरा- ठिकाण- ज्ञा॰ अ॰१६ ओ॰४०५-४०६.

**तागाईत**- प्रा॰वि॰ लगाऊ दा॰द॰११

स०१ओ०१५.

**ताटस्थलक्षण**- सं०ना० आगंतुकलक्षण-

**ताटस्थ्या**- सं०अप०ना० ताटस्थावस्था.

**ताटी**- प्रा०ना० मूर्छा-ज्ञा०अ०ओ०

**तांडी**- प्रा०ना० समुदाय-ज्ञा०अ०१५ओ०३६४.

**तात**- सं०ना० पिता-

**तांतडी**- प्रा०ना० त्वरा-

**तातवेळ**- प्रा०ना० तीव्रता-विवे०पू०प्र०१ओ०३०

**तान्त्रिक**- सं०वि० तंत्रोक्त.

**तान्तु**- सं०अप० ना० तंतू.

**तादात्म्य**- सं०ना० तदाकारताम्हणजे-कोणेएक्ये अर्थाहून आपण भिन्न असतां भ्रांतिनें त्या भिन्नास मी म्हणून मानणें त्याचें नाव.

**तानें**- प्रा०वि०१ नवें-२ धाकटें-ज्ञा०अ०१८ओ०१५२८.

**तान्हुलें**- प्रा०ना०१ तान्हेंलेंकरूं-२ वि० तान्हें-

**तापत्रय**- सं०ना० अध्यात्म-अधिभूत-अधिदैव असे त्रिविधतापते.

**तापापह**- सं०ना० चंद्र- तापहरण करणारा-

**ताळा**- प्रा०ना० समुदाय-दा०द०१५स०२ओ०२७.

**तांबोळा**- प्रा०ना० गालावरपडणारासो

ग-भा०अ०१०ओ०५१०.

**तामरस**- सं०ना० कमल-

**तामसयोगी**- सं०ना० पट्टा-अघोरयोगी-

**तार**- सं०ना० षड्जस्वरापासून निषादपर्यंत स्वर गाऊन पुनः उंच षड्ज आळाफिलात त्याचें नाव अथवा तसा नाद तो.

**तारकारि**- सं०ना० कार्तिकस्वामी

**तारतम्य**- सं०ना० तरतमभाव.

**तारसें**- प्रा०वि० तारजोळें-दा०द०३स०६ओ०४२.

**तारा**- सं०ना०१ नक्षत्र-२ बृहस्पतिची स्त्री तिचें नाव-३ वाळीची स्त्री तिचें नाव-४ हरिश्चंद्र राजाची स्त्री.

**तारारमण**- सं०ना०१ चंद्र-२ बृहस्पति-३ वाळी नामा वानर-४ हरिश्चंद्र

**ताळी**- प्रा०ना०१ देहसत्यत्व-ज्ञा०अ०१३ओ०२१-२ ताटी अथवा मूर्छा-विवे०उ०प्र०१ओ०६२.

## ति-

**तिख**- सं०अप०वि० तीक्ष्ण-भा०अ०३ओ०४.

**तिखट**- सं०अप०वि० तीक्ष्ण.

**तिगुण**- सं०अप०ना०१ त्रिगुण-२ वि० तिप्पट

**तिडकी**- प्रा०ना० ठिणगी-भा०

अ०१४ओ०२३१.
तित्तिरी- सं०ना० तैतीर्यउपनिषत्.
तितिर्षु- सं०ना० तरुणोपायइच्छिणा
रापुरुष- वि० तरुणोपायइच्छिणाराअ
सा.
तितिक्षा- सं०ना० सुखदुःखादिस-
हिष्णुता- साधन चतुष्टयांतील तिसऱ्या
साधनाचें चौथें अंग तें-
तिलुणें- प्रा०धा०ना० मागें जाणें-
ज्ञा० अ०७ओ०१६१.
तिमिर- सं०ना० नेत्राचा अंधत्व रोग.
तिर्यग्योनी- सं०ना० कीटकादिनीचयो
नी.
तिवन्हें- प्रा० वि० तिहिंचा समुच्चयअ
सें- ज्ञा० अ०१५ओ०१५.
तिहाउणें- प्रा०वि० त्रिविध-
तिहींचीरवूण- प्रा० ना० गुरु-शास्त्र-
आत्म मतितीरूपखूण.
तिन्हीगुण- सं०अप०ना० सत्व,रज,
तम,तें.
तिन्हीप्रस्थान- सं०अप० ना० गीत
भाष्य-उपनिषद्भाष्य व शारीर भाष्य ते.
तिन्हीबंद- सं० अप० ना० मूळबंद-
जालंदर आणि उड्डियान असे तीनबंद
ते- ज्ञा० अ०१८ ओ०१०३७.
तिन्हीराम- सं०अप०ना० श्रीदाशि
रथीराम- परशुराम- आणि बलराम.
तिन्हीलोक- सं०अप०ना० स्वर्ग-
मृत्यु आणि पाताळ असे तीन लोक ते
तिन्हीस्थानें- सं०अप०ना० नेत्र-
कंठ- आणि हृदय अशीं तीन स्थानेंतीं

## ती-

तीनसप्तकें- सं०अप० संख्या०वि०
एकवीस- क्रि०वि० एकवीसवेळ.
तीव्र- सं० वि० प्रखर.
तीळ- प्रा०ना० नेत्रांतीलकाळाबिं
दू.

## तु-तू.

तुक- प्रा०ना० तोल-वजन अथवा-
महत्व- ज्ञा०अ०५ओ०१०४-भा०अ०
२६ओ०२८७.
तुकावणें- प्रा०धा०ना० हलविणें
अथवा डोलविणें-
तुंग- सं०अप०वि० मोठें अथवाउं
च- ज्ञा०अ०७ओ०७०
तुंद- प्रा०वि० मूर्ख- दा०द०१८ स०
६ओ०३
तुंदिल- प्रा०वि० दोंदील- ज्ञा०अ०
१८ ओ०४.
तुंबिनीफल- सं०ना० कडू भोंपळा.
तुंबी- सं०अप०ना० तुंबिनी फल.
तुरंग- सं० ना० घोडा.
तुरंगम- सं०ना० घोडा.
तुरंबणें- प्रा०धा०ना० पूजणें- अ

मृ॰प्र॰१ओ॰५९.

तुरिया - सं॰अप॰ना॰ तूर्यनामकस माधीरूपचौथी अवस्था.

तुरुक - प्रा॰ना॰ म्लेंछ.

तुरें - प्रा॰ना॰ एकचर्मवाद्यआहे - भा॰अ॰२०ओ॰१७८.

तुला - सं॰ना॰ उपमा.

तुलीप - सं॰ना॰ पलंग.

तुलीय - सं॰अप॰ना॰ तुलीप-ज्ञा॰ अ॰१३ओ॰४२.

तुषार - प्रा॰ना॰ कोंडा-ज्ञा॰अ॰५ ओ॰११०

तुहिन - सं॰ना॰ हिमालय.

तुळापुरुष - सं॰अप॰ना॰ आपल्याभारभारसुवर्णतो

तूणीर - सं॰ना॰ बाणठेवण्याचा भाता.

तूर्ण - सं॰क्रि॰अव्य॰ शीघ्र.

तूर्या - सं॰ना॰ चवथीअवस्था.

तूर्यावगाहिनी - सं॰ना॰ ज्ञानीजीवाच्या सप्तभूमिकांतील पूर्णस्थितिरूपसातवी भूमिकाती.

तूर्यु - सं॰अप॰ वि॰ चौथें.

तूष्णींभाव - सं॰ना॰ त्रिगुणाचीसमानस्थिति असी जीवासनानंदरूपअवस्थाती.

## ते-तै-

तेजाकार - सं॰ना॰ सूर्य-ज्ञा॰अ॰ १०ओ॰१४८.

तेजोनिधि - सं॰ना॰ सूर्य.

तेलमुंगी - प्रा॰ना॰ मुंगीचीएकजातीआहेती.

तेवणें - प्रा॰वि॰ तेवढें-ज्ञा॰अ॰ ९ओ॰९.

तैजसाभिमानी - सं॰ना॰ स्वप्नदेहाचा अभिमानकरणाराजीवतो

तैत्तीर्य - सं॰वि॰ तित्तिरिशाखोक्त-२ना॰ तैत्तीर्यशाखा.

## तो-

तोक - सं॰ना॰ बालक.

तोख - सं॰अप॰ना॰ तोष.

तोय - सं॰ना॰ उदक

तोयज - सं॰ना॰ कमल.

तोयद - सं॰ना॰ मेघ.

तोरण - सं॰ना॰ द्वार.

तोळंबा - प्रा॰ना॰ वरउथळें.

त्यक्त - सं॰धा॰वि॰ टाकिलेलें.

त्यागसुख - सं॰ना॰ नेतिसुखम्हणजे तन्न तन्न असें म्हणून एकेकाचा त्यागकरणें तें.

त्रपा - सं॰ना॰ लज्जा.

त्रयोदशगुणीतांबूल - सं॰ना॰ विड्याचींपानें-सुपारी-लवंगा-वेलदोडे-जायफळ-जायपत्री-केशर-

कापूर- बदाम- कस्तुरी- कंकोळ- काथ आणि चुना- असे तेरा पदार्थ मिळून उत्तम तांबूल तो.

**त्राण**- सं० ना० १ संरक्षण- २ आधार- ३ शक्ति.

**त्रांय**- सं० ना० रक्षण.

**त्राहटक**- सं० ना० रेचक प्राणायाम प्रकरणीं त्याचें नाव.

**त्राहाटणें**- प्रा० धा० ना० वाजविणें- सिध्ध करणें.

**त्रिकांडवेद**- सं० ना० कर्म- उपासना आणि ज्ञान कांड ज्यांत आहे त्याचें नाव.

**त्रिकाळ**- सं० अप० ना० भूत- भविष्य आणि वर्तमान आदि करून काळ त्याचें नाव.

**त्रिकुट**- सं० ना० इडा, पिंगला, आणि सुषुम्ना यातिहींचा जो ऐक्यभाव याचें नाव.

**त्रिकुटी**- प्रा० ना० चोरी- चाहडी आणि शिंदळकी ह्या तीन व्यसनांचा जो समुच्चय त्याचें नाव.

**त्रिगुण**- सं० ना० सत्व- रज- आणि तमोगुण ते.

**त्रिग्रंथी**- सं० ना० तिहीं नाडींची ग्रंथी तिचें नाव.

**त्रिचरण**- सं० ना० अग्नि.

**त्रिजगति**- सं० ना० त्रैलोक्य.

**त्रिदश**- सं० ना० स्वर्गवासी इंद्रादिक देव.

**त्रिदाघ**- सं० अप० ना० त्रिविधताप- ज्ञा० अ० १६ ओ० ४३८- ४३९.

**त्रिदोष**- सं० ना० कफ, वात, पित्त एतद्रूप सन्निपात.

**त्रिधातुक**- सं० ना० शरीर- ज्ञा० अ० ११ ओ० ६९९- ७००

**त्रिनेत्र**- सं० ना० शिव.

**त्रिपथगा**- सं० ना० स्वर्धुनी- भागीरथी व भोगावती.

**त्रिपदशोधन**- सं० ना० तीन पदांचें शोधन

**त्रिपाद**- सं० ना० अग्नि.

**त्रिपुटी**- सं० ना० १ प्रपंचरचना- ज्ञा० अ० ६ ओ० १२१- २ ध्येय- ध्याता- ध्यान- यातेंविध्यांचें नाव.

**त्रिपुरारि**- सं० ना० शिव.

**त्रिभाग**- सं० ना० चुना- वाळू- ताग यांचा कर्दम तो. दा० द० ६ स० ८ ओ०

**त्रिमात्रा**- सं० ना० अकार- उकार मकार- अशा प्रणवाच्या तीन मात्रा त्या.

**त्रिवर्ग**- सं० अप० ना० धर्म- अर्थ- काम- ज्ञा० अ० १५ ओ० २५६.

**त्रिविधअवस्था**- सं० ना० जागृति- स्वप्न- आणि सुषुप्ति.

**त्रिविधअहंकार**- सं० ना० सात्विक राजस- आणि तामस असा तीन प्रकारें करून अहंकार तो.

**त्रिविधकर्म**- सं० ना० संचित- क्रियमाण आणि प्रारब्ध असें तीन प्रकारें

चें कर्मतें.

**त्रिविधताप**- सं० ना० अध्यात्म-अधिभूत आणि अधिदैव असा तीन प्रकारचा ताप तो.

**त्रिविधदेह**- सं० ना० स्थूल-सूक्ष्म आणि कारण असे तीन देह ते.

**त्रिविधपरिछेदरहित**- सं० वि० देश-काल आणि वस्तु परिछेदरहित

**त्रिविधभेदरहित**- सं० वि० सजातीय-विजातीय व स्वगत भेदरहित.

**त्रिविधलक्षणा**- सं० ना० जहत्-अजहत् आणि जहदजहत- अशी त्रिप्रकारची लक्षणा ती.

**त्रिविधाप्रतिति**- सं० ना० गुरु-शास्त्र- आत्मप्रतीति.

**त्रिशंकु**- सं० ना० कामक्रोध आणि लोभ यांचा समुच्चयाचें नाव. ज्ञा० अ० १६ ओ० ४२९-४३०

**त्रिशुध्दि**- सं० क्रि० अव्य० निश्चयें करून.

**त्रेतायुग**- सं० ना० चौकडींतील दुसरें युग.

**त्रैधर्म्य**- सं० ना० धर्म-अर्थ-काम-एतद्रूप वेदत्रयी-ज्ञा० अ० ९ ओ० ३३४.

**त्रैलोक्य**- सं० ना० स्वर्ग-मृत्यु-पाताळलोक.

**त्वगेंद्रिय**- सं० ना० त्वचा नामक ज्ञानेंद्रिय.

**त्वचा**- सं० ना० पंच ज्ञानेंद्रियांतील दुसरें इंद्रिय.

**त्वंपद**- सं० ना० उपदेश महा वाक्यांतील जीव नामक दुसरें पद तें.

**त्वरें करी**- सं० अप० क्रि० अव्य० लौकर-भा० अ० १ ओ० ३२२.

## थ

**थडी**- प्रा० ना० तीर-उ० ॥ देवें आपण घालूनउडी ॥ तयाशी नेलें पैलथडी ॥ येर अभाविकें बापुडीं ॥ वाहातचि गेलीं ॥ १ ॥

**थर**- प्रा० ना० उंची मोल-ज्ञा० अ० १८ ओ० ५५४.

**थळींव**- प्रा० ना० पात्र-ज्ञा० अ० १७ ओ० ३४४-३४५-अमृ० प्र० २ ओ० ४२

## था-

**थाटी**- प्रा० ना० फांस-ज्ञा० अ० १२ ओ० ४७.

**थातंबणें**- प्रा० धा० ना० निसरणें-ज्ञा० अ० १३ ओ० ३१८.

**थाया**- प्रा० ना० छंद-वा० ओ०-५००६-भा० अ० २९ ओ० ७५४.

**थार**- प्रा० ना० १ आश्रय-२ रहिवास-उ० ॥ नाहीं भक्तिशी थार ॥ तेथें दुस्तर हा संसार ॥ १ ॥

**थारणें**- प्रा० धा० ना० स्थिरावणें.

वा॰ओ॰ २१२७.

थारा- प्रा॰ ना॰ १ आश्रय-२ रहिवास-भा॰ अ॰ २० ओ॰ १.

थारोळा- प्रा॰ ना॰ दुधाणें म्हणजे दूध तापविण्या साठीं भूय खणून केलेलें कुंड-भा॰ अ॰ ३ ओ॰ ३७४.

थाव- प्रा॰ ना॰ थांग-अंत-भा॰ अ॰ २९ ओ॰ १.

थावणें- प्रा॰ धा॰ ना॰ स्थिरावणें-ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २५६.

थावरणें- प्रा॰ धा॰ ना॰ १ स्थीरराहणें २ संभाळणें- ओ॰ पं॰ १० स॰ ५ ओ॰ २

थावा- प्रा॰ ना॰ बळ-ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ४०१-४०२.

थावें- प्रा॰ ना॰ ठाव.

## थि-

थिटें- प्रा॰ वि॰ अरखूड-दा॰ द॰ १४ स॰ ८ ओ॰ ४५.

थिलें- प्रा॰ वि॰ १ वायां-अमृ॰ प्र॰ २ ओ॰ १२- २ असणारें-भा॰ अ॰ ३- ओ॰ ६.

थिरावणें- प्रा॰ धा॰ ना॰ स्थिर होणें वा॰ ओ॰ १५६०.

थिल्लर- प्रा॰ ना॰ उबकें.

## थो-

थोकडें- प्रा॰ वि॰ लहान-ज्ञा॰ अ॰ २ ओ॰ ११.

थोट- प्रा॰ वि॰ कुभांडी-दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ३०

थोटावणें- प्रा॰ धा॰ ना॰ निर्बळ होणें-अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ५८.

थोतांड- प्रा॰ ना॰ १ आळ-दा॰ द॰ ११ स॰ १ ओ॰ १७-वि॰ २ कल्पनीक.

थोरावणें- प्रा॰ धा॰ ना॰ वाढणें.

थोरी- प्रा॰ ना॰ थोरीव अथवा मोठेपणा.

## द.

दगदग- प्रा॰ ना॰ श्रम.

दंडक- प्रा॰ ना॰ रूढी अथवा चाल.

दंडगी- प्रा॰ ना॰ ज्वाळा-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २५४-२५५.

दंडधारी- सं॰ ना॰ सन्यासी.

दंडळणें- प्रा॰ धा॰ ना॰ डळमळणें. दा॰ द॰ ५ स॰ २ ओ॰ ३३

दंदशूक- सं॰ ना॰ सर्प.

दंदिया- सं॰ अप॰ ना॰ योध्या.

दर्दुर- सं॰ ना॰ बेडूक.

दर्पण- सं॰ ना॰ ओरसा.

दंभ- सं॰ ना॰ ढोंग.

दभ्र- सं॰ वि॰ अल्प.

दम- सं॰ ना॰ साधनचतुष्टयांतील तिसऱ्यासाधनाचें बाहेंद्रियनिग्रह

रूप दुसरें अंग.

दमयंती-सं॰ना॰ नळराजाचीस्त्री २ वि॰ जिंकणारी.

दमामा-फा॰ना॰ चर्मवाद्य आहे.

दर्मदिवी-फा॰ना॰ चंद्रजोत-ज्ञा॰अ॰ १६ओ॰६५.

दर-सं॰ना॰ १ भय-उ॰॥ देवीम्ह णेअनार्या॥ नाहींतुझिया मनांतपापदर ॥इ॰॥ -२ निरख म्हणजे भाव - ३ शंख ॥ उ॰ ॥गदा-रिदर नंदकांबुजधरानमस्तेसदा॥इ॰॥

दरारा-सं॰अप॰ना॰ भीति-भा॰अ॰ १ओ॰७१.

दरुशन-सं॰अप॰ना॰ दर्शन-भा॰ अ॰२ओ॰४५.

दरुषण-सं॰अप॰ना॰ दर्शन-भा॰ अ॰१७ओ॰३५०.

दरेमार-फा॰ना॰ पर्वत दरींतलोटू नदेऊन मारणें-तोमार. दा॰द॰३स॰ ७ओ॰६३.

दल-सं॰ना॰१ सैन्य-२ पर्ण.

दव-सं॰ना॰ दावाग्नि.

दवड-फा॰ना॰ धांवघेणें- क्रि॰धाव

दवडणें-फा॰धा॰ना॰ घालविणें-नि रासकरणें-अमृ॰प्र॰७ओ॰३८.

दर्वी-सं॰ना॰ स्वयपाकांतीलपळी.

दशकंधर-सं॰ना॰ रावण.

दशाग्नि-सं॰अप॰ना॰ आवरणाग्नि- ज्ञा॰अ॰११ओ॰२२९.

दशन-सं॰ना॰ दांत.

दशमुंड-सं॰ना॰ रावण.

दशमौळी-सं॰अप॰ना॰ दशमौली अथवा रावण.

दशशतकर-सं॰ना॰ सहस्रकर. अथवा सूर्य.

दशशतनेत्र-सं॰ना॰ सहस्रनेत्र अथवा इंद्र.

दशशतमुख-सं॰ना॰ सहस्रमुखं अथवा शेष.

दशस्यंदन-सं॰ना॰ दशरथ.

दशा-सं॰ना॰ योग्यता-ज्ञा॰अ॰ १६ओ॰३८.

दशानन-सं॰ना॰ रावण.

दशोपनिषदें-सं॰ना॰ दाहाउपनि षदें- त्यांचीं नांवें-१ ईशावास्य-२ केन-३ कठवल्ली-४ मुंडक-५ मां डुक्य-६ प्रश्न-७ तैतीर्य- ८ऐतरेय -९ छांदोग्य-१० बृहदारण्यक.

दर्शन-सं॰ना॰ अंगअथवा शास्त्र.

दर्शपूर्णमास-सं॰ना॰ आमावा स्यादि नैमित्तिक कर्मतो.

दंष्ट्रा-सं॰ना॰ दाढा.

दस्यु-सं॰ना॰ चोर.

दस्र-सं॰ना॰ अश्विनीकुमारना मक देवांचे वैद्य.

दहन-सं॰ना॰ अग्नि.

दळ-सं॰अप॰ना॰१ सैन्य-२क मळ-३ पान.

दळण- प्रा॰ ना॰ परिचय- समागम- भा॰ अ॰ ८ ओ॰ २११.

दळवट- सं॰ अप॰ वि॰ समुदायवान् दा॰ द॰ १९ स॰ १० ओ॰ ७.

दळवाडें- सं॰ अप॰ ना॰ समुदाय- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ७८- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ९५- विवे॰ पू॰ प्र॰ ४ ओ॰ १६.

दळिद्रा- सं॰ अप॰ ना॰ निःशेषता- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ३२८.

दक्ष- सं॰ ना॰ १ यानावाचा एक प्रजापति- २ वि॰ सर्वत्र सावधान अथवा शाहणा- ३ उजवें.

## दा

दांग- प्रा॰ ना॰ अरण्य अथवा वन- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ८- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ४८२- ४८३- भा॰ अ॰ १२ ओ॰ २६२.

दांध- प्रा॰ ना॰ ग्रामादिदहन- भा॰ अ॰ २ ओ॰ ७०२.

दाटणें- प्रा॰ धा॰ ना॰ दाबणें- दडपणें विवे॰ पू॰ प्र॰ २ ओ॰ ६६- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ १६९.

दादुगें- प्रा॰ वि॰ बलात्य- अनिवार- भा॰ अ॰ १ ओ॰ २३८.

दाता- सं॰ वि॰ देणारा.

दातिरें- प्रा॰ वि॰ दंताळ- दांताळ.

दाथर- सं॰ ना॰ उकाडा अथवा उकाडपाक- भा॰ अ॰ ७ ओ॰ १४७.

दादर- प्रा॰ ना॰ सुषुम्नानाडीद्वार- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २७१- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰

दादुला- प्रा॰ ना॰ १ दादला अथवा पति- अमृ॰ प्र॰ १ ओ॰ २७- २ स्वामी- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १७३३- ३ वि॰ श्रेष्ठ- भा॰ अ॰ ४ ओ॰ ९५.

दाम- सं॰ ना॰ दांवें- पुष्पमाला.

दाम- प्रा॰ ना॰ पैसा-

दामोरला- प्रा॰ ना॰ पैसा- भा॰ अ॰ ५ ओ॰ १५८.

दामोदर- सं॰ ना॰ रत्नखचितमंदिर. दा॰ द॰ ८ स॰ ५ ओ॰ ५.

दाय- सं॰ ना॰ १ वडिलोपार्जितधन. २ वांटा.

दार- सं॰ ना॰ स्त्री.

दारव्य- सं॰ अप॰ ना॰ दार्ढ्य- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १८०.

दारु- सं॰ ना॰ काष्ठ.

दारुक- सं॰ ना॰ कृष्णसारथी-

दारुकायंत्र- सं॰ ना॰ काष्ठपुतळी ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ८२.

दारुण- सं॰ ना॰ १ भयंकर- २ प्रखर

दाव- सं॰ ना॰ दावानल अथवा वणवा.

दाविणें- प्रा॰ धा॰ ना॰ देखणें अथवा पाहाणें- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १२८.

दासटपण- सं॰ अप॰ ना॰ सेवा- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ४३८- ४३९.

दासटें- प्रा॰ वि॰ दाहक- ज्ञा॰ अ॰

११ओ०५६४-ज्ञा०अ०१७ओ०१२९.

दासटेपण-प्रा०ना० उध्धटपण-ज्ञा०अ०११ओ०५५४-५५५.

दास्यभक्ति-सं०ना०उपासनामार्गांतीलनवविधभक्तिरूपसाधनाचें सेवानामक सातवें अंग.

दाहक-सं०ना०अग्नि.

दाक्षायणी-सं०ना०पार्वती.

## दि-दी.

दिक्-सं०ना०दिशा.

दिक्कंठ-सं०ना० रावण.

दिगंबर-सं०ना०परमहंस सन्यासी-२ वि० दिशारूपवस्त्र आहे ज्यास असा तो.

दिग्वक्र-सं०ना० रावण.

दिग्वल्कली-सं०वि०दिगंबर.

दिठिवा-सं०अप०ना० रूपाजल-ज्ञा०अ०९ओ०२५.

दिठी-सं०अप० दृष्टि-अमृ०प्र०४ ओ०३५.

दिनकर-सं०ना० सूर्य.

दिनमणि-सं०ना० सूर्य.

दिन्हणें-प्रा०धा०ना०देणें.

दिय-सं०अप०ना० दिवस-ज्ञा०अ० ११ओ०१६८-ज्ञा०अ०३ओ०२२.

दिवाभीत-सं०ना०घुबड.

द्दिवि-सं०अप०ना० दिवा-अमृ० प्र०६ओ०९५.

दिवो-सं०अप०ना०दिवस-अमृ०प्र० १ओ०४२.

दिव्यरस-सं०ना०अमृत.

दिशा-सं०ना०पूर्वादि अष्टदिशांत्यां एकेकीचें नाव.

दिशा-प्रा०ना० हगवण-दा०द०२ स०६ओ०२७.

दिशाचक्र-सं०ना० तेज-ज्ञा०अ० ११ओ०३१५.

दिह-सं०अप०ना०दिवस-अमृ० प्र०५ओ०४५

दी-सं०अप०ना० दिवस.

दीर्घद्वेष-सं०ना० अत्यंतद्वेष.

दीपन-सं०ना० प्रखरक्षुधा-ज्ञा० अ०११ओ०४२७

दीपी-प्रा०ना० समुद्र-ज्ञा० अ० १०ओ०७.

दीप्ति-सं०ना०प्रकाश अथवा तेज.

## दु-दू.

दुआळी-प्रा०ना०क्लेशबुध्धि-ज्ञा० अ०१३ओ०२६६.

दुकाळ-सं०अप०ना०दुष्काळ.

दुकोळ-सं०अप०ना०दुष्काळ-दा०द०१४स०८ओ०४४.

दुःख-सं०ना०विषयसुख-ज्ञा०अ० ५ओ०१२८.

दुगुलें- प्रा॰वि॰ अति रोडकें भा॰अ॰ ११ओ॰१२८६.

दुगुळें- प्रा॰वि॰ दुर्बळ- ज्ञा॰अ॰१५ ओ॰२१८.

दुग्धसार- सं॰ना॰ लूप.

दुजें- प्रा॰वि॰ द्वैत.

दुथडी- प्रा॰ना॰ नदी- ज्ञा॰अ॰९ ओ॰६२.

दुबधिक्षीरोदकी- प्रा॰ना॰ दुमज लीपातळ- अमृ॰प्र॰७ओ॰१४७.

दुभणें- प्रा॰धा॰ना॰ पान्हा घालणें- अमृ॰प्र॰७ओ॰९९.

दुर्भर- सं॰ना॰ पोट- उ॰॥ एका दुर्भ राकारणें॥ नाना नीचांची सेवा करणें॥ इ॰

दुर्भेद- सं॰वि॰ भेदायास कठिण अ सें तें.

दुरा- प्रा॰ना॰ नवा खणिलेला पाणवि ऱ्हा- दा॰द॰१६स॰४ओ॰७.

दुरित- सं॰ना॰ पातक.

दुरीदृष्टा- सं॰अप॰वि॰ दूरद्रष्टा.

दुर्घाड- प्रा॰वि॰१ कठिण- ज्ञा॰अ॰ ७ओ॰७९-२ द्वैतरूप- दुर्घट- अमृ॰ प्र॰६ओ॰८७

दुर्वाद- सं॰ना॰ दुर्वाक्य.

दुश्चित- सं॰वि॰ खिन्न- खिन्न चित्त

दुस- प्रा॰ना॰ प्रमेय- ज्ञा॰अ॰१८ ओ॰८३.

दुसरा- प्रा॰ना॰ हार- ज्ञा॰अ॰१५ ओ॰४१८-४१९.

दुहणें- सं॰अप॰धा॰ना॰ दोहन करणें.

दुहिता- सं॰ना॰१ कन्या-२ सून.

दूरशी- प्रा॰वि॰ रजस्वला.

दूस- प्रा॰ना॰ वस्त्र- ज्ञा॰अ॰ १५ओ॰८३.

दृढव्रत- सं॰वि॰ ब्रम्हचर्यसंपन्न.

दृती- सं॰ना॰ सुवास अथवा सुगंध.

दृश्य- सं॰वि॰ दिसण्यास योग्य अ सें-२ना॰ प्रकटपदार्थ.

दृश्यानुविध्धसमाधि- सं॰ना॰ दृश्यपदार्थ बाधित करून जें सच्चिदा नंद स्वरूप पाहाणें त्याचें नाव.

दृष्टादृष्ट- सं॰वि॰ इहपर असें ज्ञा॰अ॰९ओ॰५०८.

## दे.

देव- सं॰ना॰१ द्योतनरूप तो-२ त्रि दश.

देवगंधर्व- सं॰ना॰ पूर्वकल्पींतप करून गंधर्वत्व पावले असे चिरवा सी लोकांहून खालच्या पदवीचे व म नुष्य गंधर्वाहून वरल्या पदवीचे देवते.

देवगर्भ- सं॰वि॰ देवतुल्य.

देवगुरु- सं॰ना॰ बृहस्पति.

देवढा- प्रा॰वि॰ अधिक- ज्ञा॰अ॰ १५ओ॰१००.

देवतटिनी- सं॰ना॰ भागिरथी.

देवर - सं० ना० दीर- नवऱ्याचाभा ऊतो.

देवराज - सं० ना० इंद्र.

देवऋषी - सं० अप० ना० देवर्षि म्हणजेनारद.

देवलंड - सं० अप० वि० देवांप्रीत्य र्थकर्मेंन करणारा.

देवव्रत - सं० ना० भीष्माचार्य.

देवांगण - सं० ना० १ गंधर्वनगर- २ मिथ्याकल्पना. अमृ० प्र० ६ओ० ३९

देवापगा - सं० ना० देवनदी म्हण जेभागीरथी.

देविक - सं० ना० देव अथवागुरुस्वा मी- ज्ञा० अ० १० ओ० १४७.

देविका - सं० ना० दैवीसंपत्ति- अमृ० प्र० १० ओ० ६.

देव्हडें - प्रा० वि० अधिक- ज्ञा० अ० ७ओ० ७७- भा० अ० ८ ओ० २७५.

देव्हारा - सं० अप० ना० देवालय.

देशवळ - सं० अप० वि० प्राकृत- प्र कृतिरूप- विवे० पू० प्र० ३ओ० ९.

देशपरिछेदरहित - सं० वि० अमु क देशीं आहे व अमुक देशीं नाहीं असें ज्यावस्तु च्याठायीं नाहीं त्याचें नाव.

देशाउर - सं० अप० ना० देशावरी- भा० अ० २१ ओ० ४५७.

देशाधिपति - सं० ना० देशाचामु ख्यतो.

देशिक - सं० ना० श्रीगुरु.

देशी - सं० अप० वि० देशसंबंधी- ज्ञा० अ० १२ ओ० १२.

देसाई - सं० अप० ना० देशमुख्य अ थवा देशमुख.

देहं - सं० अप० ना० दिवस- ज्ञा० अ० ७ओ० १५८- भा० अ० २३ ओ० ३३८.

देहचतुष्टय - सं० ना० स्थूल- सूक्ष्म -कारण- महाकारण- यांचासमुच्चय.

देहधर्म - सं० ना० जन्मआणिमृत्यु.

देहबुध्दि - सं० ना० मी देह अशी भावना.

देहुडें - प्रा० वि० दीढचरणी- उ० देहु डाचेरणु वाजवितो वेणु॥ गोपिकारम णुस्वामी माझा॥१॥ इ०॥

देहुडी - प्रा० ना० चौकी.

## दै- दो.

दैत्यगुरु - सं० ना० शुक्राचार्य.

दैनंदिनप्रलय - सं० ना० च्यारयु गें सहस्त्रवेळा गेलीं म्हणजे जो ब्रह्मां डांतनित्य प्रलय होतो तो.

दैना - सं० अप० ना० दैन्य अथवा हलाखी.

दोघुलेपण - प्रा० ना० दोन्हीपण- अमृ० प्र० १ ओ० ६.

दोणी - प्रा० ना० होडगें- ज्ञा० अ० १४ ओ० ३०.

दोर्दंड - सं० ना० बाहु.

**द्योश**- सं०अप०ना० उद्देश-ज्ञा०अ० १३ओ०७८८.

**दोहडा**- प्रा०ना० दोहोरा.

**दोहद**- सं०ना० डोहोळा.

**द्योहा**- सं०अप०ना० दिवस-ज्ञा०अ० १ओ०१७३.

**द्युमणि**- सं०ना० सूर्य

**द्योतक**- सं०वि० प्रकाशक.

**द्रवीण**- सं०ना० द्रव्य.

**द्रव्यशक्ति**- सं०ना० १ पंचतन्मात्रा म्हणजे विषय-२ भूतें.

**द्रष्टा**- सं०ना० दृश्याचें जाणतेंजेंज्ञानतें-२ पाहणारा.

**द्रष्टांत**- सं०अप०ना० दृष्टांत विषय वस्तु.

**द्रु**- सं०ना० वृक्ष.

**द्रुम**- सं०ना० वृक्ष.

**द्रुहिण**- सं०ना० ब्रम्हदेव.

**द्रोण**- सं०ना० द्रोणाचार्य.

**द्रोणी**- सं०ना० कढई.

**द्रोण्य**- सं०अप०ना० अश्वथ्थामाद्रोणपुत्र.

**द्रोह**- सं०ना० द्वेष.

**द्रौणी**- सं०ना० अश्वथ्थामा.

**द्वंद्व**- सं०ना० कष्ट-विघ्न-ज्ञा०अ० १२ओ०६१.

**द्वंद्वमोह**- सं०ना० सुखदुःख.

**द्वादशार्का**- सं०ना० दशेंद्रियेंमनबुध्धि.

**द्वादशाविकल्प**- सं०ना० सत्-असत्-सदसदोभयात्मक-सदसद्विहीन-भिन्न-अभिन्न-भिन्नाभिन्नोभयात्मक-भिन्नाभिन्नोभयविहीन-सावयव-निरावयव-सावयवनिरावयवोभयात्मक-सावयवनिरावयवविहीन असे शास्त्रांत मायेविषयीं बाराविकल्प आहेत त्याचें नाव.

**द्वापरयुग**- सं०ना० चौकडींतील तिसरें युग.

**द्विज**- सं०ना० १ ब्राम्हण-२ पक्षी ३ दांत.

**द्विजराज**- सं०ना० चंद्र.

**द्विजिव्ह**- सं०ना० सर्प.

**द्विट्**- सं०ना० शत्रु.

**द्विप**- सं०ना० हत्ती.

**द्विपंचरथ**- सं०ना० दशरथ.

**द्विपंचवदन**- सं०ना० रावण.

**द्विमुख**- सं०ना० अग्नि.

**द्विमूर्धन**- सं०ना० अग्नि.

**द्विरद**- सं०ना० हत्ती.

**द्विरेफकु**- सं०अप०ना० द्विरेफ अथवा भ्रमर-ज्ञा०अ०१४ओ०२८७

## ध-

**धगाधगीत**- प्रा०वि० तेजःपुंज.

**धट**- प्रा०ना० १ मोठा गजबा.

२ निश्चय-ज्ञा०अ०६ओ०५२.
३ वि० निर्भय अथवा धट्ट.
धटिंगण- प्रा० ना०१ दांडगा पुरुष-
उ०॥ खेळतां नट के दशावतारीं॥ तेथें वा
टली सुंदर नारी॥ नेत्र मोडिती कळाकु
सरी॥ परीते अवघे धटिंगण॥१॥-
२ वि० दांडगा अथवा उगरणा.
धड- प्रा० ना०१ कबंध अथवा निर्मुं
डशरीर-२ वि० यथास्थित-अविछि
न्न.
धडफुडें- प्रा० वि०१ खरें-२ क्रि०
अव्य० खरोखरी- भा०अ०५ओ०४८
धडौतें- प्रा० वि० सुशोभित- ज्ञा०
अ०११ओ०७१.
धणी- प्रा० ना०१ इच्छा- ज्ञा०अ०८
ओ०५५-२ तृप्ति- भा०अ०२ओ०
५६९-३ स्वामी.
धनंजय- सं० ना० अग्नि-१ अर्जु
न-२ पंच उपप्राणांतील जांभई उत्प
न्नकरणारा शरीरस्थ पांचवा वायु.
धनद- सं० ना० कुबेर.
धनप- सं० ना० कुबेर.
धनरमण- सं० ना० कुबेर.
धनुर्वाड- सं० अप० वि० धनुर्विद्या
निपुण.
धनुर्वेद- सं० ना० च्यार उपवेदांती
लएकवेद- ज्यांत अस्त्रविद्याप्रकार
सांगिलला आहे तो
धन्वंतरी- सं० ना० चतुर्दशरत्नां
तील एक प्रसिध्ध वैद्य-२ वि० य
शस्वी अथवा पद्महस्ती.
धन्वरा- सं० अप० ना० धनुर्धर पु
रुष.
धन्वी- सं० ना० धनुर्धर पुरुष.
धबाधबा- प्रा० ना० पाण धबधबा.
२ क्रि० वि० धबाधब.
धमनी- सं० ना०१ फुंकणी-२ शरी
रस्थ शिरा.
धर्म- सं० ना०१ स्वाभाविक गुण-
२ दान.
धर्मधेनु- सं० ना० हरळी- ज्ञा०
अ०१६ओ०३२८-३२९.
धर्मशास्त्र- सं० ना० चार उपशा
स्त्रांतील चौथें शास्त्र त्याचे अंतर्ग
तभेद साहा आहेत ते असे-१ सां
ख्य-२ पातंजली-३ पाशुपत-४
वैष्णव-५ रामायण- आणि ६ महा
भारत- हे साही ग्रंथ अथवा यांचीम
तें धर्मशास्त्रांत मोडतात.
धर्मसेतु- सं० ना० धर्ममर्यादा.
धर्मालय- सं० ना० धर्मशाळा.
धर्मी- सं० ना० स्वाभाविक धर्मा
स अथवा गुणास जें अधिकरण म्ह
णजे स्थान त्याचें नाव.
धरणी- सं० ना० पृथ्वी.
धरत्री- सं० ना० पृथ्वी.
धरा- सं० ना० पृथ्वी.
धराकुमारी- सं० ना० सीता.

धराधर - सं० ना० पर्वत.
धराधरेंद्र - सं० ना० हिमालयपर्वत.
धराधिपाल - सं० ना० राजा.
धरामर - सं० ना० ब्राम्हण.
धरारुह - सं० ना० वृक्ष.
धरिणें - प्रा० धा० ना० राहणें - ज्ञा० अ० ७ ओ० ८१.
धव - सं० ना० पति - नवरा.
धवल - सं० वि० शुभ्र.
धवळार - सं० अप० ना० १ धवलाल य म्हणजे गच्ची - २ सुशोभितघर - ज्ञा० अ० ३ ओ० २६८.
धसाळ - प्रा० वि० १ विसराळू - ज्ञा० अ० ११ ओ० १६१ - २ मोठें - ज्ञा० अ० १८ ओ० ७५१.
धसाळू - प्रा० वि० वेडा - ज्ञा० अ० ११ ओ० ६०९ - ६११.

## धा

धाटी - प्रा० ना० १ धाटणी अथवारी त - २ नानाप्रकार
धाडी - प्रा० ना० धाड अथवा परच क्र - भा० अ० २३ ओ० ३१५.
धांडोळा - प्रा० ना० शोध - अमृ० अ० ७ ओ० ७.
धाणें - प्रा० धा० ना० तृप्तहोणें.
धाल - प्रा० ना० कल्पिलगोष्ट - दा० द० ४ स० २ ओ० १०.
धाता - सं० ना० ब्रम्हदेव.
धातुराशी - सं० अप० ना० धातु राशी म्हणजे देह - ज्ञा० अ० १७ ओ० ३६३ - ३६४.
धातुर्वाद - सं० ना० सुवर्णविद्या म्हणजे किमया - ज्ञा० अ० ६ ओ० ३४.
धात्री - सं० ना० दायी अथवा दाई.
धात्री - सं० अप० ना० धरत्री अथ वा पृथ्वी - ज्ञा० अ० १२ ओ० १४८.
धांदा - प्रा० ना० १ दोरा - २ अखंड ल - ज्ञा० अ० १३ ओ० ३०५.
धादांत - प्रा० ना० आप्तप्रतिति अथवा अनुभव - उ० ॥ धादांत बो लणें समजील ॥ तैसें माझें ॥ इ०
धाधावणें - प्रा० धा० ना० खाखा वणें - फार भुकावणें
धानी - सं० ना० नगरी.
धान्यवणवा - सं० अप० ना० धा न्यवणवा म्हणजे धान्यजळणी उ० अग्नलागलाशेतीं ॥ धान्य वणव्या आणि खडकुती ॥ सुक्षदंडजळोनि जाती ॥ अकस्मात ॥ १ ॥ -
धाम - सं० ना० १ तेज - २ स्वरूप ३ घर - उ० ॥ नत्यागिता अहंभाव स्थिती ॥ केल्यानाना उपाययुक्ति ॥ तेणें निज धामा प्रती ॥ नव्हे गतीस र्वथा.
धाय - प्रा० ना० हंबरडा - हाक - भा० अ० ६ ओ० २४२ - आ० पं० १

स०५ओ०७२.

धायपण- प्रा० ना० पालन- संरक्ष
ण.

धाया- सं० अप० ना० धात्रीम्हणजे
दाई- ज्ञा० अ० १८ ओ० १७२.

धार- प्रा० ना० वेगवान् उदकप्रवा
ह.

धारू- प्रा० ना० १ युध्ध- अमृ० प्र०
७ ओ० ४- २ धाक- दा० द० २ स० १ ओ०
५७.

धारणा- सं० ना० बुध्धि- २ अष्टांग
योगांतील सातवें अंग त्याचें नाव.

धारणु- प्रा० ना० वाळलें काष्ट- ज्ञा०
अ० १३ ओ० ७२४.

धारणेंपारणें- प्रा० ना० एकादिव
साआड भोजनाचें व्रत.

धारसा- प्रा० ना० १ लोकरूढी- २ उ
दक प्रवाह- ज्ञा० अ० ६ ओ० ४७४.

धारसें- प्रा० ना० धारणा- ज्ञा० अ०
७ ओ० ७९.

धाराधर- सं० ना० मेघ.

धाराधरकाळ- सं० अप० ना० व
र्षाकाळ.

धालेपण- प्रा० ना० तृप्ति- विवे०
पू० प्र० १ ओ० १०.

धावकारू- प्रा० ना० पाठिराखा
अथवा धावणारा- अमृ० प्र० २ ओ० २

धांवणें- प्रा० ना० रक्षण- उ० परतें
सारूनवैभव॥ भक्तांच्या धांवण्या धांवें
देव ॥.

धांवा- प्रा० ना० धावण्यासाठीं के-
लेली विनवणी म्हणजे धांवगीत त्या
चें नाव.

## धि-धु-धू.

धिंग- प्रा० ना० गजरधूम- उ० धन्य
धन्य पांडुरंग॥ अखंड कथेचा धिंग॥

धिटीव- प्रा० ना० धीटपण॥ ज्ञा०
अ० ९ ओ० २३.

धिवसा- प्रा० ना० धैर्य- ज्ञा० अ०
७ ओ० १०- ज्ञा० अ० १ ओ० ६८- अ
मृ० प्र० ६ ओ० ११- आ० पं० १ स० १-
ओ० ५.

धुई- प्रा० ना० धुकें- भा० अ० ९ ओ०
१८५.

धुर्जेटी- सं० अप० ना० धुर्जटी म्ह
णजे शिव.

धुंधुरू- प्रा० ना० काजवा- ज्ञा०
अ० ९ ओ० ९.

धुमाडु- प्रा० ना० अधिकला- ज्ञा०
अ० १४ ओ० २२७.

धुरधुर- प्रा० क्रि० अ० पुढें पुढें- ज्ञा०
अ० १५ ओ० १७२.

धुरसा- प्रा० ना० अग्रभाग-

धुरे-सं॰अप॰अव्य॰पुढें-उ॰का यमागों विठ्ठलधुरे॥ आम्हा तुळशीद ळपुरे॥.

धुसर-प्रा॰ना॰सुगंधीद्रव्य.

धूर्त-सं॰वि॰शाहणा-ठक.

धूप-सं॰ना॰धूर.

धूमयोनी-सं॰ना॰मेघ.

धूम्रमार्ग-सं॰ना॰धुमसार्गम्हणजे याती यालीचा मार्ग.

धूम्रपान-सं॰ना॰झाडास उलटें टांगून घेऊन खालीं धूर केलेला पीऊन तप करणें-२ गुरगुडी ओढणें-उ॰ धुम्रपान घेऊं नये॥ उन्मत्तद्रव्य सेऊं नये॥

धृति-सं॰ना॰धैर्य.

## धो.

धोकटी-प्रा॰ना॰शरीर.

धोका-प्रा॰ना॰धाक अथवा भय.

धोंडी-प्रा॰ना॰धोंगदगड अथवा धोंड.

धोरणु पडणें-प्रा॰धा॰ना॰सुषु म्नानाडी मार्ग सुगम होणें-ज्ञा॰अ॰६ ओ॰१५४.

धोवट-प्रा॰वि॰धुवट-शुध्ध.

ध्यान-सं॰ना॰१ मनोमय चिंतन २ अष्टांग योगांतील साहावें वृत्तिनि ग्रहरूप अंग तें-३ आकृती-चिन्ह उ॰॥ सुंदर तें ध्यान उभें विटेवरी-कर कटावरी ठेऊनीयां॥

ध्रुव-सं॰ना॰१ एकराजा-२ एक तारा-३ वि॰ निश्चळ.

ध्वजिनी-सं॰ना॰सेना.

ध्वनि-सं॰ना॰शद्ब-२ संशय-ज्ञा॰अ॰७ ओ॰१७-३ भावार्थ-ज्ञा॰ अ॰८ ओ॰१२३-४ अभिप्राय-ज्ञा॰ अ॰११ ओ॰३२९.

ध्वनित-सं॰वि॰अस्पष्ट अथवा गुप्त.

ध्वांत-सं॰ना॰अंधःकार.

ध्वान-सं॰ना॰शद्ब.

## न

नई-सं॰अप॰ना॰नदी-ज्ञा॰अ॰ १८ ओ॰१६२.

नकुळ-सं॰ना॰१ मुंगूस-२ एका पांडवाचें नाव.

नक्तंचर-सं॰ना॰राक्षस.

नखाक्ष-सं॰ना॰राक्षस.

नग-सं॰ना॰पर्वत-वृक्ष.

नग-प्रा॰ना॰दागिना-उ॰॥ प्राकृ तभाषा रूप सुवर्णनगीं॥ अठराश्लो करत्नें जडिलीं प्रसंगीं॥

नगारि-सं॰ना॰इंद्र.

नगारिशत्रु-सं॰ना॰रावणपु त्र इंद्रजीत.

**नघापणें**-प्रा० धा० ना० नघालणें-ज्ञा० अ० ९ ओ० ४५९.
**नटकणें**-प्रा० धा० ना० १ नराहणें ज्ञा० अ० ८ ओ० १८३-२ निर्फळ होणें. ज्ञा० अ० १० ओ० १६६.
**नठ्याळ**-प्रा० वि० नाथाळ अथवा नष्ट-द्वाड.
**नडनाच**-प्रा० ना० १ मिष-ज्ञा० अ० ९ ओ० १९७-२ अधिक्य-ज्ञा० अ० १५ ओ० २७१.
**नडनाचु**-प्रा० ना० १ उत्कर्ष-ज्ञा० अ० १० ओ० २३१-२३२-२ स्थिति-ज्ञा० अ० १३ ओ० २१६.
**नतद्रष्ट**-सं० वि० रूपण-दा० द० १२ स० २ ओ० ११
**नति**-सं० ना० नमन.
**नर्तन**-सं० ना० नाचणें.
**नदटणें**-प्रा० धा० ना० १ स्वादन घेववणें-ज्ञा० अ० ७ ओ० १९३-२ न दाटणें.
**नंदन**-सं० ना० पुत्र.
**नंदादीप**-सं० ना० अक्षयदीप.
**नंदिनी**-सं० ना० १ कन्या-२ कामधेनु.
**नदीन**-सं० ना० समुद्र.
**नदीप**-सं० ना० समुद्र.
**नफर**-प्रा० ना० चाकर-भा० अ० १३ ओ० १३६.
**नभ**-सं० ना० आकाश.

**नमनणें**-प्रा० धा० ना० न मानणें.
**नमम**-सं० सर्व० ना० माझें नाहीं असा संकल्प.
**नय**-सं० ना० न्याय.
**नयन**-सं० ना० नेत्र.
**नयोका**-सं० ना० नदी-ज्ञा० अ० १७ ओ० ३२३-३२४.
**नर**-सं० ना० १ मनुष्य-२ अर्जुन.
**नरदेह**-सं० ना० भारतवर्षीय मानव.
**नरपति**-सं० ना० १ राजा-२ पदाति प्रमुख.
**नरयान**-सं० ना० पालखी-मेणा आदिकरून.
**नरसिंह**-सं० ना० राजा-२ विष्णूचा चवथा अवतार.
**नरेंद्र**-सं० ना० राजा.
**नरेश**-सं० ना० राजा.
**नलद**-सं० ना० वाळा नामक सुगंधी पदार्थ.
**नवखंडें**-सं० ना० भारवर्षांतील नऊ भाग ते-नावें-१ इंद्रखंड-२ कशेरुखंड-३ ताम्रखंड-४ गभस्तिखंड-५ नागखंड-६ वारुणखंड-७ सौम्यखंड-८ ब्रम्हखंड-९ भरतखंड.
**नवगंध**-सं० ना० नूतन सुवास.
**नवगुण**-सं० ना० १ बुध्दि-२ सु

ख-३ दुःख-४ प्रयत्न-५ इच्छा-६ द्वेष-७ संस्कार-८ पुण्य-९ पाप-असे न्याय शास्त्रोक्त नवगुण ते.

**नवचणें** - प्रा० धा० ना० न जाणें- ज्ञा० अ० १२ ओ० १८८- विवे० पू० प्र० २ ओ० २- भा० अ० २ ओ० ६९.

**नवजणें** - प्रा० धा० ना० नवचणें.

**नवनीत** - सं० ना० १ लोणी-२ सार.

**नवरस** - सं० अप० ना० नऊरस-त्यांचीं नावें-१ श्रृंगाररस-२ वीररस ३ करुणारस-४ अद्भुतरस-५ हास्यरस-६ भयानकरस-७ बिभत्सरस-८ रौद्ररस-९ शांतिरस.

**नवलपण** - प्रा० ना० नवेपण- अनोळख- ज्ञा० अ० ७ ओ० १७७.

**नववधु** - सं० ना० नोवरी अथवा नवरी.

**नवविधाभक्ति** - सं० ना० उपासना मार्गोक्त नऊ अंगात्मक भक्ति-त्यांचीं नावें-१ श्रवण-२ कीर्तन-३ नामस्मरण-४ पादसेवन-५ अर्चन-६ वंदन-७ दास्य-८ सख्य-९ आत्मनिवेदन.

**नवसर** - सं० ना० नवलडाग.

**नवा** - सं० अप० वि० १ नूतन-२ तरुण

**नवाई** - प्रा० ना० अपूर्वता- ज्ञा० अ० १५ ओ० ४११.

**नवांजणें** - प्रा० धा० ना० स्तवन करणें- दा० द० १५ स० ५ ओ० २०.

**नवाळी** - प्रा० ना० प्राप्ति- भा० अ० ३ ओ० ३४७.

**नवोढा** - सं० ना० नववधु.

**नव्हाळी** - प्रा० ना० प्राप्ति- ज्ञा० अ० १ ओ० ४२- विवे० पू० प्र० १ ओ० १- दा० द० १ स० ८ ओ० २२

**नसरतें** - प्रा० वि० निंद्य- हीन- भा० अ० ४ ओ० १२५.

**नहुष** - सं० ना० ययाती राजाचा बाप.

## ना

**ना** - प्रा० अव्य० ना तरी अथवा नाहीं तर- अमृ० प्र० ५ ओ० ५८.

**नाना** - प्रा० अव्य० १ नाहींतर-२ किंवा- ज्ञा० अ० १८ ओ० ४०८- भा० अ० १ ओ० ६२.

**नाना** - सं० ना० १ अनेक प्रकार- दा० द० १ स० १ ओ० १०-२ वि० अनेक- भा० अ० ५ ओ० १४०.

**नाक** - सं० ना० स्वर्ग अथवा इंद्रलोक.

**नाकवणी** - प्रा० ना० नाकांत ओतावयाचे तीक्ष्ण पदार्थ.

**नाकेश** - सं० ना० इंद्र.

**नाग** - सं० ना० १ हत्ती-२ सर्पाची जाती.

**नाग** - प्रा० ना० बचनाग- भा० अ०

ओ॰३४९.
नागर- सं॰ वि॰ चांगलें.
नागरलोक- सं॰ अप॰ ना॰ नागरिक म्हणजे नगरवासीलोक.
नागरू- सं॰ अप॰ वि॰ नागर अथवा चांगलें- अमृ॰ प्र॰ १ ओ॰ ५.
नागवण- प्रा॰ ना॰ १ दरवडा- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ १८-२ बुडणूक भा॰ अ॰ २० ओ॰ १५१.
नागवणें- प्रा॰ धा॰ ना॰ नाटोपणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ २७.
नागानन- सं॰ ना॰ गणपति.
नागारि- सं॰ ना॰ गरुड- गारुडी.
नागोवा- प्रा॰ ना॰ लूट अथवा नागवण- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ८५.
नाट- प्रा॰ ना॰ १ आकार- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १०९-२ ठाव- ठिकाण- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ९५
नाटकी- सं॰ ना॰ बहुरूपी.
नाट्य- सं॰ ना॰ नृत्य.
नाड- प्रा॰ ना॰ प्रतिबंध- भा॰ अ॰ १३ ओ॰ २०१.
नाडणें- प्रा॰ धा॰ ना॰ नडणें- अडकणें- भा॰ अ॰ १ ओ॰ ४२.
नाडर- प्रा॰ ना॰ थिल्लर अथवा डबकें- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ३६७.
नाणवटा- प्रा॰ ना॰ नाणेंविकरीनी जागा- भा॰ अ॰ ५ ओ॰ १०१.
नाडक- प्रा॰ ना॰ नाडीमार्ग- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २४८.
नाते- प्रा॰ अव्य॰ नाहीं तर- नाहीतरी अथवा नातरी- भा॰ अ॰ १- ओ॰ ३७.
नाथ- सं॰ ना॰ १ पती- स्वामी- २ वि॰ मुख्य.
नाथणें- प्रा॰ धा॰ ना॰ नंसणें.
नाथिलें- प्रा॰ वि॰ लटकें- विवे॰ पू॰ प्र॰ ७ ओ॰ ४५. ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १२६- अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ६. वा॰ ओ॰ ४१७.
नाद- सं॰ ना॰ १ ध्वनि- २ मध्यमावाणी- अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ६३.
नादासकळु- सं॰ अप॰ ना॰ वैखरी आदिवाणी.
नादी- सं॰ ना॰ श्रवणव्यापार- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १५.
नापुवणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ लहानावणें- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २५८.
नाबद- सं॰ ना॰ एकजातीची साकर.
नामधेय- सं॰ ना॰ उपासनाकांड आ॰ पं॰ २ स॰ १ ओ॰ २३.
नामस्मरणभक्ति- सं॰ ना॰ उपासनामार्गीतील नवविधाभक्तिरूपसाधनाचें तिसरें अंग.
नायक- सं॰ ना॰ अधिपति- २ वि॰ मुख्य.

नारकी-सं॰वि॰नरकवासी.
नारदपांचरात्र-सं॰ना॰विष्णुउपासना विधिपरग्रंथ तो.
नाराच-सं॰ना॰बाण.
नाराज-सं॰अप॰ना॰नाराच-ज्ञा॰अ॰१६ओ॰२४२-२४३.
नावभर-प्रा॰अव्य॰क्षणभर-ज्ञा॰अ॰९ओ॰२८२.
नांवाणिगें-प्रा॰वि॰नामांकित-भा॰अ॰१३ओ॰१७६.
नावानावा-प्रा॰अव्य॰घडिघडि-ज्ञा॰अ॰९ओ॰४२.
नावानिगें-प्रा॰वि॰नामांकित-ज्ञा॰अ॰१६ओ॰३५.
नावेक-प्रा॰अव्य॰१क्षणभरअथवा अमळ-ज्ञा॰अ॰१ओ॰७२-भा॰अ॰१ओ॰१७४-२वि॰थोडेसें.
ज्ञा॰अ॰१०ओ॰३२७.
नाश-सं॰ना॰१हानी-२यम.
नासा-सं॰ना॰नाक.
नासिक-सं॰ना॰नाक.
नासिक-सं॰अप॰ना॰नाश-प॰भ॰९ओ॰११.
नाहींगवणे-प्रा॰धा॰ना॰नागवणें.
नाहो-प्रा॰ना॰पतिअथवानवरा-ज्ञा॰अ॰३ओ॰२२६.

## नि-नी.

निकट-सं॰शब्द॰अव्य॰जवळ-संनिधान.
निकर-सं॰ना॰समूह.
निकर-प्रा॰ना॰निक्षुणपण.
निकवडा-प्रा॰वि॰निष्कांचन.
निकषपाषाण-सं॰ना॰कसवटीदगड.
निकुर-प्रा॰ना॰निश्चय-२अव्य॰निश्चयें-ज्ञा॰अ॰१३ओ॰६२०
निकृंतन-सं॰ना॰छेदन.
निकें-प्रा॰वि॰१नेटकें अथवा चांगलें-ज्ञा॰अ॰१६ओ॰५४.
२बरवें अथवा बरें-वा॰ओ॰४७६३.
निखंड-सं॰अप॰ना॰निषेध-दा॰द॰२स॰२ओ॰१२.
निखेद-सं॰अप॰ना॰निषेध.
निखळ-सं॰अप॰वि॰निष्कळ-शुध्ध.
निगद-सं॰वि॰निरोगी.
निगदणें-प्रा॰धा॰ना॰बोलणें
अमृ॰प्र॰५ओ॰११.
निगदु-प्रा॰ना॰सेवानिर्धाराची शपथ-ज्ञा॰अ॰८ओ॰१२४.
निगम-सं॰ना॰वेद.
निगा-प्रा॰ना॰देखरेख-दा॰द॰२स॰१ओ॰५०
निगुती-प्रा॰वि॰निभ्रांत-यथार्थ-ज्ञा॰अ॰४ओ॰९२.

निगूढ-सं०वि०गुप्त.
निर्गम-सं०ना० सुटका-मोकळीक.
निर्गुण-सं०ना०१ त्रिगुणरूपगुणाचा स्पर्श नाहीं असें ब्रम्ह-२ वि० गुणरहित.
निर्गुणसायुज्य-सं०ना० ब्रम्हसायुज्य मोक्ष.
निर्गुणसाक्षात्कार-सं०ना० जीवास जीवत्व त्यागें ब्रम्हरूपता त्याचें नाव.
निघंट-सं०ना० व्याकरण.
निघोट-प्रा०वि० सघन अथवा परिपूर्ण-विवे०पू०प्र०३ओ०१३.
निचाड-प्रा०वि०१ निष्काम-ज्ञा० अ०२ओ०२८१-२ निगरजु-दा० द०२स०१ओ०३३.
निज-सं०ना०१ आत्मस्वरूप अथवा स्व स्वरूप-२ विश्वरूप-ज्ञा० अ०११ओ०४०७-३ मन-ज्ञा०अ० ९ओ०४६५-४ वि० स्वकीय.
निजजन-सं०ना० स्वकीयजन अथवा भक्त ज्ञा०अ०१८ओ०१
निजदाळ-प्रा०ना० स्वाभाविक गति-भा०अ०३ओ०६५०.
निजतेज-सं०ना० स्वकीयतेज-स्वस्वरूप.
निजत्व-सं०ना० निजरूप.
निजधाम-सं०ना० निजतेज म्हणजे स्वरूप.
निजनिवाड-प्रा०ना० निजस्वरूपभाव-भा०अ०१ओ०११.
निजज्ञानी-सं०ना० आत्मज्ञानी.
निजांगें-सं०अप०ना०१ निर्विषयत्व-ज्ञा०अ०६ओ०२४-२ वि० निर्विषयरूप-३ अव्य० स्वतः...
निर्जर-सं०ना० देव.
निर्जर्षि-सं०ना० देवर्षि म्हणजे नारद.
निटिल-सं०ना० कपाल.
निडु-प्रा०ना० पाहा-नीड.
निडळ-सं०अप०ना० कपाळ-भा०अ०३ओ०८३४-ज्ञा०अ०१८ ओ०२२३.
निडार-प्रा०वि० निवडक.
निडारणें-प्रा०ना०१ पक्कदशा-ज्ञा०अ०६ओ०२६६-२ धा०ना० परिपक्क होणें-भा०अ०२ओ० १७५.
निटाळ-प्रा०अव्य० केवळ-ज्ञा० अ०१३ओ०१०८.
निर्णो-सं०अप०ना० निर्णयो अथवा निर्णय-अमृ०प्र०७ओ०११६.
नितंबिनी-सं०ना० स्त्री.
नितंब-सं०ना० कटीखालचा प्रदेश
नितंबु-सं०अप०ना० पाताळलोक-ज्ञा०अ०१४ओ०१०४.

निती-सं० अप० ना० नीतीशाइपाहा.
नित्य-सं० वि० १ शाश्वत-२ नेहमींचें अथवा प्रति दिवशींचें.
नित्यकर्म-सं० ना० प्रतिदिवशीचें कर्म
नित्यनिरस्ताखिलअमंगल-सं० अप० वि० सकलअमंगलाहून सर्वदा निर्लेप..
नित्यप्रलय-सं० ना० दैनंदिन प्रलय म्हणजे शरीरात जशी निद्रा आल्यानें जीवास नित्यप्रलय होतो त्याच प्रमाणें च्यारयुगाचीएक चौकडी अथवा पर्याय हजार वेळ गेल्यानें सकल व्यापार ब्रम्हांडीचें बंद पडतात त्याचें नाव.
नित्यमुक्त-सं० ना० साकार देह प्रकट होई होई तोंच ज्यास साकार गुरू वांचून स्वस्वरूप प्रत्यय आला तो त्या स्थितीचा पुरुष तो- ही स्थिती ईश्वरास असून त्याचे गुणावतारांतून शिव आणि विष्णु यांस हीतीच स्थिती आहे. उ० अभंग॥ नित्यमुक्तिहरिहरा॥ तुझे रूपेंनें गुरुवरा॥१॥ गुरुसाकारावांचून॥ तेथें प्रगटलें ज्ञान॥२॥.
नित्यानित्यवस्तुविवेक-सं० ना० साधन चतुष्टयांतील पहिल्या साधनाचें नाव.
निद-सं० अप० ना० निद्रा-अमृ० अ० १ओ० १९.
निंदण-प्रा० ना० शेतांतील अडगवत-भा० अ० १० ओ० ५०९.
निंदणें-प्रा० धा० ना० वेणनें म्हणजे अडगवल कादणें.
निदसुरे-सं० अप० वि० निद्रालू दा० द० ११ स० ३ ओ० ५.
निदसुरेपण-सं० अप० ना० झोंप
निदळ-प्रा० वि० बिनगिलाव-भा० अ० ३ ओ० २४३.
निदाघ-प्रा० वि० निरर्थक-भा० अ० ३ ओ० २११.
निदाघु-प्रा० ना० चिंता-ज्ञा० अ० ११ ओ० २२४.
निदान-सं० ना० १ कारण-२ अंत-३ चिकित्सा.
निदिध्यास-सं० ना० ज्ञानमार्गांतील चतुर्विध साधनाचें तिसरें अंग
निदेश-सं० ना० आज्ञा.
निर्दलन-सं० ना० घात
निर्दळण-सं० अप० ना० निर्दलन भा० अ० २८ ओ० ६७६.
निर्देश-सं० ना० अमुक अशी खूण.
निधड-प्रा० वि० पराक्रमी-ज्ञा० अ० ५ ओ० १९०.
निधडा-प्रा० ना० १ शूरपुरुष-रुक्मि० अ० १२ ओ० ४-२ वि० धैर्यवान अथवा पराक्रमी.
निधन-सं० ना० मृत्यु.
निधान-सं० ना० रत्न.
निधान-प्रा० ना० आश्रय-सांठवण-ज्ञा० अ० ११ ओ० ३०८-ज्ञा० अ०

११ओ०५१५-५१६.

निधि-सं०ना० समुद्र.

निधीय-प्रा०ना० परिभ्रमण-ज्ञा० अ०१५ओ०१३६.

निर्धार-सं०ना० निश्चय.

निनाद-सं०ना० पडशद्ब.

निपजणें-प्रा०धा०ना० उत्पन्नहोणें

निपट-प्रा०अव्य० केवळ.

निपटण-प्रा०ना० निःशेषपण-अमृ०प्र०५ओ०५३.

निपटारें-प्रा०वि०हीन-आ०पं० २स०२ओ०३६.

निपसाद-प्रा०ना०१नीचत्व-२वि० नीच-भा०अ०३ओ०४३१.

निपात-सं०ना० अत्यंतपात.

निफजणें-प्रा०धा०ना० उत्पन्नहोणें

निंबलोण-प्रा०ना०कुर्वंडी.

निबळ-सं०अप०वि० मऊ-ज्ञा० अ०१७ओ०१२७.

निर्बंध-सं०ना० नियम अथवा बंधारण.

निर्बुजणें-प्रा०धा०ना० अडखळणें-घाबरणें-दिपणें-दा०द०२स० १ओ०१८.

निर्भर-सं०वि० अतिशयभरित अथवा पूर्ण.

निर्भ्रांत-सं०वि०भ्रांतिरहित अथवा निश्चित.

निमटणें-प्रा०धा०ना० निवटणें भा०अ०१४ओ०१०४.

निमणें-प्रा०ना०१लय-अमृ०प्र० ४ओ०४१-२धा०ना०लयास जाणें

निमथा-प्रा०ना० मस्तक अथवा माथा-ज्ञा०अ०५ओ०३२-ज्ञा० अ०६ओ०५४-ज्ञा०अ०१२ओ०५१.

निम्न-सं०वि० नम्र-लवलेलें.

निमाळुर-प्रा०वि०सुरेख-भा० अ०१४ओ०४७६.

निमित्तकारण-सं०ना० जेंकारण कार्यांतयेतनाहींतें-मृत्घटास जसा कुलाल निमित्तकारण-तसा विश्वायुक्तईश्वर ह्याजगास.

निमुठणें-प्रा०धा०ना० निमणें-ज्ञा०अ०११ओ०२३४.

नियंता-सं०ना० नियमनकर्त्ता ईश्वर.

नियतु-सं०अप०अव्य० नियत अथवा निरंतर.

नियम-सं०ना० अष्टांगयोगाचें दुसरें अंग-त्याचे अंतर्गत भेद१२त्यांचीं नावें-१ अंतर्बाह्य-२ द्विविधशौच-३ जप-४ तप-५ होम-६ श्रध्धा-७अतिथीपूजन-८ भगवद्दर्शन-९ तीर्थाटन-१०परार्थेहा-११ तुष्टी-१२आचार्यसेवन ह्मणजे गुरुभक्ति.

नियोग-सं०ना०आज्ञा.

निरंकुशातृप्ति-सं०ना० जीवास

ज्या सप्तावस्था आहेत त्यांतली फल रूप सातवी अवस्था.

निरखणें - सं॰ अप॰ धा॰ ना॰ पाहणें - अवलोकन करणें.

निरंजन - सं॰ वि॰ १ अस्पष्ट अथवा शुद्ध - २ निष्कलंक.

निरंतर - सं॰ वि॰ १ अंतररहित अथवा त्रिपुटी रहित - २ सदोदित.

निरतीशयानंद - सं॰ ना॰ श्रुतिसिध्ध जे मानुषानंदापासून ब्रम्हदेवापर्यंत अकरा आनंद आहेत ते सातिशयानंद होत - तसा जो नव्हे तो म्हणजे ज्यावर पुढें श्रेष्ठ आनंद नाहीं असा ब्रम्हानंद तो.

निरपत्रप - सं॰ वि॰ निर्लज्ज.

निरपेक्ष - सं॰ वि॰ निरिछ - वैराग्यशील.

निरय - सं॰ ना॰ नरक.

निरवडी - प्रा॰ ना॰ कौशल्य - रुक्मि॰ अ॰ १ ओ॰ २.

निरवणें - प्रा॰ धा॰ ना॰ स्वाधीन करणें - वा॰ ओ॰ ३१५०.

निरवधि - सं॰ वि॰ अत्यंत - बहुत - ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ५१.

निरंश - सं॰ वि॰ १ अंशरहित - २ ना॰ परब्रम्ह.

निरसणें - सं॰ अप॰ धा॰ ना॰ निरास करणें - नष्ट होणें.

निरहंकार - सं॰ वि॰ अहंकाररहित अथवा निरभिमान.

निरहर - प्रा॰ ना॰ बुद्धयादि मोहर - ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १७०.

निराभास - सं॰ वि॰ भासरहित

निरामय - सं॰ वि॰ व्याधिरहित.

निरास - सं॰ ना॰ निषेध - बाधितत्व.

निरालंब - सं॰ अप॰ ना॰ १ आकाश २ निराकारस्वरूप.

निरिखणें - सं॰ अप॰ धा॰ ना॰ पाहणें - वा॰ ओ॰ ७६०.

निरुज - सं॰ अप॰ वि॰ निरोगी - भा॰ अ॰ ६ ओ॰ ३७.

निरुती - प्रा॰ ना॰ भ्राति - ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २३१.

निरुतीहान - प्रा॰ अव्य॰ खरोखरी - अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ ७१.

निरुतें - प्रा॰ वि॰ १ खरें - ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ७० ज्ञा॰ अ॰ ओ॰ ९१ - विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ७ - अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ २३ - २ ना॰ खरेपण - अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ ८४ - ३ ना॰ निश्चय - ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ६७.

निरुपहिली - सं॰ ना॰ निरुपाधिकला - ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ४४० - ४४२

निरुपाधिकविवर्त - सं॰ ना॰ कोणिएक पदार्थ नसून भासला तो ज्ञान होतांच नष्ट होणें त्याचें नाव - जसा रज्जुसर्प.

निरूपिणें- सं॰अप॰धा॰ना॰ सांग णें-निरूपणकरणें.
निरें- प्रा॰वि॰शुध्ध.
निरोपण- सं॰अप॰ना॰ निरूपण
निलय- सं॰ना॰ स्थान.
निर्लेप- सं॰वि॰ अलिप्त-शुध्ध.
निवटणें- प्रा॰धा॰ना॰ निर्मूळक रणें-अमृ॰प्र॰७ओ॰७०-२वधक रणें-भा॰अ॰१ओ॰७२.
निवणें- प्रा॰धा॰ना॰शांत होणें- उ॰॥जो सद्गुरूवचनें निवाला॥ तोसा युज्यतेचा आंखिला॥
निवळ- प्रा॰वि॰१ स्पष्ट-२शुध्ध.
निवळणें- प्रा॰धा॰ना॰१ शुध्धहो णें-२ स्पष्टहोणें.
निवळी- प्रा॰ना॰ पाण्याचागाळ नासणारीबी.
निवाडु- प्रा॰ना॰१ निवाडा-२ नि वडकशब्द-ज्ञा॰अ॰९ओ॰५३३.
निवृत्ति- सं॰ना॰१ अंतर्सुखवृ त्ति-२ मोक्ष-३ निवर्तन-४ परमा र्थ.
निर्वच- प्रा॰ना॰ विचार-ज्ञा॰अ॰ १०ओ॰२६८-२६९.
निर्वचणें- प्रा॰धा॰ना॰१ कळणें- २ बोलतायेणें-ज्ञा॰अ॰१०ओ॰४४.
निर्वचु- सं॰अप॰ना॰ निर्वचनअ थवा भाषण.
निर्वाण- सं॰ना॰१ मोक्ष-ज्ञा॰अ॰ ९ओ॰४८९-२ अंत-३ वि॰ चरम अथवा शेवटील-४ कठिण-ज्ञा॰ अ॰६ओ॰२३९-५ अव्य॰केवल ज्ञा॰अ॰६ओ॰४७८.
निर्वाह- सं॰वि॰१ निर्वाह योग्य २ना॰ निर्वाहकर्णार अथवा वर्त णूककरणार.
निर्वाहो- सं॰अप॰ना॰ निर्वाहअ थवाउपजीवन-२ वर्तणूक.अथवा व्यवस्था.
निर्वाळणें- प्रा॰धा॰ना॰ निर्मळ करणें-ज्ञा॰अ॰१६ओ॰४०२-४०३.
निर्वाळा- प्रा॰ना॰ निवाडा-ज्ञा॰ अ॰१४ओ॰१२५-भा॰अ॰२२ओ॰ ५९२.
निर्विकल्प- सं॰वि॰१ कल्पनार हित-२ना॰परब्रम्ह.
निर्विकार- सं॰वि॰१ विकाररहि त-२ना॰ परब्रम्ह.
निर्विण्ण- सं॰वि॰१ विरक्त-२ना॰ विरक्तपुरुष.
निर्विशेष- सं॰ना॰१ ब्रम्ह-२ वि॰ विशेषनव्हे असेंतें.
निर्वेद- सं॰ना॰ विरक्ति-भा॰अ॰ ५ओ॰५६७.
निशब्द- सं॰अप॰ वि॰ शब्दरहित २ना॰ ब्रम्ह.
निशा- सं॰ना॰रात्र.
निशाकर- सं॰ना॰ चंद्र.

निशाचर- सं॰ ना॰ राक्षस.
निशाण- प्रा॰ ना॰ १ रणभेरी- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ २७१- २ लहानध्वज- दा॰ द॰ ४ स॰ ७ ओ॰ ७.
निशांत- सं॰ ना॰ १ प्रातःकाल- २ घर
निशि- सं॰ अप॰ ना॰ निशा अथवा रात्र.
निशीथ- सं॰ ना॰ मध्यरात्र.
निश्चयो- सं॰ अप॰ ना॰ निश्चय- दा॰ द॰ १ स॰ १ ओ॰ ५
निश्वास- सं॰ ना॰ वेद- अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ११.
निषाद- सं॰ ना॰ १ सप्तस्वरांतील सातवा स्वर- २ भिल्ल अथवा कोळीकिरात.
निषिध्धकर्म- सं॰ ना॰ करण्यास अयोग्य असें कर्म तें.
निषेध- सं॰ ना॰ धिःकार.
निषेधमुख- सं॰ ना॰ नामरूप त्यागार्थ जें श्रुती वचन तें.
निष्क- सं॰ ना॰ पदक.
निष्कर्म- सं॰ ना॰ १ ब्रह्म- २ वि॰ कर्मरहित.
निष्कल- सं॰ वि॰ निर्गुण.
निष्कर्ष- सं॰ ना॰ १ सिध्धांत- २ धांव- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २२५- ज्ञा॰ ओ॰ १७४९.
निष्कर्षु- सं॰ अप॰ ना॰ सिध्धांतवस्तु- अमृ॰ प्र॰ १ ओ॰ २७.
निष्काम- सं॰ वि॰ विरक्त अथवा पूर्णकाम- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २२.
निष्णात- सं॰ वि॰ निपुण.
निष्पन्न- सं॰ ना॰ १ ज्ञाता पुरुष २ वि॰ पक्कदशापन्न- ३ निपुण- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १८४- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १०७.
निष्प्रचार- सं॰ ना॰ कुंठितगति व- अरिघाव.
निष्टंक- प्रा॰ ना॰ निश्चय- प॰ प्र॰ ४ ओ॰ ९.
निष्टंकणें- प्रा॰ धा॰ ना॰ निश्चय करणें- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ३८०
निष्ठा- सं॰ ना॰ श्रध्धा.
निःसंग- सं॰ वि॰ संगरहित- एकाकी.
निसंगळ- सं॰ अप॰ वि॰ निर्लज्ज- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ १८
निःसंशय- सं॰ वि॰ संशयरहित- निःसंदेह.
निसळें- प्रा॰ धा॰ वि॰ पाजिवलें- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ २५१.
निसुगाई- प्रा॰ ना॰ आळस- दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ १७.
निसुर- प्रा॰ क्रि॰ वि॰ निश्चित- भा॰ अ॰ १ ओ॰ २३२.
निस्तत्व- सं॰ वि॰ फलकट अथवा असार.
निस्तेज- सं॰ ना॰ १ अपकीर्ति-

ज्ञा०अ०१३ओ०५४४-२ वि० तेज हीन.
निस्त्रप- सं० वि० निर्लज्ज.
निःस्व- सं० वि० निष्कांचन अथ दरिद्री-
नीच्- सं० वि० अधम- उ०॥ हंसदा सम्हणे नीच॥आले जन्मा इथे श्वपच॥
नीच- प्रा० क्रि० अव्य० नित्य- ज्ञा० अ०१२ओ०३६- भा० अ०२ओ० ६-विवे०पू०प्र०२ ओ०२६-दा०द० ३स०१ओ०२.
नीड- प्रा० ना० पक्ष्याचें घरटें- वा० ओ०७१०
नीति- सं० ना० १ नियमशास्त्र-२ ज्ञान- ज्ञा० अ०९ओ०१९२.
नीद- सं० अप० ना० निद्रा.
नीर- सं० ना० पाणी.
नीरज- सं० ना० कमल.
नीरधी- सं० ना० समुद्र-
नीलकंठ- सं० ना० १ शिव २ मोर- ३ च्यासपक्षी-
नीलग्रीव- सं० ना० शिव.
नीलोत्पल- सं० ना० काळें कमल.

## नु-ने-नै-नो.

नुथड- प्रा० ना० नथ- भा० अ०१३ ओ०२२१.
नुपकर- प्रा० वि० असमर्थ- ज्ञा० अ०१ओ०३८०.
नुपरोणें- प्रा० धा० ना० पदार्थादि मिळवणें- ज्ञा० अ०१७ ओ०१४८.
नुपुर- सं० ना० तोरडी.
नुपुरतें- सं० अप० वि० विषयासक्त- दा०द०२स०३ओ०१७.
नुरोधी- सं० अप० वि० बाधक- ज्ञा० अ०१५ ओ०२३०.
नृयान- सं० ना० नरयान.
नेटपाटें- प्रा० वि० निश्चयरूप.
नेटेपाटें- प्रा० वि०१ निश्चयात्मक विवे०उ०प्र०२ओ०२२- प०प्र०७ ओ०१६-२ अव्य० हातोपाती- विवे० उ०प्र०७ओ०४४.
नेपाळा- प्रा० ना० चूळ- ज्ञा० अ० १३ओ०४१८-४१९.
नेपुर- सं० अप० ना० तोरडी-
नेवाणें- प्रा० ना० तिरस्कार- ज्ञा० अ०११ओ०२३.
नेहटणें- प्रा० धा० ना० लक्ष लावू न पाहाणें- भा० अ०२०ओ०२०१. दा०द०२०स०४ ओ०२३.
नै- सं० अप० ना० नदी- ज्ञा० अ०१८ ओ०२७१.
नैश्वर- सं० अप० वि० नाशिवंत.
नैसर्गिक- सं० वि० स्वाभाविक.
नोकल- प्रा० ना० चुकवाचुकव- भा० अ०५ओ०१६१.
नोकिणें- प्रा० धा० ना० पराभवि

णें-ज्ञा०अ०६ओ०३२४.
नोकुणें-प्रा०धा०ना०चुकवणें-ज्ञा०अ०१२ओ०८४.
न्यसणें-सं०अप०धा०ना०ठेवणें
न्याती-सं०अप०ना०ज्ञाती-भा०अ०१४ओ०२९५.
न्याय-सं०ना० युक्ति-निर्णय.
न्याहार-प्रा०ना० दृष्टी-उ०॥न्याहार देतां आकाशीं॥ चक्रें दिसती डोळियांशी॥
न्याहाळणें-प्रा०धा०ना०पाहाणें
न्यून-सं०वि०निरावयव-उणें-ज्ञा०अ०१२ओ०५८.
न्हाणी-प्रा०ना०मोरी-भा०अ०२६ओ०२०३.

## प

पंक-सं०ना० चिखल.
पंकज-सं०ना०कमल.
पंक्ति-सं०ना०१ ओळ-२दाहासंख्या.
पंक्तिकंधर-सं०ना० रावण.
पंक्तिरथ-सं०ना० दशरथ.
पंगिस्त-प्रा०वि०पराधीन-भा०अ०८ओ०२८.
पघळ-प्रा०वि०विस्तृत.
पंचकोश-सं०ना०१ अन्नमय-२ प्राणमय-३ मनोमय-४ विज्ञानमय-५आनंदमय-असे शरीरांत एकाच्या आंत एक कोश यरूपानें कोशपंचक तें.
पंचत्व-सं०ना० मृत्यु अथवा मरण.
पंचबाण-सं०ना० मदन.
पंचभूतें-सं०ना० पंचतत्वें त्यांचीं नावें. पृथ्वी-आप-तेज-वायु-आणि आकाश.
पंचम-सं०ना० सप्तस्वरांतील पांचवा स्वर तो.
पंचरात्र-सं०अप०ना० नारद पंचरात्र हा शब्द पाहा.
पंचशर-सं०ना०मदन.
पंचवेउळी-प्रा०ना० पांच नांग्यांची इंगळी-ज्ञा०अ०१३ओ०१०७१.
पंचाग्निसाधन-सं०ना०भर उन्हाळ्यांत चोहोंकडे अग्नि पेटऊन मध्यें बसणें व मस्तकीं सूर्यताप सोसणें त्या साधनाचें नाव.
पंचात्मकी-सं०ना०मरणधर्मी देह-ज्ञा०अ०६ओ०४०१.
पंचानन-सं०ना०१ शिव-२सिंह अथवा व्याघ्र.
पंचास्य-सं०ना०१ शिव-२सिंह
पंचीकरण-सं०ना० प्रतिसूक्ष्म भूताचे दोन दोन भाग करून-एकेक भाग त्याचा त्यांतच ठेऊन दुसरा

भाग अन्य अन्य चार भूतांसवांटून देणें तेणें करून भूतांचें पंचीकृत ईश्वरें केलें होतें साचें नाव.

**पंचीकृतभूतें**-सं० ना० मूळ पंच तत्वांच्या परस्पेरांशु प्रवेशानें पंचीकरण होऊन-जीं प्रत्यक्ष दिसणारीं व भासणारीं पृथिव्यादि भूतें निर्माण झालीं तीं.

**पंजु**-सं० ना० पक्षी.

**पंजर**-सं० ना० पिंजरा-उ० अस्थि पंजर उभविला॥ शिरा नाडीनें गुंडाळिला॥ ह०॥

**पट**-प्रा० ना० पारशब्द पाहा.

**पट**-सं० ना० वस्त्र.

**पटु**-सं० वि० १ समर्थ-२ कुशल-उ० पटुत्व सकलें द्वियीं मनुजता सुवंशीं जनीं॥ ह०॥

**पठाड**-प्रा० ना० बैलाचें खोगीर-भा० अ० २३ ओ० ५९६.

**पडकणें**-प्रा० धा० ना० सवकणें-भा० अ० २ ओ० ६८१.

**पडखळणें**-प्रा० धा० ना० उगवणें-रुक्मि० अ० २ ओ० ७.

**पडगादी**-प्रा० ना० गालीच्या-रुक्मि० अ० १५ ओ० ४०.

**पडलाळा**-प्रा० ना० ग्रंथार्थविच्यार ज्ञा० अ० ७ ओ० २०२.

**पडप**-प्रा० ना० १ बरोबरी-ज्ञा० अ० १० ओ० ४६-२ शोभा-ज्ञा० अ० ११ ओ० १२-३ शृंगार-ज्ञा० अ० १७ ओ० २४५-२४६-४ आवरण-वा० ओ० ३७०७.

**पडशाळा**-सं० अप० ना० धर्मशाळा-दा० द० २ स० ७ ओ० २०.

**पडसाई**-प्रा० ना० झावळेपण-अमृ० प्र० ७ ओ० २१.

**पडसाद**-सं० अप० ना० प्रतिशब्द दा० द० ४ स० ८ ओ० १२.

**पडळ**-सं० अप० ना० पटल-पडदा-दा० द० १ स० २ ओ० ३.

**पंडुथारोग**-सं० अप० ना० पंडुरोग

**पडिकर**-प्रा० वि० डोळस-सुंदर ज्ञा० अ० १७ ओ० ४२.

**पडिघणें**-प्रा० धा० ना० धरणें-ज्ञा० अ० १४ ओ० १८६.

**पडिघा**-प्रा० ना० तरुत-ज्ञा० अ० १३ ओ० ४१८-४१९.

**पडिघाइणें**-प्रा० धा० ना० बोलणें ज्ञा० अ० १३ ओ० ५१.

**पडिघाणियें**-प्रा० ना० मध्य घटेची जागा-ज्ञा० अ० १८ ओ० ४०

**पडिघातणें**-प्रा० धा० ना० स्वाधीन करणें-ज्ञा० अ० १३ ओ० ५८७.

**पडिघापणें**-प्रा० धा० ना० व्यापणें ज्ञा० अ० १६ ओ० २५७-२५८.

**पडिताळा**-प्रा० अव्य० पुनःपुनः ज्ञा० अ० ५ ओ० १६७.

**पडिपाड**-प्रा० ना० साम्यता-

वि॰पू॰म॰१ ओ॰२६.
**पडिपाडु**-प्रा॰ना॰ थोरी-भा॰अ॰२ ओ॰२६९
**पडिपाडें**-प्रा॰ शब्द॰ अव्य॰१ सारखें अमृ॰ म॰ ७ ओ॰ २८८-वि॰सारखें अथवासमान.
**पडिभर**-प्रा॰ना॰ अधिकता-ज्ञा॰ अ॰११ओ॰९१.
**पडिभरू**-प्रा॰ ना॰१अधिक पण-ज्ञा॰ अ॰१२ओ॰३७-२ वि॰ श्रेष्ठ-दा॰द॰ १स॰७ ओ॰६.
**पडिसा**-प्रा॰ना॰ पडसाद अथवा पडशब्द-ज्ञा॰अ॰४ओ॰८२.
**पटलमूर्ख**-सं॰ अप॰ वि॰ पटलेला असून मूर्खतो.
**पटियलें**-प्रा॰वि॰ आवडतें-ज्ञा॰अ॰ ५ओ॰१७०-ज्ञा॰अ॰९ओ॰१८-ज्ञा॰ अ॰११ओ॰३१.
**पटियावो**-प्रा॰ना॰ आवड-ज्ञा॰-अ॰९ओ॰७.
**पढियासणें**-प्रा॰धा॰ना॰भासणें ज्ञा॰अ॰१५ओ॰२३९.
**पढियें**-प्रा॰वि॰१ आवडतें-ज्ञा॰-अ॰१६ओ॰२३०-२३१-२ प्रिय-भा॰ अ॰२ओ॰२८.
**पण्यांगना**-सं॰ना॰ वेश्या-कळवंतीण.
**पर्णनें**-सं॰अप॰धा॰ना॰ वरणें.
**पर्णाली**-सं॰ ना॰ पानकिडा.
**पत**-प्रा॰ना॰ सचोटी अथवा सचवटी.
**पतंग**-सं॰ना॰१ सूर्य-२एक सपक्षकीट आहे.
**पति**-सं॰ना॰१ नवरा-२वि॰मुख्य.
**पतिकर**-सं॰अप॰ना॰ प्रतिकार अथवा अपाय उपाय-ज्ञा॰अ॰११-ओ॰४०४.
**पतिकरु**-प्रा॰ना॰ पतकर-अनुभव-ज्ञा॰अ॰२ओ॰१९३.
**पतीत**-सं॰ वि॰१ नीच-२पालकी-उ॰॥ पतीतसा पापी शरण आलों तूज॥ राखें माजी लाज पांडुरंगा॥१॥
**पत्य**-प्रा॰ना॰ पत शब्द पाहा.
**पत्ररथ**-सं॰ना॰ पक्षी.
**पत्रावलंबन**-सं॰ना॰ अंगीकार ज्ञा॰अ॰१३ओ॰६७-भा॰अ॰११-ओ॰५५२.
**पथ**-सं॰ना॰ मार्ग.
**पंथ**-सं॰ना॰ मार्ग.
**पदार्थ**-सं॰ना॰१ वस्तु-२ कोणी एका वाक्यांतील जें पद त्याचा अर्थतो.
**पदार्थभाविनी**-सं॰ना॰ ज्ञानी-जीवाच्या सप्तभूमिकांतील साहावी भूमिकाती.
**पद्म**-सं॰ना॰ कमल.
**पद्मज**-सं॰ना॰ ब्रह्मदेव.
**पद्मजनंदिनी**-सं॰ना॰ सारस्वती.
**पद्मा**-सं॰ना॰ लक्ष्मी.

पद्माकर- सं० ना० सरोवर.

पद्माक्षी-सं० ना० सीता.

पद्माक्षीरमण-सं० ना० श्रीरामचंद्र.

पद्य-सं० ना० अक्षरें मात्रादिकांच्या-ज्यांत नियम असतो अशी कविताती.

पल्लास-प्रा० ना० शृंगार अथवा भूषण-भा० अ० २२ ओ० २१३.

पल्लासिणें-प्रा० धा० ना० शृंगारणें रचणें-ज्ञा० अ० १२ ओ० ४८-ज्ञा० अ० १ ओ० ११९.

पय-सं० ना० १ दूध-२ पाणी-

पयफेनधवल-सं० ना० शिव.

पयोधर-सं० ना० १ स्तन-२ मेघ.

पयोधि-सं० ना० समुद्र.

पर्यावो-सं० अप० ना० पर्याव अथवा पर्याय-म्हणजे नामांतर.

पर्यालोचन-सं० अप० ना० पर्यालोचन अथवा विचार.

पर्ये-प्रा० ना० झोंका-ज्ञा० अ० १२ ओ० ५.

पर-सं० ना० भिन्न-अन्य.

परतत्व-सं० ना० ब्रम्ह.

परत्र-सं० ना० परलोक.

परदार-सं० ना० व्यभिचार.

परमा-सं० अप० ना० प्रमेह म्हणजे शिश्नद्वारा पूवाह्मणें.

परमार्थ-सं० ना० ब्रम्ह-२ ज्यावरदु सरा अर्थ उरत नाहीं तो-

परवड-प्रा० ना० उपचार-अमृ० प्र० ७ ओ० २४९.

परवडी-प्रा० ना० १ परवड अथवा प्रकार-भा० अ० २१ ओ० ४५१-२ चातुर्य-ज्ञा० अ० १७ ओ० ३४६-३४७. ३ उपचार-भा० अ० १२ ओ० २११. ४ अ० पुनः वा० ओ० ३३०.

परशाधर-सं० अप० ना० परशुधर अथवा परशुराम.

परा-सं० ना० नाभिस्थानस्थित-निर्विकल्प आद्य रूप चतुर्विध वाचेंतील पहिली वाचा.

पराग-सं० ना० १ महान् अपराध २ पुष्पांचे गंधरज.

परामर्ष-सं० ना० अनुमान अथवा अटकळ-वा० ओ० ३६८१.

परावें-सं० अप० वि० परकें-दा० द० २ स० १ ओ० १९.

परास्कंध-सं० ना० शनिमंडळापासून सप्तऋषीं पावेतों ज्याची मर्यादा असे सप्त स्कंधांतील साहावा स्कंध तो

परिआलोच-सं० अप० ना० पर्यालोचन.

परिकर-प्रा० वि० चांगलें-ज्ञा० अ० १ ओ० १२.

परिखत-सं० ना० खंदक.

परिसुण-प्रा० ना० सण-ज्ञा० अ० १४-ओ० २१६-अमृ० प्र० १० ओ० २४.

परिग्रह-सं० ना० संग्रह.

परिघ-सं० ना० घेर.
परिचर्या-सं० ना० सेवा.
परिजन-सं० ना० सेवक.
परिणत-सं० वि० पक्क.
परिणाम-सं० ना० शेवट-चरमाव
स्था-
परिणामकार्य-सं० ना० पूर्वकारणा
चालोपहोऊन-जें त्यास रूपांतर प्राप्त
होतें-त्याचें नाव-जसें दूधमूळ कारण
लोपून त्याचें दहीं हें रूपांतर तें.
परिणामा-सं० ना० पूर्णावस्था-ज्ञा०
अ० ९ ओ० १९१.
परिपाकु-सं० ना० परिणाम.
परिपाटी-सं० अप० ना० रीत.
परियाळें-प्रा० ना० खाण्याचे पदा
र्थ-अमृ० प्र० ६ ओ० ३३.
परिये-प्रा० ना० झोंका-ज्ञा० अ० १२
ओ० ५.
परियेसणें-प्रा० धा० ना० ऐकणें-
समजणें-ज्ञा० अ० ८ ओ० ३.
परिरंभ-सं० ना० आलिंगन.
परिवर-सं० अप० ना० घर-ज्ञा० अ०
९ ओ० ५९.
परिवसणें-प्रा० धा० ना० स्पर्शणें-
ज्ञा० अ० १५ ओ० ३९२.
परिवारु-सं० अप० ना० परिवार
अथवा आवार-उ० देव देऊळ परिवा
रु॥ कोरून किजे डोंगरू॥
परिवारणें-सं० अप० धा० ना० विस्ता
रणें-ज्ञा० अ० १४ ओ० २३८.
परिवाहकस्कंध-सं० ना० सतक
वींपासून ध्रुवापावेतों ज्याची मर्यादा
आहे असा सप्तस्कंधांतील सातवा स्कं
धतो.
परिवेष-सं० ना० १ परिधि-२ चंद्र
सूर्याभोंवतालचें खळें
परिव्राजा-सं० ना० सन्यासी.
परिसणें-प्रा० धा० ना० ऐकणें-श्र
वण करणें-
परिसर-सं० ना० स्थान-ज्ञा० अ०
१३ ओ० ६१२.
परिहारु-सं० अप० ना० परिहार
अथवा निरास.
परी-प्रा० अव्य० परंतु ना० प्र
कार अथवा गोष्ट-भा० अ० २ ओ०
२८०
परीघ-सं० ना० स्तंभ.
परीस-सं० अप० ना० १ अष्टधा
तूंचें सुवर्ण करणारा पाषाण-स्प
र्शमणि-२ क्रि० ऐक-
परेतराट्-सं० ना० यम.
परोक्षज्ञान-सं० ना० जीवास
ज्या समतावस्था आहेत त्यांतील अ
सदावरणांशनाश करणारी चौथी
अवस्था ती.
पऱ्हा-प्रा० अव्य० पलीकडे.
पल-सं० ना० मांस.
पलभोज-सं० ना० राक्षस-मांस

भक्षक.

**पल्लाटण**- सं० अप० ना० पर्यटनअथवापरिभ्रमण.

**पलांडु**- सं० ना० कांदा.

**पलाशी**- सं० ना० मांसभक्षक-अथवाराक्षस.

**पलाशजन**- सं० ना० राक्षस.

**पल्ली**- सं० ना० गांव.

**पर्वत**- सं० ना० मोठाडोंगर.

**पर्वत**- प्रा० ना० घेणें देणें-भा० अ० २३ओ० १२८. दा० द० २स० १ओ० ६३

**पवन**- सं० ना० वायु.

**पवनात्मज**- सं० ना० मारुती.

**पवनारी**- सं० ना० सर्प.

**पवमान**- सं० ना० वायु.

**पवळ**- प्रा० ना० होडगें.

**पवाड**- प्रा० ना० १ मोठेपण-आ० पं० १स० १ ओ० ८--२ कीर्ति-दा० द० १स० ७ओ० ३२--३ विस्तार-ज्ञा० अ० ६ओ० ४०१--४ अवकाश-ज्ञा० अ० ११ओ० २९८--५ महत्व अथवा थोरी भा० अ० २ओ० २४९.

**पवाडणें**- प्रा० धा० ना० शिरणें अथवारिघणें- दा० द० १स० ४ओ० २-वा० ओ० १०३८-३२५१.

**पवाडु**- प्रा० ना० ठाव- अवकाश- ज्ञा० अ० ७ओ० १३८.

**पवि**- सं० ना० वज्र.

**[illegible]**- प्रा० ना० नौका-भा० अ० ५ओ० ५६३.

**पव्हे**- प्रा० ना० पाण छत्र-भा० अ० १ओ० १६२.

**पशुपति**- सं० ना० शिव-२ सिंह

**पश्यंती**- सं० ना० हृदयस्थित चतुर्विधवाचेंतील-भासरूपदुसरीवाचा.

**पष्ट**- सं० अप० वि० स्पष्ट.

**पसाय**- सं० अप० ना० प्रसाद- ज्ञा० अ० १५ओ० २८--भा० अ० १ ओ० ६१.

**पसाव**- सं० अप० ना० प्रसाद- ज्ञा० अ० १८ओ० २९.

**पसावो**- सं० अप० ना० पसाव.

**पहुडणें**- प्रा० धा० ना० आरोहण करणें-भा० अ० २ओ० ३३८.

**पहुरणी**- प्रा० ना० वीई पर्यंत दूधदेणारी गाय अथवा म्हैस-ज्ञा० अ० १७ओ० २४७-२४८.

**पळपणें**- प्रा० धा० ना० पेटणें- ज्ञा० अ० १६ओ० ३९३-३९४.

**पव्हें**- प्रा० ना० कापसाचें झाड- अमृ० प्र० ७ओ० २६३.

**पक्ष**- सं० ना० १ पंख-२ पंध्रवडा- ३ कैवार-

## पा

**पा**- प्रा० संबो० १ अपा अथवा बा-

२ पादपूरण.

**पाइक** - प्रा० ना० सेवक - उ० आम्हीरामाचे पाइक॥ आमचा श्रीरामनाईक॥१

**पाइकु** - प्रा० ना० पाइक - ज्ञा० अ० ६ ओ० ४९.

**पाउटी** - प्रा० ना० सकाम पाऊल - सकामपुण्य - ज्ञा० अ० १२ ओ० ८११.

**पाउटीसरणें** - प्रा० धा० ना० पुण्य क्षयहोणें - ज्ञा० अ० ९ ओ० ३२८.

**पाउड** - प्रा० ना० पैसा सुपारी - ज्ञा० अ० १८ ओ० ४६.

**पाउडें** - प्रा० वि० माघारलेलें - भा० अ० ७ ओ० २०१.

**पाकशासन** - सं० ना० इंद्र.

**पाकारि** - सं० ना० इंद्र.

**पाखंड** - सं० अप० ना० पाखांड म्हणजे नास्तिक मत्त.

**पाखर** - प्रा० ना० १ रूपा - २ घोड्याची उंची पाठझालर - ३ वि० रूपाळू - ज्ञा० अ० १ ओ० २०५.

**पाखाळणें** - सं० अप० धा० ना० प्रक्षाळणें - अमृ० प्र० २ ओ० ११

**पाखाळी** - सं० अप० ना० शुध्दत्व - ज्ञा० अ० ६ ओ० २६५.

**पांग** - प्रा० ना० पराधीनपणा - ज्ञा० अ० ६ ओ० २४.

**पांगडा** - प्रा० ना० अधीनत्व - दा० द० ५ स० २ ओ० ३९.

**पांगु** - प्रा० ना० पांग - ज्ञा० अ० ५ ओ० ६५

**पांगुळणें** - प्रा० धा० ना० थोगावणें

**पांगोरा** - प्रा० ना० झाडमुळ्यांचीं बारीक बारीक मुळें तीं - दा० द० ९ स० ६ ओ० ४६ - ज्ञा० अ० १५ ओ० ४७७.

**पांचइखवळें** - प्रा० ना० पंचभूतीकदेह - ज्ञा० अ० ८ ओ० ६२.

**पांचखाणी** - सं० अप० ना० १ मानसीकखाणी - २ जरायुज - ३ अंडज - ४ स्वेदज - ५ उद्भीज -

मनुष्य पश्वादिक हे जरायुज - पक्षीसर्पादिक हे अंडज - मशकादिक हे स्वेदज - वृक्षादिक हे उद्भीज.

**पांचजिन्नस** - सं० अप० ना० १ पांचभूतें व पांचखाणी मिळून १० - २ पंचकर्मेंद्रियव पंचप्राण मिळून १० - ३ पंचज्ञानेंद्रियें व मन बुध्धि मिळून ७ - ४ मूळमाया व विद्या अविद्या मिळून ३ ५ जीव आणि ईश्वर मिळून २ - याप्रमाणें ३२ पदार्थ मिळून जिन्नस ५

**पांचपिसें** - प्रा० ना० वर्णन - ज्ञा० अ० १८ ओ० १८ - २ भ्रांती अथवा वेड भा० अ० २९ ओ० १५८.

**पांचवन्ही** - सं० अप० ना० पंचवन्हि त्यांचीं नावें - १ मलयानल - २ विद्युदानल - ३ वडवानल - ४ शिवनेत्रानल - ५ द्वादशादित्यरूपानल असे हे पांच अग्नि ते

**पांचाली** - सं० ना० द्रौपदी.

**पांचिक** - प्रा० वि० हीनकस - ज्ञा०

अ०१३ओ०१०११.

**पांचैपालव**- सं० अप० ना०१ पंच पल्लव-२ अंतःकरणपंचक- ज्ञा० अ० ११ओ० ६३.

**पांजरणें**- प्रा० धा० ना० पिंजारणें अथवा पसरणें- ज्ञा० अ० १४ ओ०

**पांजरा**- सं० अप० ना० पंजर अथ वा पिंजरा- भा० अ० २६ ओ० २३०.

**पांजी**- प्रा० ना० अग्र- भा० अ० ५ ओ० ३०१

**पाट**- सं० अप० ना० पट्टाभिषेक- भा० अ० २ ओ० ६४१-२ पदअथवा पदवी ज्ञा० अ० १२ ओ० ८४.

**पाटण**- सं० अप० ना० पत्तन अथ वानगर- भा० अ० १४ ओ० ३२५.

**पाटल**- सं० अप० ना० १ पटुत्व-२ पाकशक्ति- ज्ञा० अ० ९ ओ० २४२.

**पाटाचें**- सं० अप० वि० सर्वोत्कृष्ट- ज्ञा० अ० १५ ओ० ३१६.

**पाटीर**- सं० ना० चंदन वृक्ष

**पाटु**- सं० अप० वि० श्रेष्ट- ज्ञा० अ० १८ ओ० ६०३.

**पाटुबांध**- सं० अप० ना० पट्टाभिषेक- ज्ञा० अ० १५ ओ० ९.

**पाटोळा**- प्रा० ना० नेसायाचें पातळ

**पाठोवाटी**- प्रा० अव्य० पाठोपाठ- भा० अ० २ ओ० १०.

**पाड**- प्रा० ना० १ थोरी- ज्ञा० अ० १७ ओ० १२- अमृ० प्र० ८ ओ० ९- २ मोल- भा० अ० ५ ओ० १०३.

**पाडा**- प्रा० ना० खोंड अ० गो-हा- उ० कांहीं केला तडामोडा॥ विकिला घर चा पाडा रेडा॥१॥

**पाडाउ**- प्रा० ना० स्वसत्ताधीन कर णारा- अमृ० प्र० २ ओ० ५.

**पाडुधरणें**- प्रा० धा० ना० मानणें- ज्ञा० अ० १३ ओ० ८५.

**पाढउ**- प्रा० ना० संग्रह- ज्ञा० अ० १८ ओ० ३०.

**पाढाऊ**- प्रा० ना० स्वसत्ताधीनता ज्ञा० अ० ९ ओ० २१२.

**पाणपिसें**- प्रा० वि० भ्रमिष्ट- भा० अ० १२ ओ० २९.

**पाणबुडा**- प्रा० ना० मासे धरणारा कोळी- पाणबुड्या.

**पाणवडा**- प्रा० ना० पाणवथा अथ वा पाणवठा- ज्ञा० अ० १६ ओ० ४०६

**पाणि**- सं० ना० हात- पंचकर्मेंद्रियां तील दुसरें इंद्रिय तें.

**पाणिग्रहण**- सं० ना० विवाह- लग्न

**पाणीढाळू**- प्रा० ना० पाणीगळ अ थवा ओहोटे- ज्ञा० अ० ७ ओ० ९९.

**पाणीयाडें**- प्रा० ना० पाणवठा- ज्ञा० अ० ९ ओ० २१४- भा० अ० ९ ओ० १२७

**पाणीयाढें**- प्रा० ना० तळें- ज्ञा० अ० १६ ओ० २२७.

**पाणीवणें**- प्रा० धा० ना० पळणें- ज्ञा० अ० ६ ओ० ४७१.

पात-सं॰ना॰ पतन.
पातंजली-सं॰ना॰ योगमार्ग.
पातणें-प्रा॰धा॰ना॰ येणें-दा॰ओ॰ ३१०.
पातलेलतणें-प्रा॰धा॰ना॰ कळणें-ज्ञा॰अ॰८ओ॰५३.
पातिकरू-प्रा॰ना॰ पातीकर अथवा भागीदार.
पांती-प्रा॰ना॰ बरोबरी-भा॰अ॰६ ओ॰३५६-दा॰ओ॰२७७३.
पातेजणें-प्रा॰धा॰ना॰ विश्वासणें-भा॰अ॰१२ओ॰२५६.
पाथूर-प्रा॰ना॰ दगड.
पार्थ-सं॰ना॰ अर्जुन.
पाद-सं॰ना॰ पाय अथवा चरण-पंचकर्मेंद्रियांतील तिसरें इंद्रिय तें.
पादप-सं॰ना॰ वृक्ष.
पादसेवनभक्ति-सं॰ना॰ उपासना मार्गांतील नवविधभक्तिरूपसाधनाचें चौथें अंग.
पादोदर-सं॰ना॰ उरग अथवा सर्प
पानपणें-प्रा॰धा॰ना॰ घाबरें करणें भा॰अ॰२३ओ॰५१.
पानशिसें-प्रा॰ना॰ शिसेले खणी-दा॰द॰११स॰१ओ॰७.
पापर-प्रा॰ना॰ लाथ-भा॰अ॰१ओ॰ ३८८-भा॰अ॰१४-ओ॰१०६
पापरा-प्रा॰ना॰ लाथ-ज्ञा॰अ॰११ ओ॰१०५-

पाबळ-प्रा॰ना॰ झरा-दा॰द॰१६ स॰४ओ॰८.
पाबळें-प्रा॰वि॰ नाशिवंत-तुच्छ-ज्ञा॰अ॰१०ओ॰१९३-१९५.
पामर-सं॰वि॰ मूर्ख.
पामा-सं॰ना॰ खरूज.
पायसांडा-प्रा॰ना॰ पायघडी-रुक्मि॰अ॰१५ओ॰१५७-भा॰अ॰१॰ ओ॰५६.
पायवणी-प्रा॰ना॰ तीर्थ-भा॰अ॰ २ओ॰२१.
पायांतर-सं॰ना॰ पायरी-ज्ञा॰ अ॰८ओ॰२२३.
पायालळीं घालणें-प्रा॰धा॰ना॰ इमारतीच्या पाया मध्यें जीवंत मनुष्य पुरणें तें.
पायु-सं॰ना॰ गुद-म्हणजे मलविसर्जन मार्ग
पार-सं॰ना॰ अंत-भा॰अ॰१४ ओ॰१५-उ॰ पार नाहीं नाहीं अपोब्जेच्या सुखा॥ हंस दासा लेखा कर केला.
पार-प्रा॰ना॰ झाडोरा-म्हणजे पिंपळवड यांस चिरेबंदी बांधितात ओटा जो-उ॰ देवद्वारीं पडशाळा॥ पारीं भा दीपमाळा॥ वृंदावनें पार पिंपळा॥ बांधेतो सत्वगुण॥
पारकेया-प्रा॰ना॰ निवळी-ज्ञा॰ अ॰१६ओ॰८८.
पारखें-सं॰अप॰वि॰ परोक्ष-अन्य.

विन्मुख-भा०अ०२ ओ०७३४-भा० अ०१७ओ०१२४.

**पारड्यांतघालणें**- मा०धा०ना० १ प्रतिदिवशीं वजन करून कमीभरत जाईल असें हलकरणें-२ मनुष्याचें व जनव मारण्याचीदिन संख्या यामाना नुरूप प्रतिदिवशीं कांहीं अवयव कापणें- दा०द०३ स०७ ओ०७२.

**पारद**-सं०ना०पारा.

**पारमार्थिक**- सं०वि० व्यावहारिक व प्रातिभासिक नव्हे म्हणजे वास्तविक असें तें.

**पारावार**-सं०ना०समुद्र.

**पारिजात**-सं०ना० पारिजातकनामा देवतरू.

**पारिजें**-सं०अप०ना०पारद अथवा पारा.

**पारितोषिक**- सं०ना०देणगी.

**पारियात्र**- सं०ना०पर्वत.

**पारियेणें**- मा०धा०ना० ऐकणें-अमृ०प्र०७ ओ०२९६.

**पारिसें**-मा०वि० पारोसें- अमृ०प्र० ७ ओ०१२७.

**पारुखणें**सं०अप०धा०ना० स्पर्शणें-ज्ञा०अ०१०ओ०९.

**पारुषणें**-मा०धा०ना०१ शाहसुंटणें-ज्ञा०अ०५ओ०१५२-२ तुच्छकरणें-ज्ञा० अ०१३ओ०३-३ राहणें-ज्ञा०अ०६ओ० ६०-भा०अ०१ओ०२५७-४ मुकावणें-भा०अ०१ओ०२९.

**पारुष्य**-सं०ना० काठिन्य-कठिणवचन.

**पालक**-सं०ना०रक्षणकरणारा.

**पालक**-सं०अप०ना०पालख म्हणजे पाळणा-ज्ञा०अ०१२ओ०५.

**पालटें**-मा०वि०बदला-भा०अ० २ओ०२३७.

**पालव**-सं०अप०ना० पल्लवं अथवा पदर-प०प्र०४ ओ०११.

**पालवपांचे**-सं०अप०ना० पांचे पालव-हाशब्द पाहा.

**पालवियें**-सं०अप०ना०पल्लव अथवा अंकुर-ज्ञा०अ०८ ओ०२७.

**पालाणणें**-मा०धा०ना० आच्छादणें-रुक्मि०अ०५ओ०३९.

**पाल्हविणें**-मा०धा०ना० पेरणें-ज्ञा०अ०६ओ०४८९.

**पाल्हाळ**-मा०ना० विस्तार.

**पावक**-सं०ना०अग्नि.

**पावडें**-मा०वि०पांगळें-दा०द०३ स०६ओ०४१.

**पार्वण**-सं०ना०श्राध्ध.

**पावो**-सं०अप०ना० पाव अथवा पाय म्हणजे पाद.

**पावोंसरणें**-मा०धा०ना०कळों सरणें म्हणजे कळों येणें-ज्ञा०अ०६ ओ०४८७.

**पाशि**-सं०ना० वरुण.

पांसुचीटेंपुळी - सं० अप० ना० पांसु म्हणजे रजःकण यांची टेंप या अर्थाव रून-पृथ्वी-ज्ञा० अ०१५ ओ०४००-४०१
पांसुता - सं० अप० ना० पांसुरूपता या अर्थावरून-माती.
पार्श्वद - सं० अप० ना० पार्षद म्हणून देवगणले.
पासबंधण - सं० अप० ना० पाश-बंधन.
पासवणें - प्रा० धा० ना० मागें पाहाणें ज्ञा० अ०१३ ओ०४९६.
पासिक - सं० अप० ना० पाश अथवा फांस-ज्ञा० अ०१४ ओ०१४७.
पाहाड - सं० अप० ना० पर्वत.
पाहाडीटाकणें - प्रा० धा० ना० पर्वत चढणें-ज्ञा० अ०८ ओ०८१.
पाहालणें - प्रा० धा० ना० उजाडणें ज्ञा० अ०५ ओ०२१.
पाहे - प्रा० ना० १ पांहाट-ज्ञा० अ० ९ ओ० ४०५-२ अव्य० उद्यां-ज्ञा० अ०१३ ओ०५४७-५४८.
पाहेणें - प्रा० धा० ना० प्रवेशणें-ज्ञा० अ०७ ओ०२००.
पाळ - प्रा० ना० समूह-भा० अ०१३ ओ०१९३.
पाळत - सं० अप० ना० पालन.
पाळत - प्रा० ना० चोर बातमी.
पाळा - प्रा० ना० वेढा अथवा गरका दा० द०४ स०१० ओ०६.
पाळिंगण - प्रा० ना० सांठवण-ज्ञा० अ०११ ओ०२०३.
पाळिगा - प्रा० ना० थवा.
पाळिजणें - प्रा० धा० ना० पाल्हाळणें-अथवा फांकणें-ज्ञा० अ०१० ओ०३०८.
पाळें - प्रा० ना० १ समुदाय-२ लांकडी वाडगा.

## पि-पी.

पिक - सं० ना० कोकिलपक्षी.
पिंगळा - सं० ना० पिंगला नाडी म्हणजे दक्षिण नासापुट नाडी-जिला सूर्यनाडी स्वरोदयशास्त्रांत म्हणतात- वि० दक्षिण.
पिछोंडा - प्रा० ना० मागले बाजूस हात वळवून बांधणें त्याचें नाव. दा० द०३ स०७ ओ०६७.
पिंजरी - सं० अप० ना० पिंजरा-ज्ञा० अ०९ ओ०१२५.
पिंड - सं० ना० देह-उ० प्रल्हादें हरिचरणीं॥ अर्पियेला आत्मपिंड ताताचा॥ आर्या॥
पितामह - सं० ना०१ आजा-२ ब्रम्हदेव-३ भीष्माचार्य-दुसऱ्या अर्थाचें उदा०॥ अभंग॥ दुःख सारें तिचें ऐकतांचि पाहा॥ झाला पितामहाचिंता तुर॥ ॥ तिसऱ्या अर्थाचें॥ क०॥

पितामहतदावदेभवल तूं पृथानंदनाम्भ
रमेशरथीं सारथीन्चतुरचागवीस्यंदना॥

**पितृप**- सं॰ना॰ यम.

**पितृपक्ष**- सं॰ना॰१ पितरसमूह-२ भाद्रपद कृष्णपक्ष.

**पितृलंड**- सं॰अप॰ वि॰ पितरभी त्यर्थ श्राध्धादिकर्मे न करणारा.

**पितृवन**- सं॰ना॰ स्मशानभूमि.

**पित्तकुरूपण**- प्रा॰ना॰ ज्वाला वमन ज्ञा॰ अ॰१६ ओ॰ ३९३.

**पिनाक**- सं॰ना॰ एका धनुष्याचें नाव.

**पिनाकपाणि**- सं॰ना॰ शिव.

**पिंपलिका**- सं॰अप॰ना॰ पिपिलिका

**पिपिलिका**- सं॰ना॰ मुंगी.

**पियुख**- सं॰अप॰ना॰ पीयूष म्हणजे अमृत- अमृ॰प्र॰४ ओ॰२.

**पिलंगणें**- प्रा॰धा॰ना॰ पुढेंपुढें धावणें भा॰ अ॰११ ओ॰१२१०.

**पिशित**- सं॰ना॰ मांस.

**पिशिताशन**- सं॰ना॰ राक्षस.

**पिशुण** - सं॰अप॰ना॰ पिशुन म्हणजे चाहाड अथवा उणें पाहाणारा- दा॰ द॰२ स॰२ ओ॰२३.

**पिसा**- प्रा॰ना॰१ कापूस- ज्ञा॰अ॰ १३ ओ॰११००-२ वि॰ वेडा- उ॰ वेडी. पिसा झाल्यें पूर्ण निवाल्यें॥ माझें मीपण हरलें गे बाई-॥ भु॰ ॥

**पिसाट**- सं॰अप॰ना॰१ पिशाच-२ वेडें

**पिसुण**- सं॰अप॰ना॰ पिशुण हा शब्द पाहा.

**पिसुवा**- प्रा॰ना॰ पांखरुवा.

**पिसें**- प्रा॰ना॰१ वेड- अमृ॰प्र॰६ ओ॰२०-२ वि॰ वेडें.

**पिसेपण**- प्रा॰ना॰ वेड- भा॰अ॰ १ ओ॰४८.

**पील**- सं॰वि॰ पिवळें.

**पीन**- सं॰ वि॰ पुष्ट.

**पीयूष**- सं॰ना॰ अमृत.

## पु- पू.

**पुंख**- सं॰अप॰ ना॰१ पुच्छ-२ पिसारा.

**पुंगळ**- प्रा॰ना॰ पिंगूळ म्हणजे पाद्रा अथवा पाद्राकिडा.

**पुंज**- सं॰ना॰ ढीग.

**पुंजाळणें** - प्रा॰धा॰ना॰ परिपक्क ज्ञान भक्तिच्या योगानें नेत्र तेजाऊन गंभीर दिसणें- भा॰ अ॰१४ ओ॰३१३

**पुंड**- प्रा॰ वि॰ अप्रमाणिक- उलाढाल्या.

**पुंडरीक**- सं॰ना॰ कमल.

**पुढारणें** - प्रा॰धा॰ना॰ बोलणें- ज्ञा॰ अ॰१८ ओ॰२९९.

**पुढासणें** - प्रा॰धा॰ना॰ पुढें घालणें- भा॰अ॰४ ओ॰११४.

**पुढील**- प्रा॰ वि॰ अन्य- अमृ॰प्र॰४

ओ० ३८.

**पुढीलपाय**-प्रा० ना० प्रवृत्ति-ज्ञा० अ० १० ओ० १२.

**पुढीवळणें**-प्रा० धा० ना० वांकडें होणें-ज्ञा० अ० १८ ओ० ८४२.

**पुढें**-प्रा० वि० पाहाण्यास योग्य असें दुसरें तें-ज्ञा० अ० १७ ओ० १२.

**पुत**-सं० ना० पुत्र-भा० अ० २ ओ० ५५

**पुनीत**-सं० ना० पवित्र.

**पुनीव**-सं० अप० ना० पूर्णिमा-अमृ० प्र० २ ओ० ७.

**पुर**-सं० ना० नगर.

**पुरंदर**-सं० ना० प्रस्तुत जो स्वर्गींल इंद्र आहे त्याचें नांव.

**पुरंद्री**-सं० अप० ना० पुरंध्री म्हणजे विलासी स्त्री-भा० अ० ८ ओ० १९.

**पुरस्करणें**-सं० अप० धा० ना० सावधकरणें-ज्ञा० अ० ९ ओ० २३८.

**पुराण**-सं० वि० १ जुनाट-२ ना० स्मृतिच्या खालच्या योग्यतेचा ग्रंथतो त्यांची संख्या १८ त्यांचीं नावें-१ ब्रम्हपुराण-२ पद्मपुराण-३ विष्णुपुराण-४ वायुपुराण-५ देवीपुराण अ० देवीभागवत-६ नारदपुराण-७ मार्कंडेयपुराण-८ अग्निपुराण-९ भविष्योत्तर पुराण-१० ब्रम्हवैवर्तपुराण-११ स्कंदपुराण-१२ वाराहपुराण-१३ लिंगपुराण-१४ वामनपुराण-१५ मत्स्यपुराण-१६ कुर्मपुराण-१७ गरुडपुराण-१८ ब्रम्हांडपु०

**पुराणपुरुष**-सं० ना० आदिपुरुष म्ह० भगवान्.

**पुरांतक**-सं० ना० शिव.

**पुरारि**-सं० ना० शिव.

**पुरीश**-सं० ना० पुराधिपति.

**पुरीष**-सं० ना० विष्ठा.

**पुरुस**-सं० अप० ना० विष्ठा.

**पुरुहूत**-सं० ना० इंद्र.

**पुरोधा**-सं० ना० उपाध्याय.

**पुरोहित**-सं० ना० उपाध्याय.

**पुलिका**-सं० ना० धर्म जो ज्याचा तो-ज्ञा० अ० ६ ओ० २४६.

**पुंश्चली**-सं० वि० व्यभिचारिणी

**पुष्कर**-सं० ना० १ कमल-२ शुंडाग्रभाग.

**पुष्पवंत**-सं० ना० चंद्र सूर्य.

**पुष्टपण**-सं० अप० ना० गोठेपण.

**पुष्टी**-सं० ना० बळ.

**पुंस**-प्रा० ना० १ शव-ज्ञा० अ० ११ ओ० १७-२ पुरुष-दा० द० १ स० १ ओ० ३८.

**पुळिका**-प्रा० ना० काजळी-अमृ० प्र० २ ओ० ५१.

**पूत**-सं० वि० पवित्र.

**पूतना**-सं० ना० कौंसभगिनी जी राक्षसी तिचें नाव.

**पूर्त**-सं० ना० वापीतडागादि पौर्तकर्म.

**पूरक**-सं० ना० प्राणायाम समई

नासापुटद्वारा प्राणवायू ओढून घेणें त्या चें नाव.
**पूर्वपक्ष**- सं॰ ना॰ यथार्थ विषय मति पादनार्थ जी अयथार्थ शंका तिचें नाव.
**पूर्वमीमांसा**- सं॰ ना॰ कर्मश्रुतिचें सूत्रप्रधान मानून जो जैमिनीनें ग्रंथ केला त्याचें नाव.
**पूर्वारणि**- सं॰ ना॰ अग्निमंथन करण्याची वरली अरणी.
**पूषा**- सं॰ ना॰ सूर्य-
**पूंस**- सं॰ अप॰ ना॰ पुच्छ-भा॰ अ॰ १ ओ॰ ३४८.
**पृतना**- सं॰ ना॰ सेना.
**पृथा**- सं॰ ना॰ १ कुंती पांडवमाता २ प्रतिति- अमृ॰ प्र॰ ४ ओ॰ २६
**पृथु**- सं॰ वि॰ १ स्थूळ-२ जाड.

## पे-पै.

**पेरवण**- प्रा॰ ना॰ १ कल्पित कथा भा॰ अ॰ १ ओ॰ ३०४- २ भूषण-अथवा व्यर्थ बडिवार- दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ २०- ३ कल्पितवार्ता- आ॰ पं॰ २ स॰ २ ओ॰ १.
**पेटी**- प्रा॰ ना॰ सांगड.
**पेंडखें**- प्रा॰ ना॰ मर्यादा- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ६६५.
**पेंढळी**- प्रा॰ ना॰ पुष्टता.
**पेणा**- प्रा॰ ना॰ मुक्काम- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ १४३
**पेणें**- प्रा॰ ना॰ पेणा- भा॰ अ॰ १ ओ॰ २५४.
**पेंदळी**- प्रा॰ ना॰ पाहा- पेंडळी- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ४०१.
**पेंधा**- प्रा॰ वि॰ पांगळा- अथवा मांगूळ- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ९०२- अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ६७.
**पेलणें**- प्रा॰ धा॰ ना॰ १ पोहणें- २ हलुवार तोलणें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १०१ ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २५१- ३ लोटणें- रुक्मि॰ अ॰ १० ओ॰ ४३.
**पेल्हिणें**- प्रा॰ धा॰ ना॰ पोसणें- भा॰ अ॰ १ ओ॰ ८
**पेल्होवेली**- प्रा॰ ना॰ वृध्धि- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ८१.
**पेहू**- सं॰ ना॰ पोट फुगी रोग- दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ २०.
**पेय**- सं॰ ना॰ पिण्याचे पदार्थ ते.
**पैं**- सं॰ अप॰ ना॰ वै- पादपूरण- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ६३१- भा॰ अ॰ १ ओ॰ १७२.
**पैक**- प्रा॰ ना॰ समुदाय- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ५४.
**पैंजण**- प्रा॰ ना॰ पादभूषण- भा॰ अ॰ २ ओ॰ ४६.
**पैठणें**- प्रा॰ धा॰ ना॰ बसणें- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ १३७.
**पैस**- प्रा॰ ना॰ १ विस्तार- ज्ञा॰

अ०९ओ०१३७-२ वि० मोकळें- उ० पैसआकाशअवकाश॥इ०

**पैसारु**- प्रा० ना० अवकाश- ज्ञा० अ०१७ओ०२७-

## पो-पौ-

**पोखण**- सं० अप० ना० पोषण- अमृ०प्र०२ओ०६९-

**पोखरणी**- सं० अप० ना० पुष्करणी- तळें- विहीर- अमृ०प्र०४ओ०३१

**पोटाळणें**- प्रा० धा० ना० १ कवटाळणें- अमृ०प्र०७ओ०१०९-२ आंवळून धरणें- ज्ञा० अ०१३ओ०३८२-

**पोत**- सं० ना० नौका-

**पोत**- सं० अप० ना० पुत्र-

**पोलडे**- प्रा० ना० पिशवी-

**पोतास**- प्रा० ना० कापूर- ज्ञा० अ० १०ओ०१४२- अमृ०प्र०४ओ०५-

**पोफळ**- प्रा० ना० १ सुपारी- २ प्रतिज्ञा- ज्ञा० अ०१३ओ०२०-

**पोरटें**- प्रा० वि० पोरकें अथवा निपितरें- म्हणजे निपटारें- दा० द०२ स०३ओ०१६-

**पोषक**- सं० ना० रक्षणकर्त्तापुरुष २ साधन- ज्ञा० अ०१०ओ०१३६-

**पोसणें**- प्रा० वि० पोसलेलें- धा० ना० पोषणकरणें-

**पोहणी**- प्रा० ना० पीहो अथवा पहू रास- भा० अ०२६ओ०२०३-

**पौगंड**- सं० अप० वि० बाळ आणि तरुण यांच्या मधली दशा- भा० अ०१२ओ०३२१-

**पौत्र**- सं० ना० पुत्राचापुत्र अथवा नातू-

**पौर**- सं० वि० पुरवासी-

**पौळी**- प्रा० ना० १ मूददशा- ज्ञा० अ०१८ओ०५४१- २ धर्मपोई- ३ आचार- ज्ञा० अ०१८ओ०३६-

**प्रकंपन**- सं० ना० वायु-

**प्रकर**- सं० ना० समुदाय-

**प्रकाश**- सं० ना० चिद्रूप-

**प्रकृति**- सं० ना० १ माया- २ प्रजा-

**प्रखर**- सं० वि० तीक्ष्ण-

**प्रचारु**- सं० अप० ना० प्रचार अथवा गमन-

**प्रचीत**- सं० अप० ना० प्रतीति म्हणजे अनुभव-

**प्रजापति**- सं० ना० १ ब्रम्हदेव- २ दक्षकर्दमादि ऋषि ते-

**प्रणत**- सं० वि० शरण-

**प्रणम्य**- सं० ना० प्रणाम अथवा नमन-

**प्रणव**- सं० ना० ॐकार-

**प्रतिकार**- सं० ना० दूरीकरण-

**प्रतिकुंचक**- सं० अप० वि० प्रतिकूळ- दा० द०११ स०६ओ०५-

प्रतिग्रह- सं॰ना॰ दानघेणें.
प्रतिपत्ति- सं॰ना॰ ग्रंथरचना- ज्ञा॰अ॰६ ओ॰२२.
प्रतिलोम- सं॰ना॰१ व्यतिरेक-२ वि॰ उलटें.
प्रतिलोमज- सं॰ना॰ उत्तमवर्णाचे स्त्रियेचे ठायीं नीच वर्णाचे पुरुषापासून झालेली संततीती.
प्रतिविभूति- सं॰ना॰ ऐश्वर्यादिक- ज्ञा॰अ॰१०ओ॰४१.
प्रतीति- सं॰ना॰ साक्षात्कार.
प्रतोद- सं॰ना॰ चाबूक.
प्रत्यग्बोध- सं॰ना॰ ब्रम्ह प्रत्यगात्माअभेदज्ञान.
प्रत्यगात्मा- सं॰ना॰ देहामध्येंव्यापून राहिलें जें ब्रम्हतें-२ त्वंपदांचें लक्ष्यतें-३ कूटस्थ.
प्रत्यगावृत्ति- सं॰ना॰ स्वस्वरूपाकार वृत्तिती.
प्रत्यय- सं॰ना॰ अनुभव.
प्रत्याहार- सं॰ना॰ इंद्रियांचीअंतर्मुखता- ज्ञा॰अ॰९ ओ॰२१५.
प्रत्यूह- सं॰ना॰ विघ्न.
प्रदोषचर- सं॰ना॰ राक्षस.
प्रधान- सं॰वि॰ मुख्य-२ ना॰ माया
प्रबंधहोडा- सं॰अप॰ना॰ कविलकरणसांचीपैज- ज्ञा॰अ॰१०ओ॰८
प्रभंजन- सं॰ना॰ वायु.
प्रभव- सं॰ना॰ उत्पत्ति.
प्रभाकर- सं॰ना॰ सूर्य.
प्रभु- सं॰ना॰ राजा.
प्रमथनाथ- सं॰ना॰ शिव.
प्रमद- सं॰अप॰ना॰ प्रमाद.
प्रमदा- सं॰ना॰ स्त्री.
प्रमय- सं॰अप॰ना॰ प्रमेय- परमार्थ- ज्ञा॰अ॰७ ओ॰१९८.
प्रमा- सं॰ना॰ प्रमाण- अमृ॰प्र॰ ६ ओ॰४१.
प्रमाण- सं॰ना॰१ प्रयंतर-२ अंतःकरण
प्रमाणचैतन्य- सं॰ना॰ सप्तचैतन्यांतील आभासचैतन्याचें अंतःकरण चैतन्य नामक तिसरें अंगतें.
प्रमाता- सं॰ना॰ प्रमाण करणारा.
प्रमातृचैतन्य- सं॰ना॰ सप्तचैतन्यांतील- आभासचैतन्याचें जडास चेतविणारें चौथें अंगतें.
प्रमाद- सं॰ना॰ अतिशयमोह किंवा असावधपणा.
प्रमेय- सं॰ना॰ विषय.
प्रमेयचैतन्य- सं॰ना॰ सप्तचैतन्यांतील आभासचैतन्याचें पांचवें अंग.
प्रमेयत्व- सं॰ना॰ विषयत्व- अमृ॰प्र॰५ ओ॰१६.
प्रयत- सं॰वि॰ नम्र.

**प्रयोजन** - सं० ना० १ अनुबंधचतुष्ट यांतील शोकापगमन आणि आनंदा वाप्ति - या उभयरूपानें तिसरें अंग तें २ कारण.

**प्ररोह** - सं० ना० उदय - ज्ञा० अ० ६ ओ० १२.

**प्रलाप** - सं० ना० भाषण.

**प्रवस्कंध** - सं० ना० ज्याची मर्यादा मेघमंडळापासून सूर्यमंडळापावेतों आहे - असा जो सप्तस्कंधांतील दुसरा स्कंध तो.

**प्रवादु** - सं० अप० ना० प्रवाद म्हणजे बोलणें.

**प्रविविक्तभोग** - सं० ना० स्वप्न स्थान किंवा मनोगन्य यांतील अस्पष्टभाग तें.

**प्रवृत्ति** - सं० ना० बहिर्मुखवृत्ति - २ प्रपंच - ३ प्रवर्तन.

**प्रश्न** - सं० ना० १ पृच्छा - २ अथर्वण वेदांतील एका उपनिषदाचें नाव.

**प्रसर** - सं० ना० १ विस्तार - २ प्राप्ति ज्ञा० अ० १६ ओ० १०७.

**प्रसादिक** - सं० वि० गुरु किंवा देव यांच्या कृपेनें जें कांहीं काव्यादि भाषण लोकांत मान्य पडतें त्याचें नाव.

**प्रसादु** - सं० अप० ना० १ प्रासाद अथवा मंदिर - २ देऊळ. ज्ञा० अ० १४ ओ० २३२.

**प्रसुप्त** - सं० वि० गाढ निद्रिस्त.

**प्रसू** - सं० ना० प्रसूत होणारी स्त्री.

**प्रस्थे** - सं० अप० ना० प्रस्थ म्हणजे खटलें - दा० द० १४ स० १ ओ० ५२.

**प्रस्ताव** - सं० ना० पश्चात्ताप - दा० द० १ स० १ ओ० १३.

**प्रस्तावा** - सं० ना० पश्चात्ताप - वा० ओ० ५२४१.

**प्रस्तावो** - सं० अप० ना० प्रस्ताव म्हणजे प्रसंग अथवा गोष्ट. अमृ० प्र० ७ ओ० ७.

**प्रस्थानत्रय** - सं० ना० १ शारीर भाष्य - २ गीता भाष्य आणि उपनिषद्भाष्य. या तिहींचा समुच्चय

**प्रस्तावो** सं० अप० ना० प्रस्तावो म्हणजे प्रसंग. ज्ञा० अ० १६ ओ० ६२.

**प्रळयो** - सं० अप० ना० प्रलय म्हणजे हलकल्लोळ.

**प्रज्ञा** - सं० ना० बुध्दि.

**प्रज्ञाचक्षु** - सं० वि० १ जन्मांध - २ धृतराष्ट्र.

**प्राकार** - सं० ना० १ कोट - २ पांवळं ज्ञा० अ० १८ ओ० ३६.

**प्राकृत** - सं० वि० अज्ञानी.

**प्राकृतदृष्टि** - सं० वि० १ लौकिक दृष्टि - २ चर्मदृष्टि.

**प्राकृतहेंदरें** - सं० अप० वि० गावाळी - ज्ञा० अ० ९ ओ० ३८०.

**प्राची** - सं० ना० पूर्वदिशा.

**प्राचीन** - सं० वि० १ पुरातन - २

ना॰ पूर्वकर्म अथवा प्रारब्ध.

प्राचेतस - सं॰ना॰ वाल्मीकिऋषि.

प्रांजळ - सं॰ अप॰ वि॰ प्रांजल म्हणजे स्पष्ट.

प्राज्य - सं॰ वि॰ १ पुष्कळ-२ वृध्धिंगत.

प्राण - सं॰ ना॰ शरीरस्थ आधोर्ध्वगामी वायु.

प्राणतिया - प्रा॰ ना॰ परळ-ज्ञा॰ अ॰१७ ओ॰९६.

प्राणधर्म - सं॰ ना॰ क्षुधा आणि तृषा.

प्राणपंचक - सं॰ ना॰ व्यानसमानोदान प्राणापान या समुच्चयाचें नांव.

प्रांत - सं॰ ना॰ १ अत्यंत नाश-२ मर्यादा.

प्रातराश - सं॰ ना॰ सकाळचा फराळ अथवा जेवण.

प्रायश्चित - सं॰ ना॰ शुध्धि.

प्रारब्ध - सं॰ ना॰ त्रिविध कर्मांतील तिसरें कर्म-म्हणजे जें संचितकर्मांतून भोगास आलें तें.

प्रावृट् - सं॰ ना॰ वर्षाकाल.

प्रांशु - सं॰ वि॰ उंच.

प्रास - सं॰ ना॰ यमक उ॰ कविगणपदाभेदाभेद॥ पद प्रास कर्त्ते.

प्रासाद - सं॰ ना॰ १ मंदीर-२ देऊळ.

प्राज्ञाभिमान - सं॰ ना॰ सुषुप्तिअवस्थेंतील अभिमान.

प्राज्ञाभिमानी - सं॰ ना॰ नेणिवदशेचा अभिमान धरणारा सुषुप्तिगत जीव.

प्रिय - सं॰ ना॰ १ आनंद-२ वि॰ आवडतें.

प्रियु - सं॰ अप॰ ना॰ १ पतीस संज्ञा-२ वि॰ आवडतें.

प्रेत्न - सं॰ अप॰ ना॰ प्रयत्न-दा॰ द॰८ स॰७ ओ॰६३.

प्रेषणें - सं॰ अप॰ धा॰ ना॰ पाठविणें.

प्लवंग - सं॰ ना॰ वानर.

प्लवग - सं॰ ना॰ वानर.

प्लवंगम - सं॰ ना॰ वानर.

## फ.

फटकाळ - प्रा॰ वि॰ १ वाईट-२ दुर्भाषणी-३ चोरटें.

फड - प्रा॰ ना॰ समुदाय-दा॰द॰ ११ स॰२ ओ॰११.

फणि - सं॰ ना॰ सर्प.

फणिवर - सं॰ ना॰ १ श्रेष्ठसर्प-२ लक्ष्मण.

फरश - सं॰ अप॰ ना॰ परशुनामक आयुध.

फरसाळ - प्रा॰ ना॰ स्वाद-ज्ञा॰ अ॰१८ ओ॰२०५.

फरा- प्रा० ना० पिंपळवण- रुक्मि० अ०७ ओ०२१.

फरारी- प्रा० ना० ओढ- ज्ञा० अ०१८ ओ०२५१.

फलचैतन्य- सं० ना० सत्त चैतन्यां तील आभास चैतन्याचें साहावें अंग त्याचें लक्षण प्रमाण आणि प्रमेय या चा ठोली भावतो.

फलव्याप्ति- सं० ना० जीव चैतन्या चीव्याप्तितो.

फलश्रुति- सं० ना० कांहीं एका कृ तीचें फळ तीविषयींची जीस्तुति ती.

फळ- सं० अप० ना० फल- २ भाला आदिकरून ज्या शस्त्रास अग्रभागीं लोखंडाचें शस्त्र असतें तें-

फळी- प्रा० ना० १ खेळ -२ कलह अ थवा युध्य.

## फा-फि.

फांकणें- प्रा० धा० ना० पसरणें-

फाटा- प्रा० ना० बडबड-

फाडोवाड- प्रा० ना० मोठेपणा- भा० अ०५ ओ०१०३-२ वि० पुष्कळ- भा० अ०३ ओ०२५४-३ वि० स्पष्ट अथवा मोकळें.

फांपावणें- प्रा० धा० ना० विस्तारणें दा० द०११ स०१ ओ०८.

फाल्गुन- सं० ना० अर्जुन.

फाव- प्रा० ना० अवकाश- अमृ० प्र०७ ओ०११२.

फासाटी- सं० अप० ना० पाश- भा० अ०१ ओ०१०.

फिटणें- प्रा० धा० ना० १ सुटणें- २ क्षीण होणें.

## फु.

फुई- प्रा० ना० तुषार- अथवा शिं तोडा- दा० द०११ स०७ ओ०५

फुंग- प्रा० ना० फुगारा अथवा अ भिमान- भा० अ० २ ओ०५५०

फुगा- प्रा० ना० अभिमान, बुडबु डा.

फुंज- प्रा० ना० अभिमान- विवे० पू० प्र० २ ओ०८४.

फुटी- प्रा० ना० दीप्ति अथवा तेज ज्ञा० अ०११ ओ०२०४.

फुडें- प्रा० वि० १ खरें- ज्ञा० अ०६ ओ०७८- विवे० पू० प्र०१ ओ०६- अमृ० प्र०४ ओ०३५ -२ निश्चयें- ज्ञा० अ०७ ओ०९८-३ बरें- ज्ञा० अ०८ ओ०२४२.

फुणगा- सं० अप० ना० स्फुलिंग- ठिणगी.

फुनगा- सं० अप० ना० फुणगा- ज्ञा० अ०१६ ओ०८.

फुलावणी- सं० अप० ना० स्फुलि-

तपणा.

फुलिंग- सं० अप० ना० ठिणगी- दा० द० ८ स० ४ ओ० २५.

फुली- भा० ना० फुलण्याचाभर- ज्ञा० अ० १५ ओ० १२०.

फुर्से- भा० ना० विषारीजनावर.

## फे - फो.

फेडणें- भा० धा० ना० १ दूरकरणें- अमृ० प्र० ७ ओ० ६१- २ उघडेंकरणें- दा० द० १ स० १ ओ० १२.

फेण- भा० ना० फेंस.

फोकरणें- भा० धा० ना० प्रगटकरणें- ज्ञा० अ० १६ ओ० २२१.

फोस- भा० वि० व्यर्थ- तुच्छ.

फोसें- भा० वि० फोसअथवा फलकट- वा० ओ० ६३१.

## ब.

बंक- सं० ना० चौकी.

बकारादिळकारांत- सं० वि० ब पासून ळ पावेतों वर्ण असें तें.

बगा- भा० ना० आकार- ज्ञा० अ० ११ ओ० ४६८- ४६९- ज्ञा० अ० १३ ओ० १०४१

बगें- भा० शद्ब० अव्य० - योगें- ज्ञा० अ० १५ ओ० ३३८.

बटवाळ- भा० वि० भ्रष्ट- दोषी- दा० द० २ स० ३ ओ० ३०.

बडिवार- भा० ना० मोठेपणा- कीर्ति- विवे० पू० प्र० ३ ओ० ३१.

बडिवारु- भा० ना० बडिवार- आ० पं० ४ स० १ ओ० १.

बणवी- भा० ना० वणवा- दा० द० ३ स० ७ ओ० ६२.

बत्तीस- भा० वि० १ कांहींपदार्थांचें- २ ना० बत्तीसपदार्थ.

बत्तीसपदार्थ- भा० ना० पांचजिनसांच्या रूपानें असणारे पदार्थ- वा० ओ० २१४३.

बंदी- सं० ना० स्तुतिकरणारा पुरुष.

बंदीजन- सं० ना० भाट.

बंधकी- सं० ना० दासी.

बध्ध- सं० ना० १ चत्वारजीव कोटीतील अधम कोटीचा पुरुषतो- उ० सृष्टिजेकाचराचर ॥ जीवदाटलेअपार ॥ परितेअवघेचत्वार॥ बोलिजेती ॥ १ ॥ दा० ॥ २ वि० बांधलेला- उ० ॥ तरीबध्धम्हणजे बांधला ॥ तोविवेकें मोकळा केला ॥

बंधु- सं० अप० ना० बंधअथवा बंधन- २ सं० ना० भाऊ.

बभ्रा- सं० ना० उपहास.

बरटा- भा० ना० रापलेलाचिखल ज्ञा० अ० ७ ओ० ८८.

बरड- भा० ना० माळजमीन- अमृ०

प्र०७ओ०१११.

बराडी-प्रा०वि०दुकळलेलें अथवा आशाळभूत.

बरव-प्रा०ना० शोभा- बरवेपण अमृ०प्र०१ओ०२६.

बरळ-प्रा०वि० चावळतें अथवा छांदिष्ट- आर्ष- ज्ञा०अ०५ ओ०११६- विवे०मू०प्र०२ओ०६-२भ्रमिष्ट-वा० ओ०४४२.

बल-सं०ना०सैन्य.

बलंगी-प्रा०ना० बाजरीच्या निंबुराचें कुसपट किंवा तें दातांत अडकल्यानें होतें दुःखलें- दा०द०३स०६ ओ०१८.

बलहा-सं०ना०इंद्र.

बल्वुले-सं०ना०गोळी.

बलाहक-सं०ना०मेघ.

बस्त-सं०ना० बोकड.

बस्वण्णा-प्रा०ना० जंगमसमतीलोकनंदीस म्हणतात.

बहळ-प्रा०वि०बहुत-ज्ञा०अ०१५ ओ०६-भा०अ०९ओ०२०७.

बहाळी-प्रा०ना०साजूकपण-ज्ञा० अ०१३ओ०१७९-१८०.

बहिःकरण-सं०ना०चक्षुरादिदशेंद्रियें.

बहिर्सुख-सं०वि०विषयोत्सुक.

बहिरंगोपासन-सं०ना०१संपद्विधि-२आरोपविधि-३संवर्गविधि ४अध्यासविधि-असें चार प्रकारचें बाहेरलें उपासन तें म्हणजे कर्मभक्ति.

बर्हि-सं०ना०मोर.

बर्ही-सं०ना०दर्भ.

बहुडणें-प्रा०धा०ना०१मागेंसरणें- ज्ञा०अ०९ओ०३७१-२फिरणें- ज्ञा०अ०१०ओ०७३.

बहुडा-प्रा०ना०वर्षाव- ज्ञा०अ० ११ओ०६७०-६७१.

बहुरूप-सं०ना०सोंगाचा खेळ- अमृ०प्र०२ओ०९.

बहुवसपण-सं०अप०ना०सर्वेत्व- ज्ञा०अ०६ओ०१०७.

बहुसाल-सं०अप०वि०बहुत- बहुधा-भा०अ०३ओ०२७५.

बहूळ-सं०अप०वि०अमित भा०अ०२३ओ०३२६.

बळ-सं०अप०ना०१सैन्य-२शक्ति

बळबुंड-सं०अप०वि०दांडगा.

बळसें-प्रा०ना०सुखनासिकादिमळ- दा०द०३स०१ओ०२०

बळाहक-सं०अप०मेघ.

बळीकरण-प्रा०ना० निरोगीकरण-ज्ञा०अ०१६ओ०१५०.

## बा.

बाउला-प्रा०ना० बाहुला-अथ०

पुलवा- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ४३८

बाकस- प्रा॰ ना॰ चोइटी- अथवा चिपाड- दा॰ द॰ ६ स॰ ३ ओ॰ ९.

बागडी- प्रा॰ ना॰ वेश- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५७०.

बागा- प्रा॰ ना॰ १ आकार- विवे॰ उ॰ प्र॰ ९ ओ॰ ७४- २ मार्ग- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ ८०.

बागीबछ- प्रा॰ ना॰ कंप

बागु- प्रा॰ ना॰ बाग अथवा मार्ग- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ ८०.

बाजा- प्रा॰ ना॰ पलंग- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २२-

बाजी- प्रा॰ ना॰ डाव-

बाजीगरी- प्रा॰ ना॰ गारुडविद्या- दा॰ द॰ ११ स॰ ४ ओ॰ १२.

बाड- प्रा॰ ना॰ ग्रंथ- उ॰ बाडाचे भीतरी ओषधें लिहिलीं॥ पा होतीस मजलीं तरी काय॥ इ॰॥

बाणनें- प्रा॰ धा॰ ना॰ प्रीती तिस येणें- २ प्रवेशणें- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ५२.

बादरायण- सं॰ ना॰ कृष्णद्वैपायन नामक व्यास-

बांदवडी- प्रा॰ ना॰ १ अधीनता- २ शद्ब॰ अव्य॰ अधीन- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ३४६- विवे॰ पू॰ प्र॰ ७ ओ॰ ३६.

बाधणें- प्रा॰ धा॰ ना॰ १ बाधकहोणें- २ निरसणें- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ ३०

बाधा- सं॰ ना॰ १ निरास- नामरूपसत्यत्व बुध्दिचें हनन- २ विकार- उ॰ भक्तिकुधार सरांधा॥ त्यासरत्याने कधी नोहो बाधा॥ इ॰॥

बापया- प्रा॰ ना॰ चातकपक्षी- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १८२-१८४.

बापिक- प्रा॰ ना॰ कुलपरंपराधर्म- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ६७.

बापुडें- प्रा॰ वि॰ अनाथ- दीन-

बापैया- प्रा॰ ना॰ पाहा- बापया-

बाबडें- प्रा॰ वि॰ भाजलेलें- भा॰ अ॰ २१ ओ॰ २३६.

बाबरझोटी- प्रा॰ ना॰ भयंकर मोकळे केस-

बाबळपडणें- प्रा॰ धा॰ ना॰ बहुत होणें- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १०१.

बाबळेजणें- प्रा॰ धा॰ ना॰ पाल्हाळणें म्हणजे विस्तारणें- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १८५.

बाबुळी- प्रा॰ ना॰ भोवाळ- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ६०- विवे॰ उ॰ प्र॰ ३ ओ॰

बाळेंभोळें- प्रा॰ वि॰ अज्ञभोळेसर- भा॰ अ॰ ३ ओ॰ २२४.

बायणी- प्रा॰ ना॰ वायदा- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ २५२.

बाराबळी- प्रा॰ ना॰ बारसें- भा॰ अ॰ १२ ओ॰ ५९९.

बाराबुळी- प्रा॰ ना॰ बाराबळी-

बारासोळा- प्रा॰ वि॰ १ सूर्यकला

चंद्रकला यांचें- ना॰ सूर्यचंद्रकला-
बारी- प्रा॰ ना॰ छत्रादिधर- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ४१६-४१७.
बाल- सं॰ ना॰ १ लेंकरूं- २ केश- ३ वि॰ अज्ञान.
बालक- सं॰ ना॰ लेंकरूं अथवा मूल.
बालबुध्धि- सं॰ वि॰ अज्ञान.
बालबोध- सं॰ वि॰ १ सुगम किंवा सोपें २ ना॰ देवलिपी.
बालिश- सं॰ वि॰ मूर्ख.
बावनया- प्रा॰ ना॰ मैलागरुचंदनरक्ष- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ६३१.
बावळा- प्रा॰ वि॰ १ वेडसर- २ साधा- उ॰ वेषधरावाबावळा॥ अंतरीअसाघ्या नानाकळा॥
बाष्कळ- सं॰ अप॰ वि॰ अप्रमाणिक खोटें- या॰ ओ॰ ५२३६.
बाष्ट- प्रा॰ वि॰ बासट.
बासट- प्रा॰ वि॰ ओशट- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ४०३-४०४.
बाहाणें- प्रा॰ धा॰ ना॰ बोलावणें- या॰ ओ॰ ४१२.
बाहाळी- प्रा॰ ना॰ पाहा- बहाळी-
बाहुज- सं॰ ना॰ क्षत्रिय.
बाहुल्य- सं॰ ना॰ अतिशयता- अधिकता-
बाहे- सं॰ अप॰ ना॰ बाहु- उ॰ विश्वनाहीं मीची आहें॥ वेद ऊभारोनी बाहे॥ बोल तसे जीव कांहे॥ यथार्थ हें न जाणती॥१॥ स्पष्ट पूर्णस्थिति॰
बाहेरसवडियाभंगी- प्रा॰ अ॰ अहाच- वरवर- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ३२६-३२७.
बाह्य- सं॰ वि॰ १ बाहेरील- २ ना॰ विषय- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १३०.
बाह्य- सं॰ अप॰ ना॰ हात.
बाळक- सं॰ अप॰ ना॰ लेंकरूं.
बाळबुध्धि- सं॰ अप॰ वि॰ लेंकुरबुध्धि.
बाळबोध- सं॰ अप॰ वि॰ १ सुगम- सोपें- २ ना॰ देवलिपी- उ॰ ब्राम्हणें बोळबोध अक्षर॥ घडसूनकरावें सुंदर॥
बाळा- सं॰ अप॰ ना॰ १ तारुण्याचस्छेस पूर्ण आली नाहीं ती स्त्री- २ सं बो॰ हे बाळका-
बाळाबगुळा- सं॰ अप॰ ना॰ बालनामक व बगलानामक देवता.

## बि- बी- बु.

बिजावळी- प्रा॰ ना॰ भेद अपवा भिन्नता- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ २७०.
बिडाल- सं॰ ना॰ मांजर.
बिडालक- सं॰ ना॰ मांजर.
बिडाळक- सं॰ अप॰ ना॰ मांजर.
बिडीस- सं॰ अप॰ ना॰ बडिश- आमिष अथवा मांस.

बिडौज- सं॰ना॰ इंद्र
बिढार- प्रा॰ना॰ बिऱ्हाड- विवे॰ पू॰प्र॰२ओ॰४.
बिंदुलें- सं॰अप॰ना॰ बिंदु- भू न्य.
बिंब- सं॰ना॰ तोंडलें.
बिबडु- प्रा॰ना॰ नीटकेलेली ओलीभूमि- ज्ञा॰अ॰१ओ॰५३३.
बिंबीफल- सं॰ना॰ तोंडलें.
बिराणा- सं॰अप॰ना॰ वीरपुरुष.
बिरार- प्रा॰ना॰ विकार- विवे॰ पू॰प्र॰७ओ॰५०.
बिरिदाईत- सं॰अप॰वि॰ ब्रीद धर्त्ता.
बिरुद- सं॰अप॰ना॰ ब्रीद.
बिलोर- प्रा॰ना॰ कांच.
बिसाट- प्रा॰वि॰ सामान्य- ज्ञा॰ अ॰१८ओ॰ ३७५.
बिहणें- प्रा॰धा॰ना॰ भिणें- अमृ॰ प्र॰७ओ॰५६.
बिहिती- सं॰अप॰ना॰ भीति- ज्ञा॰अ॰१२ओ॰८८.
बीक- प्रा॰ना॰१ आवड- ज्ञा॰अ॰ ६ओ॰१५. २ सौंदर्य अथवा शोभा- ज्ञा॰अ॰१३ओ॰७००- ३ तेज- अमृ॰ प्र॰२ओ॰६.
बीज- प्रा॰ना॰ दुसरीतिथि म्हणजे द्वितीया- या॰ओ॰३८७०.
बीजावळी- प्रा॰ना॰ भिन्नता भिजावळी राहू पाहा.
बीरभारीव- सं॰अप॰ना॰ वीर रस.

## बु

बुचकळणें- प्रा॰धा॰ना॰ भिजविणें- निमग्न होणें.
बुझणें- प्रा॰धा॰ना॰१ समजणें विवे॰पू॰प्र॰२ओ॰३- २ जाणणें- प॰प्र॰४ओ॰१०.
बुझावणें- प्रा॰धा॰ना॰ समजावणें- ज्ञा॰अ॰६ओ॰२०.
बुडसळ- प्रा॰ना॰ झडून वाळलेला वृक्ष- ज्ञा॰अ॰१५ओ॰१६०.
बुंथी- प्रा॰ना॰ घुंगट- रुक्मि॰ अ॰१५ओ॰३६.
बुधनालदांडा- प्रा॰ना॰ झाडाच्या बुंधाशी नाळ रुती करून बांधून मारणें- तो- दा॰द॰३स॰७ओ॰६७
बुधलेमार- प्रा॰ना॰ दारूभरले ल्या बुधल्याशीं बांधून त्या दारूस आग देऊन कोणेकास मारणें
बुद्धि- सं॰स्त्री॰ अंतःकरण पंचकांतील- निश्चयकर्त्ता तिसरा अवयव त्याचें नाव.
बुभुक्षु- सं॰वि॰ भुकेलेलें.
बुरु- प्रा॰वि॰ उत्तम- ज्ञा॰अ॰१७ ओ॰२८०- २८१.

बुध्र - सं० ना० सूर्यकिरण.
बुहली - सं० ना० अपानद्वार.
बृहदारण्यक - सं० ना० वाजसनेईशाखेचें उपनिषत्.

---

## बे-बो-बौ.

---

बेरें - प्रा० ना० खिडकी - ज्ञा० अ० ६ ओ० २७९.

बेच - प्रा० ना० पानांत घातलें - ज्ञा० अ० १५ ओ० १०३.

बेचळ - प्रा० ना० जुंबाड - ज्ञा० अ० १५ ओ० ९३.

बेचाड - प्रा० ना० जुंबाड - दा० द० ५ स० २ ओ० ४०.

बेजें - प्रा० ना० युक्ति - ज्ञा० अ० १८ ओ० १२४.

बेंधु - प्रा० ना० राजबंधु - ज्ञा० अ० १ ओ० १३१.

बेंबळ - प्रा० वि० ढिलें - ज्ञा० अ० १ ओ० २१५.

बोचिरें - प्रा० वि० दंतहीन.

बोणें - प्रा० ना० नैवेद्य - अमृ० प्र० १ ओ० ३६.

बोध - सं० ना० १ उपदेश - २ ज्ञान - वा० ओ० ७०७.

बोधाभास - सं० ना० ज्ञानाभास म्हणजे जीव.

बोने - प्रा० ना० बळी - नैवेद्य - ज्ञा० अ० ६ ओ० २९२.

बोबडी - प्रा० ना० बरळशब्द.

बोंबणें - प्रा० धा० ना० बुजऊन बोंकणें. शोधकरणें - ज्ञा० अ० ७ ओ० ९८.

बोबाणें - प्रा० धा० ना० बोभाटणें - ज्ञा० अ० १३ ओ० १४.

बोभाइणें - प्रा० धा० ना० मोठ्यानें हाक मारणें - ओरडणें - आ० पं० १ स० ५ ओ० ७१.

बोभाट - प्रा० ना० गलबला - अमृ० प्र० ३ ओ० १.

बोरबार - प्रा० ना० १ खटपट - ज्ञा० अ० ८ ओ० ३५ - २ सुखदुःखक्षीण.

बोलिंगड - प्रा० वि० बोलकें.

बोलु - प्रा० ना० शब्द - अमृ० प्र० ६ ओ० ७.

बोहणी - प्रा० ना० आरंभ - ज्ञा० अ० १८ ओ० ७८४

बोहरी - प्रा० ना० १ अग्नि - ज्ञा० अ० १८ ओ० ५५५ - २ भस्म - भा० अ० ५ ओ० ४८१ - आ० पं० २ स० ५ ओ० ७१ - राख - राखुंडी अथवा रांगोळी - दा० द० ५ स० २ ओ० २६.

बोहिणें - प्रा० धा० ना० हाक मारणें - बोलाविणें - ज्ञा० अ० १ ओ० २१५.

बोळावा - प्रा० ना० १ बोळवण. २ सोबती - ज्ञा० अ० १६ ओ० ६५.

बौदणें - प्रा० धा० ना० लयास जा

णें- अमृ० प्र०९ ओ० २८.

**बोहे**- प्रा० वि० बहुल- ज्ञा० अ० ९ ओ० १७.

**ब्रध्न**- सं० ना० सूर्य.

**ब्रम्ह**- सं० ना० १ त्रिविध भेद व त्रिविधपरिछेद रहित जी सच्चिदानंद वस्तु ती अथवा त्याचें नाव- २ वेदास संज्ञा

**ब्रम्हकटाह**- सं० ना० ब्रम्हांड.

**ब्रम्हकन्या**- सं० ना० १ सरस्वती- २ अहित्या.

**ब्रम्हग्रहो**- सं० अप० ना० ब्रम्हग्रह म्हणजे ब्रम्हराक्षस.

**ब्रम्हगोळ**- सं० अप० ना० ब्रम्हांड

**ब्रम्हचारी**- सं० ना० लग्न करतां इंद्रिये दमन करून राहाणारा जो चत्वार आश्रमांतील पहिला आश्रम धरतो- २ परब्रम्हीं च्याठायीं ज्याचीगतितो.

**ब्रम्हनंदन**- सं० ना० नारद- वसिष्ठादिक ब्रम्हमानस पुत्र.

**ब्रम्हभुवन**- सं० ना० सत्य लोक

**ब्रम्हविणा**- सं० अप० ना० १ ब्रम्हवीणा- नारदाचा हातांत जो विणा असतो त्याचें नाव- २ मस्तकास संज्ञा.

**ब्रम्हविद**- सं० अप० ना० ब्रम्हवित् म्हणजे ब्रम्हज्ञानी पुरुष.

**ब्रम्हवृत्ति**- सं० ना० १ ब्रम्हाकारवृत्ति- २ ब्राम्हणाची उपजीवन वृत्ति.

**ब्रम्हशाळा**- सं० अप० ना० ब्रम्हशाला म्हणजे वेदशाळा.

**ब्रम्हसंवित्ति**- सं० ना० ब्रम्हज्ञान.

**ब्रम्हसाक्षात्कार**- सं० ना० निर्गुण साक्षात्कार.

**ब्रम्हसूत्र**- सं० ना० यज्ञोपवीत.

**ब्रम्हज्ञानी**- सं० वि० निर्गुणस्वरूपज्ञानी.

**ब्राम्हण**- सं० ना० १ चत्वार वर्णांतील उत्तम वर्ण तो- २ ब्रम्हस्वरूप जाणतो तो.

**ब्राम्हमुहूर्त**- सं० ना० पाहाटचीं ४ घटकारात्र त्याचें नाव.

---

# भ

---

**भकाद**- प्रा० ना० वहकावण- दा० द० ५ स० २ ओ० ५७.

**भकाध**- प्रा० ना० भकाद.

**भक्ति**- सं० ना० १ भजन- २ ऐक्य.

**भग**- सं० ना० १ ऐश्वर्य- २ छिद्र.

**भंग**- सं० ना० १ तरंग- २ नाश.

**भंग**- प्रा० ना० अंग. ज्ञा० अ० १० ओ० ३३५- ३३६.

**भर्ग**- सं० ना० १ शिव- २ सुवर्ण.

**भगण**- सं० ना० नक्षत्र समूह.

**भगवान्**- सं० ना० षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर.

भगिनी- सं० ना० बहीण.
भट- सं० ना० योध्दा- उ० गोधनह रावयास्तव ॥ आलेभट कोण कोण पा हुंदे ॥
भट्ट- सं० ना० भिक्षुक ब्राम्हण- त्या यांतील एक मत्ताचें नाव.
भंड- प्रा० ना० फजीती- उ० ॥ परितें अवघे थोतांड ॥ भंड पुरें ॥
भंडउभंड- प्रा० ना० निरर्थक बा ष्कल्य- दा० द० २ स० १ ओ० २७.
भडस- प्रा० ना० पूर- लोट- विवे० पू० प्र० १ ओ० ६६.
भडसें- प्रा० ना० १ अधिक्य- ज्ञा० अ० ६ ओ० ३५४- २ थोरपण- ज्ञा० अ० ८ ओ० १५२.
भंडिमा- प्रा० ना० दंभ- भा० अ० ३ ओ० ३८८.
भणभण- प्रा० ना० १ ओसाडी- २ वि० ओसाड- दा० द० ११ स० ७. ओ० ८.
भदें- प्रा० ना० खापरांत विस्तवाच्या ज्वाळा निघतात असा पेटवून डोईव र घेऊन नाचतात त्याचें नाव- उ० ॥ भ स्तकीं भदें घ्यावें ॥ पोतें अंग हुर्पळावें
भद्रजाती- सं० ना० हत्ती.
भद्रासन- सं० ना० सिंहासन.
भयभीत- सं० वि० भयभीत- ज्ञा० अ० ११ ओ० ३२८.
भरण- सं० ना० पोषण.

भरण- प्रा० ना० १ आयुष्य- ज्ञा० अ० ११ ओ० ४९९- ५००- २ भराभर अ० व्य० भरती- उ० ॥ वायुमेघाचें भरण भरी ॥ सवेंचि पिटून परते सारी ॥ वायो ऐसा कारभारी ॥ आणीक नाहीं ॥
भरवसा- प्रा० ना० १ विश्वास- २ आश्रय.
भराडा- प्रा० ना० कीर्तन करणा रा गोसावी-
भरें- प्रा० ना० माप- ज्ञा० अ० ९ ओ० ४१६.
भरोवरी- प्रा० ना० १ सामग्री- ज्ञा० अ० १३ ओ० ११३५- दा० द० १ स० २ ओ० २१- २ श्रम- भा० अ० १३- ओ० १७.
भव- सं० ना० १ शिव- उ० ॥ जि वलग माझा त्रैलोक्य विसांवा ॥ त्या चें ध्यान भवा सर्व काळ ॥ अभंग ॥ २ संसार- उ० ॥ भव नेणों- भवनेणों ॥ सर्व हें ब्रम्हचि जाणों ॥ भवनेणों भवनेणों ॥ पद ॥
भवनदी- सं० ना० १ गंगा- २ सं सारनदी.
भवरा- सं० अप० ना० भ्रमर- अमृ० प्र० ५ ओ० ४२.
भवरी- सं० अप० ना० भ्रमण- गरगराट- भा० अ० ८ ओ० ११३.
भव्य- सं० वि० तेजस्वी- ठळक.

भषण-सं॰ना॰ कुत्रें॰
भसित-सं॰ना॰ भस्म॰
भक्ष्य-सं॰ना॰ नचावतां खाण्याचे जे पदार्थ ते॰

## भा॰

भाक-सं॰अप॰ना॰ भाषण अथवा वचन-अमृ॰प्र॰७ ओ॰१४९॰
भाकड-प्रा॰वि॰१ निरर्थक २ म्हातारी गाय म्हैस तिला संज्ञा॰
भाखा-सं॰ अप॰ना॰ भाषण-अमृ॰प्र॰२ ओ॰५४॰
भागवत-सं॰ना॰१ आठरा पुराणाहून निराळें असें एक पुराण आहे तें-२ भगवद्भक्त पुरुष-३ वि॰ भगवद्भक्त॰
भागा फिटणें-प्रा॰धा॰ना॰१ हैंत जाणें-ज्ञा॰अ॰५ ओ॰१४७-२ वांट्यास जाणें-ज्ञा॰अ॰११ ओ॰१५९॰
भांगारें-कानडी शद्ब-ना॰१ सोनें-अमृ॰प्र॰७ ओ॰२३६-२ द्रव्य-ज्ञा॰अ॰१५ ओ॰४९०-ज्ञा॰अ॰६ ओ॰१८
भार्गवी-सं॰ना॰ सरस्वती-शुक्राचार्य-उ॰॥ नमो आतां हे कवि॥ व्यास वाल्मीक भार्गवी॥ जयातें उशनाकवि॥ पुराण गौरवीं बोलिजे॥१॥
भाज-सं॰अप॰ना॰ भार्या॰
भाजन-सं॰ना॰ पात्र॰
भाजा-सं॰अप॰ना॰ भार्या-उ॰॥ देह नोहे तुझा॥ तेथें का सयाची भाजा॥१॥
भाट-सं॰अप॰ना॰ बंदीजन॰।
भाट-प्रा॰ना॰ उखर भूमी-ज्ञा॰अ॰१३ ओ॰४५॰
भांड-प्रा॰ना॰ पुष्कळ बोलून भिकेवर निर्वाह करणारा मनुष्य-भा॰अ॰८ ओ॰८१॰
भांडार-सं॰ना॰ कोशगृह अथवा कोश॰
भांडें-प्रा॰ना॰ तोफ-दा॰द॰३ स॰७ ओ॰७२॰
भाणवसा-प्रा॰ना॰ उतरंड घर॰ रुक्मि॰अ॰१८ ओ॰३५॰
भाणा-सं॰अप॰ना॰ भगिनी अथवा बहीण-दा॰द॰२ स॰३ ओ॰१०
भाणें-प्रा॰ना॰१ ताट अथवा पात्र ज्ञा॰अ॰८ ओ॰१४३-ज्ञा॰अ॰१८ ओ॰१५०-भा॰अ॰३१ ओ॰४५०
भातडी-प्रा॰ना॰ पाठिशीं बाण ठेवण्याचा भाता॰
भातारु-सं॰अप॰ना॰ भ्रतार-अमृ॰प्र॰१ ओ॰२२
भाति-सं॰वि॰ विद्युन-अथवा प्रकाशकर॰
भालुक-प्रा॰ना॰ खाजें अथवा भक्ष्य॰
भातें-प्रा॰ना॰१ भरतें अथवा भा

रती-२ मजूरी- ज्ञा० अ० ६ ओ० ३५२
भान- सं० ना० १ चैतन्य-२ स्मरण अथवा शुध्धि-
भान- सं० अप० ना० सूर्य-
भानु- सं० ना० सूर्य.
भानुनंदन- सं० ना० १ यम-२ श नी-३ सुग्रीव-४ कर्ण.
भानुपुत्र- सं० ना० भानुनंदन.
भाब - प्रा० ना० १ शोभा- ज्ञा० अ० ६ ओ० २५३-२ आभास- ज्ञा० अ० १० ओ० ७७-३ सौंदर्य- ज्ञा० अ० ७ ओ० २०७.
भांबा- प्रा० ना० विकार- विवे० पू० प्र० ७ ओ० ११५.
भाम- सं० ना० मेहुणा-
भामिनी- सं० ना० १ रागावलेली स्त्री-२ संबो० हे कुध्ध स्त्रिये.
भार्या- सं० ना० स्त्री.
भारजा- सं० अप० ना० भार्या.
भारणी- प्रा० ना० अधिकता- ज्ञा० अ० १२ ओ० १५८.
भारती- सं० ना० वाग्देवी- वाचा अमृ० प्र० ३ ओ० ३३.
भारदोरी- प्रा० ना० भारलेलीदोरी
भारेणें- प्रा० धा० ना० जडत्वास येणें ज्ञा० अ० १४ ओ० ९१
भालू- प्रा० ना० कोल्ही.
भाव- सं० ना० स्वरूप- ज्ञा० अ० १० ओ० १०-२ अभिप्राय- ज्ञा० अ० १० ओ० १०३-३ अस्तिक्यबुध्धि-४ अ स्तित्व.
भावगर्भ- सं० ना० सारांश.
भावणें- सं० अप० धा० ना० कल्पि णें-
भावना- सं० ना० अस्तिकता- उ० भावनाह्मणिजे अभाव नसावा॥ वाढूं नये गोवा अनित्याचा॥
भावज्ञ- सं० अप० ना० भूतकर्ता
भावसंदा- प्रा० ना० आश्रय- ज्ञा० कृ० ओ० ८४
भावसा- प्रा० ना० वडीलहीर.
भावीप्रतिबंध- सं० ना० पुढें सा ताशता जन्मानीं ब्रम्हसाक्षात्कार साधूं- आजन्मकायथाई आहे- अ सामनांत विक्षेप येऊन होतो प्रति बंधतो.
भावो- सं० अप० ना० भाव ह्मण जे अस्तित्व अथवा आत्मा- ज्ञा० अ० १० ओ० १४९.
भाव्या- प्रा० ना० पाहा भावसा शब्द भा० अ० ७ ओ० ५६०
भाष्यकार- सं० ना० श्रीमच्छंक राचार्य- ज्ञा० अ० १८ ओ० १७२३.
भास्वत- सं० ना० १ सूर्य-२ अग्नि
भाळ- सं० अप० ना० भाल अथ वा कपाल-
भाळणें- प्रा० धा० ना० भुलणें- भा० अ० ११ ओ० १५२४.
भाळनेत्र- सं० अप० ना० भाल

नेत्र- शिव.

## भि-भी.

भिंग- प्रा॰ ना॰ अभ्रक- अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ५१.

भिंगुरटी- सं॰ अप॰ ना॰ भ्रमरी- भा॰ अ॰ १ ओ॰ २३१.

भिंगुळवाणें- सं॰ अप॰ वि॰ भयानक- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३५६.

भिंगोरी- सं॰ अप॰ ना॰ १ भ्रमरीचीआळी- दा॰ द॰ १ स॰ १० ओ॰ ३८ २ भिंगरी-

भित- प्रा॰ ना॰ काष्ट- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २५५-२५६.

भिदुर- सं॰ ना॰ वज्र.

भिरूड- प्रा॰ ना॰ कीड- विवे॰ पू॰ प्र॰ ७ ओ॰ ११५- भा॰ अ॰ १० ओ॰ ७०८

भीक- सं॰ अप॰ ना॰ भिक्षा.

भीडस्मारु- प्रा॰ वि॰ भिडस्त.

भीमकी- सं॰ ना॰ रुक्मिणी.

## भु-भू.

भुकार- प्रा॰ ना॰ फिरतें कुंभारचाक- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ५२७.

भुजग- सं॰ ना॰ सर्प.

भुजंग- सं॰ ना॰ सर्प.

भुजंगम- सं॰ ना॰ सर्प.

भुंजणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ भोगणें

भुंजाड- सं॰ अप॰ वि॰ भर्जित म्हणजे भाजलेलें- विवे॰ उ॰ प्र॰ ७- ओ॰ १७.

भुंजिजणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ भोगणें- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १२७०.

भुगटकी- प्रा॰ ना॰ १ खटपट- उ॰ ॥ अवघी भ्रांतीचीभुगटकी ॥ — २ घडमोड- आ॰ पं॰ ३ स॰ ५ ओ॰.

भुता- प्रा॰ ना॰ देवीचा आराधी- उ॰ आईभुता करीन तुझा ॥ नाव ठेवीन केरपुंजा ॥ इ॰ ॥

भुतोंडी- सं॰ अप॰ ना॰ भूतवल्ली ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १८९.

भुभुसणें- प्रा॰ धा॰ ना॰ उदयास येणें- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १२३५.

भुयाळ- प्रा॰ ना॰ वाटाड्या- भा॰ अ॰ ३ ओ॰ ८०७.

भुयेर- प्रा॰ ना॰ तळघर.

भुररें- प्रा॰ ना॰ १ कंवयाळ अथवा चेटूक चेडें- २ भुरळ- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ३१.

भुरी- प्रा॰ ना॰ उरी- भा॰ अ॰ १४ ओ॰ ४८३.

भुवन- सं॰ ना॰ १ आश्रय- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ५- २ उदक अथवा पाणी- ३ मंदीर- ४ ब्रम्हांड.

भुवनदीप- सं॰ ना॰ ब्रम्हांडदीप म्हणजे सूर्य.

भू- सं० ना० पृथ्वी-
भूगर्भवास- सं० ना० गुहानिवास.
भूचरीमुद्रा- सं० ना० नासिकाग्रा वरून भूमी पाहाणें- अशी एक धारणा प्रकरणी मुद्रा आहे तिचें नाव.
भूजा- सं० ना० सीता.
भूजासंलापहरण- सं० ना० मारुती-
भूलणें- सं० अप० धा० ना० भुलणें- ज्ञा० अ० १५ ओ० ५७.
भूतपति- सं० ना० शिव.
भूतप्रतिबंध- सं० ना० पूर्वी विषय भोगलेले विरक्त होऊन सकल त्याग झाल्यावर मनांत उभे राहून परमार्थास विक्षेप होतो त्याचें नाव.
भूतलें- सं० अप० वि० मागलें- ज्ञा० अ० ११ ओ० ५७६.
भूताहिली- सं० ना० देवपितर आत्म ऋण न देणारा- ज्ञा० अ० १२ ओ० ६०.
भूतें- सं० ना० पंचीकृत पृथिव्यादिक भूतें तीं.
भूतोंडी- सं० अप० ना० भूतबली- ज्ञा० अ० ९ ओ० १८४.
भूदेव- सं० ना० ब्राम्हण.
भूधर- सं० ना० १ पर्वत- २ शेष.
भूभुज- सं० ना० राजा.
भूभृदरी- सं० ना० इंद्र.
भूम- सं० वि० महान्.
भूमिजा- सं० ना० सीता.

भूरी- सं० वि० पुष्कळ.
भूरुह- सं० ना० वृक्ष-
भूषावें- सं० अप० ना० भूषण- ज्ञा० अ० ९ ओ० ३६२.
भूसुर- सं० ना० ब्राम्हण.
भृंग- सं० ना० भ्रमर.
भृगुनंदन- सं० ना० शुक्राचार्य.
भृत्य- सं० ना० सेवक.

## भे- भो- भौ

भें- सं० अप० ना० भय.
भेउर- सं० अप० ना० भय- ज्ञा० अ० १३ ओ० १०५२.
भेक- सं० ना० बेडूक.
भेंड- प्रा० ना० बेंड- विवे० पू० प्र० ७ ओ० ५६.
भेडुका- सं० अप० वि० भयभीत ज्ञा० अ० ११ ओ० ३८६.
भेण- सं० अप० ना० भय- अमृ० प्र० ७ ओ० ३९.
भेदरा- सं० अप० ना० भय- भा० अ० २२ ओ० २८८.
भेली- प्रा० ना० ढेप.
भेषज- सं० ना० औषध.
भोंग- प्रा० ना० सपक्ष कीट- दा० द० १ स० १० ओ० ५५.
भोगचतुष्टय- सं० ना० स्थूल भोग- प्रविविक्त भोग- आनंद भोग

वनिरानंदभोग- यांच्यासमुच्चयाचें नाव.
**भोंगळ**- प्रा०ना० एक कर्ण्यासारखें सुखवाद्य आहे तें.
**भोगा**- प्रा०ना० नाक-ज्ञा०अ०१२ ओ०५५७.
**भोगावती**- सं०ना० पाताळगंगा.
**भोगावेया**- प्रा०ना० संवादसुख ज्ञा०अ०६ओ०११४.
**भोगी**- सं०ना०सर्प.
**भोगीभूषण**- सं०ना० शिव.
**भोगेंद्र**- सं०अप०ना० भोगींद्रम्हणजे शेष.
**भोज**- प्रा०ना०१ आवड-ज्ञा०अ० ९ओ०२०६-विवे०पू०प्र०३ओ०३८ अमृ०प्र०५ओ०६६-२ संतोष-ज्ञा० अ०९ ओ०५११-३ राज्य-ज्ञा०अ० १० ओ०१२०. ज्ञा०अ०१४ओ०२०१. ४ मोल-मोठेपण-भा०अ०१ओ०२६
**भोज्य**- सं०ना० चाऊनखाण्याचेपदार्थतें.
**भोत**- प्रा०ना० आनखशिख अंगाचें कातडें काढल्यावर जीआकृती तो- -दा०द०३स०७ओ०७४.
**भोय**- सं०अप०ना० भूमी.
**भोंवर**- सं०अप०ना० पाहा भवरा दा०द०२स०७ओ०७.
**भोंवरा**- प्रा०ना० पाणभोंवरा.
**भोंवरी**- प्रा०ना०१ गिरकी-२ भुगडी

**भौतिक**- सं०ना० शरीरविषयादिक.
**भ्याड**- सं०अप०वि० भित्रा.
**भ्यासुर**- सं०अप०वि० भयंकर.
**भ्रम**- सं०ना०१ भ्रांति-२ फेरा- ३ भरलीभूत.
**भ्रमरगुंफा**- सं०ना० गोल्हाटावरील योगशास्त्रोक्तस्थान.
**भ्रमहत**- सं०वि० भ्रांत.
**भ्रामक**- सं०वि०१ भ्रमकारक २ ना० लोहचुंबक-ज्ञा०अ०९ओ० ११६-ज्ञा०अ०१८ ओ०१३११.
**भ्रूलता**- सं०ना० भ्रुकुटी-म्हणजे भिंवई अथवा भोंवई.

## म

**मकरंद**- सं०ना०१ पुष्परस-२ सुवास.
**मकरध्वज**- सं०ना०१ काम-२ असंभोगजन्मा असा मारुतीपुत्र तो.
**मकरालय**- सं०ना० समुद्र.
**मकार**- सं०ना० प्रणवाचीतिसरीमात्रा.
**मकारांत**- सं०ना० तूर्यावस्था- ज्ञा०अ०१२ओ०५६.
**मख**- सं०ना० यज्ञ.
**मगज**- प्रा०ना०१ सार-२ बीज

अथवा महत्व- दा० द० ११ स० १० ओ०
मर्गज- सं० ना० मोलवान पाषाण
मंगल- सं० वि० १ शुभ- २ ना० स्मृति- स्तुति- आणि नमन असे त्रिविधरूपानें ग्रंथारंभीं भाषणतें.
मंगळ- सं० अप० ना० १ भूमिपुत्र जो तिसरा ग्रह तो- २ वि० कल्याण.
मंगळजननी- सं० अप० ना० पृथ्वी.
मंगळनिधि- सं० अप० ना० कल्याणाची खाण.
मंगळभगिनी- सं० अप० ना० सीता.
मघमघीत- प्रा० वि० खमंग- भा० अ० २० ओ० २४२.
मघवा- सं० ना० इंद्र.
मछघ्न- सं० ना० कोळी- भोई.
मजालस- हिंदु० ना० सभा.
मंजुषा- सं० ना० पेटी.
मंडण- सं० अप० वि० मंडन अथवा भूषण.
मंडन- सं० ना० १ स्थापन- २ वि० भूषण-
मंडूक- सं० ना० बेडूक.
मूट- प्रा० ना० १ कळी- ज्ञा० अ० १८ ओ० ४६२- २ अंकुर- ज्ञा० अ० १८- ओ० ४६३.
मठगा- सं० अप० ना० मठ अथवा घर- दा० द० ५ स० ९ ओ० ३९.
मठु- प्रा० ना० अंकुर- ज्ञा० अ० ११ ओ० ३०४.
मणिक- सं० ना० मडकें.
मणिबंध- सं० ना० मणगट.
मणिमय- सं० वि० रत्नखचित
मतंग- सं० ना० हत्ती.
मंत्र- सं० ना० १ विचार- २ कर्मकांड- आ० पं० २ स० १ ओ० २३.
मंतु- सं० ना० अपराध.
मत्सर- सं० ना० द्वेष.
मथन- सं० ना० घुसळण.
मंथा- सं० ना० अग्नि मथून काढयाची अरणी.
मद- सं० ना० मीच कायतो शाहाणा असा अभिमान अथवा उन्मत्तपणा तो.
मदगज- सं० ना० उन्मत्त हत्ती.
मदत्रय- सं० ना० १ विद्यामद- २ धनमद- ३ कुलमद- यांच्या समुच्चयाचें नाव.
मदन- सं० ना० काम.
मदनतात- सं० ना० कृष्ण.
मदनांतक- सं० ना० शिव.
मदमुख- सं० ना० उन्मत्त हत्ती ज्ञा० अ० ११ ओ० ३१४.
मंदरूप- सं० वि० सूक्ष्मरूप- अमृ० प्र० १ ओ० ३५.
मंदसत्व- सं० अप० ना० मदसत्व- दा० द० १ स० २ ओ० १२
मंदाकिनी- सं० ना० स्वर्गगंगा.

मंदार- सं॰ अप॰ ना॰ १ रुईवृक्षा चा नर-२ कल्पवृक्ष.

मदिरा- सं॰ ना॰ मद्य अथवा दारू.

मर्दन्या- सं॰ ना॰ अंगरगडणारा.

मंद्र- सं॰ ना॰ नाभिस्थानींचा गंभीरनाद तो.

मधु- सं॰ ना॰ १ मध-२ चैत्र मास.

मधुकर- सं॰ ना॰ भ्रमर.

मधुकैटभारी- सं॰ ना॰ विष्णु.

मध्यमा- सं॰ ना॰ १ कंठ स्थानस्थित मननात्मक चतुर्विध वाचेंतील तिसरी वाचा-२ सुषुम्ना नाडी- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १०३८.

मन- सं॰ ना॰ १ अंतःकरण पंचकांतील संशय वृत्यात्मक दुसरा अवयव-२ माया- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १०१

मनन- सं॰ ना॰ ज्ञान मार्गातील अधिकाऱ्याचें चत्वार साधनांतील दुसरें साधन.

मनस्वी- सं॰ ना॰ मन ज्याच्या स्वाधीन आहे तो पुरुष.

मनाक- प्रा॰ अव्य॰ क्षणभर-उ॰ विसरन्वि नपडावा मनाक॥

मनाकळित- सं॰ अप॰ वि॰ मनानें आकळलेलें.

मनिहो- सं॰ अप॰ ना॰ मनोविषय- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ९८.

मनु- सं॰ ना॰ १ मंत्र-२ वि॰ चौदा संख्या-३ एका ब्रम्हदिवसांत पृथ्वीवर भोगले सार्वभौम राजे चौदा होतात त्यांचें साधारण नाव- चौदा मनुंचीं नावें-१ स्वायंभुव-२ स्वारोचिष-३ उत्तम-४ तामस-५ रैवत-६ चाक्षुष-७ श्राध्धदेव म्हणजे सांप्रतचा वैवस्वत मनु-८ सावर्णी-९ दक्षसावर्णी-१० ब्रम्हसावर्णी-११ धर्मसावर्णी-१२ रुद्रसावर्णी-१३ देवसावर्णी-१४ इंद्रसावर्णी-

मनुज- सं॰ ना॰ मनुपासून झालेले ते म्हणजे मानव.

मनुष्यगंधर्व- सं॰ ना॰ प्रस्तुतच्या कल्पीं तपकरून गंधर्वत्व पावलेले असे देव गंधर्वांच्या खालच्या पदवीचे पुरुष ते.

मनुष्यभक्ष- सं॰ ना॰ राक्षस.

मनोज- सं॰ ना॰ मदन.

मनोधर्म- सं॰ ना॰ शोक आणि मोह.

मनोभव- सं॰ ना॰ मदन.

मनोरथ- सं॰ ना॰ मन संकल्प अथवा हेतु.

मनोहर- सं॰ वि॰ मन हरण करणारें.

मनोरें- सं॰ अप॰ ना॰ मनेछा- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ३.

मन्मथ- सं॰ ना॰ मदन

मन्यु- सं॰ ना॰ क्रोध.

मसत्व- सं॰ ना॰ ममता अथवा मोहपणा.

मयंक- सं॰ ना॰ चंद्र.

मयजा- सं॰ ना॰ मंदोदरी रावणस्त्री

मयासुर- सं॰ ना॰ दैत्यांचा सुतार- मंदोदरीपिता.

मयोर- सं॰ अप॰ ना॰ मयूर.

मराळ- सं॰ अप॰ ना॰ मराल म्हणजे हंसपक्षी.

मरिगळा- प्रा॰ ना॰ मूर्ति अथवा आकार- भा॰ अ॰ ५ ओ॰ ३४१.

मरुत्- सं॰ ना॰ वायु.

मरुधन्व- सं॰ ना॰ निर्जल देश.

मरुभूमि- सं॰ ना॰ मरुधन्व अथवा निर्जल देश.

मरुत्सख- सं॰ ना॰ अग्नि.

मऱ्हाटें- सं॰ अप॰ वि॰ १ प्राकृत २ स्पष्ट- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ५२.

मळपणें- प्रा॰ धा॰ ना॰ हलणें- दा॰ द॰ १ स॰ २ ओ॰ १६.

मवणी- प्रा॰ ना॰ गणना- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ३२१- ३२२.

मवणें- प्रा॰ धा॰ ना॰ मोजणें- अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ २६.

मसक- सं॰ अप॰ ना॰ मशक म्हणजे चिलीट- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ७५.

मसी- प्रा॰ ना॰ शाई- अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ३६- दा॰ द॰ ११ स॰ १ ओ॰ २.

मसेरें- प्रा॰ ना॰ अंधारें- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ८३.

मस्करी- सं॰ ना॰ सन्यासी.

महत्तत्व- सं॰ ना॰ जिच्या गर्भांत तीन गुण समान अवस्थेनें असतात- ती शुध्दसत्व- अथवा गुणसाम्य नामक माया.

महद्ब्रम्ह- सं॰ ना॰ माया.

महाकारणदेह- सं॰ ना॰ देह चतुष्टयांतील पिंडींचा चौथा देह.

महाजवन- सं॰ वि॰ मोगवेगवान्.

महातेज- सं॰ ना॰ १ ब्रम्ह- २ सूर्य.

महानस- सं॰ ना॰ स्वयंपाकघर.

महानुभाव- सं॰ ना॰ ब्रम्हानुभवी पुरुष.

महापद- सं॰ ना॰ ब्रम्ह.

महाप्रस्थान- सं॰ ना॰ प्रारब्धांतीं देह त्यागून विदेह कैवल्यास जाणें तें-

महाप्रलय- सं॰ ना॰ शरीरीं जसें मरण- तसा ब्रम्हांडामध्यें महाकल्प तो. त्याची संख्या च्यार युगें सहस्त्र वेळा गेल्यानें जो ब्रम्हदेवाचा एक दिवस म्हणजे नित्य कल्प- अथवा नित्य प्रलय होतो असे छत्तीस हजार कल्पांतीं जो सकल ब्रम्हांडाचा नाश होतो त्याचें नाव.

महाभूतें- सं॰ ना॰ अपंचीकृत सूक्ष्म पंच महातत्वें तीं.

महायंत्र- सं॰ ना॰ तोफ.
महावाक्य- सं॰ ना॰ १ गायत्री- २ तत्वमस्यादि चहूं वेदांचीं वाक्यें तीं.
महाशून्य- सं॰ ना॰ शून्यास अधिष्ठान तें ब्रम्ह- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ २६६
महासुख- सं॰ ना॰ ब्रम्हसुख अथवा ब्रम्हसाक्षात्कार- ज्ञा॰ अ॰ ८- ओ॰ २६४.
महास्मशान- सं॰ ना॰ श्रीकाशी क्षेत्र.
महिख- सं॰ अप॰ ना॰ म्हैस अथवा रेडा- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ४५५.
महिखळ- प्रा॰ ना॰ इंद्रिय- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ५४१.
महिंद्र- सं॰ ना॰ इंद्र.
महिमा- सं॰ ना॰ मोठेपणा.
महिमान- सं॰ ना॰ महिमा- कीर्ति.
महिला- सं॰ ना॰ १ स्त्री- २ नदी.
महिषी- सं॰ ना॰ १ पट्टराणी- २ म्हैस.
मही- सं॰ ना॰ पृथ्वी.
महीध्र- सं॰ ना॰ पर्वत.
महीसुत- सं॰ ना॰ मंगळ- २ अहंकार- ३ रेत- उ॰ ॥ महीसुतसरसावला ॥ सरसावोनी द्विधा केला ॥ उभयतां मिळोनी चालिला ॥ कार्यभाग ॥ १ ॥. कित्येक रामदासी महीसुत याचा अर्थ ऊरवणीचा बरू आहे असें म्हणतात.
महूर- सं॰ अप॰ वि॰ मधुर- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ११५- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ १२१.
महेश- सं॰ ना॰ महादेव.

## मा.

मा- सं॰ ना॰ १ लक्ष्मी- २ क्रि॰ नको. अथवा नाहीं.
माकोडा- प्रा॰ ना॰ मुंगळा.
मागध- सं॰ ना॰ १ एक देश आहे २ जरासंध
मागावें- सं॰ अप॰ ना॰ मार्ग- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ४१.
मागिलीकडे- प्रा॰ वि॰ अंतर्मुख म्हणजे मस्तकाच्या मागील बाजूकडे जी वृत्ति ती- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ७३.
मार्गण- सं॰ ना॰ बाण.
माधु- सं॰ अप॰ ना॰ मार्ग- माग.
माघावा- सं॰ अप॰ ना॰ माग- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १७२३.
माच- प्रा॰ ना॰ ठिकाण अथवा आश्रय- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ १२०.
माचीगाण- प्रा॰ ना॰ दंडीगाणा सारिखी एक जाती आहे.
माज- प्रा॰ ना॰ मस्ती- २ अधिक्य- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १२०- ३ कंबर उ॰ दुखे माज आणि मान ॥
माजघर- सं॰ अप॰ ना॰ मध्यगृह- अथवा मधलें घर.
माजवण- प्रा॰ ना॰ १ उन्मत्तपण

अधिकपण- २ उन्मत्तद्रव्य- मद्या
दिक- ज्ञा० अ० ११ ओ० ४२.

**माजिटा**- प्रा० ना० उत्कर्ष- ज्ञा०
अ० ६ ओ० १०९.

**माजिरा**- प्रा० वि० उन्मत्त- ज्ञा०
अ० १६ ओ० ३६१.

**माजिवटा**- प्रा० ना० १ उन्माद- २
मरण- ज्ञा० अ० ८ ओ० २०८.

**माजु**- प्रा० ना० माज म्हणजे मस्ती.
२ कंबर- भा० अ० १४ ओ० ४१२.

**मार्जार**- सं० ना० मांजर.

**माझेपण**- प्रा० ना० भजनास संज्ञा
ज्ञा० अ० ९ ओ० ४५६.

**माझेमन**- प्रा० ना० मायेस संज्ञा.
ज्ञा० अ० १० ओ० ९४.

**माटुळणें**- प्रा० धा० ना० खुंटणें-
ज्ञा० अ० १८ ओ० १०८२.

**मांड**- प्रा० ना० पसारा.

**मांडलीक**- सं० ना० चार देशांचें ए
क मंडळ त्या मंडळाचा अधिकारी तो.

**मांडुक्य**- सं० ना० अथर्वण वेदांती
ल एका शाखेचें उपनिषत् त्याचें नाव.

**मांडोवा**- प्रा० ना० विस्तार.

**माणा**- प्रा० ना० उंसाच्या रसजींत ग
ळतो ती नांद- भा० अ० ३ ओ० २८१.

**माणीक**- प्रा० ना० १ तांबडा मोल
वान् खडा तो- २ लेंकरूं- ज्ञा० अ० १३
ओ० ७८९.

**माणें**- प्रा० धा० ना० समावणें-

**मात**- प्रा० ना० १ घडलेली गोष्ट-
दा० द० ४ स० २ ओ० १०- २ बुद्बुद्धी
च्या खेळांत जी प्यादे मारती- उ०
॥ हंस दास म्हणें बुदबळांचे खेळीं ॥
॥ नाहीं जरीं जाहाली प्यादे मात ॥ तरी
ती अखेर नाहीं साधिली ॥ वरबु
डी झाली आपणा तूं सा ॥ १ ॥

**मातंग**- सं० अप० ना० मतंग म्हण
जे हत्ती.

**मातुंग**- सं० ना० मांग.

**मार्तंड**- सं० ना० १ सूर्य- २ मल्हारि.

**मात्रा**- सं० ना० विषय- २ फराळा
चें साहित्य- अथवा भोजन सामग्री.
३ औषध- उ० ॥ जेणें विठ्ठल मात्रा
घ्यावी ॥ तेणें पथ्य सांभाळावी ॥

**मात्रात्रय**- सं० ना० अकार- उ
कार- मकार- अशा प्रणवाच्या तीन
मात्रा त्यांचें नाव.

**मादळी**- प्रा० ना० वस्त्र- अमृ०
प्र० ७ ओ० १२६.

**मांदार**- सं० ना० रुई वृक्षाचा पुरु
ष.

**मांदाळ**- प्रा० ना० मृदंग.

**मांदियाळी**- प्रा० ना० समुदाय.
भा० अ० ५ ओ० १५४.

**मांदियाळें**- प्रा० ना० समुदाय.

**मांदी**- प्रा० ना० समुह- अमृ०
प्र० २ ओ० २७- वा० ओ० २२६८.

**मादुरी**- प्रा० ना० चाबुकस्वार-

ज्ञा० अ० १६ ओ० २२४.

**मांदूस** - प्रा० ना० पेटी - ज्ञा० अ० १५ ओ० ८३.

**मांदोडा** - सं० अप० ना० १ मांडव - ज्ञा० अ० ८ ओ० ८ - २ जुंबाड - ज्ञा० अ० १५ ओ० ६१.

**मार्दव** - सं० ना० मृदुल - नम्रता.

**माधव** - सं० ना० १ विष्णु - २ वैशाख मास.

**माधवी** - सं० ना० वसंतकाळ.

**माधुरी** - सं० अप० ना० वाचेस संज्ञा - ज्ञा० अ० १४ ओ० ३१.

**माध्यमिक** - सं० ना० आत्मा अणु नाहीं महान् नाहीं - मध्यम परिमाणाचा आहे असें ज्यांत मानितात तें मत अथवा तद्वत् यायी पुरुष तो -

**मानव** - सं० ना० मनुज अथवा मनुष्य - ज्यांस वैखरी द्वारा भाषणकर्ता येतें ते - यांची संख्या सप्तद्विपांस्थीं त जे चार लक्ष देश आहेत त्यांवरून तितकीच मानली आहे॥ उ०॥ तीस लक्ष योनीं पशुचिया घरीं॥ मानवा भितरी च्यार लक्ष॥ अ०॥१॥ उ०॥ लक्ष च्यारी मानवी॥ योनी सप्तद्विपा भुवी॥१॥

**मानस** - सं० ना० १ मन - २ वि० मानसिक अथवा मान सोडून.

**मानें** - प्रा० शब्द० अव्य० बरोबर - ज्ञा० अ० ९ ओ० २६३.

**माप** - सं० ना० लक्ष्मीपति.

**माप** - प्रा० ना० गणना - प० प्र० २ ओ० ६.

**मापारी** - प्रा० ना० मापाड्या - भा० अ० ३ ओ० ८७२.

**मायदळ** - प्रा० ना० मांदाळ शब्द पाहा.

**मायराणी** - सं० ना० एक देवता आहे ती.

**माया** - सं० ना० १ कपट - २ जी नाहींती म्हणजे अभाव.

**माया** - प्रा० ना० १ द्रव्य - पैसा - ज्ञा० द० स० ४ ओ० २९ - २ प्रेम - उ० भाग्यवंत म्हणोंतया॥ अवघी देवा घरी माया॥१॥.

**मायाकरस** - सं० ना० शृंगारादि नवरस.

**मार** - सं० ना० मदन.

**मार** - प्रा० ना० घोडेराऊत - ज्ञा० अ० ११ ओ० ३९५.

**मारग** - सं० अप० ना० मार्ग - उ०॥ झाडूं संतांचे मारग॥ आडरानीं भरलें जग.

**मारणु** - सं० अप० ना० १ लक्ष्मीपति विष्णु - २ कृष्ण - ३ राम.

**मारुत** - सं० ना० वायु.

**मालथणें** - प्रा० धा० ना० माल्हतणें शब्द पाहा.

**मालोवाली** - प्रा० अव्य० चहूंकडोन - ज्ञा० अ० १५ ओ० ११८.

माल्हाल-प्रा० ना० अंगिकार-ज्ञा० अ०१४ ओ० १८०.
माल्हालणें-प्रा० धा० ना० निस्ते जहोणें-ज्ञा० अ० १४ ओ० २५३.
माव-प्रा० ना० माया अ० कपट-उ० लैंसीच मावराक्षसांची॥ देवांसहीधा टेसाची॥ इ०॥
माही-प्रा० ना० छत्री-दा० द० ४ स० २ ओ० १०.
माहुरी-प्रा० ना० मादुरीशहपाहा.
माहेवणी-प्रा० ना० १ रजस्वलास्त्री २ वि० रजस्वला-ज्ञा० अ० १८ ओ० ९६६
माळया-प्रा० ना० राव- काकवी-ज्ञा० अ० १० ओ० ३३.
माळिया-प्रा० ना० झाडाच्या आड व्या फांस्या-ज्ञा० अ० १५ ओ० १५१.
माळी-प्रा० ना० खाण-ज्ञा० अ० १८ ओ० ३५.
माळीण-प्रा० ना० नाकांतहोतोफो डतो.

## मि-मी.

मिठांशु-सं० अप० ना० मिष्टांश-अमृ० प्र० ५ ओ० ७.
मिठी-प्रा० ना० ऐक्य.
मिडकणें-प्रा० धा० ना० धाधावणें-आशाळवणें-दा० द० ३ स० ५ ओ० ७
मिडागणी-प्रा० ना० स्तुती-ज्ञा० अ० १३ ओ० ३१९.
मिणधा-प्रा० वि० ओशाळा.
मित-सं० वि० परिमित.
मितलें-सं० अप० क्रि० परिमित.
मिती-सं० ना० गणना.
मित्र-सं० ना० १ सूर्य-२ सखा.
मित्रतनया-सं० ना० १ यमुना-२ सावित्री.
मित्रपत्र-सं० ना० सूर्यपान-शह पाहा.
मिथिलेश-सं० ना० जनकराजा.
मिथ्यात्मा-सं० ना० देह.
मिनधा-प्रा० वि० मिणधा अथवा ओशाळा.
मिलिंद-सं० ना० भ्रमर.
मिश्री-प्रा० ना० साकर.
मीन-सं० ना० मासा.
मीनकेतन-सं० ना० मदन.
मीनणें-प्रा० धा० ना० एकत्रहो णें अथवा मिळणें-वा० ओ० १२६४

## मु-मू.

मुकणें-प्रा० धा० ना० अंतरणें-भा० अ० १ ओ० ८७.
मुकळित-प्रा० वि० १ स्पष्ट-२ संक्षिप्त-ज्ञा० अ० १३ ओ० २३०
मुकुटाभरण-सं० ना० राज्याभिषेक.

मुकुळ- सं०अप०ना० कमळ-पुष्प ज्ञा०अ०१५ओ०६ अमृ०अ०१ओ०५९

मुकुळणें-प्रा०धा०ना०हेवणें-ज्ञा० अ०५ओ०१४२.

मुक्त- सं०वि० ज्ञानी- अज्ञानापासून सुटलेला.

मुक्तक्रिया-सं०ना०ज्याक्रियेसवेदाधारनाहीं.ती.

मुक्तमार्ग-सं०ना० ज्यामार्गास वेदाधारनाहींतो.

मुक्तस्रग्- सं०ना०१मोत्यांचेघोंस-२वि० मोत्यांनींयुक्त.

मुक्ता- सं०ना० मोतीं.

मुक्ताफळ-सं०ना० मोतीं.

मुक्तिक-सं०ना० यजुर्वेदांतीलएकाउपनिषदाचेंनाव-

मुखळ-सं०अप०ना० मुशलअथवामुसळ-भा०अ०१ओ०३६७.

मुखरण-सं०अप०ना० प्रमुख-उ० ॥ चंद्रावळीयानामें॥ मुखरणगोपीबाहीणराहीची॥

मुख्यअहंकार -सं०ना० ज्ञानापूर्वींचा अहंकार तो-

मुख्यउपासना - निर्गुणोपासनाजींत त्रिपुटीनाहींती-

मुख्यचैतन्य- सं०ना०सत्यचैतन्यांतील अविनाशी चैतन्य तें म्हणजे परब्रम्ह-

मुख्यदेव-सं०ना०परब्रम्ह-

मुख्यब्रम्ह- सं०ना० चौदाब्रम्हांतील अनिर्वाच्यब्रम्हतें.

मुख्यभक्त-सं०ना० आर्त-जिज्ञासु-अर्थार्थीहे असाज्ञानीभक्ततो.

मुख्यभक्ति-सं०ना०जीमध्यें-ध्येय-ध्याता-ध्यान अशीत्रिपुटीनाहींतीनिर्गुणभक्ति-अथवा अद्वैतभक्ति.

मुख्यपरमात्मा-सं०ना०परब्रम्ह.

मुख्यात्मा-सं०ना० प्रत्यगात्माब्रम्ह-कूटस्थ.

मुग-सं०अप०ना० मौन-ज्ञा०अ० १४ओ०११.

मुगुतें-सं०अप०ना० मुक्ति-ज्ञा० अ०७ओ०४९.

मुग्ध-सं०वि०१अस्पष्ट-२अज्ञान-ज्ञा०अ०१८ओ०५४४.

मुंड-सं०ना०मस्तक-२अथर्वणवेदांतील एकाउपनिषदाचेंनाव-

मुंडक-सं०ना० मुंडनामकउपनिषत्-

मुंडघर्षणी-सं०अप०ना० मुंडघर्षण-म्हणजे मस्तकावर मस्तकें आदळत इलकीं मनुष्यादिकांचीदाटीती-

मुंडा-प्रा०ना० धान्यठेवण्यासपेंढ्याचाकरितातगोलतो-ज्ञा०अ०

६ ओ०४८९- अमृ०प्र०५ ओ०५१.
मुंडासें-प्रा०ना०पागोटें
मुद्-सं०ना०हर्ष अथवा आनंद.
मुद्गलसिंचन-सं०अप०ना०रेता
च्या व्ययास संज्ञा-भा०अ०३ ओ०२५५
मुद्गलूट-प्रा०ना०पुण्यक्षय-ज्ञा०
अ०१७ ओ०३४६.
मुद्रा-सं०ना०१ खेचऱ्यादिक च्या
रसुद्रा त्या एकेक-२ आकार अथवा
आकृती.
मुद्रा-प्रा०ना०गांठोडी-ज्ञा०अ०११
ओ०१२१.
मुद्रालावणें-सं०अ०धा०ना०सिध्धां
तकरणें-ज्ञा०अ०१० ओ०३२.
मुध्धारा-सं०ना०प्रेम रस धारा
मुनि-सं०ना०१ मननशीलपुरुष-
२ वि० सात संख्या.
मुमुर्षु-सं०ना० मरणोन्मुखपुरुष.
मुमुक्षु-सं०ना०चवार जीवकोटीं
तील मध्यम पुरुष म्हणजे मोक्षेच्छु.
मुमुक्षुत्व-सं०ना० मोक्ष प्राप्तीची
इछा.
मुरणें-प्रा०धा०ना०जिरणें- पक्व
होणें-उ०॥ वेदु बोले कांहीं करितां॥ मी
मी हें मुरवीं॥ रे नर देइ बुध्धि मुरवीं॥
निजशी जे जो मुराला॥ इ०॥
मुरांतक-सं०ना० विष्णु-उ०॥ म्हणे
क्षण मुरांतक क्षण पुरांतक ब्राम्हणा.
मुरारि-सं०ना० विष्णु-उ० सद्गुरुको
पतां मुरारी पुरारि॥ संरक्षितीना॥
मुहूर्तकरणें-प्रा०धा०ना०चेत
विणें-ज्ञा०अ०१४ ओ०१४४.
मुळिक-सं०अप०वि०पहिलें-
ज्ञा०अ०१४ ओ०५५-अमृ०प्र०१
ओ०१.
मूर्छना-सं०ना० मूर्छा-१ गाय
नांत एकविस स्वर तीन ग्रामाच्या
धोरणानें होतात त्यांचें नाव.
मूढवृत्ति-सं०ना० तमोगुणाची
वृत्ती.
मूर्ति-सं०ना० आकृति-आकार.
मूनकोंड-सं०ना० मूलखडा.
मूर्धज-सं०ना० केंस.
मूलाज्ञान-सं०ना० त्रिपुटी.
मूषक-सं०ना० उंदीर.
मूळअहंता-सं०अप०ना० मू
ळस्फुरण- ब्रम्हत्व-ज्ञा०अ०१४
ओ०३०३.
मूळप्रकृति-सं०अप०ना०मू
लप्रकृती अथवा मूळमाया ब्रम्हां
डीचा महाकारण देह.
मूळबंध-सं०अप०ना० गुदस्था
नस्थित आधारचक्र.
मूळभूत-सं०अप०ना० आदिका
रण.
मूळकारी-सं०अप०ना०मूळपा
ठविलाला पुरुष.
मृगमद-सं०ना० कस्तुरी.

मृगराज-सं॰ना॰ सिंह.
मृगांक-सं॰ना॰ चंद्र.
मृड-सं॰ना॰ शिव.
मृडानी-सं॰ना॰ पार्वती.
मृणालतंतु-सं॰ना॰ कमलतंतु.
मृत्-सं॰अप॰ना॰ मृत्तिका अ॰ माती-अमृ॰प्र॰३ओ॰५.
मृत्युलोक-सं॰ना॰ मानवलोक अथवा भूलोक.
मृदोली-सं॰अप॰ना॰ गिर्दी-रु क्मि॰अ॰१५ओ॰५०
मृषा-सं॰वि॰ मिथ्या.

## मे-मै.

मेखळा-सं॰अप॰ना॰ कटिसूत्र.
मेखळें-प्रा॰ना॰ मेखळा नामक वस्त्र-ज्ञा॰अ॰१५ओ॰२५१.
मेघडंब्री-सं॰अप॰ना॰१ उंचछत्री-२ घुमट-दा॰द॰४स॰५ओ॰२७
मेघनाद-सं॰ना॰ इंद्रजीत.
मेचणें-प्रा॰धा॰ना॰ आटोपणें-ज्ञा॰अ॰१४ओ॰२५७.
मेचु-प्रा॰ना॰ प्रीति अथवा आवड ज्ञा॰अ॰१५ओ॰१२५-अमृ॰प्र॰ओ॰२९
मेदिनी-सं॰ना॰ पृथ्वी.
मेदिनीवसन-सं॰ना॰ समुद्र.
मेधा-सं॰ना॰ आवड.
मेध्य-सं॰वि॰ पवित्र.

मेर-प्रा॰ना॰१ समय-ज्ञा॰अ॰८ ओ॰७४-२ कड अथवा बाजू-ज्ञा॰ अ॰२ओ॰२००.
मेरू-सं॰ना॰ ज्याच्या भोंवतीं सप्त द्विपें व सप्त समुद्र वलयाकार स्थिती नें असून जो त्यांच्या मध्यभागीं केंद्रवत् असणारा पर्वत तो.
मेरूदंड-सं॰ना॰ पाठीचा कणा.
मेल्हारे-सं॰अप॰ना॰ संयोग-अमृ॰प्र॰२ओ॰५२.
मेसको-प्रा॰ना॰ एक जलदेवता आहे.
मेहुडा-सं॰अप॰ना॰ मेघ-ज्ञा॰अ॰ १९ओ॰१७५.
मेहूण-प्रा॰ना॰ दंपत्य.
मेळावा-प्रा॰ना॰ समारंभ-ज्ञा॰ अ॰११ओ॰४७५.
मेळिकार-सं॰अप॰ना॰ भेट.
मेळु-सं॰अप॰ना॰ मेळ अथवा संयोग.
मैथुन-सं॰ना॰ रेतोत्सर्ग अथवा रति.
मैंद-प्रा॰वि॰ फांसेगार अ॰ घातकी.
मैंदावें-प्रा॰ना॰ मैंदपण.
मैळ-सं॰अप॰ना॰ मल अ॰ मळ.

## मो-मौ.

मोकलणें-प्रा॰धा॰ना॰ सोडणें अथवा उपेक्षणें-उ॰॥ तुझे दारींचा कु

तरा॥ नकोमोकलूं दातारा॥ अभंग॥

**मोकळवाडी** - प्रा॰ ना॰ मोकळीक भा॰ अ॰ २० ओ॰ २१६.

**मोकार** - प्रा॰ वि॰ मोकळा - अनर्गल दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ३०.

**मोकाटु** - प्रा॰ वि॰ मोकाट - ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ६९७.

**मोगर** - प्रा॰ ना॰ पायदळ - ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३९५ - रुक्मि॰ अ॰ ५ ओ॰ २६

**मोघ** - सं॰ वि॰ निर्फळ.

**मोघरीमार** - प्रा॰ ना॰ अपानादि द्वारीं मेख ठोकून मारणें त्याचें नाव.

**मोचा** - प्रा॰ ना॰ पादरक्षा म्हणजे चर्मीजोडा.

**मोट** - प्रा॰ ना॰ १ वाट - ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १२७ - २ गांठोडें - उ॰॥ तनुपाहतां हे जीची॥ मोट जैशी कातड्याची॥१॥

**मोटकें** - प्रा॰ वि॰ १ थोडकें - ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ४९ - २ अंमळसें - ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३४७ - ३ सूक्ष्म - ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १४४ - विवे॰ उ॰ प्र॰ ९ - ओ॰ ६० - ४ नेटकें - नीट - अमृ॰ प्र॰ १ ओ॰ १३.

**मोडी** - प्रा॰ ना॰ आकार - ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २७६.

**मोडोन येणें** - प्रा॰ धा॰ ना॰ द्वारभरून येणें - ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २२ - अमृ॰ प्र॰ २ ओ॰ १७.

**मोतड** - सं॰ अप॰ वि॰ मुक्तलग अथवा मोतलग - भा॰ अ॰ १३ ओ॰ २२१.

**मोर्ती** - सं॰ अप॰ ना॰ मूर्ति - आकार.

**मोद** - सं॰ ना॰ आनंद.

**मोदळा** - प्रा॰ ना॰ १ मुद्गल - अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ४९ - २ वांसरास दूध पाजण्याची चर्मीपिशवी ती.

**मोरकुंत्रा** - सं॰ अप॰ ना॰ मोरचें कुळ.

**मोरवीस** - सं॰ अप॰ ना॰ मयूरपिछ - भा॰ अ॰ ६ ओ॰ ५५.

**मोवाज्वर** - सं॰ अप॰ ना॰ तापाची एक जाती आहे - दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ३४.

**मोवाळ** - सं॰ अप॰ वि॰ मृदु.

**मोहर** - प्रा॰ ना॰ मार्ग - ज्ञा॰ अ॰ ३ ओ॰ २११.

**मोहरणें** - प्रा॰ धा॰ ना॰ १ गासहोणें - अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ ३९ - २ शिरणें - उ॰ रजनिचें एक बरें॥ मोहरितां चिमोहरे॥ स्वरूपीं घालितां भरे॥ निर्विकल्पीं॥ दास॰॥

**मोहरा** - प्रा॰ ना॰ औषधिमणि.

**मोहाळी** - प्रा॰ ना॰ घोड्याची स्वारकी - रुक्मि॰ अ॰ ८ ओ॰ १५.

**मोहिरें** - प्रा॰ ना॰ साहित्य अथवा सामग्री - अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ९.

मोळा- प्रा॰ना॰ ओझें- भा॰अ॰ ५ओ॰११८.
मोक्ष- सं॰ना॰ स्वकीयस्वरूपाचें जेंअज्ञानत्याचाजोनाशतो- स्वरूपावस्थान.
मोक्षश्री- सं॰ना॰ मोक्षलक्ष्मी.
म्रो- सं॰अप॰वि॰ मृदु.
मौर्ख्य- सं॰ना॰ मूर्खत्व.
मौल- सं॰ना॰ मस्तक.
मौळ- प्रा॰ना॰ फळावरीलकांटे- ज्ञा॰अ॰१८ओ॰६५८.
म्लेंछ- सं॰अप॰ना॰ यवन.
म्हणियारा- प्रा॰ना॰ सेवकअथवादूत- दा॰द॰३स॰९ओ॰४.
म्हणियें- प्रा॰ना॰ कार्यअथवाकाम- ज्ञा॰अ॰८ओ॰१६८- ज्ञा॰अ॰१७ओ॰१३२

## य

यजन- सं॰ना॰ यज्ञकरणें.
यज्वा- सं॰ना॰ यजनकर्ता- ज्ञा॰अ॰९ओ॰२४२.
यती- सं॰ना॰ १ यत्नकरणारा- २ सन्यासी.
यंत्र- सं॰ना॰ १ कळासी- २ प्राणायाम- ज्ञा॰अ॰१२ओ॰५०.
यदुभूषण- सं॰ना॰ कृष्ण.
यम- सं॰ना॰ १ मरणोत्तर पातकीजनांसशासनकरणाराअधिकारीआहेतो. २ अष्टांगयोगांतील पहिलें अंग- त्याचे अंतर्गत बारा अवयव आहेत त्यांचीं नावें- १ अहिंसा- २ सत्य- ३ अस्तेयता- ४ असंगत्व- ५ निंद्यकर्मलज्जा- ६ असंचय- ७ अस्तिक्य- ८ ब्रम्हचर्य- ९ मौन- १० स्थैर्य- ११ क्षमा १२ अभय.
यमनंदन- सं॰ना॰ धर्मराजा.
यमयातना- सं॰ना॰ पातकीं जनांस मरणोत्तर कुंभपाकादि यातना यम करितो त्या.
यमल- सं॰वि॰ दोघे अथवा जुळे- जावळे.
यमी- सं॰ना॰ योगीपुरुष.
यवन- सं॰ना यावनदेशीयमनुष्य- म्लेंछ.
यवव्रीही- सं॰ना॰ गहूं साळी.
यळील- प्रा॰वि॰ निर्फळ- दा॰द॰ १२स॰४ओ॰१९.
यक्ष- सं॰ना॰ राक्षसांचे सापत्नबंधु.
यक्षप- सं॰ना॰ कुबेर.
यक्षवर- सं॰ना॰ कुबेर.
यक्षवित्त- सं॰ना॰ कुबेरधन.
यज्ञ- सं॰ना॰ ईश्वरोद्देशानें जें हवन कर्मकरणें तें.
यज्ञवाट- सं॰ना॰ यज्ञमंडप.
यज्ञोपहार- सं॰ना॰ यज्ञशेषभाग.

याग- सं॰ ना॰ यज्ञ-
याजन- सं॰ ना॰ यज्ञ करविणें-
याजी- सं॰ वि॰ यजनशील-
यातायात- सं॰ अप॰ ना॰ येणें जाणें- श्रम-
याती- सं॰ अप॰ ना॰ ज्ञाती-
यातु- सं॰ ना॰ राक्षस-
यातुधान- सं॰ ना॰ राक्षस-
यातुप- सं॰ ना॰ राक्षसेंद्र- रावण-
यात्रा- सं॰ ना॰ संचार-
याद- सं॰ ना॰ जलचर-
यादवेंद्र- सं॰ ना॰ कृष्ण-
यादसराज- सं॰ ना॰ वरुण-
यान- सं॰ ना॰ गमन-२ रथादिक-
याम- सं॰ ना॰ १ प्रहर- २ वायुजय-
यामिनी- सं॰ ना॰ रात्र-
यामिनीचर- सं॰ ना॰ राक्षस-
यावा- प्रा॰ ना॰ १ उदय- भा॰ अ॰ ३ ओ॰ २९-२ माति- दा॰ द॰ ३ स॰ ४ ओ॰ ३-३ धैर्य- दा॰ द॰ २ स॰ २ ओ॰ ३१-
याज्ञसेनी- सं॰ ना॰ द्रौपदी-
याज्ञीक- सं॰ ना॰ यज्ञ करणारा-

## यु-यू-

युक्ताभिला- सं॰ अप॰ वि॰ अ-क्लिष्ट भावना झुकलो-
युक्तिघोष- सं॰ ना॰ मुच्छबंध- ओडिया आणि जालंदर असे जे - आधार- हृदय आणि कंठस्थान स्थितती न बंधत संबंधि मंत्रलो- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ५०-
युग्म- सं॰ ना॰ जोडी-
युपु- सं॰ अप॰ ना॰ यज्ञांतील यूपबंध स्तंभ- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २३९
युवती- सं॰ ना॰ स्त्री-
युष्मदंड- सं॰ अप॰ ना॰ इक्षुदंड म्हणजे ऊस-
यूथ- सं॰ ना॰ समूह-
यूप- सं॰ ना॰ यज्ञस्तंभ-

## ये-

येकट- सं॰ अप॰ वि॰ एकाकी- एकटा-
येकुणा- प्रा॰ वि॰ दीद दुमता-
येकतुकें- सं॰ अप॰ अव्य॰ सारखें- वि॰ समान- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ २५
येकांतर- सं॰ अप॰ वि॰ एकादिवसाआड- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ३६३- ३६५-
येकंदरें- प्रा॰ वि॰ एकाकार- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १५१-
येकवगी- सं॰ अप॰ ना॰ एकप्रकार- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४०४-
येकमुख- सं॰ अप॰ शब्द॰ अव्य॰ सन्मुख- भा॰ अ॰ १ ओ॰ १५१-
येकमोहरें- सं॰ अप॰ अव्य॰ एकत्र

ज्ञा० अ० १० ओ० २५२-२५३.
येकरस-सं० अप० ना० एकरसम्ह णजे ब्रम्ह.
येकलें-सं० अप० वि० एकटें-सामर्थ्यहीन-ज्ञा० अ० १० ओ० ३०९-३१०
येकवंकिया-सं० अप० ना० एकाकारता-ज्ञा० अ० ६ ओ० ३१६.
येकवंकी-सं० अप० ना० तादात्म्य. ज्ञा० अ० ८ ओ० १२६.
येकवंकें-सं० अप० ना० एकरूपत्व अथवा सारखेपण-ज्ञा० अ० १५ ओ० ५७१.
येकवद-सं० अप० ना० एकत्व.
येकवळा-सं० अप० ना० एकोप. ज्ञा० अ० ११ ओ० ५.
येकवेळु-सं० अप० ना० मरणास संज्ञा-ज्ञा० अ० ९ ओ० २०६.
येकसरणें-मा० धा० ना० अनुसरणें-ज्ञा० अ० १३ ओ० ६०६.
येकसार-सं० अप० ना० अनन्य भक्त-ज्ञा० अ० ५ ओ० ४.
येकसारांश-सं० अप० ना० एकसार.
येकायतनु-सं० अप० ना० एकायतन अथवा अधिष्ठान ब्रम्ह.
येकायेकी-सं० अप० वि० एकाएकी अथवा निःसंग-भा० अ० १ ओ० ४३
येकावळी-सं० अप० ना० एकावली म्हणजे एकेरा हार.
येर-मा० वि० अन्य-दुसरा.
येरझार-मा० ना० वेरझार अथवा जाणें येणें.
येर येर-मा० अव्य० परस्पर-सं० ना० तो आणि हा.
येरिका-मा० ना० लव्हाळ्याचीएकजात-भा० अ० १ ओ० ३८०.
येरीमोहरे-मा० वि० उलटें-ज्ञा० अ० १५ ओ० ४१.
येरु-मा० वि० अन्य.
येवी-मा० वि० येरु अथवा येर. ज्ञा० अ० ११ ओ० १५३.

## यो.

योग-सं० ना० १ संयोग-२ हठयोग अथवा कर्मयोग.
योगनिद्रा-सं० ना० समाधि.
योगपट-सं० ना० श्रेष्ठभोग. ज्ञा० अ० १६ ओ० ३३१.
योगक्षेम-सं० ना० १ अप्राप्ततें प्राप्त होणें व त्याचें संरक्षण करणें त्याचें नाव-२ उदरनिर्वाहास चुकून म्हणतात.
योषा-सं० ना० स्त्री.
योषिता-सं० ना० स्त्री.

## र.

रंक - सं० वि० गरीब - दीन.
रंकु - सं० अप० वि० रंक - ज्ञा० अ० ६ ओ० ११५.
रक्तप - सं० ना० राक्षस.
रक्तपरमा - सं० ना० शिश्न द्वारा कांहीं व्याधिच्या योगानें जो रक्तप्रवाह लिंडीकूलागून होतो तो.
रखलवाणी - प्रा० ना० मजूर काम. दा० द० २० स० १ ओ० १०.
रंग - सं० ना० सभामंडप.
रंगण - सं० ना० सभा.
रंगमाळा - सं० अप० ना० रंगवल्ली म्हणजे रांगोळी.
रचणें - सं० अप० धा० ना० १ रचना करणें - २ तन्मय होणें - ज्ञा० अ० ५ ओ० १४१.
रज - सं० ना० कण - धुरोळा.
रजक - सं० ना० परीट.
रजत - सं० ना० रुपें.
रजतवणी - सं० अप० ना० रुपेरीपाणी म्हणजे रुपेरी मुलामा.
रजनी - सं० ना० रात्र.
रजनीचर - सं० ना० राक्षस.
रजस्वला - सं० वि० विटाळशी - शिऊन येशी.
रजोगुण - सं० ना० त्रिगुणांतील जन्ममरणदायक दुसरा गुण तो.
रज्जु - सं० ना० दोरी.
रणचत्वर - सं० ना० रणांगण.
रणमोहरी - सं० अप० ना० रणवाद्य.
रति - सं० ना० मदनस्त्री - मैथुन.
रतिनाथ - सं० ना० मदन.
रत्नाकर - सं० ना० समुद्र.
रद - सं० ना० दांत
रदन - सं० ना० दांत - उ० रदनखात बहु कर कर कर कर
रदी - सं० ना० हत्ती.
रंधन - सं० ना० १ पाकक्रिया - अमृ० प्र० ५ ओ० ६४ - २ पाकपात्र - भा० अ० २६ ओ० २६२.
रंध्र - सं० ना० छिद्र.
रंध्रशलका - सं० ना० छिद्रपाडण्याची सळई.
रंभा - सं० ना० १ स्वर्गातील नृत्यांगना - २ केळ.
रंभागर्भ - सं० ना० केळीचागाभा.
रंभापुत्र - सं० ना० कापूर.
रमण - सं० ना० पति.
रमणी - सं० ना० स्त्री
रमा - सं० ना० लक्ष्मी.
रमाबंधु - सं० ना० चंद्र.
रमावर - सं० ना० विष्णु.
रय - सं० ना० वेग.
रयनी - सं० अप० ना० रात्र.
रव - सं० ना० शब्द.
रवदळी - प्रा० ना० १ नाश - चुराडा - भा० अ० २ ओ० ३ - २ दाणादाण.

रुक्मि० अ० १२ ओ० ६.

रवरव-सं० अप० ना० रौरवनामेंनरक.

रवळिया-मा० ना० एकक्षुद्रदैवत.

रवि-सं० ना० सूर्य.

रवितनया-सं० ना० यमुना.

रवी-मा० ना० घुसळदंड.

रशना-सं० ना० कटिबंध.

रश्मि-सं० ना० किरण.

रस-सं० ना० १ पंचविषयांतील चौथाविषय-२ पाणी.

रसद-सं० ना० मेघ.

रससोय-सं० अप० ना० पाक. अमृ० प्र० ५ ओ० ४२.

रसा-सं० ना० पृथ्वी.

रसाधिपति-सं० ना० वरुण.

रसास्वाद-सं० ना० विक्षेप-लय-कषाय-ह्यातिहींविघ्नांचानाश करणारा-ब्रम्हस्वरूपाभिमानतो.

रहंवर-सं० ना० रथ.

रहाण-मा० ना० अंगांतदैवतआणऊन बोलविणें-अथवाअंगांतदेवतघालणें यांचेंनाव-दा० द० ३ स० २ ओ० ४४.

रळी-मा० ना० विनोद.

रक्षा-सं० ना० १ संरक्षण-२ राख अथवाभस्म-३ वि० रक्षित-उ० ॥ प्रभुजीरक्षातुमची॥ दासाचीमीलहानशीवटिका॥ आर्या॥

राई-मा० ना० मोहरी-उ० ॥ समुद्रामध्येंजैशीराई॥ इतुकीस्फूर्तिचीअसे नवाई॥

राउळ-मा० ना० देव-भा० अ० ७ ओ० १७३-विवे० पू० प्र० २ ओ० ३१.

राऊत-मा० ना० १ स्वार-२ अपानवायूससंज्ञा-दा० द० १८ स० ९ ओ० १७.

राऊळ-मा० ना० १ घर-ज्ञा० अ० १० ओ० १६०-२ मंदिर-भा० अ० २ ओ० ३८-३ देऊळ.

राका-सं० ना० पूर्णिमा.

राख-सं० अप० ना० विवाहपत्नीशिवायउपभोगार्थ बाळगलेलीस्त्री.

राखोंडें-मा० वि० जन्मओठतुटकें.

राग-सं० ना० १ प्रीति-२ भैरवादिगायनसंबंधीरागते.

रागबागा-मा० ना० घोड्यालगीकवण-भा० अ० २० ओ० २१४.

रागज्ञान-सं० ना० भैरव-पंचमनाट-मल्हार-गौडमाल-आणिदेसाख-यांचेंज्ञानतें.

रागी-सं० वि० आसक्त.

रागीसांडी-सं० अप० वि० विषयासक्त-ज्ञा० अ० ७ ओ० ९३.

रागेचें-सं० अप० वि० आवडीचें ज्ञा० अ० ९ ओ० ३२६.

राघ-सं० ना० महलाभ.

राघावळी-मा० ना० आळीदार घोड्याचीपाठझालर-रुक्मि० अ० ८ ओ० १५.

राजयोग- सं॰ ना॰ हट्यानेंमनाच्यानि रोधन करितां हळू हळू चित्तास आकळ णें असा प्रकार ज्यांत आहे तो- म्हणजे ज्ञानयोग.

राजस- प्रा॰ वि॰ १ डोळस अथवा सुंदर- २ वि॰ रजोगुणी.

राजहंस- सं॰ ना॰ दूधपाणी एक जाहालें असतां त्यांतूनदूधतितकेंच निवडून घेणारा असा एक पक्षी आहे तो.

राजी- सं॰ ना॰ पंक्ति ओळ.

राजी- प्रा॰ वि॰ अनुकूळ.

राजीव- सं॰ ना॰ कमळ.

रांडवडा- प्रा॰ ना॰ तोडा तोडी.

राडी- प्रा॰ ना॰ धगधगीत निरवान्यांची स्वाई ती- दा॰ द॰ ३ स॰ ३ ओ॰ ५१.

रांडोळी- प्रा॰ ना॰ १ उपहास- भा॰ अ॰ १ ओ॰ ३२५- २ विनोद- भा॰ अ॰ ६ ओ॰ ३६२- ३ मारामारी- रुक्मि॰ अ॰ ६ ओ॰ ९.

रानवटीमाळ- सं॰ अप॰ ना॰ वनमाला.

राणसोरू- सं॰ अप॰ ना॰ अरण्यसूकर म्हणजे रानडुकर- भा॰ अ॰ ५ ओ॰ १६७.

राणिवसा- सं॰ अप॰ ना॰ अंतःपुर भा॰ अ॰ १३ ओ॰ ५९१.

राणीव- सं॰ अप॰ ना॰ १ राज्य- पर॰ प्र॰ १२ ओ॰ ८- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ २६९- २ राज्यसुख- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १२-

विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ६.

रातणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ रत होणें- प॰ प्र॰ २ ओ॰ २- भा॰ अ॰ २ ओ॰ ६६४.

राती- सं॰ अप॰ ना॰ रात्र.

रातोत्पल- सं॰ ना॰ तांबडें कमळ.

रात्रिंचर- सं॰ ना॰ राक्षस- उ॰ ॥ हे रात्रिंचर राजा ॥

रांधणें- सं॰ अप॰ ना॰ १ भाजणखापर- २ धा॰ ना॰ पाक करणें.

राधा- सं॰ ना॰ १ एक गोपी- २ गाडीवानाची स्त्री ती-

राधेय- सं॰ ना॰ कर्णराजा.

रानशाकट- सं॰ [illegible] एका जातीचें श्वापद- दा॰ द॰ ३ स॰ ७ ओ॰ ९.

राभस्य- प्रा॰ ना॰ १ विषयसुख ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १०२८- २ अविचार- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ३९१.

रामा- सं॰ ना॰ स्त्री.

रायवणी- प्रा॰ ना॰ मोहऱ्यांचें पाणी.

रायविनोद- सं॰ अप॰ ना॰ रायनंद म्हणजे बहुरूपी.

रायेण- प्रा॰ ना॰ कडू इंदावन- विवे॰ पू॰ प्र॰ ७ ओ॰ ७२.

रावणारि- सं॰ ना॰ श्रीराम.

रावणी- सं॰ ना॰ इंद्रजीत.

राविणें-प्रा०धा०ना०रंगविणें-ज्ञा०अ०११ओ०६००-अमृ०म०७ओ०१६.

राषभी-सं०अप०ना० रासभी म्हणजे गाढवी-स०ओ०३७.

राष्ट्र-सं०ना०देश.

रासभी-सं०ना०गाढवी-उ०॥तु झ्यागुणकथामहासुरभि यांतहीरासभी॥

राहटी-प्रा०ना०रहाणीअथवामार्ग-विवे०पू०म०१ओ०६.

राहाटणें-प्रा०धा०ना०आचरणें-वर्तणें-ज्ञा०अ०२ओ०२३४.

राहाडी-प्रा०ना०राडीअथवाराड-ज्ञा०अ०१७ओ०१६०.

राहाण-प्रा०ना०रहाणशब्दपाहा

राहो-सं०अप०ना०राहुनामादैत्य.

## रि-री.

रिगनिग-प्रा०ना०रिघणें-निघणें

रिगु-प्रा०ना०रिघाव-म्हणजेशिरकाव-भा०अ०१ओ०३१३

रिघणें-प्रा०धा०ना०प्रवेशणें-अमृ०म०६ओ०२३.

रिघनिघ-प्रा०धा०ना० जायेअथवा येजा.

रिचवणें-प्रा०धा०ना०ओतणें-भा०अ०७ओ०५२४.

रितेंसोप-प्रा०वि०निरर्थक

रिद्धि-सं०ना०१स्वाभाविकसिध्दि-म्हणजेपूर्वतपसाध्यसिध्दि भा०अ०६ओ०५४-२द्रव्य-ज्ञा०अ०७ओ०९३-अमृ०म०७ओ०१२५.

रिपु-सं०ना०शत्रु.

रीण-सं०अप०ना०ऋण-म्हणजेकर्ज.

रीस-सं०अप०ना०ऋक्षम्हणजेअस्वल.

## रु-रू.

रुका-प्रा०ना०पैशाचातृतियांश.

रुक्म-सं०ना०सुवर्ण.

रुक्मिणी-सं०ना०कृष्णपत्नि.

रुक्मिणीसुत-सं०ना०मदन.

रुख-सं०अप०ना०वृक्ष.

रुचिर-सं०वि०सुंदर.

रुची-प्रा०ना०१शोभा-२आवड ३चव अथवा गोडी.

रुंजी-प्रा०ना०गुंजारव-भा०अ०१ओ०१०२.

रुजुत्व-सं०अप०ना०ऋजुत्व-म्हणजे सरलत्व.

रुण-सं०अप०ना०ऋण.

रुतुमती-सं०अप०वि०ऋतुमती म्हणजे रजस्वला.

रुद्र-सं॰ना॰ एकादश संख्याक दे वता आहेत त्यांचें नाव-
रुधणें-सं॰ अप॰ धा॰ ना॰ रोधणें-
रुधिर-सं॰ना॰ रक्त-
रुपणें-प्रा॰धा॰ना॰ खोंचणें-
रुमा-सं॰ना॰ सुग्रीवस्त्री-
रुषी-सं॰अप॰ना॰ ऋषि-
रुसणें-प्रा॰धा॰ना॰ झांकणें-अ मृ॰प्र॰७ ओ॰१६-
रुळेना-प्रा॰ क्रि॰ हेत दिसेना-ज्ञा॰ अ॰८ ओ॰ ६५-
रुक्ष-सं॰अप॰ना॰ ऋक्ष म्हणजे अस्वल-२ ऋक्ष म्ह॰ नक्षत्र-३ वि॰ कोरडें-ज्यांत आर्द्रता नाहीं असें-
रूप-सं॰ना॰ पंचविषयांतील ति सरा विषय-२ आकारवंत स्वरूप-
रूपक-सं॰ना॰ मुख्य बोलावयाचा विषय अन्योक्तिनें सांगणें त्याचें नाव-
रूळणें-प्रा॰धा॰ना॰ विराजणें-दा॰ द॰१ स॰२ ओ॰१९-

## रे-रो-रौ-

रेखणें-प्रा॰धा॰ना॰१ रेखाटणें-२ लिहिणें-
रेखा-सं॰अप॰ना॰ रेषा अ॰पर्वा दा-भा॰अ॰५ ओ॰२००-
रेखा-प्रा॰ना॰१ कपिल रचना-ज्ञा॰ अ॰६ ओ॰१८-२ यथोक्त कर्म-ज्ञा॰ अ॰६ ओ॰५१-
रेचक-सं॰ना॰ पूरकानें वायु भो टलेला कुंभकांत स्थिर झाला जो तो सोडणें त्याचें नाव-
रेटमकाहणी-प्रा॰ना॰ भाकड कथा-
रेण-सं॰अप॰ना॰ रेणु-भा॰अ॰ १४ ओ॰१८९-
रेणुका-सं॰ना॰ जमदग्न्यपत्नि परशुराममाता-
रेंदा-प्रा॰ना॰ चिखल-
रेवपणा-प्रा॰ना॰ जंगम मतांती ल देव त्यांचें नाव-
रेवती-सं॰ना॰ बलरामपत्नि-
रोकडें-प्रा॰वि॰ प्रत्यक्ष-भा॰अ॰ १ ओ॰२०-दा॰द॰५ स॰१ ओ॰२
रोख-सं॰अप॰ना॰ रोष अथवा क्रोध-रुक्मि॰अ॰११ ओ॰१९-
रोध-सं॰ना॰ प्रतिबंध-बाणास संज्ञा-
रोप-प्रा॰ना॰ बाण-
रोम-सं॰ना॰ केंस-
रोष-सं॰ना॰ क्रोध-
रोहिणी-सं॰ना॰ बलराममाता २ एक तारा आहे-३ एक नक्षत्र-
रोहिणी-प्रा॰ना॰ मृगजल-ज्ञा॰ अ॰५ ओ॰११६-ज्ञा॰अ॰७ ओ॰२९
रोहिणीपति-सं॰ना॰ चंद्र-
रोही-प्रा॰ना॰१ रुधिर-ज्ञा॰अ॰

१६ओ०३६९-३७० २ उपक्रम-ज्ञा० अ०१८ ओ०६५२.

**रोळा** - प्रा० ना० दृष्टी-भा० अ०३१ ओ०३७.

**रौरव**-सं०ना० एका महानरकाचें नाव.

## ल.

**लगटणें** - प्रा० धा० ना० दाटफळणें दा०द०७स०१ओ०१०.

**लगबग**- प्रा० ना० त्वरा-भा०अ० ६ओ० ३०९.

**लगासी**-प्रा०शद्ब०अव्य०स्वाधीन.

**लग्न**- सं० ना० ऐक्य-ज्ञा० अ०८-ओ०११६.

**लंघणें**-प्रा० धा० ना०भुकेनेंथकणें.

**लंघणें** -सं०अप०धा०ना० उल्लंघणें.

**लंघन**-सं० अप० ना० उल्लंघन.

**लंघन**-प्रा० ना० उपवास.

**लघिमा**- सं० ना० अष्टमहासिध्धीं तील तिसरीसिध्धि-२ हलुवटपणा.

**लघुशंका**- सं० ना० मूत्र.

**लचकणें**-प्रा० धा० ना० धमकणें-२ तरळणें- ज्ञा० अ०१४ ओ०८५.

**लचाळ**- प्रा० वि० लाचुंगा अथवा लोंचट-दा०द०२ स०३ ओ०२८.

**लटपट**- प्रा० ना० धांदल-दा०द०स०भु०

**लटी**- प्रा० ना०१ लेखा- ज्ञा०अ०१० ओ०३००-३०१-२ वि० लटकें-ज्ञा० अ०७ ओ०३०.

**लंड**- प्रा०वि०१ अतिधूर्त-दा०द० २स०३ओ०२९-२-वाडगा-अथवा उन्मत्त.

**लडिवाळपणा**-प्रा०ना० लाडकेपणा.

**लंडी**-प्रा० वि० भित्रा-दा०द०२ स०१ओ०३३.

**लब्ध**-सं०धा०वि० मिळालेलें.

**लब्धसंज्ञ**- सं० वि० सावध.

**लय**- सं० ना०१ संहार-२ झोंप ३ राजयोगसमाधीस होणारें दुसरें विघ्न त्याचें नाव.

**लय**- प्रा० ना० लक्ष अथवाध्यास.

**लयस्थ**-सं० वि० निद्रिस्त- ज्ञा० अ०११ ओ०१२९.

**ललना**- सं० ना० स्त्री.

**लव**- सं० ना०१ क्षण-२ बालाग्र.

**लवक**- प्रा० ना०१ उभारणी-२ वि० किंचित-अमृ० प्र०५ ओ०३३.

**लवंघा**- प्रा० ना० दाह- ज्ञा०अ० १७ ओ०१४९.

**लवटें**- प्रा०वि० लवलेलें- विवे० उ०प्र०९ ओ०७४.

**लवडसवड**- प्रा० ना० लगबग अथवा त्वरा- भा०अ०३ओ०६१६.

**लवण**- सं० ना० मीठ.

**लवण**- प्रा० ना० वाकण अथवाली

नता-उ०॥ नुरे गवचि देतासि॥ साधे लवण मीनाशी॥

**लवणशाक**- सं० ना० लोणचें-

**लवलाह**- प्रा० ना० वेग अथवा त्व रा-भा० अ० १ ओ० २८४- अव्य० सत्वर- विवे० पू० प्र० ७ ओ० १०२.

**लवलाहें**- प्रा० अव्य० सत्वर-

**लवलाही**- प्रा० ना० त्वरा-

**लविथपी**- प्रा० ना० लपंडाव म्हण जे लपणें प्रगटणें- ज्ञा० अ० १४ ओ० ९

**लसती**- सं० ना० १ शुभांगी स्त्री- २ वि० शुभांगी-

**लळा**- प्रा० ना० लाड- भा० अ० ७ ओ० ८२. बा० ओ० ५१६०-

**लळेवाडें**- प्रा० वि० लाडकें-

**लक्ष्य**- सं० ना० १ शुध्धस्वरूप- २ वि० लक्षायास योग्य असें तें.

**लक्ष्यांश**- सं० अप० ना० वाच्यांशा चा त्याग झाल्या वर उर्वरीत जो अधिष्ठा न ब्रम्हात्मा तो-

## ला.

**लाकण**- प्रा० ना० बंधन- ज्ञा० अ० १४ ओ० १५१.

**लाखाजोहर**- सं० अप० ना० ला क्षाजोहर अथवा लाक्षाग्नि- दा० द० ५ स० ८ ओ० ११.

**लाग**- प्रा० ना० बंधन- भा० अ० १ ओ० २५८.

**लागवेग**- प्रा० ना० अतित्वरा- उ० ॥ सर्व सांडोनियां मागें॥ देवाशि येलागवेगें॥

**लागु**- प्रा० ना० १ स्पर्श- लागाला ग- भा० अ० ८ ओ० ६९. २ इच्छा- प्रीति- ज्ञा० अ० १२

**लांगूल**- सं० ना० पुच्छ-

**लाघव**- सं० ना० १ सूक्ष्मत्व- भा० अ० १ ओ० ९८- ज्ञा० अ० ४ ओ० २ २ लघुता अथवा कनवाळूपणा- ३ कुशलता- उ० लाघव देखतां भरे वृत्ती॥ परंतु तेथें त्रिभाग॥

**लाघवी**- सं० वि० नाटकी- नम्र कुशल- मायाळू-

**लांच**- प्रा० ना० १ कुमार्ग- ज्ञा० अ० १८ ओ० ७४३- २ भाड- उ०॥ लु काम्हणे जेशी लांचासाठीं गाही॥ दे ती परि नाहीं ठावी वस्तु॥१॥

**लांचावणें**- प्रा० धा० ना० संव कणें- भा० अ० १ ओ० २९०-

**लांचुगें**- प्रा० वि० भाड खाऊ- भा० अ० २ ओ० ६३.

**लाजहिणें**- सं० अप० धा० ना० लाजणें-

**लाजा**- सं० ना० लाह्या-

**लाठा**- प्रा० वि० मोठा- भा० अ० १२ ओ० ६०१.

**लाठु**- प्रा० वि० थोर- समर्थ- ज्ञा०

अ·१५ओ· २५७·
लाडिलें-प्रा·वि· लाडकें·
लाणी-प्रा·ना· शेवट-ज्ञा·अ·८ ओ·१००-ज्ञा·अ·२ओ· २४२-ज्ञा·अ·९ ओ· ४७०
लाताड-प्रा·वि· पायपोसखाऊ
लाद-प्रा·ना· पाणवटचिखल-दा·द·११ स·७ओ·२
लाधणें-सं·अप· धा·ना· लब्ध होणेंअ· मिळणें·
लापणिका-सं·अप·ना·१शब्द पांडित्य-२भाषण·
लापणी-सं·अप·ना·भाषण·
लांबाउगवे-प्रा·वि·श्रेष्ठ-ज्ञा· अ·६ओ· ४४४·
लाबाड-प्रा·वि· लबाड·
लालणें-सं·अप·धा·ना· लाल नकरणें·
लालन-सं·ना·पालन-क्रीडा-ज्ञा· अ·१० ओ· २.
लालसा-सं·ना·आवड भा·अ· ६ओ·५५.
लालसें-सं·अप·ना·प्रीतीनेंखे ळविणें-ज्ञा·अ·११ ओ·१२०·
लांव-प्रा·ना· लांसअथवाजखी ण-डांकीण-दा·द·३स·१ओ·६
लावणें-प्रा·धा·ना· तोडणें-ज्ञा· अ·१८ ओ·१७९·
लाविरों-प्रा·धा·ना·जाळणें-ज्ञा· अ·९ओ·४६.
लांसणें-प्रा·धा·ना· डागणें·
लासी-प्रा·ना· मांजरी·
लासें-प्रा·ना·१ चिन्ह-ज्ञा·अ· १७ओ·७३-२लांसरूं डोळ्यासहो तेतें-दा·द·३स·६ओ·५०·
लास्य-सं·ना·नृत्य·
लाहणें-सं·अप·धा·ना· लाभ णें-ज्ञा·अ·१६ ओ· ४६-विवे·पूं· प्र·२ओ·६.
लाहलाहल-प्रा·वि· रुसलसी त-ज्ञा·अ·१५ओ·११४·
लाहो-प्रा·ना· छंद-दा·द·१ स·१० ओ·१·
लाळणें-प्रा·धा·ना·जीभलोंब विणें·

## लि-ली-लु-लू.

लिंग-सं·ना·१ चिन्ह-२प्रतिमा·
लिगटणें-प्रा·धा·ना· लागणेंअ थवा स्पर्शणें·
लिंगदेह-सं·ना· वासनात्मकदे ह-अथवा सूक्ष्मदेह·
लिंगभेद-सं·ना·१ सूक्ष्म देहभे द-२पूज्योच्छेद·
लिंगभेदु-सं·अप·ना·१ लिंग भेद-२वैषम्य-ज्ञा·अ·२ ओ·३१ अमृ·प्र·१ ओ·५१·

लिंगाध्यास - सं॰ना॰ वासनाता दात्म्य·
लिथाडणें - प्रा॰धा॰ना॰ १ बरबट णें-दा॰द॰ १ स॰ १ ओ॰ २५-२ लाथा ळणें-दा॰द॰ ५ स॰ ९ ओ॰ ३८·
लिंपणें - सं॰अप॰धा॰ना॰ लिप्तहो णें- भिजणें - ज्ञा॰अ॰ ५ ओ॰ ५०·
लिही - प्रा॰ना॰ शब्दोच्चार अथवा लेख- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ २८·
लीला - सं॰ना॰ क्रीडा - कौतुक·
लीळा - सं॰अप॰ना॰ लीला·
लीळाविग्रह - सं॰अप॰ना॰ स्वकीयइछेनें-अपराधीनत्वें - भक्तमनोरथपूरणार्थ धरलेला देह तो·
लुगडें - प्रा॰ना॰ वस्त्र-उ॰ द्रौपदी चांगडी॥ सभेपुरउनी लूगडीं॥ अ॰॥
लुंठणें - प्रा॰धा॰ना॰ लोळणें- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २२२
लुबुधका - सं॰अप॰ना॰ पारध·
लुब्धक - सं॰ना॰ पारधी·
लुलाय - सं॰ना॰ रेडा·
लूता - सं॰ना॰ कोळीण

## ले-लो-लो.

लेंकपिता - प्रा॰ना॰ जनिता म्हणजे पिता·
लेख - सं॰ना॰ १ देव - २ लिखित·
लेखर्षि - सं॰ना॰ नारद - देवर्षि·
लेखा - सं॰अप॰ना॰ लेखन ग णिल-उ॰॥ गोकुळींच्या सुखा॥ अंतपार नाहीं लेखा॥ १॥
लेंडिया - प्रा॰ना॰ लेंड ओहळ·
लेंडोरा - प्रा॰ना॰ अमंगळ अशा लेंड्या·
लेणें - प्रा॰ना॰ भूषण-अथवा अलंकार· अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ २३६·
लेणें - प्रा॰धा॰ना॰ १ भूषण करणें-भा॰अ॰ १ ओ॰ ७०-२ घेणें-अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ १६६·
लेप - प्रा॰ना॰ बाहुलें अथवा चित्र भा॰अ॰ ६ ओ॰ १४
लेपें - प्रा॰ना॰ लेप· अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ १००
लेसा - प्रा॰ना॰ १ चांगलीरीत-ज्ञा॰अ॰ ७ ओ॰ २०९-२ वि॰ समर्थ- ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ २३६·
लेह्य - सं॰ना॰ १ चाटून खाण्याचे पदार्थ ते· २ वि॰ चाटून खाण्यास योग्य·
लो - प्रा॰ना॰ लय अथवा छंद· दा॰द॰ ३ स॰ २ ओ॰ २२
लोकत्रय - सं॰ना॰ स्वर्ग-मृत्क आणि पाताळ असें त्रै लोक्य·
लोकस्तुत - सं॰वि॰ लोकस्तुत·
लोकपाळ - सं॰अप॰ना॰ इंद्रादिक लोकपाल अथवा दिग्पाळ-ते·
लोकप्राणेश - सं॰ना॰ वायु·

लोकबंधु-सं॰ना॰ लोकहितक र्तासूर्य.
लोकालोकपर्वत-सं॰ना॰ प्रका शव अंधःकार यांच्यामधोमध सप्त द्वीपें सप्तसमुद्र व सुवर्णभूमी पोटींघे ऊन-मेरूपासून साडेबाराकोटीयो जनांतरानें वलयाकार असापर्वत आहेलो.
लोकोत्तर-सं॰वि॰ अलौकि की- विशेष.
लोचन-सं॰ना॰ नेत्र.
लोटांगण-प्रा॰ना॰ नमस्कार.
लोथ-प्रा॰ना॰ मोट-ज्ञा॰अ॰१० ओ॰२५९.
लोधणें-प्रा॰धा॰ना॰ झोंबणें;चि कटणें.
लोप-सं॰ना॰ नाश.
लोपामुद्रा-सं॰ना॰ अगस्त्यना मकऋषीचीस्त्री.
लोभिष्ट-सं॰अप॰वि॰ लोभिष्ठ.
लोलंगता-प्रा॰ना॰ आसक्ति-भा॰अ॰२१ ओ॰३२९-दा॰द॰२ स॰३ओ॰५.
लोष्ठ-सं॰ना॰ मातीचेंढेकूळ.
लोह-सं॰ना॰ लोखंड.
लोह-प्रा॰ना॰ सोनें-ज्ञा॰अ॰९ ओ॰५९.
लोहबंद-प्रा॰वि॰ सोनेरी.
लोहवी-सं॰अप॰ना॰ तांबूस पण-ज्ञा॰अ॰१५ओ॰११४.
लोहीव-सं॰अप॰वि॰ तांबडें.
लौकिक-सं॰वि॰ अवैदिक.
लौंद-प्रा॰वि॰ गलेलठ्ठ-दा॰द॰ २स॰३ओ॰३२.

## व.

वंकनाळ-सं॰अप॰ना॰ ज्यांचा टेनें प्राणेनें खालेले रस मुलासग भींत पोचून पुष्टता येते तें नाळ-दा॰द॰३स॰१ ओ॰६.
वक्ता-सं॰ना॰ बोलणारा-उ॰॥ होवोनीयांभोलावक्ता॥ करीआपु लो आपणकथा॥१॥
वक्त्र-सं॰ना॰ मुख-उ॰॥ रामव देवक्त्र॥ तेंचिजाणावेंपवित्र॥१॥
वक्र-सं॰वि॰ वांकडें.
वक्रावलोकन-सं॰ना॰ वांकडें अवलोकन म्हणजे चोरदृष्टी.
वंगु-सं॰अप॰ना॰ कलंक-ज्ञा॰ अ॰१० ओ॰४६-२ कथील.
वच-सं॰ना॰ भाषण.
वच्छप-सं॰अप॰ना॰ वत्सप म्ह णजे गोपाळ.
वज्रधर-सं॰ना॰ इंद्र.
वज्रपाणी-सं॰ना॰ इंद्र-उ॰॥ रू पाभाकिताजाइलावज्रपाणी॥ तया कारणें वामनुचक्रपाणी॥इ॰

**वज्राग्नि**- सं० ना० विद्युल्लताग्नि म्हणजे विजेचा अग्नि- ज्ञा० अ० १२ ओ० ५०

**वट**- सं० ना० वडाचा वृक्ष.

**वटक**- प्रा० ना० लेंकरास दूध पाजतांच ल्हान ल्हान गोळ्या होऊन ओकलें त्याचें नाव- दा० द० ३ स० ६ ओ० २२

**वटवट**- प्रा० ना० बड बड- दा० द० २ स० ३ ओ० ७.

**वटु**- सं० अप० ना० वट वृक्ष- अमृ० प्र० ७ ओ० १४९

**वडप**- प्रा० ना० पडप अथवा शृंगार शोभा- ज्ञा० अ० ६ ओ० ४९० -२ आश्रय- ज्ञा० अ० १० ओ० ४६ -३ दृष्टि- ज्ञा० अ० १३ ओ० ३९८ - ३९९.

**वडवा**- प्रा० ना० पाणधरण अ० पाणबांध.

**वडवाळी**- प्रा० ना० ग्रास- ज्ञा० अ० ६ ओ० २३०.

**वडस**- प्रा० ना० डोळ्यांत वाढलेलें मोठें फूल.

**वडील**- सं० अप० वि० वृध्द- श्रेष्ठ.

**वढाणी**- प्रा० ना० दुर्गंधी- दा० द० ३ स० ३ ओ० २३.

**वणिजें**- सं० अप० ना० वाणिज्य- म्हणजे व्यापार कर्म- ज्ञा० अ० ६ ओ० ११०.

**वर्ण**- सं० ना० १ व्याधिरूप कोड- किंवा छिद्र- त्याचें नाव -२ श्वेत पीतादि रंग त्याचें नाव -३ ब्राह्मणादि जाती- उ० सकळही वर्णा॥ शरणीं अधिकार ब्राह्मणा॥ अभंग॥

**वर्णसंकर**- सं० ना० वर्णैक्य अथवा भ्रष्टाकार- उ० चार लक्ष सत्तावीस सहस्र॥ दोनशें चाळीस संवत्सर॥ पुढें अन्योन्य वर्णसंकर॥ होणार आहे॥१॥ तु० उ०॥ जगीं भेद कांमानये॥ वर्णसंकर करूं नये॥

**वर्तमान**- सं० ना० वार्ता -२ वि० सांप्रतचें.

**वर्तमानप्रतिबंध**- सं० ना० परमार्थास मस्खुल विघ्न करणारा प्रतिबंध तो. त्याचे अंतर्गत भेद च्यार आहेत त्यांचीं नावें- १ प्रज्ञा मांद्य म्हणजे बुध्दिची मंदता -२ कुतर्क म्हणजे बुध्दि चांगली पण तर्क अन्यथा -३ विपर्यय- म्हणजे विपर्यास असें असेल कीं नाहीं कोण जाणें अशी कल्पना मनांत येणें -४ दुराग्रह म्हणजे तुम्ही म्हणतां असें नाहींच- म्हणून म्हणणें तो.

**वत्सल**- सं० वि० कृपावंत.

**वत्सळु**- सं० अप० वि० दयाळू.

**वदंती**- सं० ना० भाषण.

**वदन**- सं० ना० मुख.

**वंदन**- सं० ना० नमन- नमस्कार.

**वंदनभक्ति**- सं० ना० उपासना मार्गांतील नवविध भक्तिरूप साध

वैंसाहावेंअंगलें.
वदान्य- सं० ना० दाता.
वर्धिष्णु- सं० वि० वाढणारा.
वधु- सं० अप० ना० वधूम्हणजे स्त्री.
वन- सं० ना० १ उदक- २ अरण्य.
वनद- सं० ना० मेघ.
वनश्री- सं० ना० फलपुष्पसंभाररूपवनलक्ष्मी.
वनाळ- प्रा० ना० स्वभाव- दा० द० १४ स० ६ ओ० २.
वनिता- सं० ना० स्त्री उ० मानी शीळाडकी ॥ वनिताजे माणसखी॥
वनौक- सं० ना० वनचर
वन्हि- सं० ना० अग्नि.
वपन- सं० ना० क्षौर.
वपु- सं० ना० शरीर.
वमक- सं० ना० वमन थवावांती- ओक.
वमणें- सं० अप० धा० ना० ओकणें- टाकणें.
वर्म- सं० ना० १ मर्म- २ गुह्य- ३ सार उ० ॥ हंसदासम्हणे सुरम्य वर्म तेवी ॥ शोधितां दृथिवी सांपडेना ॥१॥
वयसा- प्रा० ना० वय- भा० अ० ९ ओ० २६२- दा० द० २ स० १ ओ० ५४.
वयसें- प्रा० ना० तरुणपण- ज्ञा० अ० ७ ओ० ८५.
वर- सं० ना० १ पति- २ वि० मुख्य.
वरगण- प्रा० ना० वांटणी.
वरचिलें- प्रा० अव्य० आणखी- २ वि० वरलें- ज्ञा० अ० ८ ओ० १३५.
वरटा- सं० ना० हंसी.
वरद- सं० वि० वरदाता.
वरदळ- प्रा० ना० वरीलभाग.
वरपंगी- प्रा० अ० बाह्यतः भा० ओ० २६५२.
वरपडा- प्रा० वि० गुंतलेला. दा० द० ३ स० १ ओ० ४८.
वरपडी- प्रा० ना० मिठी म्हणजे सुरकुंडी- भा० अ० ६ ओ० ५७.
वरपेकरी- प्रा० वि० लुटारू- ना० चोर- दा० द० २ स० ३ ओ० ३१.
वरपेरुकरी- प्रा० वि० वरपेकरी.
वरमाय- सं० अप० ना० वराची आई.
वरवर्णिनी- सं० ना० सुंदरस्त्री.
वरवळा- प्रा० ना० वरचढपणा.
वरस- सं० अप० ना० वर्षाव- ज्ञा० अ० १८ ओ० ३२२.
वऱ्हाडी- सं० अप० ना० वराचे सुहृद अथवा वरपक्षीयलोक.
वराक- सं० वि० नीच.
वरारोहा- सं० ना० सुंदरस्त्री.
वरासन- सं० ना० श्रेष्ठासन.
वरिखणें- सं० अप० धा० ना० दृष्टिकरणें- ज्ञा० अ० १८ ओ० ४३४.
वरितु- सं० अप० ना० भ्रतार.

ज्ञा०अ०१०ओ०३२८-३२९.

**वरिपडणें**-भा०धा०ना०१नकळणें ज्ञा०अ०१२ओ०७०-२अज्ञान-वा० ओ०२८३८.

**वरी**-सं०अप०क्रि० ग्रासकरूनघे ई-उ०॥श्रीकृष्णनवरानवरीसी॥शु शुपाळनवरानवरीसी॥

**वरी**-प्रा०शब्द०अव्य०पर्यंत-उ० देवजवळीअंतरी॥भेटिनाहींजन्म वरी॥

**वरुणदिक्**-सं०ना०पश्चिमदि शा-उ० तंवतोवरुणदिग्वधुचेंसदन॥ वासरमणिप्रवेशला॥

**वरुणालय**-सं०ना०समुद्र

**वरुषणें**-सं०अप०धा०ना०वर्षा वकरणें-भा०अ०१ओ०३४.

**वरोस**-प्रा०ना०पोट-ज्ञा०अ० १८ओ०२५८.

**वरोसी**-प्रा०ना०पोटखर्च.

**वलय**-सं०ना०कंकण.

**वलाट**-सं०अप०वि०बलाढ्य-ज्ञा०अ०१८ओ०८५७.

**वल्कल**-सं०ना०झाडाचीसाल

**वल्गेजणें**-सं०अप०धा०ना०व ल्गनाकरणें.

**वल्मिक**-सं०ना०वारूळ.

**वल्लभ**-सं०ना०पति.

**वंश**-सं०ना०१पूर्वजमालिका-२वे ळू

**वंशी**-सं०ना०मुरलीअथवावेणु. पावा.

**वश्य**-सं०अप०अव्य०वशम्हण जे अनुकूळ.

**वर्षु**-सं०अप०ना०वर्षाव.

**वसतें**-सं०अप०वि०राहतें अ थवा वस्तीचें.

**वसु**-सं०ना०अष्टसंख्याकदेव ते.

**वसुंधरा**-सं०ना०पृथ्वी.

**वसुधा**-सं०ना०पृथ्वी.

**वसुमती**-सं०ना०पृथ्वी.

**वसा**-सं०अप०ना०वसुअथ वा पोळ. ज्ञा०अ०१७ओ०२८०

**वसोटा**-सं०अप०ना०वस्ती-ज्ञा०अ०५ओ०१२.भा०अ०५ ओ०१०१.

**वस्तु**-सं०ना०१पदार्थ-२परब्र म्ह-भा०अ०२१ओ०४६.

**वस्तुतंत्र**-सं०वि०ध्येयपरब्र म्हरूप.

**वस्तुतंत्रता**-सं०ना०ध्येयब्र म्हरूपता.

**वस्तुता**-सं०अप०अव्य०वा स्तवीकपणें-भा०अ०११ओ०२९.

**वस्तुपरिछेदरहित**-सं०वि० अमुकवस्तुंतअसणें व अमुकव स्तुंतनसणें असाज्या परब्रम्हासव स्तुपरिछेद नाहींत त्याचें नांव.

**वहिलें**-प्रा० अव्य० १ सत्वर-ज्ञा० अ० ५ ओ० ३२-२ लौकर-भा० अ० १ ओ० १७७.

**वहिलेंपण**-प्रा० ना० वेग-ज्ञा० अ० ७ ओ० ८१.

**वही**-प्रा० ना० प्रतिबंध-ज्ञा० अ० १३ ओ० १४०.

**वळ**-प्रा० ना० मांडीचे संधींत होतो लांबट वरवंटा तो.

**वळघ**-प्रा० ना० वेंघ-अमृ० प्र० ६ ओ० २७.

**वळण**-प्रा० ना० धरण-दा० द० ११ स० ७ ओ० ३.

**वळणें**-प्रा० धा० ना० उलटणें.

**वळवट**-प्रा० ना० गव्हले आदिक रून वळीव सामग्री.

**वळसा**-प्रा० ना० १ नदीच्या पुरामध्ये लाकेर कचरा-भा० अ० २ ओ० १४ वा० ओ० ४८०९-२ गलबला-घोंटाळा-दा० द० ५ स० १० ओ० २९-३ वेढा-दा० द० ११ स० ७ ओ० ६-४ उपद्रव दा० द० १७ स० ६ ओ० ११-५ फेरा झपाटा-दा० द० ३ स० १ ओ० ६.

**वळ्हीं**-प्रा० ना० गंज.

**वळी**-प्रा० ना० वेग-ज्ञा० अ० ६ ओ० २१७.

## वा

**वाइलें**-प्रा० वि० निराळें-भिन्न.

**वाउधान**-सं० अप० ना० व्यवधान-ज्ञा० अ० १५ ओ० १९३-भा० अ० १३ ओ० २४१.

**वाउर**-प्रा० वि० १ वाईट-ज्ञा० अ० ११ ओ० ५३८-५३९-२ वाउगें-ज्ञा० अ० १६ ओ० ४२१-४२२.

**वाकी**-प्रा० ना० पायवाळे-भा० अ० १४ ओ० ४९४. दा० द० १ स० २ ओ० २३.

**वांकुलिया**-प्रा० ना० निंदा-ज्ञा० अ० १७ ओ० १४.

**वांकोण**-प्रा० ना० वक्रता-दा० द० ११ स० ७ ओ० ३-२ वांक-दा० द० १९ स० १ ओ० ५.

**वाक्यदीप**-सं० ना० यथार्थ-अशीं वाक्यें.

**वाख**-प्रा० ना० दशी-अमृ० प्र० ७ ओ० २६७.

**वाखली**-प्रा० ना० १ भजन-ज्ञा० अ० ९ ओ० ४८०-२ चिंता-ज्ञा० अ० १३ ओ० ८०८.

**वाखाणनें**-सं० अप० धा० ना० स्तवन करणें.

**वाखाणा**-सं० अप० ना० व्याख्यान-स्तुती.

**वाखारी**-प्रा० ना० दुकान-ज्ञा० अ० ७ ओ० १३५.

**वाखोरा**-प्रा० ना० घर-ज्ञा० अ०

७ ओ० १३८.

**वांग**- मा० ना० सुरमाच्याकाळसरपु
ळ्या-दा० द० ३ स० ६ ओ० ५०.

**वागारा**- सं० अप० ना० वागुरा-
ज्ञा० अ० १५ ओ० ३५६.

**वागारें**- सं० अप० ना० वाग्दोर-
भा० अ० १६ ओ० १०३.

**वागेश्वरी**- सं० ना० सरस्वती.

**वाग्देवता**- सं० ना० सरस्वती.

**वाग्ब्रह्म**- सं० ना० वेद-ज्ञा० अ०
१२ ओ० ११२.

**वाग्बाण**- सं० ना० शद्बबाण-

**वाग्वज्र**- सं० ना० शद्बशस्त्र.

**वाग्विलास**- सं० ना० वाणीप्रभा
व.

**वाग्शून्य**- सं० वि० वाचाहीन.

**वाघुरा**- मा० ना० जाळें-

**वाचस्पति**- सं० ना० देवगुरु बृह
स्पति-

**वाचा**- सं० ना० पंचकर्मेंद्रियांती
ल- वाणिनामक पहिलें इंद्रिय-

**वाचारंभण**- सं० ना० वाणीनेंबो
लावया पुरतामात्र जो विषय तो.

**वाच्य**- सं० वि० बोलायास योग्य
तें.

**वाच्यांश**- सं० ना० १ बोलण्यास
योग्य अंशतो- २ काम- कर्मज्ञ विद्या
दिक तसेच सर्वज्ञत्वादिक हे जिवे
श्वरांचे वाच्यांशा ते.

**वाजट**- मा० वि० रथा-ज्ञा० अ०
१३ ओ० ५९. ज्ञा० अ० १४ ओ० २६.
२ वादाड्या- दा० द० २ स० ३ ओ०
३०- ३ वाचाळ.

**वांजट**- सं० अ० वि० वंध्यापुत्र
वत्- अमृ० प्र० ७ ओ० २४४

**वाजणें**- मा० धा० ना० आदळणें
ज्ञा० अ० १६ ओ० ८९.

**वाजांतर**- सं० अप० ना० वाद्य-

**वाजी**- सं० ना० घोडा.

**वाजी**- मा० ना० अपवाद-विवे०
पू० प्र० ७ ओ० ५१- २ कंटाळा अ
थवा त्रास-

**वांझोळें**- सं० अप० ना० वांझ
फळ- वंध्याफळ-ज्ञा० अ० १०-
ओ० ३३३- ३३९.

**वाटणें**- मा० धा० ना० १ भासणें-
उ० ॥ तुज वाटे हे जागृती ॥ मज झा
ली अनुभवप्रासि ॥. २ आवडणें-
ज्ञा० अ० ७ ओ० २०८.

**वाटवधें**- मा० ना० अडथळा-
ज्ञा० अ० १२ ओ० ६१.

**वाटी**- मा० ना० गुडघीरोग-दा०
द० ३ स० ६ ओ० २२.

**वाटीव**- मा० ना० पुरुषार्थ-ज्ञा०
अ० १ ओ० १८८. विवे० उ० प्र० ३
ओ० ११- भा० अ० ६ ओ० २५८.
रुक्मि० अ० ८ ओ० ९.

**वाटेय**- मा० ना० विषय- ज्ञा० अ०

१६ ओ० ५६.

**वाड** - प्रा० वि० थोर अथवा मोठें - ज्ञा० अ० ११ ओ० ८७.

**वाडव** - सं० ना० वडवानल.

**वाडवेळ** - प्रा० अव्य० फार वेळ. विवे० पू० प्र० २ ओ० ६.

**वाडेकोड** - प्रा० ना० १ मोठी आवड भा० अ० ३ ओ० २५४ - २ मोठें कपट भा० अ० २ ओ० ८९ - ३ वि० कोटीपट भा० अ० २ ओ० ७१७.

**वाडेकोडें** - प्रा० अव्य० अत्यंत.

**वाढीव** - सं० अप० ना० कीर्ति.

**वाण** - प्रा० ना० १ तोटा - ज्ञा० अ० २ ओ० ४५ - २ ठसा

**वाणनें** - प्रा० धा० ना० स्तवन करणें.

**वाणिज्य** - सं० ना० व्यापार.

**वाणी** - प्रा० ना० १ वाण - अथवा तोटा - भा० अ० १ ओ० ४२ - २ शद्ब० अव्य० सारखें - भा० अ० १३ ओ० ४०४.

**वाणेउमट** - प्रा० ना० नाना प्रकार ज्ञा० अ० ६ ओ० १२२.

**वांत** - सं० अप० ना० वांती अथवा वमन.

**वातात्मज** - सं० ना० अग्नि - मारुती.

**वातायन** - सं० अप० ना० वातायतन म्हणजे खिडकी - भा० अ० ९ ओ०

**वासाहल** - प्रा० ना० नासाडी - दा० द० ३ स० ३ ओ० २६.

**वार्तिक** - सं० ना० ग्रंथाचें नाव. शंकराचार्यांच्या सूत्रांवरील वृत्या त्यांचें व्याख्यान तें.

**वादीकुडें** - प्रा० ना० वादीचें कोडें अथवा खेळ.

**वाधावणें** - प्रा० धा० ना० मूळ धाडणें - ज्ञा० अ० १३ ओ० ८२९ - २ ना० मोल - अमृ० प्र० ९ ओ० २८.

**वाधावा** - प्रा० ना० १ मूळ आल्याची सूचना - भा० अ० ५ ओ० ५६४. २ वार्ता - भा० अ० ७ ओ० ५७३.

**वार्धक्य** - सं० ना० म्हातारपण.

**वानप्रस्थ** - सं० ना० विधियुक्त प्रपंच करून. स्त्रीसहीत. परंतु स्त्रीसंभोगवर्जून वनांत रहणारा चार आश्रमांतील तृतीयाश्रम धरतो.

**वानवसा** - प्रा० ना० १ मध्यगृह अथवा माजघर - २ भोजनशाळा - ज्ञा० अ० ११ ओ० १०८.

**वानी** - प्रा० ना० १ कस - ज्ञा० अ० १२ ओ० २५ - २ मोल - ज्ञा० अ० १८ ओ० १२१ - भा० अ० ३ ओ० ३८४.

**वापी** - सं० ना० पायऱ्यांची विहीर म्हणजे बारव.

**वाम** - सं० वि० १ उजवें - २ सुंदर.

**वाय** - प्रा० वि० वाव अथवा व्यर्थ. विवे० पू० प्र० ३ ओ० ५.

वायवस- प्रा॰ वि॰ लटकें- विवे॰ पू॰ प्र॰१ ओ॰३५·
वायस- सं॰ ना॰ कावळा·
वायाणी- प्रा॰ वि॰ व्यर्थ- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १९६· अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ २०५·
वायुधारणा- सं॰ ना॰ प्राणायाम· भा॰ अ॰ ३ ओ॰ २७८·
वायो- सं॰ अप॰ ना॰ वायु·
वायोसुत- सं॰ अप॰ ना॰ १ मारुती २ अग्नि·
वारण- सं॰ ना॰ हत्ती·
वारयावेंधणें- प्रा॰ धा॰ ना॰ वायु चक्रानुरूप मनभ्रमणें- दा॰ द॰ ३ स॰ २ ओ॰ ६३·
वारांगना- सं॰ ना॰ वेश्या·
वारि- सं॰ ना॰ पाणि·
वारिका- प्रा॰ ना॰ वेग- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २७२·
वारिकें- प्रा॰ ना॰ शेरडूं- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ५३८-५३९·
वारिज- सं॰ ना॰ कमळ·
वारिरासी- सं॰ ना॰ समुद्र·
वारिवाह- सं॰ ना॰ मेघ·
वारी- प्रा॰ ना॰ वेळ- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ६५४-२ फेरी· उ॰ परी मासीवारी चुकोंनेदीहरि॥
वारु- सं॰ ना॰ घोडा·
वाल्लभ- सं॰ अप॰ ना॰ १ आवड अथवा प्रीति- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १२३- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ४६५-२ तादात्म्य- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १६५·
वालीफ- प्रा॰ ना॰ गवसणी- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २५·
वालेंदुलें- प्रा॰ वि॰ युग्मरूप- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १४·
वाल्हेंदुल्हें- प्रा॰ वि॰ वालेंदुलें·
वावटेणें- प्रा॰ धा॰ ना॰ विश्राम घेणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ २१९·
वावरणें- प्रा॰ धा॰ ना॰ फिरणें अथवा भटकणें·
वावरिजेणें- प्रा॰ धा॰ ना॰ व्यवहारणें· अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ६३·
वावसें- प्रा॰ वि॰ व्यर्थ·
वावो- प्रा॰ वि॰ वाव अथवा व्यर्थ- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ १०५·
वार्षी- सं॰ अप॰ ना॰ दृष्टि- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ १११·
वास- सं॰ ना॰ १ वस्त्र- २ वास्तव्य·
वास- प्रा॰ ना॰ १ सोय- १ मार्ग- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ १३-२ वाट- आ॰ पं॰ १ स॰ ५ ओ॰ ७२-३ मार्गप्रतिक्षा दा॰ द॰ ३ स॰ २ ओ॰ ११·
वासना- सं॰ ना॰ पापपुण्याचें बीज जिच्यांत असतें ती·
वासरमणि- सं॰ ना॰ सूर्य·
वासव- सं॰ ना॰ इंद्र·
वासिपणें- प्रा॰ धा॰ ना॰ वचकणें अथवा भिणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३५१·

विवे॰पू॰प्र॰ ७ ओ॰ ४७.
**वासी**-प्रा॰ वि॰ अर्थ-ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ १२२.
**वासिप**-प्रा॰ ना॰ काळ.
**वासिपु**-प्रा॰ ना॰ काळ अथवा मृत्यु ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ७५१.
**वासु**- सं॰ अप॰ ना॰ वास्तव्य-भा॰ अ॰ १ ओ॰ ३.
**वाहणा**-प्रा॰ ना॰ भजन-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ३२८.
**वाहणें**-प्रा॰ धा॰ ना॰ वागवणें-दा॰ द॰ १ स॰ ६ ओ॰ २०.
**वाहर**-प्रा॰ ना॰ बाधकता-ज्ञा॰ अ॰ ११-ओ॰ ६०.
**वाहाणी**-प्रा॰ ना॰ मार्ग-प्रवाह-रूढी-ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ८५.
**वाहिनी**- सं॰ ना॰ सेना.
**वाहिवा**-प्रा॰ ना॰ कारभार-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ३६.
**वाळणें**-प्रा॰ धा॰ ना॰ १ निषिध्ध करणें-ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ २६७-२ निरासकरणें-अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ३६.

## वि-वी.

**विकडी**-प्रा॰ ना॰ चातुर्य-ज्ञा॰ अ॰ ओ॰
**विकरणें**-सं॰ अप॰ धा॰ ना॰ विकार पावणें.
**विकरणें**-प्रा॰ धा॰ ना॰ विखरणें-अ॰ पसरणें-ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ५२.
**विकार**-सं॰ ना॰ बाधा अथवा विकृति.
**विकार**-प्रा॰ ना॰ विस्तार-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १३८.
**विकारी**-सं॰ वि॰ १ बाधक-२ ना॰ कार्यजात अ॰ नाशिवंतपदार्थ-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १२५.
**विकृति**-सं॰ ना॰ १ विकार-२ कुबुध्धि.
**विकोपीजाणें**-प्रा॰ धा॰ ना॰ फाटणें-ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ २५३.
**विक्रम**-सं॰ ना॰ पराक्रम.
**विख**-सं॰ अप॰ ना॰ विष.
**विखरणें**-प्रा॰ धा॰ ना॰ पसरणें-विस्तारणें.
**विखार**-सं॰ अप॰ ना॰ विषाकार म्हणजे सर्प-वा॰ ओ॰ २२५६.
**विखास**-प्रा॰ ना॰ श्रम-अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ४७.
**विखीं**-सं॰ अप॰ शब्द॰ अव्य॰ विषयीं-भा॰ अ॰ १२ ओ॰ ६१४.
**विखो**-सं॰ अप॰ ना॰ विषयो अथवा विषय-अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ३६.
**विगतविषय**-सं॰ वि॰ विरक्त.
**विंगळ**-सं॰ अप॰ ना॰ अंगार अथवा इंगळ-निखारा.
**विग्रह**-सं॰ ना॰ १ साकारदेह-२ युध्ध.

विचंबणें- प्रा० धा० ना० १ खोळंबणें ज्ञा० अ० ६ ओ० ४९-२ श्रम करणें- ज्ञा० अ० १८ ओ० ६०९-३ विघ्न करणें भा० अ० ४ ओ० १६७.

विचंबु- प्रा० ना० संकट- भा० अ० २३ ओ० ३१८.

विचळणें- प्रा० धा० ना० १ आश्रय होणें- ज्ञा० अ० १३ ओ० १६-२ भांबावणें- भा० अ० ३ ओ० ६८३.

विचक्षण- सं० वि० बुध्धिमान्-शाहणा.

विचारणा- सं० ना० १ विचार-२ सप्तभूमिकांतील दुसरी भूमिका.

विचित्र- सं० ना० १ आश्चर्य-२ वि० चमत्कारीक.

विची- सं० ना० पाण्याची लाट अथवा लहरी.

विजया- सं० ना० भांग- भा० अ० २ ओ० २३०.

विजातीय- सं० वि० १ अन्य-२ अपूर्व- भा० अ० २० ओ० ८.

विजातीयभेदरहित- सं० वि० वृक्षास पाषाण हा जसा विजातीय असल्यामुळें भेद संभवतो- तसा ज्याप रब्रह्मीं भेद घडत नाहीं त्याचें नाव.

विजावळी- प्रा० ना० वेगळेपण अथवा भिन्नता- ज्ञा० अ० १८ ओ० २६९.

विजु- सं० अप० ना० विद्युल्लता अथवा वीज.

विट- सं० ना० १ जार-२ जांवई

विटंकु- प्रा० वि० निबिड अथवा घनदाट- ज्ञा० अ० १५ ओ० ६३.

विटणें- प्रा० धा० ना० १ नासणें-२ त्रासणें.

विटप- सं० ना० वृक्ष.

विटपी- सं० ना० वृक्ष.

विटंब- सं० अप० ना० अपमान-नाश.

विटंबना- सं० ना० अप्रतिष्ठा.

विटाळु- प्रा० ना० १ स्पर्श-२ अशुचित्व.

विडापाउड- प्रा० ना० विडा पैसा ज्ञा० अ० १८ ओ० ४६.

विणावणी- प्रा० ना० उपाधी- विवे० पू० प्र० १ ओ० ४३.

वितंड- प्रा० वि० १ अघटित- ज्ञा० अ० १३ ओ० २१-२ विशाळ- भा० अ० २ ओ० १८८-३ प्रशस्त अथवा मोठें- दा० द० १ स० २ ओ० १०

वितंडु- प्रा० वि० वितंड- भा० अ० ५ ओ० १२३.

वितरेक- सं० अप० ना० व्यतिरेक शब्द पाहा.

वितान- सं० ना० छत.

वितुळणें- प्रा० धा० ना० मावळणें ज्ञा० ओ० ३५१८.

वित्त- सं० ना० द्रव्य अथवा धन.

वित्तप- सं० ना० कुबेर.

वित्पत्ति- सं॰ अप॰ ना॰ व्युत्पत्ति- म्हणजे शास्त्रप्रवण·

विद- सं॰ ना॰ १ जाणता पुरुष-२ वि॰ ज्ञानी·

विदरें- प्रा॰ वि॰ कुरूप- दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ ४२·

विदळ- प्रा॰ वि॰ डांकलग- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ १०११·

विंदाणी- प्रा॰ ना॰ १ कारागिरी अ॰ कौशल्य-२ वि॰ कुशल· ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ४५४·

विंदाण- प्रा॰ ना॰ १ निग्रह- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ३६५ -२ वर्मलक्ष्य- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ २७१-३ लक्षण- भा॰ अ॰ ३ ओ॰ ५३७·

विदुदयोद्यान- सं॰ ना॰ ज्ञानोत्प त्तीचा बाग·

विदेहमुक्त· सं॰ ना॰ गुरूपदेशा नें निवृतिक समाधान पावून निर्विक ल्प स्थितिनें असतो तो·

विदेहस्थिति- सं॰ ना॰ देह आहे तावत्काल राहातो परंतु देहाची स्मृ तिनाहीं अशीजी ज्ञानी पुरुषाची नि र्विकल्प स्थीतितिचें नाव·

विद्भद- सं॰ अप॰ ना॰ आत्मज्ञान ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १·

विद्या- सं॰ ना॰ १ ज्ञान-२ अन्य था ज्ञान रूप म्हणजे विक्षेपरूप ई श्वरोपाधि शक्तिनी·

विद्याधर- सं॰ ना॰ देवांमध्यें एक जाती आहे त्यांचें नाव·

विद्युल्लता- सं॰ ना॰ वीज·

विद्रुम- सं॰ ना॰ पोंवळें·

विद्वत्सन्यास- सं॰ ना॰ ज्ञान होऊने जो न्यास म्ह॰ त्यागतो·

विंधणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ टोंचणें

विधाता- सं॰ ज्ञा॰ ब्रम्हदेव·

विधि- सं॰ ना॰ १ ब्रम्हदेव-२ अं मुकच करणें अथवा घेणें अशाअ र्थाचा उपदेश तो·

विधिनिषेध- सं॰ ना॰ अमूक करावें अथवा घ्यावें व अमूक करूं नये अथवा घेऊं नये असें ज्यांत सांगितलें आहे त्याचें नाव·

विधिमुख- सं॰ ना॰ सच्चिदानं दानंत स्वरूपाचें जें वर्णन तें·

विधु- सं॰ ना॰ चंद्र·

विधुर- सं॰ वि॰ गतस्त्रीक म्हण॰ ज्याची बायको मेली तो·

विनटणें- प्रा॰ धा॰ ना॰ मग्न होणें- रंगून जाणें- भा॰ अ॰ ५ ओ॰ ३५०·

विनटु- प्रा॰ ना॰ खेळ- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ११३·

विनतानंदन- सं॰ ना॰ १ गरुड २ अरुण·

विनतापुत्र- सं॰ ना॰ १ गरुड- २ अरुण·

विनयोग- सं॰ अप॰ ना॰ विनियोग·

व्यवस्था.
**विनयोगणें**- सं॰ अप॰ धा॰ ना॰ खाणें- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २८१.
**विनायक**- सं॰ ना॰ १ गणपति-२ गरुड.
**विनाश**- सं॰ वि॰ १ विपरीत- २ ना॰ नाश.
**विनास**- सं॰ वि॰ नकटा.
**विनित**- सं॰ वि॰ नम्र.
**विनियो** - सं॰ अप॰ ना॰ विनयो-विनय अथवा नम्रता- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २२६
**विनोद**- सं॰ ना॰ कौतुक.
**विनोदु**- सं॰ अप॰ ना॰ विनोद अथवा चमत्कार- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १७६.
**विन्यास**- सं॰ ना॰ विस्तार- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ६६.
**विपट**- प्रा॰ ना॰ वैषम्य- दा॰ द॰ ११ स॰ ५ ओ॰ १३.
**विपत्ती**- सं॰ ना॰ आपदा.
**विपत्पात**- सं॰ ना॰ आपदा प्राप्ति.
**विपनणें**- प्रा॰ धा॰ ना॰ शास्त्र दृष्ट्या- पाहाणें- ज्ञा॰ अ॰ २ ओ॰ २७४.
**विपरीतभावना**- सं॰ ना॰ देहच आत्मा अशी भावना ती.
**विपरीतज्ञान** - सं॰ ना॰ अन्यथाज्ञान म्हणजे नामरूपात्मक वस्तुजाताचें हें सत्यच असें ज्ञान तें.
**विपाइलें**- प्रा॰ वि॰ १ एकादें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १०- २ थोडें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १०२.
**विपाय**- सं॰ ना॰ अपाय.
**विपायें**- प्रा॰ अ॰ कदाचित्- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १२- अमृ॰ प्र॰ १ ओ॰ १५.
**विपारा**- प्रा॰ वि॰ विरूप- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ ३५.
**विपावो**- सं॰ अप॰ ना॰ विपाव अथवा कठीणपण- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २८.
**विपिन**- सं॰ ना॰ अरण्य.
**विपुळात**- सं॰ अप॰ वि॰ विपुल अथवा पुष्कळ- भा॰ अ॰ ५ ओ॰ १०५.
**विप्र**- सं॰ ना॰ ब्राम्हण.
**विफल**- सं॰ वि॰ निष्फल.
**विफळ**- सं॰ अप॰ वि॰ विफल.
**विफळात**- सं॰ अप॰ वि॰ विफल अथवा व्यर्थ.
**विबुध**- सं॰ ना॰ त्रिदश अथवा देव.
**विभक्त**- सं॰ ना॰ १ अभक्त- २ वि॰ भिन्न अथवा वेगळें.
**विभव**- सं॰ ना॰ भाग्य अथवा वैभव- २ संपत्ति- ३ वि॰ सुखदायक- ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ३१०.
**विभांडणें**- प्रा॰ धा॰ ना॰ पराभव करणें अथवा जिंकणें- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ १२१.
**विभावसु**- सं॰ ना॰ अग्नि.
**विभु**- सं॰ वि॰ महान्.
**विभूति**- सं॰ ना॰ भृगु आदिकरून महान् महान् पुरुष ते.
**विरंची**- सं॰ अप॰ ना॰ विरिंचि अथवा ब्रम्हदेव.

विरज- सं॰ वि॰ निर्मळ.
विरजा- प्रा॰ ना॰ साद्यकर्त्ती- ज्ञा॰ अ॰१८ ओ॰ ४५६.
विरजांबर- सं॰ ना॰ निर्मलवस्त्र.
विरजियें- प्रा॰ वि॰ साद्यकर्त्तें- ज्ञा॰ अ॰१ ओ॰१२०
विरजें- प्रा॰ ना॰ सोबती- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰४४९.
विरमणें- प्रा॰ धा॰ ना॰ विरणें अथवा लाजणें-
विरळ- सं॰ अप॰ वि॰ विरल म्हणजे क्वचित्.
विराग- सं॰ ना॰ विरक्ति अथवा वैराग्य.
विराट्- सं॰ ना॰ ब्रम्हांड- ईश्वराचा- स्थूलदेह.
विराणा- प्रा॰ ना॰ एकदेवता आहे- दा॰ द॰१३ स॰८ ओ॰१४.
विरावें- सं॰ अप॰ ना॰ शौर्य- दा॰ द॰३ स॰१ ओ॰७.
विरु- सं॰ अप॰ वि॰ विरुध्ध- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰५७.
विरुगोळा- सं॰ अप॰ ना॰ अडथळा- ज्ञा॰ अ॰१५ ओ॰४६५.
विरुध्ध- सं॰ वि॰ उलटें.
विरुध्धनानिज- सं॰ अप॰ ना॰ द्वैतनाब्रम्ह- ज्ञा॰ अ॰१४ ओ॰७८.
विरुळें- सं॰ अप॰ वि॰ विरल अथवा- फाटकें-
विरूपाक्ष- सं॰ ना॰ त्रिनेत्र म्ह॰ शिव.
विरोचनात्मज- सं॰ ना॰ बळीनामा दैत्य.
विरोध- सं॰ ना॰ द्वेष.
विरोधु- सं॰ अप॰ ना॰ विरोध.
विलग- प्रा॰ ना॰ उपद्रव- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰६२.
विलपणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ विलापकरणें अथवा शोक करणें.
विल्याळणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ विलयासजाणें.
विलसणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ शोभणें- वा॰ ओ॰१२६८.
विवर्त- सं॰ ना॰ १ भोंवरा- २ नसून दिसतेंतें-
विवर- सं॰ ना॰ गुहा.
विवर- सं॰ अपं॰ ना॰ विवरण- दा॰ द॰ १४ स॰ ३ ओ॰ ४६.
विवरण- सं॰ ना॰ सविस्तर निरूपण.
विवसी- प्रा॰ ना॰ १ भूत- २ विघ्नदेवता- दा॰ द॰१४ स॰५ ओ॰३२.
विवस्कंध- सं॰ ना॰ नक्षत्र मंडळापासून शनी मंडळापावेतों ज्याची मर्यादा असा सासस्कंधांतील पांचवा स्कंध तो
विवळ- प्रा॰ वि॰ १ सविस्तर- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰१६४- २ सुगम- ज्ञा॰ अ॰१० ओ॰ १८८-१९०
विवळणें- प्रा॰ धा॰ ना॰ स्पष्टकरणें- स्पष्टहोणें अथवा समजणें- ज्ञा॰ अ॰

१६ ओ० ३.
विवळणें—भा० वि० आनंदयुक्त. ज्ञा० अ० ६ ओ० १३५.
विवक्षा—सं० ना० १ हेतु अथवा कारण. २ भाषण. ज्ञा० अ० ११ ओ० २७१.
विवित्क—सं० वि० एकांत.
विविदिषा—सं० ना० जाणाऱ्याची इच्छा.
विवेक—सं० ना० नित्यकार्य व अनित्य कार्य याचा विचार तो. साधनचतुष्टयांतील पहिलें साधन.
विशद—सं० वि० स्पष्ट अथवा प्रांजळ.
विशदु—सं० अप० वि० विशद.
विशाण—सं० अप० ना० विषाण म्हणजे शिंग.
विशिख—सं० ना० बाण.
विशिष्ट—सं० वि० १ वर्णादिलक्षणयुक्त ना० २ श्वेतपीतादिकवर्ण.
विशेख—सं० अप० वि० विशेष. भा० अ० १ ओ० १२.
विशेषणें—सं० अप० धा० ना० वर्णन करणें.
विशेषज्ञान—सं० ना० आभासरूप जीव चैतन्याचें ज्ञान.
विशो—सं० अप० ना० विषय. ज्ञा० अ० १८ ओ० १७३६.
विश्लेष—सं० ना० दुःख.
विश्व—सं० ना० जग.
विश्वकर्मा—सं० ना० देवांचा सुतार.
विश्वसृट्—सं० ना० ब्रम्हदेव.
विश्वाभिमान—सं० ना० हा देह मी आणि हे विषय माझे असा जागृतीमधला अभिमान तो.
विश्वाभिमानी—सं० ना० विश्वाभिमान धरणारा जीव तो.
विश्वोदयपंथ—सं० ना० माया.
विश्वोदयपंथकंधर—सं० ना० मायानियंता.
विषकंठ—सं० ना० शिव.
विषदु—सं० अप० वि० विशद.
विषय—सं० ना० १ शब्दादिपंचविषय ते. २ वेदांतशास्त्रांत ब्रम्हप्रत्यगात्मा यांचें ऐक्य त्याचें नाव.
विषयपंचक—सं० ना० शब्द. स्पर्श. रूप. रस. आणि गंध. या पांचांचा समुदाय तें.
विषयी—सं० वि० विषयासक्त.
विषवल्लति—सं० ना० विष वल्ली.
विषाण—सं० ना० शिंग.
विषो—सं० अप० ना० विषयो अथवा विषय.
विष्कळित—सं० अप० वि० विसकटित.
विष्टप—सं० ना० देव.
विष्टर—सं० ना० दर्भ.
विष्णुनाभ—सं० ना० ब्रम्हदेव.
विष्णुपदी—सं० ना० गंगा.
विसकुस—भा० ना० विघड अथवा तुटातूट. अमृ० प्र० २ ओ० ६९.

विसकुसें-प्रा०ना० व्यर्थकासाविशी-ज्ञा०अ०८ओ०६७.
विसर्ग-सं०ना० त्याग.
विसंचणें-प्रा०धा०ना०नासणें-ज्ञा अ०८ओ०१८०-२विकारणें-वि०पू०प्र-१ओ०९१.
विसणनें-प्रा०धा०ना० आवेशणें-ज्ञा-अ०१ओ०१६१.
विसंव-प्रा०ना०१ अवकाश-२त्याग-भा०अ०२३ ओ०३५
विसंबणें-प्रा०धा०ना-विश्रांतिपावणें ज्ञा०अ०१५ओ०१०-विवे०उ०प्र०७ओ-१०६.
विसंवादिभ्रम-सं०ना० लाभहीनभ्र मतो.
विसाळ-प्रा०ना० कांहींबाधा-दा० द०२स०६ओ०१२.
विसिफ-प्रा०ना० गुरांच्या आरवाड्यां तएककिडा असतो तो.
विसुरा-प्रा०ना०१ विस्मय- ज्ञा०अ० ५ओ०१७५-२अभिप्राय-ज्ञा०अ० १७ओ०१५२.
विसुरें-प्रा०ना० भ्रांती-ज्ञा०अ०६ ओ०१८-अमृ०प्र०७ओ०२१४.
विसूचिका-सं०ना० हागओकाचारो ग-रुक्मि० अ०१४ओ०६५.
विस्मो-सं०अप०ना० विस्मय-ज्ञा० अ०१३ओ०६३०.
विहंग-सं०ना० पक्षी.
विहंगम-सं०ना० पक्षी.
विहरण-सं०ना० विहार.
विहरा-प्रा०ना० भोगपणदुरा-दा० द०१६स०४ओ०७.
विहित-सं०वि० योग्य.
विळून-प्रा०अ० एकावेळांतून-भा० अ०८ओ०२५२.
विक्षिप्तता-सं०ना० अभ्यासाच्या च्यारभूमिकांतील पहिली भूमीका.
विक्षेप-सं०ना०१ अडथळा-२विघ्न ३जीवासससावस्था आहेत त्यांतली तिसरी अवस्था.
विक्षेपशक्ति-सं०ना० अन्यथा-ज्ञानरूपविद्या.
विज्ञान-सं०ना०१प्रपंच-ज्ञा० अ०९ओ०४२-२ज्ञाना ज्ञान दोन्ही मावळूनउर्वरीतस्थितितिचेंनाव.
वी-सं०ना०पक्षी.
वीचि-सं०अप०ना० विचि म्हणजे जललहरी.
वीर्य-सं०ना० पराक्रम.
वीर-सं०वि०१ शूर-२ वैराग्यशील
वीरगुंठी-सं० अप० ना० बध्यकेश त्यांचेंनाव.
वीरसू-सं०ना० वीरमाता.
वुंडी-प्रा०ना० बलिदान-ज्ञा०अ० १७ओ०९७.
वृक-सं०ना० लांडगा.
वृत्ति-सं०ना०१ स्फुरण अथवास

स्वरूपाचीमूळआठवण- २ वतन.

**वृत्रघ्न**- सं० ना० इंद्र.

**वृत्रारि**- सं० ना० इंद्र.

**वृत्रारिशत्रु**- सं० ना० इंद्रजीत.

**वृंद**- सं० ना० समुदाय.

**वृंदारक**- सं० ना० देव.

**वृष**- सं० ना० कर्णराजा.

**वृषण**- सं० ना० अंड.

**वृषभ**- सं० ना० बैल- नंदी.

**वृषभध्वज**- सं० ना० शिव.

**वृषली**- सं० वि० व्यभिचारिणी.

**वृष्णिप**- सं० ना० कृष्ण.

## वे.

**वेउळी**- मा० ना० इंगळी- ज्ञा० अ० १६ ओ० २५८-२५९.

**वेरवासें**- मा० वि० १ विरुध्य- ज्ञा० अ० ७ ओ० ४७- २ व्यर्थ- ज्ञा० अ० १७ ओ० ३०९- ३१०- ३ दृष्ट अ० पाहिलेलें- ज्ञा० अ० १३ ओ० ८०१.

**वेंगडी**- सं० अप० ना० वेग अथ० गति दा० द० १ स० ५ ओ० १०

**वेगाटें**- सं० अप० अव्य० लवकर- भा० अ० ६ ओ० ३०९.

**वेगु**- सं० अप० ना० त्वरा- वेग

**वेगु**- मा० ना० दूषण- ज्ञा० अ० १३ ओ० २७१.

**वेंघणें**- मा० धा० ना० चढणें.

**वेंचु**- सं० अप० ना० १ व्यय अथ० खर्च- २ क्षय.

**वेंटाळणें**- सं० अप० धा० ना० १ वेष्टणें- २ स्वस्वाधीनकरणें.

**वेंठणें**- सं० अप० धा० ना० वेष्टणें- भा० अ० १ ओ० ४७.

**वेंधळावणें**- सं० अप० धा० ना० वेधणें- २ भुलविणें.

**वेढनुपुरें**- सं० अप० ना० वेष्टन- वस्त्र- ज्ञा० अ० ६ ओ० १०९.

**वेतंड**- सं० ना० हत्ती.

**वेत्रपाणि**- सं० ना० भालधर अ० भालदार.

**वेद**- सं० ना० १ ज्ञान- २ भगवंताच्यामुखांपासून अनेकश्रुतिनीयुक्त अशीनिघालेली स्वतः प्रमाणवाणी.

**वेदत्रयी**- सं० ना० धर्म- अर्थ- काम- यांचा समुच्चय

**वेदलोकु**- सं० अप० ना० श्रुति.

**वेदवती**- सं० ना० पृथ्वी- ज्ञा० अ० ११ ओ० २२४.

**वेदांत**- सं० ना० १ अद्वैतशास्त्र- २ शास्त्रप्रतीति.

**वेदांतशास्त्र**- सं० ना० अद्वैतशास्त्र.

**वेदिका**- सं० ना० कुंड- ओटा- ज्ञा० अ० ८ ओ० ४९.

**वेद्य**- सं० ना० विषय- १ वि० जाणायास योग्य.

वेद्यु-सं॰अप॰ना॰वेद्य॰
वेध-प्रा॰ना॰ छंद॰
वेऱ्ही-प्रा॰शद्ब॰अव्य॰ पावेतों-पर्यंत
वेल-प्रा॰ना॰ मर्यादा-भा॰अ॰८ ओ॰ ५४॰
वेलरी-प्रा॰ना॰ फळ-ज्ञा॰अ॰१६-ओ॰३६६-३६७॰
वेलांडी-प्रा॰ना॰ दधि-ज्ञा॰अ॰ १५ ओ॰२८१॰
वेलावणें-प्रा॰धा॰ना॰ सुरवावणें-अमृ॰प्र॰९ओ॰२॰
वेल्हावणें-प्रा॰धा॰ना॰ भोगणें-ज्ञा॰ अ॰१२ ओ॰६४॰
वेल्हाळ-प्रा॰ वि॰१ प्रिय-२ सविस्तर-ज्ञा॰अ॰१३ ओ॰३११॰
वेशस्त्री-सं॰ना॰ वेश्या॰
वेश्या-सं॰ना॰ कळवंतीण॰
वेषधारी-सं॰वि॰ सोंगाड्या-उ॰ येर मायीक वेषधारी॥असल्छिव्य॥१॥७॥
वेसणी-प्रा॰ना॰ वेसण अ॰नथणी॰
वेसजें-सं॰अप॰ना॰व्यसन-ज्ञा॰ अ॰६ओ॰१०॰
वेळाईत-प्रा॰ना॰ कैंवारी-विवे॰उ॰-प्र॰९ओ॰२३-विवे॰उ॰प्र॰११ ओ॰५८
वेळाउळ-प्रा॰ना॰ घर-ज्ञा॰अ॰१३ ओ॰३११-
वेळिलवाणें-प्रा॰वि॰ दीनवाणें-दा॰ द॰१४ स॰१ ओ॰५९॰

## वै

वैकल्य-सं॰ना॰विकळता॰
वैकुंठ-सं॰ना॰१ विष्णु-२ ब्रम्हसृष्टी बाहेर विष्णूचें स्वेछानिर्मितरहिवासस्था नतें म्हणजे विष्णुलोक॰
वैखरी-सं॰ना॰ जिव्हायोगानेंश ब्दस्पष्टउमटतात अशीचतुर्विधवाचेंती ल चौथी वाचाती॰
वैदर्भी-सं॰ना॰रुक्मिणी॰
वैदिक-सं॰वि॰ वेदाध्ययनशील-वेदोक्त॰
वैदेही-सं॰ना॰ सीता॰
वैनतेय-सं॰ना॰ गरुड॰
वैभव-सं॰ना॰ ऐश्वर्य॰
वैरागर-सं॰ना॰१ खाण-२ दुकान॰
वैराग्य-सं॰ना॰ विरक्ति॰
वैशेषिक-सं॰ना॰न्यायशास्त्रांतील एकमत॰
वैश्य-सं॰ना॰चवार वर्णांतीलति-सरावर्णतो॰
वैश्रवण-सं॰ना॰कुबेर॰
वैश्वानर-सं॰ना॰१अग्नि-२स्थूल ब्रम्हांडाभिमानीदेवता॰
वैसा-प्रा॰ना॰ वयसा-पाहा-भा॰ अ॰११ ओ॰४१६॰

## वो॰

वोरवटें-प्रा॰वि॰ वाईट॰
वोरवटेवर्णी-प्रा॰ना॰हड्यावर्णी

दिरोग·

**वोखद्**- सं॰अप॰ ना॰ औषध- ज्ञा॰ अ॰१७ओ॰६१·

**वोगर्**- प्रा॰ना॰ वाढपी·

**वोगरणें**- प्रा॰धा॰ना॰ भोजन वाढणें अमृ॰प्र॰२ओ॰२·

**वोगराळें**- प्रा॰ना॰ वाढणपात्र·

**वोंगळ**- सं॰अप॰ वि॰ अमंगळ·

**वोज**- प्रा॰ना॰ चांगुलपण- स्वछप ण-भा॰ अ॰१९ ओ॰२००

**वोजावणें**- प्रा॰धा॰ना॰ आकर्षिणें- सांवरणें- भा॰अ॰१ ओ॰९·

**वोजें**- प्रा॰वि॰ उत्तम - शुध्ध- स्वछ भा॰ अ॰१ ओ॰५·

**वोझें**- प्रा॰ना॰ भार- अमृ॰प्र॰६ ओ॰

**वोटंगण**- प्रा॰ना॰ गिर्दी·

**वोटंगणें**- प्रा॰धा॰ना॰ लागणें- ज्ञा॰ अ॰१२ओ॰७५·

**वोडउ**- प्रा॰ना॰ आदर- ज्ञा॰ अ॰१३ ओ॰६३६·

**वोडगस्तपण**- प्रा॰ना॰ ओढाताण वा॰ओ॰४६००

**वोडण**- प्रा॰ना॰ ढाल- रुक्मि॰ अ॰८ ओ॰४०·

**वोडंबरी**- प्रा॰ना॰ गारुड विद्या- ज्ञा॰ अ॰९ ओ॰१७३- अमृ॰प्र॰६ओ॰३२

**वोडंबा**- प्रा॰ना॰ गलबला- ज्ञा॰अ॰ १५ ओ॰२७६·

**वोडवणें**- प्रा॰धा॰ना॰ प्राप्तहोणें- भा॰अ॰१ओ॰३५८- २खालींकरणें अथवापुढेंकरणें- भा॰अ॰१ओ॰३६०

**वोडवा**- प्रा॰ना॰ योग्यता- ज्ञा॰अ॰ ६ओ॰३३१·

**वोढवणें**- प्रा॰धा॰ना॰ वोडवणें

**वोढावारा**- प्रा॰ना॰ मर्यादा अथवा धरबंध- ज्ञा॰अ॰१३ओ॰६१२·

**वोत**- प्रा॰ना॰ वोहट अथवा वोहटी- ओहोट- ज्ञा॰ अ॰१५ओ॰३३५

**वोतपली**- प्रा॰ना॰१ दीप्ति अथवा तेज- ज्ञा॰अ॰७ओ॰१३१- २ उन्हा चाशेक- ज्ञा॰ अ॰१०ओ॰१५६·

**वोतप्रोत**- सं॰अप॰वि॰ ओतप्रो त म्हणजे अखंडदंडायमान·

**वोथंबा**- प्रा॰ना॰१ गंवत्याचा लंब क- ज्ञा॰अ॰१३ओ॰५३६-५३७· २ आश्रय- ज्ञा॰अ॰१३ओ॰१०८३- ज्ञा॰अ॰१५ओ॰२७६·

**वोथर**- प्रा॰ना॰ पडशाहू- अमृ॰प्र॰ ६ओ॰४६·

**वोथिजणें**- प्रा॰धा॰ना॰ १ पातळ करणें- ज्ञा॰अ॰९ओ॰२१- २ विस्ता रणें- ज्ञा॰ अ॰१ ओ॰६६·

**वोपणें**- प्रा॰ धा॰ना॰ देणें- विक णें- ज्ञा॰अ॰९ ओ॰३३५- भा॰अ॰ २१ओ॰४७१·

**वोपसर**- प्रा॰ना॰ हीनखडा हिर कणी सारखा दिसावा म्हणून देतात पू रतें- अमृ॰प्र॰२ओ॰७३·

वोपसारा- प्रा॰ना॰ वोपसिरा.
वोपसिरा- प्रा॰ना॰ संबंध-ज्ञा॰अ॰ १५ ओ॰ ७६.
वोभण- प्रा॰ना॰ १ प्रवाह-२ वेग.
वोभाण- प्रा॰ना॰ वोभण.
वोभाणें- प्रा॰ना॰ १ वेग-ज्ञा॰अ॰ ७ ओ॰ ७३- २ धा॰ना॰ वेगानें वाहणें
वोमथणें- प्रा॰ धा॰ना॰ उमरणें-उगवणें-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ ५६०.
वोरप- प्रा॰ना॰ १ इच्छा-ज्ञा॰अ॰ १७ ओ॰ २३०-२३१-२ क्रि॰ भुरक अथ॰ भुरका किंवा फुरकामार.
वोरबारें- प्रा॰ना॰ अपेक्षा-अमृ॰प्र॰ ६ ओ॰ ३६.
वोरस- प्रा॰वि॰ १ स्नेहभरित-ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ६२-२ ना॰ स्नेहभरित पान्हा.
वोल- प्रा॰ना॰ ओल म्ह॰ हृदय अ॰ गाहण-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ ३३१
वोलाकुष्ठ- सं॰ अप॰ना॰ रक्तपिती रोग-दा॰द॰ ३ स॰ ६ ओ॰ २१.
वोलांडा- प्रा॰ना॰ पाहा- ओलांडा-दा॰द॰ ३ स॰ ६ ओ॰ २२.
वोलावा- प्रा॰ना॰ १ ओलेपणा-२ आश्रय.
वोल्हावणें- प्रा॰ धा॰ना॰ भिजणें-अमृ॰प्र॰ ६ ओ॰ ३५.
वोल्हासु- सं॰ अप॰ना॰ उल्हास-भा॰अ॰ १ ओ॰ ३६.
वोल्हासु- प्रा॰ना॰ ओलावा-अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ ३४-भा॰अ॰ १६ ओ॰ १४४.
वोवसा- प्रा॰ना॰ व्रत-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ ८१८.
वोवांडणें- प्रा॰धा॰ना॰ ओवाळून टाकणें-ज्ञा॰अ॰ १३ ओ॰ १६४.
वोवांडा- प्रा॰ना॰ ओलांडा-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ २६५.
वोवाडेणें- प्रा॰धा॰ना॰ लवणें-ज्ञा॰अ॰ १५ ओ॰ २००
वोसंग- प्रा॰ना॰ मांडी-पाहा-वोसिंगा.
वोसंडणें- प्रा॰धा॰ना॰ १ भरून वाहणें-विवे॰प्र॰ १ ओ॰ ४५-२ भरपूर होणें-भा॰अ॰ ९ ओ॰ २२७-३ टाकणें अ॰ सांडणें.
वोसण- प्रा॰ना॰ पाहा-वोसाणें
वोसपानें- प्रा॰धा॰ना॰ बरळणें-भा॰अ॰ १० ओ॰ ३०७.
वोसणातियाचाग्रंथ- प्रा॰ना॰ झोंपेतल्याचीबडबड-ज्ञा॰अ॰ १५ ओ॰ ३९३.
वोसंतणें- प्रा॰ धा॰ना॰ आचरणें ज्ञा॰अ॰ १६ ओ॰ ९१-९२.
वोसर- प्रा॰ना॰ ओहोट-आ॰पं॰ १ स॰ ५ ओ॰ ५३.
वोसरणें- प्रा॰धा॰ना॰ वोहोटणें अमृ॰प्र॰ ५ ओ॰ ४९-भा॰अ॰ १ ओ॰ २४४.

वोसाडा- प्रा० ना० शितोळ. भा० अ० ११ ओ० १५.

वोसाणें- प्रा० ना० पुरामधील लांकडें केरकचऱ्याचा समूह- ज्ञा० अ० ७ ओ० ७२.

वोसावणें- प्रा० धा० ना० ओस अथवा शितें पडणें- ज्ञा० अ० १५ ओ० ३०२.

वोसिंगा- प्रा० ना० मांडी- भा० अ० १ ओ० ७६.

वोह्रर- सं० अप० ना० वधुवर- दंपत्य अ० मेहूण.

वोहळणें- प्रा० धा० ना० वाहूनजाणें- अमृ० प्र० २ ओ० २९.

वोहा- प्रा० ना० गाय म्हैस यांची कास. अमृ० प्र० ७ ओ० ६३.

वोळगण- प्रा० ना० प्राप्ति- भा० अ० ११ ओ० ३२८.

वोळगणा- प्रा० ना० सेवाधार.

वोळगणें- प्रा० धा० ना० प्राप्तहोणें- अमृ० प्र० ९ ओ० २९.

वोळगें- प्रा० ना० सेवा- ज्ञा० अ० १७- ओ० १०.

वोळणें- प्रा० धा० ना० प्राप्तहोणें.

वोळंबा- प्रा० ना० १ वाळवी- ज्ञा० अ० ८ ओ० ८९- विवे० पू० प्र० ७ ओ० ११५- २ मुंग्या- ज्ञा० अ० १८ ओ० ६०९.

वोळसा- प्रा० ना० फेरा.

वोळा- प्रा० ना० मेघ- ज्ञा० अ० ९ ओ० २८.

व्यक्ति- सं० ना० आकार अ० आकृति

व्यंजक- सं० वि० प्रकाशक.

व्यतिरेक- सं० ना० अव्याप्ति.

व्यभिचार- सं० ना० जो ज्यावस्तूचा धर्म तोएकेक्षणीं असणें दुसरेक्षणींन सणें त्याचें नाव.

व्यय- सं० ना० वेंच अथ० खर्च.

व्यवस्थिणें- सं० अप० धा० ना० खरे करणें- ज्ञा० अ० ११ ओ० १५९.

व्यवस्थितु- सं० अप० अव्य० व्यवस्थित अ० निश्चित- ज्ञा० अ० ६ ओ० ३५२

व्यष्टि- सं० ना० पिंड अथ० देह.

व्यसन- सं० ना० १ छंद- २ दुःख.

व्यस्त- सं० वि० उलटें.

व्याकरण- सं० ना० सहाशास्त्रांतील शब्दनियमशास्त्र- शब्दशास्त्र.

व्याघात- सं० ना० वाणीची हानी- ज्याला जें न बोलावें तें त्याला बोलणें याचें नाव.

व्याज- सं० ना० मिष अ० निमित्त.

व्याधि- सं० ना० शरीरव्यथा- उ० श्रीमत्परब्रम्हसत्य सर्वआधीं ॥ जेथें आधिव्याधिसुखींनाहीं ॥१॥

व्यान- सं० ना० आपादमस्तकशरीरांत व्यापलाराहून सर्वनाडीस अन्नरस पोंचविणारा पंचप्राणांतील पहिला वायु तो.

व्याप्ति- सं० ना० १ व्यापकता- २ अन्वय.

व्याप्य- सं० ना० व्यापण्याजोगा योग्य

असे पदार्थ.
व्यामोह- सं॰ना॰ अत्यंत मोह.
व्याल- सं॰ना॰ सर्प.
व्यावर्तक- सं॰वि॰ आगंतुकलक्षण युक्त. म्ह॰ क्षणिकलक्षण युक्त- आ॰पं॰ १ स॰१ ओ॰१९
व्यावर्ति- सं॰ना॰ अव्याप्ति अ॰ व्यतिरेक.
व्यासंग- सं॰ना॰ उद्योग.
व्याहाळी- भा॰ना॰ क्रीडा- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰५४१- भा॰ अ॰६ ओ॰३६२.
व्याळ- सं॰अप॰ ना॰ व्याल म्ह॰ सर्प.
व्योम- सं॰ना॰ आकाश.
व्योमकेश- सं॰ना॰ श्रीमहादेव.
व्रज- सं॰ना॰१ समुदाय-२ गोकुळ
व्रात- सं॰ना॰ समूह.
व्रीडा- सं॰ना॰ लज्जा.

## श.

शकट- सं॰ना॰ गाडा.
शकड- सं॰अप॰ना॰ शकट म्ह॰ गाडा
शकुंत- सं॰ना॰ पक्षी.
शकुन- सं॰ना॰ पक्षी-
शकुनी- सं॰ना॰ गांधार अ॰ दुर्योधनमातुल.
शक्ति- सं॰ना॰१ वल्ली- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰२२७-२ सामर्थ्य-उ॰ नामशक्तिबळें जळीं पाषाण तरले॥१॥-३ माया-उ॰ जे महंताची शांति॥ जे ईश्वराची शक्ति॥इ॰
शक्तिचक्र- सं॰ना॰ मायाचक्र-उ॰ जें शक्तिचक्राशीं वेगळ॥
शक्तिपात- सं॰ना॰ महावाक्योपदेशानें जो अज्ञानशक्तिचा निरास तो.
शक्तिसुत- सं॰ना॰१ कार्तिकस्वामी- २ पराशर ऋषि.
शक्र- सं॰ना॰ इंद्र.
शक्रजित- सं॰ना॰ इंद्रजीत.
शक्रनंदन- सं॰ना॰१ वाळी २ अर्जुन.
शक्रसुत- सं॰ना॰ शक्रनंदन.
शक्रारि- सं॰ना॰ इंद्रजीत.
शक्रारिजनक- सं॰ना॰ रावण-
शक्रारिजनकप्रिया- सं॰ना॰ मंदोदरी.
शक्रारिजनकांतक- सं॰ना॰ श्रीराम.
शंखतीर्थ- सं॰ना॰ फाल्गुन वाद्यास संज्ञा-उ॰॥ लंवले मालेनें घेतलें॥ शंखतीर्थ॥.
शंखवळा- सं॰अप॰ना॰ बांगड्या भा॰ अ॰९ ओ॰९५.
शंखावळी- सं॰अप॰ना॰ शंखवलय म्ह॰ बांगडी.
शचि- सं॰ना॰ इंद्राणी-
शचिनायक- सं॰ना॰ इंद्र.
शचिपति- सं॰ना॰ इंद्र.
शचिवर- सं॰ना॰ इंद्र.
शठ- सं॰वि॰१ कदर्यु-२ हरामी.

शण-सं॰ना॰ १ अंबाडी-२ वारव-३ ता ग.
शणपट्ट- सं॰ना॰ तागांचीं वस्त्रें.
शतक्रतु- सं॰ना॰ इंद्र.
शतधृति- सं॰ना॰ ब्रम्हदेव.
शतपत्र- सं॰ना॰ कमळ.
शतमख- सं॰ना॰ इंद्र.
शनिपात- सं॰ना॰ सन्निपात.
शनैशनै- सं॰अप॰अव्य॰ शनैःश नैः म्ह॰ हळूहळू.
शंपा- स॰ना॰ विद्युलता अ॰ वीज
शपरीध्वज- सं॰ना॰ मदन.
शबर- सं॰ना॰ भिल्ल अ॰ कोळी.
शबल- सं॰वि॰ औपाधिक.
शब्द- सं॰ना॰ विषय पंचकांतील पहि लाश्रवणविषय
शब्दब्रम्ह- सं॰ना॰वेद- ज्ञा॰अ॰९ओ॰
शब्दविता- सं॰अप॰ना॰ शब्द द्योतके परमात्मा-
शब्दसृष्टि- सं॰ना॰ कविता- ज्ञा॰अ॰ १२ओ॰२
शब्दानुविध्यसमाधि- सं॰ना॰ अं तः करणानें कल्पिलेलाभास बाधितक रून त्याचें अधिष्ठानजें परमात्मस्वरूप तेंच चिंतन करणें त्याचें नाव
शम- सं॰ना॰ मनादिक अंतरिंद्रियांचानि ग्रह.
शमन- सं॰ना॰ १ यम- २ शांतता.
शमादिषट्कसंपत्ति- सं॰ना॰ साधन चतुष्टयांतील तिसरें साधन- त्याचे अ तर्गत साहाभेद आहेत- १ शम- २ द म- ३ तप- ४ तितिक्षा- ५ श्रध्दा- ६ स माधान.
शर्म- सं॰ना॰ सुख.
शय- सं॰ना॰ हात.
शर- सं॰ना॰ बाण.
शरण्य- सं॰ना॰ शरणांगताचेंरक्ष णकरणारा.
शरधि- सं॰ना॰ बाणठेवण्याचाभाता उ॰॥ कदांनेणों वोढी॥ शरधितुनीकाढी शरकदां॥ इ॰
शराव- सं॰ना॰ परळ.
शरासन- सं॰ना॰ धनुष्य.
शरीरभाव- सं॰ना॰ अहंभाव म्ह॰ मीदेह असाभाव.
शरीरादिएकवीसभेद- सं॰अप॰ ना॰ ४ देह- ४ अवस्था- ४ अभिमान ४ गुण- ५ भोग आणि जीवमिळून जो समुच्चयतो.
शलभ- सं॰ना॰ मशाक
शव- सं॰ना॰ मेत.
शर्व- सं॰ना॰ श्रीशंकर.
शशक- सं॰ना॰ ससा.
शशांक- सं॰ना॰ चंद्र.
शशि- सं॰ना॰ चंद्र.
शशिमौळी- सं॰अप॰ना॰ श्रीशिव.
शशिविखाण- सं॰अप॰ना॰ शशि विषाण- ज्ञा॰अ॰ १५ओ॰ २१५.

शशिविषाण- सं॰ना॰ शशशृंगम्ह॰ सशाचेंशिंग.
शशिशेखर- सं॰ना॰ चंद्रचूड अ॰ शिव.
शष्प- सं॰ना॰ कोमलतृण.
शस्त्र- सं॰ना॰ हत्यार.
शस्त्रि- सं॰ना॰ कटार.

## शा.

शाक्त- सं॰ना॰ शक्तिउपासक अथ॰ देवीभक्त.
शाक्तमार्ग- सं॰ना॰ ज्यांत देवतो द्देशानें मद्यप्राशन करावें असें सांगितलें आहे त्या तंत्रोक्त मार्गाचें नाव.
शाखामृग- सं॰ना॰ वानर.
शाखिया- सं॰अप॰ना॰ वृक्ष- ज्ञा॰अ॰ १८ ओ॰ ८९८.
शाडूळ- सं॰ अप॰ना॰ १ लसलसीत धान्यांकुर- २ वि॰ लसलसीत- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ५६.
शांतवृत्ति- सं॰ना॰ १ सत्वगुण- या॰ ओ॰ ९४५- २ वि॰ सौम्य.
शांधी- सं॰ अप॰ ना॰ संधि अ॰ साम भा॰ अ॰ १९ ओ॰ १५५.
शारदा- सं॰ना॰ सरस्वती.
शारदी- सं॰ अप॰ ना॰ शरत्काळ- ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ५६- भा॰ अ॰ ३ ओ॰ १५३
शारी- प्रा॰ ना॰ अंगावर येतोशारातो भा॰ अ॰ १७ ओ॰ २५४.
शारें- प्रा॰ना॰ शारी.
शाल- सं॰ना॰ एकवृक्षजाती आहे.
शालिका- सं॰ना॰ उत्पत्ति- ज्ञा॰अ॰ १४ ओ॰ ६७.
शालीय- सं॰ना॰ मंदिर.
शावक- सं॰ना॰ मृगबालक.
शासन- सं॰ना॰ १ साधन- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १४७- २ आज्ञा- शिक्षा अ॰ शिकवण.
शास्त्र- सं॰ना॰ वेदप्रमाण धरून जी आज्ञा तिचें नाव.
शाहाडा- प्रा॰ना॰ मोगरवृक्ष- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३४४- २ सिंह.

## शि-शी.

शिउ- सं॰अप॰ना॰ शिव अ॰ ईश्वर अमृ॰ प्र॰ १ ओ॰ २४.
शिखा- सं॰ना॰ १ ज्वाला- २ शेंडी.
शिखी- सं॰ना॰ १ अग्नि- २ मोर.
शिंतरू- प्रा॰ वि॰ शिंतरें म्ह॰ फसविणारें- दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ २९.
शितिकंठ- सं॰ना॰ १ शिव- २ मोर.
शिबिका- सं॰ना॰ पालखी.
शिराणी- प्रा॰ना॰ १ महत्व- विवे॰ पू॰ प्र॰ ५ ओ॰ ७- २ उपभोग- आ॰ पं॰ ७ स॰ ४ ओ॰ ३२.
शिरियाळें- सं॰ अप॰ ना॰ शिर अ॰

मस्तक. ज्ञा० अ० १४ ओ० १९६

शिला- सं० ना० धोंड अ० दगड.

शिलाराशी- सं० ना० पर्वत.

शिलोच्चय सं० ना० पर्वत.

शिल्पशास्त्र- सं० ना० सुतार काम संबंधी कौशल्य.

शिव- सं० ना० १ ईश्वर - २ महादेव - ३ कल्याण.

शिंव- प्रा० ना० मर्यादा अ० हद्द.

शिवलणें- प्रा० धा० ना० स्पर्शणें.

शिवदिनी- सं० ना० १ एकादशी - २ शिवरात्री.

शिवा- सं० ना० कोल्हा.

शिंशिपा- सं० ना० सीतापळीवृक्ष.

शिशु- सं० ना० लेंकरूं.

शिश्नोदरपरायण- सं० वि० आहार मैथुन परायण.

शिष्टागम- सं० ना० शिष्टाचार.

शिळु- सं० अप० ना० शील म्ह० स्वभाव

शिळा- सं० अप० ना० धोंड अ० दगड.

शिळाराशी- सं० अप० ना० पर्वत.

शिळोच्चय- सं० ना० पर्वत.

शीत- सं० ना० थंडी - २ वि० थंड.

शीतकर- सं० ना० चंद्र.

शीतभानु- सं० ना० चंद्र.

शीतवास- सं० ना० शीतकाळींपाण्यांतउभेराहाणें.

शील- सं० ना० स्वभाव.

शीलवृत्ति- सं० ना० धन्यानेंशेतांतील धान्यनेल्यावरपडलेलेदाणेंजमाकरून निर्वाहकरणें अशी जी वृत्ति तिचें नाव.

शुक- सं० ना० १ रांवा अथवा राघु - २ व्यासपुत्र.

शुक्ति- सं० ना० मोतशिंपला.

शुक्तिका- सं० ना० शुक्ति.

शुक्र- सं० ना० १ शुक्राचार्य - २ रेत.

शुक्लि सं० ना० रेत.

शुचि- सं० ना० १ आषाढमास - २ शृंगार - ३ वि० पवित्र अ० शुध्य.

शुध्यअपरोक्ष- सं० वि० स्वप्रकाश अपरोक्ष.

शुध्यउपदेश- सं० ना० जीवेशलक्ष्य ब्रम्ह प्रत्यगात्मा ह्यांचे ऐक्याचा उपदेश तो.

शुध्यचैतन्य- सं० ना० मुख्यचैतन्य म्ह० ब्रम्हचैतन्य.

शुध्यस्वरूप- सं० ना० प्रत्यगात्मा ब्रम्ह.

शुध्यज्ञान- सं० ना० स्वप्रकाशअपरोक्षस्वरूपज्ञान.

शुनक- सं० ना० कुत्रें.

शुनें- सं० अप० ना० शुनक अ० कुत्रें.

शुभ- प्रा० वि० बुध्धिहीन - दा० द० २ स० २ ओ० २९.

शुभा- सं० ना० गोंवऱ्या - दा० द० ६ स० ९ ओ० ७.

शुभेच्छा- सं० ना० ज्ञानीजीवाच्या- सप्तभूमिकांतील पहिलीभूमिका - जि

ऱ्यायोगानें जीवास अनुतापउत्पन्न होऊन साधनचतुष्टय संपन्नता येते व गुरुपदेशास पात्रता प्राप्त होते.
**शुभ्रांशु**- सं॰ ना॰ चंद्र.
**शुशुप्ति**- सं॰ अप॰ ना॰ सुषुप्ति म्ह॰ झोंप.
**शुश्रुषा**- सं॰ ना॰ सेवा- परिचर्या.
**शूकर**- सं॰ अप॰ ना॰ सूकर म्हणजे डुकर.
**शूद्र**- सं॰ ना॰ चत्वार वर्णांतील चौथा वर्ण तो.
**शून्य**- सं॰ ना॰ १ माया- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ २७- २ वि॰ निराकार अ॰ निरवयव- ज्ञा॰ अ॰ ८ ओं॰ १६.
**शून्यवादी**- सं॰ ना॰ १ नास्तिकपुरुष- २ वि॰ नास्तिक.
**शून्यबीज**- सं॰ ना॰ माया.
**शून्यसिध्दांत**- सं॰ ना॰ पदार्थमात्र नाशिवंत म्हणून हे मृगजलवत् दिसले तरी नाहींतच- आणि ब्रम्ह ही असतें तर प्रत्ययास येतें- जें जेव्हां प्रत्ययास येत नाहीं तेव्हां तें ही नाहीं- तर जें नाहीं तेंच ब्रम्ह असा जो सिध्दांत तो.
**शूलपाणि**- सं॰ ना॰ महादेव.
**शूळपाणि**- सं॰ अप॰ ना॰ महादेव.
**शृंगार**- सं॰ ना॰ भूषण.
**शृगाळ**- सं॰ अप॰ ना॰ कोल्हा.
**शृजणें**- सं॰ अप॰ धा॰ ना॰ सृजणें म्ह॰ निर्माण करणें.

**शेरवी**- प्रा॰ क्रि॰ अव्य॰ शेवटीं- चा॰ ओ॰ २२९३.
**शेली**- सं॰ ना॰ गळा.
**शेवडी**- प्रा॰ ना॰ चर्म- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ १९२.
**शेषकन्या**- सं॰ ना॰ सुलोचना इंद्रजीत स्त्री.
**शैल**- सं॰ ना॰ पर्वत.
**शैल्य**- सं॰ अप॰ ना॰ मद्रदेशाधिपति शल्य राजा- शल्य म्ह॰ सलणी- भा॰ अ॰ २३ ओ॰ ५९.
**शोकणें**- सं॰ अप॰ धा॰ ना॰ शोषणें.
**शोकनिवृत्ति**- सं॰ ना॰ शोकभंग.
**शोकभंग**- सं॰ ना॰ जीवास सप्त अवस्था आहेत त्यांतली साहावी- शोकापगमन अवस्था.
**शोच्य**- सं॰ वि॰ १ शोकाकुलित- २ अयोग्य- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ९१.
**शोच्यता**- सं॰ ना॰ १ शोकाकुलता २ अयोग्यता- ज्ञा॰ अ॰ १॰ ओ॰ १८१- १८२.
**शोण**- सं॰ वि॰ रक्तवर्ण- अ॰ तांबडें.
**शोणित**- सं॰ ना॰ रक्त.
**शौरी**- सं॰ ना॰ कृष्ण.
**श्रध्दा**- सं॰ ना॰ शमादिषट्कसंपत्तिचें पांचवें अंग- म्ह॰ गुरुवेदांतवाक्यावर विश्वास त्याचें नाव.
**श्रध्दापत्नि**- सं॰ ना॰ धर्मपत्नि.

श्रवण- सं॰ ना॰ ऐकणें १कान-२ ज्ञानाधिकाऱ्याचें नवार साधनांतील पहिलें साधन·
श्रवणभक्ति- सं॰ ना॰ उपासनामार्गांतील नवविधभक्तीरूपसाधनाचें पहिलें अंग·
श्रांतु- सं॰ अप॰ वि॰ १ श्रमलेला-२ ना॰ विश्रांति-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ४·
श्राप- सं॰ अप॰ ना॰ शाप म्ह॰ अमंगल भाषण·
श्रावणारि- सं॰ ना॰ दशरथराजा·
श्री- सं॰ ना॰ १ लक्ष्मी-२ संपत्ति·
श्रीकंठ- सं॰ ना॰ महादेव·
श्रीद- सं॰ ना॰ कुबेर·
श्रीमदु- सं॰ अप॰ ना॰ श्रीमद-ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ३२८·
श्रीया- सं॰ अप॰ ना॰ कमल-ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ १९९-२००·
श्रीयेसाररिवया- सं॰ अप॰ ना॰ अष्टमहासिध्धि-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ३१२
श्रीवल्लभ- सं॰ ना॰ विष्णु·
श्रीहट- सं॰ ना॰ ब्रम्हरंध्र अ॰ सहस्रदल कमल म्हणून योगशास्त्रोक्तस्थान·
श्रुताधित- सं॰ वि॰ बहुश्रुतवपढीक·
श्रुति- सं॰ ना॰ १ कान २ भगवंताच्या मुखापासूननिघालेलीवेदश्रुतवाणीती श्रुतहोतांचलिहिली त्यालेखाचें नाव·
श्रेणी- सं॰ ना॰ पंक्ति·

श्रेणवी- प्रा॰ ना॰ निशाण-ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ३२८·
श्रोणित- सं॰ अप॰ ना॰ शोणित म्हण॰ रक्त-प॰ प्र॰ ५ ओ॰ १८·
श्रोता- सं॰ ना॰ श्रवणकर्ता·
श्रोत्र- सं॰ ना॰ पंचज्ञानेंद्रियांतील श्रवणनामक पहिलें इंद्रिय·
श्रोत्री- सं॰ ना॰ १ अग्निहोत्री-२ अक्षामहतपुरुष·
श्रौत- सं॰ ना॰ श्रौताग्निविधान·
श्रौतसमो- सं॰ अप॰ ना॰ श्रुतीसमूह·
श्लाघेजता- सं॰ अप॰ ना॰ श्लाघ्यता-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ५८·
श्लाघ्य- सं॰ वि॰ योग्य·
श्लेष्मा- सं॰ ना॰ कफ·
श्व- सं॰ ना॰ कुत्रा·
श्वपच- सं॰ ना॰ अंत्यज·
श्वपाक- सं॰ ना॰ अंत्यज·
श्ववृत्ति- सं॰ ना॰ नीचसेवाकरून निर्वाहकरणें ती वृत्ति·
श्वसन- सं॰ ना॰ वायु·
श्वा- सं॰ ना॰ कुत्रा·
श्वान- सं॰ ना॰ कुत्रा·
श्वित्र- सं॰ ना॰ कुष्ट अ॰ कोड·
श्वेत- सं॰ वि॰ पांढरें-सत्व·
श्वेतु- सं॰ अप॰ ना॰ सेतु म्ह॰ पूल·
श्वेतवाह- सं॰ ना॰ अर्जुन·
श्वेतवाहन- सं॰ ना॰ अर्जुन·

षट्कर्म- सं॰ना॰१ यजन २ याजन- ३ अध्ययन-४ अध्यापन-५ दान- ६ प्रतिग्रह- यासाहांचा समुच्चयतें

षट्चक्र- सं॰ना॰१ मूलाधार-२स्वाधिष्ठान-३ मणिपुर ४ अनाहत ५ विशुध्य ६ आज्ञा अ॰ अग्निचक्र-यासाहांचा समुच्चय याचें नाव-

षट्दर्शन- सं॰ना॰१ सौर-२शाक्त गाणपत्य-३ शैव-४ वैष्णव ५ स्कांद- यासाहांचें नाव:

षट्पद- सं॰ना॰भ्रमर-

षट्प्रमाण- सं॰ना॰ जीव आणि अंतःकरण पंचक मिळून जें षट्क त्याचें नाव

षट्शास्त्र- सं॰ना॰१ छंद-२ निरुक्त ३ व्याकरण-४ ज्योतिष-५ शिक्षा-६ कल्पसूत्र-यासाहांचें नाव-

षडानन- सं॰ना॰ कार्तिकस्वामी

षडास्य- सं॰ना॰ षडानन

षडूर्मी- सं॰ना॰१ जन्म २ मरण- ३ क्षुधा ४ तृषा ५ शोक ६ मोह- यासाहांचें नाव-

षड्गुणैश्वर्य- सं॰ना॰१ ज्ञान-२ वैराग्य-३ ऐश्वर्य-४ यश-५ कीर्ति ६ औदार्य- यासाहांचें नाव-

षड्भावविकार- सं॰ना॰ षड्विकार.

षड्रस- सं॰ना॰१ कडू-२ आंबट-३ खारट-४ तुरट-५ तिखट आणि ६ मधुर- यांचें नाव-

षड्विकार- सं॰ना॰१ उत्पन्न होणें- २ आहे सें दिसणें-३ वाढणें-४ परिणामास पावणें-५ क्षीण होणें-६ मरणें- असें देहास साहा विकार ते

षण्मुख- सं॰ना॰ कार्तिकेय-

षण्मुखी- सं॰ना॰ २ कानाचीं छिद्रें-२ डोळे-२ नाकपुड्या मिळून साहा अंगुष्ठादिकांनी दाबून जी मुद्रा लावणें तिचें नाव-

# स

सकट- प्रा॰ग्रा॰अव्य॰१ बरोबर २ सुध्धां-

संकट- सं॰ना॰१ अडचण-२ कोडें-३ अरिष्ट-

संकल्प- सं॰ना॰१ कल्पना-२ निर्धार-३ जीवसहित मन अ॰ बुध्धि-

संकल्पविहंग- सं॰ना॰ मनोविहंग म्ह॰ मनोरूपपक्षी- ज्ञा॰ अ॰८ ओ॰ ३४-

संकलित- सं॰अप॰अव्य॰ संकलित म्ह॰ संक्षेपतः

सकुली- सं॰अप॰ना॰ शष्कुली म्ह॰ करंजी भा॰७,॰२७ ओ॰२९०

संकेतकुंज- सं॰ना॰ क्रीडास्थान

संकोचित- सं॰अप॰ वि॰ संकुचित म्ह॰ अडचणीचें-

सख- सं॰ ना॰ सखा अ॰ मित्र.
सखोल- प्रा॰ वि॰ १ अतिशयखोल- गंभीर.
सख्य- सं॰ ना॰ सुध्ध.
सख्यभक्ति- सं॰ ना॰ उपासना मार्गी तीलनवविधभक्ति रूपसाधनाचें आठवें अंग.
संख्या- सं॰ ना॰ गणना.
संख्या- प्रा॰ अव्य॰ निश्चयें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १६२.
संख्यावान्- सं॰ वि॰ विद्वान.
सगट- प्रा॰ शद्ब॰ अव्य॰ सारखें.
सगर्भप्राणायाम- सं॰ ना॰ प्रणव युक्तप्राणायाम.
संगीन- प्रा॰ वि॰ यथास्थित- दा॰ द॰ ११ स॰ ओ॰ २५.
सगुणब्रम्ह- सं॰ ना॰ शबल ब्रम्ह- अ॰ मायीक ब्रम्ह.
सगुण साक्षात्कार- सं॰ ना॰ १ शिव विष्णु यादिरूप होणें- २ शिवविष्णवादि दृष्टीसपडणें त्याचें नाव.
सर्ग- सं॰ ना॰ उत्पत्ति.
संघ- प्रा॰ ना॰ समुदाय.
संघाट- प्रा॰ ना॰ समुदाय- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ७४- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३९४.
संघात- प्रा॰ ना॰ समुदाय- वा॰ ओ॰ ५८५
संचणें- प्रा॰ धा॰ ना॰ असणें- भा॰ अ॰ १ ओ॰ ९९.
संचरणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ १ अंगीं भरणें- २ अंगींशिरणें- भा॰ अ॰ ८ ओ॰ ७१.
संचार- सं॰ ना॰ १ फिरणें- पर्यटन २ बाधा.
संचारु- सं॰ अप॰ ना॰ १ फिरणें- २ बाधा अथवा पीडा- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ २१७.
संचित- सं॰ वि॰ सांचलेलें.
संचितकर्म- सं॰ ना॰ अनंत जन्मींचें सांचलेलें कर्म तें.
सच्चिदानंद- सं॰ वि॰ सत्य- ज्ञान घन व आनंदरूप.
सच्चिदानंदतनु- सं॰ ना॰ सच्चिदानंदविग्रह.
सचिव- सं॰ ना॰ प्रधान.
सजातीयभेदरहित- सं॰ वि॰ वृक्षास दुसरा वृक्ष सजातीयभेद आहे- तसें सच्चिदानंद ब्रम्हासारखें दुसरें ब्रम्ह नाहीं म्हणून भेद तेथे नाहीं.
संजोगणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ १ संयोगणें अ॰ जुंपणें- २ सिध्धकरणें भा॰ अ॰ ३॰ ओ॰ ९३
संटणें- प्रा॰ धा॰ ना॰ १ सोडणें- अमृ॰ प्र॰ ८ ओ॰ ४- २ सांठवणें भा॰ अ॰ १४ ओ॰ ३२६
सटवणें- प्रा॰ धा॰ ना॰ क्षयपावणें अ॰ पतन पावणें- दा॰ द॰ ५ स॰ २- ओ॰ ६०.
सटी- सं॰ अप॰ ना॰ उपजल्याची

जीषष्ठीतिथीती अथवा तत्संबंधीएक क्षुद्रदेवता मानिताततीं दा० द० १४ स० १ ओ० ५३.

**सडक**— प्रा० ना० वस्त्रानापदर—२सुगमपंथ

**सडें**— प्रा० वि० संगरहित-ज्ञा० अ० ७ ओ० १३०.

**सदळ**— प्रा० वि० उदार.

**सणाणें**— प्रा० वि० तीव्र-ज्ञा० अ० १५ ओ० २५९.

**सत्**— सं० वि० त्रिकालाबाधित म्ह० जेंजगेदुत्पत्तिपूर्वींहोतें- जग असतानां आहे व जगलय पावलें तरी असणार एवंच असें जें तिहीं काळीं अबाधित तें ब्रम्ह.

**संत**— सं० ना० ब्रम्हस्वरूपचळतनाहीं ढळतनाहीं आहे तसेंच सर्वकाळआहे असा स्वात्मत्वेंकरून दृढानुभवज्या संतांपुरुष.

**सततिसावें**— प्रा० सं० वि० छत्तीसतत्वांस आधारभूततें ब्रम्ह-ज्ञा० अ० ११ ओ० ३०९.

**संतान**— सं० ना० मूललेंकरूं-२ वंश ३ वृक्ष.

**सतिक**— सं० अप० ना० सत्यत्व-ज्ञा० अ० १५ ओ० २२३.

**सती**— सं० ना० पार्वती-२ वि० पतिव्रता.

**सतु**— सं० अप० वि० सत्-अमृ० अ० ६ ओ० ३१.

**संतोखु**— सं० अप० ना० संतोख म्ह० संतोष-भा० अ० १ ओ० १०१.

**सत्ता**— सं० ना० सद्रूपत्व अ० आहेपणा.

**सत्यदर्शी**— सं० ना० ब्रम्हतत्वदर्शी म्ह० ब्रम्हतत्वस्वात्मत्वेंकरून अवलोकनकरणारापुरुष.

**सत्यप**— सं० ना० ब्रम्हदेव.

**सत्यपांड**— सं० ना० ब्रम्हांड.

**सत्यलोक**— सं० ना० ब्रम्हलोक.

**सत्यलोकनाथ**— सं० ना० ब्रम्हदेव.

**सत्यवतीकुमर**— सं० अप० ना० कृष्णाद्वैपायन नामाव्यास.

**सत्यवतीहृदयरत्न**— सं० ना० सत्यवतीकुमर.

**सत्या**— सं० ना० सत्यभामा.

**सत्यापति**— सं० ना० कृष्ण.

**सत्राण**— सं० ना० बल- रुक्मि० अ० ११ ओ० ४१-२ वि० थोर-ज्ञा० अ० १५ ओ० १८३-३ अव्य० सवेग-भा० अ० २ ओ० १५०.

**सत्व**— सं० ना० १ सार-२ वि० सूक्ष्म-ज्ञा० अ० ७ ओ० ३५.

**सत्वगुण**— सं० ना० त्रिगुणांतीलऊर्ध्वगतीदातागुणतो.

**सत्वापत्ति**— सं० ना० ज्ञानी जीवाच्या सप्तभूमिकांतील चौथी भूमिकातिचें नाव.

**सद**- स॰ ना॰ सभा·

**सद्ट**- प्रा॰ वि॰ १ मोठें-दा॰ द॰ १ स॰ २ ओ॰ ५-२ भारी· भा॰ अ॰ ३ ओ॰ ३३६

**सदन**- सं॰ ना॰ घर-उ॰ प्रल्हाद बोले सदन त्यजावें ॥

**सदसुख**- सं॰ अप॰ अव्य॰ सत्सुख

**संदिसें**- प्रा॰ अ॰ चुकतें-दा॰ द॰ २ स॰ ३ ओ॰ २९-वा॰ ओ॰ २६३२·

**संदु**- प्रा॰ ना॰ छंद· ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ७४ भा॰ अ॰ ११ ओ॰ २१२·

**संदेह**- सं॰ ना॰ संशय·

**सद्गुरु**- सं॰ ना॰ श्रीगुरु म्ह॰ आत्मज्ञान समर्थ सनातन तो·

**सद्म**- सं॰ ना॰ घर·

**सद्यःप्रतीति**- सं॰ ना॰ मेल्यावांचून स्वर्गाची प्रतीति नाहीं· तसेंब्रम्हसुख अ॰ मोक्ष यास मरणें नको· याच देहीं याच डोळां प्रतिती आहे तिचें नाव·

**सधर**- सं॰ वि॰ आश्रययुक्त-ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ७६· अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ १

**सनकादिक**- सं॰ ना॰ १ सनक-२ सनंदन-३ सनत्सुजात-४ सनत्कुमार-असे ब्रम्हदेवाचे चौघे मानसपुत्र ते·

**सनातन**- सं॰ वि॰ शाश्वत-नित्य·

**सनोळख**- प्रा॰ वि॰ ओळखीचें·

**सन्निध**- सं॰ श॰ अ॰ १ जवळ-२ विसिध्ध·

**सन्यास**- सं॰ ना॰ चतुर्थाश्रम·

**सन्यासी**- सं॰ ना॰ सकल त्याग उत्तम प्रकारचा करून सिध्ध झालेला असा चत्वार आश्रमांतील चतुर्थाश्रमध रतो·

**सपत्न**- सं॰ ना॰ शत्रु·

**सपाई**- प्रा॰ वि॰ पच्चपावल-अ॰ संपूर्ण· ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ १०९९-ज्ञा॰-अ॰ १४ ओ॰ ६१·

**सपाखर**- प्रा॰ वि॰ सरूप·

**सपातळ**- प्रा॰ ना॰ पडदा-ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ११४·

**संपादणी**- सं॰ अप॰ ना॰ मिळवणी अ॰ बनावणी·

**सपिळी**- प्रा॰ वि॰ समूळ· ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ७६८-

**सपुर**- प्रा॰ वि॰ बारीक-ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ६·

**सपूरण**- प्रा॰ वि॰ बारीक-ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १६

**सपोस**- सं॰ अप॰ वि॰ पुष्ट-भा॰ अ॰ ३ ओ॰ ६७८·

**सपोष**- सं॰ अप॰ वि॰ पुष्ट-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ४४२-४४३·

**सप्तकंचुकब्रम्हांड**- सं॰ ना॰ ५ मूळपंचतत्वें-१ अहंकार-१ महत्तत्व मिळून सातकंचुकयुक्त त्रैलोक्य तें·

**सप्तकर**- सं॰ ना॰ अग्नि·

**सप्तकरनेत्र**- सं॰ ना॰ अग्निनेत्र म्ह॰ शिव·

**सप्तचैतन्य**- सं॰ ना॰ १ मुख्यचें

तन्य अ॰ ब्रम्हचैतन्य-२ ईशचैतन्य-३ जीवचैतन्य-४ प्रमाणचैतन्य-५ प्रमातृचैतन्य-६ प्रमेयचैतन्य-७ फलचैतन्य-यांतमुख्यचैतन्यशाश्वत बाकी साहामायीक आहेत.

**सप्तजिव्ह** सं॰ना॰ अग्नि.

**सप्तद्वीपपृथ्वी**-सं॰ना॰ १ जंबुद्वीप-२ पूक्षद्वीप-३ शाल्मलद्वीप-४ कुशद्वीप-५ क्रौंचद्वीप-६ शाकद्वीप-७ पुष्करद्वीप- हीं सप्त द्वीपें मिळून पृथ्वी ती.

**सप्तधातु**-सं॰ना॰ १ अस्थि-२ नाडी-३ मज्जा-४ मांस-५ त्वचा-६ रक्त आणि-७ नखव केश मिळून याप्रमाणें देहाच्या सप्त धातु किंवा सप्तकोश समजावे

**सप्तपाताळ**-सं॰अप॰ना॰ १ अतल-२ वितल-३ सुतल-४ तलातल-५ महातल-६ रसातल-७ आणि पाताल.

**सप्तभूमिका**-सं॰ना॰ ज्ञानीजीवाच्या सात भूमिका त्यांचीं नावें-१ शुभेच्छा-२ विचारणा-३ तनुमानसा-४ सत्वापत्ति-५ असंसक्ति-६ पदार्थाभाविनी-७ तूर्यावगाहिनी.

**सप्तव्यसनें**-सं॰अप॰ना॰ सप्त व्यसन यांचीं नावें-१ जारण-२ मारण-३ विध्वंसन-४ वशीकरण-५ स्तंभन-६ मोहन-७ उच्चाटन- अशीं सात व्यसनें.

**सप्तसागर**-सं॰ना॰ क्षारसमुद्र-२ क्षीरसमुद्र-३ सुरासमुद्र-४ घृतसमुद्र-५ दधीसमुद्र-६ इक्षुरससमुद्र-७ शुध्धजल समुद्र असे सात समुद्र एकेक द्वीपा भोंवते आहेत ते

**सप्तस्कंध**-सं॰ना॰ १ अवास्कंध २ प्रवस्कंध ३ उद्वस्कंध ४ सद्वस्कंध ५ विवस्कंध ६ परास्कंध ७ परिवाहकस्कंध असे एकावर एक सात स्कंध ते.

**सप्तस्वर्ग**-सं॰ना॰ १ भूलोक-२ भुवर्लोक-३ स्वर्लोक-४ महर्लोक-५ जनोलोक-६ तपोलोक-७ सत्यलोक असे सप्तस्वर्ग.

**सप्तावस्था**-सं॰ना॰ १ अज्ञान २ आवरण-३ विक्षेप ४ परोक्षज्ञान ५ अपरोक्षज्ञान-६ शोकभंग ७ निरंकुशातृप्ति- याप्रमाणें जीवास सप्तावस्था आहेतत्या.

**संप्रज्ञात**-सं॰वि॰ सविकल्प.

**संप्रज्ञातसमाधि**-सं॰ना॰ सविकल्पसमाधि.

**संबंध**-सं॰ना॰ साध्यसाधकरूप जोयोगतो.

**संबंधु**-सं॰अप॰ना॰ गुरुशिष्यादिसंवाद-ज्ञा॰अ॰११ ओ॰३७०

**सबराभरीत**-सं॰अप॰वि॰ सबाह्याभ्यंतरित म्हणजे व्यापक-वा॰ ओ॰५२०७.

**सबळ**- सं० अप० वि० शबल म्ह० औ पाधिक-अ० मायीक.
**सबाह्य**- सं० अप० वि० अंतर्बाह्य.
**संबोखणें**- प्रा० धा० ना० समजावणें आ० पं० १२ स० ४ ओ० ३०.
**सबोव**- प्रा० वि० सुशोभित- ज्ञा० अ १५ ओ. १८७.
**संभव**- सं० ना० उत्पत्ति.
**संभ्रम**- सं० ना० वैभव.
**संभावना**- सं० ना० १ संभव- २ यो ग्यता- ज्ञा० अ० ११ ओ० १३.
**संभावनीय**- सं० वि० संभवायास योग्य.
**संभूति**- सं० ना० उत्पत्ति- ज्ञा० अ० ९ ओ० १२२.
**सम**- सं० वि० १ समान- २ ना० ब्रह्म- ज्ञा० अ० ६ ओ० ५३.
**समता**- सं० ना० समानता- अ० ब्रह्म रूपता- ज्ञा० अ० ५ ओ० ८८.
**संमति**- सं० ना० अनुमोदन- उ० ना नाग्रंथाच्या संमति॥ उपनिषदें वेदांतश्रु ति॥
**समर्थ**- सं० वि० शक्तिमान्.
**समर्थणें**- सं० अप० धा० ना० बोलणें ज्ञा० अ० ९ ओ० ४८५.
**समर्थवणें**- सं० अप० धा० ना० प्रतिपाद णें- ज्ञा० अ० ९ ओ० ४८२.
**समंधु**- सं० अप० ना० संबंध- भा० अ० १ ओ० ११.
**समर**- सं० ना० युध्य.
**समरस**- सं० ना० ब्रम्हस्वरूप.
**समरसणें**- सं० अप० धा० ना० मि ळूनजाणें- भा० अ० २ ओ० ३९१.
**समवाय**- सं० ना० १ कारणतंतु- ज्ञा० अ० ९ ओ० १०६- २ व्यापकता- ज्ञा० अ० ९ ओ० ३४४- ३ समुदाय अ० स मूह.
**समवाव**- सं० अप० ना० समवाय अ० समुदाय- ज्ञा० अ० १२ ओ० १७४
**समसमील**- प्रा० अव्य० बरोबरी. ज्ञा० अ० ११ ओ० ४२१.
**समष्टि**- सं० ना० ब्रम्हांड.
**समस्या**- सं० ना० आकांक्षा- शंका
**समस्या**- प्रा० ना० शक्ति- ज्ञा० अ० ११ ओ० १२.
**समाकुळ**- सं० अप० वि० व्याप्त- ज्ञा० अ० ११ ओ० ३१५.
**समाज**- सं० ना० १ समुदाय २ स भा- ज्ञा० अ० ९ ओ० २
**समाधान**- सं० ना० चित्तैकाग्रता शमादिषट्कसंपत्तींतील साहावें अं ग.
**समाधि**- सं० ना० वृत्तीला स्वात्मलें करून स्वरूपज्ञानहोऊन जो स्थिराउ परम त्याचें नाव.
**समान**- सं० ना० १ नाभिस्थानस्थित सकलसंधींस हलविणारापंचप्राणांती ल दुसरावायु- २ शब्द० अव्य० सारखें.

**समास**- सं॰ ना॰ अव्ययीभाव- तत्पु रुष- कर्मधारय- बहुव्रीही- आणि द्वंद्व असे प्रत्येकले.

**समित्**- सं॰ ना॰ समिध.

**समिद्ध**- सं॰ धा॰ वि॰ पेटलेलें.

**समीपता**- सं॰ ना॰ सानिध्य.

**समीपतामुक्ति**- सं॰ ना॰ चतुर्विधमु क्तिंमधीलदुसरी मुक्ति.

**समीर**- सं॰ ना॰ वायु.

**समुध्धर्ता**- सं॰ ना॰ उध्धारकर्ता.

**समुदावो**- सं॰ अप॰ ना॰ समुदाय- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २११.

**समो**- सं॰ अप॰ ना॰ १ समूह- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ २६०- अमृ॰ प्र॰ ९ ओ॰ ६९- २ स मय- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २९४- २९५

**संमोह**- सं॰ ना॰ अतिभ्रांति- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ७७.

**सम्यक**- सं॰ वि॰ चांगलें.

**सम्यकु**- सं॰ अप॰ वि॰ सम्यक.

**संयति**- सं॰ ना॰ नेम. ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ १२७.

**संयमनी**- सं॰ ना॰ यमनगरी.

**सर**- सं॰ ना॰ सरोवर.

**सरकाळें**- प्रा॰ ना॰ कड ज्याचें तांटा चा मुळाकडील भाग.

**सरघा**- सं॰ ना॰ मधमाशी.

**सरणें**- प्रा॰ धा॰ ना॰ १ खपणें- सरू न जाणें- २ सरसावणें अ॰ पुढें होणें- अ मृ॰ प्र॰ ६ ओ॰ १८- ३ मनांतपेणें- ज्ञा॰ अ॰ २ ओ॰ २१०.

**सरता**- प्रा॰ अ॰ १ रुलरूल- २ वंद्य- भा॰ अ॰ १ ओ॰ १७६- ३ पुढारी- भा॰ अ॰ २५ ओ॰ १४.

**सरसगट**- प्रा॰ वि॰ मिश्रित.

**सरसिज**- सं॰ ना॰ कमल.

**सरसिजोद्भव**- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.

**सरसिजोद्भवकुमरी**- सं॰ अप॰ ना॰ सरस्वती.

**सरळी**- सं॰ अप॰ ना॰ मोकळीक- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ २२८.

**सरिला**- सं॰ ना॰ नदी.

**सरिसें**- प्रा॰ श॰ अव्य॰ सारखें- ब रोबर- विवे॰ पू॰ प्र॰ ७ ओ॰ २६.

**सरिसेपण**- प्रा॰ ना॰ सारखेपण- २ व्यापकपण- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ २०

**सरी**- प्रा॰ ना॰ १ बरोबरी- २ उपमा दा॰ द॰ १ स॰ ९ ओ॰ २३.

**सरूपवासनाक्षय**- सं॰ ना॰ स विकल्पजीवन्मुक्ति.

**सरोक**- प्रा॰ वि॰ बिनकीड- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ९८.

**सरोरव**- सं॰ अप॰ क्रि॰ वि॰ सरोष अ॰ सक्रोध- ज्ञा॰ अ॰ २ ओ॰ ८८.

**सरोज**- सं॰ ना॰ कमल.

**सरोत्तर**- सं॰ अप॰ क्रि॰ अव्य॰ बरोबरीनें.

**सरोभरी**- प्रा॰ ना॰ आदर- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २८-

**सलगी**- प्रा० ना० १ संगति- भा० अ० ६ ओ० ३४६-२ बरोबरी- भा० अ० ६ ओ० ३४८-३ अतिपरिचय- उ० तुम्हा संतां चोसीसलगी॥ म्हणोनि करितों-

**सलिल**- सं० ना० पाणी.

**सलिलराशी**- सं० ना० समुद्र.

**सलिली**- सं० अप० ना० पाणी-

**सलेप**- सं० अप० वि० मलिन- ज्ञा० अ० ११ ओ० २९१-२९२.

**सलोकतामुक्ति**- सं० ना० उपास्यदेवतेच्या लोकीं राहाणें जें त्यामुक्तिचें नाव.

**संवगडे**- प्रा० ना० सोबती.

**संवगण**- प्रा० ना० धान्यजमाबंदी- ज्ञा० अ० १३ ओ० ३८.

**संवगणी**- प्रा० ना० संवगण.

**संवचोर**- प्रा० ना० १ सोबतचोर- २ सावचोर- भा० अ० १३ ओ० १२६.

**सवडी**- प्रा० ना० शेवट- ज्ञा० अ० १० ओ० ६०

**सवतें**- प्रा० ना० १ सार्थक- ज्ञा० अ० १३ ओ० ५०२- २ वि० निराळें-

**संवसाट**- प्रा० ना० सद्भाव- भा० अ० ८ ओ० २४८.

**संवसाटी**- प्रा० ना० बरोबरी- भा० अ० ११ ओ० ६७०.

**संवसारें**- प्रा० शा० अव्य० बरोबर- ज्ञा० अ० १५ ओ० १८१.

**सर्वगत**- सं० वि० व्यापक.

**सर्वस्व**- सं० वि० १ संपूर्ण- २ ना० मन ज्ञा० अ० १३ ओ० ३३१.

**सर्वज्ञ**- सं० वि० १ महान् ज्ञानी- २ ना० ईश्वर.

**सव्यसाची**- सं० ना० अर्जुन.

**सवा**- प्रा० धा० अव्य० १ घेतां- अथः घेत असतां- ज्ञा० अ० ६ ओ० ५०- २ ना० कांठ अ० किनारा- तीर- भा० अ० २० ओ० १७९.

**संवाद**- सं० ना० वादरहितभाषण.

**संवादिभ्रम**- सं० ना० भ्रम व्हावा परंतु त्यांत लाभ असावा त्याचें नाव.

**संवाहन**- सं० ना० आरोहण- ज्ञा० अ० १७ ओ० ३८.

**सविता**- सं० ना० सूर्य.

**संवित्ती**- सं० ना० ज्ञान.

**सविया**- सं० अप० अव्य० सहज ज्ञा० अ० ५ ओ० ७- अमृ० प्र० ६ ओ० ७५.

**संवे**- प्रा० ना० संवय- भा० अ० ६ ओ० ३४४- दा० द० ६ स० २ ओ० २०

**सवें**- प्रा० शा० अव्य० १ समागमें- अमृ० प्र० २ ओ० ८- २ अव्य० तत्क्षणीं- दा० द० ३ स० १ ओ० ४८

**सवेशा**- सं० अप० ना० स्वइच्छा- ज्ञा० अ० ५ ओ० १३.

**सवेळ**- प्रा० ना० प्रातःकाल- ज्ञा० अ० १६ ओ० ३.

**सवेळे**- प्रा० अ० तत्काळ- ज्ञा० अ० १३ ओ० ७७१-

संश्लिष्टता- सं० ना० अभ्यासाच्याचा रभूमिकांतील तिसरीभूमिका·
सर्षप- सं० ना० मोहरी·
संसर्ग- सं० ना० सांनिध्य- आ० पं० ७ स० २ ओ० ३·
ससाणें- प्रा० वि० लखलखीत- भा० अ० १२ ओ० ५८२·
संसार- सं० ना० १ प्रपंच- २ विस्तार- ज्ञा० अ० ५ ओ० ५४- ३ लोक- ज्ञा० अ० ५ ओ० ९९·
संसृति- सं० ना० जन्ममरण·
संस्था- सं० ना० निर्णय- ज्ञा० अ० ५ ओ० २६·
सस्मित- सं० वि० विकसित·
सस्य- सं० ना० धान्य·
सस्यांत- सं० ना० शिशिरऋतूचा अंत- ज्ञा० अ० १४ ओ० ३५१
सहजसमाधि- सं० ना० ध्यानिस विकल्प असो कीं निर्विकल्प असो- परंतु उभयकाळीं ही जें एकसारखें समाधान त्याचें नाव·
सहसा- सं० अ० एकाएकी·
सहस्कंध- सं० ना० ज्याचीमर्यादा चंद्रमंडळापासून नक्षत्रमंडळापावेतों आहे असा जो सप्तस्कंधांतील चौथा स्कंध तो·
सहस्रकर- सं० ना० सूर्य·
सहस्रदल- सं० ना० ब्रम्हरंध्र·
सहस्रनयन- सं० ना० इंद्र·
सहस्रमुख- सं० ना० शेष·
सहिष्णा- सं० अप० वि० सहिष्णु म्ह० सहनशील·
सळ- सं० अप० ना० छल अ० वैर·
सळ- प्रा० ना० १ आग्रह अ० अभिमान- ज्ञा० अ० १६ ओ० ४५३-४५४· २ घडिमोड- दा० द० ३ स० ५ ओ० ४१
सळणी- सं० अप० ना० छळण·
सळा- सं० अप० ना० छल·
सळु- प्रा० ना० १ आग्रह- ज्ञा० अ० १५ ओ० ३०२- २ बळ- ज्ञा० अ० १० ओ० २६८- २६९- अमृ० प्र० ५ ओ० ६३ ३ न्यूनत्व- ज्ञा० अ० ५ ओ० ७८- अमृ० प्र० ७ ओ० २६१- ४ वि० वाईट ज्ञा० अ० ७ ओ० १६८·
संक्षेप- सं० वि० अविस्तृत·
संज्ञा- सं० ना० १ खूण- २ आज्ञा- ज्ञा० अ० ९ ओ० ३६

## सा

साइकडे- प्रा० ना० साइखडें
साइखडें- प्रा० ना० खांबसूत्र अ० कळसाहुली- ज्ञा० अ० ९ ओ० ३०- ज्ञा० अ० १३ ओ० ३००
साइपण- प्रा० अव्य० स्वतः अमृ० प्र० ७ ओ० ७९
साउमा- प्रा० शा० अव्य० समोर- ज्ञा० अ० १६ ओ० ६२- सदा० ओ० ३७

भा० अ० २ ओ० ११८.

**साउली**- सं० अप० ना० १ छाया-२ प्रतिबिंब- ज्ञा० अ० ८ ओ० १३८.

**साऊळ**- प्रा० ना० पांढरेपण- ज्ञा० अ० १३ ओ० ७५९.

**सांकड**- प्रा० ना० १ अडचण-२ संकोच- ज्ञा० अ० ११ ओ० ८०-३ वि० कठिण-४ संकोचित अ० अल्प- ज्ञा० अ० १४ ओ० ९६३- ज्ञा० अ० ११ ओ० ३०.

**सांकडणें**- प्रा० धा० ना० अवघडणें-

**सांकडी**- प्रा० ना० १ अडचण-२ दुर्लभत्व- ज्ञा० अ० १० ओ० १३७.

**सांकडें**- प्रा० ना० १ संकट- भा० अ० १ ओ० ३९-२ ओझें- दा० द० २ स० १० ओ० ११-३ वि० कठिण- विवे० पू० प्र० १ ओ० १२२-४ संकोचित- दा० द० ५ स० १ ओ० २

**सांकळ**- सं० अप० ना० शृंखळा म्ह० बेडी- स० ओ० ७३९.

**सा कांक्ष**- सं० वि० श्रध्दाळू- भा० अ० ३ ओ० ३१.

**साकें**- प्रा० वि० डांकलग- ज्ञा० अ० ८ ओ० ३८.

**साकेत**- सं० ना० अयोध्यानगर.

**सांखळ**- सं० अप० ना० पाहा- सांकळ

**सांखी**- सं० अप० वि० सांख्य- सज्ञानी.

**सांख्य**- सं० ना० विचार.

**साग**- सं० वि० सापराध अ० अपराधयुक्त.

**सांग**- सं० वि० अव्यंग- भा० अ० २० ओ० ७३

**सांगडें**- प्रा० वि० १ अवघड- भा० अ० ६ ओ० १४-२ शद्ब० अव्य० सारिखें- योगें ज्ञा० अ० ५ ओ० ८.

**सागळा**- प्रा० ना० झारीधरणारा- ज्ञा० अ० १३ ओ० ४१८-४१९.

**सागी**- सं० अप० ना० संगत- सोबत भा० अ० १० ओ० ३३८.

**सांघडें**- प्रा० ना० पाहा- सांखडें.

**सांघाती**- सं० अप० ना० संगतिचा मनुष्य- सोबती.

**साच**- सं० अप० वि० सत्य- खरें- अमृ० प्र० ६ ओ० २१.

**साचें**- सं० अप० वि० १ खरें-२ बरें- ज्ञा० अ० ८ ओ० ७९- भा० अ० १ ओ० १२

**साचोकार**- सं० अप० अव्य० खरोखर- भा० अ० १ ओ० ३.

**साचोळ**- प्रा० ना० अस्पष्टध्वनि-

**साज**- प्रा० ना० १ रास- ज्ञा० अ० १३ ओ० ३९-२ सामान- अ० सामग्री-३ क्रि० शोभ- अ० शोभिवंत हो.

**साजणें**- प्रा० धा० ना० १ शोभणें-२ बोलणें- ज्ञा० अ० १२ ओ० ६५ अमृ० प्र० २ ओ० ३९-३ ना० मैत्री- ज्ञा० अ० १३ ओ० १४८- विवे० पू० प्र० २ ओ० ५५- दा० द० ६ स० ८ ओ० २९.

सांजवणी- प्रा० ना० सायंकाल अ० अस्तमान- ज्ञा० अ० १८ ओ० ४८१.
सांजवेळ- प्रा० ना० सायंकाल.
साजा- प्रा० वि० नूतन- साजूक.
साजिरें- प्रा० वि० सुशोभित.
साजिवता- सं० अप० ना० सजीवता टवटवितपणा.
साजुकुळ- प्रा० वि० शांत- ज्ञा० अ० १ ओ० ९१
साजूक- प्रा० ना० निर्गुणसायुज्य- ज्ञा० अ० १० ओ० १३९.
साजें- प्रा० वि० टवटवीत- अमृ० प्र० ७ ओ० ९१.
साट- प्रा० ना० भय-
साटी- प्रा० ना० १ बदला- ज्ञा० अ० ८ ओ० २६२- २ संगत- भा० अ० १३ ओ० १९९- ३ सोबत- दा० द० ३ स० ४ ओ० ४२.
साटु- प्रा० ना० सार म्ह० भय- भा० अ० २९ ओ० ११२.
साटोप- प्रा० ना० अतिनेट- भा० अ० १७ ओ० ३१४.
साटोपु- प्रा० वि० साहंकार- अ० अहंकारयुक्त- ज्ञा० अ० ६ ओ० ४६
साटोवा- प्रा० ना० सांठवण- रुक्मि अ० १ ओ० ३५.
साटोवाटी- प्रा० ना० बदला- भा० अ० २९ ओ० ४०७.
साठ- प्रा० ना० सवदा.

सांडणें- प्रा० धा० ना० १ टाकणें- २ राहाणें- ज्ञा० अ० ६ ओ० ५८.
सांडीपडणें- प्रा० धा० ना० हरणें- ज्ञा० अ० १४ ओ० २२५.
सांडीमांडी- प्रा० ना० टाकणें घेणें- उ० मग हे सांडीमांडी न लगे तूज॥
सांडें- प्रा० क्रि० नव्हे- ज्ञा० अ० ५ ओ० ३२
सांडोवा- प्रा० ना० १ कुरवंडी- ज्ञा० अ० १३ ओ० १६७- २ त्याग- ज्ञा० अ० ९ ओ० ३८१.
सातरिया- प्रा० ना० सात संख्या कांही पदार्थ अ० फळ त्याचें नाव.
सांतवण- प्रा० ना० सांठवण अ० संग्रह- भा० अ० ९ ओ० २७.
साता- सं० अप० धा० अव्य० असतां- ज्ञा० अ० ८ ओ० १९८.
सातिशय- सं० वि० अधिकाधिक.
साती- सं० अप० धा० अव्य० असतां- ज्ञा० अ० ७ ओ० ४
सात्विक- सं० वि० १ सत्वशील- २ ना० शुध्दसत्व- ज्ञा० अ० ५- ओ० १४०
सार्थक- सं० ना० कृतकृत्यता.
साद- सं० अप० ना० शब्द.
साद- प्रा० ना० स्मरण- ज्ञा० अ० ११ ओ० ५८७।५८८.
सादर- सं० वि० तत्पर.
सादु- सं० अप० ना० साद अ० शब्द.

ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २७५·
**सांद्र**- सं॰ वि॰ निबिड अ॰ घनदाट·
**साधक**- सं॰ ना॰ मनुष्यमात्राच्याचा रकोटीआहेत त्यांतील उत्तम कोटीचा पुरुषतो·
**साधनचतुष्टय**- सं॰ ना॰ १ नित्यानित्यवस्तुविवेक-२ इहामुत्रफलभोगविराग-३ शमादिषट्क संपत्ति-४ मुमुक्षुत्व- यासमुच्चयाचें नाव·
**साधर्म्य**- सं॰ ना॰ सादृश्य अ॰ सारखेपणा·
**साधारण**- सं॰ वि॰ सामान्यरूप·
**साधारणकार्य**- सं॰ ना॰ एक्याव्यक्तिचें विशेषें करून नव्हे असें जें कार्य तें·
**साधु**- प्रा॰ ना॰ १ पवित्रपुरुष-भगवद्भक्त-२ वि॰ चांगला अ॰ बरा·
**साध्वस**- सं॰ ना॰ भय·
**साध्वस**- प्रा॰ ना॰ उद्देश-ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३८·
**साध्वी**- सं॰ वि॰ पतिव्रता·
**सान**- प्रा॰ वि॰ लहान- भा॰ अ॰ १ ओ॰
**सानुराग**- सं॰ वि॰ सप्रेम·
**सानें**- प्रा॰ वि॰ लहान- ज्ञा॰ अ॰ ८- ओ॰ २६३·
**सापत्न**- सं॰ वि॰ सावत्र·
**सापें**- सं॰ अप॰ अव्य॰ सांप्रत अ॰ आज-आतां-ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ५०९·
**साबडें**- प्रा॰ वि॰ भोळें अ॰ भोळसर·

**साबरें**- सं॰ अप॰ ना॰ शंबर म्ह॰ पाणी ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ३२५·
**साबळा**- प्रा॰ ना॰ बर्छी-ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ६६२-भा॰ अ॰ ११ ओ॰ ३६·
**साबळें**- प्रा॰ ना॰ भालनामकशस्त्राचें लोखंडीफळ-ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ १४३·
**सामरस्य**- सं॰ ना॰ समरसत्व अ॰ ब्रम्ह-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १३७·
**सामान्यस्त्री**- सं॰ ना॰ वेश्या- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ २९५·
**सामान्यज्ञान**- सं॰ ना॰ निर्विकार ज्ञान·
**सामान्या**- सं॰ ना॰ वेश्या- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ७००
**सामास**- सं॰ अप॰ ना॰ अव्ययीभावादिसमास·
**सामें**- प्रा॰ ना॰ सामग्री- दा॰ द॰ १९ स॰ १ ओ॰ १४
**साम्यता**- सं॰ ना॰ १ समता अ॰ समबुध्दि-२ ब्रम्हप्राप्ति- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १३१
**सायक**- सं॰ ना॰ बाण·
**सायकासन**- सं॰ ना॰ धनुष्य·
**सायास**- सं॰ ना॰ श्रम·
**सायुज्यमुक्ति**- सं॰ ना॰ चौथीमुक्ति·
**सायुज्यता**- सं॰ अप॰ ना॰ सायुज्यता·

सारंग- सं॰ अप॰ ना॰ शार्ङ्ग नामक धनुष्य.
सारंग- प्रा॰ ना॰ भ्रमर- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १६३६ - भा॰ अ॰ १ ओ॰ १०२
सारंगधरु- सं॰ अप॰ ना॰ शार्ङ्गधर म्ह॰ विष्णु-
सारजा- सं॰ अप॰ ना॰ शारदा अ॰ सरस्वती.
सारमेय- सं॰ ना॰ कुत्रा.
सारस- सं॰ ना॰ कमल.
सारसाक्ष- सं॰ वि॰ कमलनयन.
सारस्वतें- सं॰ अप॰ ना॰ १ विद्यामात्रसर्व- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ २- २ भावगर्भ- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २८.
सारासार- सं॰ वि॰ नित्यानित्य.
सारिका- सं॰ ना॰ मैना-
सारिखें- प्रा॰ वि॰ समान.
सारी - प्रा॰ ना॰ सोंगटी अ॰ सोंकटी.
सारीपाट- प्रा॰ ना॰ सोंगट्यांचा पट- सोंगट्यांचा खेळ.
साला- सं॰ अप॰ ना॰ शालक म्ह॰ मेहुणा- मेव्हणा-
सावचित्त- सं॰ वि॰ सावधान.
सावचोर- प्रा॰ ना॰ वाटावा साव आणि असावा चोर असा मनुष्य तो.
सावज- सं॰ अप॰ ना॰ श्वापद-
सावडणें- प्रा॰ धा॰ ना॰ गोळाकरणें उ॰ ॥ तुज होतां न्यथा टकम कापाहाती ॥ परी सावडी ती द्रव्य आधीं ॥ अ॰ ॥ ॥
सांवर्तिक- सं॰ वि॰ प्रळयकालीन म्ह॰ प्रळयकाळचें
सावळगोंदा- प्रा॰ वि॰ मलीन: घाणेरा- दा॰ द॰ २० स॰ ३ ओ॰ १८.
सावाई- प्रा॰ वि॰ सांग- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ३९०- ३९१.
सावाय- सं॰ अप॰ ना॰ साह्य- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३९३- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ ६
सावाळणें- प्रा॰ धा॰ ना॰ सांगकरणें- ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ ३६६- ३६७.
सावावो- प्रा॰ ना॰ १ अधिकता- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १६५- २ सबळता- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ४१६- ३ प्रदीप्तता- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २११- ४ साह्यकर्त्ता ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ २२८- ५ साह्य- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३५५.
साविया- सं॰ अप॰ अव्य॰ सहज ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १३४.
सावेव- सं॰ अप॰ वि॰ सावयव- अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ३.
सासन- सं॰ अप॰ ना॰ साधन- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १४७.
सासिक- सं॰ वि॰ सशस्त्र.
सासितलें- प्रा॰ ना॰ निबिडछाया ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ४-
सासिनणें- प्रा॰ धा॰ ना॰ पिकणें- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ २६२.
सासु- सं॰ वि॰ सप्राण अ॰ जिवंत

**साहणें**- सं॰ अप॰ धा॰ना॰ सहनकरणें.

**साहना**- सं॰ अप॰ ना॰ सेना- ज्ञा॰ अ॰१० ओ॰ ३०१

**साहित्य**- सं॰ना॰ सामग्री.

**साहीगुण**- सं॰ अप॰ ना॰ षड्गुण म्ह॰ षड्विकार- ज्ञा॰ अ॰१४ ओ॰ २१५.

**साहीविकार**- सं॰ अप॰ना॰षड्विकार.

**साहेब**- प्रा॰ ना॰ धनी.

**साळयी**- प्रा॰ ना॰ साळीधान्य- भा॰ अ॰२ ओ॰ १२७.

**साक्षत्व**- सं॰ अप॰ ना॰ साक्षित्व- जाणतें ज्ञान.

**साक्षात्कार**- सं॰ ना॰ ब्रम्हात्मैक्य- श्रवण- मनन- निदिध्यास यांचा परिपाकें करून जें स्वरूपावस्थान तें- उपासना मार्गांत श्रवण कीर्तनादिकांचा परिपाक झाला असतां जें आत्मनिवेदन होतें तें व ज्ञानी पुरुषाचें स्वरूपावस्थान एकच तीव्र मंद अधिकारभेदानें मात्र मार्ग दोन वाटतात- परंतु दोघांचें ही पावण्याचें स्थान एक.

**साक्षात्कारु**- सं॰ अप॰ ना॰ साक्षात्कार.

**साक्षी**- सं॰ ना॰ जाणतें ज्ञान.

**साक्षीभूत**- सं॰ वि॰ साक्षीरूप प्रकाशक.

**साक्षेप**- सं॰ ना॰ यत्न.

**साक्षेपु**- सं॰ अप॰ ना॰ साक्षेप- उत्कंठा- भा॰ अ॰१ ओ॰ ५७.

## सि-सी.

**सिकता**- सं॰ ना॰ वाळू.

**सिंतरणें**- प्रा॰ धा॰ ना॰ झकविणें ज्ञा॰ अ॰१४ ओ॰ ३४१- दा॰द॰ ३स॰ ३ ओ॰ ९

**सिता**- सं॰ना॰ साकर.

**सिदणें**- सं॰ अप॰ धा॰ना॰ छेदणें ज्ञा॰ अ॰१८ ओ॰ ६४३.

**सिंधुर**- सं॰ना॰ हत्ती.

**सिध्ध**- सं॰ ना॰ १ चवार जीवकोटींतील ब्रम्हात्मसाक्षात्कारवान् उत्तमोत्तम कोटीचा पुरुष तो- २ अणिमादि सिध्धि ज्यास साध्य तो- ३ वि॰ तयार.

**सिध्धतत्व**- सं॰ ना॰ ब्रम्ह.

**सिध्धांत**- सं॰ ना॰ १ गुरुप्रतीति २ निश्चय.

**सिध्धांतमार्ग**- सं॰ना॰ गुरुभक्तिमार्ग.

**सिध्धि**- सं॰ ना॰ १ अणिमादिक २ इहजन्मीं तपादि केल्यानें प्राप्त होतें जें अंगीं सामर्थ्य तें.

**सिनसाळ**- प्रा॰ वि॰ क्षणिक- ज्ञा॰ अ॰१५ ओ॰ १४०

**सिनसाळें**- प्रा॰ ना॰ उच्चतेपासून

यतन- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ५६०.

**सिनानें**- प्रा॰ ना॰ १ वेगळेपण- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ३९ -२ वि॰ वेगळें- अमृ॰ प्र॰ १ ओ॰ ६०.

**सिनार**- सं॰ ना॰ वेगळेपण- विवे॰ पू॰ प्र॰ २ ओ॰ ६१ - ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १५८९.

**सिनें**- प्रा॰ ना॰ १ वेगळेपण- २ वि॰ वेगळें

**सिन्हें**- प्रा॰ ना॰ सिनें- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ४५७-४५८.

**सिंपणें**- प्रा॰ धा॰ ना॰ १ सिंचनकरणें अ॰ भिजवणें - २ स्पर्शणें- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ७७.

**सिसुर**- प्रा॰ वि॰ सुरलेलें अ॰ रुळलेलें- भा॰ अ॰ ३ ओ॰ ३९३

**सियारी**- प्रा॰ ना॰ शारा- कंप- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ६८.

**सिराणी**- प्रा॰ ना॰ श्रेष्ठता- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ३९.

**सिरें**- प्रा॰ ना॰ कारण.

**सिल्प**- सं॰ अप॰ ना॰ शिल्प-शद्ब पाहा.

**सिसार**- सं॰ अप॰ ना॰ अर्ध्दशीशी- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १७९.

**सिसाळें**- सं॰ अप॰ ना॰ शीस अ॰ शीस म्ह॰ मस्तक- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४१५

**सिंहाडा**- सं॰ अप॰ ना॰ सिंह- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४७४-४७५.

**सिंहावलोकन**- सं॰ ना॰ सिंह पुढें पुढें जसा चालत जाऊन वरचेवर मागें पाहतो- तसें मनुष्यानें लेखभाषणादिकांत वरचेवर पूर्वानुसंधान ठेवणें त्याचें नाव.

**सिंहिका**- सं॰ ना॰ राक्षसी- राहुचीमाता.

**सिंहिकासुत**- सं॰ ना॰ राहुनामादैत्य.

**सीमा**- सं॰ ना॰ मर्यादा-पराकाष्ठा-

**सीस**- सं॰ अप॰ ना॰ शीर्ष अ॰ मस्तक.

## सु-सू.

**सुआवणें**- प्रा॰ धा॰ ना॰ १ करणें- ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ १५६ - २ सेवनकरणें - ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ३१.

**सुइणें**- प्रा॰ धा॰ ना॰ घालणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ २५०.

**सुकंठ**- सं॰ ना॰ सुग्रीव.

**सुकरणें**- प्रा॰ धा॰ ना॰ आनंदविणें अमृ॰ प्र॰ १० ओ॰ १

**सुकृत**- सं॰ ना॰ पुण्य.

**सुख**- सं॰ ना॰ आनंद.

**सुखासन**- सं॰ ना॰ पालखीआदिकरून.

**सुगड**- प्रा॰ वि॰ सुगर अ॰ चतुर- दा॰ द॰ २ स॰ ८ ओ॰ ११.

**सुगंधमार्जार**- सं॰ ना॰ जवादिमांजर

**सुगंधमृग**- सं॰ ना॰ कस्तुरीमृग.

**सुगल**- सं॰ ना॰ सुग्रीव.

**सुग्रावा**- प्रा॰ ना॰ चातुर्य-भा॰ अ॰ १३ ओ॰ १४८.

**सुघट**- सं॰ वि॰ घडण्यास सुलभ.

**सुघट**- प्रा॰ अव्य॰ केवळ-ज्ञा॰ अ॰ ७ ओ॰ ५५.

**सुघटी**- प्रा॰ ना॰ रॉव-ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ११३.

**सुजणें**- प्रा॰ धा॰ ना॰ घालणें-अमृ॰ प्र॰ ५ ओ॰ ६५.

**सुजन्म**- सं॰ ना॰ दैवी संपत्तियुक्त जन्म.

**सुझणें**- प्रा॰ धा॰ ना॰ १ दिसणें-ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १५६-२ जाणणें-कळणें-प॰ प्र॰ ८ ओ॰ १.

**सुटंक**- प्रा॰ ना॰ १ सुचिन्ह-भा॰ अ॰ २ ओ॰ १७८-२ वि॰ सुचिन्हित-भा॰ अ॰ ३ ओ॰ ४४१.

**सुठरें**- प्रा॰ ना॰ पांगुओलांडेफोड म्ह॰ पिवळ्याफडक्यांत जोंधळे सात अ॰ पांच गांठींनीं बांधून फोडां वरून उतरून रस्त्यांत टाकितात त्याच्या ओलांडण्यानें होतात फोड- वेडें अथवा गळवें त्याचें नाव-दा॰ द॰ ३ स॰ ६ ओ॰ २५.

**सुडावणी**- प्रा॰ ना॰ १ एकाकारता-ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ५४-२ सूडउगविणें-भा॰ अ॰ ९ ओ॰ १२२.

**सुणें**- सं॰ अप॰ ना॰ श्वुनक अ॰ कुत्रें-भा॰ अ॰ १२ ओ॰ ५७७-दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ ६५.

**सुत**- सं॰ ना॰ पुत्र-उ॰ ॥ बाळपणीं मरेमाता ॥ तारुण्यपणीं मरे कांता ॥ वृध्दपणीं मृत्युसुता ॥ यानांव अधिभूतिक ॥.

**सुतणें**- सं॰ अप॰ धा॰ ना॰ निजणें-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ ४७-ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ १८८ ज्ञा॰ अ॰ १७ ओ॰ १५०.

**सुतसणें**- प्रा॰ धा॰ ना॰ घालणें-ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३८३.

**सुता**- सं॰ ना॰ कन्या.

**सुतिणें**- प्रा॰ धा॰ ना॰ मारणें-ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ ४०३-४०४.

**सुती**- प्रा॰ ना॰ १ प्रवेश-ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ १०९-२ विसार-ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ १४५- दा॰ द॰ ५ स॰ १-ओ॰ ३२

**सुदती**- सं॰ वि॰ सुंदरी-

**सुदंश्रु**- सं॰ अप॰ वि॰ ज्ञाता-अस्तिक-ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १६१.

**सुदावा**- प्रा॰ ना॰ थांग-वा॰ ओ॰ २८१०.

**सुधा**- सं॰ ना॰ अमृत.

**सुधा**- प्रा॰ वि॰ सद्गुणी-

**सुधाकर**- सं॰ ना॰ चंद्र.

**सुधापानी**- सं॰ ना॰ स्वर्गवासीदेव.

**सुधांशु**- सं॰ ना॰ चंद्र.

सुनार- सं॰ अप॰ वि॰ शून्यरूप अ॰ र्थ्थ- भा॰ अ॰ १५ ओ॰ १६२.
सुनी- सं॰ अप॰ वि॰ शून्यरूप.
सुनी- प्रा॰ धा॰ अव्य॰ घालून- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ ४७.
सुपर्ण- सं॰ ना॰ गरुड-
सुपर्णाग्रज- सं॰ ना॰ सूर्यसारथी अ रुण.
सुपाणी- सं॰ अप॰ ना॰ मोती.
सुपाणीदाणा- सं॰ अप॰ ना॰ पाणी दार मोती. भा॰ अ॰ ३ ओ॰ २१२
सुभग- सं॰ वि॰ उत्तमभाग्यवान.
सुभगे- प्रा॰ धा॰ ना॰ घालणे- ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १९५.
सुभट- सं॰ वि॰ शूर- योध्धा.
सुभद्रा- सं॰ ना॰ कृष्णभगिनी- अ र्जुनस्त्री
सुभर- सं॰ अप॰ वि॰ उत्तमभरलेलें
सुभरें- सं॰ अप॰ वि॰ परिपूर्ण- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ २२६
सुम- सं॰ ना॰ पुष्प.
सुमन- सं॰ ना॰ पुष्प- उत्तममन.
सुमनस- सं॰ ना॰ स्वर्गवासीदेव.
सुमनश्चाप- सं॰ ना॰ मदन.
सुमरु- सं॰ अप॰ ना॰ स्मरण- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ १००
सुयाण- प्रा॰ ना॰ सुकाळ- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३३८
सुर- सं॰ ना॰ स्वर्गवासीदेव.

सुरंगी- प्रा॰ ना॰ वाट- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ४८.
सुरत- सं॰ ना॰ १ मैथुन- २ वि॰ उत्त मप्रकारें रत.
सुरतरु- सं॰ ना॰ कल्पवृक्ष.
सुरति- सं॰ ना॰ ऐक्य- ज्ञा॰ अ॰ ५ ओ॰ १३४.
सुरद्रु- सं॰ ना॰ कल्पवृक्ष.
सुरद्रुम- सं॰ ना॰ कल्पवृक्ष.
सुरनदी- सं॰ ना॰ भागीरथी-
सुरपति- सं॰ ना॰ इंद्र.
सुरफुरे- प्रा॰ वि॰ सूचक- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ ६८.
सुरभी- सं॰ ना॰ कामधेनु-
सुरभीपुत्र- सं॰ ना॰ शिववाहननं दी- ती.
सुरभूरुह- सं॰ ना॰ कल्पवृक्ष.
सुरमा- प्रा॰ ना॰ अंगावरपांढरेचट्टे येतात तो रोग- २ डोळ्यांतघालणेचापदार्थ.
सुरयानी- सं॰ ना॰ शुक्रकन्यादेव यानी ती.
सुरयुवती- सं॰ ना॰ देवांगना.
सुरवाड- प्रा॰ ना॰ स्वाधीनपण- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २१४.
सुरवाडणें- प्रा॰ धा॰ ना॰ १ प्रफुल्लि तहोणें- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ३३७- २ सुरवावणें- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २१५- २१६
सुरवाडिक- प्रा॰ वि॰ सुखदायक विवे॰ पू॰ प्र॰ २ ओ॰ ४.

**सुरसरित्**- सं॰ना॰ भागीरथी॰
**सुरसरी**- सं॰अप॰ना॰ भागीरथी॰
**सुरस**- सं॰ वि॰ रसिक॰
**सुरसिंधु**- सं॰ना॰ भागीरथी॰
**सुरा**- सं॰ना॰ मद्य -
**सुरांगना**- सं॰ना॰ देवांगना॰
**सुरालय**- सं॰ना॰ स्वर्ग.
**सुलीनता**- सं॰ना॰ चवार अभ्यासभूमिकांतील-चरम भूमिका॰
**सुलोचना**- सं॰ना॰ १ इंद्रजीतस्त्री- २ वि॰ उत्तम लोचना॰
**सुल्लभ**- सं॰अप॰ वि॰ सुलभ-उ॰ साहित्यविषयींसुल्लभा ॥ अष्टनायकाहोती ॥॰
**सुवर्ण**- सं॰ना॰ १ सोनें॰ २ ब्राम्हण- ३ उत्तम अक्षर वर्ण॰
**सुवर्णधातुमार्ग**- सं॰ना॰ किमया- दा॰ द॰५ स॰२ ओ॰३
**सुवर्णपंथी**- सं॰ना॰ किमयागार- दा॰द॰३ स॰७ ओ॰४९॰
**सुवर्म**- सं॰ वि॰ सुयुक्त- ज्ञा॰अ॰१० ओ॰६२
**सुवारु**- प्रा॰ना॰ पाककर्त्ता- ज्ञा॰अ॰ १२ ओ॰४२१॰
**सुवावो**- सं॰अप॰ना॰ सुवायो म्ह॰ सुवायु अ॰ उत्तमवायु॰
**सुषमा**- सं॰ना॰ उत्तमशोभा॰
**सुषुप्ति**- सं॰ना॰ झोंप॰
**सुषुम्नानाडी**- सं॰ना॰ इडा आणि पिंगला यांचे मध्य संधीस जी नाडी आहे ती॰
**सुस**- सं॰अप॰ना॰ सुख- अमृ॰ प्र॰१ ओ॰१५
**सुसड**- सं॰अप॰ वि॰ उत्तम सडीक ज्ञा॰अ॰८ ओ॰१०
**सुहाड**- प्रा॰ वि॰ १ सुजाण- ज्ञा॰ अ॰९ ओ॰२४१- २ विलासी- ज्ञा॰ अ॰११ ओ॰६७०- ३ ज्ञाता- ज्ञा॰अ॰ १२ ओ॰४८॰
**सुहाव**- प्रा॰ना॰ १ आवड- ज्ञा॰अ॰ १५ ओ॰६८- २ वि॰ सुशोभित- भा॰ अ॰१ ओ॰१०९॰
**सुहावणें**- प्रा॰धा॰ना॰ कल्पिणें-
**सुहावा**- प्रा॰ वि॰ १ आवडता- २ ज्ञा॰ साह्यकर्त्ता- ज्ञा॰अ॰१४ ओ॰२
**सुज्ञ**- सं॰ वि॰ जाणता॰
**सूकर**- सं॰ना॰ डुकर- उ॰ आम्हासाठीं अवतार ॥ मच्छ कूर्मादि सूकर ॥
**सूत**- सं॰ना॰ गाडीवान्- २ पुराणादिक सांगणारा-
**सूतपणें**- प्रा॰धा॰ना॰ तन्मय होणें- ज्ञा॰अ॰५ ओ॰१४८
**सूत्र**- सं॰ना॰ १ यज्ञोपवीत- २ दोरा ३ व्यास ऋषि -
**सूत्रकार**- सं॰ना॰ व्यास ऋषि॰
**सूनी**- प्रा॰धा॰ अव्य॰ घालून- ज्ञा॰ अ॰७ ओ॰२०२
**सूनु**- सं॰ना॰ पुत्र॰

**सूपरम**- सं॰ना॰ मरण·
**सूपराम**- सं॰ना॰ मरण·
**सूपशास्त्र**- सं॰ना॰ पाक करण्याची विद्या·
**सूर्यदुहिता**- सं॰ना॰ यमुना·
**सूर्यनंदन**- सं॰ना॰ १ यम-२ शनी ३ सुग्रीव-४ कर्ण·
**सूर्यपान**- सं॰अप॰ना॰ अद्यागिरी· अद्यागीर- दा॰द॰ २ स॰७ ओ॰ २६·
**सूर**- सं॰अप॰ना॰ स्वर·
**सूर**- सं॰ अप॰ ना॰ शूर- भा॰अ॰१२ ओ॰१७६·
**सूक्ष्म**- सं॰वि॰ बारीक- अस्पष्ट·
**सूक्ष्मदेह**- सं॰ना॰ लिंगदेह-अ॰वासनात्मकदेह·
**सृगाल**- सं॰ना॰ कोल्हा·
**सृजणें**- सं॰ धा॰ ना॰ उत्पन्न करणें·
**सृष्टि**- सं॰ना॰ जग-२ उत्पत्ति·

## से-सै·

**से**- प्रा॰ ना॰ छंद- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ७
**से**- प्रा॰ ना॰ सय अ॰ स्मृति- स्मरण ज्ञा॰ अ॰१३ ओ॰ ६४५.
**सेवटीं**- प्रा॰ अव्य॰ शेवटीं-भा॰ अ॰ १ ओ॰ ८२
**सेज**- सं॰ अप॰ ना॰ शय्या·
**सेजार**- सं॰ अप॰ ना॰ शय्या- ज्ञा॰ अ॰ ओ॰ ४८९-४९० - विवे॰ पू॰ अ॰२ ओ॰१४- भा॰ अ॰१ ओ॰ २४६
**सेजारीं**- प्रा॰शह॰अव्य॰ जवळ· अथवा समीप·
**सेजारें**- प्रा॰शह॰अव्य॰ जवळ· ज्ञा॰अ॰९ ओ॰३९०
**सेंद**- प्रा॰ ना॰ करंडा- ज्ञा॰ अ॰१८ ओ॰४२२
**सेन**- सं॰अप॰ना॰ स्येन म्ह॰ ससाणापक्षी·
**सेना**- सं॰ना॰ चमू म्ह॰ फौज·
**सेनानी**- सं॰ना॰ कार्तिकस्वामी·
**सेल**- प्रा॰ ना॰ १ उत्तम वांटा- २ भाक- ज्ञा॰ अ॰११ ओ॰ ६४३-६४४- ३ शेवट- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ २१- ४ वि॰ शेलका अथवा निवडक- ज्ञा॰ अ॰१० ओ॰ १३०
**सेवाहिली**- प्रा॰ना॰ ज्ञानभक्ति- ज्ञा॰ अ॰९ ओ॰ ४११
**सेवट**- प्रा॰ना॰ शेवट अ॰ नाश-
**सेवन**- सं॰ना॰ सेवा·
**सेव्यागाय**- सं॰ अप॰ना॰ सेव्य गाव म्ह॰ मुख्यस्थान ब्रम्ह·
**सेस**- प्रा॰ ना॰ भरण- ज्ञा॰ अ॰४ ओ॰ ५८
**सैंध**- प्रा॰ वि॰ बहुल- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰१४४- २ पुष्कळ- ज्ञा॰ अ॰१० ओ॰ १२६- ३ फार- भा॰ अ॰ ३० ओ॰ ६१- ४ अव्य॰ केवळ- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ १००- ५ [illegible] - ज्ञा॰ अ॰ ९

ओ॰ ३२२.

**सैंधव**- सं॰ ना॰ १ मीठ- २ जयद्रथ.

**सैन्य**- सं॰ ना॰ दळ.

**सैर**- सं॰ अप॰ वि॰ स्वैर अ॰ स्वछं दी- दा॰ द॰ २ स॰ १ ओ॰ २१

**सैरा**- सं॰ अप॰ वि॰ अफार- भा॰ अ ३ ओ॰ ६५.

**सैराट**- सं॰ अप॰ वि॰ अद्दा तद्दा- मोकाट.

**सैरावैरा**- सं॰ अप॰ अव्य॰ इक डेतिकडे.

## सो.

**सोई**- प्रा॰ ना॰ सोय अ॰ मार्ग.

**सोकरणें**- प्रा॰ धा॰ ना॰ रक्षणकर णें- ज्ञा॰ अ॰ १३ ओ॰ ३८- भा॰ अ॰ ५ ओ॰ ६१

**सोगयाचेंअंजन**- सं॰ अप॰ ना॰ सौवीरांजन म्हणजे डोळ्यांतसुदमाघा लितात त्याहून अतिगुणकर व मनोह र असा एक उंची पदार्थ आहे त्याचें ना व.

**सोज्वळ**- सं॰ अप॰ वि॰ अतिस्वछ

**सोट**- प्रा॰ ना॰ १ एकजंतु आहे- २ वि॰ फटिंग.

**सोटवाव**- प्रा॰ ना॰ फोक- ज्ञा॰ अ॰ १५ ओ॰ १८६.

**सोत्कंठा**- सं॰ ना॰ कळकळ.

**सोनवी**- प्रा॰ ना॰ निशाण- ज्ञा॰ अ॰ १४ ओ॰ ३३८

**सोनसळा**- प्रा॰ ना॰ १ पीतांबर- भा॰ अ॰ ३ ओ॰ ५५१- २ वि॰ गव्हां चीएक पिवळ्रटजाती आहे- उ॰ ॥ आले बाय कोन्हे भाऊ॥ त्याला सोनसळे गहूं॥ इ॰॥

**सोप**- प्रा॰ वि॰ १ सोपटें अ॰ फोल ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४७६- २ लटकें- ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ १२२.

**सोपाधिकविवर्त**- सं॰ ना॰ जो विवर्त अ॰ भ्रमज्ञान झालें तरी उपा धि आहे तावत्काल दिसत राहतना हीं त्याचें नाव- जसें मृगजल.

**सोपान**- सं॰ ना॰ जिना.

**सोपाना**- सं॰ अप॰ ना॰ पायऱ्या ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ५४.

**सोपु**- प्रा॰ वि॰ व्यर्थ- ज्ञा॰ अ॰ ८ ओ॰ ६

**सोम**- सं॰ ना॰ १ चंद्र- २ अमृत.

**सोमप**- सं॰ ना॰ सोमपान कर्त्ते.

**सोम्य**- सं॰ संबो॰ हे शिष्य.

**सोमादि**- सं॰ ना॰ रानशेरादिपा ले- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २६७.

**सोय**- प्रा॰ ना॰ मार्ग- उ॰ कांहीं तरी धरावी सोय आगांतुका गुणाची॥

**सोर**- प्रा॰ ना॰ आकांत.

**सोरु**- सं॰ अप॰ ना॰ सूकर- अद्दु कर- भा॰ अ॰ १३ ओ॰ ११६

**सोवतें**- मा॰ वि॰ १ निराळें- २ अन्य- स्वतः अ॰ स्वाधीन· ज्ञा॰ अ॰ १६ ओ॰ २९० ३९१

**सोवाणी**- मा॰ ना॰ गणना- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ ४२४·

**सोस**- सं॰ अप॰ ना॰ हाव- हावरेपणा·

**सोसणी**- सं॰ अप॰ ना॰ हवरेपणा·

**सोसु**- सं॰ अप॰ ना॰ १ शोष- हाव अमृ॰ प्र॰ ६ ओ॰ २९- २ यत्न- भा॰ अ॰ ओ॰ ९०·

**सोहं**- सं॰ ना॰ ब्रम्ह मी असा भाव·

**सोहम्**- सं॰ अप॰ ना॰ सोहं म्ह॰ हा देह मी नव्हे तर तो मी जो या देहादिकांस अधिष्ठानभूत परमात्मा- अमृ॰ प्र॰ २ ओ॰ २२·

**सोहळा**- मा॰ ना॰ उत्साह- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ४०

**सोळाकळा**- सं॰ अप॰ ना॰ षोडशकळा म्ह॰ चंद्रास अमृतादि सोळा कळा आहेत त्या

---

## सौ·

---

**सौकर**- प्रा॰ ना॰ कोष्ट्याचा माग- अमृ॰ प्र॰ ७ ओ॰ १४१·

**सौख्य**- सं॰ ना॰ सुख·

**सौजन्य**- सं॰ ना॰ सुजनत्व- अ॰ मित्रत्व·

**सौंदर्य**- सं॰ ना॰ सुंदरत्व·

**सौदामिनी**- सं॰ ना॰ विद्युल्लता अथ॰ वीज·

**सौध**- सं॰ ना॰ मंदिर- राजमंदीर·

**सौधव**- सं॰ अप॰ ना॰ मंदिर·

**सौबळ**- सं॰ अप॰ ना॰ शकुनीमामा

**सौभद्र**- सं॰ ना॰ अभिमन्यु अर्जुनपुत्र·

**सौभाग्य**- सं॰ ना॰ सुभगता- अहेवपण·

**सौभाग्यद्रव्य**- सं॰ ना॰ हरिद्राकुंकुम·

**सौम्य**- सं॰ वि॰ शांत·

**सौरभ**- सं॰ ना॰ सुवासित्व·

**सौरभ्य**- सं॰ ना॰ सौरभ·

**सौरस**- सं॰ ना॰ सुरसिकत्व·

**सौरस**- मा॰ ना॰ १ यत्न- ज्ञा॰ अ॰ ६ ओ॰ ४५९ - ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ३६७ २ आसक्ति- ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ ३११- विवे॰ पू॰ प्र॰ २ ओ॰ ८१- ३ प्रसाद·

**सौरसु**- मा॰ ना॰ प्रसाद- विवे॰ पू॰ प्र॰ १ ओ॰ ११ - ज्ञा॰ अ॰ १० ओ॰ ६- २ ऐक्यभाव- ज्ञा॰ अ॰ ११ ओ॰ १००

**सौरसु**- सं॰ अप॰ ना॰ सुरसत्व- ज्ञा॰ अ॰ १२ ओ॰ २०२- भा॰ अ॰ १- ओ॰ १०

**सौग्र**- सं॰ अप॰ वि॰ शूर·

**स्कंद**- सं॰ ना॰ स्वामीकार्तिक·

**स्कंध**- सं॰ ना॰ खांदा·

स्तंब- सं॰ ना॰ अणुरेणु सारिखे बारीक जीव.
स्तबक- सं॰ ना॰ पुष्पगुच्छ- घोंस.
स्तंभ- सं॰ ना॰ खांब.
स्तोम- सं॰ ना॰ समूह.
स्थविर- सं॰ वि॰ म्हातारा.
स्थाणु- सं॰ ना॰ वृक्षखुंट.
स्थावर- सं॰ ना॰ वृक्षादिक.
स्थिति- सं॰ ना॰ रक्षण- व्यवस्था.
स्थूल- सं॰ वि॰ जाड- मोठें
स्थूलदेह- सं॰ ना॰ अस्थिमांसाचाप्र त्यक्षदेह तो.
स्थूलदृष्टी- सं॰ ना॰ दोबळीदृष्टी.
स्थूलबुध्धि- सं॰ ना॰ जडबुध्धि.
स्थूलभोग- सं॰ ना॰ जागृती मधील प्रत्यक्षभोग.
स्थूळ- सं॰ अप॰ वि॰ स्थूल- मोठें- जाडें.
स्थूळदेह- सं॰ अप॰ ना॰ स्थूलदेह.
स्नपन- सं॰ ना॰ स्नान.
स्निग्ध- सं॰ वि॰ चोपडवाईक- बुळबुळीत- ओशट.
स्नुषा- सं॰ ना॰ सून- पुत्राचीबायको.
स्नेह- सं॰ ना॰ १ तेल- २ आर्द्रता- ३ मैत्री.
स्पंद- सं॰ ना॰ गति.
स्पर्शमणि- सं॰ ना॰ परीस.
स्पर्शवर्ण- सं॰ ना॰ कपासून मपर्यंत पंचवीस वर्णते.
स्पृहा- सं॰ ना॰ इच्छा.
स्फिति- सं॰ ना॰ कीर्ति.
स्फुंज- सं॰ अप॰ ना॰ फुंज अ॰ फुगारा- गर्व.
स्फूर्ति- सं॰ ना॰ १ आठवरूपवृत्ति २ माया.
स्मर- सं॰ ना॰ मदन.
स्मरगृह- सं॰ ना॰ कामसदन अ॰ उपस्थ.
स्मशान- सं॰ ना॰ मसणवटा.
स्मशानवैराग्य- सं॰ ना॰ मसणवट्यांतून घरीं परत येसतों पर्यंत येतें वैराग्य तें.
स्मरार- सं॰ ना॰ शिव.
स्मरारि- सं॰ ना॰ शिव.
स्मारक- सं॰ वि॰ स्मरण देणारें अ॰ करणारें.
स्मृति- सं॰ ना॰ १ भगवंताच्या मुखापासून निघालेली वाणी जी श्रुत झाली होती- तीअवकाशानें स्मरण करून लिहिली तिचें नाव आणि याच कारणा वरून श्रुत होतांच लिहिली जी श्रुति ती हून स्मृतिकमी योग्यतेची आहे २ स्मरण.
स्यंदन- सं॰ ना॰ रथ.
स्रजणें- सं॰ अप॰ धा॰ ना॰ सृजयें म्ह॰ उत्पन्नकरणें
स्रष्टा- सं॰ ना॰ ब्रम्हदेव.
स्रोत- सं॰ ना॰ प्रवाह.

स्त्री - सं० ना० बायको.
स्त्रीधर्मिणी - सं० वि० रजस्वला.
स्त्रैण - सं० वि० स्त्रीलुब्ध अथवा स्त्री लोभी.
स्वगतभेदरहित - सं० वि० वृक्षास फांद्यापानें फुलें हे अनेक अवयव आहेत असे जेथें अवयव नाहींत ती पर ब्रम्हवस्तु तद्भेदरहित.
स्वर्गलोक - सं० ना० ब्रम्हसृष्टीच्या आंत जें इंद्राचें वसतें स्थान तें.
स्वर्गोनि - सं० अप० अव्य० लांबून - ज्ञा० अ० १४ ओ० २१६
स्वजात - प्रा० ना० सार्थक - ज्ञा० अ० १२ ओ० ११९.
स्वतःप्रमाण - सं० ना० वेद अ० वेदांतील श्रुति - यांस प्रमाणांतरापेक्षा नाहीं - वेदाचें अ० वेदश्रुतिचें - स्मृति पुराणादिकांस प्रमाण पाहिजे तसें वेदास कोणाचें प्रमाण नको त्याचें प्रमाण त्यालाच म्हणून वेदश्रुति स्वतः प्रमाण असें समजावें.
स्वधर्म - सं० ना० मानवी प्राण्यानें आपलें स्वरूप ओळखून तेंच अंतःकरणांत दृढ धरून तदाकार होऊन राहणें त्याचें नाव.
स्वधाम - सं० ना० निजधाम अ० स्वप्रकाश निजरूप तें.
स्वर्धुनी - सं० ना० भागीरथी.
स्वप्नगुरु - सं० ना० स्वप्नांत उपदेश करणारा गुरु तो.
स्वप्नावस्था - सं० ना० कल्पित इंद्रियांनीं कल्पित विषय ग्रहण होतें ती अवस्था.
स्वप्रभ - सं० वि० स्वप्रकाश.
स्वप्रकाशापरोक्षज्ञान - सं० ना० श्रुतपदार्थाचें ज्ञान तें परोक्षज्ञान - व दृष्ट पदार्थाचें ज्ञान तें अपरोक्षज्ञान असें नैय्यायिक मत आहे. त्यांत जें न्यायोक्त अपरोक्षज्ञान तें पर प्रकाशापरोक्षज्ञान समजावें - त्याहून वेगळें तें स्वप्रकाशापरोक्षज्ञान जें देहादिकांचें साक्षी व अधिष्ठान असें तें.
स्वमेवो - सं० अप० अव्य० स्वयमेव म्ह० आपला आपण.
स्वयंजोती - सं० ना० स्वप्रकाश वस्तु.
स्वयंप्रकाश - सं० ना० स्वप्रकाश ब्रम्ह.
स्वयंभू - सं० अप० ना० स्वयंभु म्ह० स्वतःसिध्ध वस्तु.
स्वरूप - सं० ना० निजरूप ब्रम्ह.
स्वरूपता मुक्ति - सं० ना० तिसरी मुक्ति.
स्वरूपलक्षण - सं० ना० स्वाभाविक लक्षण - म्ह० ज्या लक्षणास उत्पत्ति व लय नाहीं असें लक्षण सत् चित् आणि आनंद तें.

**स्वसणें**- सं० अप० धा० ना० श्वासटाकणें·

**स्वसंवेद्य**- सं० ना० ज्ञानस्वरूपवस्तु·

**स्वसो**- सं० अप० ना० संशय- ज्ञा० अ० ११ ओ० २११·

**स्वस्ति**- सं० वि० बरें- कल्याणरूप·

**स्वांतःकरण**- सं० ना० लिंगदेह- ज्ञा० अ० १४ ओ० २८४·

**स्वाद**- सं० ना० रुचि अ० स्व- गोडी

**स्वाधिष्ठानचक्र**- सं० ना० मूलाधारावरलें व मणिपुरा खालचें षट्चक्रांतील दुसरें आधारस्थ चक्र योगशास्त्रांत मानलें आहे तें·

**स्वाध्यावो**- सं० अप० ना० अध्ययन

**स्वेतु**- सं० अप० ना० सेतु- म्ह० पूल· भा० अ० ४ ओ० २४१

**स्वेद**- सं० ना० घाम·

**स्वैरत्व**- सं० ना० स्वेच्छाचारित्व·

**स्वैरिणी**- सं० वि० स्वेच्छाचारिणी- अ० व्यभिचारिणी·

## ह·

**हकारा**- प्रा० ना० हकाहाक·

**हट**- सं० अप० ना० हट्ट म्ह० आग्रह

**हटयोग**- सं० अप० ना० हठयोग- म्ह० प्राणनिरोधरूप योगाभ्यास त्याचें नाव·

**हटवट**- प्रा० ना० बाजार अ० [illegible]

र चाचौक·

**हडप**- प्रा० ना० १ गाहण- २ पानदान- ज्ञा० अ० १२ ओ० ४१९·

**हडपी**- प्रा० ना० विडा देणारा- भा० अ० ९ ओ० १५७

**हलतुक**- प्रा० ना० अटकळ- अ० अदमास·

**हतवसणें**- सं० अप० धा० ना० करतळामळकरणें·

**हुतासन**- प्रा० ना० मिष अ० निमित्त- ज्ञा० अ० ६ ओ० ११९

**हतियार**- सं० अप० ना० शस्त्र·

**हदोळविदोळ**- प्रा० वि० १ चळबळीत- २ ना० चळबळ·

**हन**- प्रा० अव्य० १ आणीक अ० आणखी- ज्ञा० अ० १ ओ० १८६- अमृ० प्र० ३ ओ० ३२- २ ही- अमृ० प्र० २ ओ० ७७· अमृ० प्र० ६ ओ० ७५·

**हनन**- सं० ना० वध- मारणें·

**हनु**- सं० ना० हनवटी·

**हनुमंत**- सं० ना० मारुती- अंजनीसुत·

**हय**- सं० ना० घोडा·

**हयपति**- सं० ना० घोड्यावरील मुख्य अधिकारी·

**हयहंयु**- सं० अप० ना० हे हय-पाहो- भा० अ० ४ ओ० २४२

**हयांगुळील**- सं० ना० [illegible]

**हयारोह** — सं० ना० स्वार·

हर-सं० ना० नित्यमुक्तशिव.
हरद्र- सं० अप० ना० हार्द-म्ह० हृद्गत अभिप्राय- दा० द० १९ स० २ ओ० २०
हरपणें- प्रा० धा० ना० हरवणें- सांडणें.
हर्पणें- प्रा० धा० ना० हरपणें.
हरंबळणें- प्रा० धा० ना० तळमळणें. दा० द० ३ स० ७ ओ० ३९.
हराश- सं० अप० ना० ऱ्हास.
हरास- सं० अप० ना० ऱ्हास.
हरासु- सं० अप० ना० हरास-म्ह० ऱ्हास- ज्ञा० अ० १६ ओ० १०६- भा० अ० २० ओ० २७४.
हरि- सं० ना० १ नित्यमुक्त विष्णु-२ इंद्र ३ वानर-४ सिंह- ५ घोडा.
हरिख-सं० अप० ना० हर्ष- भा० अ० १ ओ० २४२. दा० द० २ स० ७ ओ० ८३.
हरिलणें- सं० अप० धा० ना० हरण करणें.
हरिहय-सं० ना० इंद्र.
हरुषतें- सं० अप० वि० हर्षित-भा० अ० १ ओ० ५.
हरोन्- सं० अप० धा० अव्य० संगरहित खेंतद्रूप करून- ज्ञा० अ० ५ ओ० ३४.
हल- सं० ना० नांगर.
हलकालोळ- सं० अप० ना० हाहःकार.
हलधर- सं० ना० बलराम.
हलयाणें- प्रा० धा० ना० हाणनें- ज्ञा० अ० १६ ओ० १२५
हलायुध- सं० ना० बलराम.
हलासिणें- प्रा० धा० ना० हाणनें- ज्ञा० अ० ११ ओ० १०५.
हलेणें- प्रा० धा० ना० १ बडविणें-अमृ० प्र० ६ ओ० ४४- २ मारणें- अमृ० प्र० ७ ओ० ५०
हल्लर- प्रा० ना० गाणें- ज्ञा० अ० १२ ओ० ७
हवाई- प्रा० ना० चंद्रजोत.
हवाव- प्रा० ना० शोभा- ज्ञा० अ० ६ ओ० १३२
हवावा- प्रा० ना० शोभा- ज्ञा० अ० ७ ओ० २०९.
हवि- सं० ना० होमद्रव्य.
हव्य- सं० ना० यज्ञयागादिकर्म.
हव्यवाट्- सं० ना० अग्नि.
हव्यास- प्रा० ना० १ छंद- विवे० पू० प्र० २ ओ० ८१- दा० द० २ स० ६ ओ० २१- २ सुख- दा० द० ३ स० २ ओ० २९
हंस- सं० ना० सूर्य- २ शिव- ३ विष्णु ४ क्षीर नीर निवडणारा एक पक्षी आहे लो० ५, नित्यानित्य विच्यार कर्ते ज्ञानी अ० श्रीगुरु.
हंसकुलप्रभु- सं० ना० श्रीराम- राघव- अ० रघुनाथ.
हंसकुलभूषण- सं० नां० श्रीराम श्रीरघुनाथ.
हंसकुलवर्य- सं० नां० श्रीराम.

श्रीरघुनाथ- उ॰ भक्तांसाठीं झाला जल
गार न्याय॥ हंस कुलवर्य कृपासिंधु॥ ॥

**हंसगमनी**- सं॰ अप॰ ना॰ हंस गामि
नी म्ह॰ सरस्वती॰

**हंसवाहन**- सं॰ ना॰ ब्रम्हदेव॰

**हंसवाहिनी**- सं॰ ना॰ सरस्वती॰

**हस्तमात्रा**- सं॰ ना॰ कडीं तोडे अ॰
गोट पाटल्या आदि करून हस्तभूषणें॰

**हस्तोदक**- सं॰ ना॰ संकल्पोदक-
ज्ञा॰ अ॰ १ ओ॰ ३२२-३२३

**हळ**- सं॰ अप॰ ना॰ हल म्ह॰ नांगर॰

**हळधर**- सं॰ अप॰ ना॰ हलधर म्ह॰
बलराम॰

**हळाहळ**- सं॰ अप॰ ना॰ हालाह
ल विष॰

**हळाळ**- सं॰ अप॰ ना॰ हालाहल
विष॰

**हळुवट**- प्रा॰ वि॰ १ हळू- २ उणें॰ कु
उपमे देतां द्विजराजभार्या॥ तेही वाटे
हळुवट॰

## हा

**हाकारा**- सं॰ अप॰ ना॰ दौंडी- भा॰
अ॰ ५ ओ॰ ५५७

**हाट**- सं॰ अप॰ ना॰ हाटक म्ह॰ बा
जार॰

**हाटकरस**- प्रा॰ ना॰ शाई॰

**हाठावोवरी**- प्रा॰ अ॰ येथवर- अमृ॰
प्र॰ १ ओ॰ ६

**हाणावन**- प्रा॰ ना॰ हाणावनी-

**हाणावनी**- प्रा॰ ना॰ आवड- ज्ञा॰
अ॰ १८ ओ॰ १०

**हालणें**- प्रा॰ धा॰ ना॰ सारवणें-
ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ ५३२

**हाततुक**- प्रा॰ ना॰ अटकळ- ज्ञा॰
अ॰ १८ ओ॰ १३१॰

**हातफळी**- प्रा॰ अ॰ हातोपाती-
ज्ञा॰ अ॰ १८ ओ॰ १२२

**हातरूं**- सं॰ अप॰ ना॰ हत्ती॰

**हातवटी**- प्रा॰ ना॰ धाटनी- प्रकार
ज्ञा॰ अ॰ ९ ओ॰ २२९

**हातवसणें**- सं॰ अप॰ धा॰ ना॰
हस्तगत करणें अ॰ होणें- भा॰ अ॰
७ ओ॰ १५४॰

**हातवसी**- प्रा॰ धा॰ ना॰ हात उगा
रणें- प्र॰ ६ ओ॰ ४३ अमृ॰

**हातवा**- प्रा॰ ना॰ काडवात- ज्ञा॰
अ॰ १६ ओ॰ २३

**हातिणें**- प्रा॰ धा॰ ना॰ मारणें- भा॰
अ॰ १ ओ॰ ३८८॰

**हातिवा**- प्रा॰ ना॰ पाहा- हातवा

**हातींचामळु**- सं॰ अप॰ ना॰ क
रतलामलक॰

**हातोफळी**- प्रा॰ अव्य॰ हातोपा
ती- भा॰ अ॰ २३ ओ॰ ६८२॰

**हादंशु**- सं॰ अप॰ ना॰ हृद्गतांश
म्ह॰ हृद्गताभिप्राय- ज्ञा॰ अ॰ ९

ओ०१३६.
**हायन**- सं०ना० वर्ष
**हार**- प्रा०ना० मोगीमाला-ज्ञा०अ० ९ओ०१४८
**हालाहल**- सं०ना० विष-कालकूट.
**हाव**- प्रा०ना० इच्छा-आशा.
**हावभाव**- प्रा०ना० कामोत्पादकचेष्टा.
**हावरें**- प्रा०वि० आशाळ-उ०॥ हावरीनें म्याकंचुकीलोभें॥ वनींधाडिये लाभर्त्तारे॥
**हावाव**- प्रा०ना० ह्वाव अ०शोभा

## हि-ही.

**हिंगुरडें**- प्रा०ना० हिंगाच्या अवपथ्यानें होतें बेंडतें.
**हिणकट**- प्रा०ना० खोटे नाणें-२वि० खोटसाळ.
**हित**- सं०ना० कल्याण.
**हिनसुदें**- प्रा०वि० हिरमुसें अ० हिरमुसलेलें.
**हिंपुटी**- प्रा०वि० कष्टी-भा०अ०७ ओ०२०४.
**हिमनग**- सं०ना० हिमाचल.
**हिमनगजामात**- सं०ना० शिव.
**हिमनगबाळा**- सं०अप०ना० पार्वती.
**हिमभानु**- सं०ना० चंद्र.
**हिमाचळ**- प्रा०ना० हिमालय.
**हिमांशु**- सं०ना० चंद्र.
**हिमालय**- सं०ना० नवखंडात्मक भारतवर्ष त्याच्याउत्तरेस व किन्नरवर्षाच्या दक्षिणेस असाउभयमध्य भागींपर्वत आहेतो.
**हियें**- सं०अप०ना० हृदय-ज्ञा० अ०६ओ०३७६-ज्ञा०अ०९ओ० ३५ ज्ञा०अ०११ओ०४७.
**हियें**- प्रा०ना० भय-ज्ञा०अ०६ ओ०७७.
**हिरणें**- सं०अप०धा०ना० हरण करणें-ज्ञा०अ०१६ओ०४१५
**हिरण्य**- सं०ना० सोनें.
**हिरण्यगर्भ**- सं०ना० ब्रम्हांडीचा सूक्ष्मदेह.
**हिरवट**- प्रा०वि० तापट-एक कळी
**हिलावणें**- प्रा०धा०ना० हलविणें दा०द०१स०२ओ०१३
**हिवारें**- प्रा०ना० शीतज्वर अ० हींव ताप.
**हिवासणें**- प्रा०धा०ना० हिरमुसणें-दा०द०३स०२ओ०१८.
**हिंसक**- सं०ना०१ खाटीक-२कसाब-२वि० दयाहीन.
**हीन**- सं०वि० नीच.
**हीर**- सं०वि० श्रेष्ठ.
**हीरभरणें**- प्रा०धा०ना० लचकणें

हुडक- प्रा॰ना॰ हुडुक.
हुडकणें- प्रा॰धा॰ना॰ शोधणें-शोधकरणें-
हुंडका- प्रा॰ना॰ दुःखाचालोट.
हुंडा- प्रा॰ना॰ बुरूज.
हुतवह- सं॰ना॰ अग्नि.
हुताश- सं॰ना॰ अग्नि.
हुताशन- सं॰ना॰ अग्नि.
हुतास- सं॰अप॰ना॰ हुताश.
हुप- सं॰ना॰ १ उत्सुकता-२ धैर्य.
हुंबरणें- प्रा॰धा॰ना॰ शब्दकरणें-ओरडणें-
हुंबळी- प्रा॰ हुंबरीहमामा.
हुंबा- प्रा॰वि॰ रडका-रड्या-दा॰द॰१९ स॰९ ओ॰२९.
हुमणी- सं॰ना॰ बुकी-अ॰ ठोंसरा.
हुरहूर- प्रा॰ना॰ उदासी.
हूण- सं॰ना॰ हूणदेशीयलोक म्ह॰ इंग्रज.
हृदय- सं॰ना॰ १ अंतःकरण-२ अभिप्राय.
हृदयशून्य- सं॰वि॰ निकाळीजें-पाषाणतूल्य.
हृद्य- सं॰वि॰ सुंदर.

## हे-है-हो.

हेकाड- प्रा॰वि॰ एककल्ली-दा॰द॰१२ स॰४ ओ॰१९.
हेजीब- सं॰ना॰ दूत-सेवक.
हेत- सं॰अप॰ना॰ हेतु अ॰ अभिप्राय-दा॰द॰११ स॰२ ओ॰६
हेती- सं॰ना॰ खड्ग.
हेतु- सं॰ना॰ १ कल्पना-ज्ञा॰अ॰८ ओ॰८८- २ कारण-ज्ञा॰अ॰९ ओ॰१३१- ३ इच्छा-कामना.
हेतुक- सं॰वि॰ कामनीक.
हेतुकपण- सं॰अप॰ना॰ कामना ज्ञा॰अ॰२ ओ॰२५२
हेम- सं॰ना॰ सोनें.
हेमकट- सं॰अप॰वि॰ सोनेरी.
हेमधर- सं॰ना॰ सुवर्णाचल अ॰ मेरू.
हेयोपादेय- सं॰वि॰ त्याज्य ग्राह्य.
हेरंब- सं॰ना॰ गणपति.
हेवड- प्रा॰ना॰ गुंताडा-दा॰द॰१५ स॰१ ओ॰५
हेवा- प्रा॰ना॰ मत्सर-दा॰द॰२ स॰१ ओ॰५२.
हेळसणें- सं॰अप॰धा॰ना॰ हेलनाकरणें-
हेळा- प्रा॰ना॰ १ क्षण- विवे॰पू॰ प्र॰२ ओ॰१-२ दृष्टि- स॰ ओ॰४८३ अ॰ ३ सत्वर- आ॰पं॰१४ स॰१ ओ॰ ३॰॥ आम्हांटाकुनियांहेळा॥ कोठें गेलासीगाबाळा॥ अभंग॥
हेळी- सं॰ अप॰ना॰ हेलिक अ॰ सू

र्य- मुक्ते· वन· अ·१७ओ·६-क·अ· १६ ओ·२७
हैमवती- सं· ना· पार्वती·
हैरण्यगर्भमती- सं· ना· माणा त्मवादी·
हैहय- सं· ना· सहस्रार्जुन·
होआवें- प्रा· क्रि· व्हावें·
होकरणें- प्रा· धा· ना· योजावणें·
होड- प्रा· ना· पैज·
होता- सं· ना· हवनकर्ता·
होनेणें- प्रा· क्रि· होऊंनजाणें-हो ऊंजाणेना·
होपळ- प्रा· वि· पोकळ- निष्फळ· फलकट·
होमणें- सं· अप· धा· ना· जाळ णें·
होरपळणें- प्रा· धा· ना· भाजणें
होला- प्रा· ना· घरांतशिरण्यास निंद्यअसापक्षी तो·
होसरणें- प्रा· धा· ना· होणें- अ मृ· प्र· ६ ओ· १०२
ह्रद- सं· ना· डोह·
ह्रस्व- सं· वि· लहान- अरवूड·
ह्रास- सं· ना· नाश·

## क्ष-क्षा

क्षइष्णु- सं· वि· नश्वर अ· नाशिवंत
क्षणदाचर- सं· ना· राक्षस·
क्षतज- सं· ना· रक्त·
क्षत्ता- सं· ना· विदुर·
क्षति- सं· ना· नाश·
क्षत्रिय- सं· ना· चत्वारवर्णांतील दुसरावर्णतो·
क्षत्रियांतक- सं· ना· श्रीपरशुरा मविष्णूचा साहावा अवतार·
क्षपणकमत- सं· ना· शून्यास. वादमत अ· नास्तिकमत·
क्षपा- सं· ना· रात्र·
क्षपाचर- सं· ना· राक्षस·
क्षमा- सं· ना· १ पृथ्वी· २ सहनता·
क्षमाध्र- सं· ना· पर्वत·
क्षयरोग- सं· ना· धातुक्षयव्याधि
क्षर- सं· वि· नाशिवंत·
क्ष्मा- सं· ना· पृथ्वी·
क्ष्मापति- सं· ना· राजा·
क्ष्वेड- सं· ना· विष·
क्षार- सं· वि· खारट·
क्षाराब्धि- सं· ना· लवणाब्धि अ· क्षारसमुद्र·
क्षिति- सं· ना· पृथ्वी·
क्षिती- प्रा· ना· खंती- हुरहूरहूर
क्षीर- सं· ना· दूध·
क्षीरसागर- सं· ना· दुग्धसमुद्र
क्षीराब्धिकन्या- सं· ना· लक्ष्मी·
क्षीराब्धिजामात- सं· ना· विष्णु
क्षीराब्धितनया- सं· ना· लक्ष्मी·
क्षीरोदकपाटोळा- सं· अप· ना·


पांदरें पातक·
**क्षुद्र**- सं॰ वि॰ अल्प अ॰ लहान·
**क्षुर**- सं॰ ना॰ वस्त्रा·
**क्षुल्लक**- सं॰ वि॰ नीच- हलका·
**क्षुरप्र**- सं॰ ना॰ बाण·
**क्षेत्र**- सं॰ ना॰ १ पुण्यग्राम- २ देहास संज्ञा·
**क्षेत्रज्ञ**- सं॰ ना॰ जीव- ज्ञा॰ अ॰ १३ ओं॰ १·
**क्षेत्री**- सं॰ अप॰ ना॰ क्षत्रिय·
**क्षेम**- सं॰ ना॰ १ कल्याण- २ आलिंगन·
**क्षोणी**- सं॰ ना॰ पृथ्वी- २ संख्या·
**क्षोभ**- सं॰ ना॰ क्रोध

## ज्ञ-ज्ञा·

**ज्ञप्ति**- सं॰ ना॰ लय साक्षीज्ञान·
**ज्ञप्तिचिन्मात्र**- सं॰ वि॰ केवळज्ञानस्वरूप·
**ज्ञातता**- सं॰ ना॰ पंचविषयांतून कोणेकविषयीं मनबुध्धिचाविकल्पहोऊनगेल्यावर जी ज्ञानाची सामान्यावस्थातिचेंनाव·
**ज्ञाता**- सं॰ ना॰ १ ज्ञानीपुरुष- २ किज्ञानवान्·
**ज्ञान**- सं॰ ना॰ कळणेपणा·
**ज्ञानकळा**- सं॰ अप॰ ना॰ ज्ञानकलाचित्कला·
**ज्ञानकांड**- सं॰ ना॰ त्रिकांडवेदांतील मोक्षकर असें स्वरूपावस्थानरूपतिसरें कांडतें
**ज्ञानगुरु**- सं॰ ना॰ मोक्षगुरु म्हणजेमहावाक्योपदेशों करून ब्रम्हप्रत्यगात्मैक्यप्रत्ययास आणून देणारा त्याचेंनाव·
**ज्ञानघन**- सं॰ वि॰ ज्ञानपरिपूर्ण
**ज्ञानजनक**- सं॰ वि॰ ज्ञानोत्पादक
**ज्ञानदाता**- सं॰ ना॰ श्रीगुरू·
**ज्ञानमात्र**- सं॰ वि॰ ज्ञानस्वरूप·
**ज्ञानशक्ति**- सं॰ ना॰ ज्ञानेंद्रियपंचकास संज्ञा·
**ज्ञानसागर**- सं॰ ना॰ ज्ञानसमुद्र·
**ज्ञानार्क**- सं॰ ना॰ ज्ञानसूर्य·
**ज्ञानांजन**- सं॰ ना॰ ज्ञानरूपनेत्रौषध·
**ज्ञानाब्धि**- सं॰ ना॰ ज्ञानसमुद्र·
**ज्ञानासि**- सं॰ ना॰ ज्ञानखड्ग·
**ज्ञानी**- सं॰ ना॰ स्वकीयस्वरूप जाणता पुरुष·
**ज्ञानेंद्रियकपंचक**- सं॰ ना॰ श्रोत्र- त्वचा- चक्षु- जिव्हा- घ्राण- यांचासमुच्चयाचेंनाव·
**ज्ञानोत्तरकाल**- सं॰ ना॰ सविकल्प अ॰ निर्विकल्प जीवन्मुक्तदशा तिचेंनाव·

**दुसराभागसमास·**

समाप्त.



| पृष्ठ. | ओळ. | अशुध्ध. | शुध्ध. |
|---|---|---|---|
| १० | १७ | करितो | करीतो. |
| १० | २० | कोडून | कोंडून. |
| ११ | ५ | उत्तमोचें | उत्तमोचे. |
| ११ | ११ | दुष्टा | दुष्ट. |
| १२ | १५ | बालिजे | बोलिजे. |
| १५ | १० | करीं | करिं. |
| १५ | १७ | ऐसें | ऐसे. |
| १७ | १ | जय | जये. |
| १७ | १ | हीं | ही. |
| १७ | १ | स्छितिमाजी | स्छितीमाजी. |
| १८ | २४ | भज | भजन. |
| १८ | २७ | अहो | अहोतो. |
| २० | १४ | शरी | सरी. |
| २२ | २७ | तिखुकें | तिकडें. |
| २२ | २ | ना | नाहें. |
| २५ | २५ | सर्व | सर्प. |
| ३४ | २२ | निश्चन्नि | निश्वळन्नि. |
| ३५ | ५ | करतील | करील |
| ३५ | २५ | आणी | आणीक. |
| ३७ | २२ | अवांत | अवांतर. |
| ३८ | १९ | सांठवावी | सांडवावी. |
| ४१ | २३ | राहो | रोहो. |
| ४२ | २ | अकरांत | अकारांत. |
| ४४ | २ | घुंगुरडें | घुंगरडें. |
| ४४ | २३ | गोजिर,वाणें | गोजिरवाणें. |
| ४५ | २२ | साइरीक. | सोइरीक. |
| ४६ | २४ | धाव. | घाव. |
| ४७ | ११ | अकारात. | अकारांत. |
| ५४ | २७ | बिघत | बिघडत. |

भाग २

| पृष्ठ | कालम | ओळ | अशुध्ध | शुध्ध. |
|---|---|---|---|---|
| २ | २ | २७ | पंचमहाभूतेंच तीन गूणमि | आगंतून तीन वजाजातां चार्थ |
| ,, | ,, | ,, | ळून प्रकृतिती. | पांचया अर्थानें पंचमहाभूतें |
| ३ | १ | २१ | त्यांचे | त्याचें. |
| ४ | १ | १५ | दोही-च्या | दोहीं-च्या. |
| ४ | १ | १८ | वेदांत, शास्त्रांत | वेदांतशास्त्रांत. |
| ११ | १ | २९ | अनौते | अनौतें |
| १५ | २ | २१ | भोंपाळा. | भोंपळा. |
| १९ | २ | ११ | मन्वांतरांत | मन्वंतरांत. |
| २३-२६ | २-२ | १-१९ | श्रीगुरू | श्रीगुरु. |
| ३५ | २ | २८ | षड्चक्राती | षड्चक्रांतील. |
| ३६ | १ | ६ | सांनिध्ध | सांनिध्य. |
| ४४ | २ | २६ | हत्तीचाछाव | हत्तीचाछावा. |
| ५३ | २ | २८ | षड्रिपुसंज्ञा | षड्रिपूंससंज्ञा. |
| ६१ | २ | २३ | गपत्ति. | गणपति. |
| ७४ | २ | २ | प्रत्यागात्मा | प्रत्यगात्मा. |
| ९९ | २ | २२ | ना० | वि०. |
| १०० | १ | २१ | अप० | अप० ना०. |
| १०६ | १ | १९ | धारण | धरण. |
| १११ | १ | ३ | उपास | उपासना. |
| ११३ | १ | ११ | युगाच्ची | युगांची. |
| ११९ | २ | ७ | पंचत्वें | पंचतत्वें. |
| १२० | १ | २ | तेणें करू | तेणें करून. |
| १४६ | २ | २९ | भा | भ. |
| १७६ | १ | १८ | थवा | अथवा. |
| १७७ | २ | २९ | नाहींत | नाहीं. |
| १९५ | १ | १२ | शापरिध्वज | शफरिध्वज. |
| १९८ | १ | २१ | जें जेव्हां | तें जेव्हां. |
| १९९ | १ | २७ | वेदश्रुतवाणीती | वेदवाणीजी. |
| २०८ | १ | १८ | साहजमाधि | सहजसमाधि. |
| ४३ | १ | २४ | ना० | वि०. |